ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

दिवाळी अंक

ऑक्टोबर–नोव्हेंबर २०११ मूल्य १००₹






टाटा सॉल्ट लाईटची निवड म्हणजे
तुमच्या पतिराजांसाठी हलक्या-फुलक्या
आनंदाची निवड.
आता, इ.एम.आय. वाढो, शेयर बाजार कोसळुदे, किंवा आयुष्य आणखी
धकाधकीचे होउदे, तुमचे पतिराज नेहमीच खुष राहतील.
आहारात सोडीयम कमी प्रमाणात असल्यास रक्तदाबावर नियंत्रण
राहण्यास मदत होते. टाटा साल्ट लाईट तुम्ही अगदी नेहमीच्या मिठाप्रमाणेच
वापरू शकता आणि तेही चवीबद्दल तडजोड न करता.
आता टाटा साल्ट लाईटची निवड करुन
आपल्या पतिराजांची ताण तणावापासुन सुटका करा.
LOW SODIUM SALT*
TATA SALT LITE
LOW SODIUM SALT
घरी आणा आयुष्यातील हलका फुलका आनंद
टाटा मीठामुळे तुमच्या जेवणाची चव कायम राहते कृपया ज्यांनी आहारात पोटॅशियमवरती नियंत्रण
ठेवण्यास सांगितले आहे त्यांनी वापरण्याआधी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

सप्रेम नमस्कार,
सोबत ‘रुची’ दिवाळी अंक
पाठवला आहे.
आपली प्रतिक्रिया जाणण्यास
उत्सुक आहोत.
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छांसह!
आपले स्नेहांकित,
अरुण जोशी, संपादक
सुदेश हिंगलासपूरकर, विश्वस्त
आणि
ग्रंथाली परिवार

ग्रंथाली

जैन सौर उत्पादनांनी धरली प्रगत तंत्रज्ञानाची कास
संपला अंधाराचा प्रवास, प्रकटला दिव्यप्रकाश..!





वॉटर हीटर ■ कंदील ■ होम लायटींग ■ पॉवर पॅक (इन्व्हर्टर) ■ स्ट्रीट लायटींग
ट्रॅकरसह सौरपंपः शेती, घरे व हातपंपासाठी ■ ग्रीड कनेक्टेड पॉवर प्लांट

*शासकीय अनुदान उपलब्ध

*अटी लागू

MNRE
International Organization For Standardization
MEDA महाऊर्जा
Government of india
Minisry of commerce & Industry
Department of commerce
Directorate General of Supplies & Disposcle
CRISIL RESEARCH

जैन सौरवंब®
जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®
जैन ज्योत®


जैन ग्रीन एनर्जी पार्क; पो. बॉ. २०, जळगांव-४२५००२; फोनः ०२५७ ६६३०६१४, मनोज सुतावणे- ०२५७ ६६३०६०९
फॅक्सः ०२५७ २२६११५५; ई-मेलः solar@jains.com; वेबसाईटः www.jains.com


*सूर्यनारायणासमवेत संयुक्त प्रकल्प!*


**ज्ञानेश्वर भिसे** ९४२२७७५९३० (अहमदनगर, औरंगाबाद, जालना, बीड) **लक्ष्मण धांडे** ९४२२७७५९२८ (अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा) **अनुप आगीवाल** ९४२२७७५९२७ (जळगांव, धुळे, नाशिक) **विजय उरमुडे** ९४२२७७५९३९ (सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, बेळगाव, गोवा) **देवीदास पाटील** ९४२२७७५९३१ (पुणे, सातारा, रत्नागिरी) **प्रवीण कुलकर्णी** ९४२२७७५९३३ (सोलापुर, उस्मानाबाद, लातूर) **दीपक पाटील** ९८७०९९०७५० (मुंबई, ठाणे, रायगड) **राजेश कपाले** ८६००९९३९०७ (नागपूर) **भागवत कुंभार** ९४२२७७५९४० (नांदेड, परभणी, हिंगोली)



शुभ दिपावली
दि शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि.
(मल्टि-स्टेट शेडयुल्ड बँक)
(स्थापना:1906)
व्यक्तिगत सेवेसाठी
Call: 022-66999777 | www.svcbank.com
• बचत व चालू खाते • मुदत ठेवी • लघु व मध्यम उद्योगधंद्यांसाठी अर्थसहाय्य • गृह व वाहन खरेदीसाठी कर्जे • एनी ब्रांच बँकिंग (ABB)
• भारतभर एटीएम् (ATM)चे विस्तृत जाळे • इंटरनेट बँकिंग • आयुर्विमा म्युच्युअल फंडांचे वितरक
• आर. टी. जी. एस., एन. ई. एफ. टी. व डीमॅट • परकीय चलन विनिमयाचा परवाना


चौगुले समुहा कडून दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !
चौगुले समूह
www.chowgule.co.in





# रुची


**ऑक्टोबर–नोव्हेंबर २०११**

**वर्ष ३१ वे, दिवाळी अंक, मूल्य १०० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**

कार्यकारी संपादन : **अरुण जोशी**

मुखपृष्ठ व आतील चित्रे : **सतीश भावसार**

मांडणी : **योगिता मोरे**

जाहिरात व्यवस्था : **सुदेश हिंगलासपूरकर**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता

ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची

म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर (प),

मुंबई ४०० ०२८

फोन : २४४७ ४८ ४३

Email - granthali01@gmail.com



**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**


## अनुक्रम


### व्यक्ती–अभिव्यक्ती

पेरणी झाली कागदांवर / स्मिता भागवत / ९

इरेना सेण्डलर : मृत्युगोलातली जीवनदायिनी / कुमार नवाथे / २६

ध्येयवेडा सेनापती / प्रमोद बक्षी / ३४

एकांतपुरुष / प्रवीण बर्दापूरकर / ४५

मूकपटात शेक्सपीयर / विजय पाडळकर / ५८

क्लब ट्वेन्टीसेव्हन! / अपर्णा पाटील / ६८

मन:स्पर्शी / लतिका भानुशाली / ९५

लता आखिर लता है / दिवाकर गंधे / ९९

माथाडींचा डॉक्टर–मित्र / दिलीप जोशी / ११३

एक स्मरणसहल / उषा मेहता / १६४

### ललित–वैचारिक

सॉरी फॉर द ब्रेक ते कमर्शियल ब्रेक! / नरेंद्र बेडेकर / ९१

मधमाश्यांची अजब दुनिया / डॉ. सुजाता देशपांडे / ११९

घटस्फोटाचा सोहळा! / केतकी नवाथे / १२३

चोरांच्या दुनियेत / अरुण पुराणिक / १२८

संवादाचे सद्भान / डॉ. यशवंत पाठक / १४०

किरकोळ व्यापारातील सांस्कृतिक घटीत / गजानन खातू /१४५

'ब्रँड' न्यू स्टोरी / अपर्णा चवाथे / १५४

प्राग व कारालावो वारी / सुधीर कुलकर्णी / १५९

भ्रष्टाचार असावा तर असा! / दिलीप चावरे / १८६

हसरा सूर्य आणि नक्षत्रमंडल / रमेश पंचवाघ / १९०

## संपादकीय

स.न.

भारतवर्षात सध्या व्यक्ती आणि त्यांचं कर्तृत्व यांचा बोलबाला आहे. अण्णा हजारे यात सर्वोच्च स्थानी आहेत. त्याआधी भाजी स्वस्त की टूजी असा संभ्रम निर्माण करणारे राजा, कनिमोळी आणि नरो वा कुंजरोवा भूमिका घेणारे मनमोहन सिंग गाजत होते. आता दारिद्र्यरेषेचा ब्रॉड ब्रॅन्ड करणारे मॉन्टेकसिंग अहलुवालिया चर्चेत आहेत. 'दक्ष' राहून मोदींची गांधीगिरी सुरू झाली आहे आणि अडवाणींनी जेपींकडून घेतलेली चेतना भारतभ्रमण करणार आहे. एकमेकांना खड्ड्यात पाहणारे राज-उद्धव मराठी सत्तेच्या नळावर कसे भांडतात हे आपण पाहतोच आहोत. ही लोकशाही आहे! इथे व्यक्तिस्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य आहे! या लोकशाहीचा चौथा स्तंभ तर इतका उंच झालाय की त्याकडे डोळे वर करून पाहणाऱ्याची टोपी पडते. तो दात विचकतो आणि सारे त्याला वचकून असतात. यांना तर विषय कुठलाही चालतो. फक्त तो दर्शनीय असावा. नसला तर करावा! मग घडवायच्या आक्रस्ताळी चर्चा. तेच वक्ते, तेच श्रोते, तेच प्रश्न आणि तीच उत्तरं... तेच ते नि तेच ते! शिवाय, चोवीस तास रिॲलिटी शो किंवा 'झाडावरती गेंद लटकती, शेतामधूनी बॅटी' या शांताबाईंच्या ओळींचा मंत्र घेऊन कृषिमंत्र्यांनी घडवलेली 'आपली माणसं, आपली क्रिकेटशेती', असे कार्यक्रम पाहणारा १२० कोटींचा 'रसिक'वर्ग! हे महासत्तेकडे जाणाऱ्या देशाचं वर्तमान आहे.


समाज बनतो तोच विविध अभिव्यक्तींच्या व्यक्तिसंचयातून. त्यातील आपल्याला समृद्ध करणाऱ्या, समाजभान देणाऱ्या व्यक्तींचं व्यासपीठ म्हणून ग्रंथालीनं आपला टीआरपी गेली पस्तीस वर्षं अबाधित राखलाय. त्यामुळे या अंकातले लेखही 'व्यक्ती-अभिव्यक्ती'चं रूप साकारतात. या व्यक्तींची क्षेत्रं वेगळी, कर्तृत्व वेगळं. जगणं वेगळं आणि जीवनानुभव वेगळा.

जेम्स नॉर्मन हॉल या प्रसिद्ध लेखकाच्या मृत्यूस ६० वर्षं होत आहेत. त्यानिमित्त स्मिता भागवत यांनी त्यांच्या आत्मकथनातील भागाचा केलेला अनुवाद अंकाची हृद्य

**अनुभव / कथा**


कोंडवाड्यातले मांडे / डॉ. उज्ज्वला दळवी / १५
महामार्ग / डी.व्ही. कुलकर्णी / ५०
गगनभरारी एका झंझावाताची! / उमेश कदम / ६३
अबफाल विरशाफ्ट / संगीता उत्तम धायगुडे / ७७
वानरस्मृती / प्रभा पुरोहित / ८६
पायल / डॉ. माधवी मेहेंदळे / १३५
टाळी / चांगदेव काळे / १७४
लढा स्वत:चा स्वत:शी / विमल कुलकर्णी / १९२

**कवितेची पाने** / १६७
डॉ. यशवंत मनोहर, प्रमोद वाळके 'युगंधर', सदानंद डबीर, संदीप माळवी, विजय शं. माळी, अशोक कोतवाल, बबन लोंढे, प्रतिभा सराफ, छाया कोरेगावकर, शारदा नवले, मनोहर जाधव, जया भीमराव जगताप, विद्युल्लेखा अकलूजकर, सतीश सोळांकूरकर, दत्ता हलसगीकर, श्रीपाद भालचंद्र जोशी, सदानंद सिनगारे



सुरुवात करतो. डॉ. उज्ज्वला दळवी यांनी सौदी अरेबियातील नर्सच्या 'कोंडवाड्या'चा लिहिलेला प्रसंग चित्रदर्शी आहे. पोलंडमधील घेट्टोतून अडीच हजार ज्यू बालकांची सुटका करताना इरेना सेंडलरनं घेतलेली जीवघेणी जोखीम कुमार नवाथे यांनी ज्या परिणामकारकतेनं मांडली आहे त्यानं हृदय पिळवटतं. मुंबईत फ्रिक आउट जगणारा, 'समाजसेवा'सारख्या शब्दाशी देणंघेणं नसणारा एक कलंदर आनंदवनात नाइलाज म्हणून जातो आणि तिथलाच कायमचा होतो. प्रमोद बक्षी यांनी केलेलं कन्फेशन त्यांच्याच मोकळ्या शब्दांत अवतरलंय. आनंदवनाचे डॉ. विकास आमटे यांच्यासारखी आणखी एक ध्येयासक्त डॉक्टर व्यक्ती म्हणजे माथाडी कामगारांच्या आरोग्यसेवेसाठी स्वत:ला झोकून देणारे डॉ. श्रीधर नाईक. इंजिनीयर व्हायची इच्छा असलेल्या व डॉक्टर होऊन गांधीजींचे शब्द जगणाऱ्या डॉ. नाईकांची ओळख दिलीप जोशी यांनी करून दिली आहे.

यशवंत पाठकांनी अण्णांच्या उपोषणानिमित्त 'संवादाचे सद्भान' या लेखातून केलेली टिप्पणी विचार करायला लावणारी आहे, तर दिलीप चावरे यांनी भ्रष्टाचाराचा इटालियन मार्ग दाखवलाय.

कवी ग्रेस यांची नाडी पकडण्याचा प्रयत्न प्रवीण बर्दापूरकर यांनी केला आहे. ख्यातनाम समीक्षक माधव मनोहर यांची जन्मशताब्दी झाली. त्यांच्या आठवणींना उजाळा देणारी स्मरणसहल उषा मेहता यांनी आगळ्या ढंगात रंगवली आहे.

ॲमी वाइनहाउस या ब्रिटिश गायिकेचा मृत्यू काही दिवसांपूर्वी, वयाच्या केवळ सत्ताविसाव्या वर्षी झाला. वयाच्या या वर्षात मृत्यू ओढवून घेतलेले ख्यातनाम कलावंत 'क्लब ट्वेन्टीसेव्हन'चे सदस्य कसे झाले हे अपर्णा पाटील यांच्या लेखातून समजतं. मूकपटांच्या आरंभकाळावर शेक्सपीयरचा असलेला प्रभाव विजय पाडळकर सांगतात. धकाधकीच्या, गतिमान जीवनात रेडिओ जॉकी आपल्या अथक संवादानं मनोरंजनापासून हवामानापर्यंतची माहिती देत आपली सोबत करतात. त्यांच्या या व्यवसायातून त्यांना मन:स्पर्शी अनुभव येतात. लतिका भानुशाली यांनी अशा तीन रेडिओ जॉकींचे अनुभव कथन केले आहेत.

व्यापार आणि बाजार, किरकोळ विक्रेते ते मॉल ही सांस्कृतिक वाटचाल मांडली आहे, अपना बाजारचे गजानन खातू यांनी. ओपन मार्केट आणि स्पर्धा यांत आपला ठसा कायम राहण्यासाठी उत्पादकांना ब्रँडिंगच्या विविध क्लृप्त्या लढवाव्या लागतात. ब्रँड निर्माण करणं हे एक आव्हानात्मक कसब आहे. यात गेली काही वर्षं स्वत:चा ठसा निर्माण केलेल्या अपर्णा चवाथे ब्रँडची पार्श्वभूमी आणि त्यांचे अनुभव सांगत आहेत. बाजारपेठ आणि ब्रँडिंग यांना हवं असतं प्रभावी प्रसिद्धी माध्यम. तेच ते 'दर्शनीय' असण्याची अट असलेलं. या प्रसिद्धी माध्यमांनी जनमानसावर काय परिणाम केलाय ते नेमक्या शब्दांत प्रसृत केलंय नरेंद्र बेडेकर यांनी.

मधमाश्या वागतात कशा याची रंजक माहिती सुजाता देशपांडे यांनी सांगितली आहे, तर जपानमध्ये घटस्फोटाचाही सोहळा होतो ही माणसाची अनोखी अदा दाखवली आहे केतकी नवाथे यांनी.

अशा नवीन काही अभिव्यक्ती मांडणाऱ्या लेखांसह उमेश कदम, डी.व्ही. कुलकर्णी, प्रभा पुरोहित, चांगदेव काळे, डॉ. माधवी मेहेंदळे, विमल कुलकर्णी यांच्या कथा आणि नामवंतांसह अन्यांच्या कविता अंकाला पूर्णत्व देतात. सतीश भावसार यांनी सजवलेलं मुखपृष्ठ व आतील चित्रं यांनी अंक 'दर्शनीय'ही झालाय. ग्रंथाली परिवारातील एक झालेले आमचे स्नेही इंडिया प्रिंटिंग वर्क्सचे आनंद लिमये यांनी अंक देखण्या स्वरूपात सिद्ध केला आहे. अंकातील लिखाणाला शुद्धतेचा स्पर्श देणाऱ्या शकुंतला मुळ्ये, नेहमीच्या सरावानं अंक सिद्ध करताना टेन्शन घेणारी योगिता आणि जाहिरात व वितरण चोख ठेवणारी महेश, शिवाजी, हरिप्रसाद ही ग्रंथाली टीम या साऱ्यांच्या सहकार्यातून अंक घडलाय.

दिलीप चावरे आणि विनायक गोखले यांचं पाठबळ सर्वच आघाड्यांवर असतं. आभार मानायचे ते हितचिंतक आणि जाहिरातदारांचे.

काही वर्षांपूर्वी 'ग्रंथाली'च्या वाचकदिनी 'अर्धं आकाश' हा कार्यक्रम झाला होता. पायलटपासून रिक्षा चालवण्यापर्यंत आणि स्पेस शटलपासून स्पेस सेलिंगपर्यंत सर्वच क्षेत्रांत स्त्रियांनी कर्तबगारी सिद्ध केली आहे. आता, महाराष्ट्र सरकारनं त्यांना राजकीय अर्धं आकाश देऊ केलं आहे. हे वरातीमागून घोडं असलं तरी, निदान त्यात तरी महाराष्ट्र पहिला आहे ही समाधानाची बाब आहे. त्यामुळे अर्धी भाकरी तरी करपणार नाही हा विश्वास समाजाला लाभेल आणि हे अर्धं आकाश सबल होत जाईल. दिवाळीत दिव्यांची नाही पणत्यांचीच आरास शोभते. मंद तेवत या पणत्या अंधारावर मात करतील. कोळशानं काळं केलेलं विजेचं तोंड ही दीपावली उजळेल ही शुभेच्छा. पुढील अंक डिसेंबरचा.

– अरुण जोशी


ह्या दिवाळीत युनियन बँकेच्या खास ऑफर्सच्या सहाय्याने
तुमची स्वप्ने साकार करा
युनियन होम
आमचे 10 पॉइंटर गृह कर्ज घ्या आणि प्रोसेसिंग शुल्कावर 50% सूट मिळवा
युनियन माईल्स
नविन कार घरी घेऊन या आणि प्रोसेसिंग शुल्कावर 50% सूट मिळवा
युनियन गोल्ड
सोन्याची नाणी आता 2 ग्रॅम्स, 5 ग्रॅम्स, 8 ग्रॅम्स, 10 ग्रॅम्स, 20 ग्रॅम्स, आणि 50 ग्रॅम्स मध्ये उपलब्ध.
युनियन बँक
ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक
टोल फ्री: 1800 2222 44
www.unionbankofindia.co.in

Supreme©
People who know plastics best

# दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !

दिपावली म्हणजे
विलक्षण असा आनंदाचा सण
सुख, शांती, समृध्दी
यांचा त्रिवेणी संगम

सोबतच लाभावे आपणास
आरोग्याचे धन
पाणी व सांडपाण्याचे
करू या व्यवस्थापन

“सुप्रीम” पाईप्स् व फिटींग्ज
सदैव आपल्या सेवेत सक्षम




दि सुप्रीम इंडस्ट्रीज लि., मुंबई • जळगाव • गाडेगाव
www.supreme.co.in

# पेरणी झाली कागदांवर

स्मिता भागवत

जेम्स नॉर्मन हॉल (२२ एप्रिल १८८७ ते ५ जुलै १९५१) या लेखकाच्या मृत्यूस यंदा ६० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त साहित्यक्षेत्रात जगभर वर्षभर विविध उपक्रम साजरे होत आहेत. लेखकानं ताहितीत व्यतीत केलेला काळ, होतकरू साहित्यिकाची जडणघडण वर्णन करणारा आहे. हा परिसर लेखकास इतका पसंत पडला, की पुढे त्यास तिथेच वास्तव्य करावेसे वाटले. त्याने ताहितीसच देह ठेवला. लेखकाच्या मृत्यूनंतर (१९५२) प्रकाशित झालेल्या, 'माय आयलंड होम' या आत्मचरित्रातील भागाचा स्वैर अनुवाद करून, मराठी भाषाभगिनीकडून या ज्येष्ठ लेखकास ही शब्दांजली!

**ता**हितीची राजधानी पॅपी येथे राहत असताना, मला पैसे संपत आल्याची जाणीव झाली. शहरात राहणे परवडणार नाही, याचीही! म्हणून मी शहरातील मोठे घर सोडून जवळच्या गावी राह्यचे ठरवले. त्यानुसार एका घराचे सहा महिन्यांचे भाडे भरून मी तिथे राहायला गेलो.

जागा छोटी असली तरी सोयीची होती. घरास तळघर होते. भोवती दोन-तीन बिघे जमीन होती. फळे- भाज्या लावून खर्चात घट करण्याची सोय मला आवडली. लगेच मी अमेरिकेहून उत्तम बियाणे आणि अवजारे मागवली. मी शेतकरी नव्हतो, पण किचन गार्डन कुणालाही करता येते, असा माझा समज! लवकरच भ्रमनिरास होऊन तो माझा गोड गैरसमज ठरला! मी पेरणी करताच लाल मुंग्या नि खेकडे ताव मारायला पुढे सरसावले. एक घोसाळे, तीन टोमॅटो नि मक्याची दोन कणसे माझ्या हाती आली. कणसातील बहुतेक दाणे उंदीरमामांनी कुरतडले होते. बियाणे व अवजारांचा खर्च वजा जाता, हा ऐवज साडेपंधरा डॉलरना पडला.

पहिला प्रयत्न अयशस्वी होताच निराश होणे मला पटले नाही. मी पुन्हा अमेरिकेहून उत्तम बियाणे मागवले. ते येताच मी पेरणीसाठी सफाईकाम करायला गेलो. पण लाल मुंग्या नि खेकडयांची फौज माझ्या पेरणीच्या प्रतीक्षेत खोळंबलेली दिसली. मला प्रचंड नैराश्य आले. काही पिकवून पोटाचा प्रश्न सोडवण्याचे अशक्यप्राय स्वप्न बघण्यापेक्षा, लेखनावर लक्ष केंद्रित करून पैसे कमावणे बरे, असा साक्षात्कार झाला. अर्थातच मी पेरणीचा विचार सोडला.

लेखनसामग्रीची गौर टेबलावर मांडून लेखनाचा श्रीगणेशा करण्याचा शुभसंकल्प सोडला. तो अंमलात आणण्यासाठी दुपारी मी कागद सरसावून खुर्चीवर आसनस्थ झालो. मात्र, पेन उघडले तरी ते बुंदी पाडण्याच्या झाऱ्याप्रमाणे लेख पाडू शकले नाही. मन एकाग्र करणे जमत नसल्याने, नजर कागदावर स्थिर न होता इथे-तिथे भिरभिरत होती. मला उघड्या खिडकीतून बागायतदार शेजारी हॉपसिंग दिसला. तो कष्टाळू आणि प्रामाणिक शेतकरी होता. अमेरिकेहून मागवलेल्या उत्तम

बियाण्याची पाकिटे माझ्यासाठी निरुपयोगी होती. म्हणून मी त्यास हाक मारली. मी त्यास टोमॅटो, मुळे आणि घोसाळ्याच्या बियांची पाकिटे दिली. गोल्डन बॅटम या तिथे अप्राप्य असलेल्या मक्याचे बियाणेही त्यास देऊन, मी त्यास पाकिटावर इंग्रजीत लिहिलेली लागवड करण्याची रीत समजावली. माझे बोलणे त्याने मन लावून ऐकले. मग त्याने मला साऱ्याची किंमत विचारली.


''नव्या शेजाऱ्यानं प्रेमानं दिलेली भेट समज.'' मी हसत म्हणालो. कृतज्ञता व्यक्त करून तो निघून गेला.

माझ्यापाशी अवघे एकशे अठ्ठावीस फ्रँक्स उरले होते. लेखनाचा स्वीकार होऊन अमेरिकेहून मानधनाचा धनादेश येईतो यात भागणे अशक्य होते. तरी घरभाडे भरले असल्याने, रस्त्यावर येण्याचे भय नव्हते. मन लावून लेखन करायचे तर धूम्रपानास पर्याय नव्हता. पंचवीस फ्रँक्स त्यात गेले. थोडी रताळी आणि बीफचे काही सीलबंद डबे खरेदी करून मी पोटाचा प्रश्न स्वस्तात संपवला. हे संपले की? हा प्रश्न सामान्य नव्हता. तरी त्यावेळी सुचेल ते करू, असा विचार करून मी लेखनासाठी कंबर कसली. मध्येच आर्थिक काळजी डोके वर काढत होती. तरी मी नेटाने लेखन सुरू केले.

प्रशांत महासागराच्या - पॅसिफिक महासागराच्या संदर्भात लेखन चालू होते. वास्तविक सकस अनुभव माझ्या गाठीस होते, पण आर्थिक प्रश्न तितकाच चिंतादायक होता म्हणून मी काहीसा वैफल्यग्रस्त होतो. अपेक्षित वेगाने लिखाण होत नव्हते. बऱ्याचदा लेखन मीच नापसंत करणे घडत होते. मी वारंवार कागदाचे बोळे कचराटोपलीत टाकण्याचे धर्मकृत्य करत असताना, एकदा दारावर टकटक झाली. हॉपसिंग आला होता. छोटी भेट आणली असल्याचे सांगून तो गाडीकडे वळला. माझ्या प्रतिक्रियेची वाट न बघता! गाडीतून शँपेनची बाटली, एक कोंबडी, अंड्यांचे शिप्तर आणि तीन मोठी कलिंगडे काढून त्याने माझ्या घरात ठेवली.

त्याच्या मते छोटी असलेली भेट, मला जीवनदायक वाटली. कोंबडी पाहून माझ्या तोंडाला पाणी सुटले नाही असे नव्हे, पण कोंबडीवर ताव मारण्याचा विचार मी संयमाने दडपला. तळघरात एका मोठ्या टोपलीखाली मी कोंबडीची व्यवस्था केली. मग सहा अंड्यांचे जंबो आम्लेट केले. खूप दिवसांनी चवदार आणि पोटभर जेवण मिळाले. ढेकर देऊन मी लेखनासाठी बैठक मारली. मन शांतवल्याने लेखणी झरझर चालू लागली. स्वाभाविकच कामाने वेग घेतला.

न्यूझीलंडहून अमेरिकेस जाणारी आगबोट दर महिन्यास पॅपी बंदरास लागत असे. त्या बोटीने लेखन पाठवावे, असे मी ठरवले. हॉपसिंगच्या भेटीने पोटाचा प्रश्न थोडा सोपा केला



जेम्स नॉर्मन हॉल

तरी हाती नगद रक्कम नव्हती. म्हणून बसचा खर्च न करता मी चालत निघालो.

मस्त चांदरात होती. सर्पाकार रस्त्यावर प्रवास करताना होणारे भव्य प्रपाताचे दर्शन विलक्षण मोहक वाटत होते. उडणाऱ्या तुषारांमुळे तरल बनलेले मेघ अजस्र खडकांवर विलोभनीय कमान रचत होते. प्रचंड जलौघ खडकांवर फुटून फेसाळत, लोभस दृश्याची निर्मिती करत होते. घराघरांतून गिटार व अ‍ॅकॉर्डियनवर ताहितीच्या लोकगीतांचे सुस्वर पाझरत होते. वातावरणात धुंद आनंद प्रतीत होत होता. चालण्याचे श्रम जाणवू नयेत असा! वेगाने वाट सरत होती.

पोट भुकेची जाणीव करून देऊ लागले. रस्त्यात विखुरलेल्या तुरळक झोपड्यांबाहेर लोक शेकोटी पेटवून बसले होते. खेड्यातील लोक अनौपचारिक आणि आतिथ्यशील! पावले सहज तिकडे वळावीत असे. मी गेलो त्या शेकोटीशी आजी-आजोबासादृश दांपत्य होते. त्यांनी मला आनंदाने जेवणात सामावून घेतले. त्यांनी दिलेला पदार्थ अत्यंत स्वादिष्ट होता. मी तसे म्हणालोही! त्यावर आजोबा जे म्हणाले, ते ऐकून माझा आनंद शतगुणित झाला. कारण तो पदार्थ खेकडा आणि विशिष्ट प्रकारचे दाणे वापरून केला होता. माझ्या बागकामाचा बोजवारा उडवण्यात खेकड्यांचा मोठा वाटा! शिवाय, त्या पदार्थासाठी वापरलेले दाणे माझ्या मोकळ्या जमिनीत आपसूक उगवत होते. ते खातात, हे मला ठाऊक नव्हते. मी तसे म्हणताच आजीबाईंनी कौतुकाने नवऱ्यास आदेश दिला, 'अहो, लेकराला खेकडे पकडायला शिकवा.' आजोबांनी हौसेने ज्ञानदान केले. मी खेकडे पकडण्याच्या सूचना आणि तो पदार्थ करण्याच्या

रीतीचा प्रत्येक शब्द जिवाचे कान करून ऐकला. त्या रात्री माझे पोट भरलेच; शिवाय मला पोट सदैव भरलेले राहण्याचा मार्ग गवसला. म्हणून पुढची वाटचाल तणावमुक्त मनाने सहज संपली.

परमेश्वराचे स्मरण करून मी लिखाण पोस्टात टाकले. पोटाचा प्रश्न सुटल्यात जमा झाल्याने मी बसने परतण्याचे ठरवले. बसला अवकाश होता. उगीच भटकून भुकेस निमंत्रण देणे मला नकोसे वाटले. म्हणून मी बस स्टँडच्या बाकावर बसची वाट बघत बसलो. बाकावर टेकतो न टेकतो तोच एक टकल्या, ठेंगणा माणूस धावत आला. आदराने मला म्हणाला, ''आपण लेखक आहात ना?''


मी गोंधळलो.

''हॉपसिंगला ओळखता ना?'' त्याने विचारले.

''होय. तो माझा शेजारी आहे.'' मी उत्तरलो.

''मी ली फॅट! त्याचा मेहुणा!'' उत्तेजित स्वरात तो इंग्लिश बोलण्याचा आटापिटा करत म्हणाला, ''समोरचं दुकान माझं आहे. म्हणून मी तुम्हाला बघितलं. मध्यंतरी हॉपसिंगकडे आलो असताना त्यानं मला तुम्ही उत्तम बियाणं दिल्याचं सांगितलं. त्यानं मलाही ते थोडं दिलं. मला तुमचे आभार मानायचे होते. पण त्यानं तुमच्या खिडकीकडे बोट दाखवलं. तुमच्या लेखनात व्यत्यय आणणं योग्य नाही, असं तो म्हणाला. मला पटलं. लगेच परतायचं असल्यानं आभार मानण्याची संधी हुकली. तुम्ही दिसताच आभार मानायला धावलो. घरी येता?''

मी लगेच जात असल्याचे सांगताच 'गुड बाय' म्हणत तो पळाला.



बस आली. तिकीट घेतल्यावर माझ्यापाशी फक्त नऊ फ्रँक उरले. पण खेकडे, शेतातले दाणे आणि हॉपसिंगची कोंबडी यावर मी जगू शकणार होतो. माझा थांबा येताच मी बसमधून उतरलो. बस चालकाने मला एक खोके काढून दिले. मी त्यास माझ्याकडे काहीही सामान नसल्याचे सांगितले. तो अदबीने म्हणाला, ''ली फॅटनं हे तुम्हाला द्यायला सांगितलं. बस सुटण्याच्या तयारीत असताना तो धापा टाकत आला. म्हणून तुम्हाला भेटू शकला नाही.''

तो इतक्या घाईने का पळाला होता, याचा मला उलगडा झाला. बॉक्स जड असल्याने मी संथ चालू लागलो. ली फॅटच्या मोडक्यातोडक्या भाषेची नि कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या देहबोलीची याद मला सुखावत होती.

खोके उघडताच पेन्सिलने ढबोळ्या अक्षरांत लिहिलेली छोटी चिठ्ठी दिसली. 'मिस्टर हॉल, अप्राप्य बियाणासाठी कृतज्ञता व्यक्त करणारी ही अल्प भेट स्वीकारा. सस्नेह, ली फॅट.' खाली दोन पाउंड उत्तम चॉकलेट्स, सिल्कचा पायजमा-झब्बा, शँपेनची बाटली आणि ताज्या लिची होत्या. ते तळघरात ठेवायला खाली गेलो तर गुबगुबीत बैठक मारलेली कोंबडी दिसली. आनंदाने तिला दूर करून मी तिच्या खालचे ताजे अंडे उचलले. परत कामाला लागणे भागच होते.

वैफल्य आणि अपुऱ्या आहारामुळे माझे वजन घटले होते. थोडा अशक्तपणा जाणवू लागला होता. पण आता काळजी नव्हती. खेकडे आणि दाण्यांच्या सकस आहाराने फक्त सहा आठवड्यांत वजन ठिकाणी आणले. लेखन मनाप्रमाणे होत होते. लेखनाची झिंग असल्याने तळघरात शँपेन आहे, याचे मला विस्मरण झाले. अशावेळी घरमालक सहकुटुंब भेटायला आला.



**जेम्स नॉर्मन हॉल यांचे घर**

मला नेमक्यावेळी ली फॅटने दिलेल्या वस्तूंची आठवण झाली. मुलांना उत्तम चॉकलेट व मालकास  शँपेन देऊन मी दणक्यात स्वागत केले. सारे फार खूश झाले.

सकाळी दार उघडले तर दाराशी दोन टोपल्या! एकीत केळी आणि आंबे तर दुसरीत उत्तम प्रकारची मासळी! वर कागद चिकटवलेला. त्यावर ढबोळ्या अक्षरांत घरमालकाच्या सहीची चिठ्ठी! सारे हॉपसिंगमुळे! हॉपसिंग उत्तम बेकरही होता. काही दिवसांच्या अंतराने तो माझ्या दाराशी अननसाचा गोड केक ठेवत असे. माझ्या कामात व्यत्यय न आणता! मी खूपदा त्याला असे करण्याची गरज नाही, असे सांगत असे. पण ते तो हसून साजरे करत असे. कृतज्ञता त्याचा स्वभावधर्म होता. कष्टाळू आणि हाडाचा शेतकरी होता. त्या वर्षी खूप छान पीक आले. भरपूर फायदा अपेक्षित होता. तो तसे म्हणालाही!

सुमारे तीन महिने सरले. बोट पॅपी येथे येण्याची वेळ होत आल्याची जाणीव झाली. म्हणून अपेक्षित दिवशी मी तिथे गेलो. बोट आली की बटवड्याची कारवाई – तिथे प्रत्यक्ष आलेल्यांना पत्राची सोपणी होई. माझ्या डोळ्यांत प्राण गोळा झाले. माझ्याकडे बघून गोड हसत बटवडा करणारी मुलगी म्हणाली, ‘तुमचा लखोटा आहे बरं का! पण तो सोडवून घ्यावा लागेल!’ लखोट्यात धनादेश असेल तर तो भलत्या हाती जाऊ नये, यासाठी प्रकाशक तो तिकीट न लावता पाठवत. पोस्टेज देऊन ते सोडवून घेण्याची रीत होती. लखोटा सोडवून घेतल्यावर माझ्या खिशात फक्त एक नाणे उरले. येताना चालत आलो होतो आणि परतही चालत जावे लागणार होते. म्हणून उत्सुकतेने मी बंदरावरच लखोटा उघडला. त्यात पत्रासोबत पाचशे डॉलरचा चेक होता. चालण्याच्या श्रमाचे दुःख दूर पळवणारा! अनेक ज्वलंत प्रश्न सोडवू शकणारा! संधीचे मोकळे आभाळ प्रदान करणारा! आता ताहिती बेटाचा निरोप घेणे हिताचे ठरणार होते. तसे न केल्यास ही रक्कम संपून पुन्हा ती जमवण्याचा आटापिटा करावा लागण्याची शक्यता होती. मी तयारीस लागलो.

हॉपसिंग आणि ली फॅट, मला निरोप द्यायला बंदरावर आले. माझ्या विरोधास भीक न घालता, त्यांनी टोपलीभर कणसे नि अंड्यांचे शिप्तर भेटीदाखल बोटीत चढवले. अल्पशिक्षित पण सुसंस्कृत प्रेमळ मित्रांचा निरोप घेताना मला भरून आले.

बोटीच्या मुदपाकखान्यातल्या नोकरास केबिनमध्ये बोलावून, मी माझ्यासाठी सूप बनवायला काही कणसे दिली. रात्री जेवायची सुरुवात केली. माझ्या टेबलवर पांढऱ्या मिशा असलेले एक वयस्क गृहस्थ बसायला आले. त्यांनी माझ्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले. मेन्यूकार्ड बघून त्यांनी काही पदार्थ मागवले




तरी मला त्यांच्या मुखावर स्पष्ट नापसंती दिसली. नोकरास भेटून मी माझ्यासाठी केलेले कॉर्नसूप त्यांनाही देण्यास सांगितले. ते कॉर्नसूपवर तुटून पडले. तिसरा कटोरा संपवून त्यांनी नोकरास विचारले, 'कॉर्नसूप तुमच्या मेन्यूकार्डमध्ये का नाही?'

माझ्याकडे हस्तनिर्देश करून नोकराने ते मी त्यांना देण्यास सांगितले, असे सांगितले. तोवर मला बघितलेच नसावे अशा नजरेने माझ्याकडे बघत त्यांनी आभार मानले. पुन्हा ते सूप पिण्यात दंग झाले. माझे जेवण झाले तरी त्यांचे सूप पिणेच चालू होते.

जेवण संपवून मी डेकवर गेलो. ताहिती बेटाची पर्वतमाला वेगाने क्षितिजापार जात होती. ते पाहून मनास अनाम खिन्नता ग्रासू लागली. पापणी न लववता, मी ती पर्वतमाला नजरेत सामावण्याचा प्रयत्नात होतो. त्यामुळे मला भोजनसाथी निकट पोहोचल्याचे जाणवले नाही. माझ्या खांद्यावर हात ठेवून ते आत्मीयतेने म्हणाले, ''सूप छान होतं. पण त्यापेक्षा ती माझी गरज होती. म्हणून मला फार बरं वाटलं. मला अस्थमा आहे. पथ्य पाळावं लागतं. मेन्यूकार्डात मला चालेल असं फारसं काही नव्हतं. जे मोजके पदार्थ मला चालतात, त्यात कॉर्नसूप आहे. मला तुमची फार मदत झाली.'' आभार शब्द न वापरता देहबोली आणि स्वरातून भावना व्यक्त करण्याची त्यांची शैली मला आवडली. ते वयस्क असल्याने त्यांच्याकडून शाब्दिक आभार मानून घेणे मला पसंत पडले नसते. त्यांच्या स्वर-शब्दांत स्नेह आणि आपुलकी होती....

''तुम्ही पर्वतमाला बघत असताना मी तुम्हास निरखत होतो. तुमची नजर तुम्हाला या प्रदेशाचा निरोप घेणं जड जात असावं, असा संकेत देत होती. मी इथे राहू शकलो नाही. तुम्ही या प्रदेशाची विस्तृत माहिती मला सांगाल?''

ते म्हणाले ते खरेच होते. मी हे बेट नि तिथल्या अनुभवांविषयी भरभरून बोलत सुटलो. पुनःप्रत्ययाचा आनंद मला सुखावत होता. अचानक मी दचकलो. या वयस्क व्यक्तीस माझे बोलणे पाल्हाळ - रटाळ तर वाटत नसेल, या संशयाने मला गप्प केले. मनीचे भाव माझ्या चेहऱ्यावर उमटले असावेत. ते मधाळ स्वरात म्हणाले, ''अजिबात कंटाळलो नाहीय मी! उलट तिथे जाणं न जमलेल्या मला, तुम्ही जणू त्या परिसराचं साक्षात दर्शन घडवताय. डोळे आणि कानांचा उत्तम उपयोग करून घेण्याची तुमची क्षमता मला फार भावली. तुम्ही लिहिण्याचा प्रयत्न करा. मला वाटतं, लेखन छान जमेल तुम्हाला.''

त्यांचे बोल मला प्रोत्साहन देणारे होते. माझी जुजबी माहिती देऊन त्यांना मी नवोदित लेखक असल्याचे सांगितले. अनुभवसिद्ध लिखाण करण्याच्या मोहानेच मी पॅपी येथे गेलो, असेही मी म्हणालो. त्यांनी माझे लेखन बघण्याची इच्छा व्यक्त केली. ते मला सुजाण वाटले. प्रकाशकास देण्यापूर्वी सुजाण वाचकाचा अभिप्राय जाणणे, नवोदितास स्वागतार्ह वाटते, असे सांगून मी चार लेख त्यांना दिले. पर्वतमाला क्षितिजापल्याड गेली होती. डेकवर थांबल्या-न थांबल्याने फरक पडणार नव्हता. त्यांना एकांत देण्यासाठी मी तत्परतेने दूर झालो.

परतलो तोवर त्यांनी सारे लेख वाचून संपवले होते. उद्योजकासारखा मख्ख चेहरा करून ते म्हणाले, ''लिखाण बरं जमतंय तुम्हाला! तुम्हाला सांगायचं राहिलं असेल, की मी xxx या प्रकाशन संस्थेचा मॅनेजर आहे. या लिखाणाच्या संदर्भात तुमची आर्थिक अपेक्षा सांगाल?''

प्रश्न अत्यंत अनपेक्षित होता. मी लगेच उत्तर देऊ शकलो नाही. प्रत्येक लेखाचे शंभर डॉलर मागितले तर ते मला हावरा, वा नवा असल्याची जाणीव न ठेवणारा उर्मट समजतील का, या विचारात मी चाचपडत होतो. त्यांनीच दुसरा प्रश्न विचारला, ''प्रत्येक लेखासाठी मी दीडशे डॉलर दिले तर चालेल?''

मी आनंदाने वेडा व्हायचाच बाकी राहिलो. तरी त्यांच्या मख्ख मुद्रेचे अनुकरण करत मी संयत स्वरात 'चालेल' असे म्हणालो. त्यांच्या मख्ख मुद्रेवर मात्र आता या उत्तराचा स्पष्ट आनंद झळकला. माझा आनंद लपवायला मला अक्षरशः तिथून पळ काढावा लागला.

कष्टाळू आणि स्वच्छ मनाचा भोळा हॉपसिंग मनात रुंजी घालत होता. अवजारे व बियाण्यासाठी मी मोजके डॉलर खर्च केले होते. त्याचा मी उपयोग केला नाही तेच बरे झाले. केला असता तर आधीच्या अनुभवाचे पुनरावर्तन होणार होते. भूक सोसत कर्जबाजारी अवस्थेत मला ताहिती बेटाचा निरोप घ्यावा लागला असता.

कर्जफेडीसाठी कष्टताना लेखनास वेळ देणे अशक्य ठरले असते. कर्जफेड होईतो लेखनेच्छा लयास जाऊन कदाचित मी सवंग नोकरीकडे वळलो असत ो. पण माझ्यासाठी निरुपयोगी ठरलेली सामग्री न विकता, योग्य व्यक्तीस भेट देण्याची मला वेळीच सद्बुद्धी झाली. हॉपसिंगमुळे टप्याटप्प्याने माझ्या समस्यांचे सुखद समाधान हाती आले. उत्तम बियाण्याची माझ्या आवारात नव्हे तर जणू मी कागदांवर पेरणी केली. या बियाणाच्या आधारे तरारलेला अंकुर, वेगाने वृक्षात रूपांतरित होत असल्याची चुणूक प्राप्त झाली आणि मी मोहरलो.

**- स्मिता भागवत**
53 Townley Cres. Barmpton ON
L6Z 4S9 Canada
Phone # 1 289 752 8885
smitacap@gmail.com
bhagwats@rogers.com

''गेली ९५ वर्षे सतत ग्राहकांची सेवा करीत पूर्णपणे संगणकीकृत बारा शाखांसह आधुनिक प्रगतीची वाटचाल''

॥ असमर्थास समर्थ करणे ॥

## दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. मुंबई

मुख्य कार्यालय : २१७, राजा राममोहन रॉय रोड, गिरगांव, मुंबई ४०० ००४. दू. क्र. २३८५४९४५, २३८६८१३४, २३८५४९९४
फॅक्स क्र. - २३८९ ६८५३

मध्यवर्ती कार्यालय : १३-१४, गणानाथ को-ऑपरेटिव्ह हौ. सोसा. लि., दादर (पश्चिम) स्टेशनसमोर, मुंबई-४०० ०२८.
दू. क्र. २४२२५७१८, २४२२३११६. फॅक्स क्र. - २४३१ ५० ५०

### ❋ शाखा ❋

१) गिरगांव २) दादर ३) भायखळा ४) घाटकोपर (प.) ५) गोरेगांव ६) बोरीवली
७) दहिसर ८) घाटकोपर (पू.) ९) वाशी १०) ठाणे ११) खारघर,
१२) हडपसर, पुणे

वरील सर्व शाखांमधून आरटीजीएस द्वारे फंड्स ट्रान्सफरची सुविधा उपलब्ध.
कोअर बँकिंगद्वारे कुठल्याही शाखेतून व्यवहार करण्याची तसेच मोबाईल, एस.एम.एस. बँकिंगची सेवा उपलब्ध.
दादर, भायखळा, ठाणे या शाखांमधून फ्रॅकींग सेवा उपलब्ध. अल्पावधीत इंटरनेट बँकिंगची सेवा उपलब्ध होईल.

★★★ मुदत ठेवीवर दिनांक १० जून, २०११ पासून खालीलप्रमाणे व्याजदर लागू ★★★

| मुदत | व्याजदर | मुदत | व्याजदर |
|---|---|---|---|
| १५ दिवस ते ९० दिवस | ५.५०% | १३ महिने ते २४ महिने | ९.२५% |
| ९१ दिवस ते १८० दिवस | ७.००% | २५ महिने ते ३६ महिने | १०.००% |
| १८१ दिवस ते १२ महिने | ८.५०% | ३ वर्षावरील ते ५ वर्षा | ९.५०% |
| | | ५ वर्षापेक्षा अधिक | ९.२५% |

**'डेक्कन शताब्दी ठेव योजना'**
**२४ महिने-११.००%**
(व्याजाची रक्कम दर तिमाही ठेवीदारांच्या खाती जमा)

**०.५०% अधिक व्याजदर (१ वर्ष व त्यावरील कालावधी), ज्येष्ठ नागरिक, रजिस्टर्ड हौसिंग सोसायटी व धर्मादाय संस्था यांच्याकरिता**

**वसुल भाग भांडवल ७.६४ कोटी ठेवी ३०३.३३ कोटी कर्ज १७८.८६ कोटी**

**श्री. विजय श्रीकृष्ण भोळे**
उपाध्यक्ष

**श्री. काशिनाथ दिनकर मोरे**
अध्यक्ष

**श्री. शशिकांत ल. अभंग**
सरव्यवस्थापक

ho@deccanbank.com website-www.deccanbank.com co@deccanbank.com

# कोंडवाड्यातले मांडे

डॉ. उज्ज्वला दळवी

छाती दडपून टाकणाऱ्या भिंतीच्या पलीकडच्या त्या गूढ जगाबद्दल मला उत्सुकता होतीच. एल्सम्माच्या आमंत्रणानं मला त्या रहस्याची किल्लीच मिळाली. डिरेक्टरांनीही फारसे आढेवेढे घेतले नाहीत. रविवारी, जुन्या हॉस्पिटलची सकाळची ओपीडी आटोपून मी त्या मुलींबरोबर गेले.

''**डॉ.** उज्ज्वला, येत्या रविवारी दुपारी तुम्ही आमच्या होस्टेलमध्ये याल का? रजनीचा वाढदिवस आहे. आमच्याकडे कुणीच येत नाही एरवी,'' एल्सम्माचा उत्साह आधीपासूनच ओसंडत होता.

''डिरेक्टरची परवानगी लागेल ना?''

एकोणिसशे पंच्याऐंशी साली, मी सौदी अरेबियातल्या उम्म खद्रा नावाच्या मागासलेल्या, लहानशा वाळवंटी गावात नुकतीच कामाला लागले होते. अंगावर नखशिखान्त बुरखा, नवरा बरोबर नसला तर साधा घरासमोरचा रस्ताही ओलांडायची चोरी, रमझानमध्ये दिवसाउजेडी चारचौघांत हातातोंडाची गाठ पडण्याला बंदी, प्रत्येक पाऊल उचलताना लागणारी परवानगी, अशा तिथल्या नियमांच्या कचाट्यानं गांजले होते.

''हो. तुम्ही विचारा मुदीरना. आम्हीपण नर्सिंग सुपरवायझरला आणि ट्रान्सपोर्टवाल्यांना विचारतो.''

त्या दिवसांत आमच्याकडे गाडी नव्हती. जाळत्या उन्हाळ्यातलं सावलीतलं तापमान पन्नास अंशांच्या आसपास पोचे. गावातल्या एकुलत्या एका डांबरी रस्त्याला बिलगून वस्ती होती, तेवढीच! त्यापलीकडे क्षितिजापर्यंत तीनशेसाठ अंश पसरलेलं अफाट, अनोळखी वाळवंट मनाला हतबल एकाकीपणाच्या मणामणाच्या बेड्या घालत होतं. कुठे रमतगमत चालायला जाणं अशक्य होतं. अशा अवस्थेत हॉस्पिटलच्या गाडीनं असं कुठे वाढदिवसाच्या पार्टीला जायला मिळणं म्हणजे पर्वणीच होती. मी प्रयत्न करायचं ठरवलं.

त्या सौदी गावात नर्सेसची राहण्याची व्यवस्था दोन वेगवेगळ्या ठिकाणी केलेली होती. पाश्चात्य परिचारिका, फिलिपीन्सच्या नर्सेस आणि भारत-पाकिस्तान-इजिप्तमधल्या बी.एस्सी.सारखी नर्सिंगची डिग्री घेऊन आलेल्या मुली, असा उच्चभ्रू गट हॉस्पिटलच्या आवारातल्या वॉशिंग मशीन, डिश-वॉशर यांसारख्या अनेक आधुनिक सुखसोयींनी परिपूर्ण अशा प्रशस्त फ्लॅट्समध्ये राहत असे. बुरखा चढवला की त्यांना घराभोवतालच्या विस्तीर्ण पटांगणात फिरायला पूर्ण मुभा होती. स्विमिंग पूल, टेनिस कोर्ट, छोटीशी व्यायामशाळा असं सारं

त्यांच्या दिमतीला होतं. त्यांतल्या बहुतेक नर्सेस तिथेच, नव्या आधुनिक हॉस्पिटलमध्ये काम करत.

डिप्लोमा किंवा छोटे कोर्सेस करून आलेल्या मुलींची गावातल्या एका मध्यवर्ती मोठ्या घरात (गैर)सोय करून दिलेली होती. त्या मुली जुन्या हॉस्पिटलच्या बकाल ओपीडीमध्ये, तिथल्या वरच्या जुनाट वृद्धाश्रमात किंवा साथीच्या रोगांच्या गावठी इस्पितळात कामाला जात.

आठवड्यातून एक-दोनदा, ड्युटीनुसार, मला जुन्या हॉस्पिटलमध्ये जावं लागे. तशा जाणाऱ्या बाकीच्या डॉक्टरणींच्या बरोबर मी सरकारी बसनं जात असे. वाटेत, ते भर गावातल्या अरुंद गल्लीतलं होस्टेल लागे.

होस्टेलची इमारत बाहेरून दिसतच नसे. इमारत स्त्रीलिंगी! तिला तिच्याहून उंच अशा करड्या, काँक्रीटच्या भिंतीचा कायम बुरखा चारी बाजूंनी चढवलेला होता. एक माणूस जेमतेम जाईल असं एकच दार होतं त्या भिंतीला. त्या गल्लीत शिरल्यावर बराच आटापिटा आणि आपटधोपट करत ड्रायव्हर बस वळवून घेई. बसचं दार त्या भिंतीच्या दरवाजाच्या बरोब्बर समोर येईल अश्शीच बस उभी राहिली, की तो खाली उतरून त्या दरवाजाशी जाई. दाराच्या वरच्या टोकाला एक पेरभर भोक होतं. त्यातून एक जाडसर तारेचा फासा बाहेर आलेला होता. ड्रायव्हर तो फासा जोरजोरात ओढी. आत कुठेतरी घंटेची अस्फुट किणकिण होई. मग तो वाट बघे.

आतमध्ये एक दार खडखड करत उघडे. मग सटक्क-फटक्क सपाता वाजत, कुलपात किल्ली फिरे, कुलूप निखळे, कुंईऽऽ करणारी कडी काढली जाई आणि कुरकुरीनं निषेध नोंदवत दुसरं दार हले. एकाएकी धावपळीच्या, गलबल्याच्या आवाजांचा स्फोट होई. मग कूंऽऽकुंक्-कूंऽऽकुंक् करत आणखी एक कडी निघे आणि तो गंजक्या- लालसर रंगाचा लोखंडी दरवाजा उघडे.

आतला धष्टपुष्ट सौदी गार्ड अडकत, अंग चोरून सोडवत कसाबसा त्यातून बाहेर येई. दाराची चौकट थरथरत सुटकेचा निःश्वास टाकते न टाकते, तोच तो ड्रायव्हर आणि गार्ड मिठी मारून एकमेकांच्या गालांची चुंबनं घेत.

'सलाऽऽम आऽऽलेऽकुम व रहिमतुल्लाहिवबरकाऽतु'-पासून सुरुवात करून, 'श्लोनक?(तुझा रागरंग कसा?)', 'व श्लोनक', 'व श्लोनक', 'व श्लोनक' अशी सातपडसादी खुशाली घेतली जाई. ही सारे आन्हिकं सरेतो दारात घुटमळणारी पहिली मुलगी खोळंबून राही.

त्यानंतर तो ड्रायव्हर नाव पुकारी,

''फसुंदाऽऽराऽ!''

समंजस चेहऱ्याची वसुंधरा तरतरीतपणे येऊन बसमध्ये चढे.

''बाऽऽफनाऽऽ!''

चौकस डोळ्यांची इवलीशी पावना पळत पळत येई.

''रीदा!'', ''रजानी!'', ''सादिया!', ''लिसामा!''

एकामागोमाग एक नाव पुकारलं जाई. जिचं नाव पुकारलं असेल ती मुलगी लगबगीनं, पुकाऱ्याचा विचार बदलायच्या आत, येऊन बसमध्ये बसून घेत असे. ड्रायव्हरजवळची यादी संपली की तो गार्डाचा भारावलेला निरोप घेई. गार्डानं आत जाऊन दार लावून घेतलं, की गल्लीभर नजर टाकून, 'कुणी चुकार मुलगी निसटून बाहेर तर राहिली नाही ना', याची खात्री करून मगच बस सुरू करी.

ओपीडी संपल्यावर, परतीच्या वाटेवर त्या मुलींना सोडायला बस पुन्हा त्या होस्टेलवर जाई. पुन्हा हजेरीचा ललकार होऊन, जड पावलांचं एक एक मेंढरू कोंडवाड्यात पाठवलं जाई. मग 'कूंऽऽखण्णण्ण्ड्ढऽऽम्म्म्..' आवाज करत दार लागे. यावेळी भिंतीआड सामसूम असे. गलबला सोडा, साधा पावलांचाही आवाज नसे. भयाण शांततेवर फक्त कड्या-कुलपांचं शिक्कामोर्तब होई. बाहेरच्या सुन्या गल्लीत उदास एकाकीपणा माजे. बस सुटे.

छाती दडपून टाकणाऱ्या भिंतीच्या पलीकडच्या त्या गूढ जगाबद्दल मला उत्सुकता होतीच. एल्सम्माच्या आमंत्रणानं मला त्या रहस्याची किल्लीच मिळाली. डिरेक्टरांनीही फारसे आढेवेढे घेतले नाहीत. रविवारी, जुन्या हॉस्पिटलची सकाळची ओपीडी आटोपून मी त्या मुलींबरोबर गेले.

होस्टेलच्या दाराशी, 'फसुंदारा', 'बाफना' यांच्या जोडीने 'उगाऽवाऽलाऽ' असा माझ्याही नावाचा पुकारा झाला आणि अंगावर सरारून काटा आला. त्या गंजक्या लोखंडी दाराची चौकट खालून चांगलीच उंच होती. त्या वीतभर उंबरठ्यात पाय अडकून मी धडपडले, जराशा बेसावध मनानं आत शिरले आणि आतल्या जगाच्या प्रथमदर्शनानं धडकीच भरली.

बाहेरून कुणीही आत डोकावू नये म्हणून इमारतीचा दरवाजा तटबंदीच्या दरवाजासमोर नव्हता. होस्टेलच्या इमारतीची भिंत आणि बाहेरच्या तटबंदीची त्याहून उंच भिंत, यांच्यामध्ये फार तर तीन फुटांचं अंतर होतं. त्या मधल्या अरुंद बोळातून दहा पावलं उजवीकडे गेल्यावर एक बरासा लाकडी दरवाजा दिसला. त्याला नुसती कडी घातली होती. मुली त्याच्यावरून पुढे जात राहिल्या. आणखी पंधरा पावलं गेलो आणि बाहेरच्या गंजक्या दाराचा जुळा भाऊ भेटला. त्याला भक्कम कुलूप होतं. मुली जरा सरकून थांबल्या. तिथून पुढे वाट नव्हती. ढोपरभर घमघमता उकिरडा माजला होता. मागून येणारा गार्ड दारापर्यंत पोचल्यावर त्यानं ते कुलूप काढलं. आम्ही

सगळ्याजणी दारातून पार झालो आणि बाहेरून कुलूप लागलं.

आत भरदुपारी अंधार होता.

केरळच्या, मैलोन् मैल पसरलेल्या हिरवाईतून आलेल्या या मुली, या अंधारकोठडीत राहतात! नुसता विचारदेखील घशाशी दाटून आला.

''मघाचं ते लाकडी दार कसलं?'' एल्सम्मानं दिवा लावल्यावर मला कसाबसा कंठ फुटला.

''गार्डाच्या खोलीचं. आमच्या जेवणाच्या हॉलएवढी मोठी असावी ती खोली. तिची एक भिंत हॉलला लागून आहे आणि दुसरी ही इथे जिन्यालगत आहे बघा. हॉलमधून नळ गेलेत तिच्यात. म्हणजे आंघोळीपांघोळीचीही सोय असणार'', तळमजल्यावरच्या खोलीकडे जाणाऱ्या पावनाच्या बोलण्यात कडवटपणा होता.

एल्सम्मा, रजनी दुसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या. सिमेंटच्या लहान-मोठ्या, वेड्यावाकड्या, अरुंद पायऱ्या चढत आम्ही गेलो. मुलींनी जिना स्वच्छ ठेवला होता.

दुसऱ्या मजल्याच्या मधल्या कॉरिडॉरचा दिवा गेला होता. त्या अंधारात मी चाचपडत, मधे ठेवलेल्या बादल्यांना, चपलांना अडखळत जात होते.

''आमची सरावाची वाट आहे ही. ही उजवीकडे आलीच रजनीची खोली. माझी इथेच पुढे, डावीकडे आहे. मग रजनी घेऊन येईलच तुम्हाला'' म्हणत एल्सम्मा गेली.

रजनीनं दारावर थाप मारली,

''रोसम्मेऽ, बाजूला हो. डॉक्टर आल्यात.''

दरवाजा किलकिला उघडला.

''आत व्हा डॉक्टर, मी मागून येते.''

मी दरवाजा ढकलला. तो मला एकटीला कुस्करून शिरता येण्याइतपतच उघडला. आत शिरले.

''या, या डॉक्टर, दार बंद करा म्हणजे तुम्हाला पुढे येता येईल.''

तो डाव्या बिजागिरींचा, उजवीकडे उघडणारा दरवाजा आतल्या उजव्या भिंतीला जवळजवळ लागून होता. त्याच भिंतीला चिकटून ठेवलेली खाट दरवाजालगतच, त्याला समांतर होती. त्यामुळे त्या दरवाजाची झडप झाली होती. आत शिरून, भिंतीला बिलगून, झडप बंद करून मी त्या खाटेच्या बाजूनं गेले. त्यानंतरच रजनी झडपेतून आली. खाट संपली तिथे डाव्या भिंतीतल्या कपाटाचं उघडं दार लागलं. ते बंद केलं आणि सरतेशेवटी खोलीत शिरल्याचा आभास लाभला.

त्या चिंचोळ्या, लांबोड्या खोलीत, उजव्या भिंतीला चिकटलेल्या तशा पाच खाटा होत्या. दर दोन खाटांनंतर एका माणसाला चालण्याएवढी जागा सोडली होती. शेवटची खाट



टोकाच्या भिंतीला टेकलेली होती. बंद खिडकीच्या अर्ध्या भागात एअर-कण्डिशनर बसवलेला होता.

डाव्या भिंतीतल्या कपाटाची चौकट संपली तिथपासून टोकापर्यंत ट्रंका, खोकी आणि बॅगा व्यवस्थित रचून, वर आडवं फळकूट टाकून एक सलग आडवा काउंटर तयार केला होता. त्याच्यावर कपडे वाळवायचे स्टॅण्ड होते. उजव्या भिंतीवर दोन लांबलचक फळ्या मारलेल्या होत्या. त्यांच्यावर भांडी, डबे, वाणसामान, साबण वगैरेंची गर्दी होती. फळ्यांखालच्या खुंट्यांवर कपड्यांचे ढिगारे लोंबत होते. खाटांच्या खालीही खोक्या-बॅगांची रेलचेल होती.

''या कपाटाला असं अर्धंच दार कसं?'' आत शिरल्याबरोबर मला पहिला प्रश्न पडला.

''त्याचा उरलेला अर्धा भाग शेजारच्या खोलीत उघडतो, डॉक्टर.''

''एसी मोडला तर दुरुस्त करणारा माणूस आत कसा येतो?''

हा प्रश्न पुरा होण्यापूर्वीच मी इस्त्रीच्या वायरला अडखळून खाटेवर आदळले. मुलींना त्याचं फारसं काही वाटलेलं दिसलं नाही. सवय असावी.

''होस्टेलमधल्या काही मुली रजेवर गेलेल्या असतात ना! आम्ही खाटांखालचं सामान त्यांच्या खोल्यांत नेऊन टाकतो. मग खाटांची घडी करायची की जागाच जागा होते.''

''डॉक्टर, आमच्या खोलीत बरीच जागा आहे. अंग

आकसून का होईना, चालायला मिळतं. पावना, लिसम्मा वगैरे राहतात ना, तिथे सगळ्याच खाटा भिडवलेल्या आहेत. त्यांना फक्त रांगता येतं.''

''रोजची झाडलोट कशी करता?''

''डॉक्टर, आपल्याला तीन वाजता संध्याकाळच्या ओपीडीला जायचंय ना? चला, चला. कोट काढून ठेवा. आपण हात धुवायला जाऊया. केक कापायचाय ना!''

झाडलोटीचा मुद्दा झटकून टाकला गेला. केव्हा एकदा तिथून बाहेर पडते असं झाल्यामुळे मीही कीस पाडला नाही.

तेवढ्या थोडक्या काळात आणि जागेत, थोराड बांध्याच्या रजनीनं गडद लाल पंजाबी ड्रेस चढवला होता. मोठाल्या काळ्या डोळ्यांत काजळ, सावळ्या गालांवर लाली आणि ओठांवर लिपस्टिक चढली होती.

जाताजाता एल्सम्माच्या खोलीचं दर्शन घेतलं. बाकी बहुतेक सारं तसंच होतं, फक्त तिच्या खोलीच्या खिडकीचं तावदान पारदर्शक होतं. त्यातून पलीकडचा, दीड फुटावरचा काँक्रीटचा पडदा नजर खिळवून ठेवत होता.

तोवर सगळ्या खोल्यांतून मुली पाखरांसारख्या बाहेर पडायला लागल्या.

''अय्यो, रजनी काय छान दिसते आहेस! लाल रंग शोभतो तुला.''

तिथल्या गहिऱ्या अंधारात तो गडद रंग दिसला तिला!

''हॅप्पी बर्थडे, रजनी!''

''मेनी हॅप्पी रिटर्न्स ऑफ द डे, रजनी! मस्त दिसतेयस.'' शुभेच्छांचा चौफेर वर्षाव सुरू झाला. खऱ्याखोट्याची फारशी शहानिशा न करता रजनी खुलली.

अडखळत, ठेचाळत कसाबसा जिना गाठला.

खाली जेवणाच्या हॉलमध्ये सगळ्या जणी जमल्या. प्रत्येकीनं हॉस्पिटलकडून मिळालेलं आपलं जेवणाचं खोकं बरोबर आणलं होतं. शिवाय नव्या हॉस्पिटलमधल्या फिलिपिनींना ऑर्डर देऊन करून घेतलेले स्प्रिंग रोल्स आणि एक मोठासा चॉकलेट केक होता. रजनी तो कापत असतानाच सॅली घाईघाईनं येत म्हणाली,

''हे बघ, मी काय बनवलं! मलई केक केलाय. तुला गेल्या वेळी आवडला होता ना?''

तो केकही कापला गेला. 'हॅप्पी बऽर्थडेऽऽ टूऽऽ यूऽऽऽ'चं गाणं टाळ्या वाजवत, नेहमीच्याच बेसूरपणे गायलं गेलं. रजनीला भेटी दिल्या गेल्या. योगायोगानं मी घेतलेलं लाल कानातलं, बर्थडे गर्लच्या पंजाबी ड्रेसवर शोभलं. एकेकीनं येऊन तिला ते किती खुललं ते मोठ्या प्रेमानं सांगितलं.

हा हॉलही तसा फार मोठा नव्हता. फार तर पंधरा फूट रुंदी आणि वीस फूट लांबी. त्यात काही चौकोनी टेबलं. त्यांतल्याच एका कोपऱ्यातल्या टेबलावर ठेवलेली विजेची शेगडी. बाकीच्यांच्या भोवती खुर्च्या मांडलेल्या. एका कोपऱ्यात बऱ्याच घडीच्या खुर्च्याही होत्या. इथे मात्र सारं झाडूनपुसून स्वच्छ ठेवलं होतं. हॉलच्या चारी भिंतींवर मोठाली, हिरव्यागार जंगलांची, बागांची, नदीकाठांची चित्रं चिकटवून लावली होती. त्यांना एक्स-रेच्या पिवळ्या वेष्टनांच्या सुबक, नक्षीदार चौकटी होत्या. आज वाढदिवस म्हणून उरल्यासुरल्या भिंतीवर आणि छताला फुगे आणि झिळमिळती तोरणं लावली होती.

''खोलीत चित्रं लावायला जागाच उरत नाही,'' माझी नजर एका नदीकाठावर खिळलेली पाहून एल्सम्मानं स्पष्टीकरण दिलं.

''सुंदर आहेत ही. आणि इथले नियम पाळायला माणसं, प्राणी, सगळं टाळलंय शिस्तीत,'' मी कौतुक केलं.

''इथे तेवढाच हिरवा रंग दिसतो नजरेला,'' ती सुस्कारली.

''तुम्हाला इथे शिजवायची परवानगी आहे का?'' खोलीतल्या उकड्या चिकनच्या वासानं मला विषय सुचवला.

''नाही खरं तर, पण हॉस्पिटलची ही खोकी खाऊन कंटाळा येतो. रोज तेच ते चिकन-भात आणि टोमॅटोबरोबर उकडलेली गिळगिळीत भेंडी. गिळवत नाही. मग या एका शेगडीवर अधूनमधून काहीतरी शिजवतो. इडली-सांबाराची फार आठवण आली किंवा कुणाला मासळी मिळाली की करतो. बऱ्याच जणींकडे मिक्सरही आहेत. पण मिक्सर आणि शेगडी एकाच वेळी लावले की इथला फ्यूज उडतो. मग चोरून शिजवल्याचा बोभाटा होतो. शिक्षा होते. सॅलीचा मलई केक फक्त फ्रिजमध्येच बनतो म्हणून झाला.''

''पण मासळी आणि इडलीचा शिधा कुठून मिळतो?''


''आठवड्यातून एकदा बस असते कुठल्यातरी सुपरमार्केटला जायला. पण तिच्यावर इतक्या उड्या असतात ना! तिच्यात नंबर लावावा लागतो. तो टिकावा म्हणून वशिले लावायचे. बरेच उपद्व्याप करायला लागतात. महिन्या-दोन महिन्यांत कधीतरी लागते वर्णी. बऱ्याच वेळा मैत्रिणींना नाहीतर सरळ ड्रायव्हरलाच यादी आणि पैसे देतो आम्ही.''

''पण खास वैयक्तिक वस्तूंचं काय?''

''मैत्रिणी आणतात ना त्या! नाहीतर त्यांनी स्वतःसाठी आणलेल्या वस्तूंत आम्ही वाटेकरी होतो.''

जेवताजेवता आमचं बोलणं चाललं होतं. इतक्यात तळमजल्यावरचा फोन वाजला.

''रजनी, तुझ्या घरचा फोन!'' दहाबारा जणी एकदम ओरडल्या. रजनी पळतच गेली.



‘‘इथे फोन आहे?’’ मी नवलाईनं विचारलं. अजून आमच्या घरी फोन नव्हता.

‘‘हो. आहे. म्हणजे येतो. पण जात नाही.’’

‘‘इथून फोनही करता येत नाही..’’ मी वाक्य अर्धवटच सोडलं.

‘..तर या कडेकोट बंदोबस्तात कधी आग लागली, कुणी मुलगी अतिशय आजारी झाली तर बाहेरच्या जगापर्यंत कुणकुण कशी पोचणार?’ हा उत्तरार्ध मी उद्‌गारले नाही. एल्सम्माला तो कळला असावा. ती एकाएकी उदास झाली.

रजनी परत आली ती हॉस्पिटलला जायच्या तयारीनंच.

‘‘काय, आईशी बोलून खूश झालीयेस का?

‘‘आईचा आवाज ऐकायला मिळाला. पण ती काय बोलत होती ते फारसं कळलंच नाही. आमच्या गल्लीत एकच फोन आहे. सरपंचांच्या घरी. तो देखील नेहमी बिघडत असतो. नेहमीसारखं आजही कनेक्शन तुटलं मधेच. आता त्याचीही सवय झाली आहे. हा तुमचा कोट. मी येताना घेऊन आले. बस येईलच आता.’’

रजनी सगळी वाक्यं एका सुरात बोलली. तिचा वाढदिवस संपला होता.

‘‘उद्या मी दम्मामला जाणार आहे, पेशंटबरोबर. टीबीचा पेशंट चेस्ट हॉस्पिटलला न्यायचा आहे. वॉर्डाकडे पाठवायला मुलगी नाहीये. मी घानेम ड्रायव्हरकडे वशिला लावून ठेवला होता. त्यानं माझं नाव दिलं. कित्ती मज्जा!’’ वसुंधरा हवेत तरंगत होती.

‘‘पण म्हणजे तू दम्मामला भोज्जा करून येणार. मज्जा कशी?’’

‘‘घानेमला मस्का लावलाय. म्हणजे, त्याच्यासाठी आप्पे घेऊन जाणार आहे. त्याला ते फार आवडतात. त्याच्या बदल्यात तो मला दम्मामच्या बाजारात घेऊन जाईल. तिथे आपले मसाले मिळतात. परत आल्यावर त्याला मसालेभात करून घालीन. असा सौदा पटवलाय.’’

या सौद्यातल्या सगळ्या धोक्यांच्या घंटा माझ्या पापी डोक्यात घणघणल्या, पण तिच्या आनंदाला विरजण लावायची हिंमत झाली नाही. उलट,

‘‘माझ्यासाठी थोडा ओवा आणशील?’’ म्हणत मीही तिच्या गळ्यात काम घातलं.

आठवड्यानं मला ओवा मिळाला, दोन किलो! पुढची दहा वर्षं पुरला तो मला!

‘‘आणखी काय काय आणलंस?’’

‘‘मिरची, धणे, जिरं आणि ताजा कढीपत्तादेखील मिळाला. पण परत येताना घानेम फार वाईट वागला.’’

‘‘क..क..काय केलं त्यानं?’’

‘‘येताना मला डुलकी लागली. गाडी थांबली म्हणून जाग आली. तर समोर आपलं नवं हॉस्पिटल दिसलं. घानेम म्हणाला, ‘मला काम आहे. तू इथेच उतर आणि इथून दुसरा ड्रायव्हर घेऊन जा.’ मी म्हटलं, ‘ठीक आहे.’ नाहीतरी तुम्हाला ओवा द्यायचाच होता. उतरून तुम्हाला शोधत निघाले. पण

काहीतरी वेगळं वाटलं. ओळखीचं कुणीच दिसेना. मी तडक ट्रान्सपोर्टमध्ये गेले. तिथेही सगळे अनोळखी ड्रायव्हर. मला बघून ते खदाखदा हसायला लागले. माझे हातपाय लटपटले. कशीतरी सावरले आणि धूम ठोकली. बाहेर गेटपाशी आले तर घानेम माझी फजिती बघायला थांबलेलाच होता.''

''पण ते हॉस्पिटल कुठलं वेगळं होतं का?''

''हो. ते कतीफचं हॉस्पिटल होतं. तुम्हाला माहीत आहे, या पूर्वेच्या प्रांतातली सगळी सरकारी हॉस्पिटलं एकच साचा वापरून बांधली आहेत. कम्पाउंड्स् सुद्धा तश्शीच! सगळी एकसारखी दिसतात. म्हणून तर फसले मी.''

निव्वळ काही मसाल्यांसाठी त्या मुलीनं केवढं साहस केलं होतं! मग ध्यानात आलं, की ते मसाल्यांसाठी नव्हतंच. त्या मुली स्वातंत्र्यासाठी हपापलेल्या होत्या. तो कतीफचा अनुभवही त्या दुर्मिळ स्वातंत्र्याचाच एक भाग होता!

आम्हाला उम्म खद्राला पोचून वर्ष झालं. अजून आम्हाला आमच्या मुलांना तिथे नेणं जमलं नव्हतं. कागदपत्रंच होत नव्हती. त्यामुळे मधूनमधून मन विषण्ण होई. अशा वेळी नर्सेस होस्टेल्समध्येच मला माहेर लाभत असे. नव्या-जुन्या हॉस्पिटल्सच्या नर्सेसशी माझा जिव्हाळा जुळला होता.

जुन्या हॉस्पिटलच्या तळमजल्यावर मधोमध एक लांबलचक कॉरिडॉर आणि त्याच्या दुतर्फा ओपीडीच्या तपासणीच्या खोल्यांची रांग अशी रचना होती. खोल्यांचे आतले दरवाजे कॉरिडॉरमध्ये उघडत आणि बाहेरचे दरवाजे बाहेरच्या ओसरीवर उघडत. त्या कॉरिडॉरच्या पार आतल्या टोकाला नर्सेसचं मोठं टेबल होतं. स्त्री पेशंट्सची नावनोंदणी, नवे कागद; सारं तिथे केलं जाई. पुरुषांसाठी ही व्यवस्था बाहेरच्या पटांगणात केली होती.

एक दिवस काही कामासाठी मी त्या नर्सेसच्या टेबलापाशी उभी होते. रजनी नावनोंदणीला बसली होती. कॉरिडॉरच्या दुसऱ्या टोकाला, आत येण्याचा दरवाजा होता. त्या दरवाजातून एक नवीच नर्स आत शिरली. ठेंगणी-ठुसकी, गोरटेली, गुटगुटीत, जरा लाडिक चेहऱ्याची हसरी मुलगी. तिला पाहून रजनी म्हणाली,

''ही मुलगी माझ्या ओळखीची आहे. तिला कुठेतरी भेटलेय मी.''

ती मुलगी जवळ आली. रजनीनं तिला हटकलंच,

''नाव काय ग तुझं? कुठल्या गावची तू?''

''मी जया. जया विमला. मुहाम्माची.'' तीही रजनीच्या चेहऱ्यात ओळखीच्या खुणा शोधायला लागली होती.

''म्हणजे कनकम्माची मुलगी ना तू? मी रजनी. कोक्कमंगलमच्या दुर्गम्माची.''

''ओऽऽ, रजनीऽचेऽची! कित्ती छान!'' जयानं आनंदानं उडीच मारली.

त्या दोघींच्या आया जिवाभावाच्या मैत्रिणी होत्या. मोठेपणी वेगवेगळ्या गावात राहिल्यामुळे भेटीगाठी क्वचित होत राहिल्या. पण आपल्या लेकींना वाढवताना जुन्या मैत्रिणीच्या कहाण्या रोज सांगितल्या गेल्या. जुने फोटोही दाखवले गेले. मैत्रीची ओढ टिकवली गेली. उम्म खद्रासारख्या दूरवरच्या गावात पुढच्या पिढीनं ती ओळख पटवली.

''कधी आलीस सौदीत? कुठे राहातेयस?''

''चार दिवस झाले. सध्या नव्या हॉस्पिटलच्या वाय होस्टेलमध्ये ठेवलंय. आज रात्री गावातल्या कुठल्यातरी होस्टेलमध्ये पाठवणार आहेत म्हणे.''

''म्हणजे आपण एकाच घरात राहणार. सध्या तर माझ्या खोलीतल्या दोघीजणी सुटीसाठी गावाला गेल्या आहेत. त्यामुळे आज रात्री तुला माझ्याच खोलीत झोपता येईल.''

''रजनी, तुला वाढदिवसाची छान भेट पाठवली ग देवानं!'' मी बावळटपणानं एल्सम्माच्या सरप्राइझ बर्थडे पार्टीचा सगळा बेत धाब्यावर बसवला.

''डॉक्टर उज्ज्वला, केवढं लक्षात ठेवलं तुम्ही! आज गुरुवार आहे. आज दुपारपासून तुम्ही राहायलाच या ना माझ्या खोलीत. खरंच, दोन खाटा रिकाम्या आहेत. आता शेवटच्या घटकेला परवानगी कशी काढायची?''

''मी बघते. आज सूझन नर्सिंग सुपरवायझर आहे. तिला पटवता येईल. डॉक्टर दळवींनाही तिच्याचकडे देते निरोप.''

खरं तर एल्सम्मानं ते सगळं आधीच आखून व्यवस्थित कागदपत्रंही करून घेतली होती. त्या खोलीत अख्खी रात्र घालवणं महाकठीण असूनही मी तिच्या आग्रहाला बळी पडले होते. आणि आता तर जया आणि रजनीच्या प्रेमाच्या देवाणघेवाणीला साक्षीदार व्हायचा फार मोह झाला. मल्याळमचा गंध नसूनही!

मी दुपारीच रजनीकडे गेले. घाई नसल्यामुळे आणि खोलीत थोडी जागा असल्यामुळे एल्सम्मा, वसुंधरा, पावना यासुद्धा तिथे आल्या. जयाबद्दल, तिच्या आईबद्दल सांगता सांगता त्या चौघी गावच्या आठवणींत हरवल्या. मलाही आपल्यात ओढायला साऱ्या गप्पा इंग्रजीत चालल्या होत्या. खाडीचं निळंशार पाणी, त्यात डोकावून पाहणाऱ्या माडांच्या राया, संथ तरंगणाऱ्या शाकारलेल्या नौका, पलीकडे केळींच्या बागा आणि क्षितिजापर्यंत पसरलेली भाताची हिरवीगार खाचरं. त्याच अथांग हिरवाईत वसलेली घरं, तशीच शाळा. शाळेची वाट निळ्या पाण्यातून नावा वल्हवत कापली जायची. बोलता

बोलता मुलींनी एक पाय अंगाखाली मुडपून घेतला, दुसरा वल्हं म्हणून खाटेवरून खाली सोडला, आणि हाताने वल्ही मारल्याचा अभिनय करत नावाड्यांची ठेक्यातली गाणी म्हटली! मग रजनीनं कपाटातून एक तळहाताएवढा अल्बम काढला. त्यात गावाकडच्या हिरवाईचे असेच फोटो होते. माणसांचे, प्राण्यांचे फोटो मुद्दामच आणले नव्हते. पण लाल कौलांच्या दुहेरी छपरांची टुमदार घरं, त्यांच्या ऐसपैस उघड्या पडव्या आणि परसातली बहरलेली फुलझाडं मात्र होती.

''आम्ही रोज हे फोटो बघतो. त्यांच्याबद्दल बोलतो. सगळ्या मिळून गावाकडची गाणी गातो. मग ही इथली गचडी, या भिंती जाणवत नाहीत. शांत वाटतं,'' पावना तृप्त सुरात म्हणाली.

ते फोटो बघितल्यापासून त्या खोलीतली दाटी माझ्याही अंगावर कोसळेनाशी झाली होती. श्वास मोकळा वाटत होता.

रजनीच्या आईच्या फोननं वाढदिवसाचा सोहळा सुरू झाला. जयाबद्दल ऐकून आईला आनंद झाला. फोन तुटलाही नाही. वाढदिवस छान साजरा झाला. जयाला यायला उशीर होणार होता. म्हणून केक, मिठाई, सामोसे असा खासा खाऊ तिच्यासाठी राखून ठेवला.

रात्री दहाच्या सुमाराला सामानासुमानासकट जया आली. आतल्या दाराला गार्डानं बाहेरून कुलूप घातलं आणि जयाच्या चेहऱ्यावरचं हास्य हरपलं. ती कावरीबावरी झाली. रजनीनं तिला जवळ घेतली, बळेबळे केक खाऊ घातला, कुण्या रमणवरून तिला चिडव चिडव चिडवली. मग तिचं सामान लावून देऊन पुन्हा एकदा खोलीत गप्पा रंगल्या. बालिश, गोंडस जया सगळ्यांनाच आवडली. तिचे गाल ओढून खोड्या काढणं, लाड करणं सुरू राहिलं. रमणचं नाव काढलं की ती गोड लाजते, हे माझ्याही लक्षात आलं.

त्यांची गडबड चालू असतानाच मी थकून आडवी झाले. उशीला डोकं टेकलं मात्र, खोबरेल तेलाचा आणि सुक्या मासळीचा उग्र दर्प मस्तकात भिनला. त्या दर्पानं उवा-ढेकूण मरत असावेत आणि उंदीर सैरावैरा पळत असावेत असा सुखद विचार मनात घोळवताना, झोप कधी लागली ते कळलंही नाही.

अर्ध्या रात्री जाग आली ती रजनीच्या हाकांनी!

''डॉक्टर, डॉक्टर उज्ज्वला, जयाला बघा हो! तिला हार्ट अ‍ॅटॅक आलाय बहुतेक. बघा ना कशी करतेय!''

मी धडपडून उठले. जया तिच्या खाटेवर माशासारखी तळमळत, बेभानपणे हातपाय आपटत होती. तिनं अंगातले सारे कपडे काढून टाकले होते. भयभीत, पांढराफटक चेहरा, विस्फारलेले डोळे, गारढोण, घामानं निथळणारं अंग, वेडेवाकडे, थरथर कापणारे हातपाय... ती भयानक दिसत होती. छातीतली



धडधड तर तुफान मेलच्या गतीनं, दीडशेच्या पार चालली होती.

''काय होतंय जया? कुठे दुखतंय का?''

''छातीत कसंतरी होतंय. गुदमरायला झालंय. चक्कर येतेय. मी मरणार आहे आता'', ती हातपाय आपटत, धापा टाकत मल्याळममध्येच बोलली.

तिच्या वयाला हार्ट अ‍ॅटॅकची शक्यता कमी होती. पण इतरही बरेच गंभीर आजार असतात. त्या सगळ्यांचीच शक्यता नाकारता येत नव्हती. तिच्या पूर्वीच्या आजारांची माहिती ना मला होती, ना रजनीला. त्या होस्टेलनामक गुहेत साधं रक्तदाब मोजणारं यंत्रही नव्हतं. एका स्टेथॉस्कोपनं किती माहिती मिळवणार?

रजनी रडायलाच लागली. खोलीतल्या बाकीच्या दोघीही जाग्या झाल्या होत्या. मी त्यांना पाठवून एल्सम्माला बोलावून घेतलं.

''गार्डाला उठवा. हिला हॉस्पिटलमध्ये न्यावं लागेल.''

''गार्डाला उठवणार कसं? त्याच्या खोलीपर्यंत आम्हाला पोचताच येणार नाही. त्या खोलीच्या भिंतीवर थापा मारल्या

**साहित्य अकादेमी** प्रादेशिक कार्यालय, 172, शारदा सिनेमा बिल्डिंग, दादर (पूर्व), मुंबई–400 014
फोन : 24135744 फॅक्स : 24147650
E-mail : sahitya@mtnl.net.in, sahityaakademi@gmail.com

## महत्त्वपूर्ण मराठी प्रकाशने

**एकविंशति**
रवीन्द्रनाथ ठाकुर
अनु. मामा वरेरकर रू. 190

**योगायोग**
रवीन्द्रनाथ ठाकुर
अनु. शंकर बाळाजी शास्त्री रू. 110

**चक्षुशल्य**
रवीन्द्रनाथ ठाकुर
अनु. शंकर बाळाजी शास्त्री रू. 150

**बाल–साहित्य**
रवीन्द्रनाथ ठाकुर
संपादक : लीला मजुमदार,
क्षितीश रॉय
अनु. सरोजिनी कमतनूरकर रू. 120

**काळाला झोपू देणार नाही**
एन. गोपी
अनु. कांचन दिलीप जतकर रू. 90

**विभावरी शिरूरकर** रू. 40
अरुणा श्री. दुभाषी

विष्णुशास्त्री चिपळूणकर
अनुपमा उजगरे रू. 40

**व्यंकटेश माडगूळकर**
मीरा तारळेकर रू. 40

**पुरुषोत्तम शिवराम रेगे**
सुलभा हेर्लेकर रू. 40

**अनुभवाच्या आकाशात चंद्र**
लीलाधर जगूडी
अनु. कविता महाजन रू. 80

**मोरनामा आणि इतर कथा**
इंतजार हुसैन
अनु. भास्कर लक्ष्मण भोळे रू. 130

**श्री तुकारामाच्या अभंगांची चर्चा**
(खंड १ व खंड २)
वासुदेव बळवंत पटवर्धन
गणेश हरी केळकर प्रत्येकी रू. 150
प्रस्तावना : दिलीप धोंडगे

**तुकाराम गाथा**
भालचंद्र नेमाडे रू. 110

**निवडक बी. रघुनाथ**
संपादक : नागनाथ कोत्तापल्ले रू. 70

**निवडक शेजवलकर**
संपादक : राजा दीक्षित रू. 100

**एकनाथ वाङ्मयदर्शन**
संपादक : भगवंत देशमुख रू. 100

**नामदेव गाथा**
संपादक : हरी श्रीधर शेणोलीकर रू. 90

**समर्थ रामदास : विवेकदर्शन**
संपादक : वि.रा. करन्दीकर रू. 100

**भारती**
प्रेमा नंदकुमार
अनु. यशवंत कळमकर रू. 40

**बोरकरांची निवडक कविता**
संपादक : प्रभा गणोरकर रू. 70

**दोन ओळींच्या दरम्यान**
राजेश जोशी
अनु. बळवंत जेऊरकर रू. 80

**निवडक मराठी एकांकिका**
संपादक : सुधा जोशी, रू. 125
रत्नाकर मतकरी

**कलीकथा : व्हाया बायपास**
अलका सरावगी
अनु. जयप्रकाश सावंत रू. 100

**निवडक ना.सी. फडके**
संपादक : इंदिरा संत,
प्रल्हाद वडेर रू. 125

**एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य (खंड–१)**
संपादक : भास्कर लक्ष्मण भोळे रू. 100

**एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य (खंड–२)**
संपादक : भास्कर लक्ष्मण भोळे रू. 120

**विसाव्या शतकातील मराठी गद्य (खंड–१)**
संपादक : भास्कर लक्ष्मण भोळे रू. 190

**विसाव्या शतकातील मराठी गद्य (खंड–२)**
संपादक : भास्कर लक्ष्मण भोळे रू. 160

**लोकमान्य टिळक लेखसंग्रह** रू. 260
संपादक : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

**अशी धरतीची माया**
शिवराम कारंत
अनु. रं.शा. लोकापूर रू. 170

**मातीचा माणूस**
कालिंदीचरण पाणिग्रहि
अनु. वामन कृष्ण चोरघडे रू. 60

**बाणभट्टाची आत्मकथा**
हजारीप्रसाद द्विवेदी
अनु. र.श. केळकर रू. 130

**नाट्याचार्य खाडिलकर**
नारायण कृष्ण शनवारे रू. 40

**गालिब**
एम. मुजीब
अनु. वा.रा. कांत रू. 40

**रवीन्द्रनाथ ठाकुरांच्या आणि त्यांच्यावरील ग्रंथांवर 40% विशेष सवलत**

Subscribe to Akademi's Bi-monthly Journals

समकालीन भारतीय साहित्य **Single Copy : Rs. 25, 1 Year : Rs. 125, 3 Years : Rs. 350**

Indian Literature **Single Copy : Rs. 50, 1 Year : Rs. 250, 3 Years : Rs. 650**

तरी तो उठणार नाही. उठलाच तरी त्याच्याकडेही फोन नाही. त्याची गाडीही नाही. तो काय करणार कप्पाळ!'' एल्सम्मानं कपाळावर हात मारला.

भरवस्तीतल्या घरात असूनही आम्ही जगापासून दूर दूर एकट्या पडलो होतो. वाळवंटात वाट चुकली की येतो तसाच प्रचंड एकटेपणा, तेच नैराश्य मनात दाटून आलं. एका अजस्र काँक्रीटच्या थडग्यात बंद करून आम्हाला गाडून टाकलंय, जग आम्हाला विसरून गेलंय, आमच्या हाकेला कधीच ओ येणार नाही, असं वाटून त्या सिमेंटच्या भिंतीचं सारं वजन गप्पकन छातीत बसलं. जीव तोडून आभाळाला भिडणारी किंकाळी फोडावी, आम्हाला जखडून टाकणारे काँक्रीटचे थर त्या आक्रोशाच्या धारेनं टराटरा फाडून छाती भरून मोकळा श्वास घ्यावा म्हणून जीव तडफडला. जयावर इलाज करणं बाजूलाच राहिलं. माझीच भीती मोकाट उधळली. तिला लगाम घालावा म्हणून मी सगळं अवसान एकवटून विचार केला आणि दाराला कुलूप लागल्याबरोबर अस्वस्थ झालेल्या जयाचा चेहरा मला आठवला. माझ्या थरथरत्या पायांना जमीन सापडली.

''रजनी, रडं आवर. माझ्या प्रश्नांची उत्तरं दे. तरच मला काही इलाज करता येईल. एल्सम्मा, होस्टेलमध्ये कुणाच्याही खोलीत झोपेच्या गोळ्या असल्या तर त्या आता घेऊन ये.'' माझ्या अधिकारवाणीनं त्या दोघींना धीर आला.

''रजनी, जया कधीपर्यंत बरी होती? तिची तगमग केव्हापासून सुरू झाली?''

''आज ती तशी फारशी आनंदात दिसत नव्हती. पण सगळ्या जणी इथे होत्या, आम्ही गावाकडच्या गप्पा करत होतो तोपर्यंत ती ठीक होती. बाकीच्या निघाल्या, इथे निजानीज झाली आणि ती तळमळायला लागली. अंगात आल्यासारखी जोरजोरानं आवाज करत धपापायला लागली. म्हणाली, 'चेची, मला बरं वाटत नाही. हातापायांना मुंग्या येतायत. श्वास घशात अडकतोय. छातीत गच्च वाटतंय. मला घरी जायचंय.'

'उद्या सकाळी नर्सिंग सुपरवायझरला सांगू हं', मी समजूत घालत म्हटलं आणि दारं बंद, फोन नाही, गाडी नाही, या सगळ्या अडचणींचा पाढा वाचला.

माझं बोलणं संपायच्या आतच, 'मी मरते! मी मरते!' असं ओरडत ती इकडेतिकडे पळायला लागली. आता या खोलीत कोण कसं पळणार? मग खाटेवर चढून धावली. त्यातही पडली आणि मग जागच्या जागी तडफडत थाड् थाड् उडायलाच लागली.''

''ठीक आहे. रजनी, मी नक्की सांगू शकत नाही. पण बहुतेक जया नुसतीच घाबरली आहे. गावाकडच्या मोकळ्या वातावरणातून आलेली मुलगी ती. इथल्या आठशे भिंती, नऊशे



कुलपांच्या आक्रसलेल्या कडेकोटात गुदमरली आणि तिला आत्यंतिक भयाचा झटका आला. पॅनिक अ‍ॅटॅक म्हणतात याला. या देशात झोपेच्या गोळ्या जवळ बाळगायला बंदीच आहे. कुणी चोरून आणलेल्या असल्या आणि एल्सम्माला मिळाल्या तर ठीक. नाहीतर आत्ता जयाला नुसतं बोलून शांत करावं लागेल. तुझा तो अल्बम काढ. दुपारसारख्या आठवणी काढा उकरून. त्याही मल्याळममध्ये! आणि मधून मधून तो तिचा मनरमण शिंपडा त्या हिरवाईवर.''

भरल्या डोळ्यांनी रजनी खुदूकन हसली. बाकीच्या दोघीही सरसावल्या. मी अदमासे पण जिवाच्या आकांतानं मारलेल्या वल्ह्यानं नाव सरकायला लागली. तीन मजल्यांवरच्या नव्वद मुलींची झोपमोड करून, झोपेची एकच गोळी घेऊन एल्सम्मा परतली तेव्हा जया नीटनेटके कपडे घालून, मन लावून अल्बम बघत होती. गोळी घेतल्यावर तासाभरानं ती पेंगुळली आणि आम्ही सगळ्याजणी निजायला मोकळ्या झालो.

तोपर्यंत पहाटेचे तीन वाजले होते. तरीही निर्दयपणे मी रजनीला सहाचा गजर लावायला लावला. सातच्या ड्युटीच्या मुलींना न्यायला साडेसहाला बस येणार होती. त्यावेळी जयाला बाहेर काढून नव्या हॉस्पिटलमध्ये सायकिअ‍ॅट्रिस्टच्या हवाली केलं, की माझा त्या भिंतींत चिणलेला जीव भांड्यात पडणार होता.

''पण आता ती बरी आहे ना, डॉक्टर?''

''हो. पण तिची पुन्हा केव्हाही घबराट होऊ शकते. मात्र गरजेची तपासणी झाल्याशिवाय माझ्या निदानाचा शिक्का बसता नये तिच्यावर.''

शुक्रवारी सकाळी कधीतरी मला नव्या हॉस्पिटलला

पोचवायची जबाबदारी त्या ड्रायव्हरला दिलेली होती. त्यासाठी दुसरी खेप करावी लागणार नव्हती हे त्याच्या फायद्याचंच होतं. पण यादीत नसलेली, ड्युटीवरही नसलेली जया केवळ 'ती फार आजारी आहे', या क्षुल्लक कारणासाठी माझ्याबरोबर येणार, हे त्याच्या आणि त्या गार्डाच्या सांगकाम्या बुद्धीला काही केल्या पटेना. नशिबानं जया अजून त्या झोपेच्या गोळीच्या अमलामुळे मलूल दिसत होती. अंगात ताकद नसल्यासारख्या तिच्या झोकांड्या जात होत्या.

''ती आतमध्येच मेली तर कसं निस्तरशील?'' या अभद्र प्रश्नानं मात्र काम केलं. जयाची सगळी कायदेशीर जबाबदारी माझ्यावर ढकलून ड्रायव्हरनं आम्हाला नव्या हॉस्पिटलात सोडलं.

'हार्ट ॲटॅक असेलसुद्धा एखाद वेळ', असं म्हटल्यामुळे जयाला ICU मध्ये दाखल केलं गेलं. तिथल्या खोल्या तर अगदीच लहानशा आणि बंदिस्त. झोपेच्या गोळीचा अंमल सरून जागी झाल्याझाल्या जया पुन्हा अनावर झाली. तोवर अर्जंट तपासांचे निकालही आले होते. दुसरा कसलाही गंभीर आजार नव्हता तिला.

तेव्हापासून सायकिॲट्रिस्ट डॉ. करीमनी तिची जबाबदारी स्वीकारली. त्यांनी तिला औषधं तर दिलीच शिवाय ते गावातलं होस्टेल सुधारावं, निदान जयाची राहण्याची जागा बदलावी म्हणूनही आटोकाट प्रयत्न केले. अशा प्रयत्नांमुळे कदाचित तिला नोकरीवरून काढून टाकलं जाईल हे ध्यानात आल्यावर त्यांनी ते सोडून दिले. पण त्यांनी तिला विचारांची नवी पद्धत शिकवली. बाकीच्या मुली जशा गावची हिरवाई मनात जागवत होस्टेलचा कोंडवाडा विसरत होत्या तसा सकारात्मक दृष्टिकोन दिला. मुख्य म्हणजे भयाचा अक्राळविक्राळ ब्रह्मराक्षस समोर उभा ठाकला, की त्याला बगल देऊन जायच्या मनाच्या चोरवाटा दाखवल्या.

''आता आमच्या खोलीच्या भिंतीत मी गावच्या घराच्या भिंती बघते. टांगलेल्या कपड्यांत ओसंडणाऱ्या वेली, ओठंगलेल्या फांद्या बघते. खेळच झालाय तो मनाला. आणि जमतील तेवढे वशिले लावून महिन्यातून एकदा तरी गावातल्या दुकानांच्या ट्रिपला जाते,'' आनंदी, हसऱ्या जयानं सांगितलं.

''आणि रमणची आठवण काढतेस ना? त्याचं काय?''

''कोण जाणे! त्याची आई अडून बसली आहे. माझे आईवडील करतायत प्रयत्न. बघू,''

जयाचा चेहरा पुन्हा काळजीनं ग्रासला.

पुढच्या आठवड्यात ती पुन्हा खुशीत होती,

''गावात ते नवं अल् अझीझिया नावाचं सुपरमार्केट आलंय ना, तिथे म्हणे उकडा तांदूळ आणि ओला नारळ मिळतो. आईच्या हातच्या इडलीची आठवण येतेय. कित्ती दिवसांत उकड्या तांदळाची इडली आणि ओल्या नारळाची चटणी खाल्ली नाहीये.''

''मग? कधी करणार आहेस त्या अझीझियावर स्वारी?''

''येत्या सोमवारी. कित्तीजणींशी रदबदली करून, मस्का लावून, शेवटी एकदाचा लागलाय नंबर माझा. रजनीचेची देखील आहे बरोबर. दोघी मिळून व्यवस्थित खरेदी करणार आहोत.''

''काय? कशी झाली खरेदी तुमची? मला वाटलं होतं तू आज माझ्यासाठी इडली-चटणी आणशील. आणली आहेस?''

जयाची थट्टा करायला मला आवडायचं. पण आज या प्रश्नाचं उत्तर म्हणून ती एकदम, ॲहॅक् ॲहॅक् ॲहॅक्, करून त्या मधल्या कॉरिडॉरमध्येच गदगदून रडली. योगायोगानं डॉ. करीमनी ते दुरून पाहिलं. तेही लगबगीनं तिथे आले. तिला ओपीडीच्या खोलीत घेऊन, रजनीच्या मदतीनं, हळूहळू सगळी हकिकत समजली.

अझीझियाला जायचा, तिथल्या खरेदीचा, मग इडली करायचा असे बरेच बेत आखून जयानं मनचे मांडे पोटभर खाल्ले होते. त्यांना होस्टेलवरून तिथे नेणारी बस दुपारी चारला यायची होती. जया साडेतीनपासूनच बुरखा चढवून तयार होती. त्यावरूनही सगळ्यांनी तिची भरपूर चेष्टा केली,

''अगबाई, कोण रमण येणार आहे का अझीझियाला बरोबर? नाही म्हणजे, इतकी उतावीळ झालीयेस म्हणून म्हटलं!''

''अझीझियालाच, बुरखा घालूनच जायचं तरी अशी नटली आहे बया! मग रमणबरोबर फिरायला जायचं असलं की काय काय नखरे करेल, कोण जाणे!''

जाता-येता सगळ्यांनी टोले हाणले.

बरोबर चार वाजता खाली बस आली. रजनी, जया आणि बाकीच्याही मुली उतरल्या. नेमका त्याच वेळी तळमजल्यावरचा फोन वाजला.

''जया, तुझ्या आईचा फोन!''

''फोन घे, जया! पण थोडक्यात आवरतं घे. तोवर मी घानेमला थांबवते'', म्हणून रजनी घाईनं पुढे गेली.

आई नेहमीसारखं थोडं इकडचं तिकडचं बोलली. बाहेर रजनीची आर्जवं चालली होती.

''आई, मी आता फोन ठेवते. पुढच्या आठवड्यात बोलू.''

''नाही, जया, थांब. अग, रमणच्या आई आल्या आहेत. थांब हं, त्यांना बोलावते. महेश, ए महेश, थंगम्मांना घेऊन ये. जपून, हात धरून आण रे!''

''त्या फोनवर बोलणार आहेत?''

''हो अग, तुझ्याशी बोलायचंय त्यांना''- आईच्या आवाजात निकड जाणवत होती. जया थांबली.

''येताहेत हं त्या. त्यांना चालायला थोडा वेळ लागतो. फोन ठेवू नको बरं. वाट बघ.''

आता जयाला फोन आवरता घेणं शक्यच नव्हतं. तिचा डावा कान फोनला आणि उजवा बसकडे लागला होता.

होस्टेलच्या दाराबाहेर रजनीचा घानेमशी हुज्जत घालणारा आवाज टिपेला पोचला होता. ती घशाच्या ताणलेल्या शिरांनी बस अडवायला बघत होती. आणि घानेमला ती वेसण थांबवू शकत नव्हती.

''हॅलो, जया, मी थंगम्मा, रमणची आई.''

''नमस्कार, अम्मा.''

''या जयाऽऽ'', बाहेरून घानेमची हाक आली.

''जया, मला तुला काही विचारायचंय,'' थंगम्मांचा आवाज अस्पष्ट झाला. हे बऱ्याचं चिन्ह नव्हतं. कनेक्शनचं काही खरं नव्हतं.

''विचारा, अम्मा.''

''हॅलो, हॅलो, जया! जया!'' अम्मांचा आवाज विरत विरत गेला.

बाहेर बसचा दरवाजा बंद झाला. बस सुटली.

''बोला अम्मा! अम्मा!''

कनेक्शन तुटलं. नुसता कूंऽऽकूंऽऽ आवाज, कदाचित तो मुहाम्मा गावापासून येत असेल, तेवढाच येत राहिला. तेल गेलं, तूप गेलं, हाती फक्त रिसीव्हरचं धुपाटणं राहिलं!

अझीझियाची ट्रिप चुकल्याचं दुःख झालंच शिवाय रमणच्या आईचा काय गैरसमज झाला असेल त्याबद्दल तर मनात शंकाकुशंकांनी धुमाकूळ घातला. उजव्या कानातला बस सुटल्याचा आणि डाव्या कानातला फोन तुटल्याचा असे दोन्ही आवाज, मना-कानात घुमत राहिले.

सगळ्या जगासाठी आईची माया काळजात घेऊनच जन्माला आलेला डॉ. करीम हेलावला. ओपीडीची फिकीर न करता बराच वेळ जयाची समजूत घालत राहिला. पॅनिक अॅटॅक्समधून जया नुकती कुठे सावरत होती. आता या गैरसमजाची नवी चिंता लागली, तर पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या', होण्याची शक्यता होती. तिला पुन्हा आनंदी करायला करीमची धडपड चालली होती.

मलाही काळजी लागून राहिली. दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी मी करीमला गाठलं,

''कशी आहे जया? काही कळलं?''

''जया? जया बरी आहे. तू निर्धास्त राहा. ठीक आहे ती,'' करीमनं आश्वासन दिलं.

पुढच्या ओपीडीला जया खरोखर हसत हसत आली.

''डॉक्टर, तुमच्यासाठी खरंच इडली-चटणी आणली आहे आज. आणि सांबारसुद्धा आहे'', म्हणत माझ्या हातात डबाही ठेवलान्.

'काय जादू केली असेल करीमनं?' असाच विचार माझ्या डोक्यात चालू होता तेवढ्यात जयानंच प्रश्न केला,

''डॉक्टर उज्ज्वला, डॉक्टर करीमनी काय केलं माहीत आहे, माझ्यासाठी?''

''काय केलं? करीम-सना तुला घेऊन अल अझीझियात गेले ना?''

''हो डॉक्टर! सोपं नव्हतं ते. आमच्या होस्टेलमधल्या मुलींना असं मोकळं सोडत नाहीत. ते नियम फार कडक आहेत. पण त्या दोघांनी जाऊन डिरेक्टरशी वादविवाद केला. आणि मग डॉक्टर करीम गावातल्या मुख्य धर्मगुरूकडे गेले. त्यांच्याशी चर्चा करून त्यांचीही परवानगी घेतली. असं सगळं करून डॉक्टर करीम आणि डॉक्टर सना मला अल अझीझियात घेऊन गेले. मला हवा होता तसा उकडा तांदूळ, ओला नारळ, कढीपत्ता, छोटे कांदे, शेवग्याच्या शेंगा, सगळं मिळालं. मग ती दोघं मला त्यांच्या घरी घेऊन गेली. त्यांची बाळं काय गोड आहेत! पण त्यांच्याशी खेळायला मला वेळच दिला नाही. डॉ. सनांनी मला आईच्या शेजारच्या जानकम्माचा नंबर लावून दिला. तिच्याकडे आईला बोलवायला लावलं. मग त्यांनी सांगितलं म्हणून मी आईकडून रमणच्या शेजाऱ्यांचा नंबर सुद्धा घेतला. तिथे फोन लावून रमण आल्यावर डॉक्टर करीम त्याच्याशी बोलले. मी किती चांगली मुलगी आहे ते सांगितलं. मग मला सासूबाईंशी बोलायला दिलं. केवढा वेळ फोन चालला होता! मला फारच ओशाळं वाटत होतं. पण त्या दोघांनी मला आग्रहानं बोलायला लावलं. काय सांगू डॉक्टर उज्ज्वला, रमण आणि त्याची आई खूश झालेत अगदी.''

काय सांगू आणि काय नको असं जयाला झालं होतं. चेष्टा करायची अशी सुवर्णसंधी मी कशाला सोडावी?

''त्या आनंदात केलंय हे इडली-सांबार तर! तरीच. फर्मास झालं असणार! मग, आता होस्टेलच्या भिंतींमध्ये आईचं घर दिसतं, नारळीच्या बागा दिसतात की रमणचं घर?''

डॉ. करीमच्या सायकिअॅट्रीच्या डिग्रीचं सर्टिफिकेट त्याच्या घराच्या किंवा क्लिनिकच्या भिंतीवर लावलेलं नाही. पण त्या क्षणी जयाच्या लाजऱ्या चेहऱ्यावर मात्र ते गुलाबी अक्षरांत छापलेलं होतं.

**- डॉ. उज्ज्वला दळवी**
ujjawalahd9@gmail.com

# इरेना सेण्डलर

## मृत्युगोलातली जीवनदायिनी

कुमार नवाथे

आजूबाजूला थरकापाचं तुफान असताना, इरेना करत असलेलं काम प्रचंड धोक्याचं, गळ्याला स्वत:च फाशीचा दोर अडकावून घेतल्यासारखं होतं. तिलाही याची पूर्ण कल्पना होती. तरीही ती पुढेच जात होती. तिचं हे आयुष्य शब्दांत मांडणं-लिहिणं म्हणजे केवळ काही पांढऱ्यावर काळं करण्याइतपतच आहे. ते धाडस, ते साहस, तो निग्रह... सारं सारं शब्दांपलीकडचंच!

दोन हजार सहा हे माझ्या आयुष्यातलं एक झपाटलेलं वर्ष होतं. सहज चाळा म्हणून रात्री दूरदर्शनवरील वेगवेगळ्या वाहिन्या सरकवत असताना एच.बी.ओ. का कुठल्यातरी वाहिनीवर मी थांबलो. 'शिंडलर्स लिस्ट' हा ब्लॅक ॲण्ड व्हाईट चित्रपट चालू होता. याबद्दल थोडंसं ऐकलं होतं, पण खोलात जाऊन शिंडलरबद्दल कधी उत्सुकता दाखवली नव्हती; वा ज्यूंबद्दल कधी हळहळलो नव्हतो. प्रथमच पाहत असलेल्या या चित्रपटानं मी थरारलो, मुळापासून हादरून गेलो. रात्रीचा दीड वाजला होता. त्या चित्रपटातील काही प्रसंग, शिंडलरचं काम करणारा लिम निसॉम व त्याचा ज्यू मॅनेजर बेन किंग्जले यांनी मनात घर केलं. दोन मिनिटांत कधीही, कुठेही, केव्हाही झोप येणारा मी ती रात्र अस्वस्थ होतो.

दुसऱ्या दिवशी सकाळीच 'शिंडलर्स लिस्ट'ची डीव्हीडी आणली आणि दिवसभरात तीन वेळा तो चित्रपट लागोपाठ पाहिला. चित्रपट पाहताना कधी नव्हे ते डोळ्यांत पाणी आलं. कॉलेज आयुष्यातसुद्धा कुणी हिंदी चित्रपटातील नट वा नटीनं मनात प्रवेश केला नव्हता, पण शिंडलर आरपार साऱ्या धमन्यांत शिरला. त्यामागून ज्यूंनी प्रवेश केला. आउशवित्झ छळछावण्या/घेट्टो; सारं सारं आगंतुकपणे मनाचा ताबा घेऊन बसलं. ऑस्कर शिंडलर माझा हिरो झाला होता. त्यानंतर अनेक वेळा शिंडलर बघितलाच, शिवाय ज्यू छळावरील सारेच चित्रपट पाहिले, पुस्तकं वाचली आणि माझी अस्वस्थता वाढली. शिंडलरला भेटायला, त्याचा कारखाना बघायला, ज्यू वस्त्या बघायला, गॅस चेंबरमध्ये जिथे लाखोंनी लहान बालकांपासून तरुण स्त्रिया, म्हाताऱ्यांचा कोळसा झाला ते आउशवित्झ बघायची आस शिगेला पोचली आणि मी पोलंडला गेलो.

त्यानंतर पुढील दोन वर्षं दुसरा विषयच डोक्यात नव्हता. 'ग्रंथाली'च्या दिनकर गांगल यांना मी सांगत असलेल्या पोलंडच्या कहाण्यांनी पिडलं; त्यांनी पिच्छा पुरवला आणि 'नाझी नरसंहार' या पुस्तकानं जन्म घेतला.

त्यानंतरच्या साऱ्या कौतुकानं, वाचकांच्या प्रतिक्रियांनी मी सुखावलो. अगदी वर्षापूर्वीपर्यंत मी अगदी हवेतच होतो. एके

दिवशी इंग्रजी वर्तमानपत्रात फोटोसहित एक बातमी वाचली आणि धाडकन जमिनीवर आलो. बातमी होती– ''१२ मे, २००८ रोजी इरेना सेंडलर या ९८ वर्षांच्या पोलिश स्त्रीचं वॉर्सामध्ये निधन. आउशवित्झ कॅम्पमधून अत्यंत धाडसानं, अडीच हजार ज्यू मुलांना गुपचूप बाहेर काढून वाचवणारी सेंडलर म्हणजे ऑस्कर शिंडलरची हुबेहूब दुसरी प्रतिमा होती. तिचा मृत्यू झाला, तो ती राहत असलेल्या वॉर्साच्या घरामध्येच.''

२००७ साली मी वॉर्सामध्ये होतो. ऑस्कर शिंडलरच्या चित्रपटातील त्याचा कारखाना शोधत मी गेलो होतो. ज्यू घेट्टोंमधून फिरलो होतो. मात्र तेव्हा लेडी इरेना सेंडलर, कर्तृत्वाची महामेरू त्याच शहरात असल्याची गंधवार्ताही मला नव्हती. तिच्या कार्याबद्दल कुठे वाचल्याची आठवणही नव्हती. आता भरभरून तिची महती वाचताना, सततची बोच माझ्या मनाला लागत होती, की माझं नशीब, माझं दुर्दैव, शंभरीला पोचलेल्या या एका 'इतिहासाचं' वॉर्सोत जाऊनही मी दर्शन घेऊ शकलो नाही.


तरुण इरेना

असं होणं फक्त माझ्याच बाबतीत नव्हतं. इरेना सेंडलर हे व्यक्तिमत्त्वच तसं होतं. जे आयुष्यभर पडद्यामागेच, प्रसिद्धीपराङ्मुख राहिलं. जगालासुद्धा तिची ओळख आता आता होऊ लागली होती.

चार अमेरिकन मुलींना अभ्यासाच्या विषयात खोल खोल जाताना इरेना सेंडलर सापडली. ऑस्कर शिंडलर या नावाशी बरंच साधर्म्य असलेली इरेना मानवतेत, दयाळूपणात आणि सतत मरणाच्याच दारात उभी असलेली, ऑस्करची जणू बहीणच शोभावी. शिंडलर या नावाची सहसंवेदना ही जणू जहागिरी असल्यागत ऑस्कर शिंडलर व इरेना सेंडलर आयुष्यभर जगले. हिटलरनं जेवढी स्वत:च्या देशाची, समाजाची व जर्मन सभ्यतेची मान जगात शरमेनं खाली घालायला लावली, त्यापेक्षा जास्त एका आदर्श मूल्याची रुजवात या दोन 'शिंडलर्स'नी केली.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात, इरेनाचा पोलंडच्या वॉर्सा शहरात एका कॅथलिक पोलिश डॉक्टर कुटुंबात जन्म झाला. तिचे वडील स्टॅनिसलॉ पोलिश समाजात एक आदरणीय व्यक्ती होतेच, शिवाय ते सहृदय डॉक्टर म्हणून प्रसिद्ध होते. रशियन सिव्हिल वॉरनंतर पोलंडमध्ये लाखो ज्यू स्थलांतरित होऊ लागले. ज्यू द्वेषाचा भडका त्यामुळे आणखीच वाढला. मुख्य पोलिश समाजाला हे उपरे ज्यू तिरस्करणीय होते. परिणामी त्यांना अलग ठेवण्याचं धोरण जनताच नाही, तर सरकारदरबारापासून कटाक्षानं पाळलं जात होतं.

ज्यू विरोध आणि द्वेष टोकाला पोचला असतानाच दुर्दैवानं 'टायफस' (Typhas) या महाभयंकर संसर्गजन्य रोगाच्या साथीनं वॉर्सा शहराला ग्रासलं. या रोगाची लागण झालेला रोगी प्रथम तापाचा शिकार व्हायचा आणि मग अंगावर निळसर चट्टे पडून खंगत जायचा. या साथीमुळे ग्रासलेल्या हजारो रुग्णांवर उपचार करणाऱ्या साऱ्या डॉक्टरांनी, ज्यूंना मात्र दवाखान्यात येण्यासही नकार दिला. असं असताना केवळ इरेनाचे वडील स्टॅनिसलॉ; या गरीब, समाजानं तिरस्कारलेल्या ज्यूंवर मानवतेच्या भावनेतून अहोरात्र उपचार करत होते. साऱ्या पोलिश लोकांचा, कॅथलिक समाजाचा रोष पत्करून, सामाजिक बहिष्काराला सामोरं जाऊन आपलं वैद्यकीय सेवाव्रत त्यांनी चालूच ठेवलं होतं. जेमतेम चार-पाच वर्षांची त्यांची कोवळी मुलगी इरेना त्यावेळी सतत त्यांच्याबरोबर असायची.

ज्यू समाजाचं दु:ख, त्या गरिबांची असहाय्यता, त्यांना सतत मिळणारी तुच्छतेची वागणूक आणि त्याही परिस्थितीत आपल्या वडिलांची सोशिकता, अखंड कामाची ऊर्जा इरेनाला त्या बालवयातच नकळत बरंच काही शिकवून गेली. तिचं दुर्दैव असं, की इतरांना उपचार करत असताना या तिच्या निरपेक्ष, सच्छील वडिलांनाच या भयानक रोगाची लागण झाली आणि केवळ सातव्या वर्षांत पदार्पण केलेली इरेना, तिच्या वडिलांचं मायाछत्र गमावून बसली.

तिचं बालपणच हरवलं. शाळेचे धडे गिरवण्यापूर्वीच नियतीचे धडे ती अजाणपणे अनुभवू लागली. वडिलांची पुण्याई मोठी होती. तिला स्मरून सारा ज्यू समाज लहानग्या इरेनाच्या पाठीशी उभा राहिला. ज्यूंना बाकी समाजानं कधीच आदरानं वागवलं नव्हतं. अपवाद होता त्यांना उपचार करणाऱ्या डॉ. स्टॅनिसलॉ यांचा. त्यांच्या मृत्यूनंतर, त्यांनी ज्यूंना केलेल्या मदतीचं प्रायश्चित्त त्यांच्या मुलीला– इरेनाला लहानपणापासूनच भोगावं लागलं. त्या वयात इरेनाची जाण, समज प्रगल्भ होत होती. वडिलांचा वारसा तिच्यात झिरपला होता.

शाळेत प्रवेश केल्यापासून पोलिश मुलांना ज्यू द्वेषाचे धडे मिळू लागत. ज्यू विद्यार्थ्यांकरता बसण्याची व्यवस्था वेगळी केलेली असायची. ज्यूसाठींचा हा भेद पाळणं सक्तीचं असायचं. ज्यू मुलं त्यांची जागा (बाकं) सोडून इतरत्र कुठेही बसू शकत नव्हती. तर इतर विद्यार्थ्यांना ज्यूंच्या बाकावर बसण्यास, त्या भागात जाण्यासही मनाई असायची.

इरेनाला त्या बालवयातही हा भेदभाव रुचला नाही. तिच्या वडिलांना ज्यू समाजानं देवासारखं मानलं होतं. पूजलं होतं. त्यांच्याबरोबर इरेनाचा साऱ्या ज्यू वस्त्यांमधून संचार असायचा. त्यामुळे त्या साऱ्यांबरोबर तिची मैत्री होत राहायची. ती मैत्री तिनं शाळेत, बाजारात, इतरत्र इकडेतिकडे फिरतानासुद्धा तशीच जपली. शाळेतील ज्यू अलगतेला तिनं शिस्त म्हणूनही मानलं नाही. तिचा हाच ताठर, समभावी बाणा तिनं पुढे शाळेत, कॉलेजात व विश्वविद्यालयातही कायम ठेवला. त्याची (योग्य!) किंमतही तिला चुकवावी लागली. वॉर्सा युनिव्हर्सिटीमध्ये प्रवेश घेतलेल्या इरेनाला, कॅथलिक ख्रिश्चन असूनही ज्यूंमध्ये मिसळते, त्यांच्याबरोबर खाणं-पिणं करते व ज्यू बहिष्काराचा सार्वत्रिक नियम धाब्यावर बसवते याची खास दखल घेऊन; विश्वविद्यालयानं तिला तीन वर्षांकरता बडतर्फ केलं. इरेनानं बडतर्फी स्वीकारली पण ज्यू द्वेष स्वीकारला नाही.

आपलं वॉर्सा शहर सोडून, तुलनेनं लहान असलेल्या ओटवॉक आणि टारसिन या खेडेगावांतून तिनं स्वत:ला सामाजिक कामात गुंतवून घेतलं.

१९३९ मध्ये हिटरलनं पोलंडमध्ये सैन्य घुसवून त्या देशावर कब्जा मिळवला आणि नाझींचा आधीच असलेला ज्यू द्वेष आणखी कैकपटींनी, ठायी ठायी ज्यूंच्या हत्या करून वाढू लागला. शुद्ध आर्यन रक्तपेशीमधील एकमेव विषाचा खडा म्हणजे ज्यू; ही नाझी हिटलरची भावना सत्ता हाती येण्याआधीपासून होती. आता ती हाती येताच एका आसुरी आनंदानं त्याला ग्रासलं. पोलंडमध्ये ज्यूंची फार मोठ्या प्रमाणावर वस्ती होती. त्यामुळे हा बहुसंख्याक ज्यू समाज आता भीषण आपत्तीत सापडणार, या कल्पनेनंच इरेना अस्वस्थ झाली आणि त्याचा प्रत्यय लगेचच पोलंडच्या रस्त्यारस्त्यावरून लावल्या गेलेल्या भडक मजकुराच्या फलकांवरून येऊ लागला. त्यावरील साऱ्या पोलिश जनतेला दरडावणारे नाझींचे शब्द, साधी भीतीच दाखवणारे नाही तर थरकाप उडवणारे होते.

पोलंडमधील साऱ्या ज्यूंना घरे-दारे, जमीन-जुमला, व्यापार, हवेल्या, बंगले ताबडतोब नेसत्या वस्त्रानिशी सोडण्याचा हुकूम दिला गेला होता. आपापल्या भागातील, गल्लीतील, शेजारी राहणारे ज्यू या हुकुमाचं पालन करतात की नाही, हे गैर ज्यूंनी बघणं कायद्यानं फक्त बंधनकारक नव्हतं; तर घरं, वस्ती न सोडणाऱ्यांची माहिती पोलिसांना देणं सक्तीचं होतं. जे या फतव्याचा अनादर करतील वा हा इशारा गांभीर्यानं घेणार नाहीत, त्यांना मृत्युदंडाची शिक्षा दिली जाईल, हेही ठळकपणे नमूद केलं होतं.

या साऱ्याचा अपेक्षित परिणाम पोलंडमध्ये लगोलग दिसू लागला. सामान्य माणसं हादरून गेली. नाझींना, ज्यूंची माहिती न देणाऱ्यांना मृत्युदंड दिल्याच्या खऱ्या-खोट्या बातम्यांनी, स्वत:च्या भवितव्याबद्दल चिंतीत होऊ लागली.

१६ ऑक्टोबर १९४० रोजी पहिला घेट्टो या साऱ्या ज्यूंकरता बांधला गेला आणि तीन लाख ऐंशी हजार एवढ्या विक्रमी संख्येनं हे पोलंडचे गरीब-अमीर धनवान ज्यू लहानग्या मुलाबाळांसह, आई-बायकोसह बंदिस्त केले गेले. राष्ट्रीय आरोग्य विभागात काम करणाऱ्या इरेनाला या घेट्टोत संसर्गजन्य रोगपीडितांना औषधोपचार, मलमपट्टी करायला आणि त्या रोगाच्या निर्मूलनाकरता जाण्याची खास परवानगी होती. ज्यू लोकांच्या काळजीपेक्षा तिथे असलेल्या व साऱ्या पोलंडभर पसरलेल्या नाझींना कोणत्याही रोगाची लागण होऊ नये, हा त्याच्या मागचा मुख्य हेतू होता.

मनुष्यसंहाराची धग दिवसेंदिवस जास्त भडकत होती. सामान्य लोकांनी केव्हाच शरणागती पत्करली होती. जगावेगळ्या विचारांची, भावनेची आणि धैर्याची केवळ मूठभर माणसंच या वणव्याविरुद्ध पोटतिडकीनं उठून उभी राहिली.

इरेना सेंडलर ही त्यातील एक शलाका होती. एवढं तरुण वय पण विचारांचा पोक्तपणा तिच्यात आला होता. भर दिवसा ज्यूंना मरणाला सामोरं जावं लागत होतं. मुला-बाळांची, स्त्री-पुरुषांची जन्माची ताटातूट होत होती. हे सारं पाहणंसुद्धा हृदय विदीर्ण करणारं होतं. नुकतीच चालू लागलेली किंवा आईच्या कडेवरील लहान मुलं हिसकावून घेऊन ट्रकमध्ये कोंबली जात होती, फेकली जात होती. त्यांच्या जीव तोडून रडणाऱ्या आकांताकडे आणि मातांच्या हंबरड्यांकडे दुर्लक्ष करत ट्रक भरले की अज्ञात स्थळी निघून जात होते.

इरेनाला स्वत:च्या आयुष्याची लाज वाटली. जंगली जर्मन मनोवृत्तीची घृणा आली. डोळ्यांसमोर होणारा हा नरसंहार आपण मूकपणे विनाप्रतिकार पाहणं तिला षंढपणाचं वाटलं. पण उघड प्रतिकार केल्यास आपलं ईप्सित साध्य होणार नाही याची तिला खात्री होती. केवळ एका हिटलरच्या वांशिक उन्मादानं ज्यू ही सारी मनुष्यजातच जगातून नष्ट होईल, या विचारांनी ती त्रस्त झाली आणि या रानटीपणापुढे वाकायचं नाही हा तिचा संकल्प दृढ झाला.

जेव्हा सामान्य स्त्री-पुरुष हिटरलच्या फतव्यांच्या भीतीचे बळी होत होते तेव्हा आपल्या नॅशनल वेल्फेअरमधील नोकरीचा

जास्तीत जास्त फायदा घेण्यास तिनं सुरुवात केली. घेट्टोत गेल्यावर ती दंडावर 'स्टार ऑफ डेव्हिड'चा पट्टा, जो साऱ्या ज्यूंना बांधणं सक्तीचं होतं, तो बांधायची. ज्यू लोकांमध्ये अधिक विश्वास निर्माण करण्याकरता तिला ते आवश्यक वाटायचं. घेट्टोमध्ये औषधोपचारांची दवाखानासदृश दहा केंद्रं होती. आपल्या खास विश्वासातील एकेका माणसाची नियुक्ती इरेनानं या दहाही केंद्रांवर, आपण जणू त्यास ओळखतच नाही असं भासवून केली. तिच्या दिमतीला एक रुग्णवाहिका, एक शववाहिनी होती. घेट्टोत दिवसभर काम करताना एखादं शव बाहेर घेऊन, ती वा तिच्या विश्वासातील कुणी शववाहिनीत बसून जायचं, त्यावेळी बाकाखाली वा एखाद्या पांढऱ्या फडक्यात गुंडाळून कुठल्यातरी मुला-मुलीला ते घेट्टोबाहेर काढायचे. तपासणीचे नाके कडक असायचे. तिथे गाडी येण्याआधी इरेना त्या मृतवत ढोंग घेतलेल्या मुला/मुलीला हातानं थोपटून धीर द्यायची, ओठावर, डोळ्यांवर हात ठेवून आवाज न करण्याची, डोळे बंद ठेवण्याची सूचना द्यायची. कधी औषधाच्या मोठ्या रिकाम्या डब्यातून एकेकाला घेट्टोच्या नरकातून बाहेर काढायची. घेट्टोत एक चर्च होतं. रविवारी सकाळी इतरांबरोबर ती कुणा मुलीला चार-चार दिवस आधी पढवून प्रार्थनेकरता घेऊन जायची आणि शांतपणे चर्चच्या दुसऱ्या दारातून बाहेर पडायची, आणखी एका अभाग्याची सुटका व्हायची.

घेट्टोमध्ये दाखल झालेल्या साऱ्या ज्यू लोकांच्या बँक व्यवहारांना, पैसाअडका, मौल्यवान वस्तूंना नाझींनी सरकारी मालमत्ता म्हणून जाहीर केलं. सारी अफाट संपत्ती नाझींची मालमत्ता झाली आणि अब्जाधीश ज्यू रातोरात भिकारी जीवन जगू लागले. ऑक्टोबर १९४२ मध्ये - म्हणजे बरोबर दोन वर्षांनी - 'कौन्सिल फॉर एड टू ज्यू' म्हणजे 'झेगोटा' ही भूमिगत मदत संस्था स्थापन झाली. तेव्हा इरेना ताबडतोब त्यात जोलांटा असं नवीन नाव घेऊन सामील झाली. साऱ्या युरोपात नाझीविरोध धुमसत होता, पण त्याला उघड विरोध करणं कुणाला शक्य नव्हतं म्हणून अशी झेगोटा गुप्तपणे उघडली जाऊ लागली. पोलिश सरकारनं (हरलेल्या) रशियन कम्युनिस्टांच्या मदतीनं वॉर्सा-झेगोटाला मदतीचा हात दिला.

झेगोटामधून इरेनानं आपल्या कामाची व्याप्ती आणखी वाढवली. आउशवित्झची गॅस चेंबर रोज हजारो ज्यू स्त्री-पुरुषांच्या आयुष्याचा घास घेत होती. चिमणीतून निघणारे, दूरवरून दिसणारे धुराचे लोट, जळलेल्या प्रेतांची दुर्गंधी... सारं अंगावर काटा आणणारं, जिवाचा थरकाप करणारं होतं. घेट्टोमधून मालगाडी भरून माणसं गेली, की ती संपली हे इरेनाला ठाऊक होतं आणि म्हणून नॅशनल वेल्फेअरमधील कामापेक्षा आणखी जास्त युक्त्या शोधून जास्तीत जास्त बालकांना बाहेर काढण्याकरता ती प्रयत्नशील होती.

आजूबाजूला थरकापाचं तुफान असताना, इरेना करत असलेलं काम प्रचंड धोक्याचं, गळ्याला स्वत:च फाशीचा दोर अडकवून घेतल्यासारखं होतं. तिलाही याची पूर्ण कल्पना होती. तरीही ती पुढेच जात होती, तिचं हे आयुष्य शब्दांत मांडणं-लिहिणं म्हणजे केवळ काही पांढऱ्यावर काळं करण्याइतपतच आहे. ते धाडस, ते साहस, तो निग्रह... सारं सारं शब्दापलीकडचंच!

या साऱ्या शौर्यापेक्षाही लहान-मोठ्या मुलांच्या आईबापांना सामोरं जाणं, त्यांना परिस्थितीची जाणीव करून देणं, महाभयंकर धोक्याची सूचना होता होईल तेवढ्या स्पष्ट शब्दांत, कमीत कमी वेळात पटवून देणं तिला जीवघेणं वाटायचं. सहा-आठ महिन्यांच्या किंवा अगदी आठ-नऊ वर्षांच्या आपल्या लाडक्या मुलांना माझ्याकडे द्या असं जेव्हा ती पालकांना विनवायची, तेव्हा ही मुलं नक्की सुरक्षित राहतील याची खात्री काय म्हणून तिला विचारणा व्हायची. इरेनाचं एकच उत्तर असायचं, माझ्याकडे दिल्यावर ती सुरक्षित राहतील वा नाही हे मला ठाऊक नाही पण इथे राहिली तर खात्रीनं ती भट्टीतच जिवंत जाळली जातील, एवढं निश्चित! इरेना स्वत: धीर न सोडता त्या आईवडिलांच्या दु:खात सामील व्हायची. तुमचं नशीब तुमच्या हातात नाही, किमान मुलांना जगण्याची संधी द्या, म्हणून विनवायची. घेट्टोचं एकूण वातावरणच इतकं जीवघेणं होतं, की इरेनाच्या शब्दांतील कळकळ आईवडिलांच्याही मनाला स्पर्शून जायची. आईबाप मुलांना आपल्यापासून दूर करायला तयार झाले, की मुलाला कसं, केव्हा, कुठून बाहेर काढायचं याबद्दल इरेनाची विचारचक्रं सुरू व्हायची. वेळ खूप कमी असायचा. एकदा मालगाडी वॉर्साहून सुटली, की आउशवित्झमध्ये साऱ्यांना खाली ढकलून देऊन परत रिकामी यायची, हा प्रवासाचा जाण्या-येण्याचा वेळ, तोपर्यंत पुढील दुर्दैवी लोकांचा क्रम लागायचा, ती नावं पक्की झाली, की त्यातून मुलांना बाहेर काढणं मग कठीण असायचं, म्हणून इरेनाची सारी धावपळ, लकडा या कुटुंबवत्सलांमागे असायचा.

घेट्टोबाहेर शहरात, गैर ज्यू लोकांमध्येही भीतीचंच वातावरण होतं. तरीही अनाथालयात, चर्चमध्ये, सधन मध्यमवर्गीय घरांत इरेना जायची. एखाद्या मुला-मुलीला तरी दत्तक घ्या म्हणून प्रार्थना करायची. सारी मुलं ज्यू. ती कॅथलिक ख्रिश्चन कुटुंबात राहायची, त्यामुळे उद्भवणाऱ्या धोक्यांवरही ती तोडगा काढायची. मुला/मुलीचं ज्यू नाव ती कॅथलिक नावात बदलवायची. सारे संस्कार, कॅथलिक रीतिरिवाजांत असलेले उपचार या लहानग्यांना शिकवून, त्यांच्याकडून घोटून तयार करून घ्यायची. जेणेकरून घरावर धाड पडल्यास ते बालक ज्यू नसून कॅथलिक असल्याची नोंद होईल. घेट्टोतील खरे आईबाप आणि घेट्टोबाहेरील नवीन बनणारे आईबाप यांच्या मनधरण्या करताना इरेनाला कधी कमीपणा वाटला नाही.

उलट एखादा मुलगा यशस्वीपणे बाहेर पळवून नेल्यावर, त्याची नव्या घरात व्यवस्था लावल्यावर तिला हायसं वाटायचं. आपण पकडलो गेलो नाही हे तिला त्या दिवसाचं समाधान असायचं. तिची जिद्द आणि निष्पाप लहान मुलांकरता होणारी तिची तडफड, यापुढे तिला स्वत:च्या मृत्यूची छाया कधीच दिसायची नाही. आणखी उत्साहानं ती नवनवीन घरं शोधायची. सुखवस्तू लोकांनी मानवतेच्या दृष्टिकोनांतून या निराधारांना जवळ करायला पाहिजे असं ती सतत पटवत राहायची. त्यांच्या भीतीपोटीच्या अनिच्छेला इच्छेत बदलवायची. त्या घरात जर लहान मूल असेल तर त्याला खेळायला जोडीदार ज्यू मुलगा/मुलगी घेट्टोतून शोधून नक्की करायची. एका घरात नुकतंच एक बाळ जन्माला आलं होतं. इरेनाला घेट्टोतील सहा महिन्यांच्या तशाच बाळाची आठवण झाली. त्या ज्यू बाळाच्या आईवडिलांना तिनं परोपरीनं समजावलं, दाहक वास्तवाची कल्पना दिली. हे गोजिरवाणं बाळ मला दिलं नाही तर उद्या तुमच्यासह आउशवित्झच्या भट्टीत ते निर्दयपणे फेकलं जाईल, एवढं जेव्हा कठोरपणे तिनं सांगितलं तेव्हा, पुन्हा कधीही हे बाळ आपण पाहू शकणार नाही याच्या जाणिवेनं, घळाघळा वाहणाऱ्या अश्रूंसह ते इरेनाच्या हवाली केलं गेलं.

एवढा लहानसा जीव मातृपितृछत्राला पारखा झाला केवळ हिटलरच्या ज्यू द्वेषामुळे! खोट्या आर्यन दुरभिमानामुळे. आईच्या दुधापासून तोडली गेलेली, डोळेही पूर्ण न उघडलेली ती कळी नंतर एका सुताराच्या पेटीतील सारी अवजारं काढून त्यात ठेवली गेली. तिचं रडणं बाहेर ऐकू येऊ नये म्हणून औषधाची गोळी देऊन तिला झोपवलंच; शिवाय बिचारीच्या तोंडावरही चिकटपट्टी लावली गेली. सुतारासह अवजाराची (?) ही पेटी घेऊन इरेना निघाली. संशय येऊ नये म्हणून तिनं दोघांच्या चालण्यात अंतर ठेवलं. तिनंच शिकवून तयार केलेला कुत्रा दोघांच्या मधून त्या बाळाचं रक्षण करत चालला होता. सैनिकी वेशातील कुणीही जवळ आलं, की जोरजोरात ओरडण्याचं प्रशिक्षण इरेनानं तिच्या इमानी कुत्र्याला दिलं होतं; जेणेकरून इरेनाच्या जवळ कोणी येऊ नये आणि अगदी आल्यास कुत्र्याच्या भुंकण्यामुळे एखाद बाळ जरी रडलं तरी आवाज बाहेर येऊ नये अशी दुहेरी जोखीम म्हणजे विस्तवाला हातात घेतच इरेना एकेकाला अनेक दुष्कर, अकल्पित प्रकार करून बाहेर काढत होती. दिवसाढवळ्या नाझी अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत धूळ फेकून स्वत:च्या पाठीवरील बॅगेत, महत्प्रयासानं लहान बाळाला सामावत होती. घेट्टोबाहेर झपाझपा पडून आधीच ठरवलेल्या घरी बाळाला पोचवत होती. जरा मोठ्या मुलांना असं नेणं शक्य नव्हतं. घेट्टोमध्ये दिवस-रात्र खूनसत्र चालू असल्यामुळे, इकडेतिकडे एखाददुसरी शवपेटिका असायची. इरेना लहान मुलांना शिक्षण द्यायची. मेलेल्या मुलासारखं हात-पाय न हलवता, डोळ्यांची जराही उघडझाप न करता पडून राहण्याची थोड्याच काळात सवय करून घ्यायची आईवडिलांची संमती आणि बाहेर जाण्याची संधी मिळाली, की जिवंतपणी तो मुलगा-मुलगी शवपेटीत शवासनावस्थेत जायचे, मग पेटी बंद झाली की झेगोटामधील मुखवटाधारी नाझी ही प्रेतवाहिनी उचलायचे. घेट्टोबाहेर सुरक्षित जागी न्यायचे आणि हे 'मृत' बालक मग कोणाच्या घरी आगंतुक पाहुणा होऊन जायचं. इकडेतिकडे पडलेल्या प्रेतांना उचलायला हातगाड्याही वापरल्या जायच्या. सारी प्रेतं एकत्र करून, एकेका गाडीवर जेव्हा त्यांची चवड रचली जायची, तेव्हा त्यातल्या त्यात एखाद्या धीट मुलाला त्याच गाडीवर झोपवलं जायचं. महाभयंकर दुर्गंधी व मृतदेहाशेजारी पडून राहणं किती कठीण! याची फक्त कल्पना केली तरी शिसारी येते, पण एक मौल्यवान जीव वाचवायला इरेना याही टोकाला जायची. आणखी बाहेर पळून नेण्याचा मार्ग म्हणजे गोणपाटाची मोठी पोती. छिन्नविछिन्न झालेली शरीरं गोणपाटात बांधून फरफटत ओढली जायची, काही सुदैवी अशा फरफटीतून नवजीवनाकडे न्यायची.

जे जे सुचेल ते स्वत:च्या प्राणाची पर्वा न करता इरेना करत राहिली. शवपेटीतून, पोत्यातून, अवजारांच्या पेटीतून, औषधांच्या



खोक्यातून, जेवणाच्या मोठ्या डब्यातून तिचं हे प्राणदान चालू होतं.

हे सारं अजिबात सोपं नव्हतं. किती जणांच्या, किती शक्यतांचा, धोक्याचा विचार करावा लागायचा, हे एकटी इरेनाच जाणे! तिचं व्यक्तिगत आयुष्यच संपलं होतं. तरी तारुण्यसुलभ भावना कधी उफाळून येत. लहानपणापासून पोरकी वाढलेली, स्वत:च्या समाजानं दखल न घेतलेली इरेना प्रेमाची भुकेली होती. झेगोटामधील सहकारी मिझिस्लॉव सेंडलरबरोबर तिच्या तारा जुळल्या आणि इरेना स्टॅनिसलॉची ती इरेना सेंडलर झाली. हे प्रेमसंबंध आणि हा विवाह फार काळ टिकू मात्र शकला नाही. काही काळातच दोघंही विभक्त झाले. पण सेंडलर हे आडनाव तिला अखेरपर्यंत चिकटून राहिलं. ती पुन्हा एकटी पडली. तिनं घेतलेलं असिधाराव्रत सोडलं नाही.

घेट्टोतून बाहेर सोडवून आणलेल्या मुलांची ज्यू ओळख पुसून टाकून त्यांना कॅथलिक समाजातले भासवण्याकरता त्यांना ती सतत रीतिरिवाज, नेहमीच्या बोलीभाषेतील शब्द, चर्चमधील आचरण इत्यादी शिकवत राहायची. त्यांची केशरचना, कपडे यांकडे ती विशेष लक्ष द्यायची. त्यांची बदललेली नावं आणि घरच्या लोकांची ओळख ती सतत पक्की करत राहायची. शहरातून दिवस-रात्र ज्यूंना शोधण्याचं नाझींचं धाडसत्र चालू असायचं, त्यामध्ये एवढ्या हिकमतीनं सोडवून आणलेल्या मुलांचा बळी जाऊ नये हीच त्यामागची भावना असायची.

मरणाच्या दारातून पाचशे तरुण व म्हाताऱ्या स्त्री-पुरुषांना शिताफीनं बाहेर काढणाऱ्या इरेनानं, युद्ध संपेपर्यंत अडीच हजार एवढ्या मोठ्या संख्येनं, सहा महिन्यांपासून ते आठ-नऊ वर्षांच्या मुला-मुलींना जीवदान मिळवून दिलं. प्रत्येकाची नावं बदलणं, त्यांची खोटी कागदपत्रं तयार करणं, अनाथालयात भरती करताना बेवारशीपणाच्या कथा रचणं; यांसारखी सारी 'खोटी' कामं या सत्प्रवृत्त स्त्रीनं केली.

लहान-मोठ्या पदांवरील नाझींनी व आपल्या कामाची थोडीफार शंका घेणाऱ्यांनी गप्प राहावं, फितूर होऊ नये म्हणून त्यांना सतत पैसे देऊन ती खूश ठेवायची. आपली पाठीवरील बॅग, शवपेटी सुखरूप बाहेर काढण्यास त्यांच्याकडून अडथळा न येणं, हीच तिला त्यांची मोठी मदत असायची.

१९३९ सालापासून चालू झालेलं ज्यू हत्याकांड चार वर्षांनंतरही कमी होण्याऐवजी जास्तच वाढत गेलं. छळछावण्यांची संख्याही वाढली. ट्रायब्लिंकाला एका अशाच क्रूर छावणीची बांधणी झाल्यावर, घेट्टोमधून माणसं बाहेर पाठवण्याचा वेग वाढू लागला आणि त्यामुळे इरेनाच्या कामाचाही. या गाडीतून जाणाऱ्यांची नावं एकदा निश्चित झाल्यावर मग त्यातून कुणा मुलांना बाहेर काढणं कठीण व्हायचं, गाडीत चढलेले धट्टेकट्टे फार फार तर एक आठवड्याचे सोबती असायचे. हे सारं चित्र डोळ्यांसमोर सतत ठेवणाऱ्या इरेनाची दमछाक होऊ लागली. ती जास्त धोका पत्करू लागली. परिणामांची तमा न बाळगण्याइतकी बेचैनीनं काम करू लागली. साऱ्या घेट्टोमध्ये असलेल्या व सुटका करून इतरत्र वसवलेल्या मुलांकरता जास्त चिंतीत होऊ लागली. हिटलर आणि त्याच्या साथी नाझींचा उन्माद तिला जास्त छळू लागला.

...आणि अशाच एका बेसावध क्षणी- १९४३ च्या ऑक्टोबरमध्ये - ज्यू मुलांना घेट्टोच्या बाहेर पळवून नेताना ती सापडली. नाझींच्या तावडीत तिचं स्वत:चं मरण तिला डोळ्यांसमोर लख्ख दिसू लागलं.

अडीच हजार मुलांची खरी नावं, वयं, आईवडिलांची नावं याची नोंद मुलांना बाहेर नेण्याआधीच ती करायची. एखाद्या वहीत या नोंदी करणं धोक्याचं असल्यानं व ती नोंदवही कुठे एका जागी ठेवणं वा सतत बाळगणं हे त्याहून कठीण असल्यानं तिनं दुसरीच एक शक्कल लढवली. तिनं मुला/मुलीला घेट्टोमधून हलवण्यापूर्वी त्यांची सारी माहिती एका कागदावर लिहून, ते कागद काचेच्या एका मोठ्या बरणीमध्ये टाकायला सुरुवात केली. घेट्टोमध्ये या बरणीस सुरक्षितता नव्हती. तिनं आपल्या एका परिचिताच्या बंगल्याच्या मागे, सफरचंदाच्या झाडाखाली एक खड्डा खणून त्यात ही बरणी ठेवली. जेव्हा एखादी चिठ्ठी टाकायची असे तेव्हा गुपचूप जाऊन, माती बाजूस सारून, बरणीत तो नोंदीचा कागद टाकायची. पुन्हा त्यावर माती पसरून निश्चिंत व्हायची.

आज ती पकडली गेली होती. संगिनीधारकांच्या घेरावात अडकली तेव्हा आपला शेवट समीप आला या चिंतेपेक्षा तिच्याजवळ नोंदी असलेल्या कागदांची तिला जास्त काळजी वाटू लागली. इरेनाच्या धैर्याचं शल्य नाझींना डसत होतं. आपल्यासमोर अनेकांना यापूर्वी इरेनानं सहीसलामत बाहेर काढलं, हा त्यांना वैयक्तिक पराभव वाटत होता. ती सारी माहिती इरेनाकडून काढून घेण्याचे आदेश लष्करी कोर्टानं देऊन तिची पाविॲकच्या कोठडीत रवानगी करण्याची आज्ञा दिली. इरेनाच्या कामाची पद्धत, तिची साखळी, तिचे साथीदार हे सारं जाणून घेऊन त्या साऱ्यांना फासावर लटकावण्यास नाझी उतावीळ झाले आणि ही माहिती काढून घेण्याकरता या क्रूर कोठडीची निवड झाली होती.

इरेना अजूनही जवळ असलेल्या नोंदी-कागदांमुळे अस्वस्थ होती. तिला तुरुंगाकडे घेऊन जाताना ती आपल्या सहकाऱ्याला भेटायचं नाटक करून एकीच्या जवळ गेली, तिला मिठी मारून नाझींच्या नकळत मग तिनं सारे कागद शिताफीनं समोरचीच्या अंगवस्त्रात कोंबून टाकले.

इरेनाकडून सारी माहिती काढून घेऊन तिला फासावर



वृद्धपणीची
समाधानी
इरेना

लटकावून वा तिच्या शरीरावर गोळ्यांची बरसात करून संपवायचं; यासाठी सारे उतावीळ होते. तिला कोठडीत नेण्यात आलं आणि थर्ड डिग्रीच्याही पलीकडे इरेनाला मारझोड सुरू झाली. मार खाऊनही इरेनानं तोंड उघडलं नाही. त्यामुळे तिला चटके दिले गेले. अनन्वित छळानं, प्रचंड मारानं, इलेक्ट्रिक शॉकनं, गुप्त जागी केलेल्या वेदनांनी इरेना अर्धमेली झाली. पाण्याच्या थेंबापासून आणि अन्नाच्या कणापासून तिला एकदम दूर ठेवलं गेलं. जेणेकरून तिच्याकडून सत्य बोललं जाईल. याचा परिणाम होऊन इरेनाचा स्वत:वरील ताबा सुटला. उलट्या, मलमूत्र तिला जागीच होऊ लागलं. त्याच घाणीत, दुर्गंधीत तिला ठेवत. नाझी तिला तिच्या सहकाऱ्यांची नावं विचारत होते. किती ज्यूंना मदत केली हे पोटावर जाड बुटांच्या लाथा मारत विचारत होते.

तुझा आता वध होणार आहे, हालहाल करत शेवटच्या काळकोठडीत तुझी आता रवानगी होणार आहे, तुझं मरण आता तू स्वत: पाहणार आहेस... हे सारं तुला थांबवायचं असेल, यातनांतून सुटका पाहिजे असेल तर अजूनही तू सारं सांगून बाहेर येऊ शकतेस, कमी हा नाझी कमांडर गुर्मीत इरेनाला सांगत होता.

इरेना सेंडलर शांत होती. या साऱ्या भाषणाचा तिच्यावर काहीही परिणाम झाला नाही. स्वत:च्या मृत्यूच्या भयानं तिला जराही स्पर्श केला नव्हता. आपण आता जाणार या यातनेपेक्षा तिला सोडल्या न गेलेल्या मुलांचे, त्यांच्या आईवडिलांचे आक्रोश, असहायता टोचत होती. आपलं काम अपूर्ण राहिल्याची खंत त्याही परिस्थितीत तिला बोचत होती. तिच्या मौनातच तिच्या मरणाची संमती होती. १९४४ साल तिच्या मृत्यूकरता मुक्रर झालं.

हा नाझींच्या अमर्याद क्रूर शक्तीचा एका कोवळ्या, नि:शस्त्र महिलेनं केलेला पराभव होता. शिवाय आणखी मोठा पराभव, लाजीरवाणी चपराक नाझींना मिळाली त्यांच्याच सैनिकी अधिकाऱ्यांकडून. अनैतिकता, क्रूरता, उन्माद यांच्या पायावर उभी राहिलेली नाझी संघटना, त्याचे सैनिक थोडेच सत्शील वर्तनाचे सद्‌गुणी असणार! वैयक्तिक स्वार्थात लडबडलेले हे (शूर!) सैनिक भरपूर पैशांचं आमिष दिसताच गडबडले. झेगोटाच्या कार्यकर्त्यांनी तुरुंगाधिकाऱ्यांवर भरपूर पैशांची बरसात केली. गुप्तपणे साऱ्या मोक्याच्या अधिकाऱ्यांना फितवलं आणि त्या लाचेच्या मोबदल्यात इरेना हलकेच मृत्यूच्या दारातून परत आली.

नाझी युद्ध हरले. धर्मांधतेचे साठ लाख बळी ठरलेल्या ज्यूंचं जीवन संपवणारे नीच नाझी आणि त्यांचा माथेफिरू सेनापती हिटलर, सारे आत्महत्या करते झाले. खोटा राष्ट्रवाद, खोटी अस्मिता, खोटी आश्वासनं, फॅसिस्टांचे सारे शब्दच खोटे. त्यांचं जीवन आणि भडकावू विचारसरणीच खोटी!

इरेना सेंडलर मृत्यूच्या जबड्यातून तिच्या पुण्याईनं बाहेर आली. युद्ध संपेपर्यंत तिच्या अंगात त्याही परिस्थितीत झुंजण्याची हिंमत असूनही, ती साऱ्यांपासून दूर वनवासात राहिली. नाझींनी तिचे हात-पाय तोडले होते, साऱ्या अंगाची चाळणी झाली होती.

ती आता पस्तिशी ओलांडलेली, नाझी जोखडातून मुक्त झालेली विहंगिणी होती. आपल्या साऱ्या मुलांना त्यांच्या खऱ्या आईबापांकडे सुपूर्द करायला ती उतावीळ झाली होती. पण एकेक कुटुंब आउशवित्झच्या भट्टीत जिवंत जाळला गेल्याच्या बातम्यांनी आणि सारी मुलं कायमची अनाथ झाल्याच्या वास्तवानं ती विदीर्ण झाली. मी या मुलांना वाचवू शकले या समाधानापेक्षा न वाचवलेल्यांच्या होरपळीनं अतृप्त राहिली.

युद्धानंतर सारा युरोपच हादरून गेला होता. सारं पोलंड पोरकं झालं होतं. आपला देश पुन्हा उभा करण्याकरता इरेनानं आपलं समाजकार्य पुन्हा आणि उजळमाथ्यानं चालू केलं.

स्टिफन या एकेकाळच्या भूमिगत सहकार्यकर्त्याबरोबर लग्न करून ती संसारी झाली. आपल्या कामाचा, आपल्या शौर्याचा डंका तिनं कुठे पिटला नाही, ना स्वत:च्या पिटाई झालेल्या आयुष्याचं कुठे प्रदर्शन केलं!

प्रकाशापासून-आत्मसन्मानापासून दूर राहणाऱ्या इरेना सेंडलरला, तिच्यावर अलोट प्रेम करणाऱ्यांच्या प्रेमाला मात्र अव्हेरता आलं नाही. तिच्या उपकाराची परतफेड आपण केलीच पाहिजे असं सामान्यांपासून सरकारपर्यंत सर्वांनाच प्रकर्षानं वाटत होतं. पोलिश सरकारनं 'ऑर्डर ऑफ द व्हाइट ईगल' हा देशाचा सर्वोच्च सन्मान देऊन इरेना सेंडलरला गौरवलं. तिच्या शौर्याचा, धैर्याचा आम्हाला अभिमान वाटतो, असं नमूद करताना पोलिश राष्ट्रपतींनी इरेनानं अडीच हजार बालकांना वाचवलं त्याबद्दल गौरवोद्‌गार काढले. इरेना सेंडलरनं सन्मान स्वीकारला आणि साऱ्या स्तुतिसुमनांबद्दल नम्र भाषेत राष्ट्रपतींना उत्तर पाठवलं. त्या पत्रात इरेना म्हणते, Every child saved with my help is the justification of my existance on this earth & not a little to glory.

युद्धानंतर काही वर्षांतच ज्यूंचं इस्रायल हे नवीन राष्ट्र उभं राहिलं व जगभरातील वाचलेल्या, पोळलेल्या ज्यूंनी आपल्या देशात धाव घेतली. इरेना सेंडलरचं स्मरण त्यांना न होईल तरच नवल होतं. त्या ज्यू राष्ट्रानं ज्यू नसलेल्या परकीय देशातील या स्त्रीला, 'Yad Vashem Holocaust memorial' तर्फे दिला जाणारा देशाचा सर्वोच्च Righteous Genetiles हा सन्मान बहाल केला. या पदाची पहिली मानकरी होण्याचं भाग्य इरेनाला मिळालं. पाठोपाठ इस्रायल देशाचं सन्माननीय नागरिकत्वही तिला बहाल करण्यात आलं. १९९१ मध्ये ती इस्रायलच्या भेटीवर गेली तेव्हा नाझी तुरुंग–गॅस चेंबरमधून वाचलेले व तिनं ज्यांना वाचवलं त्या, त्या वेळच्या मुलांनी आणि आताच्या प्रौढांनी तिला 'हिरो'चा मान दिला.

'हिरो' या शब्दाची मला नफरत आहे, इरेना म्हणाली. माणुसकी, मानवता यावर माझी श्रद्धा आहे. अमानुषता, अमानवता साऱ्यांचा समूळ नाश करणारी आहे. ती बदलणं हीच गरजेची गोष्ट आहे. ती म्हणाली, 'माझा विश्वास आहे, Who changes one person changes the world entirely.'

जग बदलायला कटिबद्ध झालेली ही चालतीबोलती वीरांगना, अनेकांचे जीव वाचवून वॉर्साच्या आपल्या लहानशा घरात, गतकाळच्या चांगल्या–वाईट स्मरणरंजनात आयुष्य निवांत घालवू लागली. माणसाच्या हातून सत्कृत्य न घडणं म्हणजे बहुमोल आयुष्य व्यर्थ घालवणं आहे, यावर तिची श्रद्धा होती. अनेक पुरस्कार, सन्मान, चित्रफिती यानी तिचं उत्तरआयुष्य भरभरून पावलं.

इरेना सेंडलरला त्याचं अप्रूप नव्हतं. सहा महिन्यांच्या एका मुलीला तिनं घेट्टोतून वाचवलं होतं. आता प्रौढ झालेल्या तिनं जेव्हा इरेनाला मिठी मारली तेव्हा त्या प्रौढेचे घळघळणारे अश्रू हेच इरेना सेंडलरला मिळालेलं अत्युच्च जिवंत पदक होतं.

या दुर्मिळ पदकाच्या मानकरीचा, मी वॉर्सोत असूनही चरणस्पर्श करू शकलो नाही ही सल कायम राहील.

१२ मे, २००८ रोजी इतिहासाचं हे सुवर्णपान हलकेच गळून पडलं, आवाज न करता. अनंत ज्यूंच्या आठवणीत विलीन झालं.


**– कुमार नवाथे**

साईप्रसाद, दयाळदास रोड,

विलेपार्ले (पूर्व), मुंबई – ४०००५७

दूरध्वनी : (०२२) २६११८३०९

भ्रमणध्वनी : ९८६९०१४४८६

kumar.nawathe@hotmail.com



*With Best*
*Compliments*
*From*

# GANESH ZAGADE

# ध्येयवेडा सेनापती

**प्रमोद बक्षी**

माझा सेल फोन वाजला. गंभीर शब्द आले, 'नमस्कार! नवीन वर्षाच्या शुभेच्छा!' मी म्हटले, 'तुम्हालापण. कोण बोलताय?' परत तोच गंभीर आवाज, 'नंबर तुम्हीच दिलात.' मी म्हटले, 'ठीक आहे. पण मित्रा, नाव तर सांग.' समोरील अदृश्य व्यक्ती नाव न सांगता फिरकी घेण्याच्या मूडमध्ये बोलत होती. दोन-चार मिनिटांनी म्हटले, 'च्यायला! नाटके खूप झाली. नाव सांग यार, फुकटचा पिडू नकोस.' आणि तोच गंभीर आवाज कान जाळत, हृदयाचे ठोके वाढवत, पार काळजात गेला, 'मी डॉ. विकास आमटे बोलतो आहे!'

२००५ साली, ताडोबा जंगलाच्या सहलीच्या निमित्ताने अक्षयतृतीयेला आनंदवनात अपघाताने जाण्याचा योग आला. खरे तर, आनंदवनात जायच्या मूडमध्ये नव्हतो, पण ऑफिसची रूटीन टूर हिंगणघाटच्या युनिटमध्ये होती. त्यात आम्ही तिघे ऑडिटर, साहेब आणि ए.सी. गाडी सोबत! तिथून ताडोबाला जायचे होते, पण जी.एम.ची अट एकच; आनंदवन व्हिजिट करायची. कमीत कमी भोज्याला तरी हात लावून जाऊ. नंतर ताडोबा. झालं! पिकनिक मूड खराब! हिंगणघाट वर्धा जिल्ह्यात, आधीच ड्राय डिस्ट्रिक्ट. इथे चांगला चान्स आला, पण साहेबांनी केलेली गोची. आई शपथ, साला नोकरी करतो म्हणून अडला हरी! हे असले पुण्यकर्म, समाजसेवा ही सारी प्रकरणे हे रिकामपणाचे उद्योग आहेत अशा विचारात आयुष्य गेले आपले. बाबा आमटे समाजसेवा करताहेत, तिथे आपण जाऊन काय मोठे कंदील लावणार आहोत? तरी आमच्यातला एक सीनियर ऑडिटर पचकलाच शेवटी, 'अर्धा तास थांबू या, साहेब सांगताहेत तर.' साहेबांची नजर चुकवून साला डोळ्यांनीच खुन्नस दिली त्याला. गाडीत बसल्यावर मात्र घेतला उलटा. साहेबांच्या 'हो ला हो' करून नाडकर्णीसाहेब महात्मा झाला होता ना! फुकटचा लोच्या. तरी बरे, जायच्या रस्त्यावरच आनंदवन असल्याने, तासाभरात गेटमधून गाडी पार्किंग झोनमध्ये लावली. बाहेर आल्यावर नजरेत जे येत होते तेच आनंदवन असेल तर... Something is wrong. Of course I am wrong!

नजरेत भरली ती स्वच्छता. टुमदार अर्धगोलाकृती घरे, रस्त्यांच्या कडेने हिरवीगार झाडी. रस्त्यावर अत्यंत तुरळक वावर. समोरच मुक्तांगणमध्ये प्रदर्शन आणि विक्री केंद्र. मोर्चा अर्थात तिकडे. दालन भव्य होते. काही अपंग स्त्रिया आणि पुरुष असे पाच-सात जण होते. पंचे, शबनम बॅग्स, रुमाल, बेडशीट, ग्रीटिंग कार्ड आणि पुस्तक विक्री असे स्वरूप होते. एक लुंगी घेतली आणि एका पुस्तकाकडे लक्ष वेधले गेले. त्यावरील हसतमुख गब्बू गब्बू चेहऱ्यामुळे उगीचच विक्रम गोखलेचा भास झाला. पुस्तकाचे नाव होते, 'विकास आनंदवनाचा'.

खरेदी आटोपून, ड्रायव्हरला चहा प्यायचा होता म्हणून

कॅन्टिनकडे पावले वळली. आत प्रवेश केल्यावर लक्षात आले, सर्व 'तीच' माणसे आहेत, पण त्यात अपंग, अंधपण दिसत होते. गरम बटाटेवडे, समोसा, थंड भजी वगैरे जाळीत झाकून ठेवलेले दिसत होते. आमच्यातल्याच ऑडिटर जगदीश शहाने विचारले, 'बक्षीसाब, ऑर्डर क्या देने का?' गरम वड्याचा मोह सोडून 'काही नको' म्हणून मान हलवली. 'चाय-कॉफी बोलू क्या?' थंडपणाने म्हटले, ठंडा Thums up, safer side असणार आणि तिघांमध्ये सर्वांत ज्युनियर असूनसुद्धा डिसाइड करून सर्वांना सांगून टाकले, ''बाबा आमटे मोठे व्हीआयपी, समाजसेवक. झेड सिक्युरिटी असणार. आपण फुकट वेळ घालवायचा नाही. आनंदवन बघितले ना, बस्स! आता सीधा ऑपरेशन ताडोबा. आठ दिवस झालेत, फक्त पाणीच पीत आहोत आपण. आठवडाभर उपवासाचे पुण्य पदरी पडलेच आहे. आपल्या आईबाबांनापण 'वर' आनंद वाटला असेल, पोरगे सुधारले, बहुत हुआ. आटपा लवकर आणि खसका बाहेर!''

सर्व आटोपल्यावर बाहेर पडत असताना पुस्तकावरचा विक्रम गोखले हसऱ्या चेहऱ्याने पाहत होता. मी त्याच्याकडे पाहून गाडीत बसलो आणि प्रवासात कामाच्या संदर्भात कोणाची कशी xx... याच्या धमाल गोष्टी चविष्टपणे सगळेच करत असताना, 'साहेब, हा बार चांगला आहे, जेवणपण चांगले मिळते' म्हणून टेक्निकल सुपरवायझरने माहिती दिली. बार बरा वाटत होता. ओरिजिनल स्टफ मिळतो ना, मग हरकत नाही. आत प्रवेश करून, फ्रेश होऊन आपापल्या सिंहासनावर स्थानापन्न झालो. साडेदहा वाजता गिऱ्हाईक आले म्हणून मालकच स्वत: उठून आला. 'बोला साहेब, काय सेवा करू?' गिऱ्हाईक फक्त आम्हीच. हॉटेल आमच्याच बापाचे आहे अशा थाटात, 'एक रॉयल स्टॅग खंबा, सोडा, बर्फ, पाणी आणि सोबत खायला काय देणार?' 'मसाला खारा सिंग, मुंगदाल... आणखी काय पाहिजे ते सांगा. लसन फ्राय चार प्लेट, मसाला पापड, रोस्टेड चिकन, सुका मटन?' 'खाने में क्या चाहिये, बादमें वो बोलता हूं.' तेवढ्यात सुपरवायझरचा दबका आवाज आला, 'एक ठंडा-थम्सअप.' प्रश्नार्थक नजरेने बघितले भटजीबुवांकडे, म्हटले- 'सिंगसाब, थम्सअपमें लेते हो क्या?' च्यायला ढापण्या ओशाळून म्हणाला, 'नही साब पीता नहीं हू.' 'क्यों बम्मन हो क्या?' 'नहीं साब ठाकूर हूं.' मी म्हटले, 'चलो! अपून अपनी कास्ट चेंज करेंगे. आजसे बम्मन तुम बन जाओ, हमारे कास्ट में आ जाओ. अपून ठाकूर बन जाते है.' तोपर्यंत दिलेल्या ऑर्डरने टेबल छान सजायला सुरुवात झाली. टीव्हीवर सुरू असलेला कार्यक्रम बदलायला लावून फक्त म्युझिक चॅनेल लावायला सांगितले. फक्त ऐकण्याचा आनंद लुटायचा. डोळ्यांना सुख देण्यासाठी रॉयल स्टॅग सफिशिअंट होती आणि मनमुराद गप्पागोष्टी. सोबत कूलरची थंड हवा. भट्टी चांगली जमली होती. चिअर्स फॉर अवर 'ग्रेट मिशन आनंदवन व्हिजिट.'

साधारणत: दुसऱ्या राउंडनंतर सिंगसाहेबाची खेचायला सुरुवात झाली. पण सिंगसाहेब बेरकी निघाला, कारण आम्ही फक्त खाओ-पिओ ऐश करो, दुसरे दिन भूल जाओ असे; पण तो साला हे सोडून बाकी सर्व गोष्टीत एक्स्पर्ट होता. त्याच्या सबजेक्टमध्ये पण तो आमच्यापेक्षा एक पाऊल कसा पुढे होता हे त्याचे नॉन-व्हेज किस्से विद ॲक्शन दाखवत होते. हॉटेलचा मालकसुद्धा खुदखुदत त्याचा स्टाफ घेऊन जॉईन झाला होता. आम्ही मात्र भटजीच राहिलो होतो. मुंबईसारख्या ठिकाणी हिरवळ असूनदेखील सुगंधी फुलांकडे आकर्षित नाही झालो. साला, एकाच पोरीवर लाइन मारली. लग्न करून मोकळा झालो. पहिलेच लव्ह लेटर मोठ्या भावाच्या हातात पडले. सॉलिड लोच्या झाला होता. त्याच्याहून मोठ्या भावाने तर पार तुडवला होता. पण एकदाचे तिच्याचबरोबर गंगेत घोडे न्हाले. तिच्याशी एकनिष्ठ मात्र राहिलो. इतरांबद्दल तसले विचार नाही आले, अगदी आजपर्यंत. लाइफटाइम एकच सिम कार्ड कायम ठेवले.

तसे म्हटले तर, आमची सात भाऊ, दोन बहिणी आणि आई-बाबा अशी एक क्रिकेटची टीमच होती घरात. आज मात्र दोन बहिणी आणि मी धरून तीन भाऊ आहोत, बाकी सर्व एकेक आउट होऊन पुढच्या प्रवासाला निघून गेलेत. संपूर्ण ब्राह्मणी संस्कारातले, कडक शिस्तीचे वातावरण घरात होते. रामरक्षा, श्लोक, पाढे कम्पलसरी. त्याशिवाय जेवण नाही. शिवाय खरे बोलायचे. व्यसन करायचे नाही. अंडी पण खाणे वर्ज्य. चोरी करायची नाही मग पोरी पटवणे दूरच नाही, तर पापच! पण आपण असल्या शेंडी संस्कारात कधीच रमलो नाही. भूतकाळ परत येत नाही. उद्या भविष्यात काय आहे माहीत नाही. आताचा वेळ आपला आहे हे आपले थिंकिंग. सॉलिड एन्जॉय केले. संस्काराच्या चौकटीची मर्यादा तोडून वयाच्या बाविसाव्या वर्षापर्यंत अक्षरश: फुल टू धमाल करून घेतली. शाळेत एक-दोन पोरींवर, त्या वयातले अल्टरेशन म्हणून प्रयत्न करून बघितला पण साला वनसाइडच निघाला. हा प्रांत आपला नाही लक्षात हे आले. परत लफड्यात नाही पडलो. बाकी मवाली, टपोरी लाइफ, मारामाऱ्या भरपूर पण त्यात मारच जास्त खाल्ला इतरांकडून, कारण घरात त्याचा खुराक जास्त मिळाला होता म्हणून आपली बॉडी तयार झाली होती. बाबांचे पैसे ढापायचो पण कधी कधी विद चॅलेंज. थोडक्यात, आपण संपूर्ण घरातली गॉन केस. नऊ भावंडांत माझा नंबर आठवा म्हणजे नवसाचा नक्कीच नव्हतो. 'धोबी का कुत्ता ना घर का, ना



**डॉ. विकास आमटे आणि प्रमोद बक्षी**

घाटका' असलो तरी परिवारातले प्रेम भरपूर मिळाले. ते त्यांनी का केले माहीत नाही पण त्याबाबतीत सुदैवी ठरलो. हॅट्स ऑफ टू अवर बक्षी फॅमिली. असले गॉन केस प्रकरण असूनसुद्धा सर्व्हिस लागल्यावर एक मुलगी पटवली शेवटी. महान आश्चर्य म्हणजे तिला मी आवडलो. तिने विचारण्याच्या अगोदर इमानदारीत आपली सेल्फ मेड लाइफ हिस्टरी सांगूनदेखील तिने मला स्वीकारले. लहान होती. आठवीत शिकत होती. छान दिसायची तेव्हा आणि ऑफ कोर्स अजूनही. एसएससी पास झाली आणि लगेच लग्न केले. कारण लव्ह लेटर होते ना दोन वर्षांपूर्वीचे! आज तब्बल अडतीस वर्षे झालीत लग्न होऊन; पण एक गोष्ट मान्य करायलाच पाहिजे, की तिने माझ्यासारख्याच्या जीवनात येऊन- अगदी बॅड क्वालिफिकेशनचा रबर स्टॅम्प असूनसुद्धा - स्वत: त्या आगीचे चटके सहन करून मला माणसात आणून ठेवले. माझ्या आयुष्यातील तिच्या प्रवेशाने मी माझ्या मोहमयी जीवनातून निर्धारपूर्वक बाहेरही आलो. कारण तोपर्यंत छोट्या दोन मुली, मुलगा यांनी आमच्या दोघांच्या जीवनात चिमण्या पावलांनी प्रवेश केला होता. सर्व मुलेही अलकासारखी म्हणजे माझ्या पत्नीसारखीच देखणी आणि चांगल्या स्वभावाची निघालीत. माझे रूप आणि माझी आधीची लाइफ स्टाइल कोणी घेतली नाही. अर्थात क्रेडिट गोज टू अलका. त्यांचे लहानपण, शाळा, कॉलेजप्रवेश, घर, संस्कार आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मला आणि आम्हाला सर्वांना तिने सांभाळले. आजच्या क्षणाला माझ्या तिन्ही मुलांची लग्न झालेली असून मुली रश्मी-रूपाली आपापल्या घरांत स्थिरावल्या आहेत आणि पिल्लू, गुड्डी आणि यश अशा त्रिमूर्ती असलेल्या नातवंडांचा 'दाढी आबा' म्हणून मीही जीवनात स्थिरावलो आहे...

साला, प्यायला बसलो तर असेच होते. कधी कधी जुन्या आठवणींत रमून जातो. ओल्ड इज गोल्ड. खरेच भूतकाळात माणूस रमतो आणि आपल्यासारखी जीवनात विविधता असेल तर धमालच असते. जीवनात सगळ्या गोष्टींचा आस्वाद आपण घेतलाच पाहिजे या मताचे आपण. आजतरी मी सांगू शकतो, की आपण निर्माण केलेल्या या चक्रव्युहात अभिमन्यूसारखे किती फिरत बसावे याचे तारतम्य ठेवले, तर लाइफ इज एन्जॉएबल. हे श्रेय मात्र कौटुंबिक संस्कारांना जाते. कारण आज त्या जुन्या लाइफ स्टाइलचे आकर्षण राहिलेच नाही किंवा कदाचित ते तेव्हा तसे बेभान होऊन जगलो म्हणूनच आज अलिप्तपणे सहजगत्या सोडूनदेखील दिले. त्याचे दु:ख मुळीच नाही. आता त्या गोष्टीचे आकर्षण राहणार नाही याबद्दल पक्की खात्री. त्यावेळेला भरपूर मार खाऊन फुल बॉडी आज एकसष्टाव्या वर्षात ठणठणीत आहे. नो ब्लडप्रेशर, नो डायबिटीस आणि नो मेडिसीन; कारण आजवर जगलेला हा बेस कदाचित इतका मजबूत आहे.

अशा रीतीने या क्षणाला मी, नाडकर्णी आणि जगदीश शहांच्या पोटात फुल दीड खंबा विद फर्स्ट क्लास जेवण पचवून आणि सिंग मास्टरच्या पोटात थम्स अपचा एक खंबा जाऊन, आम्ही व्यवस्थित होतो. तिघांचा स्टॅमिना चांगलाच म्हणायचा. अर्थात मध्ये गॅपपण भरपूर झाली होती. पण इमानदारीत एन्जॉय करत होतो. ताडोबात वाघ, अस्वल, बिबटे सोडून बाकी सगळे प्राणी दिसले, ते पण सफिशिअंट होते.

परतीचा प्रवास सुरू झाला तरी मला पुस्तकावरचा हसरा विक्रम गोखले मिश्किलपणे हसून बघत डिस्टर्ब करत होता. नजर चुकवूनही परत त्याच्याकडे नजर जात होती. शेवटी हातच ठेवला फोटोवर. लफडे नको उगीच. गेस्ट हाउसवर परतलो, रात्रीचे जेवण आटपून रूमवर आलो तर, टीपॉयवर परत विक्रम गोखले वाट बघतच होता. मनापासून हसून त्याला म्हटले, 'गुड नाइट. अरे यार, झोपू दे ना, प्लीज! स्वप्नात येऊन रात्र खराब करू नको यार!' आणि खरेच विक्रम गोखले प्रकरण विसरून गेलो. कारण ते महाराज बॅगमध्येच आराम करत पडले होते.

साधारणत: सात-आठ महिन्यांनी, घरात एकटाच होतो तेव्हा घरातली साफसफाई म्हणजे सर्व कपाटे, पलंग, टीव्ही, फ्रिज यांच्या जागा बदलून, कचरा काढून घराला नवीन लूक दिला. टूरची बॅग आवरताना अचानक जुना मित्र, विक्रम गोखले परत भेटला. खूप दिवसांनी भेटला. छान वाटले. फोटोतला चेहराच एकदम प्लेझंट वाटायचा. सगळी कामे भराभर आटपून विक्रम गोखलेला जवळ केले. पुस्तक हवरटासारखे खाल्ले.

खरेच सांगतो, पचायला जड गेले. परत सावकाश संपूर्ण वाचले. तो हसणारा कव्हरवरील फोटो म्हणजे डॉ. विकास आमटे होते. 'विकास आनंदवनाचा' म्हणजे डॉ. विकास आमटेंनी केलेल्या कार्याची ती ओळख होती. तेव्हा समजले, की बाबा आमटेंना दोन मुले आहेत, डॉ. विकास आणि डॉ. प्रकाश.

पुस्तक वाचून सुन्न झालो. फार वेगळ्या दुनियेतून फिरून आलो. प्रखरतेने जाणवला तो गिल्टी कॉन्शस. आपण आनंदवनात जाऊनपण... गैरसमजुतीने त्या महामानवांना–बाबांना आणि साधनाताईंना न भेटल्याची खंत वाटली. मला सतत मोहिनी घालणाऱ्या विक्रम गोखले ऊर्फ डॉ. विकास आमटे यांना भेटलो नाही या जाणिवेने लगेच एक पत्र लिहायला घेतले आणि त्या पत्रात स्वत:बद्दल, कुटुंबीयांबद्दल, नोकरीबद्दल समग्र माहिती लिहून पहिल्याच पत्रात सरेंडर झालो. आनंदवनात येऊन अक्षरश: भंग्यापासून वॉचमनपर्यंत कसलेही विनावेतन काम मला करू देण्याची विनंती त्यांना केली. स्वत:चा मोबाइल फोन, पत्ता लिहून पत्र पोस्ट केले. ते सात-आठ दिवस स्वत:लाच अनोळखी असल्यासारखा जगलो. बोललो कोणालाच नाही. दहा-पंधरा दिवसांत तसा रिलॅक्स होत गेलो म्हणा, कारण पत्र पोचलेच नसावे कदाचित असे वाटले.

आणि... २००६ गुढीपाडवा, साडेतीन मुहूर्तामधील महत्त्वाचा दिवस...

घरात अलका आणि मी दोघेच. तिचे भाज्या चिरणे सुरू होते. मी पेपर, टीव्ही आणि होम मिनिस्टरबरोबर गप्पागोष्टी करत होतो. घरातले वातावरण छान आणि माझा सेल फोन वाजला. गंभीर शब्द आले, 'नमस्कार! नवीन वर्षाच्या शुभेच्छा!'

मी म्हटले, 'तुम्हालापण. कोण बोलताय?' कारण आवाज आणि डिसप्ले नंबर नवीन वाटत होता.

परत तोच गंभीर आवाज, 'नंबर तुम्हीच दिलात.'

मी म्हटले, 'ठीक आहे. पण मित्रा, नाव तर सांग.'

समोरील अदृश्य व्यक्ती नाव न सांगता फिरकी घेण्याच्या मूडमध्ये बोलत होती. दोन-चार मिनिटांनी म्हटले, 'च्यायला! नाटके खूप झाली. नाव सांग यार, फुकटचा पिडू नकोस.' आणि तोच गंभीर आवाज कान जाळत, हृदयातचे ठोके वाढवत, पार काळजात गेला,

'मी डॉ. विकास आमटे बोलतो आहे!'

आई शपथ! घसाच कोरडा पडला. शब्दच बाहेर पडत नव्हते. कसेबसे शब्द आले, 'सॉरी सर! मला कल्पना नव्हती तुम्ही आहात म्हणून. बोलताना जरा भान सुटले. रिअली सॉरी!'

मोकळ्या आवाजात हसत त्यांनी पत्र मिळाल्याचे सांगून सर्वांना शुभेच्छा देऊन फोन बंद केला. मॅडमने खुणेने विचारले कोण? तिला खुणेनेच रिप्लाय दिला पाणी आण. ते घटाघटा प्यायलो. दोन मिनिटे शांत बसलो. शांतपणे म्हटले डॉ. विकास आमटेंचा फोन होता. 'कोण आहेत ते?' बाळबोधपणे आमच्या बाईसाहेबांचा प्रश्न. शांतपणे सांगितले, 'बाबा आमटेंचे ज्येष्ठ चिरंजीव.' पण तुम्हाला फोन कसा? आणि मग तिला जवळ करून, तिच्या खांद्यांवर हात ठेवून, डोळ्यांत रोखून पाहत आनंदवन ते पत्रापर्यंतचा प्रवास सांगितला आणि मग मात्र सुरू झाले प्रचंड शीतयुद्ध.

त्यातच भर पडली ती महिनाभराने डॉ. विकास आमटेंच्या सुंदर हस्ताक्षरातील आलेल्या सुरेख पत्राने. त्या पत्राने आगीत तेल ओतण्याचे काम मात्र प्रामाणिकपणे केले. तेव्हा या युद्धभूमीवरील माझी बाजू शांत होती. मी वाद करत नव्हतो. शांतपणे माझे म्हणणे समजावून सांगण्याचा प्रयत्न करत होतो. जीवनाचा इतका मोठा निर्णय घेताना तो सर्वांच्या पचनी पडेल असाच घ्यायचा होता, कोणालाही नाराज न करता!

त्या दिवसांत माझ्यातले अतिरेकी प्रमोद हे रूप नष्ट होण्यास सुरुवात झाली होती. कारण अलकाने प्रेमाने, चिडून, रागावून, विनवण्या करून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला, तर कधीकधी एकदम स्वत:लाच संपवून घेण्याइतपत टोकाच्या भूमिकेपर्यंत ती जात होती. रश्मी, माझी मोठी मुलगी खूप प्रेम करते. तशी तिन्ही मुले सारखेच प्रेम करतात, पण रश्मी मोठी आणि तिने मला तिच्या आईसारखेच खूप सांभाळले. समजावयाला आली. रूपाली नागपूरला होती पण तिच्या कानांवर बातमी गेली होती. मी मनाचा तोल जाऊ न देता माझी सफाई देत होतो. शेवटी माझी केस, माझे मोठे बंधू प्रफुल्ल यांच्याकडे आली. तो आणि प्रतिमावहिनी बोरीवलीहून बदलापूरला घरी आले. मला एकट्याला बाजीप्रभूसारखी खिंड लढावयाची होती. थोडक्यात, विरोधकांची संख्या जास्त. प्रफुल्ल आमच्या घरातला संत माणूस, अध्यात्माची बैठक, सज्जन, पापभीरू. माझ्याहून पाच वर्षांनी मोठा. त्याने शांतपणे दोन्ही बाजू ऐकून घेतल्या. माझ्यातला हा बदल नक्कीच त्याला अपेक्षित नव्हता. समाजसेवा, परोपकारी वृत्ती, नि:स्वार्थीपणा ह्या गोष्टी माझ्या वाट्याला फिरकतील किंवा तसे विचार येऊ शकतील हेच शक्य नव्हते. इतका मी ISO brand gone case! जीवनात अशा अर्थाने बदल येईल ही अपेक्षा मला सुद्धा नव्हती. पण या कोंडीतून बाहेर येण्यास प्रफुल्ल आणि माझा मुलगा अक्षय यांचा उपयोग झाला. कारण अक्षय आणि प्रफुल्लची कृष्णशिष्टाई त्यावेळी तरी यशस्वी झाली. मात्र त्यानंतर आठ महिन्यांतच मी अलकाला फार वेगळ्या अनुभवांनी अनुभवले. कधी कधी ती माझी पत्नी असून माझी आईपण झाली. बिचारी मला स्वत:शी घट्ट धरून अगदी लहान मुलासारखे डोक्यावर

हळुवारपणे थोपटायची, पण कधीतरी झोपेत तिच्या डोळ्यांतले गरम अश्रू माझ्या चेहऱ्यावर जाणवायचे. मी पण मूकपणे तिच्या कुशीत आणखी शिरून अश्रूंना वाट मोकळी करून देत होतो. कारण तिला तिच्या नाठाळ – gone case - प्रमोदची काळजी वाटत होती. वाईटपणाचा शिक्का बसलेला तिचा प्रमोद इतका बदलू शकतो, की जो जिवंतपणीच आपल्या बायकोला, मुलांना, नातवंडांना अनाथ करून जाण्याइतपत टोकाची भूमिका घेतो? हा प्रमोद खरा की समाजाने, काही कुटुंबीयांनी, अनाथ केलेल्या कुष्ठरोग्यांमध्ये अनाथ, अपंग ह्या समूहात, काही विचार न करता स्वत:ला झोकून देणारा प्रमोद खरा? परत वरतून सांगतो आहे, की आजपर्यंत कळतनकळत झालेल्या चुकांचे पापक्षालन करण्यासाठी हे प्रायश्चित्त घेतो आहे आणि त्याला विश्वास होता, की हजारो कुष्ठरोगी, अपंग, अंध, मूकबधिर आणि अनाथसमूहाचे प्रेम आणि आशीर्वाद आपले आणि आपल्या कुटुंबाचे कवचकुंडलासारखे रक्षण करतील.

डॉ. विकास आमटे यांच्या आलेल्या पत्रानुसार, रिझर्व्हेशन करून त्यांना आनंदवनला येण्याचा दिवस कळवला. संपूर्ण प्रवासात फक्त आनंदवन आणि डॉ. विकास आमटे हाच विचार प्रामुख्याने होता. आता प्रत्यक्ष भेट होणार होती! गाडी दुसऱ्या दिवशी पहाटे नऊ वाजता वरोऱ्याला पोचली. रिक्षा करून आनंदवनात पोचलो आणि तेथील बूथमध्ये चौकशी करून डॉ. विकास आमटे यांना भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली. एस.टी.डी. बूथवरील एका व्यक्तीने मला लांबूनच डॉ. विकास आमटे दाखवले. पांढराशुभ्र झब्बा-पायजमा, प्रसन्न व्यक्तिमत्त्व आणि पहिल्याच भेटीत सहज आकर्षित होईल असे दिसले. आपल्या कार्यकर्त्यांच्या घोळक्यामध्ये चर्चा करण्यात ते मग्न होते. एक अनामिक दडपण होते मनावर. एखाद्या ज्येष्ठ समाजसेवकाला भेटण्याची जीवनातील पहिलीच भेट होती. मी त्या ग्रुपजवळ गेलो. एखाद् मिनिट थांबून वाट पाहिली.

स्वत: डॉ. विकास आमटे माझ्याकडे वळून म्हणाले, 'या बक्षी, चला!' मी गारच पडलो. मी अनोळखी, पण भेटायला मी आलो होतो आणि तीच व्यक्ती माझे स्वागत करत होती. प्रवास कसा झाला या संदर्भातून प्राथमिक बोलणे सुरू झाले. त्यांनी मला सुचवले, चहा-नाश्ता आटपून घ्या. विश्रांती घेऊन दुपारी दोन वाजता साठेकाका तुम्हाला आनंदवन दाखवायला नेतील. साठेकाकांशी ओळख करून दिली. राहण्याची केलेली सोय दाखवून देण्यात आली. मी त्यांची रजा घेऊन रूमवर आलो. स्नान आटपून पलंगावर बसलो. उन्हाळ्याचे दिवस, रूमला कूलरची व्यवस्था होती. पाण्याचा थर्मास. पांढऱ्याशुभ्र चादरी पलंगावर अंथरलेल्या, पांघरुणाची व्यवस्थित केलेली घडी. गुडनाइट, मच्छरदाणी, स्वच्छता आणि टापटीप सारेच वाखाणण्यासारखे होते. साडेअकरा वाजता मेसमध्ये जेवण झाले. जेवण साधेच पण चविष्ट होते. बारा ते दीड विश्रांती घेऊन दोनपर्यंत ऑफिसजवळ आलो असता लक्षात आले की साठेकाका माझ्याआधीच येऊन माझी वाट पाहत होते. साठेकाकांबरोबर आनंदवनाच्याच गाडीत बसून आनंदवनाचे दर्शन घेण्यास सुरुवात झाली. आपल्या पलीकडचे जग इतक्या वेगळ्या प्रकारचे असू शकते यावर विश्वास बसू शकत नव्हता. काय नव्हते आनंदवनात! पण या सर्वांत जास्त चटका लावून गेली ती शकुंतला. हात असून निकामी असल्याने ती तिची सर्व दैनंदिन कामे, जेवण, वेणीफणी, ग्रीटिंग, सुई-दोरा पायाने ओवणे, असे अगदी सहजतेने करत होती. तिच्या कामाच्या कौशल्याचे वर्णन करायला शब्द अपुरे पडतात. भारावलेल्या अवस्थेतच सर्व बघत होतो. शब्दांना जागाच नव्हती, व्यक्त होण्यास मीच अपंग झालो होतो.

साधारणत: साडेचारला आम्ही परत आलो. साठेकाकांनी मला डॉ. विकास आमटे बसले होते तिथे आणले. तिथे आल्यावर अवघ्या दोन मिनिटांत हातात चहाचा कप आला. चहा झाल्यावर आम्ही दोघे ऑफिससमोरच्या चौकोनी दगडी ओट्यावर बसलो. एकंदरीत शारीरिक आकारमानाला शोभणार नाही इतक्या सहजतेने त्यांनी पद्मासन अवस्थेतील मांडी घालून हाताची रुबाबदार घडी घातली. सकाळच्या पहिल्या भेटीपासून एक गोष्ट जाणवली, ती म्हणजे रुबाबदार, कोणालाही पाहत राहावेसे वाटेल असे छान व्यक्तिमत्त्व त्यांना लाभले आहे. बोलण्याला आत्मविश्वास आणि पार अंत:करणाचा ठाव घेणारी नजर. खरे व्यक्तिमत्त्व उघड झाले ते साडेचार ते साडेआठ वाजेपर्यंत त्यांच्या अथक बोलण्यातून. माझ्याकडून त्यांच्या बोलण्याला शाब्दिक हुंकारच फक्त देऊ शकत होतो. श्रोता म्हणाल तर, माझ्यासारख्या टपोरी आयुष्य जगलेल्या, मवालीपणात संपूर्ण मुरलेल्या, घरच्यांनी ओवाळून टाकलेल्या माणसासमोर डॉ. विकास आमटे आनंदवनाची पार्श्वभूमी विशद करत होते. महामानव बाबा आमटे आणि वात्सल्यमूर्ती साधनाताई यांच्या ज्येष्ठ चिरंजीवांचा शब्दन् शब्द मेंदूचा पार भुगा करत होता. त्यांचे बोलणे मराठीमध्येच असले तरी समाजसेवक ह्या व्याख्येत न बसणारे. पार वैदर्भीय शब्दांत पोटतिडकीने मांडत होते. ते अनुभवाचे शब्द अक्षरश: काळजाला घरे पाडत होते. आनंदवनाची निर्मिती होऊन अठावन्न वर्षे झाल्यावरही कुष्ठरोग्यांच्या बाबतीत होणाऱ्या सामाजिक अन्यायाच्या गोष्टी सुसंगतवार हळुवारपणे उलगडत जाणारा आनंदवनाचा तो प्रवास, बाबांच्या प्रत्येक गोष्टीचा एकमेव साक्षीदार आणि बाबांची स्वप्ने पूर्ण करण्याचा ठेका घेतलेला ठेकेदार, मनाला अंतर्मुख करत होता. भावुक प्रसंगात

इमोशनल न होता, दगडी हृदयाचा असलेला माझ्यातला मीच, अजून तासभर ऐकत बसलो असतो तर काळजाच्या नक्कीच ठिकऱ्या उडाल्या असत्या. एक अविश्वसनीय, उत्तुंग व्यक्तिमत्त्व नियतीने माझ्यासमोर बसवले होते. माझ्यातला मी नष्ट होऊन संपूर्ण थिजून गेलो होतो. माझ्याही नकळत मी त्या माणसाच्या अक्षरश: प्रेमात पडलो. फक्त प्रश्न होता, तो माझ्यावर प्रेम करेल का? कारण त्याने माझ्यावर प्रेम करावे असे माझ्याकडे काहीच नव्हते. त्याचवेळी मी त्यांच्यावर का प्रेम करू नये, याचे एकही कारण मला मिळाले नाही.

आनंदवन परिवारात डॉ. विकास आमटे भाऊ या नावाने संबोधले जातात. सलग चार तास बोलून त्यांनीच जाणवून दिले, की वेळ खूप झाला. रात्रच झाली म्हणून ते उभे राहिले. मी भक्तिभावाने त्यांना नमस्कार करण्यासाठी वाकलो, पण तो त्यांनी नाही करू दिला. संपूर्ण रात्र फक्त भाऊच डोक्यात वळवळत होते, पण रात्र झोपेविना वाया गेली त्याचे दु:ख नव्हते आणि झोप न झाल्याचा थकवाही मुळीच जाणवला नाही. सकाळी भाऊ सात वाजता खाली त्यांच्या ऑफिसमध्ये यायच्या आधीच मी हजर झालो. ऑफिसमध्ये एका बोर्डावर तीन महिन्यांच्या अवधीत येणाऱ्या पाहुण्यांची तारीख आणि नावे होती. माझे नाव आयुष्यात पहिल्यांदा बोर्डावर बघून तेच माझ्याकडे अनोळखीपणे हसले. जीवनात माझी इतकी दखल प्रथमच कोणीतरी घेतली होती. भाऊंनी मला ताई-बाबांकडे नेले. मी मंत्रमुग्ध होऊन बाबांना इतक्या जवळून पहिल्यांदा पाहिले. मी त्यांना नमस्कार करून स्वत:ची ओळख करून दिली. माझ्या वडिलांचे निधन झाल्यानंतर पंचवीस वर्षांनी बाबांची भेट झाली. दहा मिनिटे त्यांच्याशी बोलून साधनाताईंना भेटलो आणि ही माऊली माझी आई गेल्यानंतर छत्तीस वर्षांनी भेटली. नियतीने परत उदार मुक्तहस्ताने मला माझ्या आई-वडिलांचा कमी लाभलेला सहवास, ताई-बाबांच्या रूपाने प्रसाद म्हणून दिला. हे प्रेम मी त्यांच्या सहवासात गेली सहा वर्षे सातत्याने अनुभवले. पहिली भेट असूनसुद्धा ती परकेपणाची वाटली नाही, इतक्या प्रखरतेने त्यांच्याकडून माझ्यापर्यंत पोचलेली वात्सल्याची किरणे अभावितपणे स्पर्शून गेली. आनंदवन ही कुष्ठरोग्यांची भूमी नसून ताई, बाबा, भाऊ यांनी निर्माण करवून घेतलेली, खऱ्या अर्थाने हजारो कुष्ठरोगी, अनाथ, अपंगांच्या जीवांची मोक्षभूमी, स्वर्गभूमीच असल्याची जाणीव झाली. ताई-बाबांचे आशीर्वाद घेऊन मी तर भारावल्यासारखाच भाऊंबरोबर बाहेर आलो. मग भाऊंनीच स्वत: गाडी चालवून दोन दिवस आनंदवनमधील शेती, तलाव, पाणी, चारा-गवत, घरबांधणी, वर्कशॉप दाखवून समग्र माहिती दिली. फिरताना माहिती देण्याचे अव्याहत काम माझ्या एकट्यासाठी ते करत होते. शेती, घरबांधणी वगैरे मी स्वत:च दगड असल्याने डोक्यावरून गेले. त्याच रात्री भाऊंची परवानगी घेऊन दुसऱ्या दिवशी डॉ. प्रकाशभाऊंना भेटण्याची इच्छा प्रदर्शित केली. कारण या दोन दिवसांच्या आनंदवन दाखवण्याच्या निमित्ताने, त्यांनी आपल्या लहान भावाने प्रतिकूल परिस्थितीत केलेले काम, आलेल्या अडचणी सांगितल्या होत्या. ते भावाचे कौतुक करत होते. त्यामुळे त्यांनादेखील भेटण्याची खूप इच्छा होती.

दुसऱ्या दिवशी मला सुचवण्यात आल्याप्रमाणे अहेरी बस पकडून आलापल्लीमार्गे हेमलकसाला पोचेपर्यंत संध्याकाळ झाली. प्रकाशभाऊ आणि मंदावहिनी जवळपासच फिरायला गेले होते. तोपर्यंत माझी राहण्याची व्यवस्था झाली होती. जरा वेळाने स्वत: मंदावहिनीच भेटायला आल्या आणि सांगून गेल्या, की बेल झाली की जेवायला या. जेवायला गेलो असता डॉ. प्रकाशभाऊ आणि मंदावहिनींनी हॉलमध्ये प्रवेश केला. प्रकाशभाऊंनी हसूनच स्वागत केले. जेवण झाल्यावर त्यांच्यासमवेत मला घरी नेले. मी स्वत:ची ओळख करून दिली. प्रकाशभाऊंचे व्यक्तिमत्त्व एकदम साधे. पांढरी बनियन, तशीच हाफ पॅण्ट, मध्यम अंगकाठी. त्यात बाबांच्या चेहऱ्याचा भास जाणवतो. मोजके पण शांत बोलणे आणि एखाद्या गोष्टीला खळखळून हसून दाद देण्याची पद्धत, कोणालाही आकृष्ट करेल अशी! तुलना नाही, पण सहजपणे दोन्ही भावांच्या स्वभावांत खूप फरक जाणवत होता. का कोणास ठाऊक, तो दोघांना शोभत होता. एक आग होती तर एक संयमी शांत. एकाचे कपडे टापटीप तर दुसरा एकदम साधा. कोणत्याच गोष्टींचे साम्य नाही. एकाच आई-वडिलांच्या पोटी जन्म घेतलेले दोघे. दुसऱ्या दिवशी प्रकाशभाऊंचे जगावेगळे प्राणीसंग्रहालय आणि प्राण्यांशी त्यांची दोस्ती बघून आश्चर्यचकित झालो होतो. हेमलकसा आटपून दुसऱ्या दिवशी सकाळी परत आनंदवनला येऊन ताई-बाबा आणि भाऊंचा निरोप घेऊन मुंबईला यायला निघालो. जीवनात पहिल्यांदा जाणीव झाली, की निघण्यासाठी पाय साथ देत नव्हते! मुंबईमध्ये येईपर्यंत मनातून ताई-बाबा-भाऊ जात नव्हते. प्रश्न फक्त दोन-तीनच होते, भाऊ मला आनंदवन परिवारात सहभागी होऊ देतील का? मी त्या परिवारात ॲडजेस्ट होऊ शकतो का? (कारण एकीकडे जीवनातील पन्नास वर्षे मुंबईसारख्या ठिकाणी आयुष्य घालवले आहे) आणि माझा परिवार मी सोडू शकेन का? पत्नी, मुले आणि नातवंडे यांच्याशिवाय मी आणि ते सर्व राहू शकू का? उत्तर मात्र होते नियतीकडे, जे मला अज्ञात होते. नंतरचे पाच-सहा महिने खूप डिस्टर्ब नक्की होतो. सगळ्यांशी मनापासून प्रेमाने वागत होतो आणि एकटेपणात अश्रूंना वाट मोकळी करून देत होतो. अलकाने पण स्वत:ला सावरले होते. तिच्या प्रेमाची एक

वेगळीच अनुभूती घेत होतो. रोज माझ्या आवडीचा एखादा पदार्थ करून खायला देत होती, पण मला पोटात तो उतरवणे कठीण जात होते. ह्या कालावधीत अनुभवत असलेली अलका मी तीस वर्षांत अनुभवली नव्हती. एक-दोनदा अक्षय माझ्या मिठीत येऊन रडून मोकळा झाला होता आणि रश्मीच्या ठाण्याहून बदलापूरच्या घरी चकरा वाढल्या होत्या. परत ठाण्याला घरी जाताना तिच्या चेहऱ्यावरच्या खोट्या हसऱ्या गालातूनसुद्धा डोळ्यांतले अश्रू लपवू नाही शकली बिचारी. रूपाली आमच्यापासून दूर होती, पण तिची परिस्थिती वेगळी नसणार. देवयानी (पिल्लू) आणि यश खूप लहान होते आणि गुड्डीचा जन्मच झाला नव्हता.

मुंबईला जरी आलो तरी भाऊंशी बोलणे असायचे. त्यांचे एसएमएस जास्त यायचे. सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात त्यांचा फोन आला, की मी शंभर माणसांना घेऊन आत्महत्या करायला जातो आहे. मी क्षणाचा विचार न करता सांगून टाकले, १०१ वा मी येतो आणि ३० सप्टेंबरला निघून १ ऑक्टोबर २००६ रोजी आनंदवनात आलो. भाऊ, ताई-बाबा यांना भेटलो. २ ऑक्टोबर २००६. भाऊ नित्यनियमाप्रमाणे बाबांना भेटायला गेले आणि बाबांनी भाऊंना सांगितले, ‘आज तुला सकाळी नऊच्या आत आनंदवन सोडायचे आहे. मला कोणत्याही सबबी नकोत. अन्यथा मी जाईन.’ विविध दुखण्यांनी जर्जर असलेल्या बाबांच्या तोंडून आकाशवाणी झाली, Vikas, you are going without any reason. आणि कलियुगातील पिता दशरथाच्या तोंडून निघालेल्या आज्ञेचा पालनकर्ता होता, कलियुगातला राम. फक्त ‘ठीक आहे’ असे म्हणून तो वनवासात जाण्याच्या तयारीस लागला. मला सांगितले, आपल्याला निघायचे आहे. भाऊ जाणार ही बातमी संपूर्ण आनंदवनात पोचायला वेळ लागला नाही. भारतीवहिनींना ती बातमी दवाखान्यात समजली. त्यापण तत्परतेने आल्या. तासाभरात तयारी आटपून भाऊ परत ताई-बाबांचा आशीर्वाद घेऊन आले, तर रस्त्यात भारतीवहिनी औक्षणाचे साहित्य घेऊन भाऊंच्या स्वागताला उभ्या होत्या. भाऊपण अचंबित झाले असावेत. क्षणभरच त्या दोघांची नजरानजर झाली आणि वहिनींनी भाऊंना ओवाळले. त्या दिवशी दसरा होता. ध्येयवेडा असलेल्या आनंदवनाचा लॅन्ड आर्मीचा सेनापती, जीवनातल्या एका पर्वाचे सीमोल्लंघन करणारा कर्मयोगीच होता. आनंदवनमधील आनंदवनच्या आठवडी बाजाराचे उद्‌घाटन करून वानप्रस्थान करावे हा आनंदवन परिवाराचा सर्वानुमते झालेला आग्रह भाऊ मोडू शकले नाहीत. घरापासून बाजारापर्यंत रस्त्याच्या कडेने हजारो आनंदवनवासी अक्षरशः रडून, टाहो फोडून भाऊंना निरोप देत होते. फारच हृदयद्रावक प्रसंग! जीवनात पहिल्यांदाच मी अनुभवत होतो. मनाचा विरोध झिडकारून डोळ्यांनी अश्रूंना वाट केव्हाच मोकळी करून दिली होती. बाजाराचे उद्‌घाटन करून आनंदवन चौकातून गाडी जेव्हा नवीन प्रोजेक्टकडे निघाली तेव्हा घड्याळात बरोबर ८.५५ झाले होते. गाडीत भाऊ, मुलगी शीतल, जुने जाणते कार्यकर्ते भास्कर भोईर आणि मी होतो.

साधारणतः सत्तर किलोमीटरवर नवीन प्रोजेक्ट होता. यवतमाळ जिल्हा, ता. झरी जामनी, मूळगव्हाण येथे. वणी सोडल्यावर काही वेळातच आदिवासी वस्त्यांचे छोटे छोटे तुरळक पाडे दिसायला लागले. साधारणतः दीड तासाने मुक्कामाचे ठिकाण आले. भाऊ आले म्हणून तिथे असलेले भाऊंचे लॅण्ड आर्मीचे सत्तर-ऐंशी जवान त्यांचे स्वागत करायला आले. पळस आणि सागांच्या झाडांनी व्यापलेली छोटी टेकडी, सरळ पट्ट्यात नसलेली जमीन, टेकडीवर कोलाम आदिवासींची स्मशानभूमी, रस्त्यांच्या बाजूला दगडांच्या खाणीमुळे निर्माण झालेला खड्डा, तलाव आणि एक छोटे आदिवासी देऊळ असा परिसर. त्यात भाऊंसाठी बांधलेली छोटी झोपडी आणि इतरांना राहण्यासाठी बाबूंच्या आधाराने उभारलेल्या ताडपत्रांच्या झोपड्या. माझा नंबर गजानन वसूच्या झोपडीत लागला. झोपडीत प्रथमच राहणार होतो. लाइट, संडास आणि बाथरूम नसताना एक नवीन अध्याय सुरू झाला. मोकळ्या आकाशाखाली, झोपडीच्या बाहेर अंगणात खाटेवर छान झोप लागली. रात्री पंजाबराव (वॉचमन) किती वाजले त्याचे टोल वाजवत होता. एम.एस.इ.बी.चे लाइट यायला पाच महिन्यांनी परवानगी मिळाली. अंधार, थंड वातावरण, त्यात ज्या टेकडीच्या पायथ्याशी राहत होतो त्याच टेकडीवर कोलाम आदिवासींची स्मशानभूमी (दफनभूमी). भुतांच्या राज्यात ध्येयवेडा सेनापती. आमच्या मुंबई परिसराच्या क्षितिजापलीकडचा! त्यांच्या लॅण्ड आर्मीचे जवान हातापायांना बोटे नसलेले असे. शस्त्र हाती न घेता आनंदवन फुलवणारे, आनंदवनाचे ब्रॅण्ड ॲम्बॅसेडर. सर्व जगाला ओळखता न आलेले; पैलू न पाडलेले हिरे आणि ज्यांचा गौरवपूर्वक उल्लेख स्वतः भाऊ, स्वतःचे गुरू म्हणून आदराने करतात, ते जवान सकाळच्या लांबलेल्या पाचच्या टोल्याने पहाटेच्या अंधारलेल्या प्रकाशात लगबगीने डबे, पाण्याच्या बाटल्या घेऊन टेकडीवरील जंगलात मार्गस्थ होत असताना दिसत होते. चहानाश्ता होऊन ग्रुप लिडर गजानन वसूची (आनंदवनाचा नाना पाटेकर) बर्मुडा, टी-शर्ट, शूज व डोक्यावर हॅट घेऊन भाऊंशी सल्लामसलत करून, हातात कुदळ, फावडे, घमेले आणि सब्बल घेतलेल्या सहकाऱ्यांना हाताशी घेऊन जागेची सफाई सुरू झाली. मी या कामाची ओळखच नसल्याने बाळटासारखा... दूर उभा राहून बघण्याशिवाय गत्यंतर नव्हते. थोडे लांबून टँकरने पाणी आणून

सोय झाली होती. स्नान समोरच्याच दगडाच्या खाणीत तयार झालेल्या पाण्याच्या तलावात उघड्यावर, उघड्या अंगाने, पहिल्यांदाच अनुभवत होतो. साडेअकरा ते दोन जेवण व विश्रांती. इतके तिखट पहिल्यांदाच खात होतो. ऑक्टोबर हिट तडका जाणवायला सुरुवात झाली होती. दुपारची विश्रांती कोलाम जातीच्या दफनभूमीवरच. चांगले झाड बघून, खाली सतरंजी दगडांच्या कबरीवर आणि त्याच कबरीतला त्यातल्या त्यात सरळ दगड डोक्याखाली उशाला!

पहिलाच दिवस, जीवनातल्या अशा पहिल्याच अनुभवाचा, पुढच्या जगण्याची दिशा जणू काही दाखवून देत होता. मी भाऊंच्या जवळपासच असायचो. शीतल पण होतीच (भाऊंची डॉक्टर झालेली मुलगी). भाऊ काम करत असलेल्या माणसांची माहिती सांगत होते. नामदेवकाका, दत्तू मिस्त्री, रमेश मेकलवार, बबन, अशोक मिस्त्री, गजानन वसू हे पहिल्या फळीतील फलंदाज आणि त्यांच्या मार्गदर्शनाने कामाच्या विकेट पाडणारे गोलंदाज अशी जगातली अनोळखी टीम. रस्त्यावरून जाणारे-येणारे कुतूहलाने थांबून लांबूनच बघत होते. असे साधारण पंधरा दिवस राहून, मुंबईला जाऊन रीतसर राजीनामा देऊन, लॅण्ड आर्मीला जानेवारी २००७ मध्ये आनंदवन परिवारात दाखल झालो. आनंदवनाच्या सत्ताविसाव्या प्रकल्पाचे काम झिरो पॉइंट प्रोसेसवरून सुरू झाले होते. इतिहासातले सुवर्णपान म्हणून. ज्या समाजाने विस्थापित केले त्याच समाजातील धडधाकट शेतकरी कर्ज आणि इतर कारणांमुळे आत्महत्या करून संपूर्ण देशाला सुन्न करत असताना, आपल्या तोकड्या हातांनी त्यांना मदतीचा हात द्यायला आला होता सर्वात प्रथम आनंदवन परिवार. स्वत:च्या अथक मेहनतीने हे अवघड शिवधनुष्य आपल्या खांद्यांवर घ्यायला आला होता.

प्रत्येक वस्तून् वस्तू आनंदवनातून दीडशे किलोमीटर जा-ये करून आणली जात होती. भाऊ तिथेच मुक्काम करून आपल्या कार्यकर्त्यांसमवेत राहत होते. १८ डिसेंबर २००६ रोजी सुरुंगाच्या स्फोटाने एका आदिवासी मुलीच्या अपघाती मृत्यूची घटना घडली. भाऊ आणि अन्य कार्यकर्त्यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने आलेला आदिवासी जमाव, प्रोजेक्ट पेटवून देण्याच्याच उद्देशाने आला होता. गजानन वसू, अरुण कदम ह्या कार्यकर्त्यांना बेदम मारहाणपण झाली. भाऊ स्वत: आपल्या कार्यकर्त्यांसमोर ढाल म्हणून उभे झाले, झालेल्या चुकीचे प्रायश्चित भोगण्यासाठी. आनंदवनातून भाऊंचा मुलगा कौस्तुभ अन्य ज्येष्ठ कार्यकर्त्यांना घेऊन प्रोजेक्टवर येऊन पोचला होता. प्रोजेक्टच बंद करुया आणि पोलिस तक्रार करण्यासाठी जाऊ म्हणत होता. पण भाऊंनी निक्षून दोन्ही गोष्टी करण्यास मनाई केली. कौस्तुभ स्वत: सी.ए. आणि सी.एस., संस्थेची आर्थिक जबाबदारी त्याच्यावर. जागेला टायटलच मिळाले नव्हते आणि प्रचंड प्रमाणात होत असलेल्या रोख आणि वस्तू स्वरूपांतील खर्चाने त्याची झोप उडवली होती. आनंदवनाच्या इतिहासात फिक्स डिपॉझिट तोडण्याची वेळ सुरू झाली होती. बोलून फायदाच नव्हता. कारण खर्च करत होते ते त्याचेच ध्येयवेडे वडील. पैसा सर्व महारोगी सेवा समिती, पब्लिक ट्रस्टचा. ट्रस्टींची संमती घेण्यापासून सुरुवात होती. भाऊंना पैशांच्या बाबतीतला विरोध अनुभवण्यास यायला लागला होता. पैशांच्या अडचणीची तक्रार थेट बाबांकडे नाइलाजाने करण्यात आली आणि बाबांचा फक्त आदल्या दिवशी फोन आला, '२६ मार्च २००७ - उद्या सकाळी सातला येतो आहे.' प्रोजेक्टवर एकच कौलारू घर तयार होते, पण त्यात संडास-बाथरूमची सोय नव्हती. एका रात्रीत अथक कामाने त्या घरात संडास-बाथरूम तयार करून दाखवणारे किमयागार मात्र तेथे होते; गजानन वसूची फौज. भाऊ आणि मी रोज पहाटे एका टेकडीपर्यंत फिरायला जात होतो ते अंतर जाऊन-येऊन अकरा-बारा किलोमीटर असावे. आम्ही परतत असतानाच बाबांना



**वेस्टेज टायरचा उपयोग करून बांधलेला चाळीस फुटी चेक डॅम**

आणणाऱ्या गाडीचा हॉर्न ऐकू आला. गाडी आम्हाला घेऊन ताई-बाबा, डॉ. पोळ यांच्यासमवेत प्रोजेक्टकडे निघाली. ताई-बाबा, भाऊंना सहा महिन्यांनी बघत होते. जागेला टायटल जोपर्यंत मिळणार नाही तोपर्यंत आरसा बघणार नाही अशी शपथ घेतल्यामुळे मूळचे रुबाबदार तांबूस वर्णीय असलेले भाऊ, दाढी वाढवलेले, काळपट पडलेला चेहरा, परीटघडी झब्बा-पायजम्याच्या जागी हाफपँट, बनियन अशा अवतारात पाहून ताईंना निश्चितच चिंतेने घेरले. मात्र बाबांच्या चेहऱ्यावरचा संपूर्ण विश्वास, हास्याने थोपटलेला भाऊंचा खांदा आणखी भक्कम करून गेला.

आदिवासी मुलीच्या अपघाती निधनाने प्रकल्पावरील इतर सर्व कामे थांबवून, भाऊंनी वेस्टेज टायरचा उपयोग करून, गजानन वसू आणि कंपनीच्या साहाय्याने अठरा तास रोज मेहनत करून, तीन महिन्यांत चाळीस फुटी चेक डॅम बांधला. तेव्हा या सर्वांचे चहा-नाश्ता-जेवण आणणारे स्वत: भाऊच होते. जेवण, बैठक आणि पुढच्या कामाचे आयोजन तिथेच. हाच बंधारा आणि सहा महिन्यांतील इतर कामे बाबांना-ताईंना, भाऊ दाखवत होते. बाबांच्या चेहऱ्यावरचे हास्य आणि बाबांनी दिलेल्या कामाची पावती- 'गो अहेड'. भाऊंच्या विकासकामाची घोडदौड थांबवणे आता नियतीच्या हाताबाहेर गेले होते. जानेवारी २००७ मध्ये भेट देऊन गेलेले डॉ. अशोक बेलखोडे, बाबांच्या दोन्ही 'जोडो भारत' सायकलयात्रेत सहभागी झाले होते, किनवटमधून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी येथे येऊन, प्रोजेक्टवर आरोग्यसेवा देत राहिले. इतर वेळेला डॉ. शीतल स्वत: जवळच्या परिसरातील लहान आदिवासी पाडे पालथे घालत होती. महिन्यातून एक दिवस भारतीवहिनी आपल्या बिझी शेड्युलमधून वेळ काढून, लहान मुलांना तपासून औषधपाणी देण्यास येत होत्या. त्या भागात वैद्यकीय मदतीच्या अभावापायी, पन्नास किलोमीटर परिसरातील लहानमोठ्या गावातील आदिवासी औषधोपचाराला येत असत. रात्रीबेरात्री सिरियस पेशंटकरता यवतमाळ आणि सेवाग्राम हॉस्पिटलसाठी संस्थेच्या गाड्या सतत ये-जा करत असायच्या. आनंदवनाच्या सेवाकार्याने तेथील लोकांच्या मनात एक विश्वासाचे स्थान मात्र कायमस्वरूपी होण्यास सुरुवात झाली. भाऊंसमवेत असूनसुद्धा मला रोज एक नवीन डॉ. विकास आमटे अनुभवण्यास येत होते. त्यांच्या रोजच्या संभाषणातून ताई-बाबा, आंनदवन, आलेली संकटे, बाबांची दूरदृष्टी, भाऊंचे कामाचे आयोजन, त्यांचा स्वभाव, ममत्व, हळवेपणा अशा विविध रूपांनी त्यांचे व्यक्तित्व समोर येत होते. त्यांची विलक्षण स्मरणशक्ती, अभ्यासूवृत्ती, लोकसंग्रह आणि निर्णय घेण्याची क्षमता, हे सर्वसाधारण माणसाच्या कल्पनेच्या बाहेरचे होते.

प्रोजेक्टला भेट दिल्यानंतर बाबांना कॅन्सरचे निदान झाल्यावर भाऊ खऱ्या अर्थाने मनोमन कोसळले. चेहऱ्यावर दिसू न देता बाबांचा अल्प सहवास त्यांच्या डॉक्टरी नजरेने हेरला आणि मग मात्र फेब्रुवारी २००८ मध्ये बाबा जाईपर्यंत जास्तीत जास्त वेळ बाबांच्या सेवेत घालवला. तेव्हा एक-दोन आठवड्यात फक्त मूळगव्हाण येथे त्यांची चक्कर व्हायची, तीपण एखादा दिवस फक्त. शीतलचे लग्न, बाबा असताना ऑक्टोबर २००७ मध्ये झाले. पण मुलीच्याच लग्नात अक्षता टाकून हा ध्येयवेडा, बाबांच्या स्वप्नांना वास्तवात आणणारा किमयागार, एकनाथ ठाकूर (संचालक, सारस्वत बँक, मुंबई) जे बाबांचे जोडो भारतमधले सहकारी असतात, त्यांना घेऊन प्रोजेक्टवर हजर झाला. ठाकूरसरांच्या भेटीने आत्महत्याग्रस्त शेतकरी परिसरात, आउटरिच प्रोग्रॅमअंतर्गत प्रकल्पाला एक कोटी रुपये डोनेशन मिळाले. इथे भाऊंची कल्पकता प्रामुख्याने दिसली. 'सीड बँक'अंतर्गत तेथील शेतकऱ्यांना उत्तम दर्जाचे बियाणे वाटले, पण सरकारी अनुदानासारखे मोफत नाही तर पीक आल्यावर मूळ बियाणे आणि त्यावरील व्याज म्हणून वजनी तेवढेच बियाणे परत करायचे. थोडक्यात, भाऊंनी संस्थेचा बियाणांचा साठा कायम ठेवून त्यात वाढच केली. शेतकऱ्याला उत्पन्न देऊन, दिलेले वजनी बियाणे घेतले. त्याचबरोबर शेतकऱ्याच्या जमिनीतील फार थोडा भाग, त्यांच्या विश्वासाने संपादन करून, त्या जमिनीवर दरमहा उत्पन्न घेता येईल अशा पद्धतीने फळभाज्या, पालेभाज्या तयार करून उत्पन्नासह त्या शेतकऱ्यांना परत केल्या. त्याचवेळी संस्थेसाठी मात्र ते उत्पन्न बाजारभावानेच विकत घेण्याची त्यांची अजब ठेकेदारी, इतरांच्या बुद्धीला अचंबित करणारी ठरली. आदिवासी शेतकऱ्यांना फक्त कापूस उत्पादनापुरते मर्यादित न ठेवता, त्यांना भाजीपाल्याचे उत्पादन घेता यावे म्हणून त्यांची मानसिकता वाढवली. आजच्या क्षणाला त्या परिसरात जवळजवळ ९५० हेक्टर जमीन आदिवासींच्या दुर्गम भागात आहे; जिथे कोणतीही सरकारी योजना पोचू शकत नाही, त्या जमिनी लेव्हल करून दिल्या. शेततळी, विहिरींचे पुनर्भरण करून, जमिनीतील जलस्तर वाढवण्याची किमया केली. चार-पाच गरीब आदिवासी कुटुंबीयांनी संस्थेला केलेली मदत म्हणून फूल ना फुलाची पाकळी या तत्त्वाने त्यांना उत्तमपैकी घरे संस्थेमार्फत बांधून दिली आणि या तऱ्हेने मूळगव्हाण हे लहानसे गाव आपल्या अथक प्रयत्नाने, महाराष्ट्राच्या नकाशावर आणावयास भाग पाडले. आनंदवनातील १२५ उद्योग, घरे, शाळा, कॉलेज, अंध विद्यालय, मूकबधिर विद्यालय आपल्या लॅण्ड आर्मीसमवेत उभारताना, आपल्या बापाने बघितलेले आनंदवनविषयी स्वप्न

म्हणून सारे अगदी नम्रपणे बाबांनाच समर्पित केले.

बाबांच्या शेवटच्या चार महिन्यांतल्या शब्दांनी, जगातले सर्व ॲवॉर्ड तुच्छ ठरतील असे कामाचे प्रमाणपत्र आपल्या कर्तृत्ववान मुलाला दिले. ते इतरांजवळ सांगायचे, की 'कामे विकासने केली मात्र जगात नाव माझे झाले.' भाऊंना त्यांच्या कर्तृत्वाची भरभरून पावती देणारे शब्द जेव्हा भाऊंना सांगितले, तेव्हा हा कर्मयोगी योद्धा स्वत:च्या वडिलांच्या कृतज्ञतेच्या भावनेने नक्कीच कृतार्थ झाला हे त्यांच्या डोळ्यांत आलेल्या पाण्यानेच सांगितले आणि बाबांच्या या शब्दांचा साक्षीदार होण्याचे भाग्य मला लाभले. सोमनाथमधली ती संध्याकाळ मी आयुष्यभर विसरू शकणार नाही.

या प्रोजेक्टवर भाऊंचे अतोनात प्रेम आहे. कारण इतर सर्व प्रोजेक्ट बाबांनी तयार केलेत. ह्या प्रोजेक्टचे प्रेरणास्थान बाबाच परंतु कामाच्या आराखड्याचे संपूर्ण नियंत्रण भाऊंचे होते. प्रत्येक कामाच्या वेळी भाऊ सदैव आपल्या लॅण्ड आर्मीसमवेतच असायचे. कार्यकर्त्यांसमवेत सतत असलेली त्यांची वत्सल दृष्टी अन्य कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित करायची. वर्षभराच्या आतच साग, पळसयुक्त वृक्षांची टेकडी या सेनापतीने अक्षरश: आडवी कापून पाच रस्त्यांचे मोठे प्लॅटफॉर्म तयार केलेत. व्यवस्थित घरबांधणीत सर्व कार्यकर्त्यांची राहण्याची सोय, कॉमन किचनमेस हॉल, पाहुण्यांसाठी गेस्ट हाऊस, दोन सेमिनार हॉल, दवाखाना, अखंड शुद्ध पाण्याचे दोन बोअरवेल... काय नाही केले? शून्यातून निर्माण झालेल्या ह्या सुंदर आविष्काराचा पहिल्या दिवसापासूनचा साक्षीदार होण्याचे भाग्य मला मिळाले. खरेच यात माझ्या आई-वडिलांची पुण्याईच काम करून गेली. ताई-बाबांचे प्रेमळ छत्र आणि भाऊंसारखा ध्येयवेडा कर्मयोगी, यांनी माझे संपूर्ण जीवनच बदलून टाकले. मी ऑक्टोबर २००८ मध्ये दिवाळी निमित्ताने घरी मुंबईला गेलो असताना, मूळगव्हाण येथील प्रोजेक्ट पूर्ण करून तो कार्यकर्त्यांचा हाती सोपवल्यानंतर, भाऊंना परत आपल्या नव्या कर्तृत्वाच्या ओढीची तहान स्वस्थ बसू देत नव्हती.

सोमनाथ आनंदवनाचा चाळीस वर्षांचा जुना शेतीप्रधान, पण कधीच प्रकाशात न आलेला सर्वात मोठा प्रकल्प, १३५० एकरांचा. कुष्ठरोग्यांचे पुनर्वसन प्रकल्प करण्यासाठी सरकारकडून मिळालेला, ताडोबाच्या जंगली भागाने व्यापलेला पण खऱ्या अर्थाने वैशिष्टयपूर्ण नंदनवनच. यातील सातशे एकर जमिनीवरील जंगल कमी करून घरे, शेते, जमीन, रस्ते, सत्तावीस तलाव, सतरा विहिरी... अक्षरश: श्रमदानातून, चाळीस वर्षांत कायापालट करण्यात आला. लोकसंख्या अवघी पाचशे. दरवर्षी १५ ते २२ मे ह्या कालावधीत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले हजारो युवक-युवती श्रमसंस्कार छावणी शिबिर, युवक-युवती, पुरुष-स्त्री श्रमदानातून साकारलेले सोमनाथ. बाबा-ताई आणि त्यांच्या स्वप्नातून सफल झालेले आनंदवन उद्योगभूमी; तर सोमनाथ कृषी-उद्योगभूमी; संपूर्ण आनंदवन आणि इतर प्रोजेक्टना अन्नधान्याचा पुरवठा करणारी. पाच



**डॉ. विकास आमटे सोमनाथ भेटीला आलेल्या युवकांसह**

वसाहतींमध्ये स्वतंत्र कॉमन मेससहित दवाखाना असे याचे स्वरूप, मात्र सोमनाथ प्रकल्प विकासात मागे राहिलेला, म्हणून प्रसिद्धीपासून दूर असलेला. ह्या प्रोजेक्टची धुरा या ध्येयवेड्या सेनापतीने वयाच्या बासष्टव्या वर्षी परत आपल्या खांद्यावर घेतली. मी मुंबईहून आल्यावर मलापण सोमनाथला भाऊंसमवेत राहण्याची संधी मिळाली. परत जीवनातल्या नवीन पर्वाची सुरुवात झाली. निसर्गाच्या वैविध्यपूर्ण, सुंदर साजाने मनाला मोहात पाडले. तिन्ही बाजूंनी किर्र जंगल. वाघ, बिबटे, अस्वल आणि अन्य वन्य श्वापदांचे माहेरघर. पाणी, हवा, आवाजाचे प्रदूषण नसलेले वातावरण. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा मजबूत आणि सोबत भाऊंसारखी व्यक्ती. हा माणूस झाडे, पक्षी, प्राणी, आकाश, तारे सर्व विषयात तज्ज्ञ. पण केव्हाच अभ्यास करताना दिसत नाही. रात्री झोपायची वेळ साडेबारानंतरच. पुन्हा सकाळी पाच वाजता जंगल सफारी करता फ्रेश मूड. शूर आणि धाडसी स्वभाव, दोन्ही मुलांमध्ये जन्मजातच असावा. प्रकाशभाऊंचे वन्यप्राणीप्रेम जगाला आश्चर्यचकित करते तर भाऊ सोमनाथसारख्या जंगलात हातात टॉर्च, काठी न घेता पंधरा-वीस किलोमीटरचा फेरफटका रोज मुक्त फिरतात, तेही अभ्यासपूर्वक. आश्चर्यचकित व्हायला होतं.

पहिल्यांदा फिरताना मला अनामिक दडपण सतत असायचे. बाबूंच्या दाट बनातून कुठूनतरी दोन अदृश्य डोळे आपल्याकडे बघत असतील ह्या जाणिवेने. कधी कधी मनात विचार यायचा, मुंबईत हुतात्मा स्मारक एकच आहे पण सोमनाथला लवकरच दोन बांधावी लागतील. एक डॉ. विकास आमटे, दुसरे बक्षीकाका. मलाच माझ्या खुळचट कल्पनेचे हसायला यायचे. भाऊंना माझी मनातली भीती चेहऱ्यावर दिसली असेल. एकदा न सांगता पण बोलण्याच्या ओघात त्यांनी माझी भीती सहजसुलभ संभाषणने कायमची दूर पळवून लावली. त्यामुळे आजकाल जंगलात फिरताना मला टेन्शन राहत नाही. ते सहज म्हणाले, ''प्रमोद, वाघ एकाच वेळी दोघांना खात नाही. तुला खाल्ले तर मी सर्वांना सांगेन, बक्षीकाका मेले आणि मला खाल्ले तर तू सांग, भाऊ मेलेत. बरं, जीवनातले सर्व चढउतार दोघांनी अनुभवले आहेत. मेलो तरी दु:ख नाही. दुसरं म्हणजे परमेश्वरानं जन्माला घातलेल्या प्रत्येक जीवाला - मुंगीपासून हत्तीपर्यंत- अक्कल वाटलेली आहे. समजा, वाघानं आपल्या दोघांना पाहिले तर तो विचार करेल प्रमोदला खाल्लं तर ते सत्तर किलोग्रॅम मांस दोन दिवस पुरेल आणि मला खाल्लं तर मी त्याला चार दिवस (वजन नव्वदच्या पुढे) पुरेल. सांगायचा मुद्दा हा, की माझा नंबर तुझ्याआधी लागेल. तुमचा हिंदूधर्म सांगतो (ते स्वत: धर्म या संकल्पनेत स्वत:ला बंदिस्त करून घेत नाहीत) ज्याचा मृत्यू जिथे लिहिलेला असतो तिथे तो शेण खायला जातो. कारण नवीन लग्न झालेलं जोडपं घरात पूजा आटपून, देवदर्शन करून, हनिमूनला जातात तेव्हा आपण बऱ्याचदा पेपरमध्ये वाचतो एकतर देवदर्शनाच्या आधी किंवा देवदर्शन झाल्यावर बरेच जण अपघातात मृत्यू पावले आहेत. तसंच, जर ते चांगल्या उद्देशानं गेलेत तर अपघात होता कामा नये. पण मृत्यू झाला हे सत्य नाकारता येत नाही. तसंच, जर आपला मृत्यू वाघाच्याच तोंडी असेल तर तो आपल्याला घरात येऊन खाईल आणि तसा मृत्यू नसेल तर आपण त्याच्या घरात जाऊनदेखील आपल्याला तो खाणार नाही. सर्वात महत्त्वाचं, कोणताही प्राणी स्वभावत: माणसाची शिकार करत नाही. आपण त्याचं अन्न नाही. पाठ न दाखवता हाताची घडी घालून, त्याच्या डोळ्यांत रोखून बघत, त्याच्या हालचालींचा अंदाज घे, तो शांतपणे निघून जाईल.''

गेल्या दोन वर्षांपासून विदर्भातील पावसाच्या दुष्काळामुळे भविष्यातले पाण्याचे संकट ओळखून, भाऊ आणि त्यांच्या मुलाने- कौस्तुभने - निसर्गाच्या लहरीपणावर मात करण्यासाठी, नवीन तंत्रज्ञ आणि त्यातील अभ्यासू व्यक्तींच्या मार्गदर्शनाने; पाण्याचे नियोजन करण्याचा चंग बांधला आहे. म्हणजे आनंदवनातला प्रत्येक पाण्याचा प्रत्येक थेंब हा आनंदवनाकरताच उपयोगी पडेल अशा प्रकारची पाण्याची साठवण आणि उपयोग, या तंत्राचा अवलंब करून भविष्याकडे आगेकूच करायला सुरुवात झाली आहे. येत्या तीन-चार वर्षांत सोमनाथदेखील कामाच्या रूपाने जगासमोर आणण्याच्या महायज्ञात पितापुत्रांनी स्वत:ला वाहून घेतलेले आहे. सोबतीला आहे आनंदवनाचे अथक सैन्य जे कामाच्या परिस स्पर्शातून चमत्कार घडवण्याचे धाडस करू शकते. त्या लॅण्ड आर्मीच्या सर्व जवानांना मानाचा मुजरा...

क्षितिजापलीकडील अज्ञात असलेले आकाश आपल्या कवेत घेऊ पाहणारे, ध्येयवेडे सेनापतीच चॅलेंज घेऊ शकतात. सेनापती कुशलतेने कामाची व्यूहरचना करतो, अमलात आणतो. मात्र मनापासून वाटते, ही वादळे जन्मापासून अंगावर खेळवणाऱ्या एकांड्या शिलेदाराने स्वत:ला जाणीवपूर्वक मागे ठेवले आहे. ॲवॉर्डसाठी किंवा कोणी चांगले म्हणावे म्हणून कामे कधीच केली नाही, तर प्रत्येक कामात स्वत:ला बेभानपणे झोकून दिले. स्वत:साठी तो कधीच जगला नाही, इतर कसे जगू शकतील हाच विचार सदैव करत बसला. ग्रेट! सिम्पली ग्रेट!

**- प्रमोद बक्षी**
आनंदवन, वरोरा
anandwan@gmail.com

# एकांतपुरुष

प्रवीण
बर्दापूरकर

एखाद्या फकिराच्या मस्त कलंदर शैलीत, स्वत:च्या प्रतिमेच्या आणि प्रतिभेच्या प्रेमात ग्रेस आकंठ बुडालेले असतात. स्वत:चं असं स्वप्रिय आणि एकांत असणं ग्रेस यांनी फकिरी बाण्याला स्मरून व्रतस्थपणे जपलं. त्यांच्या या अशा असण्या-राहण्या-वागण्यावर आणि ही अशी प्रतिमा जोपासून ठेवण्याच्या हट्टावर साहित्यवर्तुळानं अनेक प्रवाद निर्माण केले, लोकांत त्यावर भरपूर चर्चा झाली आणि जितेजागते ग्रेस एक 'मिथ' बनले.

**ग्रे**सची आणि माझी पहिली भेट 'संध्याकाळच्या कविता' या कवितासंग्रहातून झाली. नंतर एकदा नागपूरला आलो तेव्हा त्यांच्या बर्डीवरच्या सरकारी क्वार्टरमध्ये प्रत्यक्ष जाऊन एखाद्या भक्तासारखा भेटलो. 'संध्याकाळच्या कविता'मधली आवडलेली कविता कोणती असं ग्रेसनी विचारलं, तेव्हा मी–

पाऊस कधीचा पडतो
झाडांची हलती पाने
हलकेच जाग मज आली
दु:खाच्या मंद स्वराने

ही कविता म्हणून दाखवली. त्यावर ग्रेस म्हणाले होते, 'या प्राचीन पुरुषाशी तुमची मैत्री होऊ शकते.'

यानंतर थेट २०१० सालच्या एप्रिल महिन्यात ग्रेस यांच्याशी मी केवळ दुसऱ्यांदा कवितेवर बोललो. त्या कवितेच्या पहिल्या चार ओळी म्हणून दाखवत मी ग्रेस यांना म्हटलं, 'तुमची ही कविता मला मनापासून आवडली.' त्या चार ओळी अशा होत्या –


हले काच पात्रातली वेल साधी
निनादून घंटा तशा वाकल्या
खिळ्यांना कळेना कुठे क्रूस न्यावा
प्रभुने अशा पापण्या झाकल्या.

माझ्या ह्या प्रतिक्रियेवर ग्रेस किंचित खाली वाकून त्यांच्या हृदयावर हात ठेवत म्हणाले, 'इटस् माय डे टुडे!' हे एवढे दोन अपवाद वगळता ग्रेस यांच्याशी गेल्या पस्तीस-छत्तीस वर्षांत कवितेवर माझं कधीही बोलणं झालं नाही, कोणतीच कविता; ग्रेसची किंवा ग्रेसची नसलेली, यापैकी कोणत्याही कवितेवर आम्ही बोललो नाही. गेल्या साडेतीन दशकांत आम्ही असंख्य वेळा भेटलो. आमचा स्नेह सुरुवातीच्या काळात नारायण कुळकर्णी-कवठेकर आणि प्रकाश देशपांडे या आम्हा दोघांच्याही समान मित्रांच्या साक्षीनं विस्तारत गेला, प्रशस्त होत गेला आणि परस्परांविषयी विलक्षण अशी एक सामंजस्याची भावना बळकट करत गेला. १९८४ साली माझं लग्न झालं. लग्नाची पत्रिका द्यायला ग्रेसकडे गेलो, तेव्हा मंगला विंचुर्णे या नावावरून ग्रेसनी

बरीच चौकशी केली आणि एकदाची खातरजमा झाल्यावर माझी आजवरची सर्वात हुशार विद्यार्थिनी आहे ती, आणि मग ग्रेस शैलीतला एक दीर्घ पॉज घेऊन, पॉजच्या दरम्यान सिगारेट पेटवून ग्रेस म्हणाले, 'तुमचा निर्णय योग्य आहे देवा! मंगलाचा निर्णय योग्य आहे हे सिद्ध होण्यासाठी कातळाला बरेच घाव सहन करावे लागतील.'

ग्रेस काही लग्नाला आले नाहीत पण मंगलच्या संदर्भामुळे ग्रेसच्या थेट संवादी कंपूत माझा विश्वासार्ह प्रवेश झाला. फोन वगैरे न करताही बर्डीवरून जा-ये करताना, मनाला येईल तेव्हा ग्रेसच्या मठीत शिरावं, बिडी-काडी, चहापान करावं आणि बाहेर पडावं असा शिरस्ता पुढे कायम राहिला. दोघांनीही एकमेकांच्या वैयक्तिक आयुष्यात डोकावून बघायचं नाही हा शिरस्ता आम्हा दोघांच्याही बाजूनं एखाद्या करारासारखा पाळला गेला. परस्परांचं कौटुंबिक जीवन, आर्थिक-सामाजिक स्थिती, परस्परांचं लेखन किंवा त्या संदर्भात निर्माण झालेले वाद किंवा उमटलेले साद-प्रतिसाद या संदर्भात साधा उच्चारही आमच्यात कधी झाला नाही. हे कधी सहज घडत गेलं तर अनेकदा अवधान सांभाळत घडवलं गेलं. आमच्या बहुतेक सर्व भेटींत ग्रेसच जास्त बोलत. बोलणं कसलं ते, तो तर ग्रेस यांनी स्वत:शी साधलेला एक संवाद असे. ग्रेस यांच्या वाणीला विलक्षण नाद आहे, फ्लो आहे. हा नाद आणि ते प्रवाहीपण आपल्याला अक्षरश: संमोहित करतं. त्यांच्या या वाणीनं संमोहित झाल्याच्या ओझ्याखाली मी अनेकदा त्यांच्या घरातून बाहेर पडलो आहे. तो त्यांचा नाद आपल्याला खुळा बनवतो, आपली वाचा गप्प करतो आणि भारावल्यासारखं आपण ग्रेस यांचं बोलणं ऐकत राहतो, असं अनेकदा घडलं आहे. ग्रेस बोलताहेत, मी ऐकतो आहे आणि आमचा छायाचित्रकार शेखर सोनी फोटो शूट करतो आहे, असंही काही वेळा घडलं आहे. जाहीर कार्यक्रमांतही अनेकदा ग्रेसनी अनेकांना असं 'नादखुळं' केल्याचा अनुभव माझ्या मनात कुलूपबंद आहे. आमचा हा असा संवाद होत असल्यानंच बहुधा, कदाचित वयानं माझ्यापेक्षा पंधरा-सोळा वर्षं मोठे असूनही ग्रेस यांनी मला कायम त्यांच्या मैत्रीच्या छायेत हुंदडू दिलं.

इतक्या वर्षांनंतरही ग्रेस कळले आहेत असा माझा तिळमात्र दावा नाही. पस्तीस वर्षं मैत्री असणं, खरं तर तो माणूस समजण्यासाठी केवळ पुरेसंच नाही तर पुरूनही उरणारं आहे. खरं तर, मनात खोलवर रुतलेला, पण मुळीच आकलन न झालेला आत्ममग्न कविमाणूस, असंच वर्णन ग्रेस यांचं करावं लागेल. ग्रेस यांना मी पत्रकार म्हणून कधीच भेटलो नाही. आजवर स्वत:विषयी तर सोडाच पण इतरांविषयीही एखादी बातमी प्रकाशित करण्यासाठी ग्रेस यांनी मला कधीही सांगितलेलं नाही. उलट, महाराष्ट्रात कुठे-कुठे फिरताना कोणत्याही छोट्या-मोठ्या




वृत्तपत्रांत ग्रेसविषयी काही मजकूर दिसला तर तो अंक आवर्जून नागपुरात पोहोचल्यावर ग्रेस यांना देण्याची सवय मला लागली होती. 'रख दो यार!' असं म्हणत ग्रेस तो अंक बाजूला ठेवत आणि त्यांचं स्वगत सुरू करत. दोन-तीन वेळा तर ग्रेसच्या कवितेतील दुर्बोधता आणि कल्पनातीत प्रतिमांविषयी आक्षेप घेणारे लेख आणून ग्रेस मी यांना दिले. ग्रेस यांनी त्या मुद्यांचा प्रतिवाद करावा असा आग्रहही मी धरला. त्यावर, 'उनको जो कहना था वो उन्होंने कह दिया, पण मी मात्र त्यांच्यासाठी लिहिलेलंच नव्हतं त्यामुळे प्रतिवादाचा प्रश्नच निर्माण होत नाही. प्रश्नच नाही तर उत्तर कशाचं द्यायचं?' असं काही सांगून ग्रेस यांनी मला गप्प केलं. मग मी ग्रेसविषयी असलेल्या बातम्या किंवा लेख आणणं बंद करून टाकलं!

ग्रेस आणि माझ्यात त्यांच्या कवितांविषयी फारसं कधी बोलणं झालंच नाही त्यामुळे त्यांच्या कवितेतली दुर्बोधता, त्यांच्या कवितेतल्या क्वचित स्तंभित करणाऱ्या, अनेकदा धक्का देणाऱ्या आणि अनेकदा अनाकलनीय वाटणाऱ्या प्रतिमांविषयीही शब्दांची देवाणघेवाण कधीच झाली नाही. जेवढ्या वेळा आम्ही भेटलो तेवढ्या वेळा एक अपवाद वगळता ग्रेसचीच काय, अन्य कुणाचीही कविता हा आमच्या गप्पांचा विषय राहिला नाही. प्रारंभीच्या काळात माणिक गोडघाटे यांनी 'ग्रेस' हे टोपणनाव का धारण केलं असावं याविषयी मलाही उत्सुकता होती. तीस-बत्तीस वर्षांपूर्वी एका संध्याकाळी

त्याबद्दल मी ग्रेस यांना विचारलं तेव्हा त्यांनी सांगितलं होतं, ब्रिटिश अभिनेत्री इन्ग्रीड बर्गमन हिच्या आठवणीप्रीत्यर्थ त्यांनी 'ग्रेस' हे नाव धारण केलंय. नंतर ते तिच्याविषयी बरंच काही बोलले, जे सगळं माझ्या डोक्यावरून गेलं. त्यानंतर हा विषय मी कधी छेडायच्या भानगडीत पडलोच नाही!

१० मे, १९३७ रोजी नागपुरात जन्मलेल्या, माणिक गोडघाटे नावाच्या माणूस आणि ग्रेस या कवीची इतकी घट्ट सरमिसळ झाली, आणि त्यात ग्रेस वरचढ ठरल्यानं, ग्रेस हीच माणिक गोडघाटेंची जनमानसातील ओळख बनली. आमच्या ज्या काही भेटी झाल्या त्यातून ग्रेसचा हा प्रभाव मला कायमच जाणवला. ग्रेसच्या प्रभावाखालीच त्यांनी त्यांच्या उर्वरित आयुष्याची वाटचाल केली आणि काव्यसाधनाही केली. एखाद्या फकिराच्या मस्त कलंदर शैलीत, स्वत:च्या प्रतिमेच्या आणि प्रतिभेच्या प्रेमात ग्रेस आकंठ बुडालेले असतात. स्वत:चं असं स्वप्रिय आणि एकांत असणं ग्रेस यांनी फकिरी बाण्याला स्मरून व्रतस्थपणे जपलं. त्यांच्या या अशा असण्या-राहण्या-वागण्यावर आणि ही अशी प्रतिमा जोपासून ठेवण्याच्या हट्टावर साहित्यवर्तुळानं अनेक प्रवाद निर्माण केले, लोकांत त्यावर भरपूर चर्चा झाली आणि जितेजागते ग्रेस एक 'मिथ' बनले. हे असं होऊनही ग्रेसनी त्याची कधीच पर्वा केली नाही. एवढं कशाला, जन्मानं दलित असून ग्रेस दलित साहित्याच्या प्रवाहापासून लांब राहिले, हा त्यांचा प्रमादच आहे, असा जहरी घावही घातला गेला, पण त्याच्या कोणत्याही प्रतिवादात ग्रेस कधी पडले नाहीत. 'शरीर म्हटलं की घाव पडणारच. काही जखमा औषधानं बऱ्या होतात, काहींवरचं औषध काळ असतं,' असं त्यावर ग्रेस एकदा म्हणाले. सर्जनशील कलावंतानं समाजातील परंपरा आणि संस्कृतीत कालानुरूप होणाऱ्या बदलांचा वेध घेतला पाहिजे. या परंपरा आणि संस्कृतीवर आपल्या अभिव्यक्तीतून भाष्य केलं पाहिजे, हेच ग्रेस यांच्या सर्जनशील आविष्कारातून स्पष्ट दिसतं आणि त्यापेक्षाही अधिक स्पष्टपणे जाणवतं ते त्यांच्यातल्या माणसातून. दुर्बोधतेचा ठसा बसल्यावरही एकांतसाधना करत ग्रेस यांनी हे असं भाष्य करणं बेडरपणे सुरूच ठेवलं. प्रतिभावंताच्या काजळकातळी निर्धाराचंच ते प्रतीक आहे असं कधी कधी वाटतं तर काही वेळा वाटतं, ग्रेस आत्मपीडन करून घेत आहेत. मात्र आत्मपीडन कशासाठी या प्रश्नाचं उत्तर मिळत नाही.

जिवंतपणीच दंतकथा बनलेल्या ग्रेस यांच्या दोन-तीन आठवणी त्यांच्यातल्या माणसावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. साधारण पंचवीसेक वर्षांपूर्वीची ही घटना आहे. तेव्हा मी पुणे सकाळचा नागपूरचा प्रतिनिधी होतो. सकाळची रविवार पुरवणी तेव्हा सदा डुंबरे सांभाळत असे. सकाळमध्ये ग्रेस यांनी ललित लेखन करावं अशी सदाची खूप इच्छा होती. त्याप्रमाणे मी ग्रेसना गळ घातली. ग्रेस तयारही झाले, त्यांनी आरंभाचा लेख दिला. त्या महिना-दीड महिन्यात ग्रेस यांच्या जवळजवळ रोज भेटी होत. त्यांच्या घरी किंवा पत्रकार संघासमोरच्या कॉफी हाउसमध्ये. त्या काळात ते बऱ्यापैकी डिस्टर्ब असल्याचं स्पष्ट जाणवत होतं पण, अलिखित कराराप्रमाणे मी त्याबद्दल एका शब्दानंही टोकण्याचा प्रयत्न केला नाही. आम्ही नियमित भेटून, सिगारेटच्या धुराची वर्तुळं काढण्यात दंग राहत असू. एक दिवस माझं नवीन व्हिजिटिंग कार्ड आलं ते नेमकं ग्रेससमोरच. छान ले-आउट आहे असं म्हणत ग्रेसनी एक कार्ड स्वत:च्या खिशात टाकलं. त्याचदिवशी रात्री साडेअकरा-बाराच्या सुमारास ग्रेस यांचा फोन आला. थोडावेळ बोलून संभाषण संपवताना, 'हे आपलं शेवटचं बोलणं. मी आज रात्री आत्महत्या करणारेय' असं म्हणून ग्रेस यांनी फोन कट केला. मी काही फारसं ते मनावर घेतलं नाही. पुढच्या तासाभरात असंच संभाषण तीन-चार वेळा झाल्यावर मात्र मी घाबरलो. प्रसंग खूपच गंभीर आहे असं मला वाटायला लागलं आणि माझी झोप उडाली. मग तेवढ्या रात्री मी प्रकाश देशपांडेला फोन केला आणि काय घडलं ते सांगितलं. माझा गंभीर स्वर ऐकून प्रकाशही सटपटला. मग आम्ही दोघं तेवढ्या मध्यरात्री ग्रेसच्या शोधात बाहेर पडलो. नेहमीची सगळी ठिकाणं शोधून झाली, माहीत असलेले-नसलेले अड्डे शोधून झाले; आम्हाला काही ग्रेसचा शोध लागला नाही. या दरम्यान सकाळ उजाडली, अखेर कंटाळून आणि भलंमोठं निराश होऊन मी आणि प्रकाश पत्रकारभवनात येऊन बसलो. तेव्हा प्रकाश नागपूर श्रमिक पत्रकार संघाचा सरचिटणीस होता. त्यामुळे पत्रकार संघाच्या चाव्या त्याच्याचकडे होत्या. आमच्या स्कूटर बघून प्रख्यात नारायण मुद्रणालयाचे मधुसूदन बनहट्टी आत आले. त्यांना आम्ही 'महाराज' म्हणत असू. तेही ग्रेस यांचे निकटचे स्नेही होते. काय घडलं ते त्यांना सांगून, बोलत बोलत आम्ही पत्रकार संघाच्या कार्यालयाबाहेर उभे राहिलो. आम्हाला तिघांना इतक्या सकाळी तिथे बघून सीताबर्डी पोलिस स्टेशनचे इन्स्पेक्टर चंदेल यांनी जीप थांबवून चौकशी केली. आम्ही काय झालं ते सांगितल्यावर चंदेल म्हणाले, ''वो कवी ना? तुम लोग घरको जाके सो जाव, मै ढूँढता हूँ उनको.'' चंदेल आमच्यापेक्षा वडिलधारे होते, त्यांना मी 'दादा' म्हणत असे. त्या काळात माझं त्यांच्याशी चांगलं सूत होतं. ''दादा, कुछ करो यार, कुछ भलता-सलता हो गया तो मै खुदको माफ नही करूंगा'' असं काहीसं भाषण मी सुरू केलं. खांद्यावर थोपटत दादांनी मला आश्वस्त केलं. घरी येऊन मी जे झोपलो, ते दुपारी अडीच-तीनच्या सुमारास जागा झालो ते फोनच्या प्रदीर्घ काळ वाजणाऱ्या बेलनं. पलीकडून इन्स्पेक्टर चंदेल बोलत होते. ग्रेसना त्यांनी



स्वत: घरी पोहोचवलं असून ग्रेस सुखरूप आहेत असं त्यांनी सांगितलं. मग मी एकदम भानावर आलो. बायकोला फोन करून हे सांगितलं. तिनं, रात्रभर ती कशी माझी काळजी करत जागली वगैरे सांगितलं. मला ते सगळं ऐकल्यावर विलक्षण कानकोंड्यासारखं झालं. संध्याकाळी ऑफिसला जाताना ग्रेसकडे गेलो आणि त्यांच्या वर्तनाचा मंगलला आणि मला कसा त्रास झाला, याबद्दल सुनावून आलो. त्यावर ग्रेस काहीच बोलले नाही.

या घटनेचा शेवट अतिशय विलक्षण आणि ग्रेसमधल्या जगावेगळ्या माणसाचा प्रत्यय देणारा ठरला. दुसऱ्या दिवशी सकाळी अचानक ग्रेस आमच्या घरी आले आणि त्यांनी चक्क माझ्या पत्नीकडे दिलगिरी व्यक्त केली. आपल्या एकेकाळच्या विद्यार्थिनीसमोर अशी अभिव्यक्ती करणारा, माझ्या आयुष्यात आलेला ग्रेस हा पहिला आणि शेवटला माणूस.

दुसरी एक आठवण तर लुब्धस्तंभित करणारी आहे. लोकसत्ताच्या नागपूर आवृत्तीच्या संपादकपदाची सूत्रं मी स्वीकारली आहेत हे सांगण्यासाठी ग्रेसना फोन केला. तोपर्यंत माझा नागपूर ते मुंबई ते औरंगाबाद ते पुन्हा नागपूर असा प्रवास झालेला होता. औरंगाबादच्या साडेसहा-सात वर्षांच्या काळात ग्रेस यांच्याशी दूरध्वनीवरूनही संपर्क झालेला नव्हता. स्वाभाविकच त्या संपर्क नसणाऱ्या दिवसांविषयी बोलणं झाल्यावर, मी संपादक म्हणून परत आल्याचं ग्रेसना सांगितलं. हे सांगितल्यावर एकदम ग्रेस यांनी मला 'सर' म्हणून संबोधण्यास सुरुवात केली. दोन-तीनदा नंतरही फोनवर बोलणं झालं तेव्हाही ग्रेस मला 'सर' म्हणताहेत, हे प्रकर्षानं लक्षात आलं आणि मी संकोचून गेलो. त्यांचं ते संबोधन मला विलक्षण अवघडवणारं वाटू लागलं. मी तसं स्पष्टच बोलून दाखवलं तेव्हा ग्रेस म्हणाले, 'तुम्ही आता संपादक आहात आणि तेही लोकसत्तासारख्या वृत्तपत्राचे. ती खुर्ची फार मोठ्या तोलामोलाची आहे. त्या खुर्चीचा मान प्रत्येकानंच सांभाळायला हवा. त्या खुर्चीत तुम्ही असेपर्यंत मी तुम्हाला 'सर'च म्हणणार.' ग्रेसचं हे म्हणणं ऐकल्यावर ग्रेसची एक माणूस म्हणून असणारी उंची आणि समज मला एकाच वेळेस लुब्ध आणि स्तंभित करणारी ठरली. ग्रेस यांनी काही काळ तरुण भारतात उमेदवारी केली हे अनेकांना ठाऊक नसेल. त्या आणि युगवाणीचं संपादकपद ग्रेस यांनी प्रदीर्घ काळ सांभाळल्याच्या पार्श्वभूमीवर, संपादकपदाविषयीची ग्रेस यांची धारणा किती प्रगल्भ आहे याचीच ही प्रचिती आहे. नंतरही काही कार्यक्रमांत बोलताना ग्रेस यांनी माझा असाच सन्मानपूर्वक उल्लेख केला तेव्हा प्रत्येकवेळी मी थरारून गेलो. नागपूर शहराच्या स्थापनेला तीनशे वर्षं पूर्ण झाल्याबद्दल सुरू करण्यात आलेला 'नागभूषण' सन्मान स्वीकारल्यावर केलेल्या भाषणात ग्रेस यांनी कुमार केतकर यांचा अतिशय गौरवपूर्ण शब्दात उल्लेख केला तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या. केतकर तेव्हा लोकसत्ताचे संपादक होते, त्यामुळे ग्रेस यांच्या वक्तव्याला नसलेले भलतेच संभाव्य हेतू चिकटवले गेले. खरं तर, ग्रेस आणि केतकरांची ओळख नाही, त्या दोघांत साधं फोनवरही बोलणं झालेलं नाही.

आणखी एक आठवण तर ग्रेसचं एक वेगळं रूप दाखवणारी आहे. एकदा महेश एलकुंचवारांशी बोलत असताना मी त्यांचा उल्लेख प्रतिभावंत असा, 'मौनराग'च्या संदर्भात केला. तेव्हा पटकन एलकुंचवार म्हणाले, 'खरा प्रतिभावंत ग्रेसच !' काही दिवसांनी भेट झाल्यावर ग्रेसना मी हे सांगितलं तेव्हा ग्रेस एकदम स्तब्ध झाले. त्यांनी माझा हात त्यांच्या हातात घेतला आणि तो घट्ट धरून ते शांत बसले. त्यांच्या स्पर्शात थरथर होती, उबदारपणा होता. एलकुंचवारांनी केलेल्या त्या प्रशस्तीविषयी त्यांना काय म्हणायचं आहे ते मला बरोबर

कळलं. एखाद्या प्रतिभावंताचं स्पर्शातून व्यक्त होणं मी पहिल्यांदाच अनुभवलं.

'क्लोजअप' हा माझा व्यक्तिचित्रसंग्रह ग्रेस यांनी वाचला आणि त्यावर ए-४ आकाराची दोन पानं भरतील एवढी मोठी प्रतिक्रिया पाठवली ती त्यांच्या चिरपरिचित 'मी ग्रेस' अशा झोकदार सहीनिशी! ग्रेसची पाठीवर पडलेली ही शाबासकीची थाप विलक्षण उमेद देणारी जशी होती, तशीच लेखक म्हणून माझा अहंकार सुखावणारी होती. क्लोजअपच्या प्रकाशन समारंभात ग्रेस यांची ही प्रतिक्रिया वाचून दाखवायचं ठरलं पण ते नाही जमलं. मग ग्रेसचा काही दिवसांनी एसएमएस आला, ''रेव्हरंड प्रवीणजी कुड फील क्रिएटिव्ह इनकार्नेशन ऑफ माय लेटर, इन्क्लुडेड इन माय बुक, विच बीईंग प्रिंटेड....... मी ग्रेस.'' मराठी कवितेच्याच नाही तर, एकूणच साहित्य क्षेत्रात ग्रेसची शाबासकी मिळावी अशी सुप्त इच्छा अनेकांच्या मनात असते. मला तर इथे ग्रेसच्या पुस्तकात स्थान मिळालं!

ग्रेस असे अनेक तुकड्या-तुकड्यांत, वेगवेगळ्या वेळी, वेगवेगळ्या संदर्भांसह समजत गेले. तरीही ग्रेस आपल्याला पूर्ण कळले आहेत असा माझा दावा कधीच नाही. एका आत्ममग्न कवीत दडलेला एक अतिशय वेगळा माणूस मला कळत गेला आणि ग्रेसविषयीच्या कोणत्याही दंतकथा, समज, प्रवाद यांना माझ्या मनात कधीच स्थान मिळालं नाही. कविता ज्याच्या रंध्रारंध्रात भिनलेली आहे असा एक अलौकिक कवी आणि ते अलौकिकत्व ज्या माणसाच्या रोमरोमात मिसळून गेलेलं आहे असा एक माणूस म्हणून; माझ्या आयुष्यात ग्रेस यांचं स्थान अढळ आहे. काहीसं दुर्बोध, काहीसं स्तंभित करणारं आणि उदासीच्या अनेक क्षणी मनावर फुंकर घालणाऱ्या आकारात ते आहे. माझं हे म्हणणं अनेकांना अनाकलनीय वाटेल; पण ग्रेसच्याच शब्दात सांगायचं तर-

ये कावळ्या इथे ये, आहेस तू उपाशी
माझी खुडून खा ना प्राणातली उदासी.

आपल्या मनावरची उदासी दूर करणारं आणि तरीही कोणत्याही आकारात न मावणारं एकांतवासी व्यक्तिमत्त्व म्हणजे ग्रेस आहेत!

**- प्रवीण बर्दापूरकर**
एल-९०, वसंतनगर,
लक्ष्मीनगरजवळ, नागपूर ४४००२२
भ्रमणध्वनी : +९१ ९८२२०५५७९९
praveen_bardapurkar@hotmail.com
www.praveenbardapurkar.com

*With Best Compliments From*

**SHRIKRISHNA ENTERPRISES**

*With Best Compliments From*

**A. J. ENTERPRISES**

***Dealers in :***
**Lamination Film i.e. BOPP/P.V.C./Polyster, Adhesives, Chemicals, Packaging & Printing Materials**

Shop No. 50 / 52, New Bawan Chawl,
Veer Tanaji Malusare Marg,
Kala Chowki, Mumbai-400 033

# महामार्ग

डी.व्ही.
कुलकर्णी

नेहमीची मॉर्निंग मीटिंग आटोपून प्रधान आपल्या केबीनमधे आले. त्यांनी ब्रीफकेस उघडली. नॅपकीनने चेहरा पुसला.काही क्षण डोळे बंद करून मेडिटेशन केलं. हे अलीकडचं नवीन फॅड, त्यांची पत्नीने- सायलीने-त्यांच्या डोक्यात भरवलं होतं. टेन्शन्स कमी होतात म्हणे! प्रधानांच्या मनात आलं, इंडस्ट्रीत टेन्शन्स तर आठवड्याला... चोवीस गुणिले सात तास पुजलेली असतात.असो.हा एक प्रयोग.

मेडिटेशन झाल्यावर त्यांनी समोरच्या टेबलवरील पीसी सुरू केला आणि मेल चेक करायला सुरुवात केली.एका मेलवर त्यांची नजर स्थिरावली.आणि छातीत कालवाकालव झाली.

एम.डी.च्या ऑफिसमधून मेसेज होता.त्यांना आजच कॉर्पोरेट ऑफिसमध्ये दुपारी दोन वाजता भेटायला बोलावलं होतं.

प्रधान थोडेसे अस्वस्थ झाले. त्यांनी घड्याळात पाहिलं. साडेअकरा वाजले होते. म्हणजे लगेचच निघायला हवं. दुपारी दोन वाजता ते एम.डीं.च्या केबिनमध्ये शिरले.

एम.डीं.नी हसून स्वागत केलं. त्यांच्या युनिटची जुजबी चौकशी केली. प्रधान थोडेसे रिलॅक्स झाले. परंतु त्यांना निश्चित अंदाज येत नव्हता. बोलता बोलता एम.डीं.नी पुण्याच्या एका सेमिनारचा विषय काढला.

'मि. प्रधान त्या सेमिनारमधे तुम्ही एक पेपर वाचला होता..'

'होय सर.' रोल ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन इन इनक्रिझिंग प्रॉडक्टिव्हिटी''

'करेक्ट.त्यातले काही मुद्दे फारच छान होते.'

'थँक्यू सर.'

एम्.डी.नी प्रधानांकडे रोखून पाहिलं.

'त्यांची आपल्याकडे अंमलबजावणी करायला काय हरकत आहे?'

'येस सर.'

'मला वाटतं, त्या दृष्टिकोनातून तुम्ही आपल्या बेलापूर युनिटचा अभ्यास करावा.'

प्रधान मनातून सुखावले. कारण मेहता इंडस्ट्रीजचं बेलापूर युनिट खूप मोठं होतं. सुमारे पाचशे कामगार तिथे होते. ते एक आव्हानच होतं.

एम.डी. पुढे बोलत होते...

'यू नो, तितकंसं सोपं युनिट नाही ते. इंडस्ट्रीमध्ये सतत बदल होत आहेत. या बदलाला वेग आहे. आधी ग्लोबलायझेशन आलं. जगाची बाजारपेठ आपल्यासाठी उघडली हे मान्य, परंतु त्यामुळे खूप मोठ्या स्पर्धेला तोंड द्यावं लागलं. त्यापाठोपाठ रिसेशन आलं. अगदी भले भले नामोहरम झाले. धंद्यात टिकून राहणं अवघड झालं. मला वाटतं, त्यासाठी इंडस्ट्रीतल्या वर्क कल्चरचा नव्याने विचार करायची गरज आहे. आपले चेअरमन संजीव सेठ मेहता यांचंदेखील तेच मत आहे.'

प्रधानांच्या लक्षात आलं, की मेहता इंडस्ट्रीच्या कार्यपद्धतीमध्ये बदलाचे वारे वाहू लागले होते.आणि त्यामधे

त्यांना भूमिका बजावायची होती. एम.डी.पुढे बोलत होते .

'मि. प्रधान, एक निश्चित, की सध्याच्या सेटअपमध्ये अकार्यक्षम माणसाला स्थान नाही. कामचुकारांना पोसणं कंपनीला परवडणारच नाही. यंत्राचा तुटलेला भाग आपण जसा फेकून देतो तसं त्यांना फेकून द्यावं लागणार.'

प्रधानांनी मान डोलावली. एम.डीं.चं म्हणणं त्यांना पूर्णपणे मान्य होतं.

एम.डी. किंचित थांबले. त्यांनी आपला घसा मोकळा केला. नंतर पुढे म्हणाले .

'आय.टी. इंडस्ट्रीचं ठीक आहे. तिथे सध्या बूम आहे. तरुणाई काम करते आहे. उच्चशिक्षित मंडळी तिथे आहेत. नव्या जगातील नव्या आव्हानांना ते निश्चितच तोंड देतील. बट व्हॉट अबाउट इंजिनीअरिंग डिव्हिजन? ...आपल्या बेलापूर डिव्हिजनचं उदाहरण समोर आहे. तिथे अजूनही जुनीच खोडं आहेत. तिथली कार्यक्षमता सुधारणं खूपच गरजेचं आहे. जागतिक स्पर्धेत टिकून राहाण्यासाठी तिथल्या माणसांच्या क्रयशक्तीचा अधिक अधिक वापर होणं गरजेचं आहे. मुळात तिथल्या कामगारांना शिस्त लावणं गरजेचं आहे. आणि या कामात ॲडमिनिस्ट्रेशनचा रोल महत्त्वाचा आहे.'

प्रधान उत्तेजित झाले.

'येस सर. इटस् अवर प्लेझर'

एम.डी.नी प्रधानांकडे रोखून पाहिलं.आणि नंतर म्हणाले.

'तुम्ही अंधेरी डिव्हिजनचा चार्ज श्रीनिवासनला द्या आणि उद्यापासून बेलापूर डिव्हिजनला जॉईन व्हा.'

प्रधानांनी मानेनेच होकार दिला आणि हलकेच म्हणाले.

'ठीक आहे. मी तिथल्या जी.एम.ना जाऊन रिपोर्ट करतो.'

एम.डी. पटकन त्यांना तोडलं.

'नो. तुम्ही फक्त स्वतंत्रपणे तिथला अभ्यास करा.यू वुईल बी रिपोर्टिंग टू मी ओन्ली.बेस्ट ऑफ लक' मीटिंग संपल्याची ती खूण होती.

● ● ●

'बसा' बेलापूर युनिटचे जी.एम. प्रधानांना म्हणाले. आणि त्यांनी फाईलमधे पुन्हा डोकं खुपसलं.

'सर...' प्रधान काहीसे अस्वस्थ झाले होते.

'जस्ट अ मिनिट, प्रधान.' असं पुटपुटत प्रधानांनी काही फाइल्सवर सह्या ठोकल्या. नंतर फाइल्स बंद करीत डोकं वर केलं.

'एम.डीं.शी माझं बोलणं झालंय. तुमची केबीन तयार आहे. माझा पी.ए. तुम्हाला केबीन दाखवेल.'

थोडा वेळ शांतता पसरली. कोणीच काही बोललं नाही. प्रधानच नंतर काहीतरी बोलायचं म्हणून म्हणाले,

'एका सेमिनारमधे मी एक पेपर वाचला होता. एम.डीं.ना तो खूप आवडला. त्या दृष्टिकोनातून बेलापूर युनिटचा अभ्यास करायचा आहे.'

'ओह...गुड!...तुमच्या काही चांगल्या सूचना असतील तर अवश्य राबवल्या जातील. ऑफ कोर्स. नॉट ॲट द कॉस्ट ऑफ प्रॉडक्शन.'

प्रधानांच्या मस्तकात तिडीक गेली. हा माणूस आपल्याला समजतो काय?...मी काय फ्रेश पास आउट आहे?'

दोन दिवस थोडेसे रुळल्यानंतर प्रधानांनी वर्कशॉपमध्ये फेरी मारायचं ठरवलं.मशीन शॉपमधे मोठमोठ्या मशिन्स धडधडत होत्या. काही मशिन्स दुरुस्तीसाठी 'आ' वासून पडल्या होत्या. त्यांना कोणीही वाली नव्हतं. प्रधानांना वाटलं,



यांच्याकडे कुणाचं लक्ष आहे की नाही? यांची देखभाल कोण करतंय? का चालढकल चालली आहे?...मशीन शॉप्सच्या मागच्या बाजूला मेन्टेनन्स शॉप होतं. तिथला कारभार अतिशय गलथान होता. निरनिराळ्या मशिन्सचे पार्टस्‌ विखुरले होते. हाउसकीपिंग नावाचा प्रकारच नव्हता. प्रधानांच्या मनात आलं, या मंडळींना 5s हे जपानी तंत्र शिकवण्याची नितांत गरज आहे. स्वच्छता, टापटीप आणि व्यवस्थितपणा हे उत्पादन सुरक्षा या दृष्टीने कसं आवश्यक आहे ते समजेल. शॉपमध्ये उपस्थिती तुरळक होती.

प्रधान तिथून फर्नेसच्या जवळ गेले. भट्टी पेटलेली होती. चिमणीतून काळा धूर बाहेर पडत होता. याचा अर्थ उघड होता, ज्वलन योग्य पद्धतीने होत नव्हतं. बरीचशी ऊर्जा वाया जात होती. वातावरणातील प्रदूषण वाढत होतं. भट्टीजवळ पोट खपाटी गेलेले कंत्राटी कामगार राबत होते. प्रधानांना त्यांची कणव आली. यांच्या सुरक्षेचा कोणीतरी विचार करतंय का?

घामाघूम झालेले प्रधान काही क्षण स्तब्ध उभे राहिले. काही कामगार चुकारपणा करताना दिसत होते. त्यांना हटकणारं कोणी नव्हतं. थोडक्यात, खूप मोठी क्रयशक्ती वाया जात होती. प्रधानांना कोणीच ओळखत नव्हतं. त्यामुळे त्यांची दखल घेण्याचा प्रश्नच नव्हता. फॅक्टरीचं नेमकं चित्र प्रधानांना दिसत होतं.

वर्कशॉपमधून प्रधान ऑफिसमध्ये आले. तिथेही तीच परिस्थिती होती. टेबल्सवर फाइल्स उघड्या पडल्या होत्या. अनागोंदी कारभार स्पष्ट जाणवत होता.

प्रधानांच्या लक्षात आलं, की मॅन पॉवर प्लॅनिंगची गरज होती. कदाचित माणसांची संख्या जरुरीपेक्षा जास्ती होती. कुठेतरी काहीतरी चुकत होतं. काही पावलं उचलणं गरजेचं होतं.

प्रधान आपल्या केबीनमध्ये येऊन बसले. त्यांनी टायची गाठ सैल केली. डोक्यात विचारांचं चक्र सुरू होतं. प्रश्नाला नेमका कसा हात घालायचा याबद्दल डोक्यात निश्चित योजना तयार होत होती.

प्रधानांनी ह्युमन रिसोर्सेस म्हणजेच कॉर्पोरेट भाषेत एच.आर.डिपार्टमेंटला फोन लावला.

'हॅलोऽमी ॲडमिन. मॅनेजर प्रधान बोलतोय. मला जरा मॅन पॉवर प्लॅनिंगचा चार्ट हवा होता.'

'सर...आय डिडंट गेट यू.'

प्रधानांच्या रागाचा पारा चढला.

'व्हेरी सिंपल. कोणत्या डिपार्टमेंटला किती माणसांची गरज आहे. त्यांची जबाबदारी काय आहे. याचा एक सिंप्लिफाइड चार्ट असतो.'

'सर, तसा चार्ट असेल पण आता बरेच बदल झालेत.'

'ठीक आहे.मला निदान फॅक्टरीत काम करणाऱ्या इंजिनीअर्सचा प्रोफाइल द्या.'

'तो पी.सी. वर लोड केला आहे.'

'ओ.के. लिंक सांगता?'

प्रधानांनी समोरचा पी.सी. ओढला. काळजीपूर्वक डाटा तपासू लागले.

आणिएका नावावर त्यांची नजर स्थिरावली.

● ● ●

दुसऱ्या दिवशी गेटमधून पहिली गाडी प्रधानांची शिरली.

प्रधान केबीनमध्ये शिरले आणि खुर्चीवर न बसता खिडकीत उभे राहिले. केबीनच्या खिडकीतून मेन गेट स्पष्ट दिसत होतं. मेनगेटवर लोकांचा गलका होता. अनेक कंत्राटी कामागार उभे होते. ते आशाळभूतपणे मुकादमाकडे पाहत होते. प्रधानांच्या मनात आलं, की एवढ्या मोठ्या प्रमाणावर हंगामी कामगार हवेतच कशाला?

कालचेच विचार पुन्हा मेंदू कुरतडू लागले, तसे ते अस्वस्थ झाले.

त्यानंतर आठचा भोंगा झाला. शिफ्ट सुरू झाली. त्यानंतरही सुमारे अर्धा तास उशिरा कामगार येतच होते. कॉन्ट्रक्टच्या बसेस देखील वेळेवर आलेल्या नव्हत्या.

नॉन्सेन्स! कोणत्या जमान्यात वावरता आहात?

या पद्धतीने जागतिक स्पर्धेला तोंड द्यायचं कसं?

प्रधानांनी पी.सी. ओपन केला. काल अधोरेखित केलेल्या नावांची प्रोफाइल पुन्हा एकदा चाळली. आणि समोरचा फोन उचलला.

'हॅलोऽ मकरंद देशपांडे?'

● ● ●

समोर बसलेला तिशीचा तरुण प्रधानांशी बोलत होता.

'सर, मी मेकॅनिकल इंजिनीअरिंगची पदवी घेतली. आणि नतर इंडस्ट्रिअल इंजिनीअरिंगचा एक वर्षाचा कोर्स नीटी येथे केला.'

'आय नो. ऑर्गनायझेशनमधल्या यंग टॅलण्टची मतं जाणून घेण्याचा माझा प्रयत्न आहे.मला ही इंडस्ट्रिअल इंजिनीअरिंगची ब्रँच आवडते. तुमचं ते टाइम स्टडी मोशन स्टडी बाय द वे, ते सगळं आपल्या इथे नाही का राबवता येणार?'

देशपांडे नुसताच हसला.

'तुम्ही मोकळेपणाने बोलायला हरकत नाही.' हळुवारपणे प्रधान म्हणाले.

'यू वुईल गेट सम इन्सेन्टिव्ह'

प्रधानांनी गाजर दाखवलं तसा तो विरघळला.

‘सर, सगळ्या सिस्टिमचाच नव्याने अभ्यास करावा लागणार आहे.’

‘इज इट?’

‘अगदी प्राथमिक गोष्टींकडे देखील दुर्लक्ष झालंय. उदाहरणार्थ कॅन्टिन दूर आहे. ब्रेकफास्ट पंधरा मिनिटांत आटोपणं शक्यच नाही. अर्धा तास सहज निघून जातो.’

‘परंतु त्याला उपाय काय?’

‘ट्रॉली सिस्टिम चालू करता येईल.’

देशपांडे पटकन म्हणाला आणि आपल्याला हे का नाही सुचलं, याचं प्रधानांना वैषम्य वाटलं.

‘गुड!’

देशपांडे आता भरात आला.

‘सर, आपण अद्ययावत मशिन्स वापरतो परंतु त्याच्या क्षमतेचा संपूर्ण वापर होत नाही. याला कारण नीटसं ट्रेनिंग दिलं जात नाही. योग्य जागी योग्य माणसं नाहीत. आपल्या इथे एक फिटर आहे.त्याने कॉमर्स ची पदवी घेतली.कॉम्प्युटरचा डिप्लोमा घेतला, परंतु अद्यापि नट बोल्टस टाइट करतोय.त्याला प्रगतीची संधी मिळायला हवी.’

‘अजून काही?’

‘स्टोअर्सचं विकेंद्रिकरण व्हायला हवं.’

प्रधानांनी समाधानाने मान डोलावली..’

‘ओ.के. मला जरा व्यवस्थित रिपोर्ट द्या. तुमच्या सूचनांचा विचार होईल.’

देशपांडे उठला. अचानक प्रधानाना काहीतरी आठवलं.

‘बाय द वे, आज सकाळी मी पाहिलं, मेन गेटवर मोठ्या प्रमाणात हंगामी कामगार उभे होते. इतक्या मोठ्या संख्येने कंत्राटी कामगार कशाला लागतात?’

‘कारण कायम कामगार आपली कामे करीत नाहीत, म्हणून.’

‘ओह...’

प्रधानांपुढे आता चित्र स्पष्ट झाले होते.

महिन्याभरातच प्रधानांनी आपला रिपोर्ट एम.डी.ना सादर केला. बेलापूर विभागाच्या कार्यपद्धतीत अनेक बदल सुचविले.सध्याच्या व्यवस्थापनाचे दोष उघड केले.

त्यानंतर आठवडाभरातच बेलापूर युनिटच्या जी.एम.ची उचलबांगडी झाली. आणि संपूर्ण युनिटचा चार्ज प्रधानांना देण्यात आला. त्यांना आता स्वतःच सुचवलेले बदल अंमलात आणायचे होते. यश मिळालं तर पुढचं प्रमोशन निश्चित होतं.

निघतांना जी.एम.एकच वाक्य बोलले–

‘प्रधान, तुमचा स्टडी वगैरे सर्व पेपरवर योग्य आहे, परंतु माणसांची मानसिकता; तिचं काय? ...बेस्ट लक!’


● ● ●

बेलापूर युनिटचा चार्ज घेतल्यानंतर प्रधानांनी प्रथम एक क्वालिटी सेल सुरू केला.देशपांडेना त्याचं प्रमुख केलं.

काही इंजिनीअर्स हाताशी दिले.

क्वालिटी सेल सुरू झाल्यावर सुरुवातीला थोडासा विरोध झाला. परंतु फारसे बिघडले नाही. टाइम स्टडीसाठी आधुनिक पद्धती वापरल्या जात होत्या. योग्य पद्धतीने त्याचं काम सुरू होतं.

इकडे प्रधानांनी कामगारांना शिस्तीचा बडगा दाखवायला सुरुवात केली. त्यांनी गेटवर कार्डपंचिंग मशीन बसवलं. उशीर करणाऱ्या कामगारांच्या हजेरी बुकात लेटमार्क पडू लागला.



कामगारांना शिस्त पाळण्याची कडक शब्दांत ताकीद दिली गेली. कॅन्टिनच्या वेळा काटेकोरपणे पाळण्याच्या ऑर्डर्स सुपरवायझर्सना गेल्या.

'डिसिप्लीन' हा एकच शब्द प्रधान मॅनेजर्सच्या कानात ओरडत होते. कामचुकार माणसं शोधून काढा. जे ऐकणार नाहीत त्यांना मेमो द्या. पथम टुकार ग्रुप लीडर्सना पकडा.

प्रधान आक्रमक झाल्यावर कामगारांमधलं वातावरण-देखील तापलं. पत्रकं निघू लागली. लहानसहान गोष्टींवरून सुपरवायझर्सशी नडानडी होत होती. कॅन्टिनचा वडा त्यांना आता बेचव लागत होता. युनियन लीडर डिसोझा, लीगल अॅडव्हायझर्सना भेटत होता. परंतु काहीच निष्पन्न होत नव्हतं, कारण प्रधान सर्व गोष्टी कायद्याच्या कक्षेत राहूनच करत होते. हरकत नेमकी कोणत्या गोष्टीला घेणार, हा प्रश्न होता.

एव्हाना देशपांडेच्या क्वालिटी सेलचा अभ्यासदेखील पूर्ण झाला. त्यांनी कामाच्या पद्धतीत सुधारणा सांगितल्या होत्या.

हंगामी कामगारांची संख्या निम्म्याने कमी होणार होती. सर्वात कडी म्हणजे काही कामे बाहेरून करून घ्यावी असे सुचवले हाते. त्यामुळे खर्च कमी होणार होत. ही व्यवस्था अमलात आणली तर सुमारे शंभर कामगार अतिरिक्त होणार होते. एक इन्सेन्टिव्ह स्कीम देखील सुचविण्यात आली होती.

देशपांडेंचा रिपोर्ट वाचल्यानंतर प्रधान आनंदले. हे सगळं प्रत्यक्षात उतरलं तर सुमारे एक कोटीची बचत होती. बस्स! फक्त काळजीपूर्वक पावले उचलायला हवीत. बुद्धिबळाचा डाव नीट खेळायला हवा.

प्रधानांनी सर्व डिव्हिजन हेडस्ची मीटिंग बोलावली आणि देशपांडेचा अहवाल त्यांच्या समोर ठेवला.

वर्क्स मॅनेजर गोपालन चुळबुळ करू लागला.

'सर, युनियन ऑब्जेक्शन घेईल. '

'युनियनचा संबंध येतोच कुठे?'

'ते ठीक. परंतु डिसोझा पॉवरफुल आहे. आपल्याला लेबर अनरेस्टला तोंड द्यावं लागेल. ऑर्डर्स पेंडिंग राहतील. बाजारातील पत कमी होईल.' सेल्सवाल्यांनी आपलं मत दिलं.

'नो' प्रधान जरबेने म्हणाले. त्यांच्या आवाजात आत्मविश्वास होता.

'कंपनीची कार्यपद्धती मॅनेजमेंटने ठरवायची असते. युनियनने नाही. आपली स्पर्धा आता मल्टिनॅशनल कंपन्यांशी आहे. इथून पुढे 'वाजवी किंमत आणि उत्तम दर्जा' हेच सूत्र असेल. तेव्हा अवास्तव खर्च टाळावे लगतील. कार्यक्षमता वाढवावी लागेल. कामचुकारांना, अकार्यक्षम व्यक्तीला या नव्या व्यवस्थेत स्थान नाही. '

त्या नंतर त्यांनी एच . आर च्या स्वामींकडे नजर टाकली.

'मि. स्वामी, जे कामगार सातत्याने दांड्या मारता आहेत त्यांना मेमो द्या.'

'सर, त्यातले काही आजारी आहेत. '

'जे कामगार मेडिकली अनफिट आहेत त्यांना कायद्यानुसार रक्कम द्या आणि त्यांचा निरोप घ्या. सगळ्यांना कायम पोसायला इथे काही कंपनीने अन्नछत्र उघडलेले नाही. एनी वे, शंभर कामगार अतिरिक्त आहेत. एखादी व्ही. आर. एस. स्कीम आणावी लागेल. '

प्रधानांनी चौफेर नजर फिरवली. सर्वजण गप होते. वर्क्स मॅनेजर गोपालन तर हादरलाच होता.

'गोपालन, कॉण्ट्रक्ट लेबरचा पुन्हा एकदा आढावा घ्या. कायम कामगारांनी त्यांना नेमून दिलेली कामे केलीच पाहिजेत. जे काम तात्पुरत्या स्वरूपाचं आहे त्यासाठीच फक्त हंगामी कामगार असतील. जे काम करणार नाहीत त्यांना शो कॉज द्या.'

प्रधान काही काळ शांत राहिले.

'बाय द वे, कुशल आणि आज्ञाधारक कामगारांसाठी एक बक्षीस योजनादेखील आपण राबवणार आहोत. कार्यक्षम माणसाला त्याचा मोबदला मिळेलच. एनी डिफिकल्टीज?'

कुणीच काही बोललं नाही.

'मला रिझल्टस् हवेत. जे रिझल्टस् देणार नाहीत, त्यांना कंपनीचे दरवाजे उघडे असतील. ओ. के?'

मीटिंग संपली. सगळे उठले. प्रधानांनी एच. आर. च्या स्वामीला खुणेनेच थांबवलं.

'स्वामी, मी लहानपणी पेशवााईचा इतिहास शिकलो होतो. तुमच्याकडे साउथला तो शिकवतात की नाही, ते मला माहिती नाही. परंतु त्यात थोरल्या बाजीरावाच्या तोंडी एक वाक्य होतं 'घाव मुळावर घाला, फांद्या आपोआप खाली पदतील. '

नंतर त्यांनी स्वामींकडे रोखून पाहिले आणि म्हणाले.

'मला डिसोझाची संपूर्ण माहिती हवी आहे.'

अपेक्षेप्रमाणे प्रधानांची आणि डिसोझांची चकमक लगेचच झाली.

एके दिवशी डिसोझा तणतणतच प्रधानांच्या केबिनमध्ये शिरला. बरोबर चौघे होते.

'सर, आम्हाला ही तुमची बक्षीस योजना मान्य नाही.'

'कोण तुम्ही?' फाईलमधून डोकं न काढता प्रधानांनी विचारलं.

'मी मान्यताप्राप्त युनियनचा सेक्रेटरी म्हणून बोलतो आहे.'

'येस',

'ही योजना म्हणजे कामगारांमधे दुही माजवण्याचा प्रकार आहे.'

'चांगल्या बक्षिसी देणं हे वाईट कसं असू शकतं?'

'त्यातली मेख मी बरोबर जाणतो. चमचे लोक तयार करण्याची ही योजना आहे.'

'ठीक आहे. तुम्ही कामगार कोर्टात आव्हान देऊ शकता.'

'तेवढे आम्ही मूर्ख नाही. मॅनेजमेंटच्या या वृत्तीचा मी निषेध करतो.'

'काम करण्याच्या वृत्तीचा. 'खवचटपणाने प्रधान म्हणाले.

'अंहं! चाटुगिरीला प्राधान्य देण्याच्या.' तेवढ्याच तडफेने डिसोझा म्हणाला.

'डिसोझा, माइण्ड युअर लँग्वेज.'

' 'युनियन' हे मान्य करणार नाही.'

'युनियनला काय मान्य होईल हे विचारायला मॅनेजमेंट आलेली नाही. यू मे गो नाऊ'

अपमानित होऊन डिसोझा बाहेर पडला.

'वन मिनिट...इथून पुढे अपॉईण्टमेण्ट घेतल्याशिवाय केबीनमधे पाऊल टाकायचं नाही. शिस्तीला धरून होणार नाही ते.'

डिसोझा निघून गेला. प्रधान विचार करू लागले. एक गोष्ट लक्षात आली, की डिसोझा सोडून दुसरं कोणीच बोललं नाही. म्हणजे युनियनची दुसरी फळी तयार नव्हती तर!

प्रधानांनी समोरचा इंटरकॉम उचलला आणि स्वामीला बोलावून घेतलं.

'स्वामी, थोड्या वेळापूर्वी डिसोझा इथे आला होता. तो इथे काय म्हणून आहे?

'तो इथे टर्नर आहे.'

'देन व्हाय ही लेफ्ट द मशीन?'

'सर, तो युनियन लीडर आहे. तो जनरल सेक्रेटरी आहे. तो काम करीत नाही.'

'व्हॉट...यू मीन ही कंपनी त्याला फुकट पोसते आहे. ते काही नाही. उद्या त्याला जॉब शेड्यूल द्या. नाही म्हणाला तर रिफ्युजल ऑफ वर्कची केस तयार करा.'

स्वामी केबीनच्या बाहेर पडला तेव्हा घामाने थबथबलेला होता.

युद्धाला आता सुरुवात होणार होती.

दुसऱ्या दिवशी स्वामीच्या अपेक्षेप्रमाणेच डिसोजाने जॉब शीट घ्यायला नकार दिला. लगेचच त्याला 'शो कॉज' देण्यात आली.

बातमी सर्वत्र पसरली. कामगार गटागटाने चर्चा करू लागले. तावातावाने बोलू लागले. वातावरण तापलं. अधून मधून घोषणाबाजी होऊ लागली. सुपरवायझर्स त्यांचे लक्ष बनले.

दोन दिवस हेच वातावरण होतं. उत्पादन झपाट्याने खाली आलं होतं. मॅनेजमेंटकडून मात्र काहीच हालचाल नव्हती. कामगार अधिकच चिडत होते.

तिसऱ्या दिवशी प्रधानांनी मॅनेजर्सची मीटिंग बोलावली. गोपालनने वर्कशॉपमधल्या अशांत परिस्थितीची कल्पना दिली. प्रधानांनी त्याकडे फारस लक्ष दिलं नाही.

डिसोजाने 'शो कॉज'ला उत्तर दिलं?' त्यांनी स्वामीला विचारलं.

'नो सर, त्याने ती नोटीस फाडून टाकली. '

'ओके! गिव्ह हिम चार्जशीट. त्याचबरोबर सस्पेन्शन ऑर्डरदेखील काढा. सस्पेन्शन अंडर पेंडिंग एन्क्वायरी.'

'पण सर, सिक्युरिटी...'

'कॉल पोलिस. गेटसमोर व्हॅन उभी करा. मी पोलिस स्टेशनशी बोललोय. '

एव्हढ्यात समोरचा फोन वाजला. स्वामीने तो उचलला. पलीकडे एम. डी. होते.

'सर. एम. डी...'

प्रधानांनी शांतपणे, अगदी हळू आवाजात एम. डी. ना कल्पना दिली.

'सर, नो प्रॉब्लेम. परिस्थिती आटोक्यात आहे. लेबर कमिशनरला अहवाल पाठवलाय. तुम्ही ते फक्त जरा लेबर मिनिस्टरांचं बघा. यस सर. . पोलिस फोर्स आहे. '

प्रधानांनी फोन ठेवला. नंतर स्वामीकडे वळून पाहात म्हणाले.

'ओ. के. यू कॅन गो अहेड'

डिसोजाला सस्पेन्शन दिलं तेव्हा कामगार घरी जाण्याच्या तयारीत होते. दिवसभराच्या तणावाने शरीर आणि मन दोन्ही थकलं होतं. संतापाची क्षीण लाट आली. परंतु बाहेर पोलिसांना पाहिल्यावर ते धास्तावले. 'बघू उद्या'असं म्हणत एकेकाने काढता पाय घेतला.

डिसोझाने पन्नास समर्थक जमवले आणि प्रधानांच्या केबीनसमोर गोंधळ घालायला सुरुवात केली. प्रधानांनी हा गोंधळ थोडा वेळ चालू दिला. नंतर बाहेर आले आणि जरबेने म्हणाले.

'प्रश्न डिसोझाचा आहे; तोच तेवढा आत येईल. उरलेल्यांनी निघून जायचंय नाहीतर पोलिसांच्या ताब्यात दिले जाईल.'

डिसोझाने इतरांकडे पाहिलं. कोणीच काही बोलत नव्हतं. शेवटी थोडा विचार करून डिसोझा केबीनमधे शिरला.

प्रधानांनी काही काळ डिसोझाला नुसतंच बसवून ठेवलं. फाइल्समधून डोकं वर काढलंच नाही. समोरच्या व्यक्तीचं खच्चीकरण करण्याच जुनंच तंत्र त्यांनी वापरलं.

थोड्या वेळाने त्यांनी मान वर केली. डिसोजा एखाद्या जखमी श्वापदासारखा दिसत होता.

'येस मि. डिसोझा, काय प्रॉब्लेम आहे?'

'मी लीडर आहे म्हणून मला टार्गेट केलं जातंय.'

'ठीक आहे. आपण रीतसर चौकशी करू.'

'आरोप तुम्हीच ठेवणार. चौकशी तुम्हीच करणार. चांगला न्याय आहे!'

'व्यवस्थाच तशी आहे. कामगार-कायद्यांना धरूनच आहे हे.'

'मला मान्य नाही.'

'तुला मान्य असण्याचा प्रश्न येतो कुठे?'

'आम्ही संपावर जाऊ.'

'संप बेकायदेशीर ठरेल. नंतर आम्ही लॉक आउट जाहीर करू. ऑर्डर्स काय, बाहेरूनदेखील पूर्ण करता येतील. आमची सहा महिने थांबायची तयारी आहे. तुझे कामगार थांबतील?'

डिसोझा गोंधळला.

'सगळेजण एकजात सुखवस्तू आहेत. त्यांना आंदोलनाची सवय नाही. आजच बघ, एकेक जण घरी पळाला. कुणी येत नाही रे. तुझा लढा तुलाच लढावा लागेल.'

डिसोझा चमकला. कुठेतरी विचारांचं चक्र सुरू झालं होतं.

'काय होईल सांगू तुला तुमच्या संपात फूट पडेल. पंधरा दिवसात तुमच्यातले काहीजण आमच्या संपर्कात येतील. तसे आत्ताच काही जण आमच्याजवळ आलेत. '

संशयाची पाल डिसोझाच्या मनात चुकचुली.

'काही दिवसांतच संपाचा बीमोड होईल. तू एकटाच कोर्टाच्या वाऱ्या करीत राहशील. थोड्याफार फरकाने सगळीकडे असंच घडतंय. तू लेबर कोर्टात फेरी मारशील तर तुझ्या लक्षात येईल. दोष माणसांचा नाही रे, परिस्थितीचा आहे. मुळात कामगार चळवळच इतिहासजमा होते आहे. रशियाचं सोडून दे पण डावे पक्षदेखील बंगालमधे हरलेच.'

डिसोझाची नजर खाली झुकली.

'एनी वे, क्वालिटी सेलच्या शिफारसीनुसार आपल्याला बरेच बदल करायचे आहेत. शंभर कामगार अतिरिक्त आहेत. काही कामगार मेडिकली अनफिट आहेत. त्यांचादेखील विचार करायचा आहे. सर्वांसाठी आपण व्हीआरएस योजना आपण राबवू. सगळ्यांचा आपण विचार करणार आहोत. '

प्रधान काही क्षण थांबले. त्यांनी डिसोझाकडे रोखून पाहिलं.

'तेव्हा व्हीआरएस घ्यायची की कोर्टाच्या चकरा मारायच्या हे तू ठरवायचंस. चॉईस इज यूअर्स. '

डिसोझा गंभीर झाला. त्याला आपलं गोव्यातलं घर आठवलं. म्हातारे आईवडील आठवले. एक पिशवी घेऊन तो पोटासाठी मुंबईत आला होता. आता पैसा एका झटक्यात मिळत असेल तर कशाला पाहिजे झंझट?

डिसोझाने स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली.

• • •

आपल्या नव्या कोऱ्या होंडा सिटीमधून प्रधान कॉर्पोरेट ऑफिसकडे निघाले होते. दुपारी दोनची वेळ असल्याने रस्त्यावर वाहनांची वर्दळ नव्हती. पावसाची रिपरिप मात्र सुरू होती.

प्रधान आज खुशीत होते. त्या खुशीत त्यांनी गाडी स्वतःच हाकायचं ठरवलं होतं. आज सकाळीच एम. डीं.च्या ऑफिसमधून बोलावणं आलं आणि मनात आनंदाचे तरंग उमटायला लागले. गेले सहा महिने त्यांनी घेतलल्या परिश्रमाचं चीज होणार होतं. बेलापूर युनिटची घडी व्यवस्थित बसली होती. उत्पादन वाढलं होतं. युनियन प्रभावहीन झाली होती.

या सगळ्याचा परिणाम म्हणजे एम. डी. खुश झाले होते. पगारवाढ, प्रमोशन सगळं निश्चितच मिळणार होतं. त्यांनी बेलापूर युनिटचा चार्ज घेतला तेव्हा त्यांना असिस्टंट जनरल मॅनेजरवरून डेप्युटी जनरल मॅनेजरचं पद देण्यात आलं. आज बहुधा एम. डी. आपल्याला जनरल मॅनेजर म्हणून रीतसर चार्ज देतील अशी प्रधानांना खात्री होती. ते बेलापूर युनिटच्या संदर्भात प्रधानांच्या आणखीही काही योजना होत्या. एका अमेरिकन



कंपनीशी कोलॅबरेशन करण्याची एक योजना जमल्यास आजच ते एम.डी.समोर मांडणार होते. बेलापूर युनिटच्या मोकळ्या जागेमधे एका अमेरिकन कंपनीला लागणारे यंत्राचे भाग पुरवण्याची ती योजना होती. त्या संबंधीचं पेपरवर्क तयार होतं.त्या फाइल्सदेखील त्यांनी बरोबर घेतल्या होत्या. बेलापूर युनिटकडे जागा आहे, क्षमता आहे, तेव्हा या युनिटने प्रगती केलीच पाहिजे.माणसाने नेहमीच प्रगतीचा ध्यास घेतला पाहिजे. नेतृत्वाने भविष्यातील प्रगतीच्या वाटा शोधल्या पाहिजेत.जनरल मॅनेजरचं लेटर आपल्या हातात आलं आणि बेलापूर युनिटचा रीतसर चार्ज मिळाला, की भविष्यातील या योजना आपण त्यांच्यासमोर मांडू. ते अधिकच खुश होतील. प्रधानांना वाटलं, हे असंच चालू राहिलं तर आपण लवकरच व्हाइस प्रेसिडेंटदेखील होऊ. परंतु त्या आधी या कोलॅबरेशनच्या निमित्ताने अमेरिका वारी निश्चितच होईल. एम.डी.नक्कीच आपल्याला अमेरिकेला पाठवतील. त्या देशपांडेला पाठवला तसा. बाकी तो देशपांडे नशीबवान म्हटला पाहिजे. किती लवकर अमेरिका वारी मिळाली! बेलापूर युनिटमध्ये उत्पादन वाढवण्यासाठी आधुनिक मशिनरी बसवण्याचा निर्णय झाला आणि ते तंत्रज्ञान शिकण्यासाठी बेटा अमेरिकेला गेला. मायक्रोप्रोसेसर्स बेस्ड कंट्रोल्स म्हणे. बरंचसं काम रोबोच करणार आहेत. देशपांडे टेक्नोक्रॅट आहे. आपण ॲडमिनिस्ट्रेशनवाले. परंतु हे देखील क्रेडिट आपलंच. कारण देशपांडे हा आपलाच फाईंड आहे. अर्थात एम.डी. हे सगळं जाणतात. योग्य आणि हुशार माणसांना मोटिव्हेट करणं हे मॅनेजरचंच स्कील नाही का?

महत्त्वाकांक्षेचे पंख लावून प्रधान आकाशात विहरत होते. त्या खुशीत कॉर्पोरेट ऑफिस केव्हा आलं ते त्यांना समजलंदेखील नाही.

हातातल्या फाइल्स सांभाळीत त्यांनी एम.डीं.च्या केबीनमधे प्रवेश केला.

'येस मि. प्रधान. गुड जॉब डन. वुई आर प्राउड ऑफ यू. या वर्षीच्या परफॉर्मन्स मॉनिटरिंग सिस्टिममध्ये या गोष्टींची दखल घेतली जाईलच.'

प्रधान किंचित चमकले. या वर्षीचा पीएमएस म्हणजे एप्रिलपर्यंत वाट बघायला हवी.अर्थात प्रधानांनी आपली नाराजी दर्शवली नाही.त्यांनी उसने हसू तोंडावर आणले.

'थँक यू सर'.

एम.डीं.नी नंतर हात पुढे केला आणि म्हणाले

'एनी वे, बेलापूर युनिटचा चार्ज तुम्ही देशपांड्यांना द्या. ॲन्ड यू गो बॅक टू युअर बान्द्रा डिव्हिजन.'

प्रधानांच्या पायांखालची वाळूच सरकली. म्हणजे... बेलापूर डिव्हिजनचा चार्ज त्यांच्या हातातून काढून घेतला होता. परंतु असं नेमकं काय घडलं? देशपांडेने काही बॅक बाइटिंग केलं का?...आपली माणसं म्हणायची आणि तेच घात करतात.ते लोक बघा, कसे लॉबिंग करतात.

प्रधानांनी हातातल्या फाइल्सशी चाळा केला.

'सर, बेलापूर डिव्हिजनच्या संदर्भात माझ्या काही योजना होत्या.'

एम. डीं. नी मान वर केली नाही.

'शो इट टू देशपांडे.'

'सर, तुम्हीच वेळ मिळेल तेव्हा...'

'ओके, टेल मी इन वन लाइन...'

'सर, मोकळ्या जागेत एक अमेरिकन कोलॅबरेशन.'

'नो! मोकळी जागा पुढेमागे बिल्डरना देऊ किंवा आपणच कन्स्ट्रक्शनमधे उतरू. इथे पॉवर शॉर्टेजच्या जमान्यात नवीन युनिट नको.'

एम.डी. किंचित हसले.

'यू नो. संपूर्ण बेलापूर युनिटचं आपण आधुनिकीकरण करणार आहोत. नवीन मशिनरी मागवणार आहोत. देशपांडेने खूप छान योजना माझ्यासमोर मांडली.'

प्रधानांच्या लक्षात हळूहळू एकेक गोष्टी येऊ लागल्या. म्हणजे आपल्या नकळत देशपांडे एम.डी.च्या संपर्कात होता तर.कदाचित एम.डी.च त्याच्याशी संधान बांधून होते.

एम.डी.पुढे सांगत होते.

'यू नो, उत्पादनात लक्षणीय वाढ होईल. बेलापूर युनिटचा चार्ज त्या दृष्टीने एका टेक्नोक्रॅटच्या हातात देणं गरजेचं होतं'

प्रधान हळू आवाजात पुटपुटले

'सर, बट...'

एम.डीं.नी रोखून पाहिलं आणि म्हणाले

'टेक इट इझी. चर्चिल वॉज रिक्वायर्ड ओन्ली फॉर वॉर'

प्रधानांनी मान डोलावली.

प्रधानांनी आपली गाडी महामार्गावर वळवली. मनात विचारांचा गोंधळ होता. त्यांना एम.डी.चं म्हणणं पटलं होतं आणि नव्हतंही.

आफ्टर ऑल, इट वॉज ऑल इन द गेम.

महामार्गावरून अनेक गाड्या धावत होत्या. काही झपाट्याने पुढे जात होत्या. तर काही मागे पडत होत्या.

**– डी.व्ही.कुळकर्णी**
७/६ सचिन सोसायटी,
मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९२२३२६३१६९
dvkulkarni1956@gmail.com

# मूकपटात शेक्सपीयर

विजय पाडळकर

एका अभ्यासकानुसार, विसाव्या शतकाच्या पहिल्या तीन दशकांत, म्हणजे चित्रपट बोलू लागेपर्यंत जवळजवळ एक लाख पन्नास हजार मूकपट तयार झाले. त्यापैकी साधारणपणे पाचशे चित्रपट शेक्सपीयरच्या नाटकांवर आधारित होते. चित्रपटकलेला प्रतिष्ठा मिळवून देण्याची इच्छा होणे स्वाभाविक होते. यामुळे निर्माते/दिग्दर्शक शेक्सपीयरकडे वळले असा निष्कर्ष काढता येत नाही, पण प्रेक्षकांना काहीतरी दर्जेदार दाखवावे असे त्यांना निश्चित वाटले असणार आणि ब्रिटिश माणसाला शेक्सपीयरहून दर्जेदार काय आठवणार?

**शे**क्सपीयरच्या नाटकांवर आधारित चित्रपटांची सुरुवात १८९९ साली झाली असे सर्वसाधारणपणे मानले जाते. चित्रपटकलेचा जन्म होऊन यावेळी चार वर्षेही झाली नव्हती. हे म्हणजे मारुतीने जन्मल्याबरोबर सूर्याला पकडण्यासाठी उड्डाण करण्यासारखे होते. सुरुवातीला चित्रपट हे केवळ एक मिनिट लांबीचे असत. एखादे दृश्य, फार तर एखादी कल्पना त्या चित्रपटातून मांडता येई. अशा वेळी शेक्सपीयरच्या नाटकांचा सिनेमासाठी विचार करणे विलक्षणच होते. ही नवी कला काय करू शकते, काय दाखवू शकते याचा थोडाफार अंदाज, त्या काळातील दिग्दर्शकांना हळूहळू येऊ लागला होता. अर्थात तिच्या अफाट सामर्थ्याचे आकलन आताच होणे शक्य नव्हते. तरी 'चित्रीकरणाचे' वेगवेगळे प्रयोग करून पाहण्यास त्यांनी सुरू केले होतेच. 'ब्रिटिश म्युटोस्कोप अँड बायोस्कोप कं.'ने १८९९ साली असाच एक प्रयोग करून पाहिला. 'किंग जॉन' या शेक्सपीयरच्या नाटकातील काही लहान प्रवेशांचे चित्रीकरण लंडन येथे केले गेले. या प्रवेशांतील मुख्य अभिनेता-दिग्दर्शक सर हर्बर्ट ट्री हा होता. ह्या प्रवेशांपैकी फक्त एकच आज शिल्लक राहिला आहे. हा 'किंग जॉन'च्या मृत्यूचा प्रवेश होता. 'किंग जॉन मरण पावला पण त्याने शेक्सपीयरच्या नाटकांचा एक प्रबळ प्रतिस्पर्धी जन्माला घातला' असे या संदर्भात केनेथ रोथवेलने लिहिले आहे. गमतीची गोष्ट म्हणजे, ह्या 'प्रतिस्पर्ध्या'चा उपयोग मूळ नाटकाची जाहिरात करण्यासाठी केला गेला होता.

चित्रपटकलेच्या सुरुवातीच्या काळात ह्या नव्या कलेकडे केवळ मनोरंजन म्हणूनच पाहिले जात होते. शिवाय हे मनोरंजनही 'खालच्या दर्जाचेच' होते, ही गोष्ट त्या काळी तयार झालेल्या काही लघुचित्रपटांच्या नावावरून ध्यानात येते. 'A Parisian Lady's Bath', 'Undressing of a model', 'Why marie Blue out the Light' अशी नावेही त्या चित्रपटात काय असेल याची कल्पना देण्यास पुरेशी आहेत. चित्रपट हे 'Working class entertainment' म्हणून इंग्लंडमध्ये ओळखले जात होते. या छचोर सिनेमांचे एवढे पीक आले होते, की इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये देखील त्यांची चर्चा झाली. हे सिनेमे इंग्रज नैतिकतेला पॅरिसच्या पातळीवर

आणून ठेवतील असा सूर त्या चर्चेत काढला गेला. अशा वेळी काही मंडळींना चित्रपटकलेला प्रतिष्ठा मिळवून देण्याची इच्छा होणे स्वाभाविक होते. अर्थात यामुळे निर्माते/दिग्दर्शक शेक्सपीयरकडे वळले असा निष्कर्ष काढता येत नाही, पण प्रेक्षकांना काहीतरी दर्जेदार दाखवावे असे त्यांना निश्चित वाटले असणार आणि ब्रिटिश माणसाला शेक्सपीयरहून दर्जेदार काय आठवणार? याच कारणासाठी शेक्सपीयरच्या नाटकांवर जे लघुचित्रपट निर्माण झाले, त्यात नाट्यापेक्षा नैतिकतेवरच जास्त भर दिला गेला होता.

फ्रान्स ही तर चित्रपटांची जन्मभूमी. तेथेही लवकरच, म्हणजे १९०० साली शेक्सपीयरच्या चित्रीकरणास सुरुवात झाली. 'फोनो सिनेमा थिएटर'ने शेक्सपीयरच्या 'हॅम्लेट' या नाटकातील काही दृश्ये चित्रित केली. या दृश्यांचे वैशिष्ट्य म्हणजे यात सारा बेर्नहार्ट या नटीने हॅम्लेटची भूमिका केली होती. साराने यापूर्वी अनेक वेळा 'हॅम्लेट' रंगमंचावर सादर केला होता, त्यामुळे तिचा चित्रपटातील अवतारही प्रेक्षकांना आवडला. ह्या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सारा त्यात तलवारीचे द्वंद्वयुद्ध खेळली होती आणि या युद्धातील शस्त्रांच्या खणाखणीला पार्श्वध्वनीची जोड दिली गेली होती. लघुपट तयार करण्यासाठी फारसा वेळ लागत नसल्यामुळे सुरुवातीला त्यांचे अमाप पीक आले. एका अभ्यासकानुसार, विसाव्या शतकाच्या पहिल्या तीन दशकांत, म्हणजे चित्रपट बोलू लागेपर्यंत जवळजवळ एक लाख पन्नास हजार मूकपट तयार झाले. त्यापैकी साधारणपणे पाचशे शेक्सपीयरच्या नाटकांवर आधारित होते. शेक्सपीयर आधारित चित्रपटांच्या वाढत्या मागणीची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

एक : प्रेक्षकांना कथानक माहीत असल्यामुळे ही कहाणी नव्या रूपात 'कशी दिसते' या कुतूहलापोटी ते सिनेमाकडे वळत.

दोन : शेक्सपीयरच्या नावामुळेच चित्रपटाला प्रतिष्ठा मिळे.

तीन : ही नाटके जनतेची मालमत्ता (public domain) असल्यामुळे मानधन, कॉपीराइट वगैरेचा काही प्रश्नच नव्हता.

अशा तऱ्हेने इंग्लंडमध्ये शेक्सपीयरच्या नाटकांचा चित्रपटासाठी विचार सुरू झाल्यावर फ्रान्स मागे राहणे शक्य नव्हते. अमेरिकेनेदेखील लवकरच फ्रान्सची नक्कल करावयास सुरुवात केली. इटलीमध्येही नाटकांचा, त्यातील प्रवेशांचा विचार चित्रपटासाठी कच्चा माल म्हणून होण्यास सुरुवात झाली. ट्रिक फोटोग्राफीचा ज्याने शोध लावला, त्या जॉर्ज मेलिए याने १९०७ सालच्या 'हॅम्लेट'मध्ये प्रमुख भूमिका केली. चित्रपट जसे मोठ्या प्रमाणावर तयार होऊ लागले तशी अधिक चित्रपटगृहांची गरज भासू लागली. अमेरिकेच्या भांडवलशाही जीवन पद्धतीने यावर चटकन उपाय शोधून काढला. त्यांनी लगेच थिएटर्स बांधायला सुरू केले. या लहान चित्रपटगृहांना 'निकोलोडिओन' असे म्हटले जाई. कारण त्यांचे तिकीट फक्त एक 'निकेल' एवढे होते. १९०७



साली उत्तर अमेरिकेतील अशा थिएटर्सची संख्या तीन हजारांपर्यंत पोचली. काही जाहिरातीत त्यांचा एक उल्लेख 'इलेक्ट्रिक थिएटर' असाही केला जाई. केनेथ रोसवालने त्याच्या 'History of Shakespeare on Screen' या पुस्तकात या चित्रपटगृहांचे नमुनेदार वर्णन केले आहे. तो लिहितो– 'अशी थिएटर्स सुरू करण्यास फारसे काहीच लागत नसे. सुमारे दोनशे ते चारशे खुर्च्या बसतील एवढा रिकामा हॉल, खुर्च्या, फोनोग्राफ, एक पडदा, एक ऑपरेटर, एक कॅशिअर, एक पियानो आणि एक मॅनेजर, बस्स!' त्यामुळे अभिजन या प्रकाराकडे तुच्छतेच्याच नजरेने पाहत. 'हा नवीन प्रकार समाजावरील चर्चचा पगडा नष्ट करील' अशी भीती अनेकजण व्यक्त करू लागले होते. रेव्हरंड गुडेल याने एडिसनच्या 'नीरो ॲन्ड बर्निंग ऑफ रोम' या सिनेमावर बंदी घातली. कारण 'त्यात दाखवलेल्या हिंसेचे मुलांवर वाईट परिणाम होतील.' नाटकाच्या थिएटर्सचे मालक चित्रपटाच्या वाढत्या प्रभावाबद्दल चिंता व्यक्त करीत होतेच. त्यांनी धर्मगुरूंना हाताशी धरून आता आघाडी उघडली. याचा परिणाम असा झाला, की न्यू यॉर्कचा मेयर मॅक क्लीलान याने १९०८च्या ख्रिसमस इव्हच्या मुहूर्तावर एका फटक्यात तीनशे चित्रपटगृहे बंद करून टाकली.

१९०८ सालीच न्यू यॉर्कची 'विटाग्राफ कंपनी' चित्रपटाच्या व्यवसायात उतरली व तिने शेक्सपीयरच्या नाटकावर आधारित एका रिळाचे सुमारे दहा मिनिटांचे चित्रपट काढणे सुरू केले. सिनेमाला प्रतिष्ठा मिळावी म्हणून या कंपनीने थेट शेक्सपीयरलाच आवाहन केले. १९०८ ते १२ च्या दरम्यान या कंपनीने शेक्सपीयरच्या नाटकावर आधारित असे अकरा चित्रपट निर्माण केले. मूकपटांच्या जमान्यात तयार झालेले बहुसंख्य चित्रपट आज नाहीसे झाले असले तरी काही अजून सांभाळले गेले आहेत. १९०८ साली निर्माण झालेल्या 'रोमिओ ॲन्ड ज्युलिएट' या ब्लॅकटन दिग्दर्शित चित्रपटाने, या कलेचा विकास करण्याच्या

दृष्टीने काही महत्त्वपूर्ण प्रयोग केले. या चित्रपटाचा मुख्य उद्देश ही नवी कला नाटकापेक्षा कशी वेगळी आहे हे दाखवणे हा तर होताच, शिवाय यापूर्वी जसे नाटकाचे 'चित्रांकन' केले जात असे, तसे न करता, स्वतंत्रपणे चित्रपटासाठी काही दृश्ये तयार करण्यावर, ती चित्रित करण्यावर त्यात भर दिला गेला होता.

पेरिस्टोचा 'टेम्पेस्ट' (१९०८) हा चित्रपटदेखील तंत्राच्या प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जातो. या चित्रपटातील 'एरियल' हे पात्र नायकाला कधी दिसते तर कधी दिसत नाही, अगदी त्याचप्रमाणे ते प्रेक्षकाला कधी दिसते, कधी दिसत नाही. नाटकात अशी रचना करता येणे अशक्य होते. चित्रपट एकाच वेळी अनेक 'दृष्टिकोन' (point of view and perspectives) दाखवू शकतो, हे या सिनेमातून प्रभावीपणे समोर आले. पंधरा मिनिटांच्या ह्या चित्रपटात कॅमेऱ्याचे सतरा वेगवेगळे सेटअप होते.

विटाग्राफ कंपनीने पुढील पाच-सहा वर्षांतच 'किंगलिअर', 'मिड समर नाइट ड्रीम्स', 'ट्वेल्थ नाइट' या शेक्सपीयरच्या नाटकावर आधारित लघुपट तयार केले. १९१६ साली सर हर्बर्ट ट्री याने, 'मॅकबेथ' नाटकावर चित्रपट तयार करत असताना एका मुलाखतीत पुढील उद्‌गार काढले-

'हे फार विलक्षण आहे. शेक्सपीयरच्या नाटकात ज्या गोष्टी दाखवता येणे अशक्य आहे अशा कितीतरी गोष्टी सिनेमा दाखवू शकतो. दृश्यात्मक शक्यता कितीतरी सुंदर तऱ्हेने व विस्मयकारकपणे विकास पावू शकतात.'

विटाग्राफ कंपनीच्या संदर्भात आणखी एक मजेशीर गोष्ट नोंदवण्यासारखी आहे. कंपनीने तयार केलेल्या 'मॅकबेथ' (१९०८) या सिनेमातील तीन रक्तरंजित दृश्ये - 'डंकनचा खून', 'रक्तरंजित चाकूचे नर्तन', 'मॅकबेथ-मॅकडफचे युद्ध' - सेन्सॉरने कापून टाकली. शिकागो पोलिस प्रमुख जोएल स्मिथने असे म्हटल्याचे सांगितले जाते, की 'शेक्सपीयरचे ठीक आहे. तो टीकेच्या पलीकडे आहे. पण पडद्यावर हे हिंसेचे थैमान नको.' यावरून सामान्य माणसाच्या मनातील 'लेखकाचे स्थान' व त्याच्या तुलनेत 'चित्रपटाचे स्थान' यावर उत्तम प्रकाश पडतो.

'मिडसमर नाइटस् ड्रीम' आणि 'ट्वेल्थ नाइट' या चित्रपटांतील अनेक दृश्ये स्टुडिओच्या बाहेर, बागेत चित्रित करण्यात आली होती व त्यामुळे चित्रपटांच्या देखणेपणात व दृश्यात्मक गुणवत्तेत भर पडली होती. चित्रपट हा आता हळुहळू sophistication कडे जास्त लक्ष देऊ लागला होता. चित्रपटकलेचा जसा विकास होऊ लागला तसतसा ह्या कलेच्या अभ्यासकांचा, समीक्षकांचा व टीकाकारांचाही उदय होऊ लागला. डब्ल्यू. एस. बुश हा सिनेमाच्या आद्य समीक्षकांपैकी एक. तो शेक्सपीयरचाही उत्तम अभ्यासक होता. 'मूव्हिंग पिक्चर वर्ल्ड' आणि 'बायोस्कोप' अशा नियतकालिकांत त्याने चित्रपटविषयक अभ्यासपूर्ण लेखन केले आहे. तो चित्रपटकलेचा खंदा पाठीराखा होता. ही कला केवळ गरिबांच्या मनोरंजनासाठी निर्माण झाली आहे असे मानणे चूक आहे, असे त्याचे मत होते. 'There is no play of Shakespeare that can not be told in moving pictures' असे प्रतिपादन करताना, 'The 222notion that Shakespeare is too deep' is altogether wrong' असेही मत त्याने व्यक्त केले होते.

शेक्सपीयर पटांच्या इतिहासात विटाग्राफ कंपनीचे फार महत्त्वाचे स्थान आहे. मात्र प्रेक्षकांचा फारसा पाठिंबा न मिळाल्यामुळे कंपनीच्या मालकांना ती विकून टाकणे भाग पडले. 'वॉर्नर ब्रदर्स' या, त्याकाळी भरभराटीस येऊ लागलेल्या चित्रपट निर्मात्यांनी १९२४ साली विटाग्राफ कंपनी विकत घेतली आणि तिचे आपल्यात विलिनीकरण करून घेतले.

जेम्स कीने या दिग्दर्शकाचा 'द लाइफ ॲन्ड डेथ ऑफ किंग रिचर्ड-३' हा शेक्सपीयरच्या नाटकावर आधारित, पहिला, पूर्ण लांबीचा चित्रपट मानला जातो. हा चित्रपट १९१२ साली प्रदर्शित झाला होता, मात्र अनेक वर्षांपर्यंत, इतर असंख्य मूकपटांप्रमाणे, तो हरवला आहे असे मानले जात होते. पण विल्यम बफम या नावाच्या संग्राहकाने त्या चित्रपटाची एक प्रिंट जपून ठेवली होती, ती त्याने १९९६ मध्ये अमेरिकन फिल्म इन्स्टिट्यूटला भेट दिली. त्या काळी ही एक मोठीच महत्त्वपूर्ण बातमी बनली होती. अमेरिकन फिल्म इन्स्टिट्यूटने तिच्यावर संस्कार करून, तिला नवीन पार्श्वसंगीत देऊन अभ्यासकांसाठी ती उपलब्ध करून दिली.

सुमारे ५३ मिनिटांच्या या चित्रपटात नाटकाची कथा बसवताना, जेम्स कीनेला मूळ नाटकात प्रचंड काटछाट करावी लागली. मागरिट, होस्टिंग, रिव्हर्स अशा अनेक महत्त्वाच्या व्यक्तिरेखा गाळून टाकल्या गेल्या. मूळ नाटकातील राजकीय चर्चा, त्यांचे संदर्भ वगैरेही गाळण्यात आले. शिवाय घटनाप्रधान मांडणी असल्यामुळे नाटकातील मानसशास्त्रीय गुंतागुंत आणि तत्त्वचर्चाही अर्थातच गाळली होती.

जेम्स कीनेने जवळजवळ सारा चित्रपट मिडियम आणि लाँगशॉटमध्ये चित्रित केला आहे. क्लोजअप फारसे नाहीतच. अभिनयाची शैलीदेखील आज पाहताना खूपच बाळबोध वाटते. उदाहरणार्थ, दु:ख व्यक्त करण्यासाठी छातीवर हात मारणे/फिरवणे किंवा रागाने पाहताना हातावर हात चोळणे वगैरे. या चित्रपटात रिचर्डची भूमिका फ्रेडरिक वार्डे याने केली होती. त्याने लिहिले आहे- 'जेम्स कीने नटांना केव्हा आनंदी दिसायचे, केव्हा दु:खी, केव्हा रागीट दिसायचे तर केव्हा क्रोधाने ओरडायचे एवढेच सांगत असे. मात्र असे का करावयाचे याबद्दल तो काहीच बोलायचा नाही.'

नाटकाच्या शैलीचा परिणाम सिनेदिग्दर्शकावर त्याकाळी

खूपच होता. या चित्रपटाच्या सुरुवातीला व शेवटी प्रमुख अभिनेता वार्डे त्याच्या नेहमीच्या आधुनिक पोशाखात पडद्यावर येतो व नाटकातल्याप्रमाणे प्रेक्षकांना अभिवादन करतो. आज हा चित्रपट केवळ एक ऐतिहासिक महत्त्वाचा म्हणूनच आपण पाहू शकतो. मात्र त्याकाळी त्याचे फार कौतुक झाले. एका वृत्तपत्रात तर त्याच्याबद्दल लिहून आले– 'The best combination moving picture entertainment yet brought to this city... Truely wonderful.'

विटाग्राफ कंपनीप्रमाणे 'थॅनहाऊसर' या कंपनीनेही या कालखंडात शेक्सपीयरच्या नाटकांवर आधारित अनेक मूकपट निर्माण केले. या कंपनीने तयार केलेला १९१६ सालचा 'किंग लिअर' तर विटाग्राफ कंपनीच्या 'किंग लिअर'पेक्षा खूपच सरस होता. योगायोगाने १९१६ साली शेक्सपीयरच्या मृत्यूला तीनशे वर्षे पूर्ण झाली होती. हे निमित्त साधून त्यावर्षी त्याच्या नाटकांवर अनेक मूकपट निर्माण झाले. इंग्लंड, फ्रान्स व अमेरिकेप्रमाणेच ज्या ज्या देशांत चित्रपटांची कला मूळ धरू लागली होती, त्या त्या देशात शेक्सीपयरच्या नाटकावर आधारित चित्रपट तयार होऊ लागले. शेक्सपीयरचे आकर्षण सर्वकालीन व सार्वत्रिक असल्याचा हा भक्कम पुरावा होता. इटलीमधील 'सोसायटी इटालिआना' या कंपनीने १९०८ साली व लगेच १९१० साली असे 'हॅम्लेट' या नाटकावर आधारित दोन स्वतंत्र चित्रपट तयार केले. हे चित्रपट प्रत्येकी एक रीळ (९ ते १०) मिनिटे लांबीचे होते. इटालियन मूकपटांचे वैशिष्ट्य म्हणजे 'दृश्यात्मकतेकडे दिलेले विशेष ध्यान' हे होते. हे चित्रपट पाश्चात्य चित्रपटांच्या तुलनेत अधिक देखणे होते. 'फिल्म डी आर्ट इटालिया' या कंपनीने १९०१ साली 'ऑथेल्लो', १९१० साली 'मर्चंट ऑफ व्हेनिस' आणि १९११ साली 'रोमिओ ज्युलिएट' अशा तीन शेक्सपीयरपटांची निर्मिती केली. हे चित्रपट इटलीत खूपच लोकप्रिय ठरले. इटालियन चित्रपट दृश्यात्मक सौंदर्याकडे किती लक्ष देत हे १९१४ साली ॲम्ब्रिसिओ या कंपनीने तयार केलेल्या 'ऑथेल्लो'च्या जाहिरातीतूनही स्पष्ट दिसून येते. हा चित्रपट जेव्हा अमेरिकेत प्रदर्शित झाला तेव्हा अमेरिकन ट्रेड जर्नलमध्ये एक संपूर्ण पानभर जाहिरात करण्यात आली होती आणि या जाहिरातीत चित्रपटाच्या इतर कोणत्याही अंगापेक्षा छायाचित्रणाला जास्त महत्त्व दिले गेले होते. या चित्रपटात दाखवलेले व्हेनिसचे सृष्टीसौंदर्य किती अप्रतिम आहे, नयनमनोहर आहे याचेच वर्णन जाहिरातीत केले गेले होते – 'सुयोग्य अशा पार्श्वभूमीवर आणि वातावरणात तयार झालेला पहिलाच शेक्सपीयरपट! नाटककारालाही तो आवडला असता!'

जर्मनीमध्येही शेक्सपीयरच्या नाटकावर चित्रपट बनवण्याचे तुरळक का होईना, पण प्रयत्न झाले. १९२० सालचा 'हॅम्लेट' हा त्यापैकी एक अत्यंत महत्त्वाचा चित्रपट. शेक्सपीयरपटांच्या इतिहासात त्याचे खास स्थान आहे. हा चित्रपट स्वेन्ड गेड याने दिग्दर्शित केला होता व त्यात हॅम्लेटची प्रमुख भूमिका ॲस्टा निअेलसन या अभिनेत्रीने केली होती. ॲस्टा निअेलसनला मूकपटांच्या जमान्यातील असामान्य युरोपीयन अभिनेत्री मानले जाते. तिने स्त्री भूमिकांबरोबरच अनेक नाटकांत पुरुष भूमिकाही केल्या होत्या. या चित्रपटात काम करण्यापूर्वी तिची रंगमंचावरील 'हॅम्लेट'ची भूमिका खूप गाजली होती.

एकोणिसाव्या शतकातील शेक्सपीयरचा एक अमेरिकन अभ्यासक एडवर्ड विनिंग याने, हॅम्लेट हा मुळात पुरुषाचा वेष घातलेली स्त्री असावा अशी कल्पना मांडली होती. १८८१ साली त्याने 'The Mistry of Hamlet' हे पुस्तक लिहून त्यात आपल्या मताच्या समर्थनार्थ अनेक पुरावे दिले होते. हॅम्लेटचे विचार, त्याची कोणताही निर्णय सहजी न घेता येण्याची प्रवृत्ती हे स्त्रीत्वाचे द्योतक आहेत, असे त्याचे मत होते. विनिंगच्या ह्या थिअरीच्या प्रभावाखाली अनेक स्त्रियांनी नाटकात हॅम्लेटच्या भूमिका साकारल्या आहेत.

स्टेन्ड गेडने त्याच्या 'हॅम्लेट' मूकपटासाठी विनिंगचीच भूमिका स्वीकारली. ह्या चित्रपटात असे मांडले होते, की जेव्हा राणी गर्टरूडने मुलीला जन्म दिला त्यावेळी राजा एका लढाईत गंभीर जखमी झाला होता. त्याच्या जीवाला असणारा धोका आणि परक्यांचा सिंहासनावर असलेला डोळा ध्यानात घेऊन, धूर्त राणीने आपल्याला मुलगा झाल्याचे जाहीर केले. पण पुढे राजा वाचला. राणीने आपले असत्य लपवण्यासाठी आता त्या मुलीला मुलासारखेच वाढवले वगैरे, वगैरे... या चित्रपटातील ॲस्ट्राच्या भूमिकेचे, तिच्या तलवारबाजीचे खूप कौतुक झाले.




त्या काळच्या अनेक उदयोन्मुख नट्यांवर तिचा खूप प्रभाव होता. ग्रेटा गार्बोने तर 'मी सारे काही तिच्याकडूनच शिकले' असे प्रशंसोद्गार काढले आहेत.

१९२३ साली पीटर पॉल फेल्नर या जर्मन दिग्दर्शकाने शेक्सपीयरच्या 'द मर्चंट ऑफ व्हेनिस' या नाटकावर 'डॉन कुफमन व्हॉन व्हेडिंग' या नावाचा चित्रपट तयार केला. तो इंग्लंडमध्ये 'द ज्यू ऑफ मेस्त्री' या नावाने प्रदर्शित करण्यात आला. कदाचित शेक्सपीयरच्या नावामुळे दबून जाऊन प्रेक्षक सिनेमापासून दूर राहतील म्हणून हा बदल करण्यात आला. मूळ चित्रपट १०३ मिनिटे लांबीचा होता पण त्याची इंग्रजी आवृत्ती मात्र फक्त ७१ मिनिटांची होती. शेक्सपीयरच्या मूळ नाटकाचा एक स्रोत, फ्लोरेंटिनो नावाच्या लेखकाची पंधराव्या शतकात लिहिलेली एक कादंबरी होती. या कादंबरीतील काही प्रसंगांचाही चित्रपटात उपयोग करून घेतला होता. कथानकातील शेवटचे कोर्टरूममधील नाट्य प्रभावीपणे मांडले होते. या दृश्यात शेकडो एक्स्ट्रा नटांनी भाग घेतलेला होता.

रशियामध्ये देखील मूकपटांच्या काळात शेक्सपीयर-आधारित अनेक लघुपट तयार झाले. १९२२ साली डिमिट्री बुचोव्हस्की या रशियन दिग्दर्शकाने जर्मनीत येऊन, सहा रिळे लांबीचा, सुमारे एक तासाचा 'ऑथेल्लो' हा चित्रपट तयार केला. या चित्रपटात ऑथेल्लोची भूमिका एमिल जनिंग्ज या नटाने फार प्रभावशाली केली होती. ऑथेल्लोचा स्वाभिमान, त्याची आत्मप्रतिष्ठा, त्याचा संशयीपणा व मत्सर यांचे उत्तम दर्शन त्याने मूक अभिनयातून प्रकट केले होते. त्याच्या तुलनेत आयोगाची भूमिका करणारा वेर्नर क्रॉस अती नाटकी वाटतो. या चित्रपटाची लांबी सुमारे ९३ मिनिटे एवढी होती. अधूनमधून नटांचे संवाद, स्थळकाळाचा तपशील वगैरे माहिती पडद्यावर लिहिली जाई. अशी सुमारे अडीचशे अंतशीर्षके या सिनेमात होती. चित्रपटासाठीचे अनेक भव्य सेट बर्लिनच्या स्टुडिओत उभारले होते. स्टुडिओत एक मोठा कालवा, त्यावरचे पूलही तयार केले होते. त्या काळच्या मानाने या चित्रपटाचे तंत्र बरेच प्रगत होते. मोठमोठ्या महालांच्या चित्रीकरणात depth of focusचा उत्तम उपयोग केला होता. जर्मन चित्रपटात त्याकाळी अस्तित्ववादी शैलीचे वर्चस्व होते. या चित्रपटात अस्तित्ववादी शैलीचे हॉलिवूडच्या शैलीशी सुरेख मिश्रण घडवले होते, त्यामुळे हा चित्रपट अमेरिकेतही लोकप्रिय ठरला. 'A highly intelligent and compelling interpretation' अशी त्याची समीक्षकांनी स्तुती केली.

१९२८ साली पहिला बोलपट 'जाझ सिंगर' अवतरला आणि मूकपटांचा कालखंड संपला. नंतरच्या दोन-तीन वर्षांतच सारे चित्रपट बोलू लागल्यामुळे मूकपटांची निर्मिती बंदच झाली.



विसाव्या शतकाच्या पहिल्या तीन दशकांत हजारो मूकपट निर्माण झाले पण त्यापैकी फार थोडे आज शिल्लक आहेत. मूकपटांची काही बलस्थाने होती व तिचा उपयोग करून काही असामान्य मूकपट या काळात तयार केले गेले. ('कॅबिनेट ऑफ कॅलगिरी', 'सिटीलाइट', 'गोल्डरश', 'द जनरल' वगैरे.) मात्र एकही असामान्य शेक्सपीयरपट या काळात बनला नाही. कारण काव्यात्म भाषा हे शेक्सपीयरच्या नाटकाचे फार मोठे सामर्थ्य होते, जे मूकपटात हरवून जात होते. चित्रपट जेव्हा बोलू लागला तेव्हा पुन्हा एकदा निर्मात्यांनी-दिग्दर्शकांनी शेक्सपीयरला गवसणी घालण्याचा प्रयत्न नव्याने चालू केला.

(विजय पाडळकर यांच्या आगामी 'शेक्सपीयर आणि सिनेमा' या ग्रंथातून)

**– विजय पाडळकर**
द्वारा शंतनू देशमुख, इ २/४०२ हाइडपार्क,
ऑफ घोडबंदर रोड, ठाणे (प.)
दूरध्वनी - ४०१२००१८

# गगनभरारी एका झंझावाताची!

उमेश कदम

लैलाने आपला चेहरा त्या सुप्रसिद्ध फ्रेंच प्लास्टिक सर्जनने दिलेल्या आरशात न्याहाळला. दोन महिन्यांपूर्वीची लैला व आजची लैला या दोन व्यक्ती नसून एकच आहे यावर कोणाचा विश्वास बसला नसता! लैला पुन्हा एखादी धाडसी कामगिरी पार पाडायला मोकळी झाली होती.

**रो**मचा लिओनार्दो द व्हिंची हा आंतरराष्ट्रीय विमानतळ, २८ ऑगस्ट १९६९ या दिवशी सकाळी १० वाजून ४८ मिनिटांनी, अमेरिकन विमान कंपनी ट्रान्स वर्ल्ड एअरलाइन्सच्या विमानाने अॅथेन्सकडे जायला हवेत झेप घेतली. अॅथेन्सला पोचायला विमानास फक्त दीड तास लागणार होता. उड्डाण केल्यानंतर पंधरा मिनिटांनी विमानाने आपली ठरावीक उंची व गती गाठली. मुख्य वैमानिक व सहवैमानिक विमानाच्या गतीवर व दिशेवर बारकाईने लक्ष ठेवून होते. इतक्यात कॉकपिटचे दार अचानक उघडले गेले व दोन्ही वैमानिकांना उद्देशून कॉकपिटमध्ये आलेली व्यक्ती म्हणाली,

''विमान दमास्कसकडे वळवायचे व तेथे उतरवायचे. माझ्या रिव्हॉल्व्हरमध्ये आठ गोळ्या आहेत. मी सांगेन ते निमूटपणे ऐकायचे!''

दोन्ही वैमानिकांनी चमकून मागे पाहिले. चेहऱ्यावर स्कार्फ बांधलेल्या त्या व्यक्तीच्या हातातील रिव्हॉल्व्हर मुख्य वैमानिकांच्या डोक्यापासून जेमतेम सहा इंच अंतरावर होते. त्याचा रोख त्यांच्या डोक्याकडे होता. दोन्ही वैमानिकांना वातानुकूलित कॉकपिटच्या गारव्यात घाम फुटला. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना विमान दमास्कसकडे घेण्याशिवाय पर्याय नव्हता.

''ठीक आहे, दमास्कसकडे वळवतो विमान.'' मुख्य वैमानिक क्षीण आवाजात म्हणाले.

''पण त्यापूर्वी माझी आणखी एक मागणी आहे. मी काय सांगणार आहे ते नीट ऐकून घ्या...''

आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विद्यार्थ्यांना 'द हेग अॅकॅडेमी ऑफ इंटरनॅशनल लॉ' या विख्यात संस्थेच्या व्याख्यानमाला, चर्चासत्रे व संशोधन सत्रे यामध्ये सहभागी व्हायची संधी मिळणे म्हणजे एक पर्वणीच वाटे. हॉलंड – ज्याला नेदरलँड असेही संबोधले जाते– या देशात आंतरराष्ट्रीय कायद्याचा अभ्यास व विकास त्या कायद्याचा उगम झाल्यापासून झाला. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाचे आंतरराष्ट्रीय न्यायालयही हॉलंडच्या द हेग या टुमदार शहरात स्थापण्यात आले. यथावकाश या न्यायालयाच्या आवारात म्हणजे

'द पीस पॅलेस' या भव्य राजवाडासदृश इमारतीत 'द हेग' अ‍ॅकॅडेमीची स्थापना करण्यात आली. तेथील सर्व कार्यक्रमांचे वैशिष्ट्य हे, की आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायाधीश तसेच इतर देशांतून खास निमंत्रित तज्ज्ञ यांचा त्यामधील सहभाग. तरुण अभ्यासकांना त्यांची व्याख्याने ऐकण्याची व त्यांच्याशी चर्चा करण्याची सुवर्णसंधी मिळण्याचे ते जगातील एकमेव ठिकाण होते. शिवाय अशा सर्व अभ्यासकांना, संशोधकांना आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे सुसज्ज ग्रंथालय वापरायची मुभा होती. मी स्वत: १९८१ व १९८६ मध्ये तेथे झालेल्या तीन आठवड्यांच्या व्याख्यानमाला व १९९३ मध्ये झालेले एक संशोधनसत्र, यांमध्ये सहभागी झालो होतो.

युद्धविषयक आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याच्या एका संशोधन प्रकल्पावर काम करण्यासाठी जुलै २००६ मध्ये आमचया मुख्य कार्यालयाने मला द हेग अ‍ॅकॅडेमीत चार-पाच आठवड्यांसाठी जायला सांगितले. तेथे गेल्यानंतर माझ्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.

एके दिवशी सकाळी मी आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या ग्रंथालयात काही संदर्भग्रंथ चाळत होतो. माझ्यापासून दोन टेबले सोडून पंचविशीचा एक गोरा तरुण काम करत बसला होता. त्याच्या टेबलावर आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक कायद्याची पुस्तके पाहून, मला माझ्या एकेकाळच्या त्या आवडीच्या विषयाची आठवण झाली. मी आंतरराष्ट्रीय रेड क्रॉससाठी १९९८ पासून काम करायला लागल्यापासून  माझे सारे वाचन, संशोधन व कामकाज, युद्धविषयक मानवतावादी कायदा व मानवी हक्क यांच्याशी निगडित होते. पूर्वी १९८३-८४ च्या दरम्यान लंडन विद्यापीठात आंतरराष्ट्रीय कायद्याचा पदव्युत्तर अभ्यासक्रम करताना, 'आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक कायदा' हा माझ्या चार पेपर्सपैकी एक होता. थोडावेळ कुतूहलाने त्या तरुण अभ्यासकाकडे पाहिले व मी माझ्या कामाला लागलो. तासा-दीड तासाने न्यायालयाच्या उपाहारगृहात जाऊन कॉफी प्यायची तलफ आली. तेथे जाऊन कॉफी नि क्रोसाँ घेतला व माझा ट्रे घेऊन एका रिकाम्या टेबलापाशी बसलो. त्या दिवशी एका केससंदर्भात बरीच मंडळी न्यायालयात आली होती. मी कॉफी घ्यायला सुरुवात केली इतक्यात मघाशी ग्रंथालयात पाहिलेला तरुण आपला ट्रे घेऊन माझ्या टेबलापाशी आला व त्याने मला विचारले,

''मी येथे बसलो तर चालेल?''

''हो! बसा ना. आज इथं बऱ्यापैकी गर्दी आहे.''

''थँक्स!'' असे म्हणून तो बसला. मी त्याला माझी ओळख करून देण्याच्या उद्देशाने म्हणालो,

''मी उमेश कदम, आंतरराष्ट्रीय रेड क्रॉसमध्ये कायदा सल्लागारपदी काम करतो.''

''असं? अरे वा, छान. माझं नाव जेमी. येथील युट्रेक्ट विद्यापीठात एम.फिल्. करतोय. गेल्या वर्षी त्याच विद्यापीठातून एलएल.एम. केलं.''

''हवाई वाहतूक कायद्याशी निगडित तुझ्या संशोधनाचा विषय आहे, होय ना?''

''अगदी बरोबर. हवाई चाचेगिरीविषयी जे आंतरराष्ट्रीय करार आज अस्तित्वात आहेत, त्यांच्यामधील त्रुटींचा सखोल अभ्यास करायला घेतला आहे.''

''त्या विषयावरील थॉमस बर्गेंथाल, बिन चेंग व निकोलास मॅट यांचे लेख व पुस्तकं वाचली असशीलच!''

''हो, पण तुमचा त्या विषयाचा सखोल अभ्यास आहे असं दिसतंय!''

मी खुलासा केला. आमची कॉफी संपल्यावर आम्ही पुन्हा ग्रंथालयात गेलो. मी रोज चारच्या सुमारास हॉटेलवर जात असे. हॉटेल द हेगच्या स्केव्हनिंगेन समुद्र किनाऱ्याजवळील कैझरस्नात मार्गावर होते. रोज संध्याकाळी मी त्या सुंदर समुद्रकिनाऱ्यावर जवळजवळ एक तास पायी फिरायला जायचो. त्या दिवशी फिरताना अ‍ॅमस्टरडॅमच्या शिफोल विमानतळावर उतरण्यासाठी निघालेले के.एल.एम. रॉयल डच एअरलाइन्सचे बोईंग ७४७ विमान खूप कमी उंचीवरून जाताना दिसले. त्याला पाहिल्यावर हवाई चाचेगिरीचा विषय पुन्हा डोक्यात घोळू लागला व त्याचा अभ्यास करताना वाचलेल्या लेखांची व त्या संदर्भातील आंतरराष्ट्रीय घडामोडींची प्रकर्षाने आठवण झाली. विमानअपहरणाचे काही प्रसंग डोळ्यांसमोर उभे राहिले.

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर ब्रिटिश प्रशासनाखाली असलेल्या पॅलेस्टाइनमध्ये अरब व ज्यूंमध्ये हिंसाचार सुरू झाला. दोघेही एकाच भूमीवर हक्क सांगत होते. ब्रिटिशांनी त्या भूमीची दोन राष्ट्रांत विभागणी करायचा प्रस्ताव मांडला. त्यास अरबांनी विरोध केला. मे १९४८ मध्ये ब्रिटिशांनी आपले तेथील प्रशासन विसर्जित केले. त्याचक्षणी ज्यूंनी ब्रिटिश प्रस्तावात निर्देश केलेल्या भूमीवर इस्रायलच्या स्थापनेची स्वयंघोषणा केली. त्यास विरोध दर्शवून इस्रायलवर सिरिया, इराक व इजिप्त यांनी हल्ला चढवला. तो यशस्वीरीत्या परतावून इस्रायलने, जी जागा ब्रिटिशांनी अरबांच्या पॅलेस्टाईनसाठी सूचित केली होती त्यापैकी बरीचशी आपल्या ताब्यात घेतली. तेव्हापासून पॅलेस्टाइनच्या मुक्तीसाठी लढा पुकारण्यात आला. सुरुवातीस काही वर्षे त्या लढ्याने हिंसक स्वरूप धारण केले होते व आजही काही बाबतीत ते तसेच चालू आहे.

इस्रायलने १९४८ मध्ये ज्यावेळी पॅलेस्टाइनचे हाईफा हे शहर आपल्या ताब्यात घ्यायची तयारी सुरू केली व हल्ला

चढवला, त्यावेळी अस्लम जावेद यांच्या कुटुंबाने हाईफा सोडून लेबॅनॉनमध्ये आश्रय घ्यायचे ठरवले. यथावकाश १९५९-६०च्या सुमारास अस्लम जावेद यांची पंधरा वर्षांची मुलगी लैला, अरब राष्ट्रीय चळवळीची कार्यकर्ती झाली. त्या चळवळीच्या पॅलेस्टाइन शाखेचे नंतर पॅलेस्टाइन मुक्ती आघाडीत रूपांतर झाले. लैलाचा स्वभाव अतिशय धाडसी व करारी. पॅलेस्टाइनच्या मुक्तीविषयी तिची मतेही परखड होती. त्या लढ्यात सहभागी झालेली, धडाडीने काम करणारी ती पहिली तरुणी होती. मुक्ती आघाडीच्या नेत्यांना तिच्या धडाडीचे कौतुक वाटायचे. अशीच आठ-दहा वर्षे गेल्यानंतर लैलाने आपल्यावर काही जोखीमीची कामगिरी सोपवण्याचा हट्ट धरला. आता जवळजवळ पंचविशीची उंचीपुरी, मोठ्या पाणीदार डोळ्यांची, लांब, सरळ नाक असलेली लैला आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाची छाप सर्वांवर उमटवायची. तिच्या धनुष्याकृती भुवया व निमुळती हनुवटी तिच्या सौंदर्यात भर घालत होत्या. पण तिचे सौंदर्य तिचा आत्मविश्वास व करारी चेहरा यांच्या आड येत नव्हते.

पायलटने विमान दमास्कसकडे घ्यायला सुरुवात केली आणि लैलाने आपला स्कार्फ काढला. तिचे दाट काळे केस खांद्यावर रूळू लागले. लैला पुढे म्हणाली,

‘‘मी काय सांगते ते नीट ऐका. विमान दमास्कसला उतरण्यापूर्वी इस्रायलच्या ताब्यातील हाईफावरून, कमी उंचीवरून घ्यायचे. मी चार वर्षांची असताना हाईफा सोडलं. ते आता आठवत नाही आणि आता तिकडे जाताही येत नाही. निदान हवेतूनतरी पाहून घेईन!’’

पायलटने तिच्या सूचना तंतोतंत पाळल्या. आपल्या जन्मस्थळाचे हवाई दर्शन घेतल्यानंतर लैलाने विमान सिरियाची राजधानी दमास्कसकडे घ्यायला सांगितले. सिरियाची अरब लढ्याला सहानुभूती होती. सिरियन सरकारने विमान दमास्कसला उतरवण्याची परवानगी दिली. दरम्यान साऱ्या जगभर अमेरिकन विमानाचे अपहरण झाल्याच्या बातमीने एकच खळबळ उडवून दिली होती. दमास्कसमध्ये पॅलेस्टाइन समर्थकांनी लैलाचे उत्स्फूर्त स्वागत केले. तिला कडक सुरक्षेत एका गुप्त ठिकाणी नेण्यात आले. अमेरिकन व इस्रायली गुप्तहेर केव्हाही तिच्यावर हल्ला करू शकत होते. लैलाने त्यांना चकवायचे ठरवले. रात्री एकच्या सुमारास तिने तिच्या पहाऱ्यावरील सुरक्षा कर्मचाऱ्याला तिला त्याच्या घरी घेऊन जायची विनंती केली. लैलाने बुरखा परिधान केला. त्या अरब कर्मचाऱ्याला लैलाच्या धाडसाचे कौतुक वाटत होते. त्याच्या घरी दोन दिवस राहिल्यावर तिने पॅलेस्टेनियन कार्यकर्त्यांच्या मदतीने सिरियातून पलायन करायचे ठरवले.

लैला कोठे गायब झाली याचे गूढ कोणालाही कळेना. अमेरिकन व इस्रायली गुप्तहेर संघटनांनी लैलाचे फोटो पैदा केले



व ते मध्यपूर्व व युरोपमधील बऱ्याच देशांना पाठवले. तिच्या गायब होण्याने ते हतबल झाले होते यथावकाश अमेरिकन व इस्रायली गुप्तहेर तसेच शोधक पत्रकार तिला विसरून गेले.

इस्रायलच्या एल्-अल् या विमान कंपनीच्या विमानाने ७ सप्टेंबर १९७० या दिवशी सकाळी ९ वाजून १२ मिनिटांनी न्यू यॉर्कला जाण्यासाठी ॲमस्टरडॅम विमानतळावरून हवेत झेप घेतली. जेमतेम वीस मिनिटे गेल्यानंतर एक तरुणी हातात दोन हँड-ग्रेनेड घेऊन कॉकपिटकडे जाती झाली. पण विमानात प्रवासी

असल्याचे  भासवून बसलेल्या दोन इस्रायली कमांडोंनी तिला पकडून ठेवले. तिचा साथीदार पॅट्रिक मात्र कमांडोंबरोबरील चकमकीत ठार झाला. या प्रसंगामुळे विमान लंडनला उतरवून त्या तरुणीस ब्रिटिश पोलिसांच्या ताब्यात द्यायचे ठरले. लंडनच्या हिथ्रो विमानतळावर ब्रिटिश पोलिसांची एक तुकडी दाखल झाली. त्या तरुणीस ताब्यात घेतल्यावर तिला हाऊन्स्लो पोलिस स्टेशनचा कोठडीत ठेवण्यात आले. नंतर तिच्या चौकशीस सुरुवात झाली. पोलिसांकडे लैला जावेदचे चार फोटो होते. त्यांनी ते व त्या तरुणीचा चेहरा पडताळून पाहिला. त्यात साम्य नव्हते. पोलिसांनी तिचा जबाब नोंदवून घ्यायला सुरू केले.

''तुझं नाव काय?''

''लैला जावेद!''

''खोटं बोलू नकोस. आमच्याकडे लैलाचे फोटो आहेत.''

शेवटी त्या तरुणीस पोलिसांना सत्य परिस्थितीचे कथन करणे भाग पडले.

दमास्कसहून गायब झालेली लैला लपतछपत दीड महिन्यांनी पॅरिसला पोचली. तेथेही काही पॅलेस्टिनी समर्थक होतेच. लैलाला पॅलेस्टिनी मुक्तिलढ्याच्या नेत्यांचा पाठिंबा होता. लैलाची धडाडी विमान अपहरणाच्या प्रसंगाने द्विगुणित झाली होती. पण आता जगभर तिचे फोटो पोलिसांच्या व गुप्तहेरांच्या हाती असल्यामुळे तिचा मुक्त वावरण्यावर बंधने आली होती. त्यावर मात करण्यासाठी तिने एक शक्कल लढवली.

पॅरिसच्या द ग्रेनेलवरील क्लिनिकमध्ये डॉ. जाँ-लुक बुँदाँ यांनी लैलाला सांगितले,

''चला, आजचं शेवटचं सिटिंग संपलं एकदाचं. हा घे आरसा!''

लैलाने आपला चेहरा त्या सुप्रसिद्ध फ्रेंच प्लास्टिक सर्जनने दिलेल्या आरशात न्याहाळला. दोन महिन्यांपूर्वीची लैला व आजची लैला या दोन व्यक्ती नसून एकच आहे यावर कोणाचा विश्वास बसला नसता! लैला पुन्हा एखादी धाडसी कामगिरी पार पाडायला मोकळी झाली होती.

लैलावरील खटला कोणत्या न्यायालयात चालवायचा हा कायद्याचा मसुदा ब्रिटिश पोलिसांना पेचात टाकणारा होता. विमान अपहरणाचा गुन्हा हॉलंडच्या हवाई हद्दीत झाला होता तर विमान इस्रायलचे होते. परंतु तो मुद्दा निकालात निघायच्या पूर्वी इस्रायल व पॅलेस्टिनी नेत्यांमध्ये बंद्यांच्या देवाणघेवाणीची बोलणी सुरू झाली. पॅलेस्टिनी नेत्यांनी लैलाच्या मुक्ततेच्या बदल्यात दोन इस्रायली गुप्तहेरांना सोडण्याची तयारी दर्शवली. लैला मुक्त झाली.

लैला व इतरांनी केलेल्या विमान अपहरणांच्या घटनांनी, कित्येक राष्ट्रे व विमान कंपन्या तसेच आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटना; या समस्येवर काय उपाय योजता येतील याचा गंभीरपणे विचार करू लागले. बऱ्याच खलबतांनंतर १९७१ मध्ये हवाईचाचेगिरीविरोधी आंतरराष्ट्रीय करार संमत व स्वीकृत करण्यात आला. विमानतळांवरील सुरक्षा व्यवस्था अद्ययावत करण्याचे आवाहन सर्व राष्ट्रांना करण्यात आले. तरीही विमान अपहरणाच्या घटना होतच राहिल्या. कायद्यातील व सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटींचा अपहरणकर्त्यांनी पुरेपूर गैरफायदा घेतला.

लैलाची मुक्तता करण्यात आल्यानंतर ती कोठे गेली याविषयी उलटसुलट बातम्या येत राहिल्या. काहींच्या मते ती रशियामध्ये एका विद्यापीठात आधुनिक इतिहासाचा अभ्यास करायला गेली, तर इतर काहींच्या मते सिरियामध्ये जाऊन तिने तरुण पॅलेस्टिनी योद्ध्यांना प्रशिक्षण द्यायच्या कामाला वाहून घेतले. दरम्यान पॅलेस्टिनी मुक्ती आघाडीने 'आपण यापुढे विमान अपहरणाचा मार्ग अवलंबणार नाही' असे जाहीर केले. काहीही असले तरी एकेकाळी लैला नावाच्या झंझावाताच्या गगनभराऱ्यांनी भल्याभल्यांची झोप उडवून दिली होती!

माझे 'द हेग'मधले काम संपले होते. त्या दिवशी 'पीस पॅलेस'समोरील ट्रॅम स्टेशनवर मी ट्रॅमची वाट पहात होतो. इतक्यात जेमी तेथे आला. मी त्याला विचारले,

''कसं काय चाललं आहे तुझं काम?''

''चांगलं चाललंय. पुढच्या आठवड्यात टर्म सुरू होतेय. युट्रेक्टला जावं लागेल.'' युट्रेक्ट, द हेगपासून खूप दूर नव्हते.

''तुझा अभ्यासक्रम कधी संपतोय?''

''अजून एक वर्षानं प्रबंध सादर करायचा विचार आहे. नंतर मायदेशी जाईन.''

''म्हणजे कोठे?'' मी विचारले. तो कोणत्या देशाचा हे मला ठाऊक नव्हते.

''जॉर्डनला. मी अम्मानमध्ये राहतो. तेथील विद्यापीठात पुढे पीएच्.डी.चा अभ्यासक्रम करायची इच्छा आहे.''

''तू जॉर्डेनियन आहेस?''

''हो. माझं खरं नाव जमाल बादेर. माझे मित्र मला जेमी म्हणतात.'' मला वाटले होते, की तो गोरागोमटा तरुण युरोपीय असावा. एवढ्यात आमची ट्रॅम आली. त्या दिवशी मला द हेगच्या सेंट्रम या भागात काही किरकोळ खरेदी करायला जायचे होते. ट्रॅममध्ये गर्दी नव्हती. जेमी व मी एकत्रच बसलो. मी त्याला म्हणालो,

''हवाई चाचेगिरीच्या संदर्भात लैला जावेदविषयी काही तुझ्या वाचनात आलं?''

''हो, बरीच माहिती वाचली. तिच्यामुळेच १९७१चा करार घाईघाईनं संमत करण्यात आला. सखोल अभ्यास न करताच

त्याचा मसुदा तयार केला गेला. त्यामुळे त्यात काही त्रुटी राहिल्या आहेत या निष्कर्षाप्रत मी आलो आहे.'' त्याला दुजोरा देत मी म्हणालो,

''खरं आहे तुझं म्हणणं. पण पुढे त्या लैलाचं काय झालं हे गूढ मात्र आजतागायत उलगडलं नाही.''

''म्हणजे? तुम्हाला समजलं नाही?''

''काय बरं?''

''लैला आठ वर्षांपूर्वी अज्ञातवासातून प्रकट झाली. इंटरनेटवर तुम्हाला 'मिस्टरी ऑफ लैला जावेद अनफोल्डेड' हा लेख वाचायला मिळेल.'' हे ऐकून मला आश्चर्य वाटले.

''मी नक्कीच वाचेन. काय म्हटलंय त्या लेखात?'' मला तिचे पुढे काय झाले याबद्दल उत्सुकता होती.

''ती लंडनहून सुटल्यानंतर रशियातील रोस्तॉव्ह विद्यापीठात आधुनिक इतिहासाचा अभ्यास करायला गेली. त्यानंतर ती लेबॅनॉनमध्ये राहून इस्रायली सैन्यविरोधी लढ्यात सामील झाली. परंतु १९७८च्या सुमारास तिचे व लेबनीज आघाडीच्या नेत्यांचे मतभेद झाले. पॅलेस्टाइन मुक्तिलढ्याबाबतही तिच्या जहाल मतांशी त्या लढ्याच्या नेत्यांनी असहमती दर्शवली. शेवटी तिने त्या लढ्यांतून निवृत्त व्हायचे ठरवले. ती १९७९ साली विवाहबद्ध झाली.''

''असं? कोणाशी?''

''एका इराकी डॉक्टरशी. पण पुढे इराण-इराक युद्धादरम्यान त्या डॉक्टरांनी सहकुटुंब अम्मानला स्थलांतर केलं.''

''तूही अम्मानचाच ना? तू कधी तिला शोधायचा प्रयत्न केलास?''

''नाही केला.''

''मी तुला एक सुचवू? तू तिला शोधून तिची मुलाखत घे. तुझ्या संशोधनाला त्यामुळे एक प्रकारची बळकटी येईल.''

''मी माझ्या मार्गदर्शकांना तसं सुचवले होतं. पण त्यांनी मला तसं न करण्याचा सल्ला दिला.''

''असं कसं काय?''

''ते म्हणाले, की ती तुझी आई असल्यामुळे तुझ्या मुलाखतीत वस्तुनिष्ठता असणार नाही!''

**– उमेश कदम**
आनंद, २५/इ, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३
दूरध्वनी : २६५३४६०
kadamumesh@hotmail.com

**दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा**

*

# मेहता एंटरप्रायजेस

भिवंडी, ठाणे

# क्लब ट्वेन्टीसेव्हन!

अपर्णा
पाटील

सत्ताविसावं वर्ष हे काही मृत्यू ओढवून घेण्याचं वय नव्हे, तेही आयुष्यात हवी ती भौतिक सुखं पायाशी लोळण घेत असताना. पण 'क्लब ट्वेन्टीसेव्हन'मधली नावं पाहिली तर असे आत्मनाशाकडे जाणारे कलाकार स्वत:हून या क्लबमध्ये सहभागी झालेत, असं सांगता येतं. त्यातली चार प्रमुख आणि सगळ्यात जास्त लोकप्रिय नावं आहेत– ॲमी वाइनहाऊस, कर्ट कोबेन, जिमी हेंड्रिक्स आणि जिम मॉरिसन.

**२३** जुलै २०११ हा ॲमी वाइनहाऊसच्या मृत्यूचा दिवस. या मृत्यूनं तिला 'क्लब २७'मध्ये समाविष्ट केलं आहे. ही यादी काही एखाद्या अल्बमच्या विक्रमी खपाची नाही, ना एखाद्या क्लबच्या मेंबरशिपची. ती आहे, वयाच्या २७ व्या वर्षी मृत्यू पावलेल्या लोकप्रिय रॉक अँड रोल गायक-संगीतकारांची. आजवर या यादीत अनेक लोकप्रिय नावांचा समावेश होत गेला. विशेष म्हणजे या कलाकारांची लोकप्रियता वादातीत होती आणि त्यांचा शेवट वादग्रस्त.

जिमी हेंड्रिक्ससारखा अद्वितीय गिटारिस्ट असो नाहीतर 'निर्वाणा'सारख्या बँडचा प्रमुख गायक व गीतकार कर्ट कोबेन. 'द डोअर' बँडला लोकप्रियतेच्या उत्तुंग शिखरावर पोहोचवणारा जिम मॉरिसन किंवा कोणत्याही गायिकेला हेवा वाटायला लावणारी जेनिस जोपलिन. हे सगळे आहेत 'क्लब २७'चे सदस्य. या सगळ्यांना मरण आलं, ते वयाच्या २७ व्या वर्षी. त्यांचा मृत्यू अकस्मात झाला असं म्हणण्यापेक्षा तो त्यांनी ओढवून घेतला, असं म्हणणं अधिक योग्य ठरेल. कर्ट कोबेननं स्वत:ला गोळ्या घालून घेतल्या, तर जिमीनं अतिप्रमाणात ड्रग्ज घेतले होते. ॲमी तर या शेवटापासून स्वत:ला रोखूही शकली नाही. विशेष म्हणजे या प्रत्येकाला आपणच आपल्याला मृत्यूकडे नेत आहोत याविषयी जराही शंका नव्हती.

पाश्चात्त्य संगीत आणि अमली पदार्थ यांचा संबंध जवळचा आहे. जसे संगीताचे प्रवाह आणि प्रभाव आहेत तसं व्यसनाधीनता आणि त्यात गुरफटले गेलेले कलाकार यांचं नातंही अपरिहार्य आहे. कलाकारांची जीवनशैली, असुरक्षितता, लोकप्रियतेमुळे आलेलं एकाकीपण, प्रचंड नैराश्य व त्यातून व्यसनाच्या आहारी जाणं आणि कधीतरी अमली पदार्थांचा जादा डोस घेतल्यानं शेवट करून घेणं हा अनेक कलावंतांचा इतिहास आहे. स्टेजवर आपल्या नाचगाण्याचा स्टॅमिना टिकावा म्हणून सुरुवातीला 'पफ' मारणारी ही मंडळी हळूहळू त्याच्या आहारी जातात. मग लोकप्रियतेच्या शिखरावर असलेला कलाकार विस्मरणात जायला फार वेळ लागत नाही. मृत्यूनंतर मात्र त्यांचं आयुष्य दंतकथा झाल्याचं आपण पाहतो. अशा

अकाली, त्यापेक्षा चटका लावून गेलेल्या मृत्यूंना 'क्लब २७'मध्ये जागा मिळालीय.

पाश्चात्त्यांच्या संगीताला क्रांतीचं एक माध्यम मानलं गेलं. बंडखोरी आणि स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्याचं साधन होतं ते. कलाकारांनी स्टेजवरून गाणी गायची आणि तरुण पिढीपुढे एक नवविचारांचं दालन खुलं करायचं, हा संगीताचा उद्देश ठरला. अशातूनच एक भली मोठी गायक-गीतकारांची फौज तयार झाली. त्यांना लोकांनी डोक्यावर घेतलं. पण या क्षेत्राला शाप लागला तो अमली पदार्थांचा. त्यामुळेच लोकप्रियतेच्या लाटेवर स्वार झालेली ही मंडळी कधी उंचावर तर खोल गर्तेत झोके घेत राहिली. प्रचंड लोकप्रियतेतून कलाकाराच्या वाट्याला आलं ते एकटेपण, अमली पदार्थांच्या व्यसनातून अनेक मानसिक आणि शारीरिक आजार, स्वैर आणि मुक्त लैंगिक जीवनामुळे तुटलेले नातेसंबंध, खचलेपण आणि या साऱ्या गोष्टी कलाकारांना हळूहळू स्वनाशाकडे नेणाऱ्याने ठरल्या.

संगीतक्षेत्राचा मागोवा घेतला तर, अशा निराशेनं आणि वादग्रस्त आयुष्यामुळे स्वत:चा शेवट करून घेणाऱ्या मंडळींची यादी मोठी आहे. मायकल जॅक्सन किंवा बॉयझोन या बँडमधला गायक स्टीफन गटलेचा मृत्यू, इथपर्यंतचा इतिहास आपण पाहिला तर हीच गोष्ट ध्यानात येऊ शकेल. पण सत्ताविसावं वर्ष हे काही मृत्यू ओढवून घेण्याचं वय नव्हे, तेही आयुष्यात हवी ती भौतिक सुखं पायाशी लोळण घेत असताना. पण 'क्लब २७' मधली नावं पाहिली तर असे आत्मनाशाकडे जाणारे कलाकार स्वत:हून या क्लबमध्ये सहभागी झालेत, असं सांगता येतं. त्यातली चार प्रमुख आणि सगळ्यात जास्त लोकप्रिय नावं आहेत, ती ॲमी वाइनहाऊस, कर्ट कोबेन, जिमी हेंड्रिक्स आणि जिम मॉरिसन.

ॲमी वाइनहाऊस (१४ सप्टेंबर १९८३- २३ जुलै २०११)

ॲमी वाइनहाऊस २३ जुलै २०११ रोजी आईला भेटायला जाणार होती. निदान तसा निरोप तरी तिनं दिला होता. खरं तर ॲमी गायिका झाल्यापासून आणि तिच्या आयुष्यात मागोमाग आलेल्या समस्यांमुळे ती लोकांपासून दूर गेली होती. अगदी आईवडिलांपासूनही. पण का कोणास ठाऊक, गेल्या अडीच-तीन महिन्यांत तिनं सगळ्यांना स्वत:हून भेटायला आणि फोन करायला सुरुवात केली होती! प्रत्येकालाच तिच्या वागण्यातल्या बदलाचं आश्चर्य वाटत होतं. बरंही वाटत होतं. कारण तिच्या आयुष्यातल्या गोष्टी काही फार चांगल्या घडत नव्हत्या. कदाचित तीच आपल्या आयुष्याची गाडी पूर्वपदावर आणण्यासाठी प्रयत्न करत आहे, असं सगळ्यांना वाटायला लागलं होतं. पण तिला ती संधी दुर्दैवानं कधी मिळालीच नाही.



ॲमी वाइनहाऊस

भेटायला येते असं आईला सांगणारी ॲमी प्रत्यक्षात कधीही परत न येण्याच्या वाटेवर निघून गेली.

ॲमी म्हणजे काही ब्रिटनी स्पिअर्स नव्हे, की जिच्या प्रत्येक गोष्टीची चर्चा व्हावी. परंतु ॲमीच्या आयुष्यात व्यसनं, नैराश्य या गोष्टी नसत्या तर ब्रिटनीपेक्षाही जास्त लोकप्रियता तिच्या वाट्याला आली असती. ब्रिटिशांनी तिला तेवढं नक्की डोक्यावर उचलून घेतलं असतं. कारण ब्रिटिशांना सगळ्यात जास्त अभिमान असलेल्या आणि जगभरात ज्यांच्या गाण्यांचा महिमा गेली चार दशकं कायम राहिला, त्या 'बिटल्स'चा वारसा सांगणारी ती तरुण गायिका होती. तिच्या गाण्यात अशी जादू होती की ती लेडी गागापेक्षाही जास्त लोकप्रिय ठरली असती. तिचा आणि लेडी गागाचा प्रवास एकाच वेळी सुरू झाला. दोघी दिसायलाही बऱ्यापैकी सारख्या. त्यामुळेच दोघींनी आपापला लूक वेगळा असावा, याकडे लक्ष दिलं. ॲलेक्स फोडेन या स्टाइलिस्टनं, इतरांपेक्षा वेगळी दिसावी म्हणून ॲमीला उंच खोपा असलेली हेअरस्टाइल दिली आणि क्लिओपात्राप्रमाणे डोळ्यांचा मेकअप. मात्र ॲमीचं लोकप्रिय होणं तिच्या दिसण्या-असण्यात नव्हतं, तर तिच्या गाण्यात होतं.

ॲमीची आई मिशेल ऊर्फ मिच हिला गाण्याचं वेड. फ्रँक सिनात्राच्या गाण्यात मिचला आपला विरंगुळा सापडला होता. छोट्या ॲमीला सोबत घेऊन ती ही गाणी म्हणायची. ॲमीलाही दिवसभर अशी गाणी गुणगुणत राहण्याची सवय लागली. इतकी, की वर्गातल्या शिक्षकांनाही तिला शांत बसवणं कठीण होऊ लागलं. पण नऊ वर्षांची असताना तिचे आईवडील एकमेकांपासून विभक्त झाले आणि सारंच बिघडलं. तिच्या

आजीमुळे ती सुसी अर्नशॉ थिएटर स्कूलमध्ये गेली. जेमतेम दहा वर्षांच्या ॲमीनं आपल्या मैत्रिणीबरोबर 'स्वीट अँड सोअर' हा बँड सुरू केला. पण सिल्विया यंग थिएटरमध्ये गेलेल्या ॲमीला लवकरच संस्थेतून काढून टाकण्यात आलं. संस्थेच्या नियमाविरोधात जाऊन म्हणे, तिनं नाक टोचून घेतलं होतं. आणखीही काही कारणं होती. चौदाव्या वर्षांच्या ॲमीच्या बंडखोरपणाची ती पहिली झलक होती. त्यानंतर वारंवार अशा गोष्टी ती करत राहिली, कोणालाही न जुमानता!

ॲमीचा भाऊ ॲलेक्स उत्तम गिटार वाजवायचा, मग तीही शिकली. हळूहळू गाणी लिहायला लागली. 'बोल्शा बँड' नावाच्या लंडनच्या स्थानिक बँडमध्ये गायला लागली. त्यावेळी तिचा बॉयफ्रेंड असलेला टायलर जेम्स यानं तिच्या गाण्याची डेमो टेप बनवली. ॲमीला त्या टेपनं संधी मिळवून दिली नाही, मात्र गायिका बनण्याचा मार्ग दाखवला.

सलाम रेमी या म्युझिक निर्मात्याशी तिची दोस्ती जमली आणि तिच्यातल्या गायिकेला संधी मिळत गेली. पण ॲमीचं आयुष्य तिच्या या टॅलंटपेक्षाही गाजलं ते तिच्या मानसिक आणि शारीरिक अस्वास्थ्यानं. स्वत:ला जखमा करून घेण्याचा मानसिक विकार, नैराश्य यांनी तिला पछाडलेलं होतं. शिवाय 'इटिंग डिसऑर्डर'चा त्रास होताच. त्यातूनच तिनं अल्कोहोल आणि अमली पदार्थांना जवळ केलं. ते वर्ष २००५, त्यानंतरच्या



ॲमी वाइनहाऊस आणि बॉयफ्रेड टायलर जेम्स

वयात इतकी वर्षं तिच्याजवळ असणारी तिची आजी मरण पावली, त्या मृत्यूनं तिच्या आयुष्यात पोकळी निर्माण झाली. त्यामुळे तिची व्यसनं वाढत गेली.

या सगळ्याचा कडेलोट झाल्याचं पाहणं तिच्या पालकांच्या नशिबी आलं. २ डिसेंबर २००७ रोजी नुसत्या अंतर्वस्त्रांवर घराबाहेर पडलेल्या ॲमीचे फोटो इंटरनेटवर झळकले. तिची ती अवस्था पाहून तिच्या वडिलांनी तिच्या घरी धाव घेतली. त्याचकाळात अमली पदार्थ घेतानाचा तिचा व्हिडिओही लोकांनी घरबसल्या पाहिला. याच काळात ती गायिका-गीतकार म्हणून सर्वोत्कृष्ट काम करत होती. तिचं रिहॅबमध्ये जाणंही गाजलंच. त्यानंतर तिच्या आयुष्यात 'बॅक टू ब्लॅक' या अल्बमचं यश आलं. त्यासाठी तिला मिळालेलं ग्रॅमी घेण्यासाठी ती गेली नाही. तशा स्थितीत ती नव्हती. ॲमी रिहॅबमध्येच होती. तिच्या गाण्यातूनही तिची हीच मनस्थिती दिसत होती, 'यू नो आय ॲम नॉट गुड' किंवा 'लव इज लॉसिंग गेम', अशा अप्रतिम गाण्यांतून तिचं वैफल्य स्पष्ट जाणवतं होतं.'

ॲमीनं आर ॲण्ड बी (ऱ्हिदम अँड ब्ल्यू) आणि जॅझ संगीतात केवळ आवाजाच्या जोरावर 'फ्रँक' अल्बमसह संगीतजगतात पदार्पण केलं होतं. २००६मध्ये तिला पाच ग्रॅमी मिळवून देणारा 'बॅक टू ब्लॅक' हा तिचा दुसराच अल्बम होता.

ॲमी मुळात विध्वंसक वृत्तीची होती. त्यात संगीतजगतात तिला जी काही लोकप्रियता मिळत गेली त्यामुळे ती आपोआप एकलकोंडी होत गेली. २००७ मध्ये ब्लेक फिल्डर-सिव्हिलशी लग्न झाल्यानंतर तर स्वत:ला जखमा करून घेणं, अमली पदार्थांच्या सेवनानंतर धुंद अवस्थेत गैरवर्तन या सगळ्या गोष्टी नित्याच्या झाल्या. मग त्यानंतर ॲमी जणू एकांतवासात गेली. अधूनमधून तिच्या विक्षिप्तपणाचे आणि अमली पदार्थांच्या नशेत गोंधळ घालण्याचे किस्से ब्रिटिश टॅबलॉइडमध्ये गाजत. पण तितकंच. तिच्या मृत्यूच्या बातमीनं मात्र सगळ्यावरच कायमचा पडदा टाकला.


कर्ट कोबेन (२० फेब्रुवारी १९६७ -५ एप्रिल १९९४)

अमेरिकन गीतकार-संगीतकार आणि गायक. मात्र त्याची ओळख आहे ती 'निर्वाणा' या बँडचा प्रमुख गायक म्हणून. त्याही पुढे जाऊन सांगायचं तर 'स्मेल लाइक टीन स्पिरीट' या गाण्यानं अमरत्वाला पोहोचलेला गायक. निवार्णा बँड अस्तित्वात आला तो १९८५मध्ये आणि कर्टनं शेवटचा श्वास घेतला तो १९९४ मध्ये.

कोबेनचा शेवट हेरॉइनचं व्यसन, नैराश्य आणि लोकप्रियता कशी हाताळावी यामुळे आलेल्या दडपणामुळे झाला, असं

म्हणतात. पण कर्टला आपला शेवट माहीत होता, अगदी खूप लहानपणीच. त्यानं आपल्यालाही 'क्लब २७'चा सदस्य व्हायचंय असं सांगूनच ठेवलं होतं! आपल्या डोक्यात गोळ्या घालतानाही त्याच्या डोक्यात तोच विचार घोळत नसेल कशावरून, हा प्रश्नच पडतो आणि त्याचं उत्तरही मिळणं कठीणच.

कर्ट डोनाल्ड कोबेन वॉशिंग्टनमध्ये जन्मला. वडील डोनाल्ड स्कॉटिश, आयरिश आणि फ्रेंच वारसा सांगणारे, तर आई जर्मन, आयरिश, स्कॉटिश आणि इंग्लिश खानदानाची परंपरा सांगणारी. कोबेनच्या स्थलांतरित कुटुंबाला संगीताचा वारसा होता. त्याच्या काकांचा म्हणजे चक फ्रेडेनबर्ग यांचा 'द बिचकॉम्बर' नावाचा बँड होता. तर त्याची चुलती मेरी अर्ल ग्रे हार्बर कौंटीमध्ये असलेल्या वेगवेगळ्या बँडमध्ये गिटार वाजवायची. त्याच्या घरात अशी बरीच माणसं होती, जी कर्टमध्ये संगीतरस निर्माण करण्यास आपसूकच कारणीभूत ठरली. त्याची आजी आयरिस ही कोबेनला घडवत होती. त्यामुळेच तर केवळ दोन वर्षांचा असल्यापासून तो गायला लागला. चौथ्या वर्षी तो पियानो वाजवू लागला आणि गाणी लिहू लागला होता. इतक्या छोट्या वयातही त्याची संगीताची समज अचंबित करणारी होती. या काळातही बिटल्स, टेरी जॅक्स




कर्ट कोबेन

यांच्या गाण्याचा प्रभाव त्याला आकर्षित करत होता.

तो आठ वर्षांचा झाला आणि बरंच काही बिनसत गेलं. या काळात त्याच्या आईवडिलांचा झालेला घटस्फोट त्याच्या मनावर खोल जखमा करून गेला. सुरुवातीला तर त्याला स्वत:चीच लाज वाटायची. त्याला कोणालाही तोंड दाखवण्याचीही भीती वाटायची. आईवडील आणि घर अशा उबदार चौकटीत राहिलेल्या कर्टचं आयुष्य, त्या एका गोष्टीनं पार बदलून गेलं होतं. विशेष म्हणजे त्या दोघांना आयुष्यातले दुसरे जोडीदार मिळाले होते. कर्ट वडिलांकडे होता. वडिलांनी लग्न करणार नाही, असं सांगूनही दुसरं लग्न केलं होतं. तेही दोन मुलं असलेल्या स्त्रीशी. कर्टनं सुरुवातीला जुळवून घेतलं. जेव्हा सावत्र आईनं बाळाला जन्माला दिला तेव्हा मात्र पुन्हा एकदा असुरक्षिततेनं त्याला ग्रासलं. त्याची आई तर चुकीच्या माणसाच्या प्रेमात पडली होती. तिचा जोडीदार तिला इतकी मारहाण करत होता, की त्याचे वळ दिसायचे. मात्र ती त्याला सोडून राहायला तयार नव्हती. हे सगळंच आठ-नऊ वर्षांच्या कर्टच्या कोवळ्या मनाला झेपणारं नव्हतं. अशा वेळी कर्टकडून हुल्लडबाजी, वर्गातल्या इतर मुलांच्या वाटेला जाण्याचे प्रसंग यायचे. यातून पुन्हा एकदा घरात तणाव आणि सरतेशेवटी त्याला सुधारण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून त्याचा ताबा वडिलांकडे देण्याचा निर्णय झाला. त्या काळात युरोप आणि अमेरिकेतल्या अशा बंडखोर वृत्तीच्या मुलांना चर्चच्या आणि देवाच्या दावणीला बांधण्याचे उद्योग केले जायचे. कर्टच्याबाबतीत मात्र सारंच पालथ्या घड्यावरचं पाणी होतं. त्याच काळात वेगवेगळ्या धर्मांचा अभ्यास करताना, साऱ्या वेदनांपासून मुक्त होणं म्हणजे निर्वाण असं वाचलं जाणं त्याच्या पथ्यावर पडलं आणि तोच त्याच्या मुक्तीचा मार्ग ठरला. तोपर्यंत आत ठसठसत असलेल्या वेदनांना तो आता शब्दरूप, काव्यरूप द्यायला लागला. त्याचा याच काळात गे, बायोसेक्शुअल यांच्याशी परिचय झाला. 'गे' म्हणून घेणं त्याला आवडत होतं, तेही त्या कोशात वावरताना त्याला सुरक्षित वाटत होतं म्हणून.

कर्ट हायस्कूलमध्ये गेला तसं त्याला आईकडे जावं लागलं. ग्रॅज्युएशन होण्याच्या दोन आठवड्यांआधी त्याला हायस्कूल सोडून द्यावंसं वाटलं. त्या वेळी त्याला आईनं नोकरी शोध नाही तर घर सोडून जा असा पर्याय दिला. एका आठवड्यानंतर त्याचे कपडे आणि सामानाचं गाठोडं बांधून ठेवलेलं त्याला दिसलं. आपल्याच घरात आपण परके झालो, असं वाटून त्यानं थेट मित्रांच्या घरचा रस्ता धरला. कधी तिथेही त्रास वाटायला लागला तर थेट आपल्याच घरातल्या तळघरात कोंडून घ्यायचा तर कधी पुलाखाली झोपायचा. मग पुढे कधीतरी याच अनुभवाचं 'नेव्हरमाइंड' हे गाणं झालं. त्याची गाडी थोडी

धक्क्याला लागली ती तो काम करायला लागल्यावर. पैशांची तंगी नेहमीच असायची, पण कर्टला आस असायची ती रॉक कन्सर्टमध्ये जाण्याची. त्याची मैत्रीण टेसी मरँडर कॅफेमध्ये काम करून त्याला मदत करायची. त्याला सारखं कामधंदा कर काहीतरी असं सुचवतही राहायची. टेसीच्या या आग्रहामुळे दोघांत विकोपाला जातील इतके वाद व्हायचे. या वादाला 'अबाउट अ गर्ल'मधून कर्टनं मोठ्या खुबीनं मांडलं. अर्थात गाणं खूप नंतर आलं, पण विभक्त होणं दोघांच्या वाट्याला फारच लवकर आलं. तिच्या जाण्यानंतर संगीतच त्याच्या आयुष्यात उरलं. पुढे 'बिकीनी किल' या बँडची गायिका टोबी वाइल त्याला भेटली. दोघांमध्ये बरीच चर्चा व्हायची. दोघांच्या या एकत्र येण्याला पाहून त्यांची मैत्रीण कॅथलिन हान्नानं 'कर्ट स्मेल्स लाइक टीन स्पिरीट' असं भिंतीवर रंगवून टाकलं होतं. खरं तर कॅथलिननं कर्टचा असा उच्चार उपहासानं केला होता. यात 'टीन स्पिरीट' हा उल्लेख टोबी वापरत असलेल्या डीओडरंटच्या नावाचा होता. पुढे 'स्मेल लाइक टीन स्पिरीट' ही कर्टनं घडवलेली क्रांती म्हणून सूचित झाली. किंबहुना हा शब्दच क्रांती अशा अर्थानं वापरला जाऊ लागला.



कर्ट कोबेन आणि गर्लफ्रेंड कोर्टनी

बिटल्सपैकी विशेषत: जॉन लेननचा प्रचंड प्रभाव त्याच्यावर होता. लेड झेपलिन, एसीडीसी, ब्लॅक सबाथ, ॲरोस्मिथ, किस या सगळ्यांचा तो फॅन होता. म्हणूनच निर्वाणाच्या कन्सर्टमध्ये यापैकी एकाच्या तरी गाण्याला स्थान असायचंच. मोठ्या रॉक बँडबरोबर टूर करता करता निर्वाणाचा जम बसला होता. मग कधी डेव्हिड बोवी तर कधी पॅट स्मिअर यांच्या साथीनं कोबेन मोठा होत गेला. 'अनप्लग्ड'च्या निमित्तानं रॉक अँड रोल नव्या प्रकारे सादर करण्याचा प्रयोगही लोकांना आवडला होता. या यशानंतर आपण यापेक्षाही जास्त चांगला अल्बम लोकांना देऊ शकतो, असा आत्मविश्वास कोबेनमध्ये निर्माण झाला. त्याच्या संगीताची भुरळ पडण्याचं कारण होतं, ते म्हणजे त्याच्या संगीतात आधी मेलडी यायची आणि नंतर शब्द.

संगीतात यशाची शिखरं काबीज करण्याचा काळ एकटेपणामुळे अधिक नैराश्याचा झाला होता. प्रेमभंगांची दु:खं तो पचवू शकत नव्हता. अशातच त्याच्या आयुष्यातलं सगळ्यात मोठं वादळ आलं होतं, ते कोर्टनी लवच्या रूपानं. गायिका कोर्टनी आणि त्यांच्या अफेअरला मीडियानं असं काही उचलून धरलं होतं, की त्याला त्यामुळे वैफल्य यायला लागलं आणि यातून मग व्यसनाधीनता. त्यातल्या त्यात चांगली गोष्ट अशी होती, की त्याच काळात त्यानं सर्वात जास्त गाणी लिहिली. 'पॉली' आणि 'सेंटलेस अप्रेन्टीस' ही त्याची गाजलेली गाणी त्याच काळातली. तो चित्रंही तेव्हाच काढू लागला. ती काही त्याच्यातल्या कलाकाराची लक्षणं म्हणता येणारी नव्हती. तर त्याला मानवी शरीर, अवयव चितारण्याचा जणू आजारच जडला होता. त्याची अनेक कोलाज, शिल्पं त्याच्या अल्बमच्या आर्टवर्कमध्ये भेटतात, तेव्हा त्याच्यातला कलाकार आपल्याला आनंद देण्याऐवजी अस्वस्थ करून जातो.

'नेव्हरमाइंड' या दुसऱ्याच अल्बममधून तो अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचला. टीव्ही व रेडिओवर गाजणारी नवी पिढी संगीतात रुजण्याचा तो काळ होता. 'निर्वाणा'नं त्या पिढीच्या नेतृत्वाचा झेंडा आपल्या हाती घेतला होता. मीडियानं मात्र त्याला फार साथ दिली नाही, हीच गोष्ट निर्वाणाच्या यशाचा अडसर ठरली आणि कर्टच्या आयुष्याचा शेवट करणारी. तेराव्या वर्षी पहिल्यांदा मार्ज्युरिना घेणारा कर्ट वेगवेळ्या मानसिक आणि शारीरिक आजारांच्या दिशेनं चालला होता. त्याचं हेरॉइनचं व्यसन प्रमाणाच्या बाहेर गेलं होतं. आजार आणि व्यसनांनी

घेरलेल्या कोबेननं ८ एप्रिल १९९४ या दिवशी स्वत:ला गोळ्या घातल्या. वयाच्या २७ व्या वर्षी तो आपल्या कल्पनेतील मित्र बुद्ध, याच्याशी गप्पा मारत होता, हे त्या दिवशी सापडलेल्या पत्रावरून लक्षात आलं.



जिमी हेन्ड्रिक्स

जिमी हेन्ड्रिक्स (२७ नोव्हेंबर १९४२-१८ सप्टेंबर १९७०)

जेम्स मार्शल जिमी हेन्ड्रिक्स असं लांबलचक नाव त्यानं छोटं करून घेतलं होतं. त्याच्या छोट्या आयुष्यासारखं; तरीही दीर्घकाळ विसरू शकता न येणारं ठरलं. अनेक काळ्या गायकांनी संगीतसृष्टीवर राज्य केलं. मात्र त्यांची जागा घेणारे नवे कलाकार जन्माला आले. पण जिमीची जागा घेणारा गिटारिस्ट अजून तरी जन्माला यायचा आहे.

जिमीचं खरं नाव जॉनी ॲलन हेन्ड्रिक्स असं होतं. त्याचे वडील दुसऱ्या महायुद्धाच्या काळात फ्रान्समध्ये लढायला गेले. युद्धात त्यांनी बजावलेल्या कामगिरीसाठी त्यांचा सन्मान करण्यात आला होता. आपल्या या कामगिरीचा त्यांना सार्थ अभिमानही होता, म्हणूनच त्यांनी आपल्या पाच मुलांपैकी थोरल्या जॉनीच्या नावात जेम्स मार्शल असा बदल करून घेतला होता. पण त्यानं काही परिस्थिती बदलणार नव्हती. कारण युद्ध संपलं तरी त्याची धग जाणवत होतीच. पाच मुलांच्या घरासाठी लागणारा पैसा आणण्यासाठी त्यांना कामही मिळत नव्हतं. शिवाय जोसेफ या त्यांच्या मुलाला जन्मत: अपंगत्व होतं. एक मुलगी आंधळी तर दुसरीलाही काही व्याधी होत्या. या सगळ्यांचं पालनपोषण करणं त्यांना कठीण झालं होतं. त्यामुळे या सगळ्यांना अगदी तीन-चार वर्षांचे असल्यापासून सांभाळ करण्यासाठी दुसऱ्याच्या घरी पाठवावं लागलं होतं.

या सगळ्या कटकटी कमी की काय, म्हणून जिमी नऊ वर्षांचा असताना त्याच्या आईवडिलांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला. त्याच्या इतर भावंडांप्रमाणे त्याच्याही आयुष्याची कुतरओढ सुरू झाली. कधी कोणाच्या तर कधी कोणाच्या अशा घरांमध्ये त्याची रवानगी व्हायला लागली. लाजाळू जिमीला त्याचे जास्त हाल होऊ नयेत म्हणून मग आजोळी पाठवलं गेलं.

जिमीचं भावी आयुष्य ढवळून काढण्यासाठी या सगळ्याच गोष्टी कारणीभूत ठरल्या. पंधराव्या वर्षी त्याच्या आईचा मृत्यू होईपर्यंत त्याला नाना परिस्थितींना, अनुभवांना सामोरं जावं लागलं. त्यानं तो बदलत गेला. त्यानंतर वडिलांकडे पोहोचवलेल्या जिमीच्या हातात पहिल्यांदा गिटार आली आणि त्याचं आयुष्य बदललं.

एल्विस प्रिस्लेचा चाहता असलेल्या जिमीनं त्याला सिएटलमधल्या स्टेजवर पाहिलं आणि आपल्या आयुष्याची दिशा ठरवून टाकली. अगदी सुरुवातीला तर तो बँड वैगरे बनवण्याच्याही नादाला लागला नाही. अनेक ठिकाणी तो आपलं संगीत लोकांना फुकट ऐकवायचा.

त्यानं आपलं शिक्षण पूर्ण केलं नाही, त्याचीही वेगवेगळी कारणं सांगितली जातात. एका गोऱ्या मुलीचा हात धरला म्हणून त्याला गारफिल्ड हायस्कूलमधून हकललं होतं, असं म्हटलं जातं. तर प्रिन्सिपलच्या मते, त्याला चांगले मार्क्सही पडत नव्हते आणि तो वर्गातही बसायचा नाही. अर्थात वर्गात न बसल्यानं काही जिमीचं फार नुकसान झालं नाही. पण दोनदा चोरीची गाडी चालवताना पोलिसांनी पकडलं आणि त्याचं आयुष्य बदललं.

शिक्षा म्हणून जिमीला दोन वर्षं जेलमध्ये काढ नाही तर सैन्यात जा, असा हुकूम देण्यात आला. त्यानं दुसरा मार्ग निवडला. याच काळात तो आपल्या बरोबरच्या जवानाच्या प्रेमात पडला होता, असं त्याच्या 'रूम फुल ऑफ मिरर'मध्ये म्हटलंय. अर्थात पुढच्या आयुष्यात त्यानं इतक्या वादग्रस्त गोष्टी केल्या, की याबाबत चर्चा करण्याचं निमित्त मिळालं नाही. मात्र लष्करातला आणखी एक मित्र बिली कोक्स याच्याबरोबरचं त्याचं म्युझिकल कोलॅबरेशन फायद्याचं ठरलं. लष्करातून परतलेल्या जिमीला मात्र आपला बँड असावा असं वाटण्यातून

तो रोज प्रयोग करत गेला. मित्र मिळाले, तशा मैत्रिणीही आणि संधी मिळाली तशी असुरक्षितता वाट्याला आली. पैसा मिळाला पण फसवणूकही नशिबी आली. तो स्टेजवर आला की मात्र सारे भान विसरून गायला लागायचे. इलेक्ट्रिक गिटारच्या आवाजाची जादू काय असते, हे ठसवून देण्याची एकही तो संधी सोडत नसे, अगदी स्टेजवर आल्याआल्या गिटार 'ट्युन अप' करण्याच्या आवाजानंही तो रसिकांना गुंग करून टाकायचा.

जिमीच्या वडिलांनी पंधराव्या वर्षी गिटार दिली तेव्हा ती शिकण्यासाठी त्याच्याकडे पैसेही नव्हते. अर्थात जिमी इतका टॅलेण्टेड होता की तशी गरजही भासली नाही. निव्वळ इतरांचं ऐकून तो तासन् तास गिटार वाजवण्याचा सराव करायचा. बरं, त्यातून तो नुसता गिटारिस्ट झाला नाही, तर डाव्या हातानं गिटार वाजवणारा जगातला एकमेव अवलिया झाला. इतकंच नाही, तर पाठीवर लावलेली गिटार वाजवण्याची कला आजवर कोणताही कलाकार आत्मसात करू शकला नाही. हे निव्वळ वाजवणं नव्हतं, तर त्यात नावीन्य होतं, जादुई संगीत होतं. संगीतांच्या कन्सर्टसाठी मोठ्या मोठ्या ॲम्पिफ्लायरची गरज वाटायला लागली जिमीपासून. जिमीच्या गिटारवादनाचं कौशल्य ही एक अनुभवण्याची गोष्ट होती. पण स्टेजवर तासन् तास उभं राहण्याचा स्टॅमिना ही गोष्ट जशी अन्य कलाकारांना व्यसनाच्या आहारी जाण्यास भाग पाडणारी ठरायची, त्याची गरज जिमीलाही वाटू लागली. आपल्याच नशेत आणि मस्तीत चूर असलेला जिमी अमली पदार्थांच्या आहारी गेला.

जिमीही कर्टप्रमाणे शिक्षण अर्धवट सोडून संगीताच्या मागे लागलेला. तोही स्वत:च्या कल्पनाविश्वात रमलेला असायचा. त्याच्या 'जिमी हेन्ड्रिक्स एक्सपिरिअन्स बँड'नं जगभरात प्रचंड नाव कमावलं. चाहत्यांच्या गर्दीत कायम असलेल्या जिमीचा, १८ सप्टेंबर, १९७० रोजी लंडनच्या समरकंद हॉटेलमध्ये मृत्यू झाला तेव्हा मात्र त्याच्याबरोबर कोणी नव्हतं. त्यानं झोपेच्या गोळ्या घेतल्याचं शवविच्छेदनात आढळलं. परंतु ते काही त्याच्या मृत्यूचं नेमकं कारण नव्हतं. त्याचा संबंध जोडता येतो तो त्याच्या एलएसडी, चरस ओढणं, हेरॉइन घेण्याशी. अर्थात त्याच्या मॅनेजरनंच त्याचा खून केला असण्याच्या शक्यतेचा दावाही वाद निर्माण करणारा ठरला. काही झालं तरी जिमीइतक्या उंचीचा आणि लोकप्रियतेचा कलाकार अद्याप झालेला नाही, हे सत्यच.

जेनिस जोपलिन (१९ जानेवारी १९४३ – ४ ऑक्टोबर १९७०)

आजच्या घडीला प्रत्येक गायिकेला जिचा हेवा वाटू शकेल अशी गायिका म्हणजे जेनिस जोपलिन. अर्थात ज्या



जेनिस जोपलिन

प्रकारे जेनिसनं आपला शेवट करून घेतला, तसा शेवट कोणालाही आपल्या वाट्याला येऊ नये असं नक्की वाटेल.

तो काळ १९७० चा. आजूबाजूला सगळेच हार्ड रॉक बँड होते. तिनं मात्र स्वत:ला फंकी, पॉप गाण्याशी जोडून घेतलं होतं. त्यातूनच 'बिग ब्रदर बँड' आकारास आला. त्या बँडबरोबर कन्सर्ट केल्यानंतर फार योग्यता नसलेल्या सहकाऱ्यांबरोबर परफॉर्म करतेय, याची जाणीव तिला लोकांनी करून दिली. त्यानंतर तिनं स्वत:चा 'कॉस्मिक ब्ल्यू बँड' स्थापन केला.

उत्तम गायिका असलेली जोपलिन आपल्या परफॉर्मन्सनं प्रेक्षकांचं मन जिंकून घ्यायची. पण १९६९ च्या सुरुवातीला ती हेरॉइन घेऊ लागली. अर्थात त्याची गरज तिला स्टेजवरच्या स्टॅमिन्यासाठी वाटू लागली होती. तिची मैत्रिणी पेगी कॅसर्टा हिनंच तिला अल्कोहोल आणि अमली पदार्थांची ओळख करून दिली. १९६९ मध्ये वूडस्टॉकमध्ये झालेली कन्सर्ट त्याची साक्ष ठरली. या कन्सर्टवेळी तयार केलेल्या व्हिडिओ फूटेजमधून ते लोकांसमोरही आलं होतं. अर्थात जोपलिन त्यावेळी स्वत:ला त्याचा दोष देत होती. मात्र दोनशे डॉलर्सच्या बदल्यात मिळणारं हेरॉइन ती रोज घ्यायला लागली होती. काही दिवसांत तिचा कॉन्सर्टमधला परफॉर्मन्स फसत गेला आणि अमली पदार्थांपासून दूर राहावं, यासाठी ती ड्रग्ज आणि ते घेणाऱ्या मित्रांपासून दूर राहू लागली. टीव्हीवर सातत्यानं तिच्या बँडचे कार्यक्रम होत. त्यावेळी अनेक

मुलाखतींतून आपल्या आयुष्यातला गायिका म्हणून केलेल्या संघर्षाचा काळ किती कठीण होता, हे ती सांगत असे.

अमली पदार्थांपासून दूर गेलेल्या जोपलिनला जगभर प्रवास करण्याची आवड असलेल्या डेव्हिड निहॉसची साथ मिळाली. तो अमली पदार्थांपासून दूर राहणारा. एके दिवशी त्यानं तिला अमली पदार्थ घेताना पाहिलं आणि ते संबंध कायमचे संपुष्टात आले. वर्षभर ब्राझीलमध्ये डेव्हिडबरोबर राहिलेली जोपलिन पुन्हा अमेरिकेत 'फुल टिल्ट बुगी बँड' नावाच्या नव्या बँडसह अवतरली. अमली पदार्थांनी तिचा ताबा सोडलेला नव्हता. त्यामुळेच १९७०मध्ये बोस्टनच्या हार्वर्ड स्टेडियममध्ये झालेल्या कन्सर्टमध्ये ती फक्त दोनच गाणी सादर करू शकली.

त्यानंतर १९७१मध्ये आलेला 'पर्ल' हा तिचा अल्बम सर्वाधिक खपाचा ठरला. ते तिचं टोपण नाव होतं. त्यावेळी तिचा प्रियकर क्रिस क्रिस्तोफर्सनच्या अल्बमसाठी लिहिलेल्या 'मूव्ह ओव्हर' या गाण्यात, तिनं पुरुष स्त्रियांना कशी वागणूक देतात याविषयीच्या भावना व्यक्त केल्या होत्या. तिच्यातली स्त्री, कलावंत आणि परफॉर्मर कायम जागती होती, याची साक्ष देणारं गाणं होतं ते.

३ ऑक्टोबर १९७० रोजी लँडमार्क मोटार हॉटेलच्या पार्किंग लॉटमधील एका कारमध्ये तिचा मृतदेह आढळला. अर्थात त्याचं वेगळं कारण सांगायची गरज नाही. तिचा मृत्यू झाला तो १९७० सालचा ऑक्टोबर महिना संगीतक्षेत्राला आणि तिच्या चाहत्यांसाठी धक्का देणारा होता. बरोबर सोळा दिवस आधी रॉक आयकॉन जिमी हेन्ड्रिक्सचा मृत्यू झाला होता. जिमीच्या मृत्यूचं कारण आजवर गुलदस्त्यात असलं तरी जोपलिनचा मृत्यू हेरॉइनच्या ओव्हरडोसमुळे झाला होता, हे उघड झालं.

तिचं सारं आयुष्य खूप नाट्यमय होतं. जेनिसच्या आयुष्यावर किमान डझनभर पुस्तकं आणि तेवढेच सिनेमे सापडतील. १९७९ मध्ये आलेला चित्रपट 'द रोझ' तिच्याच आयुष्यावर बेतलेला होता. त्यावेळी तिच्या कुटुंबानं तिच्यावर सिनेमा बनवू नये, अशी ठाम भूमिका घेत तिच्या आयुष्यावरील कथांचे हक्क निर्मात्यांना देण्याचं नाकारलं. मग तिच्या आयुष्यावर बेतलेली काल्पनिक कथा रचली गेली. त्यात बेट मिडलरनं तिची भूमिका साकारली आणि त्या भूमिकेसाठी सर्वोत्तम अभिनेत्रीसाठीचं ऑस्कर नामांकनही मिळालं.

सहाव्या दशकाच्या उत्तरार्धात जेव्हा संगीतक्षेत्रात पुरुषांचं वर्चस्व होतं, अशा वेळी तिचं त्यांच्या बरोबरीनं तिथे असणं हेच तिचं मोठं योगदान मानता येईल. रंगीत केस, टॅट्यू, मोठ्या मण्यांच्या माळा आणि पिसांचा फॅशन स्टेटमेंट म्हणून वापर करणारी ही साठच्या दशकातली गायिका, पुढच्या दशकांतल्या गायक आणि परफॉर्मर्ससाठी स्टाइल आयकॉन ठरली.

जिम मॉरिसन (८डिसेंबर १९४३ - ३ जुलै १९७१)

जेम्स डग्लस जिम मॉरिसन नावाच्या या गायकाचा मृत्यू इतका वादग्रस्त ठरला, की आजही त्याचा मृत्यू कशानं झाला हे लोकांसमोर आलेलं नाही. तो 'द डोअर्स' या बँडचा प्रमुख गायक. त्याचबरोबर कवी म्हणून त्याचं नाव गाजलं.

स्वत:च लिहिलेल्या कविता प्रत्यक्ष कन्सर्टमध्ये सादर करताना इम्प्रोवाइज करण्याच्या त्याच्या खास शैलीमुळे तो लोकप्रिय झाला. जगातला सगळ्यात जास्त आयकॉनिक आणि करिश्मॅटिक असा परफॉर्मर म्हणून त्याचं नाव घेतलं जातं.

तो चार वर्षांचा असताना त्यानं एका रेड इंडियन कुटुंबाचा अपघात पाहिला होता आणि त्याच प्रसंगावरून त्याने लिहिलेलं गीत 'डॉन्स हायवे' प्रचंड गाजलं. ते गाणं ज्या अल्बममधील होतं त्याचं नाव होतं 'अॅन अमेरिकन प्रेअर'. अर्थात त्याच्या 'पिस फ्रॉग' आणि 'घोस्ट सॉंग' या गाण्यातून याच अपघाताच्या प्रसंगाची झलक मिळते. प्रत्यक्षात असा कोणताही प्रसंग घडला



**जिम मॉरिसन**

नव्हता, असं त्याचे कुटुंबीय सांगतात. सांगायचं तात्पर्य काय, तर तोही कर्ट कोबेनप्रमाणे आपल्याच कल्पनाविश्वात दंग असे. भोवतालच्या स्थितीत आपण टिकून राहणार नाही म्हणून स्वत:ला सभोवतालच्या जगापासून तोडून एका वेगळ्याच कोशात राहिला. कर्ट आणि त्याच्या आयुष्यात बरंच साम्य होतं.

जिम नऊ वर्षांचा असताना त्याचे आईवडील विभक्त झाले. ही गोष्ट त्याच्या आयुष्याला कायम चटका लावून गेली. मुळात तो खोडकर मुलगा होता. पण त्याच्या वयाच्या मानानं बुद्धिमत्ता अफाट होती. त्याचा खोडकरपणा बंडखोरीत परावर्तित झाला तो कलाकार म्हणून. त्याचा कलाकार म्हणून खूप गवगवा जरी झाला तरी त्याच्यासाठी आयुष्यातलं वैफल्य जास्त प्रभावी ठरलं. त्याच्या सहकाऱ्यामुळे त्याचा संबंध महर्षी महेश योगी यांच्याशी आला, पण त्याला मेडिटेशन करणं जमत नाही, असं सांगून तो सगळ्यापासून दूरच राहिला.

रॉकस्टार या गोष्टीला त्यानं एक वेगळीच इमेज दिली. तोवर लेदर पँट घालून स्टेजवर येणारे रॉकस्टार जिमनं संपवून टाकले. टी-शर्ट, जीन्स अशा पेहरावाला त्यानं रॉक म्युझिकशी जोडलं. त्याबरोबरीनं अल्कोहोल आणि अमली पदार्थांमुळे झालेला मृत्यूही तितकाच चर्चेचा विषय ठरला. ड्रग्जच्या ओव्हरडोसमुळेच त्याचा मृत्यू झाला असल्याचा संशय व्यक्त केला गेला. मात्र त्याचं शवविच्छेदन न करण्याच्या निर्णयामुळे त्याच्या मृत्यूविषयीचं गूढ कायम राहिलं.

या सगळ्याच कलाकारांचा शेवट त्यांना 'क्लब २७'मध्ये नेणारा ठरला. कर्ट असो नाही तर जिमी, जिम मॉरिसन किंवा जोपलिन सगळे असामान्य होते. सगळ्यांच्या आयुष्यात आईवडिलांचं विभक्त होणं होतं. तुटलेले नातेसंबंध होते. ती कलावंत म्हणून घेतलेली भरारी कोणालाही हेवा वाटावा अशी होती. माणूस म्हणून भोवतालच्या परिस्थितीशी जुळवून घेणं त्यांना शक्य झालं नाही. कधी ही कारणं त्याच्या स्वभावातल्या दोषांच्या मुळावर आली, तर कधी आजूबाजूच्या लोकांनी त्यांचं जगणं अवघड करून टाकलं. कारणं काही असोत, 'क्लब २७'मध्ये आपलंही नाव असावं असं कोणा कलाकाराला वाटू नये, अशी अपेक्षा संगीताच्या प्रत्येक चाहत्याला करावीशी वाटेल, हे मात्र नक्की.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व)-४२१५०१
aparna.patil1@gmail.com

**दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा**

**महाराष्ट्र इलेक्ट्रिकल्स इंडस्ट्रीज**

ठाणे

# अबफाल विरशाफ्ट

संगीता उत्तम धायगुडे

मी भूमिभरावाची माहिती घेत होते. त्यावेळी त्यांच्यापैकी एकानं 'भारतात भूमिभराव असतात का?' या सहज विचारलेल्या प्रश्नानंही मला वाईट वाटलं. आमच्याकडे कचरा डंपिंग ग्राउंडवरच डंप केला जातो असं सांगण्याशिवाय माझ्याकडे पर्याय नव्हता. परंतु त्याला डंपिंग ग्राउंड म्हणजे काय हेच माहीत नव्हतं, म्हणून फ्रँकनं त्याला सांगितलं की 'आपल्याकडे जी ५०-६० वर्षांपूर्वी कचरा एकत्र फेकण्याची जागा असायची. तशीच पद्धत त्यांच्याकडे आहे, त्याला डंपिंग ग्राउंड म्हणतात.'

फ्रँकफर्टला पोहोचताच प्रथम डोळ्यांत भरली ती शहराची सुंदरता आणि अतीव स्वच्छता. आमची गाडी फ्रँकफर्टहून सारब्रुकनच्या रस्त्यानं धावू लागली आणि दोन्ही बाजूच्या पांढऱ्याशुभ्र बर्फात न्हात असलेल्या डोंगरदऱ्यांनी माझं लक्ष वेधून घेतलं. मार्च महिना असल्यानं टेंपरेचर उणे सात होतं. घरांची छपरं, झाडांच्या फांद्या, रस्ते, बागा, सगळीकडे फक्त गच्च बर्फ साचलं होतं. गाडीच्या बंद काचांमधूनही ते दृश्य पाहताना थंडीची शिरशिरी येत होती. मोठाले भव्य, गुळगुळीत रस्ते आणि कसलंच ट्रॅफिक नाही, याचं आम्हा मुंबईकरांना अप्रूप वाटत होतं. माझ्या रूममध्ये पाहोचले आणि खिडकीतून बाहेर पाहिलं तर समोर एक ऐटदार वळणाचा रस्ता आणि त्याच्या दोन्ही बाजूंना गच्च बर्फ साचलेलं दिसलं. लागलीच माझ्या मनात प्रश्न डोकावला... रस्त्यावरचं प्रचंड बर्फ रोजच्या रोज कसं काढत असतील? डाव्या बाजूला दाट जंगल होतं, पण झाडांवर एक पान असेल तर शपथ. फ्रेश व्हायला गेले तर कळलं, की जर्मनीमध्ये सर्व ठिकाणी सर्व नळांना २४ तास गरम पाणी उपलब्ध असतं. सर्वच काही अचंबित करायला लावणारं आणि गमतीचं होतं. कँटिनमध्ये गेले तर एखाद्या रेस्टॉरंटप्रमाणे स्वच्छ आणि सुंदर कँटिन पाहून नवल वाटलं. आपल्या आणि त्यांच्या शिस्तीतला फरक पदोपदी जाणवत होता. प्रत्येक गोष्ट माझ्या कुतूहलाचा आणि उत्सुकतेचा विषय झाली होती. रस्त्यावरचं बर्फ कसं उचललं जात असेल? एवढ्या मोठ्या प्रमाणात गळणारी झाडांची पानं कशी गोळा करत असतील? रस्ते किती वेळा झाडत असतील? कँटिनचं खरकटं अन्न कुठे जात असेल? माश्या-मच्छरांचा मागमूसही कसा नाही? कुठेही उघडं गटार कसं दिसलं नाही? झोपडपट्टी न दिसल्यानं तर अगदीच चुकल्यासारखं वाटत होतं. जर्मनीत पाऊल ठेवताच आजूबाजूच्या परिसरानंच खरं तर मला प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली होती. हे सर्व पाहताना मनात सतत एकच प्रश्न डोकावत होता, की जी स्वच्छता जर्मनीत आहे ती आपल्याकडे का नाही? म्हणून मग जर्मनीतील एक वर्षाच्या प्रशिक्षणापैकी तीन महिने जे प्रॅक्टिकल ट्रेनिंग होणार होतं ते हाच विषय घेऊन करावं असं वाटू लागलं.

जर्मन गव्हर्नमेंटच्या स्कॉलरशिपवर २००६ साली जर्मनीत

'सस्टेनेबल सिटी प्रोग्रॅम' या एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी माझी नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत निवड झाली होती. तिथे इनवेंट या संस्थेमार्फत मला नागरी समस्येचा अभ्यास करायचा होता. या ट्रेनिंगसाठी आमच्या ग्रूपमध्ये ८-१० देशांचे मिळून १८ विद्यार्थी होते. संपूर्ण प्रशिक्षण जर्मन भाषेत होणार असल्यानं प्रथम त्या भाषेवर प्रभुत्व मिळवणं गरजेचं होतं. सारब्रुकन, मानहाईम, कोलोन, स्टुटगार्ट, बर्लिन असा प्रत्येक शहरात दोन ते तीन महिने मुक्काम असणार होता. इनवेंट संस्थेत आमच्या ग्रूपप्रमाणेच अनेक ग्रूप्सचे असे मिळून हजारो विद्यार्थी अनेक विषयांत प्रशिक्षण घेत होते.



पहिल्या रांगेत डावीकडे संगीता उत्तम धायगुडे

जर्मनीत गेल्यानंतर दुसऱ्याच महिन्यात, सारब्रुकनला असताना 'इनवेंट' आणि 'जीका' या जर्मन-जपानी संस्थांची कॉन्फरन्स बर्लिनमध्ये होती. या कॉन्फरन्समध्ये पेपर वाचण्यासाठी सर्व ग्रूप्सच्या हजारो विद्यार्थ्यांमधून मंगोलियाच्या सुवदाची आणि माझी निवड झाली. जर्मनीतील इन्फ्रास्ट्रक्चर पाहून मी भारावले होतेच, त्यामुळे भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थामधील मूलभूत सुविधांवर- विशेषतः स्वच्छता, पाणीपुरवठा यांवर- भर असणारा पेपर मी तयार केला. बर्लिनच्या कॉन्फरन्समध्ये मी तो पेपर वाचल्यानंतर अमेरिकेच्या क्लाउडियाची पटकन उमटलेली, 'इट वॉज एक्सलंट' अशी प्रतिक्रिया ऐकून आणि पेपर वाचल्यानंतर हॉलमधील सर्वांनाच मुंबईबद्दल आणखी जाणून घेण्याची उत्सुकता वाढलेली दिसली हे पाहून कणाकणानं माझा निश्चय दृढ होत गेला आणि घनकचरा व्यवस्थापन विषयाचाच अभ्यास करावा, असं तीव्रतेनं वाटू लागलं.

पहिले पाच महिने माझं फक्त जर्मन भाषेचं शिक्षण चालू होतं. सारब्रुकन आणि मानहाईम इथे सी.डी.डी. संस्थेत ते पूर्ण केलं. जर्मनीला येताना जरी आम्ही थोडंफार हाय-हॅलो एवढं शिकलो असलो, तरी सविस्तर आणि कार्यालयीन भाषा शिकत असताना सर्वांना जड जात होतं. त्यातून रोज नवनवीन किस्से घडत होते. कधी कधी तर ते फारच मजेशीर असत. आमच्या ग्रूपमध्ये चिनचा युँ मियाव नावाचा मुलगा होता. त्याची जर्मन भाषेची घोकंपट्टी सतत चालू असे. एक दिवस आम्हाला मॅडमनं 'निश्ट' हा शब्द शिकवला. त्याचा अर्थ 'नाही' किंवा 'नको.' त्याच दिवशी मियावनं तो वापरायचा ठरवलं. आम्ही कँटिनमध्ये जेवायला गेल्यानंतर त्यानं प्लेट पुढे केली. वाढणाऱ्या बाईंनी विचारलं, 'काय हवंय'? त्याला म्हणायचं होतं, की 'इश मोष्टं लॅम्ब निष्ट' म्हणजे 'मला लॅम्ब नको.' परंतु तो 'इश मोष्टं लॅम्ब.' इतकंच म्हणाला. त्याचा अर्थ झाला 'मला लॅम्ब हवी', आणि त्याला 'निष्ट' हा शब्द काही केल्या आठवेना! तो आठवायचा प्रयत्न करू लागला. तोपर्यंत त्या बाईंनी त्याला मोठी प्लेट भरून लॅम्ब वाढली होती. मग काय! त्याला ती गुपचूप खावीच लागली. तो लॅम्ब खात राहिला आणि आम्ही पोट धरून हसत सुटलो. असे गमतीदार प्रसंग नेहमी येत असले तरी आमची जर्मनमध्ये प्रगती मात्र चांगली चालू होती.

पाच महिन्यांनंतर 'अक्षय नागरी विकास' या विषयाचे रोजचे सेमिनार्स जर्मन भाषेमध्ये सुरू झाले. माझ्या कामकाजाशी संबंधित म्हणजेच घनकचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, इलेक्ट्रीसिटी, संगणकीकरण, वेस्ट वॉटर ट्रीटमेंट असं सेमिनारचं स्वरूप होतं. त्यातून जर्मनीतल्या कामकाजाची माहिती मिळत होती पण साइट व्हिजिट्समध्ये वेस्ट वॉटर ट्रीटमेंट प्लाण्ट, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सेपरेशन ऑफ सॉलिड वेस्ट, कंपोस्टिंग प्लाण्ट, इन्सिरेशन प्लाण्ट अशा अनेकविध कंपन्यांना आम्ही भेटी देत होतो; त्या जास्त प्रभावी वाटत होत्या. म्हणतात ना, 'दहादा ऐकण्यापेक्षा एकदा पाहणं जास्त फायद्याचं ठरतं' आणि खरंच होतं ते. त्यामुळे इनडोअर सेमिनार्सपेक्षा साइट व्हिजिट्समध्येच मी जास्त रमत होते. आपल्याकडे अजूनही ना घरात घनकचऱ्याचं वर्गीकरण अंमलात आलं आहे, ना डंपिंग ग्राऊंडवर. जर्मनीत मात्र त्याबाबतीत फारच पुढारलेपण आढळून आलं. जर्मनीत प्रत्येक घरात तयार होणारा कचरा तिथेच म्हणजेच उत्पत्तीच्या ठिकाणीच दहा ते बारा प्रकारे वेगळा केला जातो. मला सुरुवातीला त्यावर विश्वास ठेवणं कठीण होतं. वर्गीकरणाच्या या शिस्तबद्ध पद्धतीनं मी खूपच भारावून गेले. बरं, हा वर्गीकरण केलेला कचरा, कंपनीत जाऊन पुन्हा वर्गीकृत होतो आणि मगच रिसायकलिंगला पाठवला जातो. डंपिंग ग्राऊंड हा प्रकार तर कुठंच नव्हता, होते ते शास्त्रशुद्ध भूमिभराव. कचऱ्याचं संपूर्ण रिसायकलिंग होत असल्यानं एखाद टक्का कचराच भूमीभरावाला जात होता. त्याचीदेखील शास्त्रशुद्ध पद्धतीनं विल्हेवाट लावून भूमिभरावाच्या शेवटच्या प्रक्रियेत वृक्षारोपण करून तिथं जंगल विकसित केलं जातं होतं. त्यामुळं

कधी तिथे भूमिभराव केला होता हे कुणाला सांगूनही खरं वाटणार नाही. यांच्या या व्यवस्थापनाचं कौतुक तर वाटत होतंच, शिवाय ते पाहताना आपल्या देशात या कामास लवकर सुरुवात झाली पाहिजे असंही वाटत होतं. सात महिन्यानंतर प्रॅक्टिकल ट्रेनिंगसाठी म्हणजेच घनकचरा व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी मी स्टुटगार्टला पोहोचले.

स्टुटगार्ट शहर एखाद्या द्रोणासारखं वसलं आहे. मुख्य मार्केट व मुख्य स्टेशन हे खोल भागात आहे व शहराचा बराचसा भाग हा बाजूच्या डोंगरांवर विखुरलेला आहे. या डोंगरांवर वायनरीचे मळेदेखील प्रचंड प्रमाणात आहेत. स्ट्रासबानमधून प्रवास करताना नयनरम्य वायनरीचे मळे आणि खाली द्रोणात दिसणारे शहराचे लुकलुकते दिवे हमखास लक्ष वेधून घेत. झाडांची रंगपंचमी अगदीच बहरात आली होती. नारिंगी आणि लालसर रंगांची पानांनी लगडलेली झाडं उंचावरून पाहिली, की जंगलातील झाडांचा रंगीबेरंगी गालिचाच खाली पसरलाय असं वाटतं. थंडी म्हणावी तितकी नव्हती आणि नुकतीच पानगळही सुरू झाली होती. मी स्टुटगार्ट म्युनिसिपल कॉर्पोरेशनमध्ये (जर्मनमध्ये 'राट हाउस' म्हणतात) हजर झाले. राट हाउसच्या 'अबफाल विरशाफ्ट, स्टुटगार्ट' अर्थात 'घनकचरा व्यवस्थापन विभाग, स्टुटगार्ट' या विभागात जॉईन झाले. जर्मन काही बाबतीत फारच कट्टर असतात. त्यांची भाषा, रिझर्व्हड् असणं, टू द पॉइंट असणं, तसंच कमालीचं पंक्चुअल आणि शिस्तबद्ध असणं. माझा इंटरव्ह्यू जर्मन भाषेतून झाला आणि डायरेक्टर भलतेच खूश झाले. त्यांनी मी बोलत असलेल्या जर्मनबद्दल चक्क मला सॅल्युट ठोकला! सुरुवात तर चांगली झाली म्हणून समाधान वाटलं. कचऱ्याची विल्हेवाट कशी लावली जाते हे लांबून माहीत असलं, तरी आता प्रशिक्षणात जवळून प्रत्यक्ष शिकता येत होतं. ट्रेनिंगची सुरुवात स्टुटगार्टच्या सर्व सिस्टर-सिटींच्या एकत्र कॉन्फरन्सनं झाली. स्टुटगार्ट महापालिकेनं अनेक देशांतील महापालिकांबरोबर सहकार्याचे करार केले आहेत. ज्या शहरांबरोबर असे करार झालेत त्यांना स्टुटगार्टच्या सिस्टर-सिटी म्हणतात. मुंबईदेखील स्टुटगार्टची सिस्टर सिटी आहे. सिस्टर सिटी असल्यानं मुंबईतर्फे स्टुटगार्टमध्ये बॉलिवूड फेस्टिवल भरवण्यात येतं, तर स्टुटगार्टतर्फे मुंबईत वाइन फेस्टिवल भरवण्यात येतं. या कॉन्फरन्सचं आमंत्रण मुंबईला गेलं होतं. परंतु मुंबई महापालिकेकडून आयुक्त किंवा महापौर कोणीच येणार नसल्याचं कळवलं गेलं होतं. त्यामुळे स्टुटगार्ट महापालिकेतर्फे मुंबईची प्रतिनिधी म्हणून मला आमंत्रित करण्यात आलं. तीन दिवसांच्या कॉन्फरन्सनंतर शेवटच्या दिवशी एका युथ हॉस्टेलमध्ये डिनर होतं. युथ हॉस्टेलमधील एका हॉलला भारताचं नांव दिलं होतं आणि हॉलमध्ये राजस्थनी बांधणीच्या सजावटीमधे 'तिरंगा' फडकताना पाहून, माझा ऊर अभिमानानं भरून आला.

जर्मनीत आल्यापासून मी, लोकांचं काटेकारपणे शिस्त पाळणं, स्वच्छतेचं महत्त्व आणि सिगारेटचं थोटुक असो, की बसचं तिकीट खिशात ठेवून नंतर ते कचऱ्याच्या डब्यातच टाकणं, हे पाहत आले होते. सार्वजनिक ठिकाणी, बागेत, रस्त्यांवर, बाजारात, गल्लीत, सार्वजनिक संडासात कुठेही कणभर कचराही नजरेस पडत नव्हता. जर्मनीतले भिकारीदेखील रोज स्वच्छ आंघोळ करून, अत्यंत महागडे कपडे घालून, हातात ब्रिफकेस घेऊन बाहेर पडतात. बऱ्याचदा, एखादा माणूस रेल्वे स्टेशन, बस स्टॉपवर ऑफिसरच्या थाटात हातात बॅग किंवा खांद्यावर सॅक घेऊन उभा असे आणि अचानक कचऱ्याच्या डब्यात हात घालून काही मिळतं का ते पाही किंवा एखादा अचानक समोर येऊन सिगारेट किंवा बियर प्यायला पैसे मागत असे, तेव्हा कळायचं की हा भिकारी आहे. जर्मन लोक अशा भिकाऱ्यांना हुसकावून लावत नाहीत तर त्याला सिगारेट देतातच, स्वतःच्या लायटरनं पेटवूनदेखील देतात. मी मनात म्हणायचे, की आमच्या देशात या आणि दाखवा भिकाऱ्यांचे असे लाड करून! भिकाऱ्यांची कित्येक किलोमीटरची रांगच लागेल.

एका नव्या औत्सुक्यानं माझ्या प्रक्टिकल ट्रेनिंगला सुरुवात झाली. घरातच दहा ते बारा प्रकारे वर्गीकरण कसं करतात, हे पाहायला मिळू लागलं. घरोघरी सर्व कचरा शिस्तबद्ध पद्धतीनं साठवला जात होता आणि नंतर त्याची विल्हेवाट लावली जात होती. घरात तयार होणारा 'ओला', 'सुका' व 'पेपरचा' असा कचरा वेगळा ठेवून इमारतीबाहेर ठेवलेल्या तीन कुंड्यांमध्ये टाकला जात होता. ओला (नाशवंत) कचरा हा राट हाउसकडून रोज उचलला जातो. तो कंपोस्ट खत बनवण्यासाठी कंपनीत नेला जातो. पेपरच्या कचऱ्याचे डबे आठवड्यानं एकदा उचलले जातात व तो कचरा रिसायकल कंपनीत जातो. सुका कचरा म्हणजे 'रेस्ट म्युल'; जे तिसऱ्या डब्यात टाकले जाते. तो कचरा तीन दिवसांनी उचलला जातो. तो सर्व इन्सिरेशन प्लॅन्टला नेला जातो. तिथे तो बंद इन्सिरेशन प्लॅन्टमध्ये जाळून त्यापासून वीज निर्माण केली जाते. त्यातूनच संपूर्ण शहराला वीजपुरवठा होतो. वीजनिर्मितीची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर जी राख उरते, ती डेपोनी म्हणजेच शास्त्रशुद्ध भरावभूमीवर नेली जाते. तसंच ज्यावर रिसायकलची खूण असते तो सर्व रिसायकलेबल कचरा- पत्र्याचे डबे, प्लास्टिकच्या वस्तू असा वेगळा, 'पिवळ्या पिशवी'मध्ये (गेल्ब जाखं) जमा केला जातो. दर पंधरा दिवसांनी काही शहरांत ठेकेदाराकरवी तर काहींमध्ये राट हाउसद्वारे गाडी पाठवून ही गेल्ब जाखं उचलण्यात

येतात. जर्मनीत सरबतं, पाण्यासाठीदेखील काचेच्या बाटल्या वापरात असल्यानं आणि मद्यसेवन सर्वमान्य असल्यानं टाकाऊ 'काचेच्या बाटल्यांचं' प्रमाण खूप जास्त असतं. सर्व प्रकारच्या बाटल्या एकत्र जमा न करता, वेगवेगळ्या जमा केल्या जातात. प्रत्येक रंगाच्या काचेच्या बाटलीसाठी त्याच रंगाचा कचऱ्याचा डबा असतो. ते डबे रस्त्यावरच्या चौकात ठेवलेले असतात. पुरुषभर उंचीच्या या हिरव्या, पिवळ्या डब्यांमध्ये त्या त्या रंगाच्या बाटल्या टाकल्या जातात. उरलेल्या सरबतांच्या, तेलाच्या वगैरे बाटल्या दुकानात खरेदीला गेल्यावर काउंटरवरच्या मशीनमध्ये टाकतात आणि त्याचे ठरावीक पैसे मशीनमधून बाहेर पडतात किंवा कूपन्स मिळतात. ते देऊन इतर सामान खरेदी करता येतं. इलेक्ट्रॉनिक वस्तूंपासून तयार होणारा कचरा म्हणजे 'इ-वेस्ट'साठी, राट हाउसनं शहराबाहेर एखादं कलेक्शन सेंटर उभारून वेगळी सोय केलेली असते. घरात, ऑफिसेस आणि कंपन्यांमध्ये निर्माण होणारा कचरा हा वेगवेगळा जमा करून तिथे नेला जातो. तिथे तो ट्युब्ज, टी.व्ही, संगणक, इस्त्री आणि मशीनचे पार्टस् वगैरेसारख्या वस्तू असा कचरा वेगवेगळ्या भागांमध्ये साठवला जातो. वर्गीकरण केलेला हा कचरा रिसायकलिंगला पाठवला जातो. 'हजार्डस वेस्ट' म्हणजे वापरून उरलेले रंग, फोनच्या व इतर बॅटरीज, तसंच दूषित व विषारी वस्तू या घरात वेगळ्या साठवल्या जातात. दर तीन आठवड्यांनी कॉर्पोरेशनची एक लांब, मोठी गाडी येऊन ठरावीक ठिकाणी उभी राहते. ज्यांच्याकडे असा कचरा साठलेला आहे त्यांनी तो त्या गाडीत आणून टाकायचा असतो. आणि जर तो चुकून का होईना, इतर कचऱ्यात टाकला तर भल्या मोठ्या रकमेचा दंड भरायला तयार राहायचं असतं.

घरातलं जुनं फर्निचर असो की दुकानातलं किंवा कंपन्यांचं. ते कुठेही, कसंही टाकण्याची परवानगी नाही. एक



'हजार्डस वेस्ट' जमा करण्याचे वाहन



हिरव्या, पिवळ्या डब्यांमध्ये त्या त्या रंगाच्या बाटल्या टाकल्या जातात.

तर ते कुणा गरजूला द्यावं किंवा मग दर सहा महिन्यांनी राट हाउसनं जाहीर केलेल्या दिवशी ते फूटपाथवर आणून ठेवावं लागतं. त्या ठरलेल्या दिवशी राट हाउसचे लोक येऊन ते उचलून नेतात. त्याचप्रमाणे जुने कपडेदेखील कचऱ्यात टाकायला मज्जाव असतो. ते एक तर चर्चसारख्या धर्मादाय संस्थांमध्ये नेऊन दिले जातात व तिथून ते आफ्रिकेतल्या मागास देशांतील गरिबांसाठी पाठवले जातात किंवा फर्निचरप्रमाणेच कपडेही उचलण्यासाठी राट हाउसची गाडी येते, त्यादिवशी ते बाहेर ठेवले जातात. हा सर्व प्रकारचा कचरा जेव्हा डब्यात किंवा गाडीत टाकला जातो, त्यानंतर कोणत्याही प्रक्रियेत माणसाच्या हाताला कचऱ्याचा साधा स्पर्शही होत नाही. सर्व कामे मशीनद्वारे होतात त्यामुळे हे सर्व पाहताना मला एखाद्या परग्रहावर आल्यासारखं वाटत होतं.

कचरा उचलणाऱ्या गाड्या आणि रस्तेसफाईच्या मशीन्स यांच्याबरोबर जाऊन प्रत्यक्ष काम पाहण्यासाठी माझा आग्रह होता. मर्सिडीज कंपनीच्या त्या वाहनांमधून प्रवास करताना कुठेही कचऱ्याशी किंवा अस्वच्छतेशी संबंध येत नव्हता, त्यामुळे कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांची इच्छा नसतानाही मी वाहनांमधून प्रवास करून प्रत्यक्ष पाहणी करत होते. रस्तेसफाईसाठी सर्वच ठिकाणी लहान रस्त्यांसाठी लहान मशीन्सचा व मोठ्या रस्त्यांसाठी मोठ्या मशीन्सचा वापर केला जात होता. पाण्याच्या टँकरसारख्या दिसणाऱ्या या मशीन्सच्या खाली गोल ब्रश असतात, त्यानं कचरा आणि घाण (जी मुळात नसतेच) साफ करून, पाईपद्वारे कचरा शोषून घेऊन तो वर टाकीत जमा होतो. त्यानंतर मशीननं रस्त्यावर पाण्याचा फवारा मारला जातो. कचराकुंड्या उचलणाऱ्या गाड्या आणि रस्तेसफाईच्या वाहनांमध्ये ड्रायव्हरला मागचं सर्व दिसेल असा एक टीव्ही असतो. त्यामुळे ड्रायव्हर एकटा सर्व कामं करू शकतो. बागेतली पानगळ असो की फूटपाथ; कुठेही मनुष्यबळानं सफाई न होता

फक्त मशीनद्वारेच केली जाते.

ऑक्टोबरमध्ये झाडांची तांबुसलेली, गुलाबी, पिवळी पानं गळू लागतात. सुख आणि दुःख एकाच ठिकाणी भेटावं तशी पानं गळल्यानं झाडं कोरडी-बोडकी होतात आणि रस्ते रंगीबेरंगी पानांच्या रंगपंचमीनं फुलून येतात. रस्त्यांच्या कडेनं, बागांतून चालताना या सुंदर पानांतून पाय ओढत चालणं खूपच मजेशीर वाटतं. या दिवसांत सर्व फूटपाथ आणि बागा पानगळीनं भरून जातात. पानगळीची स्वच्छता कॉर्पोरेशनचे लोक मॅनपॉवर कमी असताना कशी करतात, या औत्सुक्यानं मी एक दिवस ठरल्या वेळी साइटवर पोहोचले. सफाई खात्यातल्या कॉर्पोरेशनच्या लोकांनी व ड्रायव्हरनं काम सुरू केलं होतं. आपल्याकडे पिकाला फवारणी करतात तसा पाठीवर पंप लावून एक कर्मचारी हवेच्या प्रेशरनं झाडांची पानं एकत्र करून ढीग बनवत होता. कचरा गोळा करण्याची गाडी सोकिंग मशीनसह उभी होती. गोळा केलेला पाळा-पाचोळा सोकिंग मशीननं एका लांब पाईपद्वारे गाडीत शोषून घेतला जात होता. गाडीत पुरेसा पाला जमा झाल्यावर तो प्रेस होत होता आणि पूर्ण भरल्यानंतर पाइप काढून घेऊन गाडी कंपोस्टिंग कंपनीकडे पाठवली जात होती. अर्थातच तिथे तो पाला कंपोस्टिंगसाठी वापरला जात होता.

'सोर्टीएर्ट अनलागं' म्हणजे वेस्ट सेपरेशन कंपनी, मला दाखवण्याचं काम एरिना या महिला अधिकाऱ्यावर सोपवलं होतं. स्टुटगार्टपासून एक तासाच्या अंतरावर असलेल्या त्या कंपनीत आम्ही पोहोचलो. 'घरात कचरा वेगळा साठवताना ज्यावर रिसायकलचं चिन्ह आहे त्या सर्व वस्तू, पत्र्याचे डबे, प्लास्टिक सर्व 'गेल्ब जाखं' म्हणजे पिवळ्या पिशवीतून साठवलेलं असतं. तो कचरा इथं आल्यानंतर कंपनीत पुन्हा वेगळा केला जातो.' कंपनीचे मॅनेजर मला माहिती देत होते. स्टुटगार्टमध्ये एका प्रायव्हेट कंपनीद्वारे यलो बॅग दर १५ दिवसांनी उचलून ती इथे पोहोचवली जाते. इथे पिशवी फोडून त्यामधील कचरा वेगवेगळा केला जातो. मशीनच्या एका पट्ट्यावरून तो कचरा सरकत असताना प्रथम त्यातील पत्रा वेगळा केला जात होता. पुढे तशाच प्रकारे प्लास्टिक वेगळं केलं जात होतं. सगळे घटक वेगळे झाल्यावर मातीचे कण असल्यास तेही यंत्राद्वारे चाळून वेगळे केले जात होते आणि लोखंडाचे पदार्थ लोहचुंबकाद्वारे वेगळे होऊन एका मोठ्या कंटेनरमध्ये जमा होत होते. पत्र्याचे टीनही मशीनमध्येच चपटे करून बंडल बांधूनच बाहेर पडत होते. ते वेगवेगळ्या कंपनीत रिसायकलिंगसाठी पाठवले जात होते. हा फक्त सेग्रिगेशनचा म्हणजे वर्गीकरणाचाच एवढा मोठा व्यवसाय होता, की इथे कित्येक करोडोंचा व्यवहार चालत होता. हे सगळं पाहत असताना माझ्या मनात, भारतात हे दिवस यायला किती वर्षं लागतील, याचा विचार पदोपदी चालू होता.

जर्मनीतला प्रवास नेहमीच आनंददायी होता. इथला निसर्ग वेड लावणारा होता, मोहवून टाकणारा होता. घरांच्या छोट्या रांगा, स्वच्छ परिसर, फुलांचे ताटवे आणि बघावं तिकडे हिरवळ यामुळे थंडी कितीही असली तरी इथला काळ अगदी कंटाळवाणा कधीच नव्हता. या नवख्या, औपचारिक, रिझर्व्हड्, आधुनिक देशानं बघता बघता मला आपलंसं केलं होतं. आमची संस्था अभ्यासाच्या वेगवेगळ्या साइट व्हिजिटप्रमाणेच महिन्यातून एकदा फिरायलाही घेऊन जात होती. हायडलबर्गबरोबरच स्पायर, बाडेन-बाडेन 'म्युन्स्टर आयफेल', कार्ल मार्क्सचं गाव 'ट्रियर'; जे जर्मनीचं सर्वात जुनं- १३०० वर्षांपूर्वीचं - शहर आहे, युरोपातल्या १५ देशांनी करार करून एकच 'शेंगेन व्हिजा' तयार केला ते शेंगेन शहर, 'बर्ग ईत्झ मोझेल' तर एकदा 'आयफेल फ्रायलिस्ट म्युन्स्टर' या अडीचशे वर्षं जुन्या गावाची आणि त्यावेळच्या संस्कृतीची ओळख मिस्टर लुटर यांनी करून दिली. जर्मन लोकांनी ही जुनी गावं जशीच्या तशी जपली आहेत याचं कौतुक वाटत होतं. ऱ्हाईन नदीतील जहाजाची सफर तर अलौकिकच होती. भव्य जहाजातून पाच-सहा तास ऱ्हाईन नदीतून प्रवास करताना नदीचं ते संथ, अथांग पात्र आणि दोन्ही बाजूंना भव्य हिरवेगार डोंगर, पुराणकालीन राजवाडे असं दृश्य फारच नयनरम्य होतं.

काही दिवसांत इन्सिरेशन प्लान्टलाही मी भेट दिली. घराघरांतून वेगळा केलेल्या घनकचऱ्यावर वेगवेगळ्या ठिकाणी प्रक्रिया होते. त्यापैकीच Rest Mull म्हणजे ज्या कचऱ्यावर कोणतीही प्रक्रिया होऊ शकत नाही, तो आणि कंपोस्ट व रिसायकल करून उरलेला बाकी सर्व कचरा आणि हजार्डस वेस्ट (विषारी कचरा) हा इन्सिरेशन प्लाण्टमध्ये बंद अवस्थेत जाळला जातो. कचरा जाळून त्यापासून वीजनिर्मिती केली जाते. स्टुटगार्ट शहराला मिळणारी सर्व वीज या प्लाण्टमधूनच मिळते. त्याच विजेवर रस्त्यावरचे दिवे चालतात. जळलेल्या कचऱ्याची उर्वरित राख इकडेतिकडे किंवा उघड्यावर फेकण्यास कायद्यानं मनाई आहे. ही उरणारी राख शास्त्रशुद्ध भूमिभरावला पाठवण्यात येते. भूमिभराव महापालिकेच्या मालकीचा असल्यानं इन्सिरेशन प्लाण्टचे मालक राखेची विल्हेवाट लावण्याचे चार्जेस महापालिकेला देतात. शहरात एकूण तयार होणाऱ्या कचऱ्याच्या फक्त एखाद टक्का कचरा भूमिभरावात जातो. त्याची विल्हेवाट लावण्यासाठीही प्रचंड मोठी यंत्रणा असते. इन्सिरेशन प्लाण्टनंतर, डेपोनी म्हणजे भूमिभराव पाहण्याची ओढ मला लागली होती. आतापर्यंत, फक्त गावाबाहेर नेऊन एकत्र कचरा फेकला की गाव स्वच्छ होतं

## ।। मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास ।।

### राज्य मराठी विकास संस्थेची प्रकाशने

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महानगरपालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी : २२६५ ३१ ६६ / फॅक्स- २२६३ १३ २५

- मराठी लेखन मार्गदर्शिका-यास्मिन शेख - मूल्य ८०रु.
- कोश व सूची वाङ्मय : स्वरूप आणि साध्य - संपा.सरोजिनी वैद्य, सुषमा पौडवाल, अनिता जोशी, कविता महाजन - मूल्य २०० रु.
- मराठी लघुलेखन शब्दकोश - व.वा.इनामदार - मूल्य १४०रु.
- शालेय मराठी शब्दकोश - वसंत आबाजी डहाके, गिरीश पतके - मूल्य १०० रु.
- शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम - वासुदेव बळवंत पटवर्धन - संपा. रमेश पानसे - मूल्य १६० रु.
- मराठी भाषा:वाढ आणि बिघाड - श्री. के.क्षीरसागर - मूल्य १७५ रु.
- 'वृद्धि:' भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन - दिनेश द. माहुलकर - मूल्य १६० रु.
- बेलभाषा - सुमन बेलवलकर - मूल्य १००रु.
- भाषा आपली सर्वांचीच-अविनाश बिनीवाले-मूल्य १५०रु.
- महाराष्ट्र साहित्य परिषद - म. श्री. दीक्षित - मूल्य ५० रु.
- व्याकरणकार मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य - कृ.श्री.अर्जुनवाडकर - मूल्य १५० रु.
- काकासाहेब कालेलकर : व्यक्ती आणि कार्य - मृणालिनी जोगळेकर - मूल्य १५०रु.
- गंगाधर बाळकृष्ण सरदार : व्यक्ती आणि कार्य - हेमंत वि. इनामदार - मूल्य ६० रु.
- बालगंधर्व:व्यक्ती आणि कार्य-मोहिनी वर्दे - रु. ६० /-
- मातृसेवा संघ - विनया खडपेकर - मूल्य ६० रु.
- सकाळ वृत्तपत्र आणि वृत्तसमूह-स्वाती सुहास कर्वे-मूल्य ६० रु.
- शंतनुराव किर्लोस्कर:व्यक्ती आणि कार्य - भा. र.साबडे - मूल्य १६०रु.
- डॉ.अ.का.प्रियोळकर:व्यक्ती आणि कार्य - डॉ.वि.बा. प्रभुदेसाई - मूल्य १५० रु.
- त्र्यंबक शंकर शेजवलकर सूची - सुषमा पौडवाल - मूल्य १५० रु.
- मद्रासची मराठी हस्तलिखिते - संपा.डॉ.वसंत जोशी - मूल्य १५० रु.
- हैदराबादची मराठी हस्तलिखिते-संपा.डॉ. श्री. रं. कुलकर्णी, डॉ. व. दा. कुलकर्णी, प्रा. द. पं. जोशी - मूल्य १००रु.
- कर्नाटकातील मराठी हस्तलिखिते - संपा. डॉ भीमाशंकर देशपांडे - मूल्य १५० रु.
- तंजावर सूची - संपा. भीमराव केसकर - मूल्य २०० रु.
- दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास - तंजावर खंड संपा. डॉ. वसंत जोशी - मूल्य ५००रु.
- दाक्षिणात्य साहित्य - संस्कृतीचा मराठीशी अनुबंध - डॉ. माणिक धनपलवार - मूल्य ३०० रु.
- साहित्यसेतू - श्री. रं. कुलकर्णी - मूल्य ४५ रु.
- दखनी भाषा - मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार - श्री. रं. कुलकर्णी - मूल्य ४५ रु.
- आंध्र - कर्नाटक खंड - संपा. डॉ. वसंत जोशी, डॉ. द. दि. पुंडे - मूल्य ५०० रु.
- मराठी विज्ञानग्रंथसूची (१९५१-१९९९) - संपा. रा. वि. सोवनी, संजीवनी शिंत्रे - मूल्य १५० रु.
- मराठी वैद्यकग्रंथसूची (वर्णनात्मक) (१९५१-१९९९) - संपा.डॉ.सु.नाडकर्णी, क. महाजन - मूल्य १२५ रु.
- मराठी ग्रंथसूची - भाग १ व २ - संपा. कै. शं. ग. दाते - मूल्य २६०० रु.
- मराठी ग्रंथसूची भाग - ३ (१९५१-१९६२)- संपा. शरद साठे - मूल्य १००० रु.
- मराठी ग्रंथसूची भाग - ४ (१९६३ -१९७०)- संपा. शरद केशव साठे - मूल्य ११०० रु.
- मराठी ग्रंथसूची भाग - ५ (१९७१ -१९७८)- संपा. शरद केशव साठे - मूल्य १६०० रु.
- वाचू आनंदे - माधुरी पुरंदरे भाग १ ते ४, संचाचे - मूल्य ३०० रु.
- ग्रंथालयाचा ज्ञानकोश - संपा.शं.गो.भिडे - मूल्य १६००रु.
- विज्ञान संकल्पना कोश - संपा. प्रा. रा. वि. सोवनी - मूल्य २५० रु.
- मराठी कोश व संदर्भसाधने यांची समग्र सूची - (१८००-२००३) संपा. डॉ. व. वि. कुलकर्णी - मूल्य २०० रु.
- शिक्षणाचे अंतरंग - लीला पाटील - मूल्य १७५ रु.
- फार्सी - मराठी व्युत्पत्तिकोश - डॉ. यू. म. पठाण - मूल्य ६०० रु.
- वस्त्रनिर्मिती माहितीकोश खंड १ तंतुनिर्माण व तंतुविज्ञान मूल्य ४००रु.
- वस्त्रनिर्मिती माहितीकोश खंड २ सूतनिर्माण मूल्य ४००रु.
- वस्त्रनिर्मिती माहितीकोश खंड ३ कापडनिर्माण व तंतुविज्ञान मूल्य ५००रु.
- पालघर तालुका - बोली, समाज व संस्कृती - संपा. डॉ. प्रतिभा कणेकर - मूल्य ६५०रु.

*सर्व पुस्तकांवर २० % सवलत* / संस्थेचे संकेतस्थळ - http://rmvs.maharashtra.gov.in

आणि त्या जागेला डंपिंग ग्राउंड म्हणतात एवढंच माहीत होतं. त्या डंपिंग ग्राउंडचं असंही अत्याधुनिक रूप असू शकतं हे आश्चर्यचकित करणारं होतं.

'आयनोड डेपोनी' म्हणजेच आयनोड गावात असलेला 'शास्त्रशुद्ध भूमिभराव' मला दाखवण्याची जबाबदारी महापालिकेनं फ्रँक ड्युअर या इंजिनीयरवर सोपवली होती. आयनोड स्टुटगार्टपासून बरंच लांब होतं. ही 'लँडफिल साइट' पंचवीस एकरांमध्ये परसलेली होती. संपूर्ण साइटवर फिरायचं असेल तर वाहनाशिवाय पर्याय नव्हता. अर्धा भूमिभराव पूर्णपणे तयार होऊन त्यावर झाडी लावली होती. उर्वरित भूमिभराव करण्याचं काम चालू होतं. 'लँडफिल साइट'च्या ऑफिसमध्ये सर्वांनी माझं छान स्वागत केलं. त्या स्वागताला उत्तर देऊन मी मला 'डेपोनी' म्हणजे भूमिभरावाची अगदी बारीकसारीक सर्व माहिती देण्यात यावी असं सुचवलं. त्यांच्यापैकी एकानं भारतात भूमिभराव असतात का? या सहज विचारलेल्या प्रश्नानंही मला वाईट वाटलं. आमच्याकडे कचरा डंपिंग ग्राउंडवरच डंप केला जातो असं सांगण्याशिवाय माझ्याकडे पर्याय नव्हता. परंतु त्याला डंपिंग ग्राउंड म्हणजे काय हेच माहीत नव्हतं, म्हणून फ्रँकनं त्याला सांगितलं की ''आपल्याकडे जी ५०-६० वर्षांपूर्वी कचरा एकत्र फेकण्याची जागा असायची. तशीच पद्धत त्यांच्याकडे आहे, त्याला डंपिंग ग्राउंड म्हणतात.'' बोलत बोलत आम्ही प्रयोगशाळेत पोहोचलो. जी मुलं शाळेत, कॉलेजात घनकचरा व्यवस्थापन किंवा भूमिभराव हा विषय घेतात त्यांना इथं शास्त्रशुद्ध माहिती व ट्रेनिंग दिलं जातं. फ्रँकनं इंजिनीयरिंगला 'लँडफिल साइट' हा विषय घेतला होता त्यामुळे आज एवढ्या मोठ्या डेपोनीचा तो इनचार्ज होता. प्रयोगशाळेत उंच नळीसारखं एक काचपात्र वेगवेगळ्या प्रकारच्या माती, कोळसा, वाळूनं भरून ठेवलं होतं. ते भूमिभरावाचे १९ थर होते. आम्ही बाहेर



'डेपोनी' म्हणजे भूमिभरावाची जागा

आलो. भूमिभरावावर फिरण्यासाठी खास गमबूट होते ते चढवले. एका बुटाचं वजन अर्धा किलोपेक्षा जास्त असल्यानं ते बूट घालून चालणं जड जात होतं. पाय ओढतच कामाच्या जागी गेलो.

भूमिभरावामध्ये एका खोल दरीमध्ये सर्व बाजूंनी जाड काळं प्लास्टिक टाकलं जातं. त्यावर माती, चिकणमाती पसरली जाते. पुन्हा पांढरं प्लास्टिक, त्यानंतर विषारी राख टाकल्यावर पुन्हा चिकणमातीचा थर, मग कोळसा किंवा दगडीकोळसा, नंतर मोठे वाळूचे गोटे, त्यानंतर वाळूचा थर, पुन्हा प्लास्टिकनं झाकलं जातं. नंतर हा चिकणमातीचा थर व पुन्हा एकदा हे सर्व थर येतात आणि जेव्हा भूमिभराव तयार होतो तेव्हा सर्वात वर माती पसरली जाते आणि त्यावर प्लँटेशन केलं जातं. पुढे ही झाडं वाढली, की छान जंगल तयार होतं. डेपोनी म्हणजेच हा भूमिभराव किमान शंभर वर्षं टिकून राहील अशा पद्धतीनं बनवलेला असतो. आम्ही भूमिभरावावर पोहोचलो तेंव्हा बुलडोझरनं चिकणमाती लेव्हल करण्याचं काम चालू होतं. खरंच ओल्या चिकणमातीत या बुटांशिवाय पर्यायच नव्हता. काही ठिकाणी प्लास्टिक शिट्स अंथरण्याचं काम चालू होतं. त्यावर मोठी, जाड वाळू अंथरणं सुरू होतं. या प्लास्टिक शिट्स किमान शंभर वर्षं खराब होत नाहीत, किंवा त्यातून पाणी पाझरत नाही त्यामुळे त्यांची किंमतही प्रचंड असते. काळ्याच्या मानानं पांढऱ्या शिट्स थोड्या पातळ व स्वस्तही असतात असं फ्रँक सांगत होता. काही ठिकाणी भूमिभराव पूर्ण होऊन, तिथं झाडं उगवून दाट जंगल तयार झालेलं होतं. भूमिभरावावर फिरताना काही ठिकाणी धुरकांड्यासारखं काहीतरी दिसत होतं. त्याबद्दल मी फँकला विचारलं. भूमीभरावाखालील कचऱ्यातून निघालेला गॅस हवेत सोडण्यासाठी हे पाइप असल्याचं त्यानं सांगितलं. जर्मन तंत्रज्ञान एवढं प्रगत आहे, सिस्टीम प्रगत आहे, तरी दूषित गॅस हवेत कसा सोडतात याचं मला आश्चर्य वाटलं. परंतु फ्रँकनं माझा गैरसमज तात्काळ दूर केला. दूषित गॅस पूर्णपणे शुद्ध करूनच हवेत सोडला जातो असं सांगून शुद्धिकरणाचं मशीन व ती सर्व यंत्रणा जमिनीखाली आहे असंही सांगितलं. एका दरवाजातून आम्ही जिन्यानं जमिनीखाली उतरलो. एका भुयारी मार्गातून मोठाले पाइप आत जात होते. समजा, पाइप कुठे लिक झाला तर विषारी गॅसनं मृत्यू होऊ शकतो त्यामुळे आम्हाला ऑक्सिजन मास्क असलेली पेटी गळ्यात घालण्यास दिली. दोन्ही बाजूंना मोठमोठाले पाइप असलेल्या भुयारातून आम्ही जवळजवळ एक कि.मी. चालत गेलो. जागोजागी व्हिडिओ कॅमेरे होते. त्यामुळे आत कुठे काही प्रॉब्लेम झाला तर बाहेरून कळू शकत होतं. भूमिभरावाखाली मध्यभागी पोहोचलो. तिथं एका मोठ्या गोलाकार वास्तूत लिचेट म्हणजे

दूषित पाणी व गॅस शुद्ध करण्याचं केंद्र होतं. संपूर्ण भूमिभरावातील गॅस जमा होऊन पाइपनं शुद्धिकरण केंद्राकडे आणला जातो. नंतर शुद्ध झालेला गॅस ज्वलनासाठी वापरला जातो. टाकाऊ पाणी कुठं जमा होतं ते पाहण्यासाठी पुन्हा त्या पाइपलाइनच्या भुयारी मार्गातून दुसऱ्या बाजूनं आम्ही बाहेर पडलो. वर चढून आल्यावर काही अंतरावर एक खोल विहीर होती. त्या विहिरीत सर्व बाजूंनी लिचेट जमा होत होतं. इथं जमा झालेलं (लिचेट) दूषित पाणी त्या मोठ्या पाइपमधून शुद्धिकरण केंद्राकडे जातं. शुद्ध केलेलं ते पाणी कॉर्पोरेशनच्या शुद्धिकरण प्लाण्टमध्ये जाऊन तिथं पूर्ण शुद्ध होऊन नदीत सोडलं जातं. म्हणजे पाणी किंवा दूषित गॅस कोणत्याही प्रकारे हवेच्या किंवा लोकांच्या संपर्कात येत नाही. माझ्या ज्ञानात वेगळीच भर पडली होती. आम्ही ते अवजड बूट काढण्यासाठी पुन्हा ऑफिसमध्ये गेलो.

त्यानंतर आम्ही गाडीमधून संपूर्ण भूमिभरावाला वळसा घालून १०-१५ किलोमीटरवर पुढे गेलो. तिथे गेल्यावर कळलं, की आता पाहिलेल्या भूमिभरावांच्या खालून एक नदी वाहते आहे. ती कशी सुरक्षित केली आहे हे पाहण्यासाठी आम्ही एका जंगलात आलो. तिथे असलेल्या एका मोठ्या लोखंडी गेटचं कुलूप उघडून आत गेलो. तिथं एक कंप्युटर व व्हिडिओ कॅमेरा बसवलेला दिसला. त्यामुळे इथली सर्व माहिती ऑफिसमध्ये बसून मिळत होती. एवढ्या दूर जंगलात कंप्युटर, सी. सी. कॅमेरा पाहून मला आश्चर्य वाटलं. इंग्रजी 'व्ही' अक्षरासारख्या व्हॅलीच्या तळाशी 'ओ' आकाराचा भव्य पाइप बांधून, त्याच्या वर भूमिभरावाला सुरुवात झाली होती. साधारण वीसेक फूट व्यासाच्या मोठ्या सिमेंट पाइपमधून फक्त दोन फूट रुंदीची नदी वाहत होती. खरं तर, लहानसा ओहोळच तो. पाइपच्या बाहेर पडल्यानंतर सामान्य नदीप्रमाणेच ती वाहत होती. नदीचं पाणी दूषित होऊ नये म्हणून १०० वर्षांपूर्वी हा



बंदिस्त नाला

पाइप बांधला होता. तो भूमिभरावापूर्वी दोन किलोमीटरवर सुरू होऊन भूमिभरावानंतर चार कि.मी.वर संपतो. पाइप खूप मोठा बांधण्याचं कारण पुढे कधी नदीच्या पात्रात वाढ झाली तरी पाणी ओव्हरफ्लो होऊ नये. फ्रँकनं सर्व माहिती दिली. कंपाउंडचं गेट बंद करून, कुलूप घालून आम्ही परतलो.

तोपर्यंत स्टुटगार्टचे दिवे चमकू लागले होते आणि बाजारात 'ख्रिसमस मार्केट' माणसांनी तुडुंब भरलं होतं. ख्रिसमसपूर्वी एक महिना प्रत्येक शहराच्या मुख्य चौकात किंवा बाजारपेठेत ख्रिसमस मार्केट भरतं. ख्रिसमस मार्केटच्या उत्सवामध्ये जर्मन महिनाभर तल्लीन होऊन जातात. ख्रिसमस मार्केटमध्ये घरांच्या आकाराचे अनेक ओळींतले स्टॉल्स प्लास्टिकच्या ख्रिसमस ट्रीच्या फांद्या, काचेचे रंगीत बॉल्स आणि स्टार्स वगैरेंनी सजवलेले असतात. छतावर सांताक्लॉज चढताना तर कुठे लटकलेला दिसतो. प्रत्येक स्टॉल सुंदर सुंदर गिफ्ट्स, सुंदर सजावटीच्या वस्तू, खेळणी, अनेक प्रकारच्या खाण्याच्या वस्तूंनी भरलेला असतो. तसंच, सर्व प्रकारची ड्रिंक्सही उपलब्ध असतात. प्रत्येकाच्या हातात गरमागरम व वाफाळलेली बियर किंवा वाइनचे ग्लास असतात. गरम वाफाळलेली बियर किंवा वाइन हाही माझ्या माहितीतला नवीन विषय होता.

जर्मनीत येऊन दहा महिने व्हायला आले. युरोपातल्या अनेक देशांत फिरले, परंतु सांडपाणी व्यवस्थापन पाहायला मिळालं नव्हतं. मनात म्हटलं, गंमतच आहे. आमच्याकडे पाहिजे तिथे, पाहिजे तेव्हा (आणि नको असेल तेव्हाही) गटारं, नाले पाहायला मिळतात आणि इथं ते पाहण्यासाठी एक महिना अगोदर अपॉईंटमेंट घ्यावी लागते! पण काही करून मला सिवेज सिस्टिम पाहायचीच होती. मिस्टर अल्ब्रेख्ट क्लेंकनी अपॉईंटमेंट घेऊन दिली. ठरल्या दिवशी सकाळी ८.३० वाजता गटार, नाला पाहण्यासाठी मी साइटवर पोहोचले तर त्या ऑफिसमध्ये कुणीच नव्हतं. ऑफिसच्या बाहेर रेल्वेस्टेशन होतं. तिथंही कुणीच नव्हतं. अपॉईंटमेंट दिली आणि कुणी जागेवर नाही असं कधीच झालं नव्हतं. बाहेर एक स्त्री भेटली. तिनं जर्मनमध्ये माझं नाव विचारलं. मी 'हो' म्हणताच ती म्हणाली, ''या. सर्वजण तुमचीच वाट पाहत आहेत.'' अगदी दूरवर कुणीच दिसत नव्हतं मग ते माझी वाट कुठं पाहताहेत ते कळेना! मी तिच्या मागून गेले. मध्येच ती थांबली. तिनं रस्त्यावरचं मॅनहोलच्या झाकणासारखं लोखंडी चौकोनी झाकण उघडलं अन् मला खाली जायला सांगितलं. मॅनहोलमध्ये उतरायला घाण वाटत होतीच, शिवाय तिची ओळख नसल्यानं भीतीही वाटत होती. वाटलं, आत गेल्यावर हिनं वरून झाकण बंद केलं तर? तिला माझी अडचण कळली असावी. मग ती स्वतःच

आत उतरली आणि मला तिच्यामागे यायला सांगितलं. जमिनीखाली पायऱ्या होत्या. एकानंतर दुसराही जिना उतरलो. मला वाटलं होतं, जमिनीखाली केबीन असेल, परंतु तिथं तर मोठा नाला होता. एका वाटोळ्या तीसेक फूट उंचीच्या पाइपच्या आत मी प्रवेश केला. नाल्यात वाहणाऱ्या पाण्याच्या दोन्ही बाजूंना रुंद फूटपाथ होते. त्या फूटपाथवर उभं राहून सर्वजण बोलत होते. गटाराच्या पाण्याचा थोडा घाण वास येत होता, परंतु त्यात एवढासाही कचरा दिसत नव्हता. आपल्याकडे पावसाळ्यत नद्या जशा गढूळ दिसतात तसं ते पाणी दिसत होतं. सर्वजण जमताच इंजिनीयरनं माहिती देण्यास सुरुवात केली. संपूर्ण शहराचं सांडपाणी या नाल्यात जमा होतं. जिथून ते नाल्यात येतं तिथं सर्व ठिकाणी जाळ्या बसवलेल्या असल्यानं त्यांतून कचरा येत नाही. हे नाल्याचं पाणी 'वेस्ट वॉटर ट्रीटमेंट प्लान्ट'ला जातं. तिथं प्रथम त्यात असलेला गाळ वेगळा केला जातो. त्यानंतर त्याचं वेगवेगळ्या प्रकारे शुद्धिकरण करून ९९ टक्के शुद्ध पाणी नदीत सोडलं जातं. नदीचं पाणी पिण्यासाठी वापरण्यापूर्वी शुद्धिकरणाची पूर्ण प्रक्रिया केली जाते ती वेगळी. ही माहिती व सांडपाणी व्यवस्था प्रथमच पाहायला मिळत होती. त्यानंतर काही दिवसांनी मिस्टर क्लेंक यांनी पाणी शुद्धीकरणाचा भव्य प्लान्टही दाखवला. अल्ब्रेख्ट क्लेंक हे वयोवृद्ध अधिकारी माझ्यासाठी एवढी मेहनत घेत होते, कारण ते जेव्हा भारतात कामासाठी एक महिना आले होते तेव्हा भारतीय अधिकाऱ्यांनी त्यांना खूप मदत, सहकार्य केलं होतं. त्यामुळे की काय, ते स्टुटगार्ट शहराचे टाउन प्लॅनर या मोठ्या पदावर असूनही, माझ्यासाठी भरपूर वेळ देत होते. पाणी शुद्धिकरण प्रक्रियेत मुळात शुद्धिकरणासाठी आलेलं पाणी प्रथमदर्शनीच इतकं स्वच्छ असतं, की वाटतं ते ॲक्वागार्डच्या प्युरिफायरमधून स्वच्छ करूनच आणलं आहे. प्रक्रियेदरम्यान संपूर्णपणे बंदिस्त प्लाण्टमध्ये शुद्धिकरण केलं जातं. शुद्धिकरणाच्या जागी चप्पल, बूट घालून जाण्यास मनाई असते. हे पिण्याचं पाणी १०० टक्के शुद्ध असतं त्यामुळे घरात फिल्टर लावायची गरजच नसते आणि सार्वजनिक नळाचं पाणीही पिण्यास पूर्णतः योग्य असतं.

एक दिवस क्लासवरून घरी येत असताना जोरदार वारा वाहू लागला. कसाबसा रस्ता पार करून रेल्वेस्टेशनला पोहोचले व मेट्रो पकडली. घरी पोहोचेपर्यंत वाऱ्यानं प्रचंड अक्राळविक्राळ रूप घेतलं होतं. माणसांना तोल सांभाळणं कठीण होत होतं. संध्याकाळ दाटून आली होती तरी प्रकाश कमी झाला नव्हता. दाट, गर्द होत जाणाऱ्या प्रकाशाच्या प्रतीक्षेत मी खिडकीत उभी राहिले. खिडकीतून येणारी सांज नेहमीसारखीच मला उदास करत होती. संध्याकाळ हळूहळू सावळीशी होत चालली असताना, बाहेरच्या वादळाबरोबरच मनातलं काहूर वावटळीचं रूप घेऊ लागलं आणि बघता बघता एक कविता जर्मन भाषेतच मनातून कागदावर उतरली. एक वर्ष जर्मनशिवाय कोणतीच भाषा बोलत नसल्यानं आता काव्यही त्याच भाषेत प्रकट होऊ लागलं होतं. टीव्ही चालू केला तर कळलं, की संपूर्ण युरोपमध्ये विशेषतः यु.के. आणि जर्मनी-फ्रान्स-पोलंड या देशांमध्ये वादळी वाऱ्यानं थैमान घातलं आहे. ट्रक आडवे होत होते, झाडं पडत होती. समुद्राच्या लाटांनी उग्र रूप धारण केलं होतं. रस्त्यावर चालणारी माणसं कित्येक किलोमीटरवर फेकली जात होती. सातत्यानं दोन दिवस प्रचंड वादळी वारे वाहतच होते. कधी नव्हे ते युरोपमध्ये वादळानं लोक मृत्युमुखी पडले व कित्येक करोडोंचं नुकसान झालं होतं.

मला लंडनला निघायचं होतं, पण फ्लाइट्स कॅन्सल केल्या होत्या. दुसऱ्या दिवशी क्लासनंतर एअरपोर्टला पोहोचले तोवर हवामान स्थिर होऊन फ्लाइट्स उडायला सुरुवात झाली होती. एवढ्या मोठ्या प्रचंड वादळानं अस्ताव्यस्त झालेलं जनजीवन तात्काळ स्थिर झालं होतं. ना कुठे कचऱ्याचे ढीग साचलेले होते, ना पडलेली झाडं उचलण्याच्या प्रतीक्षेत रस्ता अडवून पडली होती. अल्पावधीतच सर्व कसं नियमित आणि सुरळीत. जर्मनीत घनकचरा व्यवस्थापनात बरंच पाहून, शिकून झालं असलं तरी बर्फाची साफसफाई कशी केली जाते हे न पाहताच भारतात परतावं लागणार होतं. आल्याआल्या जे बर्फाचं साम्राज्य पाहिलं होतं, त्याचा नंतर वर्षभरात मागमूसही नव्हता. मात्र निघण्याच्या आदल्या दिवशी, सकाळी उठून खिडकीतून बाहेर पाहिलं तर रस्त्यांवर, फूटपाथवर, समोरच्या ब्रिजवर पांढऱ्याशुभ्र बर्फाचा गालिचा पसरला होता. झाडांना कापसानं झाकावं तशी झाडं पांढुरकी झाली होती. देखावा रम्य असला तरी खिडकी उघडायचं धाडस होत नव्हतं. तापमान नक्कीच उणे ६-७ असणार होतं. मात्र खिडकी न उघडताही खिडकीजवळच खुर्ची ओढून घेतली आणि भारतातल्या न पाहिलेल्या हिमालयाचा आनंद खिडकीत बसून अनुभवत राहिले.

**- संगीता उत्तम धायगुडे**
उप आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
फ्लॅट नं. ६०४, ट्विलाइट, रहेजा विहार,
चांदिवली स्टुडिओसमोर, पवई,
अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०७२
sangitaud@gmail.com

# वानरस्मृती

प्रभा
पुरोहित

**आ**म्ही अमरावतीला आलो तेव्हा विदर्भ महाविद्यालयाच्या कॉलनीमध्ये सरकारी बंगल्यात राहत होतो. तो बंगला दोघा प्राध्यापकांत विभागला होता. एका भागात आम्ही अन् दुसऱ्या भागात राहत होते प्राध्यापक मोरघरे. सरकारी नियमाप्रमाणे आमच्याकडे थोडा मोठा भाग होता, कारण केशवचा पगार थोडा जास्त होता. दहा टक्क्यांप्रमाणे सरकार भाडे घेत असे. म्हणून आम्हाला थोडीशीच पण तरी जास्त जागा मिळाली होती. ह्या बंगल्याच्या आवारात एक आंब्याचं झाड होतं पण त्याला फळं आलेली मी कधी पाहिली नाहीत. म्हणून असेल कदाचित, त्या झाडावर माकडंही कधी आलेली दिसत नाहीत. कधी कधी कोणीतरी पूजेसाठी पानं न्यायला यायचं. त्या बंगल्यात असताना आम्हाला माकडांचा उपद्रव झाला नाही हे खरं, पण वि.म.वि.च्या (विदर्भ महाविद्यालयाच्या) कॉलनीत माकडांचा खूप उपद्रव आहे, असे मी ऐकून होते.

बंगला नंबर ८ मध्ये आम्ही पाच-सहा वर्षे तरी होतोच. पुढे आम्हाला स्वतंत्र बंगला मिळाला. छोटासाच पण अतिशय सुबक, देखणा बंगला होता तो! ह्या बंगल्यात आम्ही बंगल्यासमोर छानशी फुलबाग अन् परसबाग- भाज्या, केळीची झाडं वगैरे बंगल्याच्या मागच्या भागात केली होती. हा बंगला 'रजिस्ट्रारचा बंगला' म्हणून ओळखला जायचा. पण त्याच्याआधी मूळात खरं तर तो डॉक्टरचा बंगला होता. पण नंतर डॉक्टरला छोट्या क्वॉर्टरमध्ये जागा दिली गेली आणि तो बंगला आधी रजिस्ट्रारला आणि नंतर प्राध्यापकांना देण्यात येऊ लागला. तर असे आम्ही ह्या सुंदर बंगल्यात आलो.

ह्या बंगल्यात जांभळाचं एक मोठ्ठं झाड होतं. त्याच्या बऱ्याचशा फांद्या आमच्या स्वयंपाकघरावर यायच्या. ह्या झाडाला खूप जांभळं लागायची. त्यांची जातही छान होती- मोठी मोठी, दळदार आणि गोड जांभळं! झाडावर जांभळं धरली की आम्ही ती पिकण्याचे दिवस मोजू लागायचो. पण आमच्यापेक्षा माकडं हुशार! त्यांचा हिशेब आमच्याआधीच पुरा व्हायचा. अन् एक दिवस ज्ञानेश्वर (आमच्या आउट हाउसमध्ये राहणारा), आमचा शेजारी- तो अभ्यासासाठी आमच्या घरीच राहायचा- तो सांगत यायचा, ''बाई, बाई वांदरं आले. वांदरांची टोळधाड आली.'' आता काय जांभळं शिल्लक राहणार? ती पिकायला आलेली जांभळं संपेपर्यंत त्या 'बंदरटोळी'चा मुक्काम जांभळाच्या झाडावर. आमच्या स्वयंपाकघरावर उड्या मारणं, कौलं फोडणं, जांभळाच्या बियांचा सडा अंगणात टाकणं, टाक्यावर बसून पाणी पिणं हे सगळं सहन करणं आम्हाला भागच पडायचं. काही उपायच नसायचा. मग आम्ही त्या बियांच्या सड्यात काही चांगली जांभळं मिळतात का, ते शोधायचो. काही मिळाली आमच्या नशिबानं; तर 'तेवढाच आपला वाटा' अशी आपली आपणच समजूत घालायचो. नाहीतर दुसरं तरी आमच्या हातात काय होतं? त्या माकडांची मला भीती वाटायची. माझा मुलगा- श्रीरंग - लहान होता. 'माकडांनी चवताळून त्याला काही केलं तर,' ही भीती.



म्हणून त्यांना हाकलण्याचा प्रयत्नही आम्ही कधी केला नाही. जांभळं संपली की ती जाणारच होती.

चार-पाच वर्षं आम्ही त्या बंगल्यात होतो, तोपर्यंत हे पर्व चालूच होतं. नंतर आम्ही अधिक मोठ्या बंगल्यात राहायला गेलो. तिकडे झाडं होती पण वानरांचा वावर नव्हता. मधून मधून माकडांची आठवण यायची पण आता माकडचेष्टा सहन कराव्या लागत नाहीत म्हणून बरं अन् शांत वाटायचं. ह्या बंगल्यात आम्ही अडीच-तीन वर्षं होतो. हा बंगला 'नातूबाईंचा बंगला' म्हणून ओळखला जायचा. त्या बरीच वर्षं ह्या बंगल्यात राहत होत्या. माझ्या मुलीचा- मनीषाचा जन्म ह्याच बंगल्यातला. ह्या बंगल्यातला काळ निवांत गेला. पण पुन्हा बंगला बदलण्याची वेळ आली. माझ्या मुलीचं बारसं ह्या बंगल्यात केलं; लगेच पुन्हा सामानाची आवराआवर. जसजसे मोठे बंगले मिळत होते तसतसं सामानही वाढत होतं.

आता आमचा बंगला खूपच मोठा होता. त्याचं आवारही प्रचंड होतं. त्या आवारात झिनियाची खूप झाडं उगवायची पावसाळ्यात. त्यावर विविध रंगांची फुलं फुलायची. बंगल्याच्या समोरच्या मोठ्या फाटकापासून बंगल्याच्या पोर्चपर्यंत जाणारा रुंद रस्ता. त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला ही झिनियाची रोपटी. त्यावर ही रंगीबेरंगी फुलं फुलली, की हा रस्ता सुंदरशा फुलांनी विणलेल्या मनोरम गालिचातून गेला आहे असं भासायचं. ती शोभा बघायला दृष्टी अपुरी पडायची. इथे आणखी एक मजेदार झाड होतं. त्याची फांदी धरून वाकवली, की ते जमिनीपर्यंत वाकायचं आणि फांदी सोडली की पुन्हा सरळ! ताठ वाकून नमस्कार करणाऱ्या नवागत सुनेची आठवण करून देणाऱ्या त्या झाडाला फुलंही चमत्कारिक यायची. लहानशा लाकडी कमळासारखी, लाकडी रंगाची, लाकडासारख्या कडक पाकळ्यांची. त्या झाडाकडे माकडं ढुंकूनही पाहत नसत. त्यांचा मोर्चा असे चिंचेच्या झाडांकडे. आमच्या ह्या बंगल्यात चिंचेचे दोन मोठे वृक्ष होते. चिंचेला कोवळी, पोपटी पालवी फुटली की माकडं यायची. त्यांना हे कसं कळायचं कोण जाणे! ती पालवी ओरबाडून खाऊन झाली की माकडं गायब व्हायची. आमच्या आवारात एक वडाचंही झाड होतं. त्या झाडाखालीच एक नळ होता, आउटहाउसमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी. वडाला वडुल्या धरल्या की माकडटोळी हजर! वडुल्या खाणं, नळावर पाणी पिणं आणि वडाच्या पारंब्यांना लोंबकळून झोके घेणं, असा त्यांचा धिंगाणा चालायचा. वडुल्या संपल्या की पुन्हा टोळी गायब. आमच्या बंगल्यासमोरच्या कॉलेजच्या रस्त्यावर शेतं होती, वाड्या होत्या. तिकडेही त्यांचा मोर्चा जात असावा असा माझा तर्क आहे. कधी कधी एक-दोन माकडं, त्यांची टोळी सोडून आमच्या बंगल्याच्या कौलारू छपरावर येऊन बसायची. त्यांच्या हातात कधी कणसं तर कधी पेरू असायचे. आमच्या घरावर बसून त्यांचा फराळ चालायचा. एक दिवस एक एकटंच माकड डाळिंब

घेऊन आलं. मी आमच्या मागील अंगणात गेले तर माकडाच्या हातातलं ते डाळिंब मला दिसलं. मला 'टोपीवाला आणि माकडं' ही लहानपणी वाचलेली गोष्ट आठवली. माझ्या मनात विचार आला, 'मी ह्याला दगड मारला तर हा मला डाळिंब फेकून मारील? बघू या तर खरं.' मी अंगणातला एक दगड उचलून त्याच्याकडे भिरकावला आणि काय मजा! ते माकड, डाळिंब छातीशी घट्ट पकडून पळून गेलं. गोष्ट तर गोष्टीतच राहिली. माझी युक्ती सफल झाली नाही याचं मला खूप काही वाईट वाटलं नाही. माकडाला पळवून लावलं ह्याचाच आनंद झाला.

माकडं वडाच्या झाडावर आली, की ती आउटहाउसच्या छपरावरही जाऊन बसायची. ती माकडं वडाच्या झाडावरून आउटहाउसच्या छपरावर उड्या मारत खेळत असत. त्या खोल्यांत राहणाऱ्या लोकांना त्यांचा त्रास सहन करावा लागायचा. एकदा अशीच ती माकडं वडावर आली अन् तिथून खोल्यांच्या छपरावर. प्रभाकरची खोली त्या आउटहाउसमध्येच होती. त्याचं नुकतंच– एक वर्षापूर्वी लग्न झालं होतं. त्याच्या बायकोला– कमळाला – दिवस गेले होते. दोन–तीन महिने झाले असावेत. कमळा, त्यांनी तट्ट्याच्या आडोशांनी केलेल्या, वरून उघडी असलेल्या न्हाणीत गेली होती. तिचं माकडांकडे लक्ष नव्हतं. ती ओणवी होती तर तिच्या पाठीवर एका माकडानं छपरावरून उडीच मारली. ती इतकी घाबरून गेली, की तिला ओरडणंही सुचलं नाही. माकड पळून गेलं. ती खोलीत परतली पण होऊ नये ते झालंच. ती इतकी घाबरली होती, की तिला रक्तस्राव सुरू झाला अन् ती धुपावली. आम्हालाही खूप वाईट वाटलं पण काय करणार? न घडावं ते घडून गेलं होतं. कमळा तर त्या खोलीत राहायलाच तयार नव्हती. प्रभाकरनं दुसरीकडे खोली शोधली. तो गाडगेनगरमध्ये जायला निघाला तेव्हा आम्ही त्याला अडवू शकलो नाही. अशा रीतीनं – माकडाच्या त्या करणीनं – त्याला जावं लागत होतं. आम्हाला खूपच वाईट वाटत होतं. वाईट वाटत राहणार होतं.



एका रविवारची गोष्ट. त्या दिवशी सकाळपासून दुपारपर्यंत आम्ही घरी नव्हतो. पाचच्या सुमारास आम्ही घरी आलो अन् दार उघडलं तर दुर्गंधाचा भपकारा अंगावर आला. कळेना, काय झालं! आत येऊन बघतो तर एक लांब शेपटी, उंच वाशावरून खाली लोंबत असलेली. माकडांची मजल आता घरात घुसण्यापर्यंत पोचलेली होती. आम्ही दारं, खिडक्या बंद करून गेलो होतो. मग हे माकड घरात शिरलं कसं? त्याला हाकललं तर ते आल्या वाटेनं– म्हणजे उंच छताजवळच्या शटरमधून पळून गेलं. आता ती शटर्स बंद करून घेण्याशिवाय दुसरा उपायच नव्हता. तीही सुताराला बोलावून बंद करून घेतली.

असेच एकदा आम्ही सर्व घर नीट बंद करून बाहेर गेलो होतो. घरी परतलो. घरात माकडं नव्हती. जीव हायसा झाला. मी मागच्या व्हरांड्याचं दार उघडलं तर दारात हुप्प्या! चांगला पाच–सहा वर्षांचा मुलाएवढा उंच, दिसायला भयानक. मी घाबरलेच! माझ्याबरोबरच माझा मुलगा श्रीरंग होता. तो तर किंचाळायलाच लागला, ''आई, भड्या, भड्या आहे.'' (भड्या म्हणजे हुप्प्या–नरमाकड) तो घाबरून थरथरायला लागला. कसंबसं त्या हुप्प्याला हाकलून मी दार बंद केलं आणि श्रीरंगला पोटाशी धरलं, त्याची थरथर थांबेपर्यंत. थरथर तर थांबली त्याची पण त्याला ताप चढायला लागला. मग मात्र आमची घाबरगुंडी उडाली. डॉक्टरांना बोलावून आणलं. आमच्या व्ही.एम.व्ही.च्या कॉलनीत एक छोटासा दवाखाना आणि डॉक्टर होते. त्यांच्यासाठी राहायला क्वार्टरही होतं. वेळी–अवेळीही ते येऊ शकत. डॉक्टर म्हणाले, ''श्रीरंग खूप भ्यायला आहे. त्याच्या मनातली ही भीती घालवली, की त्याचा ताप आपोआपच उतरेल. कसंतरी करून ही भीती तुम्ही घालवा.'' डॉक्टरांच्या ह्या सल्ल्यावर आम्ही दोघांनी (मी अन् केशव) विचार केला. केशव म्हणाला, ''मी कॉलेजमधून बंदूक आणतो. त्याचे नुसते वायबार काढू आणि श्रीरंगला सांगू 'भड्या मेला. आता तो येणार नाही' त्याला समजावू.'' मला ते म्हणणं पटलं.

मी श्रीरंगला समजावलं, ''तू भिऊ नकोस. आपण त्या भड्याला बंदुकीनं मारून टाकू.'' व्ही.एम.व्ही.चे त्यावेळचे प्राचार्य डॉ. मराठे ह्यांच्याकडे एअरगन होती. केशव ती घेऊन आला. ती बंदूक श्रीरंगला दाखवली. त्याला सांगितलं, ''ह्या बंदुकीनं भड्याला मारणार.'' केशव अंगणात गेला. घरावर माकडं बसली होतीच. त्यांच्यावर त्या बंदुकीनं छर्रे उडवले. माकडं पळून गेली. श्रीरंगने बंदुकीचा आवाज ऐकला अन् त्याची खात्री



पटली, की भड्या मेला. हळूहळू त्याचा ताप उतरला. पुन्हा तो खेळू वगैरे लागला, त्या बंदुकीच्या भीतीनं माकडं पळाली, ती बरेच दिवस दिसलीच नाहीत. श्रीरंगलाही विसर पडला अन् त्याची भीती गेली.

माकडं येईनाशी झाली त्यामुळे मला कधी कधी फार चुकल्या-चुकल्यासारखं वाटायचं. त्यांची आम्हाला सवय झाली होती. आता ती कधी येणारच नाहीत की काय, अशी मला चिंता वाटू लागली. माकडांचा त्रास व्हायचा पण त्यांचा घरावरचा वावर हवासाही वाटायचा. ती यावीत असं फार फार वाटायचं.

पुन्हा योग्य वेळी चिंचेची झाडं हिरवीगार झाली आणि चिंचेचे छोटे छोटे आकडेही झाडावर दिसू लागले. एके दिवशी घराच्या कौलांवर कुणीतरी धावल्याचा आवाज मला ऐकू आला. शाळेत जायच्या घाईत मी तिकडे लक्ष दिलं नाही. शाळेत गेल्यावर, वर्गावर, शिकवण्याच्या नादात तर मी ते विसरूनही गेले. पण संध्याकाळी घरी परतताना मात्र मला माकडांची पुन्हा आठवण झाली. आली असतील का ती? विचार करतच मी घरी पोचले. नेहमीप्रमाणे माझ्या मुलीला-मनीषाला मांडीवर घेऊन मी आमच्या व्हरांड्यातला झोपाळ्यावर विसावले अन् समोर बघते तर काय? स्वयंपाकघराच्या कौलावर वानरकुटुंब बसलेलं. एक हुप्प्या दोन-तीन माकडिणी, त्यांच्या तान्ह्या पिल्लांना छातीशी कवटाळून बसलेल्या. उड्या मारत घरावर फिरत असलेली, जराशी मोठी चार-पाच पिल्लं, असा तो गोतावळा. त्या कुटुंबाचा मालक- हुप्प्या आपल्या ह्या कबिल्यावर हुकमत गाजवत असलेला. छोटी पिल्लं तर त्यांच्या आयांच्या छातीशी चिकटलेली होती. पण जी थोडीशी मोठी होती त्यांना तो हुप्प्या आपल्या जरबेत ठेवत होता, एका हुंकारात. त्याचा तो रागाचा हुंकार माझ्या अंगावर काटा आणत होता. पिल्लं गप्प व्हायची. माकडिणीही चूप बसायच्या. त्या माकडिणींपैकी कोणीतरी एक हुप्प्याच्या आसपास असायची. त्याच्या तोंडावरून हात फिरवायची. त्याच्या अंगावरच्या केसातल्या उवा वेचून आपल्या स्वत:च्या तोंडात टाकायची. तो हुप्प्या मग तिला जवळ घ्यायचा. त्यावेळी दुसऱ्या माकडिणीनं त्याच्याजवळ जायचा प्रयत्न केला तर तो तिला फटकारायचा. ती बिचारी गुपचूप बाजूला जाऊन बसायची. तिचं पिल्लू सांभाळत. मला प्रश्न पडे, त्या आपापली बाळं कशी ओळखतात? मला ह्या विचाराचं हसूही यायचं. हुप्प्याची हुकमत बघून मनात विचार यायचा, 'इथेही पुरुषप्रधान पद्धतच की.' पण माझा वेळ छान जायचा ते वानरचाळे बघताना. तो माझा विरंगुळाच होऊन बसला होता- रोजचा. शाळेतून काम करून, थकून घरी आल्यावर पुन्हा कुठे बाहेर जाण्यापेक्षा ह्या मर्कटलीला बघणं बरं वाटायचं.

मनात आलं, श्रीरंगला आपल्याजवळ बसवून हे माकडांचे खेळ त्याला दाखवावे. त्याच्या मनातली माकडांची भीती संपूर्ण घालवून टाकावी, असं ठरवलं. तशी ती आता खूपच कमी झाली होती पण समूळ काढून टाकण्यासाठी हा उपाय चांगला होता. त्याला सांगावं की माकडंही आपल्यासारखीच आहेत, की आपण त्यांच्यासारखे आहोत अजूनही? हा प्रश्न तो पुढे सोडवेल, मोठा झाल्यावर.

आम्ही मुंबईला स्थायिक झाल्यावर बऱ्याच वर्षांनी पुन्हा अमरावतीला जाण्याचा योग आला. साहित्य संमेलनाच्या निमित्तानं. केशव त्या वर्षीच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष होता. तेव्हा वाटलं, विदर्भ महाविद्यालयाच्या कॉलनीत जावं. आपण इतकी वर्षं ज्या बंगल्यात राहिलो तो बघून यावा, ती चिंचेची झाडं, ती माकडं, सगळं बघावं हा हेतू मनात धरून आम्ही कॉलेज-कॉलनीत चक्कर मारली. सगळं तसंच असेल ही माझी भाबडी कल्पना!

बाहेरूनच तो बंगला बघितला. ती चिंचेची झाडं नव्हतीच तिथे. मग माकडं कुठून असणार? वाईट वाटलं. बंगला विवस्त्र झाल्यासारखा वाटला. मन खिन्न झालं. ही खिन्नता घेऊन परतले. पुढे खूप दिवस ती खिन्नता मनात होती.

**- प्रभा पुरोहित**
५ अभंग, साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : २६५९०५४३

जुन्याचा नव्याने शोध घेणाऱ्या


**‘शांबरिक खरोलिका’** या

**श्रीकांत पेटकर लिखित** पुस्तकाला

व

# ग्रंथालीला

**शुभेच्छा!**




# मास्टर इलेक्ट्रिकल्स

## सरकारमान्य विद्युत ठेकेदार

प्लॉट नं. इ-४, ॲडिशनल एम.आय.डी.सी., आनंदनगर, अंबरनाथ (पूर्व)
दूरध्वनी : (०२५१)२६२१३१६ / २६२१४४२
टेलिफॅक्स : (०२५१) २६२१२०९
masterelectricals@rediffmail.com

# सॉरी फॉर द ब्रेक ते कमर्शियल ब्रेक!

नरेंद्र बेडेकर


सॉरी फॉर द ब्रेक ते कमर्शियल ब्रेक या प्रवासानं सर्व संबंधितांचा कमर्शियल फायदा झाला हे मात्र नि:संशय! प्रायोजकांना लाभ झाला, वाहिन्यांची वाढ झाली. लेखक, कलावंत, तंत्रज्ञांना भरपूर काम, प्रसंगी मोबदलाही मिळू लागला. यात, आता सर्वजण 'व्यवसाय' म्हणून स्थिरावले आहेत. म्हणूनच आता त्यांच्याकडून काही अपेक्षा करायला हरकत नाही.

२ ऑक्टोबर, १९७२. तमाम मुंबईकरांची उत्सुकता शिगेला पोचली होती. याच मऱ्हाठी मुलखातल्या दादासाहेब फाळके यांनी, पडद्यावर दिसणाऱ्या, हलणाऱ्या चित्रांची निर्मिती केली. त्यावेळी पोचली होती तशीच. संध्याकाळी ठीक सहा वाजता पं. रविशंकरजींच्या संगीताच्या पार्श्वभूमीवर, दृक् माध्यमाचं प्रतीक असलेला 'डोळा' आणि त्या पाठोपाठ 'सत्यम् शिवम् सुंदरम्' ही अक्षरं छोट्या पडद्यावर उमटली आणि देशातल्या पहिल्या 'सुनियोजित' दूरदर्शन केंद्राला मुंबईत सुरुवात झाली.

तसं दूरचित्रवाणीचं हे तंत्रज्ञान देशाला माहीत झालं ते १९५९ साली. दिल्लीच्या प्रगती मैदानावर भरलेल्या प्रदर्शनात फिलिप्स कंपनीनं ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाइट (मोनोक्रोम) टेलिव्हिजनचं प्रात्यक्षिक मांडलं होतं. प्रदर्शनानंतर ही सामग्री त्यांनी इथेच देणगीरूपात दिली. त्या सामग्रीचा उपयोग करण्यासाठी काहीजणांना परदेशात प्रशिक्षणाकरताही पाठवण्यात आलं. त्यातून राजधानी दिल्लीमध्ये मर्यादित स्वरूपात छोट्या पडद्याचा उगम झाला. अर्थात त्याच्या प्रक्षेपणाची व्याप्ती आताच्या रेडिओ एफ.एम. चॅनेलच्या परिघाइतकीही नव्हती.

१९७२ साली त्यावेळच्या पश्चिम जर्मनीत झालेल्या, म्युनिच ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेच्या चित्रिकरणाकरता वापरलेलं तंत्रज्ञान आणून, मुंबई दूरदर्शन केंद्राची निर्मिती झाली. मग मुंबई दूरदर्शन केंद्रामुळे कृष्णधवल पडद्याची व्याप्ती वाढू लागली. घराघरांना जणू 'होम थिएटर'चं स्वरूप प्राप्त झालं. लोक आपापली कामं उरकून जवळपास ज्याच्या घरी टीव्ही आहे, त्याच्या घरात बिनदिक्कत घुसू लागले आणि तो घरमालकही कपाळावर आठ्या येऊ न देता, येणाऱ्याची, अगदी चहा-पाण्यासकट सोय करण्यात आनंद आणि अभिमान मानू लागला. चित्रपट, छायागीत, क्रिकेट मॅचच काय अगदी पुढच्या आठवड्यातल्या कार्यक्रमांची माहिती देणारी 'साप्ताहिकी' पाहण्याकरताही कौतुकभरल्या नजरा पडद्यावर खिळू लागल्या. अधेमधे प्रसारणात खंड होई आणि 'व्यत्यय' किंवा 'सॉरी फॉर द ब्रेक' ही पाटी रसभंग करे, पण नेमकी तीच वेळ साधून




प्रेक्षकांतून (किंवा टीव्हीच्या परिभाषेत-दर्शकांतून) पाण्याचे ग्लास फिरवले जात आणि ताजेतवाने होऊन पुन्हा एकदा पडद्याकडे डोळे ताणले जात.

सुरुवातीच्या काळात प्रक्षेपणप्रणाली फारशी विकसित नसल्यामुळे हा 'ब्रेक' टाळणं जसं दूरदर्शनला शक्य होत नव्हतं तसंच निवेदिकेच्या चेहऱ्याभोवती रुंजी घालणाऱ्या माशीला हटवणंही दीर्घकाळ शक्य झालं नव्हतं. पण मायबाप रसिक मात्र या गोष्टी हसण्यावारी नेऊन मधुकरवृत्तीनं विविध कार्यक्रमांचा मकरंद लुटत. अर्थात तशी संधीही त्यांना मिळत होती. अमृतमंथन, प्रतिभा आणि प्रतिमा, सुंदर माझं घर, गजरा, ज्ञानदीप अशा कार्यक्रमांतून दूरदर्शनच्या शिक्षण-माहिती आणि मनोरंजन या त्रिसूत्रीचा नेमका मेळ घातला जात होता.

हळूहळू हा छोटा पडदा लोकप्रियतेच्या निकषांवर अधिकाधिक मोठा होत गेला आणि त्यानं अवघं समाजजीवन व्यापून टाकलं. १९८२ साली दिल्लीत झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धांचं औचित्य साधून टीव्ही रंगीत झाला. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे दूरचित्रवाणीचं जाळं खेडोपाडी पसरलं.

सुरुवातीच्या काळातले 'इमेज आर्दिकॉन' कॅमेरे मागे पडून १९८४ च्या सुमारास इएनजी (इलेक्ट्रॉनिक न्यूज गॅदरिंग) तंत्रज्ञान आलं. त्यामुळे स्टुडियोतून बाहेर जाऊन चित्रीकरण करणं सुलभ झालं. पुढे एकविसाव्या शतकात प्रवेश करताना आपल्याकडेही डिजिटल तंत्रज्ञान आलं आणि चोवीस तास अखंडित, सुस्पष्ट, विनाव्यत्यय प्रसारण देणाऱ्या वाहिन्यांचं जाळं उभं राहिलं. 'अनंत हस्ते देता चित्रवाणीने, घेशील किती दो नयनाने' अशी भारतीयांची अवस्था झाली. टीव्ही हा जीवनाचाच भाग बनला. पूर्वी चित्रपटांची रंगीन दुनिया सर्वसामान्यांसाठी स्वप्नं विकत असे, आता चोवीस तास घराघरांतून स्वप्नं प्रदर्शित होऊ लागली. वास्तव काय आणि आभास काय याचा सामान्यजनांना विसर पडू लागला. या स्वप्नांच्या दुनियेत रममाण होत, आपल्या दिनचर्येचा बराचसा वेळ त्या 'कैफात' राहण्याचं 'व्यसन' बहुतेकांना जडलं. अन्न, वस्त्र, निवारा या बरोबरच टीव्ही ही गरिबांचीही प्राथमिक गरज बनली आणि डिश अँन्टेनाचे चंद्र झोपड्या-झोपड्यांवर उगवू लागले.

लोकांना वेड लावणाऱ्या या माध्यमाकडे व्यापारी वृत्तीची नजर गेली नसती तरच नवल! पण आता या माध्यमालाही वाढता पसारा सांभाळण्यासाठी व्यापारीकरण करणं भाग झालं. मुंबई दूरदर्शनवर १९७४ साली प्रथम एका गझलच्या कार्यक्रमाला प्रायोजित केलं गेलं होतं. 'गजरा' या लोकप्रिय कार्यक्रमात कधी 'कालनिर्णय', 'बँक ऑफ महाराष्ट्र' यांच्या नावाच्या पट्ट्या दाखवल्या जात. पण दूरदर्शन मालिकेच्या लोकप्रियतेचा फायदा प्रायोजकाच्या उत्पादनाच्या विक्रीला झाल्याचं पहिलं ठसठशीत उदाहरण, 'ये जो है जिंदगी' या हिंदी मालिकेमुळे, कंपनीच्या उत्पादनाची विक्री वीसपट वाढल्याचं तेव्हा 'विको'च्या मालकांनी जाहीरपणे सांगितलं होतं. नव्वदच्या दशकाच्या अखेरीस एस्सेल उद्योगसमूहाचं पहिलं खाजगी हिंदी चॅनेल आलं. आणि व्यावसायिकतेला दूरचित्रवाणी माध्यमामध्ये मुक्तद्वार मिळालं.

याच सुमारास देशात आणि जगभरातही मोठा सामाजिक बदल होत होता. जागतिकीकरणामुळे देश जवळ येत होतेच, पण उपग्रहवाहिन्यांच्या जाळ्यामुळे सर्वसामान्यांसाठी ते अधिकच जवळ आले. परदेशी उत्पादनं, तिथले ब्रॅन्डस्, त्यांची लाइफस्टाइल यांनी भारावून जाणारा, आर्थिक सुबत्ता आलेला नवश्रीमंत वर्ग आमच्याकडेही उदयाला येत होता. या वर्गाची खर्च करण्याची क्षमता वाढत होती. त्यांनाच लक्ष्य करून नवनवीन, विशेषत: चंगळवादी जीवनशैलीला अनुकूल उत्पादनांच्या जाहिरातींचा मारा छोट्या पडद्यावरून होऊ लागला. पण त्याचा विपरीत परिणाम सर्व समाजघटकांवर होऊ लागला.

मोखाड्यासारख्या आदिवासी भागात, कडेवर खंगलेलं मूल घेऊन केमिस्टच्या दुकानात, मुलाच्या तापासाठी गोळी आणि स्वत:साठी शाम्पू मागणारी आदिवासी स्त्री मी पाहिलीय. दुकानदारानं शाम्पू देऊनही ती माघारी जात नव्हती, कारण तिला जाहिरातीत दिसणारा विशिष्ट रंगाच्या 'सॅशे'मधलाच शाम्पू हवा होता किंवा शहरातून बांधकामावर मजुरी करणाऱ्या तीन लमाण स्त्रियांना कनवटीची चिल्लर एकत्र करून जाहिरातीतून फेसाळणारा एक कोला तिघींनी मिळून घोट घोट पीत धन्य होतानाही मी पाहिलंय. छोट्या पडद्यावरच्या जाहिरातींमुळे असा आगळावेगळा 'सामाजिक विकास'ही घडू लागला.

तंत्रज्ञानाच्या विकासामुळे 'सॉरी फॉर द ब्रेक' ही पाटी इतिहासजमा झाली, पण व्यापारी वृत्तीच्या अतिरेकामुळे सारख्या येणाऱ्या 'कमर्शियल ब्रेक'शी मायबाप प्रेक्षकांनी निमूट जुळवून घेतलं. पुढे पुढे जाहिरातींचा मारा इतका वाढला, की कार्यक्रम नको पण जाहिराती आवरा असं म्हणण्याची वेळ आली. 'ब्रॅन्डिंग'मुळे उत्पादनाच्या नावामागे शेपूट लावल्यागत कार्यक्रमाचं नाव येऊ लागलं आणि जाहिरात प्रथम हे सत्य अधोरेखित झालं. 'सपट चहा-महाचर्चा' असं नाव पाहिल्यावर कार्यक्रमातली महाचर्चा 'सपक' तर नसेल ना, अशी शंका मनात उगीचच यायला लागली.

वाहिन्यांच्या मानगुटीवर बसलेल्या प्रायोजकांच्या वेताळाला टी.आर.पी.चं नवं कोलीत मिळालं आणि त्याची झळ वाहिन्या आणि कलावंत दोघांनाही बसू लागली. अमुक कलाकार हवा इथपासून पुढे तमुक कलाकार नको, इथपर्यंत ही मजल गेली. वेताळाच्या प्रश्नांना उत्तरे देताना विक्रमाला नवनवीन क्लृप्त्या रचाव्या लागल्या. टीआरपीच्या दडपणाखाली मालिकांची कथानकं भरकटू लागली. साचेबद्ध कार्यक्रम होऊ लागल्याने वाहिन्यांची आयडेन्टिटी लोप पावली. विकल्या जाणाऱ्या संकल्पनांना ऊत आल्यामुळे कार्यक्रम अधिकाधिक सवंग होत गेले. चोवीस तास खायला लागणाऱ्या या माध्यमाची भूक भागवताना कल्पनाशक्ती थिटी पडू लागली. त्यातून परदेशी वाहिन्यांच्या कार्यक्रमाच्या नकला होऊ लागल्या. त्यामुळे पाश्चिमात्य संस्कृतीचा खुलेपणा केवळ बिग बॉसच्याच नव्हे, तर देशातल्या घराघरांत घुसू लागला.

वृत्तवाहिन्यांची स्पर्धा आणि टीआरपीची चढाओढ हा तर एक स्वतंत्रच विषय होईल. बातम्या 'देणं' ही सुरुवातीची संकल्पना नंतरच्या स्पर्धात्मक युगात फारच मिळमिळीत वाटायला लागली, मग बातमी 'शोधणं, 'घडवणं' आणि प्रसंगी 'लादणं' असे वेगवेगळे आयाम प्रसारमाध्यमातल्या बातम्यांना मिळत गेले. बातम्यांचं स्वरूप अधिकाधिक भडक, अतिरंजित होत गेले. छुप्या कॅमेराच्या चित्रीकरणामुळे अनेक भ्रष्ट, अनैतिक गोष्टी चव्हाट्यावर आल्या. यात एकीकडे समाधान मानावं तर दुसरीकडे खासगी आयुष्यातली छुप्या कॅमेराची घुसखोरी चिंतेचा विषय ठरली. अशा चित्रीकरणाच्या हेतूविषयीही प्रश्नचिन्हं उमटू लागली. चोवीस तास बातम्यांचा रतीब घालण्यासाठी पुराणातली वानगी दिली जाऊ लागली. हनुमान, रावण, पांडव यांच्या कहाण्या, त्यांची जन्मस्थानं, तिथल्या खुणा इथपासून ते हिमालयातला हिममानव, बर्मुडा ट्रॅन्गल, उडत्या तबकड्या या विषयीच्या खऱ्या-खोट्या, शास्त्रीय-अशास्त्रीय माहितीचा ओघ कायम ठेवत प्रेक्षकांना खेचण्याची व टिकवण्याची धडपड चालू राहिली. खोल खड्ड्यात पडलेल्या प्रिन्सपासून, अण्णांच्या उपोषणापर्यंत सारेच बातम्यांसाठीचे 'इव्हेन्ट' झाले. वाचाळवीरांना महत्त्व आलं. वादाला निमंत्रण देणारे 'बाइटस्' हवेहवेसे वाटू लागले. प्रसारमाध्यमांना दुखावण्याची हिंमत नसलेले राजकीय पक्ष आणि नेते, हे वृत्तवाहिन्यांचे सॉफ्ट टार्गेट बनले आणि त्यांच्यात कलह लावणाऱ्या कळीच्या नारदाची भूमिका वाहिन्यांनी आनंदाने स्वीकारली. स्पर्धात्मक कार्यक्रमांमध्ये 'कौन बनेगा करोडपती'ने लोकप्रियतेचं शिखर गाठलं. पण हर्षवर्धन नवाथेच्या रूपात पहिला करोडपती गवसण्याआधीच कार्यक्रमासंबंधित व्यक्ती आणि संस्थांनी कैक करोड कमवून घेतले. गाण्याच्या स्पर्धा तर पुढे पुढे इतक्या उदंड झाल्या, की चांगला गायक निवडणे हीच देशापुढची महत्त्वाची समस्या आहे की काय, असं चित्र निर्माण झालं. एसएमएसच्या भूलभुलय्याचा फोलपणा लक्षात येऊनही 'फॅन्स' व्यावसायिकतेच्या एका नव्या जाळ्यात स्वेच्छेने अडकू लागले.

पूर्वी गुणवंताच्या प्रतिभेला वाव देणारं हे माध्यम, अवगुणांचं प्रदर्शन मांडून जनमानस आकृष्ट करू लागलं. देहप्रदर्शन करणाऱ्या नट्या, सार्वजनिक जीवनात बेताल वर्तन करणारे कलावंत आणि राजकीय उच्चपदस्थांच्या अब्रूचे, त्यांच्या पश्चात धिंडवडे काढणारे कुपुत्र; केवळ टी.आर.पी. वाढेल या एकमेव क्षमतेवर विविध कार्यक्रमांत झळकू लागले. चित्रवाणी माध्यमांचा प्रवास 'क्लासेस'कडून 'मासेस'कडे झालाच, शिवाय तो होताना माध्यमांनी समाजाची अभिरुची

घडवण्यापेक्षा ती अधिकाधिक हीन कशी होईल याकडेच लक्ष दिलं, असं दुर्दैवानं म्हणावं लागेल.

व्यावसायिकीकरणाच्या रेट्यात प्रवाहपतित न होता, काही कार्यक्रमांनी वेगळा प्रयत्न निश्चित केला. मात्र असे प्रयत्न फारच विरळा! तंत्राचा विकास झाला पण कार्यक्रमाच्या अंगभूत गुणवत्तेचा आणि कल्पकतेचा दर्जा दूरचित्रवाणीच्या पहिल्या एक-दोन दशकांत जेवढा होता त्याच्यापुढे गेला नाही. नाहीतर सर्व कुटुंबांनी एकत्र बसून, नर्म विनोदाचा निखळ आनंद घेत आपल्याच जीवनाचं दर्शन घ्यावं अशा मालिकेसाठी 'चिमणराव गुंड्याभाऊ' नंतर, थेट 'गंगाधर टिपऱ्यां'पर्यंत थांबावं लागतं, हे कसलं लक्षण आहे? 'प्रतिभा आणि प्रतिमा'ची उंची 'नक्षत्रांचे देणे' सारख्या एखाद्याच कार्यक्रमाला का लाभते? गुणवत्तेशी तडजोड न करताही लोकप्रियता (आत्ताच्या भाषेत टी.आर.पी.?) राखणाऱ्या 'हमलोग', 'बुनियाद'नंतरची मेगा सीरियल चटकन का आठवत नाही? रामायण-महाभारत-चाणक्य या मालिकांनंतर भव्यता आणि परिणामकारकता याबाबतीत थेट 'राजा शिवछत्रपती'चं? अलीकडच्या काळातल्या मोठ्या व्यक्तींच्या विचार-लिखाणावर आधारित 'भारत : एक खोज' किंवा स्फोटक सामाजिक परिस्थितीचं संवेदनशील चित्रण करणारी 'तमस', ह्या देखील दूरचित्रवाणीच्या पहिल्या काही दशकांतल्याच किंवा खासगी वाहिन्यांच्या जन्मापूर्वीच्याच. खरंतर, आता नव्यानं पुढे येणाऱ्या बऱ्याच संकल्पना पूर्वीच अजमावून झाल्या होत्या. सामान्य ज्ञानाची परीक्षा पाहणारा 'खेळियाड' अंतर्गत 'फुली गोळा' कार्यक्रम किंवा बबन प्रभू, याकूब सईद यांचा द्विपात्री कॉमेडी 'हास-परिहास' ही त्याचीच उदाहरणं.

सॉरी फॉर द ब्रेक ते कमर्शियल ब्रेक या प्रवासानं सर्व संबंधितांचा कमर्शियल फायदा झाला हे मात्र नि:संशय! प्रायोजकांना लाभ झाला, वाहिन्यांची वाढ झाली. लेखक, कलावंत, तंत्रज्ञांना भरपूर काम, प्रसंगी मोबदलाही मिळू लागला. यात, आता सर्वजण 'व्यवसाय' म्हणून स्थिरावले आहेत. म्हणूनच आता त्यांच्याकडून काही अपेक्षा करायला हरकत नाही.

केवळ रंजनापलीकडे जाऊन समाजाच्या ज्ञानकक्षा रुंदावणारे, जाणिवा-संवेदना विकसित करणारे कार्यक्रम यापुढे तरी होतील का? आमच्या ज्या संस्कृती आणि इतिहासाचे आम्ही नुसते पोवाडे गातो तिचं समग्र दर्शन घडवणारी एखादी स्वतंत्र वाहिनी आमच्या देशात का निर्माण होऊ नये?

आज जगभरात भारताविषयीच्या अनेक बाबींचं औत्सुक्य आहे. अनेक परदेशी विद्यापीठांतून भारताविषयी अभ्यास करणारे विभाग आहेत. इथली योगविद्या, चरकसंहिता, आयुर्वेद, इथले आर्यभट्ट, भास्कराचार्य, शंकराचार्य, इथली शिल्पकला, नृत्यकला, संगीत, विविध प्रकारची वाद्यं या सगळ्यांचा कायमस्वरूपी जतन करावा असा, दृक्‌श्राव्यमाध्यम रूपातला ठेवा निर्माण करणं, ही आजची गरज आहे. विशेषत: एकविसाव्या शतकात जगाला नेतृत्व देण्याची भाषा करणाऱ्या देशाला त्याची अधिक निकड आहे. आज माध्यमाकडे ती क्षमता आहे. मात्र याकरता व्यावसायिक धबडग्यातून थोडा 'ब्रेक' घेण्याची गरज आहे. तेवढी उसंत आजच्या दूरचित्रवाणी माध्यमसम्राटांना आहे का, एवढाच प्रश्न आहे!


**– नरेंद्र बेडेकर**
जी-२, बी-२, विहंग गार्डन, पोखरण रोड नं.१,
रेमंड कंपनीजवळ, ठाणे - ४००६०६
दूरध्वनी : २५३७०५४३
भ्रमणध्वनी : ९८२१०५९४०५
nvbedekar@gmail.com



**संस्कार, संगोपन, संस्कृती आणि संवाद साधणारी**
**अनुराधा गांगल यांची चार ताजी पुस्तके**



**बाळाची चाहूल**
**मूल्य ६० रु.**



**संस्कार**
**मूल्य ६० रु.**



**भारती सृष्टीचे...**
**मूल्य १२० रु.**



**रांगोळी**
**मूल्य १८० रु.**

**४२० रुपयांचा संच घरपोच २५० रुपयांत!**

# मन:स्पर्शी

लतिका
भानुशाली

रेडिओ मिर्ची, एफ.एफ. गोल्ड अशा हिंदी-मराठी एफ.एफ. वाहिन्या येता-जाता सर्वत्र आपली साथ करतात. मनोरंजनापासून दिशादर्शनापर्यंत अनेक प्रकारची माहिती पुरवतात. रेडिओ जॉकी हा न थकणारा व श्रोत्यांची मरगळ घालवणारा किमयागार नात्यांची नकळत गुंफण करतो. त्या आवाजाच्या दुनियेतील हे मन:स्पर्शी अनुभव...

**एफ**.एम.चे रेडिओ जॉकी हे आजच्या धावत्या जीवनातील आवश्यक व्यक्तिमत्त्व झाले आहे. बसमध्ये, ऑफिसमध्ये प्रवासात ते आपल्याशी संवाद साधत असतात. कधी कधी हेच आर.जे. अनेकांच्या रोजच्या आयुष्याचा अविभाज्य भाग होतात. प्रेमाचे, जिव्हाळ्याचे, आपुलकीचे, वडिलकीचे भावबंध यातून तयार होतात आणि ते श्रोते व आर.जे. या दोघांनाही संपन्न करतात.

रेडिओ हे माध्यमच असे आहे की 'मेरी आवाजही पहचान है' हेच सत्य असते. त्यामुळे श्रोते व आर.जे. यांचे नाते म्हणजे 'पाहिले न मी तुला, तू मला न पाहिले' असे असते.

कित्येकांच्या आयुष्यात हे आर.जे. सखी, मित्र, एकांतपणातील आधार, बिछान्याला खिळलेल्यांच्या आयुष्यातील विरंगुळा अशा विविध नात्यांनी जोडलेले असतात.

गेली दहा वर्षे श्रोत्यांबरोबर रेडिओच्या माध्यमातून जिव्हाळ्याचे नाते जोपासलेले असे तीन रेडिओ जॉकी आहेत- रश्मि वारंग, मयुरेश शिर्के आणि गणेश आचवल. हिंदी रेडिओ वाहिन्यांच्या गदारोळात मराठी रेडिओ वाहिन्यांचे अस्तित्व टिकवून, मराठी भाषा, संस्कृती, रूढी, परंपरा यांना आपल्या ओघवत्या व अभ्यासपूर्ण भाषाशैलीतून नवसंजीवनी देणारे हे तीन 'आवाज'.

आकाशवाणी या शब्दातच मुळात जादू आहे. त्यामुळे तिथून ऐकू येणारे म्हणजे काहीतरी अद्‌भुत अशीच धारणा अनेकांची असते. पण तसे नसते. इंटरनेटमुळे आर.जे.चे काम सोपे झाले यांत शंका नाही, पण कार्यक्रम करताना वापरावी लागणारी कल्पकता, निर्णयक्षमता, कार्यक्रमाचे विषय, त्यासाठी गोळा करावी लागणारी माहिती, जुन्या गाण्यांच्या संदर्भातील किस्से यासाठी प्रचंड मेहनत लागते.

साधा 'रंग' हा विषय घेतला तरी त्यावर आधारित गाणी कशी निवडायची, कोणती गाणी लावायची, निवेदन कसे लिहायचे, आवाजातले चढउतार कसे असावेत हे सर्व शिकावे लागते. एखाद्या कलावंताच्या जीवनावर आधारित कार्यक्रम करायचा झाला तर त्या संदर्भातील माहिती गोळा करावी



गणेश आचवल

लागते. ती उत्तम संहितेत गुंफावी लागते. त्या व्यक्तीच्या संदर्भातील किस्से जमवावे लागतात. या सर्वांसाठी अभ्यासूवृत्ती व त्याचबरोबर उत्तम निवेदनकौशल्यही तेवढेच गरजेचे असते.

अशा या प्रवासात श्रोते व आर.जे. यांच्यात नकळत एक ऋणानुबंध तयार होतो. नात्यांचा तोच बंध या तीन आर.जें.च्या प्रत्यक्ष भेटीत उलगडला.

या संदर्भात गणेश आचवल यांनी पुरवलेली माहिती खूपच उद्‌बोधक आहे. आकाशवाणीच्या मुंबई केंद्राच्या एफ.एम. रेनबो वाहिनीवर (107.1 MHz) ते १९९९ सालापासून आर.जे. म्हणून ते कार्यरत आहेत.

ते म्हणतात, ''आकाशवाणी हे एक महत्त्वाचे प्रसारमाध्यम आहे. लहानपणापासून मी रेडिओ ऐकायचो. जेव्हा दूरदर्शनवर खाजगी वाहिन्यांचे अतिक्रमण झाले नव्हते तेव्हा रेडिओची लोकप्रियता प्रचंड होती. 'युववाणी'वरील कार्यक्रमापासून माझी रेडिओवरील करिअरला सुरुवात झाली. गेल्या बारा वर्षांत श्रोत्यांशी जुळलेले नाते हीच आज आयुष्यातील मोठी पुंजी वाटते. श्रोते हे आमचे चाहते तर असतातच, त्याचबरोबर ते मित्र, मार्गदर्शक आणि आमचे प्रेरणास्थान असतात. कारण ते आमचे कार्यक्रम ऐकतात, आम्हाला फोन करतात आणि त्यातून हे नाते घट्ट होत जाते.''

या संदर्भात त्यांच्या अनेक आठवणी आहेत. पूर्वी ते 'डायल इन' कार्यक्रम सादर करायचे तेव्हा अनघा जोशी या श्रोत्या आवर्जून फोन करायच्या. त्या पत्रही पाठवायच्या, पण त्यावर अनघा जोशी, चर्चगेट एवढाच पत्ता लिहायच्या. चार वर्षे त्यांची पत्रे सलग रेडिओवरून वाचली गेली. शेवटी योगायोगाने त्या बाईंचा पत्ता मिळाला आणि संक्रांतीच्या दिवशी स्वत: गणेश आचवल सहकारी निवेदिका मधुरा उपाध्ये यांच्यासह प्रत्यक्ष त्यांच्या घरी गेले. त्यातून हे संबंध अधिकच दृढ झाले. याची परिणती म्हणजे त्या बाई आकाशवाणीतील काही विभागांत निर्मिती साहाय्यक म्हणून काम करू लागल्या. २६ जुलैला आलेल्या महापुराच्या दिवशी, घर जवळ असल्याने अख्ख्या युनिटसाठी त्या साबुदाण्याची खिचडी करून घेऊन आल्या होत्या.

असाच दुसरा, त्यांचा आठवणीत राहिलेला किस्सा– स्मिता तेलंग या आणखी एक श्रोत्या, नेहमी पत्र पाठवायच्या. पत्र कुटुंबातील कोणाकडूनतरी त्या लिहून घेत असत. कारण त्यांना झालेल्या भयानक अपघातामुळे त्या कायम बिछान्यावर खिळलेल्या होत्या. गणेशजींना हे ठाऊक नव्हते. एकदा सर्व निवेदकांना त्यांनी घरी बोलावून घेतले तेव्हा सत्य कळले. त्यांनी प्रत्येकाच्या आवडीचा मेनू विचारून घेऊन तसे पदार्थ करवून घेतले होते. पत्रांवर आधारित कार्यक्रमात स्मितताताईंची पत्रे नेहमी वाचली जात. पण एकदा एक पत्र आले, की 'हे त्यांचे शेवटचे पत्र! कारण आता त्यांचे निधन झाले आहे.' त्यावेळी गणेशजींनी ते पत्र वाचले आणि गाणे लावले, 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा.'

अंधांच्या आयुष्यात 'आवाजाला' अनन्यसाधारण महत्त्व असते. एकदा आंतरराष्ट्रीय बालप्रसारण दिनानिमित्त काही अंध विद्यार्थिनी स्टुडिओत आल्या होत्या. त्यातील एकीने केवळ आवाजावरून गणेशजींना ओळखले. आपला आवाज कुणाच्यातरी जीवनात इतका महत्त्वपूर्ण असतो हे त्या दिवशी त्यांना कळले.

गेली अनेक वर्षे ते 107.1 MHz एफ.एम.रेनबो वाहिनीवर पहाटे पाच ते आठ असे, तीन तास दर बुधवारी आणि रविवारी 'मन:स्पर्शी जीवनगाणे' आणि 'स्वरमाला' असे कार्यक्रम सादर करतात. इतक्या सकाळी हे कार्यक्रम कोण ऐकत असेल असा प्रश्न कोणालाही पडणे साहजिकच आहे. मात्र जवळजवळ नव्वद हजार लोक हा कार्यक्रम ऐकतात यांची नोंद सर्वेक्षण विभागाकडून झालेली आहे.

स्मिता सहस्रबुद्धे या श्रोत्या कार्यक्रमाच्या विषयावर आधारित शीघ्र कविता करतात व फोन करून त्या रेडिओवर कळवतात. त्याचे वाचनदेखील गणेशजी नियमितपणे करतात.

मयुरेश शिर्के या रेडिओ जॉकीचा या क्षेत्रातील प्रवेश हा चक्क योगायोगाने झालेला आहे. मध्यमवर्गीय चाळीत राहताना तिथल्या परिसराची 'बोली मराठी' तोंडात बसलेली असताना, 'प्रमाण मराठी भाषा' वापरणे जिथे गरजेचे आहे अशा ठिकाणी त्यांना मिळालेली संधी म्हणजे मयुरेश यांना तो चमत्कारच वाटतो. त्यांच्या आवाजात असणारा खोल शांत, संयमीपणा व 'शब्दांमधील आर्तता' स्वरांमध्ये उमटवता येणारी त्यांची शैली या दोन गुणांवर त्यांची निवड झाली. 'फूल' शब्दाचा उच्चार 'ओष्ठ्य' करायचा, दात ओठाला लावून नाही हे



मयुरेश शिर्के

बाळकडू हळूहळू ते शिकत गेले. 'शणिवार' याचा उच्चार 'शनिवार' आहे हे त्यांना आकाशवाणीवर कळले. कॉलेजमध्ये 'बॅक स्टेज' सांभाळताना कलाकारांच्या तोंडी असलेली वाक्ये त्यांना आपोआप पाठ व्हायची. त्याचा पुढे त्यांना उपयोग झाला. बी.कॉम.ची पदवी पदरात पडल्यावर पुढे काय करायचे हे नक्की नसताना, काहीतरी वेगळे केले पाहिजे ही जाणीव त्यांना सतत अस्वस्थ करत असे. या वेळेपर्यंत रेडिओवरचे कार्यक्रमसुद्धा त्यांनी कधी ऐकले नव्हते. ''आकाशवाणीवर हंगामी निवेदकासाठी प्रस्ताव मागवले आहेत. तू प्रयत्न का करत नाही?'' या मित्राच्या प्रश्नाने त्यांना मार्ग सापडला. या क्षेत्रात आपण कसे उभे राहू हे मात्र त्यांना माहीत नव्हते. पण प्रयत्नपूर्वक 'प्रमाण मराठीच' नव्हे तर 'प्रमाण हिंदी'देखील ते शिकले व हिंदीतील उत्कृष्ट निवेदक म्हणून एफ.एम. गोल्डवर त्यांनी नाव कमावले.

ते म्हणतात, ''रेडिओ जॉकी म्हणून काम करत असताना श्रोत्यांशी संवाद हा तर एक महत्त्वाचा भाग असतो. कारण त्या मायबाप रसिक श्रोत्यांमुळेच आमचे कार्यक्रम त्यांना पसंत पडतात की नाही ते समजते. कधी कौतुकाची थाप पाठीवर पडते तर कधी चूक झाल्यावर अलगदपणे घरातील मोठ्या व्यक्तीच्या नात्याने आमचा कानही पकडला जातो. वेगवेगळ्या प्रांतांतील हे श्रोते रेडिओच्या आणि आमच्याही जीवनाचा भाग बनले आहेत.''

त्यांचे एक श्रोते वसंत वारूंडेकर यांचे रेडिओवर इतके प्रेम आहे की ते मोबाईलच्या माध्यमातून रेडिओ ऐकतात व निवेदनाविषयी आपले मत कळवण्यासाठी जवळच्या पीसीओवर जाऊन आकाशवाणीत फोन करतात.

प्रवीण पंडित हे श्रोते ज्या विषयावर कार्यक्रम सुरू आहे त्या विषयासंदर्भात आपल्या आठवणी सांगतात. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, अजून एकदाही त्यांनी दु:खद आठवण सांगितली नाही. त्यांचा जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन आम्हालाही नकळत काही शिकवून जातो असे मत मयुरेश शिर्के व्यक्त करतात.

कार्यक्रमाच्या तयारीचे अनुभव सांगताना ते म्हणतात, ''एक कार्यक्रम छान झाला म्हणून हुरळून जायचे असे हे क्षेत्र नाहीच. कालचा कार्यक्रम चांगला झाला म्हणजे उद्याचा होईलच असे नाही.''

शुक्रवारच्या 'पत्रोत्तर विशेष' कार्यक्रमात तर एका श्रोत्याने पत्रावर लिहिले, ''घातपाताच्या कारवाईचा भाग म्हणून पत्राच्या चिकटवण्याच्या भागाला विषारी पावडर लावली जाऊ शकते, सावधान!''

अशा विविध अनुभवातून संपन्न होत आज मयुरेश विद्यार्थी, शिक्षक किंवा इतरांसाठी 'व्हॉइस डेव्हलपमेंट कोर्स' घेतात. गेली सहा वर्षे त्यांनी सहाशे विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले आहे. मुंबईबाहेरच्या मुलांना असे कोर्स कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने, तिथल्या मुलांमध्ये गुणवत्ता असूनही योग्य मार्गदर्शन, योग्य संधी उपलब्ध होत नाहीत म्हणून ते स्वत:च महाराष्ट्रातील विविध ठिकाणी जाऊन 'आवाज प्रशिक्षण' देण्याचे काम करतात. त्यांच्या या कामात सहभागी असणाऱ्या रेडिओ जॉकी म्हणजे रश्मि वारंग.

आकाशवाणीवरील 'सखी' कार्यक्रमातून अनेक वर्षे आपला आवाज देणाऱ्या रश्मि वारंग यांचेही श्रोत्यांबरोबरचे नातेसंबंध असेच दृढ आहेत. अनेकदा श्रोते कळवतात, की ''गाणी घरी टेपवर ऐकलेली आहेत, पण तुमच्या निवेदनासाठी ऐकतोय.'' त्यावेळी जबाबदारीचे भान येते अशी नोंद त्या करतात. कारण सुंदर निवेदनाबरोबरच संदर्भपण अचूक द्यायला पाहिजेत याची जाणीव त्यामुळे होते. गाणी व श्रोते यांमधील दुवा म्हणजे हे आर.जे. असतात. म्हणूनच आपले बोलणे या दोघांमध्ये 'अडथळा' ठरणार नाही हे आर.जे.ला पाहावे लागते. उलट, गाण्याची उंची वाढेल असे निवेदन करणे गरजेचे असते अशी त्यांची धारणा आहे.

त्या म्हणतात, ''हातात आयुधं सज्ज आहेत म्हणून युद्ध जिंकता येत नाही, त्याप्रमाणे उत्तम संहिता, उत्तम गाणी, उत्तम आवाज आहे म्हणून कार्यक्रम चांगला होईलच असा फाजील आत्मविश्वास ठेवता येत नाही. 'सादरीकरण' या संकल्पनेत आवाजातील चढउतारापासून, गाण्याची निवड ते वेळेचं भान, प्रसंगावधान, दक्षता या सर्वच गोष्टी सांभाळाव्या लागतात.''

या संदर्भातील त्यांची एक आठवण अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण



**रश्मि वारंग**

आहे. प्रसिद्ध नृत्यांगना छाया-माया खुटेगावकर यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम होता. त्या दोघी स्टुडिओत येताना गणपतीच्या 'ट्रॅफिक जॅम'मध्ये अडकल्या. कार्यक्रम 'लाइव्ह' होता त्यामुळे वेळ कशी मारून न्यावी हा मोठा प्रश्न होता. मग रश्मीताईंनी चक्क लोककला अकादमीचे प्रकाश खांडगे यांनाच फोन केला. ते लोकल ट्रेनमध्ये होते व ऑफिसला जाण्याच्या गडबडीत होते. तरी या दोघी नृत्यांगनांविषयी माहिति द्यायला तयार झाले. माहिती देताना ट्रेनमध्ये मोबाइलची रेंज ये-जा करत होती. शेवटी एका स्टेशनवर खाली उतरून त्यांनी सविस्तर माहिती देऊन कार्यक्रमाची वेळ निभावून नेली. म्हणून 'लाइव्ह' कार्यक्रम ही तारेवरची कसरत असते असे त्यांचे म्हणणे आहे.

एकदा एक सुप्रसिद्ध डॉक्टर स्त्री-आरोग्याविषयीच्या चर्चासत्रात सहभागी झाले होते. त्यांना या माध्यमाचे भान नव्हते. मध्येच त्यांनी एक कागद काढून त्यातील आकृती समजावयाला सुरुवात केली. 'कागदावरील आकृती श्रोते पाहू शकत नाहीत' असे त्यांना सरळ सांगणे त्यांचा अपमान करणारे ठरले असते त्यामुळे प्रसंगावधान राखून रश्मीताई म्हणाल्या, ''खरंच डॉक्टर, या इतक्या छान आकृत्या आहेत. आपल्या श्रोत्यांना त्या दाखवता आल्या असत्या तर त्यांना नक्कीच फायदा झाला असता.'' अर्थातच डॉक्टरांना चूक लक्षात येऊन ते मिश्किलपणे हसू लागले हा भाग वेगळा.

'पडद्यामागील कलाकार' या कार्यक्रमाअंतर्गत विविध मान्यवरांच्या मुलाखती घेताना एकदा एडिटर भक्ती मायाळू या स्टुडिओत आल्या. ''माझे वडील बाहेर बसलेत. ते स्टुडिओच्या आत आले तर चालेल का?'' म्हणून त्यांनी विचारणा केली. त्यांचे वडील म्हणजे सुप्रसिद्ध दिग्दर्शक राजदत्त हे होते. एवढा मोठा संदर्भ आपल्याला माहीत नव्हता याचा रश्मीताईंना मोठा धक्का बसला. पण त्यामुळे कार्यक्रमाला वेगळा हृदयस्पर्श झाला.

जीवनात कितीही गंभीर प्रसंग आला तरी आर.जे.ची भूमिका पार पाडणे गरजेचे असते. एकदा त्या आकाशवाणीत पोचल्या आणि वडिलांना अत्यवस्थ अवस्थेत हॉस्पिटलला नेण्यात येत आहे असा निरोप मिळाला. परिस्थिती गंभीर होती. कार्यक्रमाला फक्त पंधरा मिनिटे बाकी होती. त्यामुळे आयत्या वेळी कोणाला तयार करणेदेखील शक्य नव्हते. विषय होता- 'हसण्याचे फायदे'. वडील गंभीर अवस्थेत असताना आपण मात्र हसतोय ही गोष्ट त्यांना कार्यक्रमभर टोचत होती. म्हणून त्या म्हणतात की हे काम म्हणजे 'सतीचं वाण' आहे.

'डायल आऊट' कार्यक्रमाचे स्वरूप वैशिष्ट्यपूर्ण काम करणाऱ्या व्यक्तींच्या मुलाखती त्यांच्या कामाच्या ठिकाणी जाऊन घ्यायच्या असे होते. त्यानिमित्ताने दिवाळीत 'घरगुती उटणं' तयार करणाऱ्या बाईंच्या घरी त्या गेल्या. सकाळी सातला झोपलेल्या माणसांची अंथरुणे बाजूला सारून, लँडलाइनजवळ बसून, घरातले लोक डाराडूर असताना त्यांनी हा इंटरव्ह्यू आपल्या स्टुडिओत पोचवला.

असे हे विविध अनुभव. श्रोते व रेडिओ जॉकी या दोघांनाही संपन्न करणारे. या माध्यमाविषयी आपली भावना व्यक्त करताना हे तिघे म्हणतात,

रेडिओच्या क्षेत्रातले हे नित्यनवेपण मनाला भावते. एकाच वेळी आपल्याला अनेकांपर्यंत नेणारे हे माध्यम स्वत:ला व्यक्त करण्याची संधी देतानाच इतरांचे व्यक्त होणेही अनुभवायला देते आणि म्हणूनच-

आपण कुठे आहोत...
कुठून आलोत आणि अजून कुठवर जायचेय
याचा प्रवास निरखावासा वाटतो...

आणि आतापर्यंतचा हा प्रवास तरी मनात एकच भावना निर्माण करतो...

कृतार्थ...

**- लतिका भानुशाली**
१० सी, एन्जालिका कॉसमॉस लाँज,
नीलकंठ ग्रीनसमोर, मानपाडा,
ठाणे (प.) ४०० ६०६
latikabhanushali@yahoo.co.in

# लता आखिर लता है

दिवाकर गंधे

लता त्या संगीतकारांबद्दल कधी एका ओळीनंही चांगलं कधी बोलली आहे का? ह्या अज्ञानमूलक प्रश्नाचं अगदी ठाम उत्तर आहे, 'हो'. एकदाच नाही, अनेक वेळा. जुन्या महान संगीतकारांबद्दल नाही तर अगदी अलीकडच्या नवोदित संगीतकारांबद्दलही ती निर्मळपणे, चांगलं बोललेली आहे.

**मा**झ्या एका संगीतप्रेमी मित्राला अकस्मात एका अनोळखी व्यक्तीचा फोन आला आणि तावातावाने तो बोलत होता, ''तुम्ही एवढे लता, लता करता, तिचे फोटो घरात लावता. तिला देवी मानता... पण लताला चांगले संगीतकार मिळाले नसते तर ती एवढी मोठी झाली असती का? बरं, ते जाऊ द्या. ज्या संगीतकारांनी तिला एवढं महान बनवलं त्या संगीतकारांबद्दल ती कधी काही चांगलं बोलली का?... अशी एखादी तरी ओळ मला दाखवा, की तिनं एखाद्या संगीतकाराबद्दल काही चांगलं म्हटलं आहे!... ती फक्त स्वत:बद्दल, दीनानाथांबद्दल आणि हृदयनाथांबद्दल बोलत असते...'' त्या क्षणी याला काय उत्तर द्यावं हे माझ्या मित्राला सुचलं नाही. मग रात्री त्यांनी मला फोन केला आणि या विषयावर जवळजवळ अर्धा तास आम्ही बोलत राहिलो.

वास्तविक, आता या गोष्टींना मुळातच फारसा अर्थ राहिलेला नाही. पंधरा-वीस वर्षांपूर्वी ह्या गोष्टी होत होत्या. लतावर अनेक प्रकारचे दोषारोप केले जात होते. अनेक प्रकारची टीका तिच्यावर होत होती, पण लता तळपतच राहिली. जगातले सर्व मानसन्मान तिला मिळालेत. भारतातला सर्वोच्च सन्मान 'भारतरत्न'ही तिला मिळाला. चित्रपट क्षेत्रातला 'दादासाहेब फाळके' पुरस्कारही तिला मिळाला. वाद-विवादाच्या, निंदा-स्तुतीच्या, आनंद-विषादाच्या, ऐहिक पातळीवरील ह्या सर्व गोष्टींच्या पलीकडे ती जाऊन बसली आहे. नुकतंच तिनं ८३व्या वर्षात पदार्पण केलं आहे आणि तिच्या आरोग्यानं आणि अप्रतिम आवाजानं ह्या सगळ्या गोष्टींना कधीच छेद दिला आहे. आपल्या शुभ्र व्यक्तित्वानं हे शिंतोडे कधीच धुऊन निघालेले आहेत. लतानं आपल्या बरोबरीच्या गायिकांना कधीच पुढे येऊ दिलं नाही, तिला मोठं करणाऱ्या संगीतकारांबद्दल ती कधीच चांगलं बोलत नाही, काही संगीतकारांचं करियर तिनं बरबाद केलं, 'ए मेरे वेतन के लोगों' तिनं स्वत:च्या सख्ख्या बहिणीकडून- आशाकडून हिसकावून घेतलं, तिच्या आवडत्या गाण्यांमध्ये तिनं ह्या ह्या संगीतकारांना हेतुपुरस्सर डावललं, ती दुसऱ्यांचा दु:स्वास करणारी आहे, ऐन वेळी रेकॉर्डिंग रद्द करून

निर्मात्यांचं नुकसान करण्यात पटाईत आहे, अनेक नव्या गायिकांना तिनं पुढे येऊ दिलं नाही, स्वत:ची एकाधिकारशाही तिनं निर्माता-संगीतकारांवर लादली; वगैरे वगैरे चर्चांनी नियतकालिकांची पानंच्या पानं भरलेली आहेत आणि इतक्या वर्षांनंतर अजूनही काही लोक ह्याच गोष्टींमध्ये रस घेणारे आणि अज्ञानमूलक विधानं करून मन:शांती मिळवणारे आहेत, हे ऐकून मला धक्काच बसला. लताबद्दल खूप चांगलं बोलत राहण्याची जशी काही लोकांना नशा आहे तशीच तिच्याबद्दल सतत वाईट बोलण्याची, तिला कमी लेखण्याचीही काहींवर नशा आहे. आपली एक मनोवृत्ती असते, अर्धवट माहितीवर आपण आपली ठाम मतं बनवत असतो. चांगुलपणापेक्षा निंदा आम्हाला अधिक प्रिय असते. रस्त्यात कुणाची हमरीतुमरी झाली तर लगेच गर्दी जमते. निंदात्मक चर्चा करण्यात आपल्याला जास्त इंटरेस्ट असतो आणि एखाद्याचं मोठेपण आम्ही निर्विवादपणे, सहजासहजी स्वीकारत नाही का?

मित्राला आलेल्या त्या लताप्रेमी (?) व्यक्तीच्या म्हणण्यात दोन महत्त्वाचे मुद्दे मला दिसतात. एक म्हणजे लताला जर चांगले संगीतकार मिळाले नसते तर ती एवढी मोठी झाली असती का? आणि दुसरा म्हणजे ज्या संगीतकारांनी तिला मोठं केलं, त्यांच्याबद्दल ती कधीच काही चांगलं बोलली नाही.

ह्या दोन्हीही मुद्द्यांचा परामर्श घेण्यापूर्वी किंवा चर्चा करण्यापूर्वी काही महत्त्वाच्या प्राथमिक गोष्टी आपण लक्षात घेतल्या पाहिजेत. पहिली गोष्ट म्हणजे लताला मिळालेली आवाजाची दैवी देणगी. तिच्या आवाजाचं वर्णन करायला सगळे शब्द, अलंकार थिटे पडलेले आहेत. इंग्रजीत 'गोल्डन व्हॉइस' (Golden voice) तर इटालियनमध्ये 'स्वान व्हॉइस' (Swan voice) असं म्हणतात. त्याही पलीकडे कुठेतरी त्या आवाजाची जातकुळी आहे असं मला वाटतं. पन्नास वर्षांत अनेकांनी तिच्या ह्या आवाजाबद्दल लिहिलं आहे. दुसरं म्हणजे बालपणापासूनच तिचे वडील दीनानाथ यांनी त्यावर केलेले संस्कार. त्या आवाजाचा भक्कम पाया. तिसरे म्हणजे, लतानं त्या आवाजावर घेतलेले परिश्रम. रियाज. गाणं म्हणण्यापूर्वी केलेल्या रिहर्सल्स, आवडणाऱ्या अनेक गोष्टींचा त्याग आणि प्रत्येक संगीतकाराकडून काही ना काही शिकण्याची वृत्ती. चित्रपटसृष्टीत आल्यानंतर १९४९ साली प्रसिद्धीच्या शिखरावर पोचेपर्यंतच्या सात वर्षांत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत (घरची आणि बाहेरची) तिने आपल्या गाण्यासाठी उपसलेले प्रचंड कष्ट, अपमान, निराशा, उपेक्षा, अपेक्षाभंग इत्यादी गोष्टींना झेलत ती आणि तिचा आवाज ठामपणे उभा राहिला. त्यातून तिचा कष्टाला आणि आवाजाला असलेली एक आध्यात्मिक बैठक.

ती इथे आली त्यावेळी जोहराबाई अंबालावाली,



अमीरबाई कर्नाटकी, शमशाद बेगम, सुरैय्या, नूरजहाँ, राजकुमारी, झीनत बेगम, हमीदा बानो... इत्यादींसारख्या मातब्बर गायिका आपली प्रतिभा फुलवत होत्या. त्यांच्याशिवाय ज्यांचं पान हलत नव्हतं असे गुलाम हैदर, खेमचंद प्रकाश, ज्ञानदत्त, बुलो सी.रानी, श्यामसुंदर, अनिल विश्वास, के.दत्ता, सज्जाद, पं. गोविंदराम, हंसराज बहल, सी. रामचंद्र इत्यादींसारखे महान संगीतकार होते. त्यांच्यापुढे किरकोळ व्यक्तिमत्त्वाची, दोन शेपटेवाली एक 'मराठी' मुलगी कुणीच नव्हती. पुन्हा जाडच्या, खर्जातल्या आवाजाची सवय या चित्रपटसृष्टीला जडलेली होती. तिचा पातळ-गोड आवाज पटकन स्वीकारण्याची निर्मात्यांची इच्छा नव्हती. त्यातून त्यावेळच्या गीतांवर उर्दू भाषेचा पगडा असल्यानं ह्या मराठी मुलीला त्यातील शब्दांचं उच्चारण (accent) कसं जमेल, ह्याही शंकेनं बहुतेकांना घेरलं होतं. दिलीपकुमारसारख्यानं तर 'ये मराठी छोकरी क्या गाना गाएगी' म्हणून हेटाळणीही केली होती. एस. मुखर्जीसारख्या निर्मात्यांनी 'शहीद'च्या (१९४८) वेळी तर गुलाम हैदरनं तिच्यासाठी बांधलेलं गाणं, 'बदनाम ना हो जाए मुहब्बत का फँसाना' हे गाण्यासाठी तिनं चक्क नकार दिला होता. अशा परिस्थितीत लतानं सगळे अपमान, टोमणे, निंदा गिळून एका प्रचंड आत्मविश्वासानं आणि शिकण्याची वृत्ती जपत कसं तोंड दिलं असेल, याची आपण कल्पनाही करू शकत नाही! तिच्याकडे ह्या चमचमणाऱ्या चित्रपटसृष्टीत उठून दिसावं असं बाकी काहीच नव्हतं. होता तो तिचा अस्सल, बावनकशी सोन्यासारखा आवाज आणि दुर्दम्य इच्छाशक्ती. ४८-४९ साल उजाडेपर्यंत एकाएकी सगळ्याच लहानमोठ्या संगीतकारांना



नौशादसह



मदनमोहनसह

तिच्या 'आवाजा'चा साक्षात्कार कसा झाला?

फोनवरच्या त्या व्यक्तीचं म्हणणं अगदी खरं आहे, की गुलाम हैदर, अनिल विश्वास, नौशाद, हुस्नलाल-भगतराम, सी.रामचंद्र यांच्यासारख्या महान संगीतकारांनी तिला अनेक गोष्टी शिकवल्या. पण सगळ्या संगीतकारांना हेही माहीत होतं, की गाण्याला आपल्याला हवा तसा परिणाम- आपण कल्पिल्यापेक्षा अधिक - लताइतका चांगला कुणी देऊ शकत नाही. एक गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे, की चित्रपट हा एक व्यवसाय आहे; दुसरी गोष्ट, ही एक 'सामूहिक' कला आहे. त्यातून संगीत हा विषय असा आहे, की इथे संगीतकार गायक आणि कलाकाराचा पडद्यावरला अभिनय यांची सायुज्यता, अद्वैत निर्माण झाल्याखेरीज त्या गाण्याला अमरत्व प्राप्त होत नाही. यात लहान-मोठं कोण, उच्च-नीच कोण, तो नसता तर ही एवढी मोठी झाली असती का किंवा ती नसती तर यांना कुणी विचारलं असतं का; अशा बाष्कळ गोष्टींना अजिबात थारा नाही. दोघंही आपापल्या जागी श्रेष्ठ आहेत. ज्यावेळी दोघांचाही अहंकार गळून पडतो आणि ती दोघं त्या संगीताशी एकरूप होऊन जातात त्यावेळी एका अप्रतिम गाण्याचा, कलाकृतीचा जन्म होतो. ह्या दृष्टिकोनातून आपण विचार केला तर दोघांचंही (संगीतकार आणि लता) महानत्व अधोरेखित होतं. यात गीतकारांचंही अद्वैत, मी गृहीत धरलेलं आहे.

ह्या प्राथमिक गोष्टींचा ऊहापोह केल्यानंतर आता त्या फोनवाल्या व्यक्तीच्या पहिल्या आक्षेपाकडे आपण वळू शकतो. लता त्या संगीतकारांबद्दल कधी एका ओळीनंही चांगलं कधी बोलली आहे का? ह्या अज्ञानमूलक प्रश्नाचं अगदी ठाम उत्तर आहे, 'हो'. एकदाच नाही, अनेक वेळा. जुन्या महान संगीतकारांबद्दल नाही तर अगदी अलीकडच्या नवोदित संगीतकारांबद्दलही ती निर्मळपणे, चांगलं बोललेली आहे. वानगीदाखल बघू या, ती कुणाबद्दल काय काय म्हणाली आहे-

''जब मैंने गुलाम हैदर के लिए पहली बार गाया, तो मैं ना तजुर्बेकार तो थी ही, महान संगीतकार के सामने अपने को बौना ही महसूस करती थी. नतीजा यह हुआ कि मेरा गायन बेमेल रहा. फिर भी हैदरसाहब ने मेरी हौसला-अफजाई की. गुलाम हैदर धून तैयार करते में ज्यादा देर नहीं लगाते थे. किसी गायक की आवाज सुन लेनेपर वे उस आवाज के अनुरूप ही धून तैयार करते थे. एक बार मैं, हैदर साहब और उनके कुछ साथी बॉम्बे टाकिज से आकर मालाड स्टेशनपर खडे, लोकल का इंतजार कर रहे थे. स्टेशनपर खडे खडे ही सिगरेट का टिन बजाते-बजाते हैदर साहबने एक धून बना दी. बाद में मेरा वह गीत 'दिल मेरा तोडा, मुझे कहीं का न छोडा तेरे प्यार ने...' जबरदस्त हिट साबित हुआ. मुझे वह गीत वहीं पर गाना पडा था. वह दिन मैं कभी नहीं भूल पाऊँगी... हैदरसाहब की शैली और मौलिकता अद्वितीय थी. पंजाबी लोकसंगीत और ढोलक इस्तेमाल सबसे पहले उन्होंने ही किया। उनकी धुनें सुनने में सरल होती थी, लेकिन गाने में उतनीही कठिन!

'आएगा आनेवाला' हे गाणं तयार करणाऱ्या ग्रेट खेमचंद प्रकाश यांच्याबद्दल लता काय म्हणते, ते बघा-

'खेमचंदजी से मेरा रिश्ता दोस्ती का ज्यादा था, गायक-



अनिल विश्वाससह

संगीतकार कम. वे इन्सान के रूप में फरिश्ता थे. शास्त्रीय और राजस्थानी लोकसंगीत के वे आदिपुरुष थे. मारवाड उनके खून में था. वे खुद भी बडे अच्छे गायक थे. ठुमरी और गजलपर उनका पुरा अधिकार था... खेमचंदजी पैसे के नहीं, कला के पुजारी थे. जब कोई व्यक्ती संगीत की इज्जत नहीं करती था, तो उन्हें बडा दुख होता था... वे अच्छे संगीत की, चाहे वह किसी का भी हो, मुक्त कंठसे सराहना करते थे.'

'साजन की गलियाँ छोड चले' किंवा 'बहारे फिर भी आएगी मगर हमतुम जुदा होंगे' ही मास्टरपीस गाणी देणाऱ्या श्यामसुंदरबद्दल काय म्हणते ती–

'अगर किसी संगीतकार का कोई शिष्य न हो तो उस घराने की परंपरा उसी के साथ समाप्त हो जाती है। संगीत–निर्देशक श्यामसुंदर के साथ ऐसाही हुआ। उनकी संगीतशैली उन्हीं के साथ समाप्त हो गयी। उनके संगीत में माधुर्य था, जान थी.'

'तुम्हारे बुलाने को जी चाहता है...' आणि 'वो दिन कहां गए बता'सारखी अतुलनीय गाणी देणाऱ्या अनिल विश्वास यांच्याबद्दल लता–

'अनिल विश्वासजी के संगीत का आधार है शास्त्रीय और लोकसंगीत, जिसकी उन्हें गहरी जानकारी है.... अनिलजी अपनी धुनें सिच्युएशन के अनुरूप बनाते थे. वे गायक की आवाज को अन्य संगीतकारों की तरह महत्त्व नहीं देते. इसके बावजूद गीत वैसा ही रहता है, जैसा वे चाहते है कि वह हो. शब्दों का सही और स्पष्ट उच्चारण मैंने उन्हींसे सीखा. आवाज की संश्लिष्टता का आभास भी मुझे उन्हीं के निर्देशन में हुआ. एक चीज मैंने उनसे और सीखी– ताल और लय को तोडे बगैर बीच में सांस कैसे ली जा सकती है। उन्होंने एक बार मुझसे कहा था, ''तुम चाहे जिस किसी स्वर में गाओ, लेकिन तुम्हारी आवाज लता मंगेशकर की आवाज रहनी चाहिए।'' कितनी बार याद रख पायी हूँ उनकी इस सीख को मैं!'

आणि नौशादांबद्दल ती असं म्हणाली–

'नौशादजी अपनी धुनों के हर पहलू का पूरा–पूरा ध्यान रखते हैं। वे गीत के बोलों के बारेमें भी बडी सचेतता बरसते हैं। अगर वे गीत की किसी एक शब्दपर भी अटक जाते हैं तो गीतकार को पूरी पंक्ती बदलने को कह देते हैं. इस वजह एक गीत की धून बनाने में उन्हें लगभग दो हफ्ते लगते हैं... वे गीत के संगीत को तबतक बदलते रहते हैं, जबतक वे इस बात को लेकर संतुष्ट नहीं हो जाते कि गीत–संगीत सिच्युएशन के अनुरूप बन गए हैं... कुछ–न–कुछ नया करते रहना नौशादजी की खासियत है. 'शारदा'में उनकी शैली अलग थी, 'रतन'में अलग, फिर 'अनोखी अदा' में उससे भी अलग। 'बैजू बावरा' का संगीत इतना नया था कि एक बार तो मैं भी चौंक गयी थी... संगीत उनका जीवन है – और उनकी शैली नितांत उनकी अपनी है।'

सी.रामचंद्र यांना 'विविधता की आत्मा' म्हणून तिनं संबोधलं आहे आणि पुढे ती म्हणते–

'चितलकर रामचंद्र एक तरह से नौशादजी का दुसरा पहलू थे. उनके साथ एक रिहर्सल ही काफी होती थी. वे खुद भी बहुत अच्छे गायक थे। उनकी धुनों की दो विशेषताएं होती थी – एक, उसे सुमधुर होना चाहिए। दो, उसकी लय और ताल ऐसी होनी चाहिए कि श्रोता अपने आपको भूल जाये। स्वर–शिल्प के लिहाज से उनका संगीत बडा सरल और सादा है। गुजराती और मराठी लोकसंगीत को भी उन्होंने अपनी धुनों का आधार बनाया और पाश्चात्त्य संगीत को भी अपनाया। फिर भी उनकी पृष्ठभूमी शास्त्रीय ही थी।'



सी.रामचंद्र यांच्यासह

'यौवन, आल्हाद और वसंत, शंकर–जयकिशन के पूरे संगीत को इन तीन शब्दोंमें समेटा जा सकता है, ये तीनों चीजें वे अपनी धुनों में – खासकर राजकपूर की फिल्मों में– लेकर आये. उनका संगीत वक्त के साथ–साथ परवान चढा. दोनों बहुत मेहनती थे.... नये गायकों से बेहतर किस्म

के गीत गवाँ लेने में उन्हे महारत हासिल थी.'

मदनमोहन आणि तिचं नातं तर भावा-बहिणीसारखंच होतं. खूप चांगलं संगीत, गाणी देऊनसुद्धा कुणीच आपली दखल घेत नाही याचं त्याला खूप वाईट वाटायचं. 'वह कौन थी'ला फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळेल असं त्याला खूप वाटलं होतं, पण ते नाही मिळालं. त्यावेळी त्याला प्रचंड नैराश्य आलं होतं. लतानं त्याची बहिणीच्या प्रेमानं समजूत काढली. लता म्हणाली होती, 'मलाही खूप वाईट वाटलं.' मी त्याला म्हणाले, 'खरं तर त्या वर्षीच्या सर्वच प्रवेशिकांपेक्षा 'वह कौन थी'चं संगीत निश्चितच उजवं होतं. तुला ते ॲवॉर्ड मिळायला पाहिजे होतं! यावर भारावून जात मदनमोहन लताला म्हणाला होता, 'तू मेरे लिये यह सोचती है, यही मेरा ॲवॉर्ड है.'

'माझे मदनभय्याशी संबंध शेवटपर्यंत चांगले होते. संगीतकार चित्रगुप्त हे आमच्या कुटुंबाचे आणखी एक जवळचे मित्र होते. मला त्यांच्या चाली गायला खूप आवडायच्या.'

'गीतकार मजहरसाब हे असेच आमचे जवळचे स्नेही होते. ते त्यांची सुख-दुःखं, समस्या आमच्याजवळ मनमोकळेपणाने सांगायचे.'

आजचा प्रसिद्ध संगीतकार ए.आर. रहेमानबद्दल तिनं म्हटलं आहे, 'ए.आर. रहेमान खूपच प्रतिभावंत आहे. रहेमानची प्रयोगशीलता मला खूपच प्रभावित करते. त्याच्या वेगळ्या धर्तीच्या संगीतावर मी खूश आहे.' संगीतकार जतीन-ललित हेही मला प्रभावित करतात.'

'मदनमोहन नेहमीच गायकाला स्वातंत्र्य द्यायचा, त्याचं गाणं अधिक चांगलं होण्याच्या दृष्टीनं. शंकर-जयकिशनसुद्धा मला असलं स्वातंत्र्य द्यायचे. विशेषत: राजकपूरच्या चित्रपटांसाठी गाताना.'

'मला नवीन संगीतकारांकडेही गायला आवडतं. गाण्याचं आव्हान स्वीकारणं मला आवडतं. मी कुठल्याही नवीन संगीतकाराशी आढ्यतेनं वागले नाही किंवा कधी मी त्यांच्या चालीला नावं ठेवली नाहीत. मी माझ्या पद्धतीनं गात राहिले.''

'मी कुठल्याही संगीतकारापुढे एखाद्या शिष्यानं गुरुपुढे बसावं किंवा विद्यार्थ्यानं शिक्षकासमोर बसावं तशी बसते. पूर्वी मी गाणं गाताना किंवा रिहर्सलच्या वेळी मदनमोहन, शंकर-जयकिशन आणि लक्ष्मीकांत-प्यारेलाल, कधी कधी एस.डी. बर्मन यांनाही काही योग्य सूचना करत असे. काही संगीतकार मला प्रोत्साहनही देत असत; मग मी कुठे 'आलाप' किंवा 'तान' घ्यायची हे सांगत असे.'

'पूर्वी सज्जाद हुसेनच्या चाली अवघड असत, पण त्यांच्याबद्दल खूप काही वाईट पसरवलं गेलं. तो अहंकारी आहे, संतापी आहे, भडक डोक्याचा आहे वगैरे. पण मला त्यांचं संगीत अतिशय आवडायचं. कारण नौशादसाहेबांप्रमाणेच आणि मदनभैय्याप्रमाणे त्यालाही काव्यात्मक व साहित्यमूल्यं असलेली गीतं आवडायची. ह्या संगीतकारांना चांगलं उर्दू येत होतं व त्यांना ते आवडायचं.'

'पूर्वीच्या बहुतेक संगीतकारांना शास्त्रीय संगीताचं चांगलं ज्ञान होतं. बर्मनदांना लोकसंगीताचं प्रचंड ज्ञान होतं, ते स्वत: चांगली गाणी म्हणत. पंचम तर ऱ्हिदमचा मास्टर आहे, प्यारेलाल आपल्या वडिलांकडून चांगलं व्हायोलिन वाजवायला शिकलेला होता. लक्ष्मीकांतलाही शास्त्रीय संगीताचं थोडंफार ज्ञान होतं. मदनभैय्या लखनौला असताना शास्त्रीय संगीत शिकला होता. सज्जाद यांनी शास्त्रीय चालीच बांधल्या आणि ते मेन्डोलिन अप्रतिम वाजवायचे.'

लताच्या बाबतीत महान शास्त्रीय गायक बडे गुलाम अली खाँसाहेब म्हणाले होते, की 'कम्बख्त कभी बेसुरा गाती ही नहीं!' त्यावर लतानं म्हटलं होतं, 'हा त्यांचा मोठेपणा झाला. ते महान गायक होते. मी त्यांच्या गाण्यावर प्रेम करते. गाणं गाताना जर मला समाधान मिळालं नाही तर रात्री मला झोप येत नाही.'

राजकपूरबद्दल लता काय म्हणाली आहे हे बघण्यासारखं आहे. 'त्याची काम करण्याची पद्धत विलक्षण होती. कधी कधी तो सेटवर आल्यावर सगळं गाणंच रद्द करायचा. कारण तो स्वत:च एक संगीतकार होता आणि त्याला नेमकं काय हवंय हे माहीत असायचं. त्याला जर 'हिट' गाणं हवं असेल तर तो सांगायचा 'पोपटिया' नंबर मला हवाय. मला व्यक्तिश: वाटतं, की शंकर-जयकिशन यांनी आर.के.बाहेर जास्त चांगलं संगीत दिलंय. आर.के.मध्ये त्यांना एका मर्यादेत काम करावं लागायचं.'

'मी पृथ्वीराज कपूर यांची मोठी 'फॅन' होते. त्यांचं 'सिकंदर'मधलं काम मला खूप आवडलं होतं!

'उदित नारायण हा आपला वेगळा ठसा उमटवणारा गायक आहे.'

'हम दिल दे चुके सनम'मधलं टायटल साँग कविता कृष्णमूर्तीनं फार छान म्हटलं आहे' - 'पण हे गाणं तर तुमच्यासाठी बनवलं होतं असं ऐकलं होतं?' यावर ती म्हणाली, 'अच्छा?' पण कवितानं ते गाणं अप्रतिम म्हटलं आहे!'

'मी के.एल. सैगलची भक्त आहे. त्याचा अभिनयही मला आवडतो. तो अतिशय स्वाभाविक अभिनय करायचा.'

'त्याकाळी एकेक संगीतकार महान होते. प्रत्येकाची शैली वेगळी होती. प्रत्येकानं जास्तीत जास्त चांगलं संगीत देण्याचा प्रयत्न केला आहे. खरं तर त्याकाळी चांगले पैसेही मिळत नसत.

काम हेच त्यांना बक्षीस वाटायचं. त्याकाळी मागून वार करण्याची पद्धत नव्हती किंवा पाठीमागे निंदा होत नसे.'

अशी असंख्य उदाहरणं आहेत, की लता सर्वांबद्दलच - जुन्या-नव्यांबद्दल - चांगलं बोललेली आहे. आपण एक लक्षात घेतलं पाहिजे, की शेवटी प्रत्येक कलाकार हा माणूसच असतो. त्यालाही 'अहंकार' असतो. त्यालाही ताणतणाव असतात. समस्या असतात. कौटुंबिक सुखदु:खं असतात आणि त्यात तो थोडंफार वावगं वागला तरी आपण त्याला समजून घेतलं पाहिजे. पुन्हा ज्याचं नाणं 'खणखणीत' आहे तोच या व्यवसायात इतकी वर्षं टिकू शकतो. 'लता' सहजासहजी निर्माण होत नाही. ती दुसऱ्यांचं कौतुक करायला नेहमीच पुढे असते. ती माणूस म्हणूनही श्रेष्ठ आहे. त्याकाळी नवीनच आलेल्या कितीतरी संगीतकारांचं 'करिअर' उभं राहावं म्हणून लता अगदी कमी पैशांत त्यांच्याकडे गायली आहे. 'विदेश दौऱ्यावर असताना दिदी आपल्या सहकलाकारांचं खूप कौतुक करतात. हेमंतकुमार, किशोरकुमार, मुकेश इत्यादी दिग्गजांशी त्या स्वत: सगळ्यांची ओळख करून देतात' असं गुणी संगीतकार अनिल मोहिले यांनी म्हटलं आहे. त्यांचा एक अनुभव तर फार सुंदर आहे. 'स्कॉटलंडच्या एका कार्यक्रमात पाचवं गाणं झाल्यावर त्यांनी सगळ्या थिएटरला 'हॅपी बर्थ-डे टु यू' म्हणायला सांगितलं. तो ८ जुलै १९७९ हा दिवस होता आणि त्या दिवशी माझा वाढदिवस होता. मी तर थक्क झालो. सहकलाकारांचं कौतुक करण्याचा एकही क्षण दिदी सोडत नाहीत.' आणखी एक प्रसंग अनिलजींनी सांगितला तो पण दिदींचं मोठेपण अधोरेखित करतो. 'इन्हीं लागोंने ले लिन्हा दुपट्टा मेरा' या गाण्यातील तबलावादन जेव्हा रमाकांत म्हापसेकर तब्येतीनं करायचा तेव्हा गाणं क्षणभर थांबवून दिदी त्याचं भरभरून जाहीर कौतुक करायच्या!' मोठे नाट्यनिर्माते, कलाकार व 'चंद्रलेखाचे' सर्वेसर्वा कै. मोहन वाघ यांच्या 'रामशास्त्री' नाटकाच्या मुहूर्ताला, लतादिदींना आणायला ते दिदींच्या घरी गेले तर दीदी चिंतेत दिसल्या. त्यांची गाडी बिघडली होती. मोहन वाघ यांनी मुहूर्त पुढे ढकलण्याची तयारी दाखवली त्यावेळी दीदी म्हणाल्या, 'नाही, आपण टॅक्सीनं जाऊ.' मोहनजींना आश्चर्य वाटलं. त्यावर दिदी म्हणाल्या, 'केवळ मर्सिडीज गाडीत बसल्यानं माणसं मोठी होतात असं नाही.'

मदनमोहनचं निधन झालं. त्यानंतर त्यांच्या पत्नीचंही काही काळात निधन झालं. त्यावेळी त्यांच्या मुलांना लतानं आधार दिला. मदनमोहनचा मुलगा संजीव कोहली याच्या लग्नाच्या पत्रिका स्वत:च्या नावानं छापून त्या निमंत्रणपत्रिका वाटल्या.

असे अनेक प्रसंग.. घटना.. हकिगती आहेत, की त्या लताचं मोठेपण सिद्ध करतात.

गीतकार-संगीतकार-गायक कलाकार यांचं मनोमीलन होणं, त्यांच्या तारा जुळणं खूप महत्त्वाचं असतं. म्हणूनच तर इथे नौशाद-शकील, शंकर-जयकिशन-शैलेंद्र, हसरत जयपुरी, राज कपूर-मुकेश, देवानंद-किशोरकुमार; एम.डी. बर्मन, इ. जोड्या जमल्या. महंमद रफी आणि लताच्या सगळ्यांबरोबरच जोड्या जमल्या. त्यांनी कलावंतांना केवळ आपला आवाजच दिला नाही, तर त्यांना त्याची ओळख दिली. त्यांच्या प्रगतीला हातभार लावला. त्यांना प्रसिद्धी मिळवून दिली. लताच्या आवाजाबद्दल खूप काही लिहिलं गेलं आहे. सुरुवातीच्या संगीतकारांनी तिला 'घडवलं' हे तिनं कधीच नाकारलं नाही. त्यांचं ऋण ती कधीच विसरली नाही. तरीही तिच्या आवाजातील दिव्यत्वानं सगळ्यांनाच उजळवून टाकलं, हेही नाकारता येत नाही. तिच्या आवाजासाठी थांबणारे, तळमळणारे, हट्ट धरणारे अनेक निर्माता-संगीत दिग्दर्शक होते. कारण त्या आवाजाची जादूच तशी आहे. ती केवळ एकाधिकारशाही गाजवून निर्माण होऊ शकत नाही. बप्पी लाहिरी तर तिला 'संगीताला वरदान' मानायचा आणि 'लता म्हणजे हिरा आहे हिरा... तो कुठेही चमकतच असतो.. कुठल्याही पद्धतीच्या गाण्यात' म्हणायचा. सगळ्याच नव्या गायिकांनी तिची 'महत्ता' मान्य केलेली आहे. ओ.पी. नय्यर एकदा म्हणाला होता, की 'लता-आशावर घेतले जाणारे आरोप-की त्या कुणालाच पुढे येऊ देत नाहीत, खरोखरच हास्यास्पद आहेत. तुम्ही एखाद्याची प्रतिभा, हुशारी किती काळ दाबू शकाल? खरं तर, आपली प्रतिभेची ताकद दाखवण्याची, खात्रीनं सिद्ध करून दाखवण्याची जबाबदारी अशांवर येते!

मी काही लताचा कुणी अंध भक्त वगैरे नाही. लता माझं श्रद्धास्थान असलं तरी मला गीता दत्तही आवडते आणि झीनत बेगम, हमीदा बानो, पारुल घोषही आवडतात. सुरैया आणि नूरजहाँही आवडतात... खरं तर मला चांगलं, अप्रतिम गाणं आवडतं... क्लासिक संगीत आवडतं. तुलना केलेली आवडत नाही आणि एका टोकाला जाऊन अज्ञानमूलक भांडणातही मला अजिबात रस नसतो. प्रत्येकजण आपल्या जागी श्रेष्ठ आहे... कारण त्यांनी आमचं जीवन आनंदमय करून टाकलं आहे... आमच्या जीवनात इंद्रधनुष्याचे रंग भरले आहेत आणि एवढं असूनही पटकन तोंडातून शब्द निघून जातात- 'लता आखिर लता है।'

**- दिवाकर गंधे**

'अनाहत', गंगानगर, पिन-४१०१०१

भ्रमणध्वनी -९८२२४४२१५०

diwakargandhe@gmail.com


। पर्व प्रकाशाचे । रंग प्रतिभेचे ।
। पंख प्रगतीचे । अमुच्या स्वप्नांना... ।
सुस्थिर आणि कार्यक्षम शासन
स्वच्छ आणि गतिमान प्रशासन
पृथ्वीराज चव्हाण
मुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन





चार दिवसांची सतत रोषणाई, फटाक्यांचा प्रखर प्रकाश आणि त्यांचा धूर यांनी डोळ्यांचे स्वास्थ्य बिघडू नये, यासाठी **जाई काजळ** वापरा. त्यामुळे डोळे थंड व निरोगी राहून दृष्टी स्वच्छ होते आणि डोळ्यांचा थकवा देखील जातो.

**जाई काजळ**

आयुर्वेदिक अंजन

लहान थोरांस सारखेच उपयुक्त.


**वेस्टर्न इंडिया केमिकल कंपनी. बोरीवली (पूर्व), मुंबई – 400066, फॅक्टरी – फोन (0250) 2452 858**




ग्रंथाली

## बाईच्या कविता

**किरण येले**




प्रत्येक बाई वेगळी
छातीत न पाठीत
ब्लाऊज शिवताना आई म्हणायची
सगळ्या बाया नाही शिवता येत
एकाच मापात

त्यात शिवाय जरा उसली
तरी शील उसण्याचे भय
नवऱ्याकडून
वा
बघणाऱ्याकडून.

**मूळ किंमत ८० रु.**
**सवलतीत ५० रु.**



ठाणे महानगरपालिका
वाटचाल उज्वल विकासाची, प्रगतीची!
● 'सॅटीस' प्रकल्पास राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त ● जनसंपर्क मोहिमेअंतर्गत राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार ●
● उर्जा संवर्धनासाठी सन २००४ सालचा राज्यस्तरीय प्रथम व २००५ सालचा राष्ट्रीय पुरस्कार ●
● सन २००६ सालचे उर्जा संवर्धनाचे दोन प्रथम पुरस्कार ● तलाव संवर्धन व सुशोभिकरणासाठी राष्ट्रीय पातळीवरचा क्रिसिल पुरस्कार ●
● संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानांर्तगत महाराष्ट्र शासनाचा घनकचरा व्यवस्थापनासाठीचा उत्कृष्ठ पुरस्कार ●
■ अपारंपारिक उर्जा स्त्रोताच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी विकास नियमावलीत बदल.. ■
■ ओल्या कचऱ्यापासून मिथेन गॅस निर्मिती प्रकल्प ■ १०० द.ल. लिटर पाणी पुरवठा योजना पूर्णत्वास ■
■ कोपरी येथे रेल्वे उड्डाण पूल व विटावा येथे रेल्वेखाली पुलाची बांधणी ■ घंटागाडीद्वारे घरोघरी जाऊन कचऱ्याचे संकलन ■
■ प्रभाग समितीनिहाय अंदाजपत्रकांची निर्मिती ■ रस्त्यांचे काँक्रिटीकरण ■ अद्ययावत तरण तलावांची बांधणी ■
■ राष्ट्रीय झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम ■ झोपडपट्टी मागासवर्गीय सुधारणा कार्यक्रम ■ द्विनोंद लेखा पध्दतीचा वापर ■
■ भुयारी गटार योजना ■ नाले बांधणी ■ विविध खेळांच्या प्रशिक्षण योजना ■ महापौर चषक क्रीडा स्पर्धा ■
ठाणे महानगरपालिका
अशोक बारकु वैती
महापौर
मनोज लासे
उप महापौर
गणेश साळवी
सभापती, स्थायी समिती
पांडुरंग पाटील
सभागृह नेता
नजीब मुल्ला
विरोधी पक्ष नेता
संतोष वडवले
क्रीडा व सांस्कृ.कार्य.समिती सभा.
आर.ए.राजीव (भा.प्र.से.)
महापालिका आयुक्त


भारतीय स्टेट बँक
तुमच्या सोबत - प्रत्येक क्षणी
निव्वळ बँकिंग. बाकी काहीच नाही.
दिपावलीचा आनंद द्विगुणित करा
स्टेट बँकेच्या शुद्ध सोन्याच्या नाण्यांसह
स्टेट बँक, भारतातील सर्वात विश्वसनीय बँक,
सादर करीत आहे शुद्ध सोने - 999.9 शुद्धता.
• ॲसे द्वारा प्रमाणित आणि टॅम्पर-प्रूफ पॅकेजिंग.
• सोन्याचा दररोज जो काही भाव असेल, त्या आधारे किंमत.
• गुंतवणूक, वैयक्तिक व कॉर्पोरेट गिफ्टिंगसाठी आदर्श.
• सोन्याची नाणी 2 ग्रॅम, 4 ग्रॅम, 5 ग्रॅम, 8 ग्रॅम व 10 ग्रॅम मध्ये उपलब्ध.
(निवडक शाखांमध्ये 20 ग्रॅम व 50 ग्रॅम सुद्धा)
शुद्धतेची पुरेपूर खात्री
संपूर्ण भारतात निवडक शाखांमध्ये उपलब्ध. अधिक माहितीसाठी : जवळच्या एसबीआय शाखेला भेट द्या / 24x7 हेल्पलाईन 1800 11 22 11 (बीएसएनएल / एमटीएनएल लॅण्डलाइन वरुन टोल फ्री) किंवा 080-2659 9990 (इतर लाइन्स) वर संपर्क करा / इ-मेल : contactcentre@sbi.co.in
प्रत्येक भारतीयाची बँक

*With best compliments from*

*We conduct the following job oriented courses*

**All India Institute of Local Self Government**
Telephone : 2657 17 13 /14/ 15 Fax : 2657 2115
Website: www.aiilsg.org

- Sanitary Inspector's Diploma Course❖Post Graduate Diploma in Hospital and Health Care Management
- Local Government Financial Management (DLGFM)
- Sub – Fire Officers Course (conducted at Vadodara Centre)
- Firemen's Course (conducted at Vadodara Centre)
- Estate Management (conducted at Pune Centre)
- Journalism And Public Relations
- Local Self Government Diploma (LSGD)
- Local Self Government Services (LGS)
- Diploma in Food Technology
- Diploma in Public Health Services
- MPHW Bridge Course
- Medical Laboratory Techniques
- Post Graduate Diploma in Management (PGDM) Approved by (AICTE) (Conducted at Chanakya Institute of
- Management Studies & Research Andheri (W) Mumbai 58. Website : www.cimser.org
- Master in Management studies (MMS) Approved by (AICTE), Conducted at Chanakya Institute of
- Management Studies & Research Andheri (W) Mumbai 58. Website : : www.cimser.org

SNEHA
ADVERTISING
& PUBLICITY

Mob. : 98675 57241
98690 48684

We Accept All Types of
News Papers & TV Advertisements

**Sneha Manohar Kumbhejkar**
E-2/304, Inlaks Park, Yari Road, Versova,
Andheri (W), Mumbai - 400 061.
Email : sneha.kumbhejkar02@gmail.com
manoharkumbhejkar01@gmail.com

# शिकागो अधिवेशनात प्रसिद्ध झालेली पुस्तके




## संवादने

**विद्या हर्डीकर–सप्रे**

मूल्य १५० रु.
सवलतीत ९० रु.

## मनातल्या वावटळी

**प्रगती कोळगे**




मूल्य १५० रु.
सवलतीत ९० रु.





## तेजस्विनी

**स्मिता भागवत**


मूल्य १५० रु.
सवलतीत ९० रु.

## परक्या भूमीवर घर

**स्मिता भागवत**




मूल्य १५० रु.
सवलतीत ९० रु.




मूल्य ३०० रु.
सवलतीत १८० रु.

## ‘ही आपलीच माणसं’

या पुस्तकाचा
**इंग्रजी अनुवाद**

# माथाडींचा डॉक्टर-मित्र

**दिलीप जोशी**

मोफत रुग्णसेवेचा लाभ गरीब रुग्णांना मिळावा यावर डॉक्टर नाईक यांचा कटाक्ष असे. त्यातून अनेक माथाडी कामगारांना अत्यंत अल्प खर्चात उपचार मिळू लागले. ही गोष्ट माथाडी कामगारांचे नेते आणि माथाडी चळवळीचे शिल्पकार अण्णासाहेब पाटील यांच्या कानांवर गेली आणि एक दिवस ते बॉम्बे हॉस्पिटलमध्ये आले. त्यानंतरच्या प्रत्येक भेटीत ते माथाडी रुग्णसेवेचं त्यांचं भव्य स्वप्न मांडायचे. शेवटी बॉम्बे हॉस्पिटलची नोकरी सोडून डॉ. श्रीधर नाईक माथाडी रुग्णसेवेत पूर्ण वेळ रुजू झाले.

**डॉ**क्टरांच्या केबिनचा दरवाजा उघडून एक वयस्क गृहस्थ सावकाश आत आले. लेंगा, सदरा, टोपी आणि भाळी अबीर-टिळा. सुरकुतल्या चेहऱ्यावर मात्र प्रसन्नता आणि नजरेत डॉक्टरांबद्दलचा अतीव विश्वास.

''आता खूप बरं वाटतंय. पण एवढं उजव्या हाताच्या अंगठ्याचं काय ते बघा. सरळ होतच नाही.''

''किती दिवस आहात मुंबईत?''

''तुम्ही म्हणत असाल तर ऱ्हातो आणि चार दिस.''

''मग असं करा. उद्याला या. हाताला 'डायनॅमिक स्प्लिन्ट' बसवावं लागेल. त्यामुळे बोटांची हालचाल व्हायला मदत होईल.'

''येतो की; उद्याच्यालाच...'' म्हणत दोन्ही कर जोडोन ते गृहस्थ उठले. पक्षाघाताच्या झटक्यातून जवळजवळ पूर्ण बरं होत असताना, हाताच्या हालचालीचीच थोडी समस्या होती... आणि तीही डॉक्टरांच्या सल्ल्याने दूर होणार याची खात्री होती.

आयुष्यभर ओझं वाहून निवृत्त झालेला हा माथाडी कामगार, त्याचा मुलगाही याच प्रकारचं काम करत असल्यानं, माथाडी रुग्णसेवेचा लाभार्थी होता. त्याला औषधोपचार तर मिळणारच होते, शिवाय त्याच्या चेहऱ्यावरचे भाव सांगत होते, की 'डॉक्टर, तुमच्यामुळेच मी बरा झालोय.' अशा अनेक रुग्णांना धीर, दिलासा देऊन अक्षरश: नवजीवन देण्याचं व्रत माथाडी रुग्णसेवेचे प्रमुख वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर श्रीधर देवीदास नाईक गेली पस्तीस वर्षं अव्याहतपणे पार पाडत आहेत. एका बहकलेल्या रुग्णाला तर डॉक्टरांनी काउन्सेलिंग करून सन्मार्गावर आणलं आणि हाणामाऱ्या करणारा तो माणूस नंतर माळकरी बनला. रुग्णांच्या उपचारापलीकडे जाणारी डॉक्टरांच्या व्यक्तिमत्त्वाची ही किमया. त्यामुळे आतापर्यंत शेकडो रुग्ण नुसते 'बरे' झाले असं नाही. कित्येकांच्या जीवनातील 'काळेबेरे'ही निपटून निघाले. ही माणसं डॉक्टरांकडे आजही कृतज्ञतेनं येतात आणि त्यांच्या चेहऱ्यावरचं समाधान पाहून डॉक्टरांना भरून पावल्यासारखं वाटतं.

या सगळ्या गोष्टी डॉक्टर फार संकोचानं सांगतात. आपण



डॉ. श्रीधर नाईक

काही विशेष केलंय असा त्यांचा भाव नसतो. एका रुग्णसेवेच्या आरंभी नवख्या डॉक्टरांसमोर बोलताना महात्मा गांधी जे बोलले होते, त्याची अशा वेळी आठवण होते. गांधीजी त्या डॉक्टरांना उद्देशून म्हणाले होते, 'उद्यापासून तुम्ही रुग्णसेवेत रुजू व्हाल. त्यावेळी आपण रुग्णांवर उपकार करत आहोत असं समजू नका. उलट, मानवतेची सेवा करण्याची संधी त्यांनी तुम्हाला दिली म्हणून तुम्हीच त्यांचे कृतज्ञ राहा.'

डॉ. नाईक यांनी आपल्या चाळीस वर्षांच्या वैद्यकीय कारकिर्दीत गांधीजींचं हे सांगणं तंतोतंत अंगीकारलं आहे.

पुण्याच्या बी.जे. मेडिकल कॉलेजमधून एम.बी.बी.एस. झालेल्या डॉक्टरांना खरं तर इंजिनीयर व्हायचं होतं. गणित विषय चांगला असल्यानं हे सहजशक्य होतं, परंतु त्याच सुमारास तुळजापूरला, डॉक्टर असलेल्या मोठ्या भावाच्या दवाखान्यात, उन्हाळ्याच्या सुटीत काम करण्याची संधी मिळाली आणि या व्यवसायाचं सामाजिक भान असणारं स्वरूप लक्षात आलं. इंजिनीयरिंगऐवजी 'मेडिकल'ला जाण्याचा तो 'टर्निंग पॉईंट' ठरला.

बी.जे. मेडिकलमध्ये शिकत असताना श्रीधर नाईक पहिल्याच वर्षी स्पोर्ट्स सेक्रेटरी झाले. अनेक खेळांत प्रावीण्य असलेला डॉक्टरांना कबड्डी संघातून राज्यस्तरावर खेळण्याची संधी मिळाली. बी.जे. मेडिकलला, त्यांच्या पुढच्या वर्गात, पुढे नामांकित झालेले डॉ. जब्बार पटेल, डॉक्टर मोहन आगाशे असे विद्यार्थी होते. प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. नीतू मांडके आणि पुढे मांडके यांची पत्नी झालेल्या डॉ. अलका हे तर डॉ. नाईक यांचे सहाध्यायी.


एका चांगल्या वातावरणात एम.बी.बी.एस. केल्यावर एम.डी. करून चाइल्ड स्पेशॅलिस्ट किंवा पिडिॲट्रिशिअन व्हावं असं डॉक्टरांना वाटत होतं. काही दिवस तुळजापूरला भावाच्या दवाखान्यात प्रॅक्टिस केल्यावर, किल्लारी येथे जाऊन ग्रामीण भागात रुग्णसेवा करता येईल का, याचाही अंदाज त्यांनी घेतला होता. प्रचंड मित्रपरिवार आणि माणसं जोडण्याची कला यातून हे त्यांना जमलं असतं, मात्र एम.डी. करायचं तर मुंबई गाठणं गरजेचं होतं.

थोड्या दिवसांनी मुंबईत आलेल्या या नवख्या डॉक्टरला एम.डी.साठी प्रवेश मिळाला नाही, पण बॉम्बे हॉस्पिटलमध्ये चीफ मेडिकल ऑफिसरची नोकरी मात्र मिळाली. तिथे डॉ. जाधव, डॉ. के.के. दाते अशा अनेक दिग्गज डॉक्टरांसमवेत काम करणं हा अनोखा अनुभव होता. सायनला, भावाकडे राहून बॉम्बे हॉस्पिटलमध्ये सकाळी आठ ते चार अशी नोकरी होती. सुटीचा दिवस रिकामाच असायचा. डोंबिवलीतील एका डॉक्टरांच्या परिचयातून तोही प्रश्न सुटला. मुंबईजवळच्या वांगणी गावातल्या आदिवासी पाड्यावर, रविवारची मोफत रुग्णसेवा करण्यात डॉ. नाईक उत्साहाने भाग घेऊ लागले. तिथेच एकदा डॉ. तोरसकर यांची ओळख झाली. डॉ. तोरसकर त्यावेळी बाल्यावस्थेत असलेल्या माथाडी रुग्णसेवेचं काम पाहत होते.

बॉम्बे हॉस्पिटलमध्ये काम करत असतानाच डॉ. ढोलकिया यांच्याशीही डॉ. नाईक यांचा परिचय झाला. त्यांच्या रुग्णालयात रात्रीची 'ड्युटी' करण्याचं काम मिळालं. तिथे बरेच रुग्ण हे आखाती देशातले अरब असायचे. बरं वाटल्यावर काही 'गिफ्ट'ही देऊ करायचे. परंतु डॉक्टरांना त्याचं कधीच आकर्षण वाटलं नाही. खेड्यातले गरीब, निर्धन रुग्ण पाहिलेल्या या तरुण डॉक्टरला ही धनिकांची रुग्णसेवा बरंच काही शिकवून गेली. काही अरब रुग्णांनी दुबईला येण्याचं दिलेलं आमंत्रण नाकारून, इथेच काम करावं हा निर्धार पक्का झाला आणि 'इच्छा तसं फळ' म्हणतात; याचा अनुभव डॉक्टरांना लगेच आला.

बॉम्बे हॉस्पिटलमध्ये 'एस' बेड्स किंवा सुपरिंटेंन्डस् बेड्स हा मोफत रुग्णसेवेचा एक भाग होता. या नव्या डॉक्टरच्या कामावर खूश होऊन, डॉ. जाधव यांनी ती जबाबदारी डॉक्टर नाईक यांच्यावर सोपवली. या विभागातल्या मोफत रुग्णसेवेचा लाभ गरीब रुग्णांना मिळावा यावर डॉक्टर नाईक यांचा कटाक्ष असे. त्यातून अनेक माथाडी कामगारांना अत्यंत अल्प खर्चात उपचार मिळू लागले. एका कामगाराचं किडनी स्टोनचं ऑपरेशन फारच कमी खर्चात झालं. ही गोष्ट माथाडी कामगारांचे नेते आणि माथाडी चळवळीचे शिल्पकार अण्णासाहेब पाटील यांच्या कानांवर गेली आणि एक दिवस ते बॉम्बे हॉस्पिटलमध्ये आले. डॉक्टर सांगतात :

'भव्य व्यक्तिमत्त्वाचे अण्णासाहेब अतिशय विनम्रतेनं बोलत होते. एवढ्या कमी खर्चात आमच्या रुग्णांना उपचार कसे मिळतात? असं विचारत होते. पुढे परिचय वाढत गेला आणि माथाडींच्या दवाखान्यात काम करणार का, असं त्यांनी विचारलं. डॉ. तोरसकरांमुळे माथाडी रुग्णसेवेची माहिती झाली होती, पण तिथे रुजू व्हायचं तर बॉम्बे हॉस्पिटल सोडावं लागणार



**माथाडी चळवळीचे शिल्पकार अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेला अभिवादन करताना डॉ. श्रीधर नाईक**


होतं आणि डॉ. जाधव मला सोडायला तयार नव्हते. दुसरीकडे, अण्णासाहेबांचा आग्रह वाढत होता. शेवटी अण्णासाहेबांचा जय झाला आणि मी, मेहता चेंबर्समधल्या माथाडी रुग्णसेवेसाठी थोडा वेळ काम करू लागलो. त्याच सुमारास डॉ. तोरसकरांना अमेरिकेला जायचं होतं त्यामुळे त्यांनी पूर्ण जबाबदारी माझ्यावर सोपवायचं ठरवलं. माझ्या 'पार्ट टाइम' कामाच्या वेळात अण्णासाहेबांशी अनेकदा भेट व्हायची. प्रत्येक वेळी ते माथाडी रुग्णसेवेचं त्यांचं भव्य स्वप्न मांडायचे. माथाडींसाठी एका मोठ्या रुग्णालयाची उभारणी करण्याचा त्यांचा संकल्प होता. मलाही हे काम सर्जनशील तसंच आव्हानात्मक वाटलं. शेवटी बॉम्बे हॉस्पिटलची नोकरी सोडून मी माथाडी रुग्णसेवेत पूर्ण वेळ रुजू झालो; ते वर्ष होतं १९७८.'

डॉ. नाईक आणि कै. अण्णासाहेब पाटील यांचं रुग्णसेवेबद्दलचं 'ट्युनिंग' इतकं उत्तम जमलं होतं, की ही रुग्णसेवा वाढवण्याच्या दृष्टीनं त्यांनी भरभर पावलं उचलायला सुरुवात केली. माथाडी कामगार जिथे मोठ्या संख्येनं काम करतात, त्या ग्रोसरी (किराणा बाजार) आणि ट्रान्सपोर्ट (वाहतूक) विभागातल्या मालकांच्या गाठीभेटी घेतल्या. प्रत्येक कामगारांमागे दरमहा फक्त ५० पैसे एवढ्या भांडवलावर रुग्णसेवेचा विस्तार करण्याचं काम हाती घेतलं. वैद्यकीय प्रदर्शनं, शिबिरं यांतून कामगारांशीही संवाद सुरू झाला. 'एक्स-रे बाहेरच्या रुग्णालयात काढण्यापेक्षा आपल्याकडेच काढता आला तर काम स्वस्तात होईल' यांसारख्या गोष्टी समजावून सांगितल्या. कामगारांनाही 'आपल्या' स्वत:च्या रुग्णसेवेचं महत्त्व पटत होतं. आता मागे वळून पाहण्याचा प्रश्नच नव्हता. अण्णासाहेबांच्या प्रयत्नांना अपूर्व यश लाभत होतं आणि त्यांना साहाय्य करण्याची संधी डॉ. नाईक यांना मिळत होती.

१९६२ मध्ये अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांची संघटना बांधली. मुख्यत्वे महाराष्ट्रातल्या, देशावरच्या ग्रामीण भागातून आलेल्या या कष्टकरी कामगारांचं एकूणच जीवन सुसह्य व्हावं, हा उदात्त हेतू त्यामागे होता. १९६९साली माथाडी कायदा अस्तित्वात आला. कामगार, मालक यांचे प्रतिनिधी आणि सरकार यांच्या सहभागातून माथाडी कामगारांच्या जीवनाला स्थैर्य लाभलं. आता त्यांच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास अण्णासाहेबांना लागला होता आणि त्यात माथाडी रुग्णसेवेचं योगदान महत्त्वाचं ठरणार होतं.

डॉक्टर नाईक सांगतात, 'डोक्यावर, मानेवर आणि पाठीवर सतत ओझं वाहणं हे माथाडींच्या कामाचं स्वरूप आहे. आज त्यांना दरमहा सरासरी पाच ते सहा हजार रुपये मिळतात. त्यातल्या प्रत्येक पैशासाठी त्यांनी अपरिमित कष्ट केलेले असतात. त्यांना होणारे विकार म्हणजे अपघातानं हातापायाचं फ्रॅक्चर किंवा मानेचा, मणक्यांचा आजार. कामगारांमध्ये तंबाखू सेवनाचं प्रमाण खूप असतं. त्यांना या विकारव्याधीतून मुक्त करण्याची पराकाष्ठा, आमचे डॉक्टर आणि रुग्णालयातील सारेच सेवक करत असतात.'

मेहता चेंबर्समधल्या छोट्या जागेतून माथाडींची रुग्णसेवा लवकरच मशीदबंदरच्या स्वत:च्या जागेत आली. 'माथाडी' भवनाचं उद्घाटन तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या हस्ते, तर रुग्णालयाचं उद्घाटन प्रसिद्ध हृदयशल्यविशारद डॉ. के.के. दाते यांच्या हस्ते झालं. आरंभी पॉलिक्लिनिकच्या स्वरूपात असलेल्या या रुग्णालयात नंतर काही खाटांची सोय करण्यात आली. कामगारांना विविध आजारांवर मोफत उपचार मिळू



डॉ. श्रीधर नाईक रूग्ण तपासताना

लागले. त्या काळात १ लाख ९५ हजाराला घेतलेलं एक्स-रे काढण्याचं यंत्र आजही कार्यान्वित आहे.

रोज सुमारे ४० ते ५० कामगारांना सेवा देणाऱ्या या कार्याचा व्याप वाढत होता. अण्णासाहेबांचं स्वप्न साकारण्याची नवी दृष्टी, मुंबई येथील कोपरखैरणे येथे रुग्णालयासाठी जागा मिळवण्यात आली. मार्केटचे काही विभाग वाशीला स्थलांतरित झाले. आता भव्य रुग्णालय उभारण्याची वेळ आली होती. १९९२ मध्ये तेही स्वप्न साकार झालं. ८५ खाटांचं सुसज्ज रुग्णालय माथाडींसाठी उभं राहिलं, परंतु ते पाहायला अण्णासाहेब नव्हते, याची खंत डॉक्टरांना आजही तीव्रतेनं जाणवते. जगाचं ओझं पाठीवर घेणाऱ्या या कामगाराला, अण्णासाहेबांनी जगाच्या पाठीवर ताठ मानेनं उभं केलं, असं सांगताना डॉक्टर नाईक भारावून जातात.

ते म्हणतात, 'आमचे कामगार अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी झगडत आपलं आयुष्य कंठत असतात. कष्ट करू शकणारं शरीर हीच त्यांची 'भांडवली' गुंतवणूक. पण ज्या देहाच्या भरवशावर कष्ट करायचे, तो व्याधिग्रस्त झाला तर उपचारासाठी खिशात पैसा नाही. रोजंदारीवर काम करताना जितकं जास्त काम करू तितका जास्त दाम मिळणार म्हणून झपाटल्यासारखं, यंत्रवत काम करणारी ही प्रामाणिक माणसं, शारीरिक कुवतीबाहेरचं, पाठीवरचं, मानेवरचं, डोक्यावरचं ओझं हा कामगार वाहत असतो. त्यातून सांधे, स्नायू, मणके यांची झीज होते. काही वेळा अपघातात जायबंदी होण्याची आपत्ती ओढवते. असं झालं की रोजगार बुडतोच, शिवाय उपचार करून घेणं जिकिरीचं होऊन बसतं. पूर्वी या वर्गात रक्तदाब, मधुमेह असे 'श्रीमंती' आजार आढळत नसत. आता त्यांचाही शिरकाव झालाय. आर्थिक श्रीमंती मात्र आलेली नाही. यातून कधी व्यसनग्रस्त, वैफल्यग्रस्त होणाऱ्या कामगारांच्या तन-मनाचं संतुलन सांभाळण्याचं काम आमची रुग्णसेवा करते.'

या रुग्णसेवेसाठी अनेक नामांकित तज्ज्ञ डॉक्टर साहाय्य करतात. त्यांच्या सक्रिय सहभागामुळे आणि रुग्णालयातील कायम सेवेत असलेल्या डॉक्टर व इतर पॅरामेडिकल स्टाफच्या आस्थेवाईक सेवेमुळे, माथाडी कामगारांचे आरोग्याचे अनेक प्रश्न सुटले आहेत. माथाडी रुग्णसेवेच्या प्रगतीत गेली चाळीस वर्षं सहभागी होता आलं, हे डॉ. नाईक यांना एक वरदानच वाटतं. ते म्हणतात, 'आज कोपरखैरणे इथे आमचं ८५ खाटांचं सुसज्ज रुग्णालय आहे. हृदयविकार वगळता इतर सर्व आजारांवर आम्ही उपचार करतो. कामगारांनी दरवर्षी जमा केलेल्या प्रत्येकी १,८०० रुपयांत त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना विनामूल्य औषधोपचार मिळतात. आता आमचं हॉस्पिटल आणि अलिबाग ते विरारपर्यंत अनेक ठिकाणी असलेल्या १४ रुग्णसेवा केंद्रांवर, रोज सुमारे दीड हजार कामगार उपचाराचा लाभ घेत असतात.'

डॉ. नाईक माथाडी रुग्णसेवेत दाखल झाले तेव्हा ते एकटे डॉक्टर आणि दोन कंपाउंडर; तसेच दोन साहाय्यक एवढाच कायमस्वरूपी स्टाफ होता. आता पूर्ण वेळ तीस वैद्यकीय अधिकारी, बारा अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी, ६५ समांतर वैद्यकीय अधिकारी आणि इतर कर्मचारी असा २०८ जणांचा ताफा रुग्णसेवेसाठी अहोरात्र सज्ज असतो.

मध्यरात्रीही एखाद्या गंभीर 'केस'चा फोन आला, की डॉक्टर लगेच निघतात. त्यांच्या नुसत्या असण्यानंच अनेक रुग्णांना दिलासा मिळतो आणि डॉक्टरांनाही त्यात समाधान



'नवी मुंबई भूषण' पुरस्कार स्वीकारताना
डॉ. श्रीधर नाईक

लाभतं. त्यांच्या शब्दांत सांगायचं तर, 'केवळ वैद्यकीय सेवा एवढ्यापुरतंच आता आमचं कार्य सीमित नाही. माथाडी कामगारांसाठी रक्तदान शिबिरं, आरोग्य प्रशिक्षणासाठी चर्चा, परिसंवाद, पथनाट्य अशा अनेक माध्यमांतून आम्ही प्रबोधन करत असतो. आमच्या कामगारांच्या मुला-मुलींना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्यासाठी, वैद्यकीय आणि समांतर वैद्यकीय अभ्यासक्रमही सुरू करण्यात आला आहे. व्यसनाधीन कामगारांचं सन्मानपूर्वक पुनर्वसन व्हावं, यासाठीही आमचा 'माथाडी हॉस्पिटल ट्रस्ट' कार्यरत आहे.'

याचाच एक भाग म्हणून प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. राजेंद्र बर्वे यांनी एक हजार 'माळकरी' माथाडी कामगारांचा अभ्यास करून, 'स्पिरिच्युअल थेरपी'विषयी एक शोधनिबंध अमेरिकेतील एका वैद्यकीय परिषदेत सादर केला होता.

भजन-कीर्तनात रंगणारा, माळकरी-माथाडी कामगार आता आपली संस्कृती टिकवून आधुनिक होतोय. त्यांच्या पुढच्या पिढीतली अनेक मुलं-मुली डॉक्टर, इंजिनीयर, कॉम्प्युटर तज्ज्ञ झाली आहेत. या कामगारांच्या कुटुंबांशीही जिव्हाळ्याचं नातं जुळलेल्या डॉक्टर नाईक यांना, अनेकदा त्यांच्या कौटुंबिक सल्लागाराचीही भूमिका करावी लागते. डॉक्टरांकडे गेलं की प्रश्नाची उकल होणारच, अशा आत्मविश्वासानं आलेले अनेक कामगार योग्य ते मार्गदर्शन मिळवूनच जातात.

माथाडींचं नेतृत्व, रुग्णालयातील सर्व स्टाफ आणि कामगार, यांच्याबरोबरच कै. अण्णासाहेबांच्या कुटुंबीयांचं सहकार्य डॉक्टरांना सातत्यानं लाभलं. त्यातूनच हे भव्य काम उभं राहिलं याची जाणीव डॉक्टर नाईक यांना आहे. माथाडी आरोग्यसेवेत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना 'नवी मुंबई भूषण' हा पुरस्कार मिळाला आहे. याचं सर्व श्रेय ते आपल्या रुग्णसेवेला नि कामगारांना देतात.

नाईकसाहेब हे आपल्या नात्यातलं जाणतं व्यक्तिमत्त्व आहे, या जाणिवेनं अनेक कामगार त्यांच्या घरीही येतात. त्यांच्यासाठी डॉ. नाईक यांच्या घराचा दरवाजा सतत उघडा असतो. हॉस्पिटलमध्ये एकटा येणारा कामगार त्यांच्या घरी सहकुटुंब येतो. तिथे त्याला शिल्पावहिनींच्या 'हॉस्पिटॅलिटी'चा (आदरातिथ्याचा) सुखद अनुभव मिळतो. एरवी औषधोपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या घरी 'औपचारिकता' नसते. असं हे विलक्षण नातं!

एकदा एक कामगार मुंबईच्या लोकल ट्रेनमधून प्रवास करताना चालत्या गाडीतून पडला. त्याच्या दोन्ही पायांना 'मल्टिपल फ्रॅक्चर' झाली होती. ठाण्याच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये तो आहे असा निरोप मिळताच, डॉ. नाईक यांनी तातडीनं त्या रुग्णालयाकडे धाव घेतली. माथाडी हॉस्पिटलमध्ये त्याच्यावर पुढचे सर्व उपचार करता येतील या आत्मविश्वासानं, त्यांनी रुग्णाला कोपरखैरणेला हलवलं. तिथे संबंधित डॉक्टरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून त्या कामगाराच्या दोन्ही पायांचं पुनरुज्जीवन केलं. आता तो कुबड्याही वापरत नाही. एका काठीच्या आधारे चालत डॉक्टरांच्या घरी येतो आणि नको म्हटलं तरी अट्टहासानं त्यांच्या पाया पडतो.

अशा क्षणी डॉक्टरांचे डोळे पाणावतात. कामगाराच्या नजरेत अपार कृतज्ञता असते आणि डॉक्टर नाईक यांच्या चेहऱ्यावर कर्तव्यपूर्तीचं समाधान! त्यांच्यातलं नातं आता डॉक्टर आणि रुग्ण यापलीकडे गेलेलं असतं. चिरंतन झालेलं असतं!

**– दिलीप जोशी**

khagoldilip@gmail.com

## मोनिका गजेंद्रगडकर यांचे कथासंग्रह




स्त्रीवादी भूमिकाच नव्हे तर कुठलीच भूमिका न घेता, मिळलेल्या अनुभवाशी प्रामाणिक राहून स्वत:चा असा संयत सूर सातत्याने जपणाऱ्या मोनिका गजेंद्रगडकर यांचा नवीन कथासंग्रह

# शिल्प

मोनिका गजेंद्रगडकर

१८० पृष्ठे • किंमत १७५ रुपये

---



विविध समस्या, विवंचना यांमुळं व्यापलेल्या, दुरावलेल्या आणि कधी त्याच विवंचनांमुळं सांधल्याही गेलेल्या नातेबंधांचा वेध : मोनिका गजेंद्रगडकर यांचा पहिला लक्षवेधक कथासंग्रह

# भूप

दुसरी आवृत्ती • १६० पृष्ठे • किंमत १५० रुपये

---




धर्म, भौगोलिक अंतर, समंजसपणाचा अभाव अशा काही कारणांमुळे आज नात्यांना, संबंधांना, जी एक विकलता आली आहे, त्यातलं आर्त, व्याकुळ करणाऱ्या भावभावना समर्थपणे व्यक्त करणाऱ्या दीर्घकथा.

# आर्त

मोनिका गजेंद्रगडकर

दुसरी आवृत्ती • १७६ पृष्ठे • किंमत १६० रुपये

---

मौज प्रकाशन गृह, गोरेगावकर लेन, मुंबई ४००००४

दूरध्वनी २३८७ १०५० इमेल : moujprakashan@gmail.com

# मधमाश्यांची अजब दुनिया

**डॉ. सुजाता देशपांडे**

मधमाश्यांना नेमके माहीत नसते, की दिवसाच्या सुरुवातीला आसपास कुठे अन्न मिळणार आहे. त्यामुळे बऱ्याच मधमाशा ह्या एकेकट्या अन्न शोधायला जातात. समजा, त्यातल्या एकीला एक छानसा फुलांचा ताटवा सापडला, तर ती मधमाशी पोळ्यात परत येते आणि आपल्या सहकाऱ्यांना त्या ताटव्याचा ठावठिकाणा सांगते. तो ताटवा पोळ्याच्या कोणत्या दिशेला आहे हे सांगते. त्या ताटव्याचे पोळ्यापासून अंतर किती आहे तेदेखील सांगते. कसे? तर नाच करून!

**म**धमाशी म्हटले, की आपल्याला आठवतो तो मध. ही झाली त्यांची गोड बाजू. आणि त्यांचा डंख ही त्या मधमाशांनी मागे सोडलेली कडवट आठवण. अर्थात आपल्यापैकी बरेच जण दुकानातून बाटलीबंद मध आणत असल्यामुळे, मधमाशीची कडू किंवा गोड आठवण येत असण्याची शक्यता कमीच आहे. मात्र मधाइतक्याच मधमाश्यांच्या इतर गोष्टीही अजबच आहेत.

मधमाशी हा सामाजिक कीटक आहे. मधमाशी एकटी तिच्या पोळ्यातील सहकाऱ्यांशिवाय जगूच शकत नाही. पोळ्यापर्यंत परतू न शकणारी मधमाशी काही तासांतच मरण पावते. कोणकोण असते तिच्या पोळ्यात? एक राणीमाशी, शेकडो ते हजारो कामकरी माश्या. राणीमाशी आणि कामकरी माश्या, या मादी माश्या. नर मधमाश्यादेखील असतात, पण संख्येने कमी. त्या असतातदेखील थोड्या कालावधीसाठीच, आणि नंतर ते ज्या पोळ्यात जन्मले ते पोळे कायमचे सोडून जातात. नर मधमाश्या फक्त प्रजननाचेच काम करतात. राणी मधमाशीचे काम हे अंडी घालण्याचे व पोळ्याचे संघटन करण्यासाठी काही विशिष्ट प्रकारची रसायने स्रवण्याचे. राणीमाशीच्या या रसायनांमुळे इतर माशा ह्या एकजूट राहतात. राणीमाशी पोळ्यात आहे हे या रसायनांच्या वासावरून इतर माश्यांच्या लक्षात येते. मात्र फक्त एका राणीमाशीचे रसायन एवढ्या हजारो माश्यांपर्यंत कसे पोहोचते? तर काही माश्या ह्या सतत राणीमाशीभोवती फिरत, तिला स्पर्श करत, आपल्या जिभेने तिला चाटत, तिचे रसायन उचलून घेतात व नंतर इतर माश्यांच्या जिभेला स्पर्श करून त्यांना ते रसायन देतात. अशा पद्धतीने केवळ काही मिनिटांतच हे रसायन सर्व माश्यांपर्यंत पोहोचवले जाते, जेणेकरून सर्व माश्यांना कळते, की राणीमाशी आहे. आता हे चाटून रासायनिक संदेश देणे आपल्याली थोडे विचित्र वाटेल. परंतु प्रत्येक जीवाची खासियत वेगळी! मधमाश्यांनी फुलांतून गोळा करून आपल्या पोटात ठेवलेला मकरंद, त्यावर पोळ्यात गेल्यावर आपल्या लाळेची प्रकिया करून त्यांनी तयार केलेला मध, आपण खातोच की! तर परत

राणीमाशीच्या रसायनाकडे वळू या. हे रसायन नसेल तर कामकरी माश्या दुसरी राणीमाशी बनवायच्या मागे लागतात. त्या स्वत: तर अंडी घालत नाहीत. मग हे कसे होते? तर एका विशिष्ट वयाच्या अळीला विशिष्ट प्रकारचे खाद्य दिले, की त्या अळीचे रूपांतर राणीमाशीत होते. या खाद्याला रॉयल जेली (royal jelly) म्हणतात. हे खाद्य नसेल तर त्या अळीपासून कामकरी माशी जन्मते. आहे ती राणीमाशी काही कारणामुळे नाहीशी होते किंवा जेव्हा पोळ्याच्या जीवनचक्रात नवीन राणीमाशी तयार करण्याची वेळ येते, तेव्हा कामकरी माश्या अशा पद्धतीने राणीमाशी 'तयार' करतात.

पोळ्यातील इतर सर्व कामे कामकरी माश्याच करतात. काय काय कामे असतात? मेण स्रवून पोळे बांधणे, वेळप्रसंगी त्याची डागडुजी करणे, हजारोंच्या संख्येने असणाऱ्या अळ्यांसाठी परागकण, मकरंद गोळा करणे, त्यांना खाऊ घालणे, पोळ्याची स्वच्छता करणे, पोळ्याचे तापमान नियंत्रित करणे, गरज असेल तेव्हा पोळ्यासाठी नवीन जागा शोधणे, पोळ्याचे संरक्षण करणे आणि संरक्षण करता करता आपला जीवदेखील गमावणे! आपल्या पोळ्यावरील हल्लेखोराला जेव्हा मधमाशी डंख मारते, तेव्हा तो डंख त्या हल्लेखोराच्या शरीरात घुसतो व तेथेच अडकून पडतो. मधमाशी उडून जाण्याच्या प्रयत्नात असते व त्या अडकून पडलेल्या डंखामुळे तिच्या पोटाचा भाग फाटून जातो. कसा? डंखाबरोबर स्पंदणारी विषग्रंथीदेखील ओढली जाते व त्यामुळे पोट फाटते. त्यामुळे अर्थातच मधमाशी मरते. हल्लेखोराच्या शरीरात जास्तीत जास्त विष टाकण्याचे काम मात्र मागे राहिलेली विषग्रंथी करते. म्हणूनच मधमाशीचा डंख झाला तर मधमाशीला मारायला जाऊ नका, ती मरणारच आहे. तिने मागे सोडलेला डंख काढून टाका, जेणेकरून कमी विष तुमच्या शरीरात जाईल.

कामकरी माश्या पोळ्यातील कामे करतात ती आपल्या वयानुसार! नुकत्याच जन्मलेल्या कामकरी माश्या पोळ्यांच्या स्वच्छतेचे काम करतात. नंतर त्या एक आठवड्याच्या होईपर्यंत अळ्यांना खायला देण्याचे काम करतात. यानंतर त्या पोळे बांधणीचे व डागडुजीचे काम करतात. यानंतर त्या बाहेरून आलेल्या कामकरी माश्यांकडून अन्न घेऊन ते इतर माश्यांना देण्याचे किंवा ते साठवून ठेवण्याचे काम करतात. यानंतर त्या पोळ्यांच्या रक्षणाचे काम करतात व सर्वांत शेवटी त्या पोळ्याबाहेर जाऊन अन्न गोळा करण्याचे काम करतात. त्यानंतर काही दिवसांतच त्यांचे आयुष्य संपते. कामकरी माशीचे आयुष्य हे सहसा दोन महिन्यांपेक्षा जास्त नसते. तर राणीमाशी काही वर्षेदेखील जगू शकते. नर माशी काही दिवसच जगते.

पोळ्याची बांधणी ही कामकरी माश्यांच्या ग्रंथीतून




**फुलातील मध गोळा करणारी मधमाशी**

स्रवणाऱ्या मेणातून केली जाते. कामकरी माश्या ह्या मेणाला आपल्या तोंडाने व पायाने षट्कोनी आकारात वळवून त्याचे कप्पे तयार करतात. या कप्प्यांत राणीमाशी अंडी घालते. तिथेच ती अंडी अळीत रूपांतरित होतात व नंतर कोशगत होतात. या कोशातून नंतर माशी बाहेर पडते. या षट्कोनी कप्प्यात मध व परागकणदेखील साठवून ठेवतात. पोळ्याचे तापमान नियंत्रित करणे, हीदेखील एक महत्त्वाची गोष्ट कामकरी माशा करतात. प्रचंड उकाड्याच्या दिवसांत त्या पाणी गोळा करून आणतात. या पाण्याचे थेंब पोळ्यावर पसरवून आपल्या पंखांनी भुर्र वारा घालतात. या वाऱ्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन होऊन थंडावा निर्माण होतो, आपण कूलर किंवा एसी लावून करतो तसा, पण प्रदूषणविरहित! थंडीच्या दिवसांत कामकरी माश्या एकमेकींना घट्ट चिकटून व एकमेकींच्या अंगावर बसून, पोळ्यावर आपले अनेक थर करतात. हे म्हणजे उबदार गोधडी घातल्यासारखे!


आता कामकरी माश्यांची आणखी एक अजब गोष्ट बघू या. मधमाशीच्या सर्वसाधारण पोळ्यात खाणारी तोंडे किती? एक राणीमाशी, असल्या तर काहीशे नर-माश्या, पाच हजार ते काही दशहजारपर्यंत कामकरी माश्या, काही दशहजार अळ्या. यातल्या अळ्या सर्वांत जास्त खादाड. या सर्वांना रोज लागतो तो दोनशे ग्रॅम मकरंद आणि लागतात पंच्याण्णव ग्रॅम परागकण. कमी वाटतात हे आकडे? मधमाशीच्या दृष्टीने विचार करा. एक मधमाशी एकावेळी फक्त पंधरा मिलिग्रॅमच वजन वाहू शकते! त्यामुळे पोळ्याच्या गरजा भागवायला तिला माराव्या लागणाऱ्या फेऱ्या ही एकटीसाठी अशक्य कोटीतील गोष्ट आहे. इथे त्या आपल्या इतर सहचरींची मदत घेऊ शकतात. ती कशी? मधमाश्यांना नेमके माहीत नसते, की दिवसाच्या सुरुवातीला

आसपास कुठे अन्न मिळणार आहे. त्यामुळे बऱ्याच मधमाश्या ह्या एकेकट्या बाहेर अन्न शोधायला जातात. समजा, त्यातल्या एकीला एक छानसा फुलांचा ताटवा सापडला, तर ती मधमाशी पोळ्यात परत येते आणि आपल्या सहकाऱ्यांना त्या ताटव्याचा ठावठिकाणा सांगते! तो ताटवा पोळ्याच्या कोणत्या दिशेला आहे हे सांगते!! त्या ताटव्याचे पोळ्यापासून अंतर किती आहे तेदेखील सांगते!! कसे? तर नाच करून. कल्पनाविलास किंवा भूलथाप वाटेल, पण ही सत्य गोष्ट आहे. वरील सर्व गोष्टीदेखील काल्पनिक नाहीत, तर वैज्ञानिक पद्धतीच्या काट्यातून, तावूनसुलाखून आलेल्या आहेत. आता मधमाशीचा नाच काय आहे, ते बघू या.


जेव्हा ताटवा पोळ्यापासून शंभर मीटरच्या आत असेल तेव्हा ती कामकरी माशी पोळ्यामध्ये येऊन गोलाकार नृत्य (round dance) करते. सोबतची आकृती (गोलाकार नृत्य–१) बघा. काही कामकरी माश्या तिच्याभोवती गोळा होतात. तिला आपल्या स्पर्शिकांनी स्पर्श करून त्या नृत्याचा मागोवा घेतात (आकृती : गोलाकार नृत्य–२). ही नाचणारी माशी त्यांना थोडा मकरंद चाटवते. या गोलाकार नृत्याचा अर्थ म्हणजे पोळ्याबाहेर जा, शंभर मीटरच्या त्रिज्येत ताटवा असेल. चाटवलेल्या मकरंदावरून फुलांचा अंदाज दिलेला असतो. ताटवा जर शंभर मीटरपेक्षा लांब असेल तर मात्र नाचाचा प्रकार बदलतो. या नृत्यात अंतर व दिशा दोन्ही सांगितले जाते. हे नृत्य इंग्रजी आठच्या आकाराचे असते. त्याला ‘वॅगल’ नृत्यदेखील म्हणतात. नाचाची सुरुवात ती सरळ रेषेत काही अंतर (काही मिलिमीटर) जाऊन करते व हे करताना ती आपल्या उदराची डावी–उजवीकडे झपाट्याने हालचाल करते. याला 'waggle run' म्हणतात. यानंतर ती उजवीकडे अर्धगोलात फिरून वॅगल रनच्या सुरुवातीला येते, परत उदराची हालचाल करत सरळ रेषेत जाते. नंतर डावीकडे अर्धगोलात फिरून वॅगल रनच्या सुरुवातीला येते (आकृती : वॅगल नृत्य–१). अशा प्रकारे ती परत परत फिरत राहते. सरळ रेषेतील वॅगल रन पूर्ण करण्यास लागलेला वेळ यावरून अंतर कळते. उदाहरणार्थ, एक सेकंद लागला तर ताटवा एक किलोमीटर अंतरावर असेल. हे अंतर झाले. आता दिशा (आकृती : वॅगल नृत्य–३). वॅगल रन सरळ रेषेत केला जातो. ही सरळ रेष व जमिनीपासून लंब काढला (पोळ्याचा अक्ष, पोळे झाडाला उभे लटकत असते) तर ती रेष यात एक कोन होतो. हा पोळ्याच्या इथला कोन. (सोबतची आकृती बघा.) असाच कोन पोळ्याबाहेर असतो. सूर्यापासून क्षितिजापर्यंत काढलेली सरळ रेष (म्हणजे उन्नतांश, altitude) ज्या बिंदूला टेकते तेथून पोळ्यापर्यंत जमिनीवर काढलेली सरळ रेष, ही पहिली रेष (पोळ्याच्या संदर्भात पोळ्याचा अक्ष). दुसरी




गोलाकार नृत्य–१




गोलाकार नृत्य–२



वॅगल नृत्य–१



वॅगल नृत्य–२




वॅगल नृत्य–३

रेष असते ती पोळ्यापासून ताटव्यापर्यंत काढलेली रेष (पोळ्याच्या संदर्भात वॅगल रनची रेष). या दोन रेषांमधील कोन. हा पोळ्याबाहेरील कोन व आतील कोन सारखेच असतात. हा कोन सांगतो, की पोळ्याबाहेर किती अंशांत जायचे व वॅगल रनची दिशा सांगते, पोळ्याच्या कुठल्या बाजूला जायचे. तर कामकरी माशी अशा पद्धतीने नाचत राहते. इतर माश्या तिच्या मागे मागे फिरत तिला स्पर्श करून नाच जाणून घेतात. (आकृती : वॅगल नृत्य-२) व नंतर पोळ्याबाहेर जाऊन त्या दिशेने त्या अंतरावर जाऊन ताटव्यातला मकरंद गोळा करून आणतात. अशा रीतीने अंतराचे व दिशेचे गणित ठरलेले असते. हे गणित मधमाशीच्या प्रत्येक प्रजातीसाठी वेगवेगळे असू शकते. शिवाय प्रजातीतही वेगवेगळे असू शकते. मात्र एका पोळ्यातील सर्व मधमाश्यांसाठी एकच असते.

कशी आणि केव्हा कळली ही नृत्यभाषा? कार्ल व्हॉन फ्रिश नावाच्या ऑस्ट्रियातील संशोधकाने ही नृत्यभाषा उलगडून दाखवली. त्याबद्दल त्यांना १९७३ मध्ये नोबेल पारितोषिक मिळाले. सुरुवातीला त्यांच्यावर कोणी फारसा विश्वास ठेवलाच नाही. माणसांपेक्षा एवढा छोटा असलेला प्राणी, त्याचा एवढा छोटासा मेंदू, तो मेंदू अंतरे आणि कोन मोजण्याचे काम करू शकत असेल यावर कोणाचा विश्वास बसतच नव्हता. मात्र फ्रिश मागे हटले नाहीत. अनेक अचूक शास्त्रीय प्रयोग करून त्यांनी आपले काम प्रसिद्ध केले. यानंतर काही संशोधकांनी रोबोटिक मधमाशी करून तिला पोळ्यात ठेवले व तिच्याकडून वॅगल नृत्य करवून घेतले; ज्यात नृत्याचा वेग व कोन त्या संशोधकांनी ठरवला आणि त्या रोबोटिक माशीच्या मागे मागे फिरणाऱ्या खऱ्या मधमाश्या त्या नृत्यातील वेग व कोनानुसार पोळ्याबाहेर त्या विशिष्ट अंतरावर व त्या कोनात गेल्या, अन्न तेथे आहे असे समजून. आणि तेथे (मधमाश्यांसाठी ठेवलेल्या खाऊसोबत) वाट बघणाऱ्या संशोधकांना सुखद आश्चर्याचा धक्का दिला. अशा रीतीने फ्रिश यांचे काम निर्विवादपणे सिद्ध झाले. आज जगात असे अनेक संशोधक आहेत, की जे मधमाश्यांच्या असंख्य गोष्टी उलगडण्यात गुंतले आहेत. मधमाश्या अंतर कसे मोजतात, कोन कसा मोजतात, सूर्य ढगामागे लपला असेल तर काय करतात या प्रश्नांचा अभ्यास केला आहे व अजून सखोल करत आहेत. फक्त मधमाश्याच नाही; तर इतरही काही प्राणी आहेत, की जे अंतराचा व दिशेचा अचूक अंदाज घेत असतात. उदाहरणार्थ, मुंग्या, स्थलांतर करणारे प्राणी यांचाही अभ्यास चालू आहे. या अभ्यासात हे प्राणी काही आपल्याला येऊन सांगत नाहीत, की आम्ही असे असे अंतर मोजतो! त्यांना आपली भाषा येत नाही आणि आपल्याला त्यांची!! त्यामुळे हे जाणून घेण्यासाठी प्रयोग आखणे हे आपल्यासाठी अतिशय आव्हानात्मक काम असते आणि मिळणारे निष्कर्ष उत्कंठावर्धक!

तर अशा या अजब मधमाश्या. त्यांच्या चार प्रजाती (species) आहेत. आफ्रिकन-युरोपीयन एपिस मेलिफेरा (Apis mellifera), आशियातील एपिस सेराना (Apis cerana), आग्या माशी एपिस डॉर्सेटा (Apis dorsata) व छोटी एपिस फ्लोरिया (Apis florea). यांतील मेलिफेरा व सेराना यांचा उपयोग हा व्यावसायिक मधुमक्षिकापालनात केला जातो. पुढच्या वेळी मध खाल तेव्हा या मधमाशीच्या अजब गोष्टीची व तिच्या कष्टांची आठवण ठेवा.

**– डॉ. सुजाता देशपांडे**
ए-१०३, अभिषेक सीएचएस, स्प्रिंग मिल कंपाउंड,
नायगाव, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४
d.sujata@gmail.com




**मूल्य १८० रु.**
**सवलतीत १०० रु.**

## आठवणींची साठवण – डॉ. सुरेश नाडकर्णी

डॉ. सुरेश नाडकर्णी ह्यांना कुणी 'आरोग्य ज्ञानेश्वर'चा किताब दिला तर कुणी 'लोकवैद्य' म्हणून त्यांची प्रशंसा केली. वैद्यकाचे ज्ञानभांडार तळागाळातल्या लोकांपर्यंत पोचवण्याचा वसा घेऊन, पंचवीस वर्षे ते कार्य अविरत चालू ठेवल्याबद्दल डॉ. सुरेश नाडकर्णी ह्यांना महाराष्ट्र राज्य पुरस्कारापासून इंडियन मेडिकल असोसिएशनच्या पुरस्कारापर्यंत अनेक पुरस्कार लाभले. परंतु त्याहूनही जास्त व्यक्तिगत पुरस्कार मित्र, आप्तेष्ट, नातेवाईक इतकेच नव्हे तर वाचकांकडून वेळोवेळी मिळाले. त्यांच्या सहृदय, मनमिळावू व्यक्तिमत्त्वाला आकार देणाऱ्या, त्यांना माणूस म्हणून घडवणाऱ्या प्रसंगांच्या आठवणींची ही साठवण...

# घटस्फोटाचा सोहळा!

केतकी
नवाथे

हिरोकी तेराई या, चिबा प्रांतात राहणाऱ्या, एकोणतीस वर्षीय तरुणाच्या डोक्यात घटस्फोटाचासुद्धा सोहळा करण्याची भन्नाट कल्पना आली आणि त्यानं २००९ मध्ये चक्क 'घटस्फोट संस्थे'चीच स्थापना केली. घटस्फोट घेणाऱ्याच्या मित्र-नातेवाइकांना ही बातमी कळावी(?) हा त्यामागचा उद्देश! तोही प्रसन्न, घरगुती आणि ताणतणाव विरहित वातावरणात, संपूर्ण व्यावसायिक दृष्टिकोनातून...

**ज**पान म्हणजे उगवत्या सूर्याचा देश. त्सुनामीची भयंकर वादळं, नेहमीचे भूकंप अशा साऱ्या जीवघेण्या अपेष्टा भोगूनही नवीन कल्पनांतून जीवन जास्त जास्त समृद्ध-सुंदर करणारा देश. भुकेल्या माणसालासुद्धा अर्धा येन फुलांकरता खर्च करण्याची शिकवण देणारा, जीवनातील आनंद इथं-तिथं कलात्मकतेनं उपभोगायचं बाळकडू प्यायलेला हा देश, अणुबाँब वर्षावात बेचिराख होऊनही फिनिक्स पक्ष्याप्रमाणे पुन्हा उभा राहिला आणि आर्थिक महासत्तेपर्यंत पोचला.

जपान हे एक कोडंच आहे. एवढा छोटासा देश किमयागार आहे. आपल्या चालीरीतींना, रूढी-परंपरांना जपणारा हा 'वर्कहोलिक' देश आणि तेथील जपानी रहिवासी यांना सतत काहीतरी जगावेगळं सुचत असतं. शोध (Innovation) ही समृद्धीची जननी. त्यामुळे काहीतरी रोज नवीन, मग ते पैशांच्या दृष्टीनं फायद्याचं असो-नसो पण ते नवीन आगळं-वेगळं पाहिजे जपान्यांची ही मानसिकताच असते.

मार्च महिन्यात आलेल्या त्सुनामीनी एवढासा जपान अक्षरश: धुऊन निघाला. अनेक इमारती, मोटार गाड्या, झाडं आणि शेकडो माणसं समुद्राच्या रौद्र मुखवट्यानं आपल्या पोटात घेतली. क्षणार्धात होत्याचं नव्हतं करणारा हा प्रलय जपानचं जनजीवनच उद्ध्वस्त करून केला. जपानी माणसांनी त्यातून स्वत:ला सावरलं. सारे मॉल्स, धान्याची दुकानं रिकामी झाली असं असतानाही उरल्यासुरल्या दुकानांतून रांगा मोडल्याची, घुसखोरीच्या गोंधळाची दृश्यं दिसली नाहीत. संयमित राहिलेला हा जपानी लगेचच अणुसर्ग दुष्परिणामांचा शिकार झाला आणि सामान्य जपानी जीवन उद्ध्वस्त झालं. अनेक परिवारांतून कर्ती माणसं मारली गेली, अनेकांच्या ताटातुटी झाल्या आणि आर्थिकदृष्ट्या जीवन जगणं महाग झालं.

दुर्दैवानं सुंदरतेबरोबरच घटस्फोटाची एक काळी किनार जपानी माणसात ठाण मांडून बसली होती. अकरा मार्चच्या या आपत्तीमुळे त्यात लक्षणीय वाढ झाली. भूकंपात हानी झालेल्या घरांतून याचे जास्त पडसाद उमटले. तरुण-तरुणींच्या मृत्यूमुळे काही ठिकाणी म्हातारी माणसं एकटी पडली. त्यामुळे लग्न

झालेल्या आणि जिवंत राहिलेल्या मुलींना संसारातील नवरा या जोडीदारापेक्षा उत्तर जपानमध्ये एकटी राहणारी आई किंवा वडील यांची काळजी जास्त वाटू लागली. आर्थिक विवंचनेनं साऱ्यांनाच पिडले आणि संसार रेटणं कठीण होऊ लागलं. आणि इच्छे-अनिच्छेनं अनेकांनी घटस्फोटाचा मार्ग स्वीकारला.

घटस्फोटाकरता इतरही अनेक कारणं होती तरी मार्चनंतर अनंत पटींनी घटस्फोट वाढण्यास हे एक महत्त्वाचं कारण होतं. अडीच लाख एवढ्या विक्रमी संख्येनं जपानमध्ये एका वर्षात घटस्फोट नोंदवले गेले. घटस्फोट घेणं हे जपानमध्ये एकेकाळी कमीपणाचं, लज्जास्पद कृत्य समजलं जायचं, पण त्याच जपानमध्ये आर्थिक विवंचनेमुळे कुचंबणा होणारे स्त्री-पुरुष घटस्फोटाकरता तयार होऊ लागले. तोसुद्धा जीवनाचाच भाग झाला.

हिरोकी तेराई या चिबा प्रांतात राहणाऱ्या एकोणतीस वर्षीय तरुणाच्या डोक्यात या घटस्फोटाचासुद्धा सोहळा करण्याची भन्नाट कल्पना आली आणि त्यानं २००९ मध्ये चक्क 'घटस्फोट संस्थे'चीच स्थापना केली. घटस्फोट घेणाऱ्याच्या मित्र-नातेवाइकांना ही बातमी कळावी(?) हा त्यामागचा उद्देश! तोही प्रसन्न, घरगुती आणि ताणतणाव विरहित वातावरणात, संपूर्ण व्यावसायिक दृष्टिकोनातून.

त्यानं चार-पाच हजार रुपयांपासून सुरू केलेले हे सोहळे आता पन्नास-साठ हजार रुपयांपर्यंत पोचले आहेत. संस्था सुरू झाली तेव्हा सातशे विभक्त होणाऱ्या जोड्यांनी हिरोकीकडे चौकशीकरता गर्दी केली होती. एकवीस वर्षांपासून सत्तावन्न वयापर्यंतच्या विविध आर्थिक-सामाजिक स्तरांतील लोकांचा यात समावेश होता.

लग्नाच्या वेळी जशी आमंत्रणं दिली जातात त्याची पुनरावृत्ती या घटस्फोट समारंभानिमित्त होते. हिरोकी तेराईचं कार्यालय संबंधित कायदेशीर कागदपत्रांच्या देवाण-घेवाणीकरता वापरून झालं की एखाद्या सभागृहामध्ये किंवा हॉटेल-रेस्टॉरंटमध्ये ही 'वरात' स्वतंत्रपणे जाऊन पोचते. कोणताही आडपडदा न ठेवता पुजारी म्हणजे हिरोकी तेराई पाहुण्यांचं स्वागत करून, वधू-वर आज विभक्त होत आहेत असं जाहीर करतो. मुलीची म्हणजे वधूची बाजू ती स्वत: मांडते- 'आमचा संसार चांगला चालला होता, पण नवरा दुसऱ्या बाईच्या नादी लागला, ते मला सहन झाले नाही म्हणून त्याला मी आता सोडचिठ्ठी देत आहे.' एका झटक्यात ती सांगून टाकते. नवरा ओशाळवाणा उभा राहतो, आपली कमकुवत बाजू लढवतो, पण त्याला कुणाकडून पाठिंबा मिळत नाही.

मुख्य विभक्त होण्याचा कार्यक्रम मग सुरू होतो. बेडकाचे तोंड असलेली लाकडी हातोडी जी या समारंभाकरता तयार केली जाते. ती दोघंही- वर-वधू एकत्र पकडतात. लग्नापूर्वी वाङ्निश्चयाच्या वेळी बोटात घातलेली अंगठी नंतर लाकडी टेबलावर ठेवली जाते आणि दोघंही त्यावर घाव घालून तिला सपाट करतात. दोघांच्या आयुष्यात फुललेलं, प्रेमाच्या आणाभाकांनी आकाशापर्यंत पोचलेलं सारं सपाट जमिनीवरच्या वास्तवावर स्थिर होतं. बेडकाच्या डोक्यासारखी बनवलेली ही हातोडी 'काइरू' (Kaeru) या नावाने ओळखली जाते. जपानी परंपरेप्रमाणे या हातोडीनं कशाचातरी नाश करणं म्हणजे जे वाईट होतं, त्रासदायक होतं त्याचा शेवट करणं. नव्या उत्साहानं मागील सारं विसरून पुन्हा सुरुवात करणं.

जपानी समजुतीनुसार बेडूक हे माघारी फिरण्याचं प्रतीक आहे. त्यामुळे काही ठिकाणी उघड्या तोंडाच्या बेडकाची प्रतिकृती समारंभस्थळी मांडलेली असते. त्या बेडकाच्या तोंडात मोडलेली अंगठी टाकून तोपर्यंतचे पती-पत्नी काडीमोड घेतात.

आकियुगू (Akie-Gu) या अशाच एका कल्पक व्यावसायिक डिझायनरनं घटस्फोटाकरता वधूचा खास पोशाख



तयार करण्याची शक्कल लढवून, ती लोकप्रिय (?) सर्वमान्य करून भरपूर पैसे कमावण्यास सुरुवात केली. त्यानं पोशाखाची मागील बाजू ही विशेष आकर्षक बनवली. पांढरा झगा, त्यावर मागील बाजूस मध्यभागी पिवळसर रंगाचं फूल (Daisy) त्यानं रेखाटलं. हेतू एवढा की एकमेकांपासून विभक्त झाल्यावर (तरी) आपली बायको सुंदर, आकर्षक होती हे नवऱ्याला वाटावं. पांढऱ्या-पिवळ्या फुलातील झग्याचा अर्थ 'इडापिडा टळली', शुभारंभाची नांदी झाली असाही होतो. तर काही ठिकाणी हा झगा असंही सुचित करतो, की आपण आता लग्नाचे बांधील नवरा-बायको नसलो तरी यापुढे आपले भावनिक प्रेमसंबंध (Platonic) राहतील आणि (कदाचित) वाढतीलही.

जेवणाच्या वेळी वधूपक्ष एका बाजूला तर समोर वरपक्ष (दोघंही आता एक्स म्हणजे पूर्वीचे). ग्रीन चहाच्या सेवनानंतर मग मुख्य रुचकर जेवण; जे समारंभातील सर्वांना तृप्त करून टाकेल असं. ते संपल्यावर मग नवीन वाटा चोखाळायला दोघंही मोकळे. वेगवेगळ्या दिशेला रिक्षा जाऊन कार्यसमाप्ती/समारंभ समाप्ती.

तसा हा समारंभ साधा सरळ सोपा वाटतो पण अनेकांना मानसिक त्रास देणारा. केवळ दोन वर्षांपासून वीस वर्षांपर्यंत एकत्र राहिलेले हे तरुण-तरुणी कधी मुलाबाळांशिवायचे तर कधी एखाददुसरं लहान मूल-मुलगा किंवा मुलगी यांच्यासह. त्यांना काय चाललंय ते न समजण्याच्या वयाचं. आई-वडिलांच्या लग्नाप्रमाणेच लहानगं आयुष्य कटी पतंगासारखं या न पाहिलेल्या विशाल आकाशात परिस्थितीनं भरकटण्याकरता सोडून द्यावं लागणारं. अनेकांना हुंदके येणारं, जुन्या आठवणींनी घायाळ होणारं. सारं चांगल्या भविष्याकरता म्हटलं तरी वर्तमानात पीडा देणारं.

जपानी संस्कृतीचे अभ्यासक रोनाल्ड केल्टस हे टोकियो युनिव्हर्सिटीमध्ये प्राध्यापक आहेत. बदलत्या जपानी समाज व्यवस्थेकरता असे घटस्फोट समारंभ, ही स्वागतार्ह बाब आहे असं त्यांना वाटतं. कारण आजची जपानी स्त्री ही चांगली शिकलेली, उच्च शिक्षण घेतलेली, अनेक माध्यमातून जग आणि वैषयिकता (Sex) जेव्हा पाहते. तेव्हा आपले नवरे असे आक्रमक, झोकून देणारे का नाहीत याचे त्यांना आश्चर्य वाटते आणि दुःख होते. तर अत्यंत अस्थिर आणि कठीण आर्थिक नोकरीच्या कोंडीत सापडलेल्या जपानी तरुणांना, आहे तेच टिकवणं हे मोठं आव्हान वाटतं. त्यापुढे बाकी साऱ्या गोष्टी त्यांना फजूल वाटतात. कदाचित म्हणूनच जगातील सर्वांत जास्त घटस्फोट असणाऱ्या देशांच्या यादीत, जपान वरच्या क्रमांकावर आहे.

या जरी रोज सामना कराव्या लागणाऱ्या जपानी स्त्री-पुरुषांच्या कथा असल्या, त्यामुळे जरी घटस्फोटांचे प्रमाण वाढत असले व त्यातून काही असे सोहळे साजरे करणारे चार पैसे कमावून जीवन जगत असले; तरी बहुतांश समाजाला घटस्फोटाच्या वाढत्या संख्येची चिंता आहे. काही समाजसेवी या विषयाकडे गांभीर्याने पाहत आहेत. घटस्फोटाचेसुद्धा सोहळे करणे, भारी कपडे, जेवणखाण यावर पैसे, वेळ खर्च करणे हा तर पैशांचा अपव्यय आहेच, पण त्याहीपेक्षा या साऱ्याचे बाजारीकरण म्हणजे विचारांचा उथळपणा आहे असं त्यांना वाटतं.

अतिप्रगत देशांतील या समस्या आता तुलनेनं गरीब तिसऱ्या देशांतही, मुक्त अर्थव्यवस्थेच्या नावाने आलेल्या नवश्रीमंतीमुळे मूळ धरू लागल्या आहेत. वाढते राहणीमान सांभाळताना आणखी वरच्या वर्गात जायची ईर्ष्या, त्यातून आणखी काम-काम-काम आणि ते वाढत्या स्पर्धेत



# मैत्रेय प्रकाशनातर्फे वाचकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा




## तीर्थे महाराष्ट्राची
### -अनंत गोपाळ मोहिते

या मंगल देशात अशी अनेक देवस्थाने आहेत,की त्यांना स्वत:चा असा इतिहास आहे, माहात्म्य आहे.त्यामुळेच ती गेल्या अनेक पिढ्या महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसाच्या हृदयात सर्वोच्च श्रद्धास्थान होऊन बसलेली आहेत बहुतेक तीर्थस्थानं ही प्राचीन आहेत,त्यांना शेकडो वर्षांची परंपरा लाभलेली आहे. त्यांची विस्तृत माहिती 'तीर्थे महाराष्ट्राची' या पुस्तकात आहे.

(पृष्ठे- २८४) (₹ ३००)

## संगीत
### चिकित्सा आणि उपचार
### डॉ. विजय तारे




औषधोपचारांबरोबरच संगीत चिकित्सेमुळे रोग बरा होण्यास मदतच होते असे आढळून येते. संगीत चिकित्सेच्या पैलूंबद्दलच्या माहितीचा या पुस्तकामुळे वाचकांना लाभच होईल.


(पृष्ठे- १२५) (₹ १२०)



## रमणीय सागरकिनारे
### डॉ. प्रकाश जोशी

सूर्योदयाबरोबर आकाशात होणारी चैतन्यदायी आभांची रंगउधळण आणि मावळत्या दिनकराची सोनेरी, शीतल किरणे; यांच्याशी रंगसंगती साधले समुद्रकिनाऱ्यांची आणि त्यांच्या लोभस वाळूची वळणे सागरवेळा आणि तिची श्रवणीय गाज, त्या रत्नाकरासारखेच विविध प्रकारच्या पुळणींनी गुंफलेले हे रमणीय सागरकिनारे म्हणजे भारतमातेच्या गळ्यातील जणू रत्नहारच!

(पृष्ठे- ९६) (₹ १००)




## 'दि ॲक्ट ऑफ लाइफ!
### सहलेखन व संपादन : ज्योती सभरवाल
### अनुवाद : चंद्रकांत भोंजाळ

अमरीशजी! भारतीय चित्रपटांतील उत्कृष्ट अभिनेत्यांपैकी एक. कोणताही गॉडफादर नसताना आपला वैशिष्ट्यपूर्ण आवाज, भरदार व्यक्तिमत्त्व आणि अभिनयाची उत्तम जाण यांच्या साहाय्याने त्यांनी आपला ठसा उमटविला. त्यांनी रंगभूमीकडून चित्रपटाकडे केलेली वाटचाल चकित करणारी आहे. जीवनाच्या सूक्ष्म निरीक्षणातून त्यांनी अनेक बारकाव्यांनिशी खलप्रवृत्तीच्या भूमिकाच नव्हेत, तर सत्प्रवृत्तीच्या भूमिकाही ताकदीने साकारल्या. केवळ आणि केवळ व्यवसायावर असलेली आत्यंतिक निष्ठा, सर्वोच्च कामगिरी करण्याचा ध्यास आणि त्यासाठी चिकाटीने घेतलेले अथक परिश्रम, यामुळेच अमरीशजी यशाच्या उत्कर्ष शिखरावर पोचले. फक्त अभिनेत्यांनाच नव्हे, तर सर्वसामान्य माणसालाही प्रेरणादायी ठरणारे त्यांचे हे आत्मकथन 'दि ॲक्ट ऑफ लाइफ!'

एका विचारी, बुद्धिमान आणि चिंतनशील अभिनेत्याचा व त्याच्यातील माणसाचा हा जीवनप्रवास!

(पृष्ठे- ३७६) (₹ ४००)

## आमची वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती, वाचनसंस्कृतीला देते दर्जेदार मिती

मैत्रेय प्रकाशन : पारशी हाऊस, ३ रा मजला, एम.जी. रोड, जैनमंदिरासमोर, बँक ऑफ इंडियाच्या वर, विलेपार्ले (पू.), मुंबई- ४०० ०५७.
फोन- (०२२) २६१०१०१६, २६१५०३५८. website : www.maitreyagroup.com

मैत्रेय प्रकाशनाची सर्व पुस्तके आता "e-book" स्वरूपात सुद्धा उपलब्ध. "Book Ganga.com" या सुप्रसिद्ध वेबसाइटला भेट द्या आणि सवलतीत पुस्तके घ्या.





टिकवण्याकरता सुखी संसाराची आहुती- जी जपानची जोडपी भोगताहेत-त्यातून दोघांचीही हतबलता, त्यामुळे इच्छे-अनिच्छेने घटस्फोट स्वीकारताहेत.

जसे लग्नमुंज हे सामान्य लोकांच्या जीवनातले (अनिवार्य) सोहळे तसंच रूप हिरोकी तेराईने घटस्फोटाला देऊन टाकले. आणि संपूर्ण माध्यमांच्या प्रभावाखाली असलेलं जग, या गंगेत आपापले हात धुण्याकरता अहमहमिकेने पुढे येऊ लागले. घटस्फोट घ्या, आयुष्य वाया घालवू नका, मोकळे व्हा, मनासारखा नवीन साथीदार शोधण्याकरता आमच्या क्लबचे सभासद व्हा, म्हणून मग 'Divorce Club'चे पेवच फुटले. इंटरनेटवरून हजारोंच्या मुलाखती दाखवल्या जाऊ लागल्या. मी किती एकटी-एकाकी होते, म्हणून कुणी स्त्री गळा काढून, मला कसा माझा हिरो मिळाला म्हणून एखाद्या क्लबचं गुणगान करायची तर कुणी तरुण, माझी बायको कशी कजाग होती, घटस्फोट घेऊन मी कसा सुटलो आणि क्लबच्या मदतीने नवीन सुखी आयुष्य कसं जगू लागलो; याचं रसभरित वर्णन करत राहायचा.

एकूणच या साऱ्याचा अतिरेक झाला. क्लबची घोडदौड वाढतच राहिली. तरीसुद्धा सुजाणांचा एक वर्ग या साऱ्या दुर्दैवी घटनांनी चिंतीत होता. 'Do not Divorce Me' या नावे एका क्लबची स्थापना या लोकांनी जपानमध्ये केली. मोडणारी लग्नं, उद्‌ध्वस्त होणारे संसार वाचवणे याकरता या क्लबचे सभासद-कार्यकर्ते मनापासून मन जोडण्याची कामं करते झाले. स्त्री-पुरुषांना संसारातील प्राथमिक धडे लग्नाला दहा-बारा वर्षे झाली असतील तरी-देऊ लागले. चुका कबूल करा, क्षमा मागा, एकमेकांचे आभार मानत राहा (Thanks चा मुक्त वापर करा), दिवसांत एकमेकांशी जास्तीतजास्त बोलत राहा. (एका पाहणीनुसार जपानी जोडपं एकमेकांशी दिवसात जास्तीत जास्त तीस मिनिटं बोलतं) इत्यादी संसार जोडण्याचं-टिकवण्याचं काम हा क्लब करतो आहे.

हे सारे प्रयत्न चालू असूनही आर्थिक विषमता, अत्यंत महागडे जीवनमान आणि नोकरी जाण्याची, धंद्यात काहीही घडण्याची अनिश्चततेची टांगती तलवार; सामान्य जपानी माणसाच्या शिरावर सतत असते. त्यामुळे सुखी राहण्याचे स्तुत्य प्रयत्न करूनही पैशाचे सोंग जमत नसल्यामुळे घटस्फोट प्रश्नाची उग्रता वाढती आहे.

हिंदी चित्रपटांतून दिसणारी भव्यदिव्य स्वप्नं, महालासारखी घरं, मोठ्या मोटारगाड्या, भारी कपड्यातील स्त्री-पुरुष; सारं सारं सामान्य माणसाला या आयुष्याकडे स्वप्नाळूपणे खेचत राहतं. तसंच जगातील श्रीमंत देश आणि त्यांची भव्य-दिव्य शहरं हीसुद्धा गरीब देशांतील लाखो लोकांची स्वप्नभूमी असते.

पण बऱ्याचदा ती दुरून डोंगरासारखी असते. जपान हा उद्योगशील, शिस्तप्रिय, अगत्यशील देश, भारावून टाकणारा पण स्थानिकांना अनेक गोष्टींचा दाह देणारा, जीवन असह्य करून टाकायला लावणारा, नाइलाजानं घटस्फोटाच्या खाईत लोटणारा...

**- केतकी नवाथे**
३२, शिवाजी हाऊसिंग सोसायटी,
सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६
दूरध्वनी : (०२०) २५६३१२१६
भ्रमणध्वनी : ९८२२०४००४८
ketki.nawathe@linguapura.in

# चोरांच्या दुनियेत

अरुण पुराणिक

अशोक त्याच्या विश्वात यशस्वी आणि समाधानी होता. लहान असल्यापासून वाडीच्या नाक्यावर, बंद दुकानाच्या पायरीवर अथवा फळीवर बसून तो जाणाऱ्या–येणाऱ्या लोकांचे सूक्ष्म निरीक्षण करत असे. त्याच्या भाषेत तो 'झाडी' करत असे म्हणजेच त्यातूनच तो आपले सावज निवडत असे. सावजाने केलेल्या पेहरावावरून त्याची सांपत्तिक स्थिती काय असेल? तो कितपत सावध आहे? आपला पाठलाग करू शकेल का?... आपल्याला हवे तसे हे सावज आहे का हे पडताळून पाहत असे...

**शा**लेय वयात पाहिलेल्या सीआयडी चित्रपटातील एक प्रसंग आजही विसरता येत नाही. नाजूक शरीरयष्टी, लवचीक कंबर, टूथब्रशसारखी मिशी, ढगळ पॅण्ट आणि लटपटणारी तिरपी चाल; असा हा जॉनीवॉकर त्या भागातील एक नामचीन चोर असतो. पोलिस स्टेशनमध्ये इन्स्पेक्टर झालेल्या देव आनंदला पाहून तो सर्वांसमोर चिरक्या आवाजात, भाबडेपणाने विचारतो, 'ये साब नया है क्या?' सिनेमाच्या पडद्यावर चोराचे घडलेले हे पहिले दर्शन! कारण या आधी चोर कसा असतो, ते प्रत्यक्ष कधी पाहिले नव्हते. बी.आर. चोप्रांच्या 'कानून'मध्ये नाना पळशीकरांनी 'कालिया' या भुरट्या चोराची भूमिका अप्रतिम साकारली होती. त्यांना त्यासाठी फिल्मफेअर पुरस्कारही मिळाला होता. परंतु परिस्थितीने गांजलेला तो रड्या चोर वाटला होता. किशोरकुमारच्या खिशात लपवलेल्या हिऱ्यांच्या प्राप्तीसाठी, प्राण आणि शम्मी 'हाफ टिकट'मध्ये किशोरकुमारच्या मागे हात धुऊन लागतात; ते पाहताना हसून हसून मुरकुंडी वळली होती. 'गेट वे ऑफ इंडिया'मध्ये मधुबाला–जॉनी वॉकरचा (नाइट क्लबमध्ये गोप व धुमाळचा) सीनही खूप छान होता.

लहानपणापासून चोर, पोलिस, डॉक्टर, ड्रायव्हर, कंडक्टर या आमच्या आवडत्या व्यक्तिरेखा होत्या. पोलिसांनाही चकवण्याऱ्या चोराविषयी तर विशेष आदरयुक्त कुतूहल होते. त्याच्याविषयी अनेक कल्पना मनात रंगवल्या होत्या. सर्वत्र भिरभिरणारी कावळ्याची नजर, चिचुंद्रीसारखा क्षणात नाहीसा होणारा, संधी मिळताच घारीसारखा सावजावर झडप घालणारा, तरसासारखा साहसी पण पकडला गेल्यावर गाढवासारखा सहनशील, निमूटपणे मार खाणारा!

चाकोरीबाह्य आयुष्य आपल्याच मस्तीत जगणारी, विविध प्रकारची माणसे जवळून निरखायला मला आवडतात, मग त्यांचा धंदा, कार्यक्षेत्र काहीही असो. विविध विषयांवरचे सिनेमेही आपण पाहतोच की! मी केवळ अभ्यास म्हणून निरपेक्षपणे त्यांच्याकडे पाहतो. फुकटचे बौद्धिक धडे देऊन कुणालाच सुधारायला अथवा बिघडवायलाही जात नाही. कारण

प्रत्येकाने आपला मार्ग स्वखुशीने, पूर्ण विचारांती निवडलेला असतो.

मला जादुगाराच्या हातचलाखीसारखेच चोराचे हस्तकौशल्य पाहण्याचेही कुतूहल होते. माझी ही इच्छा शालेय वयातच फलद्रूप झाली. कांदेवाडीतील अशोक आणि खेतवाडीतील बाबू हे त्या काळातील नामचीन शर्विलक योगायोगाने माझ्या संपर्कात आले. खिसा कापण्याच्या कलेत ते माहीर होते. उमरखाडीच्या रिमांड होममधून सुटल्यावर, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत असताना, त्यांना मी (त्यांच्या धंद्याच्या भांडवलासाठी) पाच पैशांचे 'भारत ब्लेड' विकत घेऊन दिले होते. त्या दोघांनी त्याचे दोन भाग करून वाटून घेतले होते. मला, मी केलेल्या उपकाराची जाणीव म्हणून, दुसऱ्याच दिवशी चक्क पाच रुपये आणून दिले होते. तेव्हा मला त्यांच्या खऱ्या धंद्याची कल्पना आली. माझे बाबा दिवसभर काबाडकष्ट करायचे. मिळेल तसा ओव्हरटाइमही करायचे, तरी महिन्याकाठी जेमतेम शंभर रुपये मिळवायचे आणि ही बारा वर्षांची दोन पोरं, दिवसाकाठी पन्नास-साठ रुपये मिळवायची! गल्लीतील मित्रांवर सढळ हातांनी एक-दोन रुपये उडवायची. खरे तर, त्यांच्याबद्दल मनात असूया होती. त्याचबरोबर त्यांच्या धंद्याविषयी उत्कंठाही होती.


देवाने जन्माला घातलेले प्रत्येक मूल हे हुशार म्हणूनच निपजते. परंतु अंगभूत हुशारी आणि कलागुणांशी विसंगत क्षेत्र मिळाल्यामुळे ही मुले आयुष्यात अपयशी होतात. आपल्याला नक्की काय येते, हे माणसांना कधी कधी शेवटपर्यंत उमगत नाही. प्रयोग करण्यातच आयुष्य सरून जाते. व्यावहारिक जग काहीही म्हणत असले तरी अशोक त्याच्या विश्वात यशस्वी आणि समाधानी होता. त्या चाकोरीबाह्य व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करण्याचा मी निर्णय घेतला.

सडपातळ अंगकाठी, सावळा वर्ण, जेमतेम पाच फूट उंची आणि चाळीस किलो वजन! डोक्यावर बारीक केस आणि भादरलेली मिशी! कायम हाफ पॅण्ट आणि बुश शर्ट! पंचवीस वर्षांचा घोडा झाला तरी त्याच्याकडे पाहून पोलिस त्याला अल्पवयीन समजून रिमांड होममध्ये पाठवत. 'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' असे म्हणतात. परंतु विद्यार्थीदशेतही याचे पाय पाहून भल्याभल्यांना याची कल्पना येत नसे. लहान असल्यापासून वाडीच्या नाक्यावर, बंद दुकानाच्या पायरीवर अथवा फळीवर बसून तो जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांचे सूक्ष्म निरीक्षण करत असे. त्याच्या भाषेत तो 'झाडी' करत असे. त्यातूनच तो आपले सावज निवडत असे. धोतरवाल्यांकडे तर तो पाहतही नसे. धोतरात हात घालायला सराईत चोरही धजत नाहीत. सावजाने केलेल्या पेहरावावरून त्याची सांपत्तिक स्थिती काय असेल? त्याने पैसे, पाकिट कुठे ठेवले असेल? तो कितपत सावध आहे? आपला पाठलाग करू शकेल का? प्रतिकार करेल का? आपल्याला ओळखू शकेल का? बाईने घातलेले दागिने खरे असतील का? त्यांची काय किंमत असेल? हातातील घड्याळ कोणत्या कंपनीचे आहे? एकंदरीत, आपल्याला हवे तसे हे सावज आहे का हे पडताळून पाहणे म्हणजे त्याच्या परिभाषेत 'झाडी' करणे होते.

म्युनिसिपालिटीच्या शाळेत शिकणाऱ्या अशोकला तिसरीतच शाळेतून काढून टाकण्यात आले होते. पित्याचे छत्र लहानपणीच हरपलेले, आई भाजीची टोपली घेऊन नाक्यावर बसे. वाडीतील मुले बांबूला झाडाची काटेरी फांदी अथवा डहाळे बांधून, त्या लग्गयाने हवेत उडून जाणारा, मांजा कापलेला पतंग पकडत, तर अशोक काठीला हूक लावून, ती उघड्या खिडकीत घालून खुंटीला टांगलेले शर्ट पळवत असे. क्रिकेट खेळताना चेंडू दोन चाळींमधील गटारात गेला तर तो परत आणताना आम्ही विचार करत असू. हा पठ्ठा कोणत्याही गटारात शिरून या वाडीतून त्या वाडीत जात असे. पाण्याच्या पाइपांवरून सरसर चढत कबुतरे पकडत असे. चेंडू आणायलाही तीरासारखा अनवाणी पायांनी धावत असे. प्रचंड रहदारीतून बसगाड्या चुकवत, रेल्वे ट्रॅकवरून, घाणीतून, गच्चीवरील कौलांवरून पाण्याच्या टाक्यांवरून लीलया धावत असे. चोर-शिपाई खेळात तोच नेहमी चोर बने आणि बाकी सारे शिपाई, पण पठ्ठा कधीच कुणाच्या हाती लागत नसे. कुणी मागून याची कॉलर पकडल्यास हा हळूच बुशशर्टाची बटणे काढून, दोन्ही हात वर करून झटकन खाली बसत असे. म्हणजे बुशशर्ट वरच्या वर पकडणाऱ्याच्या हाती, मग तो त्याला हळूच धक्का देऊन पळून जात असे. एकदा विश्वास बसल्यावर त्याने मला त्याच्या धंद्यातील ट्रेड सिक्रेट सांगण्यास सुरुवात केली. हे अनुभवाचे बोल होते. एका चोराचे आत्मकथन होते. फक्त त्याने आपल्या गुरूचे नाव मला कधीच सांगितले नाही. तो सांगत होता-

कोणतीही कला, त्यात पारंगत होण्यासाठी लहानपणीच शिकावी लागते. आमच्या धंद्यात दहा ते बारा या वयात पोरे ती शिकतात. नंतर शरीर बोजड होते, हातपाय काम करत नाहीत. पाऊणशे वर्षांपूर्वी पंढरपूरचे 'उचल्ये' (वारकऱ्यांचे सामानसुमान पळवणारे), पुण्याचे 'भामटे' (फसवणारे) आणि मुंबईचे 'मवाली' जगप्रसिद्ध होते; परंतु आजकाल मुंबई ही सर्वांची बाप झाली आहे. जगात असा कोणत्याही गुन्ह्याचा प्रकार नसेल, जो मुंबईत होत नाही. फॅशनसारखेच चोरीचे नवीन प्रकारही इथेच प्रथम जन्माला येतात.

चौर्य ही एक प्राचीन कला आहे. त्यासाठी कौशल्य,


SHUBH DEEPAVALI
May the festival of lights shine brightly upon you and bring you Success,
Prosperity and Happiness for the New Year.
TJSB BANK
The Thane Janata Sahakari Bank Ltd.
(MULTI-STATE SCHEDULED BANK)
The Thane Janata Sahakari Bank Ltd.
TJSB House, Plot No. 5 B, Road No. 2, Behind Aplab Ltd., Wagle Industrial Estate, Thane (W) - 400604
Board Line: 022-25878500 | www.thanejanata.co.in

चातुर्य आणि सराव लागतो. ब्लेड मारताना पॅण्टीच्या खिशाची शिवण एका झटक्यात उसवली गेली पाहिजे, आपली बोटे आणि सावजाची मांडी कापली जाता नये. आपले सावज शेवटपर्यंत, बेसावध असणे हीच यशाची गुरुकिल्ली आहे. चौर्याचे शेकडो प्रकार आहेत. लोकांना त्याची माहिती होऊन ते सावध झाल्यावर ते बदलावे लागतात. त्यावर संशोधन करावे लागते, नवीन आयडिया शोधाव्या लागतात, चुका सुधाराव्या लागतात.



चौर्यकला आणि त्यासाठी लागणारी गुन्हेगारी मानसिकता रक्तात असावी लागते. अगदी गर्भश्रीमंतांच्या बायका-मुलीही हॉटेल, मॉलमधील माल लंपास करतात, श्रीमंत एक दुसऱ्यांना टोप्या घालतात, बिले चुकवतात. पण चोरीचे आकर्षण अल्पवयीन मुलांना सर्वात जास्त असते. आपल्याला हवी ती वस्तू मिळवण्यासाठी ती धोका पत्करायला तयार असतात. या तरुणांना शिक्षणाचे बिलकूल आकर्षण नसते. त्यांना सहसा कुणी विश्वासपात्र  नोकरीवरही ठेवत नाही. यातील किती लोक इमानदारीत धंदा करून पोट भरणार? यांनी जर गुन्हेगारी सोडली तर अर्धेअधिक लोक उपाशी मरतील! भरल्यापोटी तुम्हाला बोलायला काय होते? पोटातील आग विझवायला बाहेरचा कुणीही येत नाही. ती स्वत:लाच विझवावी लागते. सध्या शिक्षण, घरचे संस्कार, पोलिसांचा धाक आणि नवीन महत्त्वाचे म्हणजे पकडले गेल्यावर होणारी घरच्यांची बेइज्जती. वर पब्लिकचा मार आणि होणारी शिक्षा! त्यामुळे या वाटेला जाण्यास सहसा कुणी धजावत नाही. मात्र पहिली चोरी पचल्यास तो निर्ढावतो. त्याचे मन त्याला कधीही स्वस्थ बसू देत नाही. प्रत्येक नवखा चोर आपल्या एरियातच, साधारण ओळखीपाळखीच्या लोकांमध्येच आपल्या धंद्याचा श्रीगणेशा करतो. कारण ओळखीचे लोक थोडीफार तरी दयामाया दाखवतात. गुन्हेगारी विश्वात आणि जेलमध्ये त्यांना इज्जत नसते. यातील काही लोक पुढे पोलिसांचे खबरी होतात. मुंबईच्या रस्त्यावर घडणाऱ्या गुन्ह्यांची यांना खडान्‌खडा माहिती असते. प्रत्येक चोराची स्वत: जोपासलेली शैली, पोलिसी भाषेत- गुन्हापद्धती असते. सहसा तो त्यात बदल करत नाही. खिसेकापूचे सर्व कौशल्य तर्जनी आणि मध्यमा या दोन बोटांत दडलेले असते. तो या दोन बोटांचा कात्रीसारखा किंवा चिमट्यासारखा वापर करतो. अनुभवी पोलिस हाताची नुसती बोटे पाहून खिसेकापू ओळखतात. कारण त्यांच्या तर्जनीला ब्लेड मारून मारून चिरा पडलेल्या असतात. घड्याळचोर गर्दीत हस्तांदोलन करताना हाताचा पंजा घड्याळावर ठेवून, अंगठ्याने बेल्टचा पट्टा हळूच सरकावतात. पाहणाऱ्याला वाटते, तो दोन्ही हातांनी हस्तांदोलन करत आहे. वरच्या खिशात ठेवलेले पैसे मागून येऊन उडवता येत नाहीत म्हणून चोर समोरून येऊन तुम्हाला उजव्या खांद्याचा धक्का मारतो व डाव्या हाताची बोटे काखेखालून घालून वरच्या खिशातील रक्कम लांबवतो. उजव्या हाताचा धक्का लागल्याने आपले उजव्या हाताकडेच लक्ष असते. कारमध्ये, मागे बसलेल्या माणसाची बॅग लांबवताना चोराचा साथीदार सायकल अथवा स्कूटरवरून समोरून येतो व कारच्या उजव्या बाजूला धडक देतो. तिथे लगेच वादावादी, भांडण, मारामारी चालू होते. मागे बसलेल्या माणसाचे, इतकेच नाही - तर पब्लिकचेही तिथेच लक्ष असते. या संधीचा फायदा घेत खरा चोर डाव्या बाजूच्या खिडकीत हात घालून हळूच बॅग लांबवतो आणि हळूच चालत चालत आसपासच्या बिल्डिंगमध्ये, दुकानात दिसेनासा होतो. जादुगर जसे एकमेकांचे जादूचे प्रयोग पाहून शिकतात तसे हे चोर रिमांड

होममध्ये, जेलमध्ये दुसऱ्या चोरांकडून धंदेवाईक शिक्षण घेतात. यासाठी त्यांनाही पैसे मोजावे लागतात. जेलमध्ये गुरूची सेवा करावी लागते. आजकाल चोरही संघटित झाले आहेत. त्यांनी एरिया आपसांत वाटून घेतल्या आहेत. एखाद्या केसमध्ये तशी गरज भासल्यास ते चोरलेला माल, पाकिट, कागदपत्रे, बॅग, दागिने आदी वस्तू मूळ मालकाला परतही करतात. घसघशीत रक्कम हाती लागली तर त्या प्रमाणात दिलदारपणे अन्नदानही करतात!

चोरी झाल्यावर पश्चात्ताप करत बसण्यापेक्षा ती होऊ नये म्हणून काळजी घेऊन सावधगिरी बाळगणे केव्हाही श्रेयस्कर असते. पोलिसात तक्रार केल्यावर, तुमच्याच सहकार्याने पोलिस अनेक वेळा चोर पकडतात. मुद्देमालही हस्तगत करतात, परंतु चोरीला गेलेली कॅश कधीच परत मिळत नाही, कारण त्यावर कुणाचेच नाव नसते. तेव्हा इतर सामान्यज्ञानासारखेच चोरांच्या कार्यप्रणालीचेही ज्ञान असणे, आजच्या काळाची व्यावहारिक गरज आहे असे मला वाटते. पोलिस खाते वेळोवेळी समाजजागृतीचे कार्यक्रम हाती घेत असते, सुरक्षिततेचे कार्यक्रमही राबवत असते. परंतु ठेच लागल्याशिवाय लक्ष द्यायचे नाही, या मनोवृत्तीमुळे बहुतेक त्याकडे दुर्लक्ष करतात. परंतु पुढील उदाहरणे, घटना, अनुभव पुरेसे बोलके आहेत असे मला वाटते.

ट्रॅफिक सिग्नलला सायंकाळी गाडी उभे असते. ट्रॅफिक जाम असतो. रस्त्यावर माणसांचीही गर्दी असते. ड्रायव्हरचे लक्ष सिग्नलकडे असते. पिवळा सिग्नल पडताच, गाडीच्या डाव्या बाजूला उभा असलेला तरुण खिडकीतून हात घालून, डॅश बोर्डवर ठेवलेला तुमचा मोबाइल लांबवतो. तुम्हाला फक्त खिडकीतून आलेला हात दिसतो. डोळ्यांसमोर गुन्हा घडूनही सिग्नल चालू असल्याने तुम्ही गाडीबाहेर येऊ शकत नाही, की ओरडूही शकत नाही. तात्पर्य, सिग्नलला गाडी उभी असताना खिडकीच्या काचा बंद ठेवणे. कुठल्यातरी गल्लीत गाडी पार्क करून आपण जवळपास कामाला जातो. परत येऊन, गाडी स्टार्ट करून रिव्हर्स (मागे) घ्यायला जातो, तेव्हा लक्षात येते. मागच्या विंड ग्लासवर कुणीतरी मोठे पोस्टर (कसली तरी जाहिरात) चिकटवून ठेवले आहे. ते काढल्याशिवाय मागचे काहीच दिसणार नाही म्हणून तो कागद काढायला आपण मागे जातो. त्या एका क्षणात पुढच्या सीटवर ठेवलेला आपला मोबाइल, लॅपटॉप, बॅग काहीतरी गायब झालेले असते. मागे कागद चिकटवणाऱ्यानेच हा प्रताप केलेला असतो.

रस्त्यावर चोऽऽर चोऽऽर म्हणून लोक धावत असतात. रेससारखे अगदी पुढे दोन-चार लोक, मागे जमाव असतो. पाहणाऱ्याला यातील चोर नक्की कोण आहे, हे कधीच कळत नसते; कारण स्वत: चोरही बोट पुढे दाखवत चोऽऽर चोऽऽर ओरडत पुढे पळत असतो. जशी नवीन अत्याधुनिक फॅशन प्रथम मुंबईत येते, तसेच गुन्ह्याचे नवीन प्रकारही मुंबईच्या रस्त्यावरच पाहायला मिळतात.

मात्र या सर्व चोरांची पंढरी म्हणजे मुंबईतील चोरबाजार! येथील प्रत्येक लहानमोठा चोर या बाजाराची वारी करत असतो. इथे देशीविदेशी गाड्यांपासून छोट्यात छोट्या घड्याळांपर्यंत सर्व चोरीचा माल विकत घेतला जातो. क्वीन व्हिक्टोरियाचे व्हायोलिन, मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांचे कपडे, अभिनेता राजकुमारचे रत्नजडित घड्याळ, मध्यप्रदेशमधील मंदिरातील मूर्ती हा सारा माल या चोरबाजारातच विकण्यात आला होता. साध्या वेशातील पोलिसांची इथे पाळत असते.

पंचाऐंशी वर्षांच्या अलीभाईशी दोस्ती करून येथील अर्थपूर्ण व्यवहारही मी समजून घेतले होते. येथील मोठे व्यापारी आणि स्थायी स्वरूपाचे दुकानदार सहसा चोरीचा माल घेत नाहीत. छोट्या टपरीत दुकान चालवणारे, ओट्यावर बसणारे व्यापारीच चोरीचा माल विकत घेतात. तोही ओळखीच्या, नेहमीच्या चोरांकडूनच! परगावच्या चोरांना इथे कुणी सहसा जवळ करत नाही. कारण पकडले गेल्यास, त्या गावी अथवा शहरात खेटे घालायला यांना वेळ नसतो. स्थानिक पोलिसांचे मात्र यांच्याशी सलोख्याचे संबंध असतात. हे आपल्या दोन नंबरच्या धंद्याचा हप्ता तर देतातच. याशिवाय मोठ्या गुन्ह्यात पोलिसांना आरोपींची खबरही हेच लोक देतात. एखाद्या केसमध्ये, प्रॉपर्टी रिकव्हर होत नसेल तर दिलदारपणे आपल्याकडचा तसाच दुसरा मालही काढून देतात. 'तुम्ही चोर आणि चोरीचा माल कसा ओळखता?' यावर अलीभाई हसत म्हणाले, 'उसकी शकलसे! पुलिस चोर को ढूंढती है और चोर पुलिस को! वो तुमसे सीधी नजर कभी नही मिलाएगा। उसका ध्यान रास्ते पर रहेगा। जादातर चोर यहाँ चरस का दम लगाकरही आते है। जिनका जमीर जिंदा है वो गम करता है और नशेमें गम भुलाता है। चोर जो भी मिला उसीमें खुशी मानकर वहाँ से जल्दी खिसक जाएगा। लेकिन कभी कभी इस धंदे में लेने के देने भी पडते है। इससे लम्बा रहना ही बेहतर है।'

गिरगाव सोडून अनेक वर्षे झाली होती आणि त्यावेळी मी गेट वेच्या 'ताजमहल'मध्ये नोकरी करत होतो. ३१ डिसेंबर १९७४ चा दिवस होता. रात्रीचे दहा वाजत होते. मी सिगारेट घ्यायला खाली रस्त्यावर आलो होतो. नवीन वर्षाच्या स्वागतासाठी तेथील रस्त्यांवर प्रचंड गर्दीत जल्लोष चालू होता. मी तो नजारा पाहत असतानाच, कुणीतरी माझ्या खांद्यावर हळूच हात ठेवला. तो अशोकच होता. मला ओढत तो तेथील सार्वजनिक प्रसाधनगृहात घेऊन गेला व कानात पुटपुटला, ''यार, आज तू मला अगदी देवासारखा भेटलास! माझं एक छोटंसं काम कर. माझ्याकडे सहा पाकिटं आहेत. आतले पैसेही

मी मोजले नाहीत. ती आज रात्रीपुरती तुझ्याकडे ठेव. धंद्याचा टाइम आहे, अजून अकराही वाजले नाहीत. फुकट पकडला गेलो तर आहे तोही माल जायचा. प्लीज, नाही म्हणू नकोस. पाहिजे तर यातील सर्वांत जाडजूड पाकिट स्वत:ला घे. हे माझ्याकडून नवीन वर्षाचं बक्षीस!''

त्याचे हे बोलणे ऐकून खरं तर मी नखशिखान्त हादरलो होतो. घशाला कोरड पडली होती. तरीही उसने अवसान आणून मी त्याला निक्षून सांगितले, ''अशोक, नाही! मला भलतं साहस करायला लावून नकोस. मी या लाइनचा नाही हे तुलाही माहीत आहे. मिळालं आहे एवढं खूप झालं. तू आता सरळ घरी जा.'' पण तो ऐकायला तयार नव्हता. त्याच्या दृष्टीने असा मौका परत येणार नव्हता. त्याने सर्व प्रकारचे प्रेशर टाकले. शेवटी मी ऐकत नाही हे समजल्यावर मला शिव्या घालत, तणतणत तो निघून गेला. मीही मग हॉटेलमध्ये कामाला लागलो.

रात्री दीडचा सुमार होता. खाली रस्त्यावर आरडाओरडा ऐकू येऊ लागल्यामुळे हॉटेलच्या बॉलरूमच्या खिडकीतून मी खाली पाहिले. पोलिस एका चोराला रस्त्यावरून बडवत घेऊन चालले होते. हो! आणि तो अशोकच होता. माझे कामात लक्ष नव्हते. राहून राहून मनात अशोकचेच विचार येत होते. त्यानंतर काही वर्षांनी गिरणगावात गेलो असताना कळले, की अशोकचे जेलमध्येच निधन झाले होते. क्षणभर मी अस्वस्थ झालो. पोलिसांनी त्याच्या पायाच्या घोट्याच्या शिरा कापल्या होत्या म्हणे!

आयुष्याला वेगळे वळण देणारा प्रसंग त्या दिवशी अचानक उद्‌भवला होता, पण देवानेच मला त्यातून तारले होते. त्या दिवशी मी जे केले ते बरोबरच होते. नाहीतर असंगाशी संग केल्याचे कटू फळ मला चाखायला मिळाले असते. अशोकपासून मी दूर राहिलो, कारण तो ज्ञात चोर होता.

मी स्वत:च पुराणिक असल्याने चोरी या विषयावरील पुराणातील दाखलेही पाहिले आणि त्यात मनोरंजक माहिती मिळाली. पहिली जागतिक चोरी शंखासुराने केली. त्याने ब्रह्मदेवाचे चार वेद चोरले. विष्णूने मत्स्यावतार धारण करून ते परत मिळवले. हिराण्यक्ष दैत्याने तर पृथ्वीच चोरून नेली होती. विष्णूने परत वराह अवतार घेऊन ती परत आणली होती. त्रैलोक्याचा राजा इंद्र, त्यानेही हिरण्यकश्यपूच्या भार्येला पळवून नेले होते, (म्हणजे सुंदर स्त्रियांची पळवापळवी पुराणकाळापासून चालू आहे) नारदाने तिला परत आणली.

श्रीकृष्णाला पूर्ण पुरुष मानले जाते. त्याला चौसष्ट कला अवगत होत्या. मजा म्हणजे चौर्य ही सुद्धा चौसष्ट कलांपैकी एक महत्त्वाची कला आहे. श्रीकृष्ण दही-दूध-लोण्याची आणि झाडावर वाळत घातलेल्या गोपींच्या वस्त्रांची चोरी करत असे. त्याला 'माखनचोर', 'नवनीत चोर' आणि 'दुकूल' (वस्त्रचोर) असेही म्हटले आहे. आजच्या कलियुगात चाळीत, गच्चीवर, गॅलरीतील कठड्यावर वाळत घातलेले कपडे चोरणारे महाभाग आहेत. काही धोबीही मोजण्यात गल्लत करून कपडे चोरतात आणि मजा म्हणजे, असे चोरीचे कपडे विकत घेणारा 'चिंधी बाजार'ही चोरबाजारात आहे.

मृच्छकटिक नाटकात तर शर्विलकाचा एक प्रवेश आहे. तो चारुदत्ताच्या घरी भिंतीला भोक पाडून चोरी करतो. यासाठी तो कार्तिकेयाची प्रार्थना करत, चोरीचा उपयुक्त मंत्र म्हणतो,

'नमो वरदाय कुमार कार्तिकेय<br>
नम: कनक शक्तये ब्रह्मणाय'

राजा विक्रमादित्य हा चौर्यशास्त्रातला चांगला जाणकार पंडित होता. मूळदेव याने चौर्यकलेवरचा पहिला ग्रंथ लिहिलेला आहे. पूर्वाश्रमीचा तो गाजलेला चोर होता. ब्रॉम फिल्ड या अमेरिकन ग्रंथकाराने संस्कृत साहित्यातील चोरांच्या सर्व कथा संकलित केल्या आहेत. त्यामध्ये 'चोरीचा गुन्हा नाकबूल करणे' हे चौर्यशास्त्रातील पहिले तत्त्व सांगितलेले आहे.

चोर हा प्राचीन काळापासून समाजजीवनाचा अविभाज्य घटक आहे. जिथे एकापेक्षा जास्त माणसे आहेत तिथे चोरीही आहे. या विषयावर चाळीसपेक्षा जास्त वाक्‌प्रचार, म्हणी आहेत. त्यातील काही वाक्‌प्रचार असे-

'चोराला डसला विंचू तो करी ना हूं का चूं'<br>
'चोराला मलिदा धन्याला धत्तुरा'<br>
'चोरावर मोर आणि सरकारला घोर'<br>
'चोराची लंगोटी'<br>
'चोरीचा माल चोरीस गेला तर हाक ना बोंब'

खरेच, तसे पाहिले तर दुसऱ्याच्या मालकीची कोणतीही गोष्ट त्याच्या पूर्वपरवानगीशिवाय घेणे किंवा वापरणे, ही सुद्धा एक चोरीच आहे आणि हे प्रकार सर्रास आणि सर्वांकडूनच घडतात. चोरून पाहणे, ऐकणे, खाणे आणि स्पर्श करणे याही लौकिक अर्थाने एक प्रकारच्या चोऱ्याच आहेत; म्हणूनच भाईभाई चित्रपटात किशोरकुमारची-एका चोराची-प्रेयसी निम्मी त्याला म्हणते,

'इस दुनिया में सब चोर चोर<br>
कोई पैसा चोर, कोई मुर्गी चोर'.

**- अरुण पुराणिक**<br>
इ-१०३, महेश्वरीनगर, एमआयडीसी,<br>
अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३<br>
vgpuranik@gmail.com


हार्दिक शुभेच्छा
आकर्षक व्याज दरासहित विविध कर्ज योजना
स्वप्नपूर्ती गृह कर्ज
घर खरेदीसाठी रु.५० लाखापर्यंत
१५ वर्षाकरिता कर्ज
मनोरथ वाहन कर्ज
वाहन खरेदीसाठी
१०० % कर्ज
ज्ञानवर्धिनी शैक्षणिक कर्ज
देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी कर्ज - रु. १० लाखापर्यंत
परदेशातील उच्च शिक्षणासाठी कर्ज - रु. २० लाखापर्यंत
व्यापार आणि उद्योग धंद्यासाठी सुलभ कर्ज
रु. ६ कोटीपर्यंत
शिवाय
ए.टी.एम.सेवा, मुद्रांक सेवा, परकीय चलन विषयक सेवा,
RTGS सुविधा व कोअर बँकिंग प्रणालीचे सहाय्याने व्यक्तिगत सेवा.
ठाणे भारत सहकारी बँक लि.
शेड्यूल्ड बँक
सहयोग मंदिर, सहयोग मंदिर पथ, घंटाळी, ठाणे - ४००६०२. फोन नं. २५४४ ७८१६ / २५४० ८०७६
मुख्य शाखा : शततारका, बाजी प्रभू देशपांडे मार्ग, ठाणे. फोन नं. २५४२ ९४३२ / ३३
ठाणे
ठाणे पूर्व / पोखरण / चंदनवाडी / चेंदणी कोळीवाडा / श्रीनगर / शिवाईनगर / ऋतुपार्क / घोडबंदर रोड / लोकमान्य नगर
कल्याण
डोंबिवली
मुलुंड
घाटकोपर
विस्तारित कक्ष, घाटकोपर (पश्चिम) आणि ऐरोली
*अटी लागू

# पायल

डॉ. माधवी
मेहेंदळे

गरम फुलके करून वाढत होते. मुलगी जेवायला बसली होती. स्वयंपाकाशी माझा फारसा जवळचा संबंध नाही. त्यामुळे अशा घटना आम्ही सगळेच कौतुकाने हृदयाशी कुरवाळून ठेवतो.

दरवेळेस फुलके करताना, हृदयात कुठेतरी बारीकशी कळ उठते. काहीतरी टोचतं. मी त्याकडे दुर्लक्ष करायचा प्रयत्न करते. पण सारखा आठवत राहतो, नेहमीच्या आकारापेक्षा थोडासा मोठा, पिवळा, जाड प्लास्टिकचा एक लंचबॉक्स.

नुकतंच माझं लग्न झालं होतं. सासर नवीन, सासरची माणसं नवीन. गाव नवीन– पुणं! आता विचार केल्यावर वाटतं, कसं काय आपण निमूटपणे करतो हे! सरळ एका जागेतून, एका कुटुंबातून, एका वातावरणातून उच्चाटन करून दुसऱ्या जागेत... अमानुषच वाटतं. पण आपल्याकडे पिढ्यान्पिढ्या सरसकट हे चालू आहे, चालू राहणार आहे.

नवीन गावी, नवीन हॉस्पिटलमध्ये इंटर्नशीपसाठी रुजू झाले. कुणालाच ओळखत नव्हते. तिथे तुझी–माझी पहिली भेट– पायल! तुझीही त्याच हॉस्पिटलमध्ये इंटर्नशीप सुरू होती. आपलं एकाच डिपार्टमेंटला पोस्टिंग झालं होतं.

मी नागपूरहून एम्.बी.बी.एस. केलेलं म्हणजे तसं पुण्याच्या लोकांच्या नजरेतून थोड्या लहान, खेडवळ गावातून आलेली मी. जरा बावळट! तू पुण्याच्या बी.जे. मेडिकलमधून एम्.बी.बी.एस. झालेली. तुझे वडील पुण्याच्या एका नामांकित शिक्षणसंस्थेचे संस्थापक.

मी लग्न झालेली. सासरी राहणारी, बंधनात. तू मुक्त! आधुनिक शहरातली, आधुनिक कॉलेजमध्ये शिकलेली, उच्चपदस्थ बापाची आधुनिक मुलगी.

तुझ्या आधुनिक पेहरावाचं मला तेव्हा अप्रूप वाटायचं. मला जे जे व्हावंसं वाटत होतं, जे जे हवंहवंसं वाटत होतं, ते सगळं तुझ्यात होतं.

सिनेमात कसा मोठा बंगला दाखवतात. आलिशान फर्निचर असलेला आलिशान हॉल. त्यात सुंदर मूर्ती, सगळीकडे झुंबरं. आत शिरल्या शिरल्या एक छान, नक्षीदार जिना झोकात वळण घेत वरच्या मजल्यावर जाताना दिसतो. हॉलमध्ये खांद्यावर लाल फडकं टाकलेला रामागडी, काय हवं–नको ते विचारायला हजर असतो. स्वयंपाकघरात नोकरांची एक वेगळी फळी कामाला असते. भिंतीवर सगळीकडे छानशी पेंटिंग्ज व पूर्वजांच्या तसबिरी – पिढीजात गर्भश्रीमंतीचा इतिहास सांगणाऱ्या. बंगल्याला लागून आणि पुढच्या छानदार बगिच्याच्या आत नक्षीदार खांबांचं एक पोर्च. त्यात एक लांब, पांढरी विदेशी गाडी, युनिफॉर्ममधल्या ड्रायव्हरसकट हजर असते.

हे सगळं बघताना हे आपलं नाही किंवा हे कधीच आपलं नसणार याची जाणीव असते. त्याचं काही दुःख वाटत नाही पण कल्पनाविलासासाठी ते छान वाटतं.

तू माझ्यासाठी तो सिनेमातला आलिशान बंगला होतीस, ज्याच्याकडे बघायला मला छान वाटायचं. तू माझ्याशी अगदी सहज मैत्री केलीस. तुझ्या–माझ्या संस्कृतीतलं अंतर तुझ्या गावीही नव्हतं.

तुझ्यामुळे मला त्या सिनेमातल्या काल्पनिक बंगल्यात फेरफटका मारायला मिळू लागला.

एकविसाव्या वर्षी, जरीच्या लाल साडीत गुंडाळून आईबाबांनी नातेवाईक – जिवलग मैत्रिणींमधून उचलून मला

दुसऱ्या गावी आणून सोडलं होतं.

अशावेळी चक्क एक मैत्रीण असणं– तीही तुझ्यासारखी– म्हणजे फारच मोठा आधार होता.

आपण हॉस्पिटलमध्ये एकत्र फिरायचो. सर्जरीच्या सरांच्या टेबलपुढे ते सांगतील तसं प्रिस्क्रिप्शन खाली मान घालून लिहायचो अन् पेशंटला द्यायचो.

नंतर आपल्या दोघींतला तो चर्चेचा कायम विषय असायचा, की हे आपले 'सर' लोक आपापले प्रिस्क्रिप्शन स्वत: का लिहीत नाहीत? एवढं काय जातं यांचं!

आता मीही सीनियर झाले आणि मलाही माझं प्रिस्क्रिप्शन लिहायचा थोडा थोडा कंटाळा येऊ लागला आहे. शिवाय सीनियर डॉक्टर्सची प्रिस्क्रिप्शन्स लिहिताना ज्युनियर डॉक्टरांची औषधाविषयी माहिती वाढते. त्यांना नावं माहिती होऊ लागतात, असं लक्षात आलं.

आता तर तुला माहिती आहे ना, की सगळं काही सॉफ्टवेअरमध्येच असतं. औषधांच्या नावांसकट. फक्त क्लिक करायचं. मग आपोआप प्रिंट होतं. तेव्हा प्रिस्क्रिप्शन लिहिताना टेबलशी बसून केलेल्या आपल्यासारख्या गमतीजमती, सरांची टिंगल, अवघड-माहिती नसलेल्या औषधांची नावं, स्पेलिंग लिहिताना झालेली तारांबळ, नंतर ती आठवून पोट धरधरून हसणं; हे सगळं आताच्या नवीन डॉक्टर्सना ठाऊकच नसावं.

पण आता हे सगळं सांगायला तू कुठे आहेस पायल?

उंच होतीस – तरी उंच टाचांचे फॅशनेबल सँडल्स घालून आणखी उंच व्हायचीस. त्यात डोक्यावर नारदमुनीसारखा बुचडा बांधायचीस. त्यानेही उंचीत भरच पडायची. हॉस्पिटलच्या लांबच्या लांब कॉरिडॉरमधून चालताना, मध्येच कधीतरी तुझे ते टोकदार सँडल्स घालायची मला हुक्की यायची. मी डगमग डगमग तोल कसाबसा सावरत, ते निमुळत्या टाचांचे सँडल्स घालून न पडता चालायचा प्रयत्न करायची. माझी त्रेधातिरपीट बघून तुला हसू आवरायचं नाही. हॉस्पिटलचका कॉरिडॉर तुझ्या हसण्याच्या गडगडाटाने भरून जायचा. मी फुरंगटून तशीच हट्टाने पुढे चालत राहायची. मागून धावत येऊन तू मला धरायचीस.

तुझ्या मोकळ्याढाकळ्या पंजाबी वागण्याला साजेसं तुझं मोकळं, खळखळून हसणं असायचं, दोन्ही गालांना उभ्या खळ्या पाडत.

मी आपली सासरच्या अनोळखी वातावरणाच्या आणि मंगळागौर, सक्रांत अशा सणांच्या पार्श्वभूमीवर माझी इंटर्नशीप करत होते. तुला त्याची खूप मजा वाटायची.

हॉस्पिटलशेजारी सिनेमा थिएटर होतं. सर्जरीचे सर आपण फार सिन्सिअरली काम करताना दिसलो, की आपल्याला रागवायचे. आपल्याला सिनेमा बघायला पिटाळायचे. आल्यावर त्यांना सिनेमाची स्टोरी सांगावी लागायची.

कँटिनमध्ये गेल्यावर हॉस्पिटलमध्ये असा संकेत असायचा, की बिल सगळ्यांत सीनियर माणसाने द्यायचे. त्यामुळे आपण दोघी चतुराईने सरांच्या जायच्या-यायच्या वाटेवर उभ्या राहायचो व त्यांना गाठून कँटीनमध्ये घेऊन जायचो.

खरं तर तुला सांगायचं होतं, की बऱ्याच वर्षांनंतर त्या सरांची आठवण आली तेव्हा मी सहज एकदा त्यांना भेटायला गेले. सरांच्या हॉस्पिटलच्या भल्यामोठ्या वेटिंग हॉलमध्ये, सर एका कोपऱ्यात छोट्या स्टुलावर बसले होते. खाली मान घालून, हातात मेंडोलिन होतं. सूर उमटत होते आणि सारा आसमंत त्या सुरांनी भरला होता– भारला होता. मीसुद्धा एका कोपऱ्यात निश्चल उभी होते. माझ्यावरही त्या सुरांचा अंमल चढला होता तेव्हा. नकळत माझा हात बाजूला गेला, तुझा हात धरण्यासाठी– ती शांतता, ती सुरांची जादू आपल्या नेहमीच्या सरांकडून ऐकताना तुझा सहभाग आवश्यकच होता, नाही का? आणि मधली सगळी वर्षं नाहीशी होऊन तू बाजूला हात धरण्यासाठी उभी असशील असं माझ्या मनाने गृहीत धरलं. भिंतीशी टेकून चाचपडताना कळलं, तू तिथे नाहीस ते. सुरांमुळे की कशामुळे; त्या मधल्या वर्षांची जरा गफलतच झाली.

तेव्हा वॉर्डमध्ये एक भाजलेली पेशंट ॲडमिट होती. खूप छान दिसणारी, मोठ्या टपोऱ्या डोळ्यांची, नुकतंच लग्न झालेली तरुण मुलगी होती.

ती का भाजलेली असेल याबद्दल आपण कधी चर्चा केली नाही. पण या, अशा कित्येक नुकतंच लग्न झालेल्या मुली भाजून कुठे कुठे सर्जरीच्या – बर्न वॉर्डमध्ये ॲडमिट होत असतील – माझंही नुकतंच लग्न झालेलं – तुझं पुढेमागे होणार.

तुझ्या नजरेतच मला ते सगळे प्रश्न दिसायचे. पुढील अनिश्चिततेबद्दलची साशंकता दिसायची. आपल्या दोघींतला तो मूकसंवाद आपल्यालाच कळायचा.

एकदा त्या टपोऱ्या डोळ्यांच्या मुलीने तिच्या मच्छरदाणीचा पडदा वर करून मला बोलावलं. मी तिला काहीतरी सांगितलं आणि पुढच्याच क्षणी तिचे टपोरे डोळे निस्तेज झाले. माझ्या डोळ्यांसमोर घडलेलं ते पहिलं मरण. डॉक्टर असल्यामुळे ते झेलावं लागलं, पण झेलताना झालेला त्रास – तू माझा हात कितीतरी वेळ घट्ट धरून ठेवलास– त्यामुळे थोडा हलका झाला.

रोज आपण एकत्र डबा खायचो. तुझा तो नेहमीच्या चपट्या लंचबॉक्सपेक्षा थोडासा मोठा, पिवळ्या रंगाच्या जाड प्लास्टिकचा लंचबॉक्स मला आठवतो. त्यात मऊ कापडात गुंडाळलेले पातळ फुलके असायचे आणि पंजाबी चवीची भाजी– मला आवडणारी.

मी पण पोळीभाजी घेऊन यायची. पण माहेर-सासर यांच्यात चवीचा खूपच फरक असायचा. संकोचामुळे मी सासरी काय बोलणार! मेडिकलला शिकत असताना आईने पाठवलेला पाचखणांचा डबा मधल्या सुटीत डबेवाला घेऊन यायचा. त्यात चटणी, कोशिंबीर बरोबर गूळतूप - तूपसाखर असले लाडही असायचे.

वांग्यांची भाजी म्हणजे माझी अगदी नावडती. मला तिच्याकडे बघवायचंही नाही. त्यामुळे डब्यात फक्त वांग्याची भाजी व पोळी खायची म्हणजे धर्मसंकट. तेव्हा तुझा तो पिवळा डबा मला तारून न्यायचा.

कधी कधी आपण लंचटाइममध्ये तुझ्या घरी जायचो. हॉस्पिटलजवळच्या एका श्रीमंत सोसायटीत तुमचा फ्लॅट होता.

फ्लॅटचं दार किल्लीने उघडून आत शिरलं, की डावीकडे नोकराची एक छोटीशी खाली होती. बंगल्याला नोकरांसाठी आउटहाउस ऐकलेलं-पाहिलेलं होतं पण फ्लॅटमध्येही; मला आश्चर्यच वाटलं होतं.

पंजाबी पद्धतीप्रमाणे तू चटकन लस्सी तयार करायचीस. फ्रिजमध्ये ठेवलेली कणीक बाहेर काढून त्याचे छोटे छोटे, पुरीसारखे टम्म फुगलेले गरम फुलके तू करून मला वाढायचीस.

आता मुलीच्या पानात वाढत असलेल्या प्रत्येक फुगलेल्या फुलक्यात मला तुझा मोठाल्या, उभ्या खळ्या पाडून हसणारा चेहरा दिसतो आणि कळ उठते हृदयात.

सर्जरीचे सर एका नवीन औषधाची ट्रायल घेत होते. आपण दोघी त्यांना त्यात मदत करायचो. एकदा रात्री एका पेशंटचं ब्लडप्रेशर अचानक खाली जायला लागलं. आपल्या आवाक्यात होतं ते आपलं करून झालं. तरी ब्लडप्रेशर वर येईना. मग सरांना फोन केला. ते पलीकडून ट्रीटमेंट सांगत होते. तू ते ऐकून मला सांगत होतील. मी तसतसे औषधोपचार करत होते; म्हणजे सर - मग तू-मग मी अशी आपली साखळी झाली होती. ब्लडप्रेशर वर यायला लागलं. पेशंट वाचला!


आपण दोघींनी एकमेकींना आनंदाने घट्ट मिठी मारली आणि कितीतरी वेळ तशाच होतो.

इंटर्नशीप सुरू असताना तुझ्या इतर वर्गमैत्रिणी भेटायच्या तेव्हा त्यांची ओळख तू मला करून द्यायचीस. त्यामुळे माझ्याही आता बऱ्याच ओळखी झाल्या होत्या. तुझी त्यातली एक मैत्रीण आपल्याबरोबर कधी कधी डबा खायची. माझ्या डब्यातली भाजी आवडीची नसली, की ती एक ट्रिक करायची. तिची व माझी भाजी मिसळून टाकायची. तुला हा असला प्रकार मुळीच आवडायचा नाही. तुझ्या नाकावर आठ्या यायच्या. आम्ही दोघी मग तुझ्या त्या आठ्यांना हसायचो. आपली ती मैत्रीण तेव्हा नुकतीच प्रेमात पडली होती. तिची ती प्रेमाच्या वाटेवरची वाटचाल आपण दोघी हरखून बघायचो. तिच्या प्रेमप्रकरणातलं काही आवडलं नाही, की पुन्हा तुझ्या नाकावर आठ्या असायच्या. 'पता नहीं क्या देखा उसमें-

TDH तो है ही नहीं - और बाकी भी कुछ नही...

TDH म्हणजे tall, dark, handsome असा नंतर तुझा खुलासा.

मध्येच एकदा तुला 'मराठी' शिकायची लहर आली. पुण्यामध्ये इतर लोक- म्हणजे जवळजवळ सगळेच- एवढं मराठी बोलायचे, की पहिल्यांदा तर मला आश्चर्यच वाटायचं.



नागपूरमध्ये दोन अनोळखी लोक एकमेकांशी हिंदी बोलतात. आम्ही फक्त घरात मराठी बोलायचो. घराबाहेर पडलं, की रिक्षावाला, दुकानदार या सर्वांशी हिंदीच बोलायचो. पण इथे हॉस्पिटलमध्ये दोन अमराठी डॉक्टर्ससुद्धा पेशंटबद्दल एकमेकांशी मराठीतच चर्चा करायचे.

मला गंमत व आश्चर्य वाटलं होतं, की एवढ्या मराठमोळ्या वातावरणात राहून तू एवढी 'अमराठी' कशी काय राहिलीस किंवा टिकली होतीस.

आजही माझ्या अमराठी पेशंटशी मी हिंदीतून बोलायला लागले, की ते लगेच 'डॉक्टर, आप पूना के नहीं हो ना?' असं लगेच विचारतात.

तुला मराठी शिकवताना आपण दोघीही खिदळायचो. तुझे ते पंजाबी ढंगातले मराठी उच्चार ऐकून माझी हसून पुरेवाट व्हायची.

मी तुला मराठी शिकवताना हॉस्पिटलमधले इतर लोक ऐकायला लागले. मग त्यांच्याशी माझे नागपुरी मराठी विरुद्ध पुणेरी मराठी असे वाद सुरू व्हायला लागते. तुला हा काय गोंधळ आहे हे कळेना. 'तू ठीक से तो सिखा रही है ना – मुझे?' तेव्हा तू मला दटावलं होतंस. आपली ही शिकवणी फार काळ काही चालली नाही.

मध्येच मी गाडी (चारचाकी) शिकण्याचा क्लास लावला. तेव्हा तुझ्या चेहऱ्यावरचा तो 'ही कशी काय गाडी चालवणार' हा भाव मला अजूनही आठवतो. गाडी चालवता आलीच पाहिजे असं मला वाटायचं. ती चैन नसून गरज आहे, अशी माझी खात्री होती. त्यामुळे मी शिकले. तू तर कधीच सराईतपणे गाडी चालवायला लागली होतीस. तुझ्या व्यक्तिमत्त्वाकडे बघून तेव्हा वाटायचं, कुठलीही गाडी तुझा हात लागला की नम्रपणे चालू लागत असेल.

मी सराईतपणे गाडी चालवायला लागेपर्यंत, आपण दोघीही आयुष्याच्या प्रवाहात वेगवेगळ्या वाहायला लागलो होतो.

आपण अगदी नवीन कामाला लागलो असताना एकदा वॉर्डात कुणाला तरी कसलंसं इंजेक्शन द्यायचं होतं. मला जरा भीतीच वाटत होती. आजूबाजूला कुणी सीनिअर नव्हते. किती डोस आहे–डोस जास्त तर होणार नाही ना?

तू आत्मविश्वासाने उठलीस. सिरिंज हातात घेतलीस. डिस्टिल वॉटरची ॲम्प्युल फोडलीस. ते पाणी सिरिंजमध्ये घेऊन इंजेक्शनच्या बल्बमध्ये टाकलंस. औषध चांगलं हलवून विरघळवलंस. परत सिरिंजमध्ये घेतलं आणि पेशंटला इंजेक्शन टोचून आलीस.

मी डोळे विस्फारून तुझ्या त्या हालचाली पाहत राहिले. आता मी इंजेक्शनच काय, कित्येक किचकट ऑपरेशन्स करते. पण तरीही तेव्हा आत्मविश्वासाने केलेल्या तुझ्या त्या हालचालींचं मला अजूनही नवल वाटतं.

'हं! त्यात काय एवढं', असा तुझ्या चेहऱ्यावरचा भाव अजूनही आठवतो.

इंटर्नशीपनंतर आपल्या वाटा जरा वेगवेगळ्या होऊ लागल्या. तू एम.डी.ला ॲडमिशन घेतलीस. मी दुसऱ्या विद्यापीठातून आलेली असल्याने मला ॲडमिशन मिळेना. मी चाचपडत होते. बरोबरीचे सगळे पुढे जात होते, मी मात्र होते तिथेच होते. तेव्हा कधीतरी आपण भेटायचो. तुझ्या स्वभावाप्रमाणे तू पुढे जात राहिलीस. नवीन लोकांमध्ये त्याच मोकळेपणाने, त्याच उत्साहाने सामावून गेलीस.

माझ्यासाठी तो काळ फारच कठीण होता. केवळ विचित्र नियमांमुळे मला भरपूर मार्क्स असूनही ॲडमिशन मिळत नव्हती. तू मला त्यात काय मदत करणार? तुझा मार्ग – निदान शिक्षणाचा–तू निवडला होतास.

तोपर्यंत मी धडपड करून, हायकोर्टात केस करून, माझ्यावर अन्याय झालाय हे सिद्ध करून एम.एस.ला ॲडमिशन मिळवली होती. माझी मुलगी तेव्हा काही महिन्यांची होती.

तुझं अजून लग्न व्हायचं होतं. आपल्या भेटी आता तुरळकच होत होत्या. एकदा भेटलीस तेव्हा घरच्यांवर जाम वैतागलेली होतीस. पुण्यात कुठल्यातरी मोटरसायकलची रेस होती. तेव्हा डॉक्टर म्हणून तुझी ड्युटी लागली आणि तू गेली होतीस. मग त्यांनी तुला रात्री पार्टीला बोलावलं. तिथे तुला जायचं होतं पण तुझी आई 'नाही' म्हणाली.

तुझ्या मुक्त स्वातंत्र्याला ते मानवत नव्हतं. 'मैं क्या अभी teenager हूँ – जो ये मुझपे ऐसे restrictions डाल रहे है?'

तेव्हा चोवीस–पंचविशीची होतीस. खरंच, आता या वयात आईवडिलांची बंधनं नसायला हवी होती. सोळा–सतराचं वय असतं तर वेगळी गोष्ट! मी कशीतरी समजूत काढली.

पुन्हा मध्ये बराच काळ आपण हरवलो. मी माझ्या करियरच्या– संसाराच्या– लहान मुलीच्या गुंत्यात पूर्ण अडकलेली. माझं गावाचं–सासरचं–चवीचं नवखेपणही कमी झालेलं...!

एकदा कुठल्याशा कार्यक्रमात तुझी आई भेटली. तिने तुझ्या लग्नाबद्दल चिंता व्यक्त केली. मी पण तिच्या चिंतेत सहभागी झाले. जगरहाटीप्रमाणे तुझं लग्न आता व्हायला हवं होतं. किती दिवस एकटी राहणार?

लगेच जरा वैतागून तुझा फोन आला– 'कैसी बाते कर रही थी, मेरी माँ के साथ.'

'अग हो, पण बरोबर आहे तिचं.' असं काहीसं चाचपडत माझं उत्तर.

खरं तर, का लग्न करत नाहीये? कुणाच्या प्रेमात पडली आहे का? काही वाईट अनुभव आले का? असे प्रश्नांवर प्रश्न माझ्या मनात उमटत होते. पण तुझ्या त्या वैतागापुढे मी गप्पच राहिले. माझे प्रश्न विचारायचे राहूनच गेले. क्वचित होणाऱ्या आपल्या भेटीमुळे व तशाच क्वचितच होणाऱ्या फोनमुळे मनातली अंतरं वाढत होती की काय? असं आता विचार केल्यावर वाटतं. पण तेव्हाचा जीवनाचा वेगच असा काही होता, की कुठे-कशाला उसंत अशी नव्हतीच. मग मात्र त्या वेगामध्ये आपण अगदीच हरवलो एकमेकींना. मध्ये किती काळ गेला माहीत नाही. काही हिशेबच नाही.

उडत उडत कानांवर आलं, की तुझं लग्न झालं अन् तू अमेरिकेला गेलीस. अमेरिकेतल्या धुक्याच्या पडद्याआड किती लोक हरवून जातात, तशी तूही हरवून गेलीस. पण मनात कुठंतरी चला, निदान तुला पार्टनर मिळाला म्हणून निश्चिंत वाटलं. लग्नाला बोलावलं का नाही - की खूप घाईत झालं की घरच्यांचा विरोध होता, हे सर्व प्रश्न माझ्याकडेच मला अनुत्तरित ठेवावे लागणार आहेत. कारण कोणाला विचारणार?

पण तिथे अमेरिकेत आपली डिग्री चालत नाही. बऱ्याचशा डॉक्टर मुली तिथे जाऊन आपल्या करियरला मुकतात. एवढी वर्षं परिश्रम करून मिळवलेली डिग्री वाया जाते. म्हणून असा कधीतरी विचार यायचा, की तू तिथे काय करियर करते आहेस, देव जाणे! इकडे माझे हॉस्पिटल-पेशंटस् हळूहळू वाढत होते.

तुला दोन मुलं असल्याचं कानांवर आलं. तुला ओळखणारं कुणी पेशंट म्हणून माझ्याकडे आलं, की तुझ्याबद्दलच्या बातम्या कानांवर यायच्या. मुलं झाल्यावर करियर करणं आणखीच कठीण असणार. त्यातून सासर-माहेरचा आधारही नाही, आपला काही संपर्कच नव्हता. सगळे नुसते तर्क.

मग अचानक कानांवर आलं, की तुझा नवरा अमेरिकेत मरण पावला. कसा काय, काहीच माहिती नाही. तुझ्यावर झालेल्या आघाताची मी नुसती कल्पनाच करू शकत होते. का कल्पनाही करू शकत नव्हते! कसं सांभाळलंस स्वत:ला? पुढे काय? मुलांची जबाबदारी! आर्थिक प्रश्न... कशाकशातून गेलीस.

तुझ्या हसऱ्या-मुक्त स्वभावाच्या हे सगळं विरुद्ध होतं. माझ्या कल्पनेतल्या आलिशान बंगल्यावर आता मरगळ आली होती. पण तुझा हात घट्ट धरून ठेवायला मी तुझ्या जगातच नव्हते. कसा धरणार?

मी पाहिलेल्या पहिल्या मरणाच्या वेळेस तू धरला होता खूप वेळ माझा हात! ते मरण तर तिऱ्हाईताचं होतं. आपल्या 'डॉक्टर' बनण्याच्या वाटेवरचं एक अपरिहार्य सत्य, पण इथे तुझ्याकडे तर...!

काळ-वेळेच्या झोक्यांमध्ये कधीतरी तुझी आठवण यायची. करण्यासारखं काहीच नव्हतं. तसं धडपड करून तुझ्या आईपर्यंत पोचले असते तर कदाचित तुझा पत्ता, फोन नं, इ-मेल मिळाला असता. का, ठाऊक नाही, पण मी असं काहीच केलं नाही.

ओळखीची एक पेशंट आली. तेव्हा ती म्हणाली, 'पायल गेली.'

माझ्या सर्व संवेदना जागच्याजागी थांबल्या. पायल गेली? तू अशी जाऊ शकतेस? हसऱ्या खळ्यांची, गडगडाट करून हसणारी, मुक्त-स्वच्छंद मुलगी? माझ्या मनातला आलिशान बंगला हळूहळू कोसळत होता.

नवरा गेल्यानंतर म्हणे लवकरच तुला कॅन्सर झाला. बरेच हाल झाले. जवळ कोणी नव्हतं. शेवटी शेवटी पुण्यातच होतीस. शेवटच्या स्टेजचे कॅन्सर पेशंटस् ठेवणाऱ्या कुठल्याशा युनिटमध्येच गेली.

आता मी कुणाचा हात धरू पायल? तुझी मुलं कुठे अन् कशी आहेत?

निष्क्रियतेची पुटं चढवलेल्या मला काही शक्य आहे का त्यांच्यासाठी करणं? माझ्या मनातल्या त्या आलिशान बंगल्याच्या काही विटा शाबूत ठेवण्यासाठी तरी! आणि तू निदान शेवटी तरी हाक का मारली नाहीस?

हे सगळे प्रश्न आता तसेच राहणार उत्तराशिवाय! इंटर्नशीप संपल्यावर हळूहळू हरवत जाणारी तू आता पूर्णच हरवलीस. मला माझ्या दुनियेत तसंच ठेवून.

पण आता मच्छरदाणीतून डोकावणाऱ्या त्या टपोऱ्या डोळ्यांच्या, भाजलेल्या मुलीच्या चेहऱ्याच्या जागी तुझा चेहरा दिसतो. तो नेहमीसारखा मोठाल्या खळ्या पाडून हसणारा आहे की नाही, हे मी नीट ठरवू शकत नाही.

कुठलाही जेवणाचा डबा पाहिला, की पिवळा प्लॅस्टिकचा लंचबॉक्स दिसत राहतो. फुलके करायला घेतले की हृदयात एक कळ उमटते.

काय करावं कळेनासं होतं. मग मी शोधत राहते घट्ट धरून ठेवायला आधारासाठी, तुझाच हात...

तू कुठे आहेस पायल...!!

**- डॉ. माधवी मेहेंदळे**

दूरध्वनी : (०२०) २५६७७५५५/२५६७६०५०

भ्रमणध्वनी : ९८९०९०४१२३

madhavimahendale@gmail.com

# संवादाचे सद्भान

डॉ. यशवंत
पाठक

महात्मा गांधींजीच्या सत्याग्रहात किंवा उपोषणात किंवा लॉंग मार्चमध्ये जनता सुसंस्कृत होती. ती विनाशापेक्षा आत्मक्लेष सहन करणारी होती. उपोषण हे हत्यार असे आहे, की ते कधी–केव्हा उलटेल ते सांगता येत नाही. अण्णांच्या पाठीशी असणाऱ्या गर्दीत संघटित विचारक्षमता असलेले आणि आचरणशुद्धता असलेले कितीजण होते? अण्णांच्या नैतिक उंचीला तितकेच नैतिक हात लाभले पाहिजेत.

लोकशाहीत सनदशीर मार्गाने विशिष्ट हक्क मिळण्यासाठी सत्याग्रह, उपोषण, मोर्चा, धरणे असे विविध मार्ग अवलंबिले जातात. यातून नागरिकांना न्याय मिळण्याची अपेक्षा असते. मुळात हे मार्ग पूर्वापार चालत आलेले आहेत. त्यातल्या त्यात उपोषण हा चित्तशुद्धीचा एक महत्त्वाचा मार्ग ऋषींनी सुचविलेला आहे. सामाजिक उपोषणाने समाजमनाची शुद्धी होते. त्यामुळे समाजाला नैतिक भान येते. हा विचार उपोषणाच्या पाठीशी आहे. महात्मा गांधीजींनी हा मार्ग स्वीकारला. गांधीजींची बैठक अध्यात्मावर आधारलेली होती. श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील अनासक्त कर्मयोग गाधींजींना प्रिय होता. मी समाजाचा विश्वस्त आहे, विश्वस्त या नात्याने मी माझे कार्य करीन, ही भावना मोलाची आहे. उपोषणातली उदात्त भावना समाजाला कळावी लागते. राजा दशरथाने श्रीरामांना काही दिवस राक्षसांचा नायनाट करण्यासाठी ऋषींच्या आश्रमात पाठवावे म्हणून विश्वामित्रांनी उपोषण केले. वसिष्ठ ऋषींनी नंदिनी नावाच्या कामधेनूसाठी विश्वामित्रांच्या आश्रमासमोर उपोषण केले. उपोषणातून शुद्धता आणि चारित्र्य हे असामान्य गुण व्यक्त होतात. समाजात आदर्श तयार होतो. समाजाला अशा आदर्शांची फार गरज असते.

अण्णा हजारेंचे लोकपाल विधेयकासंदर्भात जे आंदोलन निर्माण झाले आहे, ही दुसऱ्या स्वातंत्र्यलढ्याची तयारी आहे, असे ते मानतात. अण्णांभोवती बरेच समर्थक गोळा झाले आहेत. माध्यमांनी अण्णांना घेरले आहे. भ्रष्टाचाराच्या आंदोलनात सर्वसामान्याला आपण सहभागी व्हावे, असे नेहमी वाटते. भ्रष्टाचाराचे मूळ त्याच्यातच असते. इलाजाने किंवा नाइलाजाने तो भरडला जातो. त्याची अगतिकता त्याला मोजता येत नाही. कसेही करून आपले काम करवून घेण्याकडे त्याचा हेका असतो. काम झाल्यावर तो जेव्हा निवांत असतो, तेव्हा त्याला भ्रष्टाचाराचा सल येतो. त्याच्या मनाला ही बाब खाते. सत्य सांगताही येत नाही आणि सत्य झेपतही नाही, अशा विचित्र कोंडीत तो सापडतो. गेले काही दिवस अण्णा सगळ्यांना घेऊन परिवर्तनाची लढाई खेळत आहेत. म्हणजे नक्की काय? याबद्दल संदेह आहे. आपल्याला केवळ सरकार बदलून भागणार नाही,

तर संपूर्ण व्यवस्थाच बदलायची आहे, असे अण्णा रोज सांगतात. अण्णांचा आवाज खणखणीत आहे. त्यांचा आतला आवाज अधिक खणखणीत आहे. आतला आवाज ऐकताना अण्णांना काय वाटते, हे व्यक्त करणे नाजूक काम आहे. अण्णांच्या साधेपणात याचे रहस्य आहे. हा साधेपणा दिखावू नाही. या साधेपणाला चारित्र्याचे स्वच्छ अधिष्ठान आहे. जीवनाच्या गरजा कमीत-कमी ठेवल्या, तर आपण सर्वांना सर्व देऊन समर्थ होऊ शकतो. सॉक्रेटिसचे एक वचन आहे, श्रीमंती ही कृत्रिम गरिबी आहे. गरिबी ही नैसर्गिक आहे. सर्व बाजूंनी भ्रष्टाचारात देश पोखरला आहे. एकही क्षेत्र असे नाही, जिथे भ्रष्टाचार नाही. समाजाला त्याची मानसिकता अधिक पक्की करायला हवी. बदल हा व्यक्तिपेक्षाही समाजाला करावयाचा असतो. याचा समाजाला 'सिव्हिक सेन्स' लागतो. लोकपाल विधेयक निर्माण करण्याचा लढा हा वेगळा आहे. सगळी व्यवस्था बदलण्याची भाषा ही वेगळी आहे.

देशाच्या सर्व स्तरांतून अण्णांना पाठिंबा मिळाला. पाठिंब्याने बाजू भक्कम झाली. तरीही संसदेचे सार्वभौमत्व राज्यघटनेनुसार अंतिम असते. संसदेला प्रमाण मानून या बाबी कराव्या लागतात. भ्रष्टाचाराची बाब ही या चौकटीत आणायला हवी. घटनात्मक प्रश्नांची चर्चा करून भ्रष्टाचारापासून मुक्ती कशी मिळेल, याचा ब्ल्यू प्रिंन्ट तयार करावा. यासाठी सामाजिक भान मोलाचे आहे. नागरिकांनी याची जाणीव ठेवावी लागते. या वर्षात भ्रष्टाचारविरोधात जागतिक क्षोभ उसळलेला दिसतो. जागतिक आंदोलनात मोठ्या प्रमाणात युवक सहभागी झालेले आहेत. यामध्ये पॅरिसचे आंदोलन, लंडन येथील हिंसाचार, ॲथेन्समधील अशांतता, चिली देशातील सांथियागो येथे तरुणांनी भ्रष्टाचारार्थ काढलेला भव्य मोर्चा, स्पेनमधील माद्रिद येथे युवकांनी केलेले आंदोलन; अशी काही आंदोलने पाहिली, म्हणजे भ्रष्टाचाराच्या विरोधात जगातला तरुण आणि सामान्य माणूस हा किती अस्वस्थ आहे, ते कळते. काही ठिकाणी आंदोलनातून हिंसाचारही घडलेला आहे. सामान्यांचे न्याय्य आंदोलन सरकारी दडपशाहीमुळे चिरडून टाकता येत नाही, हे यातून सिद्ध झाले आहे. सरकारने विधेयकाचे मसुदे देण्यापेक्षा जनतेसमोर विधेयक सादर करावे.

अण्णांच्या आंदोलनाला भरघोस पाठिंबा सर्व थरांतून मिळाला. लोकजागृती झाली. लोकांमध्ये खदखदत असलेली भ्रष्टाचाराची भावना अण्णांच्या उपोषणाच्या निमित्ताने उफाळून वर आली. हेही एक प्रकारचे कॅथार्सिस आहे. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान न करता, अण्णांच्या समर्थनार्थ मोर्चे निघाले. या निमित्ताने युवकांवर फार महत्त्वाची जबाबदारी अण्णांनी टाकली आहे. ती म्हणजे, मी इमानेइतबारे काम करीन. कुठेही भ्रष्टाचार करणार नाही; हा विश्वास निर्माण होणे महत्त्वाचे आहे. हा विश्वास सरकारी साखळीतून निर्माण होणार नाही. त्यासाठी अण्णांसारखा स्वच्छ माणूस हवा. अण्णांचे आंदोलन ही तुलना करण्यापेक्षा आत्मनिरीक्षणाची संधी आहे असे मानावे. आमदार, खासदार आपल्या सोयीने आपले वेतन आणि भत्ते वाढवून घेतात. मग भ्रष्टाचाराच्या संदर्भात विधेयकाला इतका वेळ का लागावा, याचा विचार केला पाहिजे. आज सर्वार्थाने भ्रष्टाचाराने कळस गाठला आहे. नव्या पिढीला ते सारे असह्य होत आहे. भारतामधला सुशिक्षित वर्ग ही फार मोठी शक्ती आहे. यातूनही आणखी नवी प्रणाली जन्माला येईल. विशेषत: आर्थिक विकास आणि न्याय यात फार मोठा भ्रष्टाचार आहे, हे युवावर्गाला जाणवते आहे. हे पैसे माझ्या खिशातून जात आहेत, हे त्यांना कळते आहे. याचा विचार संसदीय नेत्यांनी करणे महत्त्वाचे आहे. नाही तर हल्ली सर्वत्र 'रॅटरेस'चे युग अवतरले आहे, असे जाणवते. 'रॅटरेस'मध्ये तुम्ही कितीही जिंकलात, तरी तुम्ही उंदराच्या पातळीच्यापुढे जाऊ शकत नाहीत. म्हणून भ्रष्टाचार काबूत आणण्यासाठी राजकीय नेत्यांची नैतिक विश्वासार्हता पक्की हवी. त्यातून नवे, स्वच्छ नेतृत्व पुढे यावे. राजकीय पक्षांचे व्यवहार पारदर्शक हवेत. नोकरशाही आपल्या कामात तत्पर हवी. तिने भ्रष्टाचाराला थारा देता कामा नये. सर्वांना समान वागणूक द्यावी. कोणतेही काम करून देण्यासाठी लाच देणार नाही व लाच घेणार नाही, असे मनाने घ्यावे. मी सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणार नाही. मतदानाचा हक्क बजावून मी माझ्या कर्तव्यात कसूर करणार नाही. हे सगळे कळते, पण वळत नाही. मला हे सगळ्यांमध्ये आणण्यासाठी असे आंदोलन हवे आहे. स्वच्छ प्रशासन हवे आहे. निश्चय हवा, की यासाठी क्रांती झाली तरी बेहत्तर, पण मी मोडणार नाही!

अण्णांचे उपोषण संपले. अण्णा म्हणाले, 'अर्धी लढाई जिंकली.' अर्ध्या लढाईचे विश्लेषण करणे निसरडेपणाचे आहे. केव्हाही पाय घसरू शकतो. अण्णांचे उपोषण सुटले, हे बरे झाले. उपोषणाचे क्लेष अण्णांनी हसतमुखाने सहन केले. याचे कारण त्यांना जनाधाराने विलक्षण ऊर्जा दिली. लोकांना पाहून माणसाला भरती येणे. हे संवेदनाक्षम असल्याचे चिन्ह आहे. परंतु, जेव्हा गर्दी होते, तेव्हा गर्दी नव्यानव्या युक्त्या शोधते. नव्या घोषणा देते. गर्दीच्या म्हणून नव्या फॅशन्स जन्माला येतात. लोकांना चघळायला रोज काहीतरी नवे लागते. त्यामुळे बऱ्याच जणांचा दिवस पार होतो. अशी माणसे गर्दीत येतात. ती गर्दीला वजन देतात. वजन देण्याने गर्दी सशक्त होत नाही. उलट गर्दीला सूज येते. सूज येणे हे रोगाचे चिन्ह आहे. गर्दीचे समर्थन होऊ शकत नाही. कदाचित गर्दी स्वत:तल्या शक्तींविषयी गैरसमज



असे नाही. सामान्य माणसाची कामे होत नाहीत. अण्णांच्या तेरा दिवसांच्या उपोषणाच्या काळात कोणी, किती लाच घेतली, याच्याही बातम्या वृत्तपत्रांत आलेल्या आहेत. एका बाजूला पैसे ठेवायला बँकांमध्ये जागा नाही, म्हणून विदेशातील बँका भरल्या जातात. दुसरीकडे एका रुग्णामागे जेमतेम पंधरा रुपयांचे अनुदान, आनंदवनातील कुष्ठरोग्याला शासनाकडून मिळते. पंधरा रुपयांत एकाचे जेवण व नाश्ता असे शासनाने गृहीत धरले आहे! ही विषमता लक्षात घेणार की नाही? आनंदवनाच्या कौस्तुभ आमटे व शीतल आमटे यांनी २५ ऑगस्टच्या 'लोकसत्तेत' हा प्रश्न

निर्माण करते. गर्दी फट्‌कन् खालचा तळ गाठते. गर्दीत चांगले-वाईट निवडता येत नाही. गर्दीला वेड असते, गर्दी होण्याचे. गर्दीला स्वत:चा चेहरा देता येत नाही. 'शांततेत आंदोलन करा' असेही अण्णा सांगतात. अहिंसक मार्गाने खासदारांच्या बंगल्यांसमोर धरणे धरा, असेही सांगतात. यामध्ये गर्दीपेक्षा जनतेच्या विधायक सहभागाची अपेक्षा असते. महात्मा गांधींजीच्या सत्याग्रहात किंवा उपोषणात किंवा लाँग मार्चमध्ये जनता सुसंस्कृत होती. ती विनाशापेक्षा आत्मक्लेष सहन करणारी होती. उपोषण हे हत्यार असे आहे, की ते कधी केव्हा उलटेल ते सांगता येत नाही. अण्णांच्या पाठीशी असणाऱ्या गर्दीत संघटित विचारक्षमता असलेले आणि आचरणशुद्धता असलेले कितीजण होते? चळवळीला नैतिक उंची फार महत्त्वाची असते. अण्णांच्या नैतिक उंचीला तितकेच नैतिक हात लाभले पाहिजेत.

प्रत्येकाच्या जगण्यात सोइस्कर भ्रष्टाचार आहे. त्यातून तो आपण किती शुद्ध आहोत, याचे आपल्या सोईनुसार स्पष्टीकरण करीत असतो. सोबतीला महात्मा गांधीजी, नामदार गोखले, स्वामी विवेकानंद, योगी अरविंद अशा थोरामोठ्यांची नावे घेतो. अखेर रतन टाटांनाही उद्वेगाने म्हणावे लागले, ''भारतातील भ्रष्टाचार विकोपाला गेला आहे.'' भ्रष्टाचारविरोधी लढ्यातील समाजमन नक्की भारावते. भारावलेपणातून आशेचे काही बुडबुडे फुटतात. नवी पहाट होण्याची सर्वांना प्रतीक्षा असते. या भावनिक गुंतवणुकीतून आंदोलनाला दिशा मिळेलच

विचारलेला आहे. एका बाजूला चांगल्या कामाला तुटपुंजी मदत आणि दुसऱ्या बाजूला खासदारांना लाच देताना दुसऱ्या खासदारांवर आरोपपत्र ठेवले जाते, हा कोणता न्याय आहे? गोंदिया जिल्ह्यात ७७९ बालके अतिकुपोषित म्हणून जाहीर होतात. ही जबाबदारी शासकीय यंत्रणा घेत नाही. हरित क्रांतीचा पट्टा वसईत हळूहळू नाहीसा होतो आहे. यासाठी आंदोलन करणाऱ्या माणसांच्या जाणिवांची दखल शासनकर्त्यांना घ्यावीशी वाटत नाही. यंत्रणा जेव्हा संपूर्णत: भ्रष्ट होते, तेव्हा सरकारी मालकीच्या खार जमिनीवरील हजारो तिवर वृक्ष नष्ट करण्याचे कारस्थान, तहसीलदार कार्यालयाच्या अनुमतीने शिजते.

अण्णांच्या आंदोलनाने विविध प्रकारचे परिणाम दिसल्याचे स्पष्ट झाले आहे. रामलीला मैदानावर भाऊगर्दी उसळली. मैदानावर संपूर्ण देश आला होता. अण्णांच्या समर्थकांना हे टॉनिक होते. रामलीला मैदानावर मशिदीच्या बाजूने लागलेल्या 'अण्णा की रसोई' मध्ये पुरी, भाजी, कढी, चावल, पनीरचा समावेश होता. सर्व खाद्यपदार्थांची रेलचेल होती. अण्णांच्या स्नेहापोटी हे सदावर्त दररोज २० ते २५ हजार लोकांना जेवण देत होते. यात बहुसंख्य गरीब आणि भिकाऱ्यांची दिवाळी होती. दिल्लीच्या प्रमुख रस्त्याच्या सिग्नलवरील भीक मागणाऱ्या टोळ्या मैदानात आल्या होत्या. ही मंडळी भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवत होती. मैदानावर नवश्रीमंत वर्गाचे उत्स्फूर्त लोंढे येत होते. यातल्या बऱ्याच जणांचे खिसे कापले

गेले. पोलिसांचा बंदोबस्त होता. तरीही हे होत होते. मुख्य म्हणजे अण्णांना पाठिंबा देण्यासाठी आपणहून आलेल्या अनेक उच्चभ्रू मुलींची छेडही काढली गेली. संध्याकाळी काहींनी दारू पिऊन गोंधळही घातला. काहींची हुल्लडबाजी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली. काँग्रेसच्या नेत्यांच्या नावाने अश्लाघ्य शिवीगाळ झाली. एका बाजूला प्रचंड घाण साठली आणि दुसऱ्या बाजूला हेही ओंगळवाणे दर्शन भारतीयांना झाले. असे हे होत असते, हे नेहमीचे म्हणणे आहे. ते इथे कितपत लागू पडते? साधनशुचिता मानणाऱ्यांच्या मंडपात अशी माणसे कशी काय येतात? गर्दीसाठी? की गर्दीला अवास्तव महत्त्व देण्यासाठी?

दिल्लीत दुचाकी वाहनचालकांना हेल्मेट घालणे सक्तीचे आहे. पोलिसांनी हेल्मेट न घालणाऱ्याला पकडले, तर दोनशे रुपयांचा दंड पडतो. त्यामुळे सारेच हेल्मेट घालणे पसंत करतात. इथे काहींनी हातात तिरंगा आणि डोक्यावर ''मैं अण्णा हजारे हूँ'' लिहिलेली टोपी घातली. त्यामुळे दिल्लीभर मोकाट सुटण्याचा परवाना मिळाला आहे, असा त्यांचा समज झाला. मोटरसायकलवर तीन-तीन जण बसले. त्यांनी ''अण्णा हजारे झिंदाबाद''च्या घोषणा दिल्या. यातून काय साधले, ते त्यांनाच ठाऊक! पण दिल्लीच्या अतिसुरक्षित व्ही.आय.पी. भागामध्ये त्यांनी धुडगूस घातला. हे कुणालाही पटणारे नाही. जे काय करायचे. ते विधायक मार्गानेच झाले पाहिजे. यामुळे आंदोलनाची पातळीही बिघडते. कोणत्याही विशिष्ट क्षेत्राची भरभराट ही फक्त श्रमाने होत नाही. त्यातून साखळी निर्माण व्हावी लागते. त्यासाठी विशिष्ट प्रकारचे लोकशिक्षण अभिप्रेत असते. ही साखळी मजबूत करावी लागते. कुशल मनुष्यबळ आणि योग्यदृष्टी यातून हे घडते. आर्थिक विकास आणि न्याय हे जर पारदर्शी असतील, तर बऱ्याच मोठ्या प्रमाणात समाजलढा सिद्ध होतो. भ्रष्टाचाराचे मूळ मानवी वृत्तीत आहे. मला माझे काम थोडे महत्त्वाचे वाटते. मग त्यासाठी मी, काहीही वाटेल ते करायला तयार असतो. कशानेही माणसे विकत घेता येऊ शकतात. सरकारी फायलींना आग लावू शकतात. हे एकदा कळले, की मी त्यासाठी काहीही करू शकतो. मी माझी जी चौकट निर्माण केली आहे, ती मला वाढवायची असते. त्याला धक्का न लावता मी मोठा होण्यासाठी हे करत असतो. काही, पाहुण्यांच्या हातून साप मारतात. यामुळे भ्रष्टाचाराला सवय लागते. भ्रष्टाचार हा अंगवळणी पडतो. कोणतेही काम करायला काहीतरी द्यावेच लागते, अशी मानसिकता निर्माण होते. आजच्या रोगट स्पर्धेत मला पुढे जाण्यासाठी हे करावेच लागते. याचा सगळा हिशेब मी जेव्हा कमावतो, तेव्हा चुकता केलेला असतो. मलाही या चुकतेपणातून भ्रष्टाचाराची सवय लागते. बरीच टेबले खात असताना माझे टेबल रिकामे कसे, हा प्रश्न अकारण सतावतो. मग भ्रष्टाचार पद्धतशीरपणे रुजायला लागतो. हव्यास आणि मिळते आहे, ते ओरबाडा. या वृत्तीमुळे भ्रष्टाचार हा शिष्टाचार होतो. कॉर्पोरेट जगतातला भ्रष्टाचार पाहिल्यानंतर डोके चालतच नाही. जागतिकीकरण या पातळीवर होत असेल, तर यात सामान्यांच्या श्वासाचे काय होणार, याची भीती वाटते.

श्रीमंतीचे अवास्तव, हिडीस प्रदर्शन करण्यापोटी भ्रष्टाचार निर्माण होतो. हल्ली ज्याला त्याला झटपट कोट्यधीश व्हायची घाई झाली आहे. थोड्या श्रमात खूप दाम मिळविण्याची हौस सध्या माणसाला आहे. क्षुद्र प्रश्नात करोडपती होण्याची घाई असते. त्यामुळे पैशाचे मूल्य जीवनाच्या मूल्याशी किती निगडित आहे, हे उमजत नाही. तरुण सॉफ्टवेअर इंजिनीयर वर्षाला कोटय़वधीची पॅकेजेस् मिळवितात. आणखी पैसे मिळविण्यासाठी एक कंपनी सोडून दुसऱ्या कंपनीत जातात. तिथे जीवनापेक्षा पैसा महत्त्वाचा ठरतो. यामुळे जगण्याचे मूल्य लक्षात घेतले जात नाही. श्रीमंतीच्या लोभापायी हे सारे होत जाते. कंपन्यांमधील स्पर्धा जीवघेणी असते. सध्या तर स्पर्धांमध्ये खिलाडूवृत्ती दिसत नाही. स्पर्धा म्हणजे दुसऱ्यावर स्वार होणे, असे समीकरण झाले आहे. काहीही करून मी हे मिळविले पाहिजे, ही स्वार्थांधता आज बोकाळली आहे. प्रयत्नवाद संपला आहे. एखाद्या कामावरील निष्ठा आज दुर्मिळ झाली आहे. मी केलेल्या कामातून जर आणखी चार जणांचे संसार मांडले जात असतील, तर त्याला मी मदत केलीच पाहिजे, अशी वृत्ती आजकाल दिसत नाही. तुम्ही मला काय देणार, या मोबदल्यात मी तुम्हाला हे हे देणार; असा खुला व्यवहार सगळीकडे चालू आहे. त्यामुळे समाजातील सहिष्णुता संपत चाललेली आहे. अशा स्थितीत कोटय़वधीच्या भ्रष्टाचारांची विविध प्रकरणे वाचायला मिळतात. हा पैसा ते कसा काय मिळवितात, हे कोडे अस्वस्थ करते. समाजाच्या करातून होणारे पैशांचे असे वाईट खेळ, महागाई वाढवितात, अर्थव्यवस्थेला धक्का देतात. राष्ट्रीय प्रकल्पांना अडसर ठरतात. त्यामुळे प्रत्येकाने मनाशी निश्चय केला पाहिजे, मी माझे व्यवहार स्वच्छ करीन. माझ्याबरोबर इतरांचे व्यवहार स्वच्छ करण्यास मी मदत करीन. हे करणे अतिशय कठीण आहे. १९४८ सालापासून भ्रष्टाचाराविषयी संसदेत सतत बोलले जाते. परंतु, याला प्रतिबंध घालण्याचे साहस कुणातही झाले नाही. ते अण्णांनी केले.

संसदेला संसद चालविण्यापेक्षा आपला पक्ष चालवायचा असतो. पक्षातल्या सगळ्या बाबी पक्षप्रमुखाला सांभाळाव्या लागतात. त्यासाठी त्याला विविध कसरती कराव्या लागतात. या साखळीत जर, एखाददुसरा स्वच्छ असेल, तर तोच

झाकोळला जातो. त्याच्याविषयी चांगले चार शब्द बोलले की त्यालाही बरे वाटते. परंतु, व्यवस्था सुधारत नाही. कार्यप्रणालीला ठोस रूप मिळत नाही. संसदीय कामांना वेग येत नाही. सरकारी प्रकल्प कोणत्या गतीने चालतात हे आपणाल माहीत आहे. याबद्दल कितीही बोलले, तरी उपयोग शून्य! यामध्ये काही प्रकल्प पैशांअभावी गुंडाळले जातात. तर काही प्रकल्पांचा पैसा प्रकल्पांशिवाय परत जातो. नक्की काय करावयाचे, तेच माहीत नसते. चौकटीत राहून काम करणे हे योग्य असले, तरी कामामुळे जर चौकट कुजत असेल, तर नवीन चौकट निर्माण करावीच लागते. त्यासाठी हटवादीपणा करावा लागतो. थोडीशी हतबलता आली तरी चालेल, परंतु, ते करावेच लागते. देश चालविणे अवघड असते. पण स्वच्छ किल्ल्या हातात घेऊन, जर समाजानेच त्याची दारे उघडली, तर काहीतरी चांगले घडू शकते. भारतात काही चांगले प्रकल्प आजही आहेत. त्यातल्या सेवा उत्कृष्ट आहेत. त्यातला आदर्श सुरेख आहे. तो लगेच घ्यावा असे मी म्हणत नाही. कारण आदर्श पेलावे लागतात. त्यासाठी समाजाला सत्त्वाचा कणा असावा लागतो. हे नुसत्या मिरवणुकांनी होत नाही. जयजयकारांच्या हारांमध्ये हे जमत नाही. सातत्याने चांगले काम वृत्तीत भिनवावे लागते. माणूस त्या पद्धतीने घडवावा लागतो. समाजाची जडणघडण एकूणच; याने त्याला नावे ठेवणे, त्याने याला नावे ठेवणे, अशी सध्या आहे. समर्थ रामदासांच्या भाषेत सांगायचे तर, ''सांगोचि जाणती सर्वे। कर्ता कोणी दिसेचि ना ।।'' अशी आजची परिस्थिती आहे.

चांगल्या कामाला खीळ घालणारे अधिक आहेत. चांगले काम व्हायला पाहिजे असे वाटणारे थोडे आहेत. चांगल्या कामालाही लाच कशी द्यावी लागते, याचे काही किस्से वृत्तपत्रांतून सारखे येत असतात. याच्या मुळाशी कोण आहे, हे माहीत आहे. आपण काय करीत आहोत हेही माहीत आहे. मग नक्की काय करायचे? की व्यवस्थेला शरण जायचे? यावर चर्चा होते. मनातले कढ उतू जातात. साधनांच्या वाटा पुन्हा एकदा उजळतात. प्रकाश दिसतो. तेवढ्यापुरताच. परत मळभ आहे तेच आहे. आपल्याला प्रकाश सतत ठेवायचा आहे. ते करण्यासाठी एकोपा राखून वाईट कामांवर तुटून पडणे, चांगल्या कामांना मदत करणे, हे आपण केले पाहिजे. यातून आपल्याला भारत पुढे न्यायचा आहे. हे दशक निव्वळ ज्ञानाचे असून भागणार नाही. ज्ञानाला नैतिक कणखरतेची आणि समूहात्मक स्वच्छतेची जोड दिली पाहिजे. तरच अण्णा हजारेंच्या आंदोलनाची फलनिष्पत्ती चांगल्यापैकी घडेल. अन्यथा आंदोलनाची फिल्म निघेल. आंदोलनावर चित्रपट निघेल. आंदोलनाचा इतिहास लिहिला जाईल. कदाचित विश्लेषणही बऱ्यापैकी होईल. आणि शेवटी आंदोलन पुरातत्त्व विभागाच्या एका छोट्याशा कप्प्यात जाऊन बसेल. असे होणे सामान्य माणसाला बरोबर नाही. यात महागाईची झळ आहे. अस्तित्वाला आव्हान यातून आहे. जर समाज घडवायचा असेल, तर समाजानेच आपल्याला तपासून पाहिले पाहिजे.

सध्या समाजाला उत्सवात आणि कोणत्याही आंदोलनात रमायला आवडते. आंदोलनाची मुख्य जबाबदारी त्याला नको असते. प्रदूषित होत असलेल्या गंगेला स्वच्छ करण्यासाठी उपोषण करणाऱ्या हरिद्वारमधील स्वामीने आपले प्राण दिले. याची जाणीव राष्ट्राला फारशी झाली नाही. वृक्ष टिकविण्याविषयीचे आंदोलन असो, जंगले वाचवा, सृष्टी वाचवा, याविषयीची आंदोलने समाजाला चेतना देतात. पण ती समाज तात्पुरतीच ठेवतो. अण्णांच्या आंदोलनाने जनसामान्यांना जाग आली. सामान्यांचे मन यातून व्यक्त झाले. परंतु सामान्यांची कृती भविष्यात अधिक व्यक्त झाली पाहिजे. अण्णांचा स्वच्छ श्वास जर प्रत्येक भारतीयाला कळला, तर भारतात स्वच्छ लोकशाही येईल. सर्व पातळ्यांवर कामे नीट होतील. ही आदर्शवादाची भाषा वाचायला खूप चांगली आहे. पण त्यासाठी सगळ्यांनी त्याग करायला हवा. तो असा, गरजेपुरते घेणार, राष्ट्राला भरभरून देणार. महात्मा गांधीजींच्या प्रार्थनेत वाल्मीकींच्या रामायणातील एक सुंदर श्लोक आहे, तो असा–

न त्वहं कामये राज्यं न स्वर्गं नापुनर्भवम् ।
कामये दुःखतप्तानां प्राणिनामार्तिनाशनम् ।।

'मला राज्य नको, मला स्वर्ग नको, मोक्षही नको. फक्त प्राणिमात्राचे दुःख दूर करण्याची मला शक्ती दे.' अशी भावना आमदार, खासदारांनी ठेवली तर...

लोकपाल विधेयकाची मांडणी महत्त्वाची आहे. पुढच्या पिढीच्या कल्याणासाठी हे आवश्यक आहे. केंद्रातील पाच मंत्री अण्णा हजारेंबरोबर चर्चा करतात. यात अण्णांच्या लोकपाल विधेयकाचे स्थान किती महत्त्वाचे आहे, हे ओळखले पाहिजे. काहींच्या मते लोकपालाने भ्रष्टाचार केला तर काय करावयाचे? हा दावा जनता हाणून पाडेल. जनतेने आपले समजंसपण योग्यपणे जपले पाहिजे आणि राष्ट्रीय कामाला लावले पाहिजे, हा याचा अर्थ आहे.

**– डॉ. यशवंत पाठक**
रामजानकी संकुल,
ए/२०१, चैतन्यनगर,
गंगापूर रोड, नाशिक–४२२०१३
भ्रमणध्वनी : ९४२१६०५२८२

# किरकोळ व्यापारातील सांस्कृतिक घटीत

गजानन खातू

किरकोळ व्यवसायात उतरलेल्या राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे भागधारक आपणच सर्वसामान्य असू, आपल्याच भांडवलावर औद्योगिक साम्राज्याप्रमाणे किरकोळ व्यवसायाची साम्राज्ये उभी राहतील, पण त्याचे चालक आणि मालक मात्र भांडवलदार वर्ग असेल. किरकोळ व्यवसायातील या सांस्कृतिक घटिताचे आपण साक्षीदार असू, एवढेच!

**मा**नवी समाजाच्या वाटचालीमध्ये शेतीइतकेच व्यापाराला ऐतिहासिक महत्त्व आहे. शिकारी समाजाला रोजचे अन्न रोज शोधावे लागे. त्याचा संग्रह आणि व्यापार या गोष्टी अशक्य होत्या. पण स्थिर शेतीसमाज निर्माण झाला आणि त्याच्याबरोबर व्यापाराचीही अपरिहार्यपणे सुरुवात झाली. कारण शिकारी भटक्या समाजापेक्षा स्थिर शेती समाजाच्या गरजा वाढल्या. केवळ अन्न निर्माण करून त्या भागणाऱ्या नव्हत्या. साहजिकच विनिमय हा पाया असलेला व्यापार सुरू झाला. आपल्याकडे आवश्यकतेपेक्षा जास्त असलेल्या वस्तू देऊन अन्य गरजेच्या वस्तू घेणे सुरू झाले आणि कृषिबरोबर व्यापारही मानवी जीवनाचे सांस्कृतिक अंग झाले.

व्यापारातील सांस्कृतिक आविष्कार अनेक अंगांनी प्रकट झालेले दिसतात. समाजरचनेवर व्यापाराचे दूरगामी परिणाम झाले. जगभर कारागीरवर्गाची निर्मिती झाली. भारतात अलुतेदार-बलुतेदारांची रचना उदयाला आली. कृषिसंस्कृतीच्या सुरुवातीच्या काळातील परस्परांच्या गरजा भागविण्याची वस्तुविनिमयाची प्रत्यक्ष पद्धती- बार्टर - मागे पडली, ग्राहक आणि उत्पादक यांच्यात भौगोलिक व काळाचे अंतर पडू लागले. त्याच्यातून मध्यस्थाची भूमिका वठवणाऱ्या व्यापारीवर्गाचा उदय झाला. जगभर व्यापारीवर्ग निर्माण झाला, भारतात तो जातिव्यवस्थेचा भाग बनला. व्यापारीवर्गामुळेच अप्रत्यक्ष विनिमय शक्य झाला आणि विनिमयाचे माध्यम म्हणून चलनव्यवस्था उदयाला आली.

आपण मालमत्ता शब्दाचा सर्रास उपयोग करतो. ताळेबंदात स्थावर मालमत्ता आणि जंगम मालमत्ता असा उल्लेख असतो. शेती, इमारती, जमीनजुमला ही स्थावर मालमत्ता असते तर वस्तू, सोने-नाणे, हलवता येणाऱ्या वस्तू यांचा जंगम मालमत्तेत समावेश असतो. पण मुळात मालमत्ता ही संकल्पनाच मुळी व्यापारी स्वरूपामुळे अस्तित्वात आली. म्हणजे ज्याची विक्री करणे शक्य आहे ती मालमत्ता. आणि विक्री करण्यासाठी चलनाचे माध्यम गरजेचे असते. जे व्यापारामुळे उदयाला येते. या माध्यमातील बदल हाही सांस्कृतिक बदलाचा इतिहास

असतो. श्रीकृष्णाच्या काळापासून गोधनाचा उल्लेख येतो. गाई, बैल, शेळ्या, मेंढ्या हे उत्पादनक्षमेतमुळे संपत्तीचा भाग झाले तर हत्ती, घोडे, उंट प्रवासी साधन म्हणून आणि युद्धातील महत्त्वाचा घटक म्हणून संपत्ती बनले. महाभारतातील लढाईत किती अक्षौहणी सैन्य कुणाकडे होते याच्याबरोबर किती हत्ती, घोडे कुणाकडे होते याचाही तपशील येतो.

सुरुवातीच्या काळात पशुधन हे महत्त्वाचे विनिमयाचे साधन होते. प्रदेशाशी व्यापार करायला त्याचा उपयोग होई. म्हणून युद्धात त्यांची लूट होई. पुढील काळात सोने, चांदी, हिरे, माणके हे विनिमयाचे साधन झाले. म्हणून करांचे उत्पन्न नसलेल्या राजेशाही व्यवस्थेत राज्यकारभार चालवण्यासाठी इतर राज्यांवर हल्ले करून सोन्यानाण्यांची लूट करावी लागे. सोने-चांदी विनिमयाचे साधन झाल्यावर अधिक दूरच्या प्रदेशाशी व्यापार करणे शक्य झाले. या व्यापारापायीच नव्या जगाचा शोध लागला. कोलंबस, मार्कोपोलो अशी अनेक नावे इतिहासात नोंदवली गेली. दर्यावर्दी हा किताब ठरला. दर्यावर मच्छिमारासाठी नव्हे तर व्यापारासाठी लोक जात असत. यातूनच समुद्रावर आपला अधिकार प्रस्थापित करण्यासाठी, देशरक्षणासाठी आणि युद्धसामर्थ्यासाठी आरमार उभे राहिले. ज्याचा इतिहास शिवाजी महाराजांच्या आरमारामुळे आपल्यापर्यंत पोचला. सुरुवातीला या दर्यावर्दी मोहिमा फक्त सोने-चांदी, रत्न-माणके, मौल्यवान वस्तू व पुढे मसाल्यांच्या पदार्थांपर्यंत मर्यादित होत्या. या मोहिमा, व्यापारातून वसाहतवादी साम्राज्यापर्यंत पोचल्या; त्या इंग्रज जहाजे भरून व्यापारासाठी भारत व अन्य देशांच्या किनाऱ्यावर उतरले तेव्हा.

नदीकिनाऱ्याने मानवी संस्कृतीचा विकास झाला हे आपल्याला माहीत आहे. पण व्यापारीमार्ग हे देखील सांस्कृतिक विकासाला आणि सांस्कृतिक आदानप्रदानाला कारणीभूत झाले हे फारसे लक्षात येत नाही. औद्योगिकीकरणाच्या पूर्वीच्या कालखंडात व्यापार-व्यवहार खुश्कीच्या मार्गाने म्हणजे रस्त्याने होत होता व अशा मार्गाने अनेक देश, प्रदेश जोडलेले होते. बहुधा बैलगाडीसारख्या साधनाने हा व्यापार चाले. जनावरांच्या व्यापाराचा तर तो एकमात्र पर्याय होता. अशा व्यापारीमार्गांनी त्या त्या प्रदेशांचा विकास केला. त्या मार्गावर बाजारपेठा विकसित झाल्या. त्यांच्या भोवताली वस्ती वसली. सांस्कृतिक कार्यक्रमांची केंद्रे उभी राहिली. समुद्रापासून दूर असूनही आणि नदीसान्निध्य नसूनही अशी महत्त्वाची ठिकाणे विकसित झाली. विशेष म्हणजे समुद्रकिनाऱ्यांच्या वस्त्यांच्या मानाने व्यापारीमार्गावरील वस्त्या आणि नगरे अधिक विकसित होती. यालाच Geo Economics म्हणून आता आपण ओळखतो. आज विदर्भ, मराठवाडा आर्थिक विकासात मागे पडलेला आपण पाहतो. पण औद्योगिकीकरणापूर्वी हे संपन्न प्रदेश होते. कारण खुश्कीचे व्यापारीमार्ग तिथे विकसित झाले होते. हेच मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहारसारख्या मध्य भारतातील राज्यांबाबत खरे आहे. एकेकाळी हे प्रदेश संपन्न होते. बौद्ध, जैन धर्मांचा उदय आणि हिंदू धर्माचे पुनरुत्थान याच प्रदेशात झाले. आयुर्वेदाचा विकास झाला. राज्यसंस्था विकसित झाल्या. हा मध्यभारत आता आर्थिक शर्यतीत पिछाडीवर आहे. कारण उद्योगीकरण समुद्रमार्गे आले. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यावरील राज्यात औद्योगिकीकरणाचा आणि व्यापारीकरणाचा विकास झाला. औद्योगिक क्रांतीने आणलेल्या आधुनिकतेच्या कालखंडाचे सर्व फायदे या प्रदेशांना मिळाले आणि शेती समाजाशी जोडलेले, खुश्कीच्या मार्गाने व्यापार करणारे प्रदेश मागे पडत गेले. या सगळ्या घटितांचा केवळ आर्थिक नव्हे, तर सांस्कृतिक दृष्टीने परामर्ष घेणे गरजेचे आहे.

व्यापाराचा सांस्कृतिक जीवनावर किती जबरदस्त प्रभाव पडला याचा अंदाज, सत्यनारायणाच्या पोथीतील साधुवाण्याची कथा ऐकताना किंवा 'मर्चंट ऑफ व्हेनिस' वाचताना किंवा 'टोपी विक्या आणि माकडांची गोष्ट' मुलांना सांगताना येते. दीपावलीमध्ये पारंपरिक नवे वर्ष सुरू होते आणि दुकानादुकानांतून लक्ष्मीपूजन होते. वास्तविक ते हिशेबाच्या नव्या वह्यांचे पूजन असते. पैशाचे नव्हे. या वह्यांची साग्रसंगीत पूजा करून, शुभलाभाचे चिन्ह उठवून, देवादिकांना नमन करून, नंतर मुहूर्ताच्या खरेदी-विक्रीच्या नोंदी करून वापराला सुरुवात करतात. मुंबईत तर अनेक व्यापारी वह्या घेऊन महालक्ष्मी मंदिरात जातात. पुढील वर्षं भरभराटीचे जावे अशी त्यामागे भावना असते. पण हिशेबांच्या वह्यांना दिले जाणारे हे महत्त्वही लक्षात घेण्याजोगे असते. हा सगळा सांस्कृतिक व्यवहार आहे. जो या देशातच होत असावा. दसऱ्याच्या दिवशी होणारी शस्त्रपूजा आणि कारखान्यातील यंत्रसामग्रीची पूजा, बैलपोळा, या मागेही तेच सांस्कृतिक प्रकटन असते.

शेती करणाऱ्यांच्या प्रचंड संख्येमुळे त्यांचा शेतकरीवर्ग म्हणून उल्लेख होणे साहजिक आहे, ग्रामीण व्यवस्थेतील मोठ्या उपस्थितीमुळे कारागीरवर्ग ओळखला जातो, मार्क्सने भांडवलदार व श्रमिकवर्गाच्या संघर्षाची मांडणी केल्याने हे दोन वर्ग आपल्याला परिचित आहेत पण व्यापारीवर्ग म्हणून केव्हा उल्लेख होऊ लागला ते सांगता येत नाही. कारण सुरुवातीच्या व्यवस्थेत उत्पादकच विक्रेता होता. कुंभार, सुतार, लोहार उत्पादक म्हणून ओळखले जातात, व्यापारी म्हणून नव्हेत. म्हणजे मुळात दूरवरच्या प्रदेशात जाऊन खरेदी करणारे-आजच्या अर्थाने घाऊक व्यापार करणारे-व्यापारी असणार. अरबी घोड्यांचा व्यापार आपल्या वाचनात आलेला असतो आणि

'अलिबाबा चाळीस चोर'मधील चोर तेलाचे व्यापारी म्हणूनच आलेले असतात. पण हळूहळू परप्रदेशातून आणलेल्या वस्तू विकण्याचा आणि सर्व प्रकारच्या वस्तूंचा संग्रह करून वितरित करण्याच्या किरकोळ व्यापाराला सुरुवात झाली असणार आणि असा व्यवहार करणाऱ्यांची संख्या इतकी वाढत गेली, की त्यांचा व्यापारीवर्ग म्हणून उल्लेख होऊ लागला. मार्क्सने त्यांचा मर्कंटालिझम म्हणून उल्लेख केला आहे आणि अनेकांचे आनुषंगिक काम, हे काहींचे पूर्णकालीन काम होऊन त्यातून व्यापारीवर्गाची निर्मिती झाली असे म्हटले आहे. अशा प्रकारे व्यापार हीच जीवनवृत्ती असलेल्यांची एवढी मोठी संख्या झाली, की वैश्य नावाने चार्तुवर्ण्यात त्याला स्थान मिळाले. उत्पादनात कोणतीही मूल्य वाढ (value Addition) न करता, नफा कमावणारा असा हा व्यापारीवर्ग आहे.

२००१ साली देशातील ३१.० कोटी मुख्यत: काम करणाऱ्यांपैकी १७.५८ कोटी शेतीमध्ये, ४.१६ कोटी उद्योगात आणि २.९१ कोटी व्यापारात होते. अशा प्रकारे शेती व उद्योगाखालोखाल रोजगार पुरवण्याचे काम व्यापारांनी व विशेषत: किरकोळ व्यवसायाने केले आहे.

किरकोळ व्यवसाय करणाऱ्यांचा उल्लेख शेटजी म्हणून होत असला तरी प्राय: तो अंगमेहनतीशिवाय करता येत नाही. त्याचे स्वरूपच असे असते, की केवळ नोकर नेमून करणे शक्य नसते आणि परवडत नाही. त्यामुळे या व्यवसायात बहुधा सगळे कुटुंब गुंतलेले असते आणि वडिलांनंतर मुलांनी तो सांभाळणे अपरिहार्य असते. त्यातूनच गुजराथी, मारवाडी, सिंधी असे समाजच्या समाज या व्यवसायात पुढे आलेले दिसतात. ही व्यावसायिकतेची वृत्ती या समाजघटकात एवढी बिंबली आहे, की जव्हेरी बाजार, शेअर मार्केट, डायमंड मार्केट या ठिकाणी याच समाजाचा राबता दिसतो. अर्थात सगळे गुजराथी आणि मारवाडी व्यापारीच असतात हा सार्वत्रिक गैरसमज आहे. गुजराथ आणि राजस्थानातही उर्वरित भारताप्रमाणे शेतकरी शेतमजुरांचीच बहुसंख्या आहे. परंतु सुरक्षित नोकरीऐवजी धोका पत्करून स्वतंत्र व्यवसाय करण्याची वृत्ती काही समाजसमूहांत विशेषत्वाने दिसते. महाराष्ट्रातूनही वैश्य समाज प्रामुख्याने व्यापारी आहे. एकेकाळी मुंबईतील पानविडी दुकानांची मालकी याच समाजाकडे होती. अनेक किरकोळ व्यवसाय करणाऱ्या दुकानदारांचे स्वरूप 'आगे दुकान पीछे मकान' असेच होते. दोनशे फुटांच्या गाळ्यात, दुकान, गोदाम आणि घर एकत्रच असे. आता हे स्वरूप बदलते आहे. पण चार पैसे जास्त कमावले तरी अन्य कनिष्ठ मध्यमवर्गातच मोडणारा हा व्यापारीवर्ग होता. कुंभारवाडा, सुतारगल्ली, फणसवाडी, गिरगावपर्यंत, व्यापारीवर्ग अन्य कष्टकऱ्यांसोबत चाळीतच राहत होता आणि नव्याने उभ्या राहिलेल्या उपनगरातही भाड्याच्या चाळीतच त्याचे बस्तान असे. दुकानाजवळ घर असावे हे त्याचे सूत्र होते. म्हणूनच व्यापारीवर्ग आणि स्थानिक वस्त्यांचा जैवसंबंध जोडलेला होता. कोकणातील किरकोळ व्यापरीवर्ग हा तेथील समाजवादी पक्षाचा मुख्य आधार होता. पुढे तो भाजप आणि काँग्रेसकडे गेला. जपानमध्ये तर दुकानदार हा निवडणुकीतील महत्त्वाचा घटक समजला जाई. स्थानिक पातळीवरील त्याच्या चोवीस तास उपस्थितीमुळे आणि संपर्कामुळे त्याला राजकीय महत्त्व आले होते. तिथे सहकारी संस्थेला दुकान काढण्यासाठी स्थानिक व्यापाऱ्यांच्या संघटनेची पूर्वपरवानगी कायद्याने आवश्यक केली होती. अशा प्रकारे कृषि संस्कृतीप्रमाणे व्यापारी संस्कृती विकसित झालेली दिसते.

व्यापारी संस्कृती असे म्हणण्याचे कारण म्हणजे परस्पर विश्वास हा या आर्थिक व्यवहाराचा पाया आहे. किरकोळ व्यापारातील फार मोठा व्यवहार उधारीवर चालतो. कोणतीही कायदेशीर लिखापढी नसते. व्यापाऱ्याने ठेवलेल्या नोंदी ग्राहक विश्वासाने स्वीकारतो आणि देणे देतो. कोकणात गावागावातील अनेक व्यापारी आठ-पंधरा दिवसांची नव्हे, चांगली सहा-सहा महिन्यांची उधारी ठेवत असत. बहुधा चाकरमानी मुंबईत





लिहावे नेटके
माधुरी पुरंदरे
मराठी शिकणाऱ्यांसाठी
मराठी शिकवणाऱ्यांसाठी
मराठीचा वापर करणाऱ्या सर्वांसाठी
तीन भागांची किंमत ₹४००/-
लिहावे नेटके २
नेटके १



STANLEY
Fully Shielded For Human Consideration
NOW STANLEY OFFERS THE ESSENTIAL DIFFERENCE FOR INDUSTRIES
OUR PRODUCTS
D.P. & T.P. MAIN SWITCHES, DISTRIBUTION FUSE BOARD & KITKAT FUSE IN
16 AMPS TO 500 AMPS / 240 VOLTS TO 415 VOLTS
CHANGEOVER SWITCH
16 AMPS To1250 AMPS IN 415 VOLTS
BUS BAR CHAMBER
32 AMPS TO 1000 AMPS
METAL CLAD PLUG, SOCKET & CONDUIT BOXES
IN 2 POLE 10 TO 20 AMP X 250 VOLTS
IN 3 POLE 20 TO 30 AMP X 440 VOLTS
STANLEY SWITCHGEAR PRODUCTS
21,JAGAT SATGURU INDL. ESTATE, VISHESWAR NAGAR, OFF AAREY ROAD, GOREGOAN (EAST), MUMBAI - 400 063.
TEL.: 022- 2927 1562, 022-2927 1540, FAX : 022- 2927 1561
Email : stanleyswith@yahoo.co.in • www.stanleyswitch.com
Stanley Provide You Stability Safety & Longlasting

नोकरीला असत आणि त्यांच्या घरच्यांना लागेल तो माल उधारीवर मिळे. पुष्कळसे मुस्लिम पुरुष बोटीवर काम करत आणि सहा-सहा महिने देशाबाहेरच असत. ही उधारी वसूल करण्यासाठी वाणी सहा महिन्यांनी एकदा मुंबईत फेरी मारून चाकरमान्यांच्या खोलीवर जाऊन उधारी वसूल करत. उधारी वसूल करायला जाणे ही महत्त्वाची आणि जोखमीची बाब आहे. घाऊक बाजारातून होणारी घाऊक खरेदी ही देखील विश्वासाचीच बाब होती. एकदा घाऊक बाजारपेठेतील व्यापाऱ्याशी संबंध जुळले की सगळा व्यवहार पत्रव्यवहाराने चाले. घाऊक व्यापारी योग्य दरात, योग्य प्रतीचा माल पाठवेल, अशी दुकानदाराला खात्री असे आणि दुकानदार आपले पैसे देईल याचा घाऊक व्यापाऱ्याला विश्वास असे. सचोटीचा व्यवहार हा संस्कृतीचा, सभ्यतेचा भाग आहे.

ग्रामीण भागातील दुकानदार आणि ग्राहक यांचे नाते व्यवहारापलीकडचे असे. दूरवरून आलेल्या ग्राहकाला गूळ आणि पाणी, दोन विड्या खरेदीपूर्वीच मिळत. बरोबर असलेल्या पोरांना मूठ-मूठ चणे-फुटाणे मिळत. घरातील माणसांची चौकशी होई. मग खरेदी-विक्री. ग्राहक आणि दुकानदारांच्या घरातील लग्नकार्य, सुखदु:ख, अडीअडचणी यांची परस्परांशी बोलणी होत. अशा प्रकारे दुकानदार आणि समाजाचे आर्थिक व्यवहारापलीकडचे नाते असे.

औद्योगिकीकरणामुळे भांडवलदारांचे केवळ व्यक्तिगत नव्हे, तर भागधारकांचे संघटित भांडवल उत्पादन, व्यापार व अन्य सर्व व्यवहारात आले. त्यामुळे साधनसंपन्न भांडवलदारवर्ग आणि साधनरहित बृहद् समाज असे दोन समाजगट उभे राहिले. या पार्श्वभूमीवर साधनहीन समाजगटाने स्वत:चे समान प्रश्न सोडवण्यासाठी सहकारी संस्था उभारण्याचा नवा आकृतिबंध शोधून काढला. इंग्लंडमध्ये ग्राहक सहकारी चळवळीने त्याची सुरुवात झाली, जर्मनीमध्ये उत्पादक सहकारी संस्था उभारण्यात आल्या आणि भारतामध्ये शेतीसाठी पतपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थांनी भारतातील चळवळीचा पाया घातला. युरोप, अमेरिका, रशिया या सर्वच देशांत सहकारी चळवळ उभी राहिली. इस्रायलने या चळवळीचा आदर्श उभा केला. परंतु सर्वच देशांत ग्राहक सहकारी चळवळ उभी राहिल्याचे दिसते.

भारतातील 'ट्रिप्लिकन अर्बन को-ऑपरेटिव्ह' ही चेन्नईमध्ये स्थापन झाली, पण सहकारी चळवळीत अग्रभागी असलेल्या महाराष्ट्रातील ग्राहक सहकारी संस्था प्रामुख्याने मुंबईत उभ्या राहिल्या. मुंबईतील ग्राहक संस्था उभ्या करण्यामागे दोन महत्त्वाच्या घटना कारणीभूत झाल्या. स्वातंत्र्य मिळाल्याच्या कालखंडात देश जीवनावश्यक वस्तूंच्या टंचाईने ग्रस्त होता. वितरणाची स्वतंत्र व्यवस्था शासन उभी करू शकत नव्हते. म्हणून शासनाने लोकांना ग्राहक संस्था उभारण्यास प्रोत्साहन दिले. या संस्थांना रेशनिंग दुकाने मंजूर केली. त्यासाठी एका कायद्याद्वारे खाजगी मालकीचे दुकानाचे गाळे सहकारी संस्थांना उपलब्ध केले. त्यातून मुंबई शहरात जवळपास साडेतीनशे ग्राहक संस्था सुरू झाल्या. दुसरी घटना म्हणजे त्या काळात गिरणी कामगारांमध्ये समाजवादी विचारांचे कामगार संघटन होते. अशोक मेहता हे समाजवादी नेते गिरणी कामगारांचे पुढारी होते. त्यांनी कामगारांच्या संघर्षाबरोबर, रचनात्मक कामाला चालना दिली. त्यातून नायगाव-परेल विभागात मुंबई कामगार (पुढे 'अपना बाजार' म्हणून प्रसिद्ध पावलेली), सुपारीबाग, ग्राहक सहकारी, लव्हलेन ग्राहक सहकारी, ताडदेव ग्राहक सहकारी अशा अनेक ग्राहक संस्था उभ्या राहिल्या. कामगारांचा प्रामुख्याने सहभाग असलेल्या संस्थांबरोबर पुढील काळात कनिष्ठ मध्यमवर्ग व मध्यमवर्गानेही ग्राहक सहकारी संस्था काढल्या. त्यातूनच अपना बाजार, सुपारीबाग, साउथ इंडियन, सहकार बझार (वांद्रे), सहकारी भांडार (कुलाबा), मराठा मंदिर अशा प्रमुख संस्था उदयाला आल्या. ग्राहक पंचायत ही वितरण करणारी चळवळ उभी राहिली.

या संस्थांनी किरकोळ व्यापारात नव्या संस्कृतीची भर घातली. कारण तोपर्यंत खाजगी दुकानदारी व्यक्तिकेंद्री तर भांडवलशाही व्यवस्था भांडवलकेंद्री होती. सहकारी चळवळीने ती प्रथमच समाजकेंद्री झाली. भांडवली व्यवस्थेत भागभांडवलाला मत असते आणि ज्याच्याकडे अधिक भागभांडवल तो त्या कंपनीवर आधिपत्य मिळवतो. परंतु सहकारी व्यवस्थेत प्रत्येक सभासदाला एक मत असते, त्याचा भागभांडवल धारणेशी संबंध नसतो. समान गरजा असणाऱ्यांची एकत्र येऊन संस्था उभारलेली असते. त्यामुळे नफ्यासाठी नव्हे, तर समान गरजा भागवण्यासाठी भांडवल एकत्र केलेले असते. अशा प्रकारे या संस्थांची प्रेरक शक्ती केवळ भांडवल नसते तर समान गरज ही असते. ग्राहक संस्था उभारण्यासाठी ग्राहक भागभांडवल घेतात, त्याचबरोबर सहकारी दुकान सुरू झाल्यावर खरेदी करण्याची हमीही देतात आणि त्याच पायावर संस्था उभी राहते आणि चालते. अशा प्रकारे सामूहिक जीवनाचा आर्थिक आविष्कार हे सांस्कृतिक उन्नयन असते.

सहकारी चळवळीच्या माध्यमातून प्रक्रिया संस्था, पणन संस्था, घरबांधणी, पतसंस्था, बँका, उत्पादन संस्था, मजूर संस्था, सूतगिरण्या, साखर कारखाने अशा अनेक क्षेत्रांत नेत्रदीपक कार्य झालेले दिसते. शोषक भांडवलदारी व्यवस्था आणि सर्वंकष साम्यवादी व्यवस्था यांना पर्यायी समतावादी व्यवस्था म्हणून तिचा उदय झाला. समाजवादी चळवळीने तिचा प्रामुख्याने पाठपुरावा केला. लोकशाहीचा राजकीय आकृतिबंध

स्वीकारल्यावर, आर्थिक व्यवस्थेचा प्रश्न पुढे आला. आर्थिक व्यवस्था सरंजामी, खाजगी व भांडवलशाही ठेवून राजकीय लोकशाही अर्थपूर्ण होऊ शकत नाही. म्हणून आर्थिक व्यवस्थेचे लोकशाहीकरण करण्याचा एक मार्ग म्हणून सहकारी व्यवस्थेकडे बघितले गेले. त्यामुळे भारताने स्वीकारलेल्या मिश्र अर्थव्यवस्थेच्या आकृतिबंधात खाजगी, सार्वजनिक व्यवस्थेबरोबर सहकारी व्यवस्थेचाही समावेश करण्यात आला. दुर्दैवाने ही चळवळ योग्य दिशेने पुढे गेली नाही व हितसंबंधितांनी तिच्यावर ताबा मिळवला, हे सर्वश्रुत आहे.

सुरुवातीला वितरणापुरती मर्यादित असलेली ग्राहक चळवळ पुढे विस्तारित झाली व केवळ जीवनावश्यक वस्तूच नव्हेत, तर सर्व ग्राहकोपयोगी वस्तूंच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार करू लागली. जेव्हा किरकोळ व्यवसायात मॉल संकल्पनेची चर्चाही नव्हती त्यावेळी मुंबईमध्ये, तेही नायगावसारख्या-गिरणगावात - 'अपना बाजार'चे चारमजली डिपार्टमेंटल स्टोअर सुरू करण्यात आले. दिल्लीला सुपरबझार उभे राहिले. चिंतामणी, कामधेनु या दक्षिणेत उभ्या राहिल्या. जवळजवळ सर्व मोठ्या शहरांत अशा प्रकारची सकलवस्तूभांडारे सुरू झाली. या बदलामागे ग्राहकाच्या बदलत्या गरजा हे एक प्रमुख कारण होते. केवळ जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे पुरेसे नव्हते. औषधे, कापड, इलेक्ट्रिकल, भांडी, रेडिओ, घड्याळे, प्लॅस्टिक अशा सर्वच वस्तूंचे दर आणि प्रत यांची ग्राहकाला खात्री नव्हती. या वस्तूंवरील ग्राहकाचा खर्च वाढत होता. ग्राहकाने श्रमाने कमावलेल्या उत्पन्नाचा त्याला पुरेपूर मोबदला मिळण्याचा त्याचा हक्क होता. Value for money असा आज परवलीचा शब्द झाला आहे. पण तो १९६१ ते १९८०च्या कालखंडात सर्वाधिक महत्त्वाचा आणि अर्थपूर्ण होता. त्यासाठी अपना बाजारसारखी डिपार्टमेंट स्टोअर्स सहकारी चळवळीने उभी केली गेली. भेसळयुक्त अन्नाइतकाच बनावट औषधे आणि डुप्लिकेट, कमी दर्जाच्या वस्तूंचा बाजारात सुळसुळाट होता. त्यासाठी ग्राहकांनीच चालवलेली विश्वासार्ह भांडारे हा एकमेव पर्याय होता. यातूनच अपना बाजारसारख्या संस्थांनी डाळ मिल, दूध डेअरी आणि लोणचे, मसाले कारखाना सुरू केला.

जागतिकीकरणानंतर नव्या मध्यमवर्गाचा उदय झाला. कामगारवर्गाचीही क्रयशक्ती वाढली आणि नव्या ग्राहकवर्गाचा उदय झाला. किंमत हा महत्त्वाचा प्रश्न राहिला नाही. मॉल हे नवे Entertainment Destination (विरंगुळ्याची जागा) म्हणून ग्राहकवर्गाने स्वीकारले आणि ग्राहक सहकारी चळवळीवर प्रश्नचिन्ह लागले. सांस्कृतिक अंगाने विचार करता सहकारी चळवळीने घडवलेले सामाजिक परिवर्तन विसरता येणार नाही. साखर कारखाने, दुग्ध संस्था, पतपेढ्या, बँका यांच्या माध्यमातून केवळ राजकीय नेतृत्व पुढे आले असे नाही, तर बहुजन समाजाला आर्थिक व्यवहाराचा अनुभव मिळाला आणि व्यापारउद्योगात त्याने पदार्पण केले.

अपना बाजार व गिरणगावातील अन्य ग्राहक सहकारी संस्थांमध्ये गिरणी कामगारांचीच मुले प्रामुख्याने सेवकवर्गात होती. महिन्याला पंधरा-वीस लाखांची उलाढाल करणाऱ्या दुकानांचे व्यवस्थापन करणे, डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये कोट्यवधी रुपयांची खरेदी-विक्री करणे, त्यांचे हिशेब ठेवणे, विक्रीतंत्र आत्मसात करणे हे याच सेवकवर्गाने केले. सुशिक्षित, पदवीधर ग्राहक सहकारी संस्थेत कामाला येत नव्हते तेव्हा हा प्रचंड व्यवहार केवळ अनुभव शिक्षणातून कामगारांच्या पुढच्या पिढीने केला. अशा प्रकारच्या व्यवसायाची परंपरा नसलेल्या नव्या पिढीसाठी हे एक सांस्कृतिक मन्वंतरच होते; ज्याचे भान कदाचित त्यांना स्वत:लाही नसेल.




किरकोळ व्यापार आणि ग्राहकाची क्रयशक्ती यांचा जवळचा संबंध असल्याने औद्योगिकीकरणाच्या सुरुवातीच्या काळात, कामगारांचे वेतन वाढवून क्रयशक्ती वाढवण्याचा प्रयत्न ज्याप्रमाणे कामगार संघटनांनी केला त्याचप्रमाणे रॉशडेल पायोनियर्सनी इंग्लंडमध्ये पहिल्या ग्राहक मंडळी सहकारी संस्थेची स्थापना केली. अशा प्रकारे औद्योगिक समाजव्यवस्थेत किरकोळ व्यापाराचे महत्त्व वाढू लागले आणि किरकोळ व्यापार हा अर्थव्यवस्थेचा

महत्त्वाचा घटक बनू लागला.

जागतिकीकरणानंतर सर्वच क्षेत्रांत बदल झाले. पाश्चिमात्य देशांना त्यांच्याकडील अनुत्पादक भांडवल आणि अतिरिक्त उत्पादन विकण्यासाठी नव्या बाजारपेठांची गरज होती. डंकेल प्रस्ताव, गॅट करार, वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन यांच्या माध्यमातून भांडवलाचा मुक्त संचार करता येऊ लागला. सर्व प्रकारच्या परदेशी वस्तूंच्या आयातीला मुभा मिळाली. पेटंटच्या कायद्यात बदल झाले. ऐंशीनंतर सुरू झालेल्या आणि नव्वदनंतर गतिमान झालेल्या या प्रक्रियेत, वित्तक्षेत्र, वस्तूनिर्माण क्षेत्र, संगणकक्षेत्र, करमणूक, वीज उत्पादन, बांधकाम अशा अनेक क्षेत्रांत विदेशी भांडवल, तंत्रज्ञान व उत्पादने आली. यातील शेवटचा टप्पा हा किरकोळ व्यवसायाचा आहे. कारण भारतातील अन्य क्षेत्रांत अगोदरच कंपनीकरण किंवा कॉर्पोरेटायझेशन झालेले होते. त्यामुळे प्रस्थापित कंपन्यांच्या भांडवलात गुंतवणूक करून किंवा जॉईंट व्हेंचर करून प्रस्थापित सुविधांचे जाळे, मार्केटिंगचे जाळे यांचा उपयोग करून लवकर नफा कमावणे शक्य होते. परंतु अशी संस्थात्मक रचना किरकोळ व्यवसायात नव्हती. खाजगी असला तरी व्यक्तिगत मालकीचा हा व्यवसाय विकेंद्रित होता. परंतु भारतातील प्रचंड लोकसंख्या, वीस टक्के मध्यमवर्गाची संख्याही वीस कोटींवर जाणारी, म्हणजे युरोपमधील अनेक देशांपेक्षा मोठी, नऊ टक्क्यांवर गेलेला विकासवेग हे लक्षात घेऊन भारतीय भांडवलदारांनीच संघटित किरकोळ व्यवसायात गुंतवणुकीला सुरुवात केली. उदा. बिगबाझार, मोर अशा मॉल्सची साखळी उभी राहू लागली. परदेशी गुंतवणुकीला भारतीय भांडवलदारांनीच विरोध केला. कारण परदेशी कंपन्या येण्यापूर्वी इथल्या मोक्याच्या जागा (Retail space) त्यांना काबीज करायच्या होत्या. शेअर बाजारात उतरायचे होते आणि त्यानंतरच परदेशी गुंतवणूक या क्षेत्रात यावी अशी त्यांची व्यूहरचना आहे. कारण त्यामुळे परदेशी कंपन्यांना स्वतंत्र मॉल उभारायला फारसा वाव राहणार नाही आणि भारतीय कंपन्यांशी भागीदारी, गुंतवणूक करावी लागेल किंवा त्या विकत घ्याव्या लागतील.

परंतु भारतीय किंवा विदेशी मॉल संघटित उद्योगांबरोबरच सांस्कृतिक वादळही येणार आहे, आले आहे. मुख्य आघात अन्नसंस्कृतीवर होत आहे. पारंपरिक दुकानदार स्थानिक गरजा भागवण्यासाठी दुकानदारी करत. गरजा निर्माण करणे व अनावश्यक वस्तूंची विक्री वाढवणे हे त्यांचे उद्दिष्ट नव्हते. साहजिकच स्थानिक उत्पादनांची विक्री करणे आणि अन्य उत्पादने आजूबाजूच्या प्रदेशांतून, शहरांतून आणणे हा त्यांचा परिपाठ होता. ग्राहकांचा भर स्थानिक उत्पादनाच्या व त्यापासून बनणाऱ्या वस्तूंच्या वापरावर होता. म्हणून शहरातील बिस्किटे गावात पोचली तरी स्थानिक पाव-बटरला जास्त मागणी असे. लाडू, चिवडा, शंकरपाळे, कडबोळीला मागणी असे. चिक्की बनवणारे ठिकठिकाणी होते. चणाडाळ, शेंगदाणा, कुरमुरे, लाडू, फरसाण संपे. भाजलेले चणे व शेंगदाणे हा खास खुराक होता. घरोघर साबुदाणा खिचडी, थालीपीठ, इडली, डोसे, शिरा, उपमा, कांदेपोहे अशा पदार्थांच्या जोडीला वरील तयार पदार्थांचा समावेश असे. सणासुदीसाठी श्रीखंड, बासुंदी, मिठाया, जिलेबी, बुंदी लाडू तयार मिळण्याची सोय होती. मसाले, चटण्या, लोणची, जाम, सरबते यांना मज्जाव नव्हता. अशा प्रकारे एका बाजूला समतोल आहार, दुसरीकडे श्रम वाचवणारे लोणची-पापडासारखे तयार पदार्थ तर तिसरीकडे सणासुदीसाठी आणि गमतीखातर खाण्याचे पदार्थ यांची रेलचेल होती. म्हणजे भारतीय अन्नसंस्कृती संपन्न चवीची होती आणि समाजातील सर्व लोक कमीअधिक प्रमाणात त्याचा घटक होते.

मॉल, अन्नसंस्कृतीत मुळातच बदल घडवून आणत आहे. धान्ये, डाळी, कडधान्ये, भाज्या यांच्या भाजलेल्या, शेकलेल्या, शिजवलेल्या, तळलेल्या पदार्थांऐवजी मुख्यत: मैदा, मक्याचे पीठ, सोयाबीन, बटाटे, लोणी, चीज, पनीर या पाश्चिमात्य पदार्थांचा वापर वाढत आहे. चपाती, रोटीऐवजी पाव मुख्य अन्न बनत आहे. मॅकडोनाल्ड, केंच्युकी चिकन, सबवे सँडविचेस, पिझ्झाहट, कॅफे कॉफी डे यांच्या साखळ्या उभ्या राहत आहेत. ही सर्व पदार्थ फॅशन स्टेटमेंट झाली आहेत. इतकेच नव्हे, तर पारंपरिक भारतीय अन्नपद्धतीला त्या पर्याय होत आहेत. नूडल्स आता चायनीज रेस्टॉरंटपर्यंत मर्यादित न राहता साउथ इंडियन हॉटेल्स, पंजाबी हॉटेल्स रस्त्यावरच्या गाड्यापर्यंत पोचल्या आहेत. बर्गरचे भारतीय रूप म्हणून वडापाव सार्वत्रिक होणे हा सांस्कृतिक आक्रमणाचा पुरावाच मानावा लागेल. कारण हे अति फॅट असलेले, मैदा, बटाट्यांचा अतिरिक्त वापर करणारे, तळलेले अन्न, आज आरोग्याला हानिकारक ठरत आहे आणि ओबेसिटीच्या रोगाचे कारण ठरत आहे.

पाश्चिमात्य देशांत त्यांच्या चुकीच्या अन्न सवयीच्या दुष्परिणामांच्या विरोधात चळवळ उभी राहत आहे. मॅकडोनाल्डसारख्या रेडी फूड विकणाऱ्या कंपन्यांना त्याची दखल घ्यावी लागत आहे. मॅकडोनाल्डने मुलांच्या डिशमधील फ्रेंच फ्राइज- तळलेल्या बटाट्यांचा वापर कमी करून त्याऐवजी सफरचंदाचा सहभाग करण्याचे जाहीर केले आहे. त्याचवेळी भारतात मात्र या पदार्थांचा वापर वाढतो आहे. या खाद्यसंस्कृतीच्या परिणामी इथल्या उत्पादनव्यवस्थेतही बदल घडवून आणले जात आहेत. ब्रोकोली, रंगीत ढोबळी मिरच्या अशा पाश्चिमात्य भाज्यांकडे शेती वळवली जात आहे. पदार्थ तयार करण्याऐवजी, तयार पदार्थ ग्राहकांनी घ्यावेत असा प्रयत्न

आहे. पदार्थ तयार करण्याच्या पारंपरिक पद्धतीत सुलभता आणणे वेगळे आणि त्या ऐवजी तयार पदार्थांचा खप वाढवणे वेगळे. बदलत्या खाद्यसंस्कृतीमुळे शेती उत्पादनावरही हळूहळू परिणाम होणार आहेत.

मॉलमध्ये भरपूर निवड मिळते हे त्याच्या यशाचे एक प्रमुख कारण असते. पारंपरिक धान्य दुकानात चारशे-पाचशे वस्तू असतात तर फूड मॉलमध्ये त्यांची संख्या सात-आठ हजारांवर जाते. प्रदर्शन पद्धतीने मांडणी आणि स्वयंसेवा यांच्यामुळे ग्राहक गरजेपेक्षा कितीतरी अधिक खरेदी करतो आणि अर्थात अधिक ग्रहणही करतो. कारण इथे ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नव्हे, तर निर्माण करण्यासाठी आणि त्यातून विक्रीवाढ करण्यासाठी दुकानदारी केली जाते. विशेष असे, की ग्राहकाला हे आपल्या हितासाठीच आहे असे वाटत राहते. उत्पादकाची, कामगाराची भूमिका बजावणारा समाज, नकळत कामगारवर्गाऐवजी ग्राहकवर्ग होऊन जातो. समाजच तेव्हा ग्राहकवर्ग बनतो जेव्हा तो सगळे विचार ग्राहक म्हणून करू लागतो, तीच मोजपट्टी जीवनाच्या सगळ्या अंगांना लावू लागतो. तो मुलांच्या शिक्षणाकडे त्याच अंगाने बघतो आणि मुलेही प्रॉडक्ट बनतात. शेतीतील नफा-तोटा, किरकोळ दुकानदारांवरील अरिष्ट, जमीन व पाण्यावरील आक्रमण हे सगळे त्याच्यालेखी त्याचे प्रश्न राहत नाहीत. पैसे कमावणे व पैशाचा उपभोग घेण्याचेच तत्त्वज्ञान सर्वमान्य होते. त्याशिवायच्या सर्व चर्चा गैरलागू व फालतू ठरू लागतात. या सगळ्या बदलाला केवळ मॉल जबाबदार आहेत अशी टोकाची भूमिका घेता येणार नाही. पण या सांस्कृतिक आक्रमणाचा म्होरक्या मॉल आहे, हेही विसरता येणार नाही. यातील गुंतागुंत म्हणजे वाढत्या क्रयशक्तीबरोबर मॉल माध्यमातून तिचा वापर वाढवला, की राष्ट्रीय उत्पन्नवाढीला हातभार लागतो.

आर्थिक-सामाजिक बदलाप्रमाणे किरकोळ व्यवसायातील बदलही अपेक्षितच आहेत. शेती समाजातील दुकानदारी, शिवाजीकालीन चारी बाजूंनी उघड्या ओट्यावरील दुकाने, औद्योगिक व्यवस्थेत दिसेनाशी झाली. घोड्यावर बसून खरेदी करण्याचा कालखंड संपला. आठवडी बाजार, घाऊक बाजार, मटन विकणाऱ्यांची स्वतंत्र आळी, मासळी बाजार, भाज्या फळांच्या मंड्या, ज्वेलरी दुकानांचा बाजार, कापड बाजार, भांडी बाजार, औषध, स्टेशनरी, कटलरी, पादत्राणे यांचे घाऊक बाजार असे एक किरकोळ व घाऊक व्यवसायाचे एक नवे विश्वच उभे राहिले. सगळा व्यापारीवर्ग उर्ध्वगामी वाटचाल करीत होता. जुने पुढे जात होते, नवे सामावले जात होते, पूर्वी प्रामुख्याने वैश्य समाजापुरत्या मर्यादित असलेल्या या व्यवसायात इतर जातीही उतरत होत्या. त्यात ब्राह्मण आले,




तसेच ओबीसीतील अनेक घटक व्यापार करू लागले आणि आता कुठे दलित तिकडे वळू लागले. बेताचे शिक्षण असले तरी घरात दोन पैसे असले तर व्यापाराकडे त्या वेळची तरुणपिढी वळत असे. नागरी वस्तीची वाढ आणि वाढते उत्पन्न, वाढत्या गरजा, बाजारात येणारी नवीन उत्पादने यामुळे या व्यवसायाला भरभराट आली होती. शिक्षणात मागे पडलेला आणि नोकऱ्यांची संधी नसलेल्या मुस्लिम समाजालाही किरकोळ व्यवसायाने हात दिला. अर्थात त्यांच्यामध्येही व्यापारीवृत्तीच्या बोहरी समाजाचा पुढाकार राहिला. अशा प्रकारे किरकोळ व्यवसायाला अनेक सामाजिक-सांस्कृतिक पदर आहेत.

घरोघर आणि वस्ती वस्ती, गाव गाव फिरून होणारा फेरीवाल्याचा धंदा, आता महानगर, नगर, जिल्हा, तालुक्याच्या बाजारपेठांमध्ये स्थिरावलेला दिसतो. या व्यावसायिकांना फेरीवाला म्हणायचे कारण, सकाळी रस्त्यावर माल लावायचा आणि रात्री सगळे गोळा करून घरी जायचे; हा त्यांचा नित्यक्रम. या व्यवसायात अल्पशिक्षित, अल्प भांडवल असलेले, साधनरहित, स्थलांतरित यांचा समावेश आहे. एकेकाळी खानावळी चालवणे हा गरजू स्त्रियांचा आर्थिक आधार होता, त्यांना आता रस्त्यावर फेरीवाल्यांचा धंदा हा पर्याय झाला आहे. या धंद्याला मालपुरवठा करणारी, उत्पादन करणारी एक समांतर व्यवस्थाच उभी आहे हे लक्षात येत नाही. रिमोल्ड प्लॅस्टिक वस्तू, प्लॅस्टिक चपला, हलक्या प्रतीचे कपडे, स्वस्त सौंदर्य प्रसाधने, कापड, साड्या, खाण्याच्या वस्तू, बिस्किटे, जुने कपडे, खेळणी, भाजीपाला, धान्य-कडधान्ये, भांडी असा हा उत्पादन-वितरण-विक्रीचा प्रचंड विस्तार आहे. क्रॉफर्ड मार्केटला जशी कटलरी-स्टेशनरीची बाजारपेठ आहे, तशी कुर्ला पश्चिमेला अशा स्वस्त वस्तूंची घाऊक बाजारपेठ आहे.

मानव समाजातील स्थित्यंतराप्रमाणे त्यांच्याशी जोडलेल्या सर्व व्यवस्थांमध्ये ही स्थित्यंतरे होत आली. शेती, उत्पादन, घरबांधणी, व्यापार यांच्यात झालेले बदल, हे बदलत्या परिस्थितीशी जोडलेले होते. एका अर्थाने हे नाते जैविक होते व त्यामुळे स्थित्यंतरे देखील जैविक होती. नगरांचा

आणि शहरांचा उदय व विकास ही देखील जैविक क्रिया मानली जाते. म्हणून वरील सर्वच बाबींचा संबंध भूविभागाशी, तेथील हवामान, पाऊसपाणी, मनुष्यवस्ती यांच्याशी येतो व प्रदेशानुरूप बदल दिसून येतात. ज्याला त्या त्या प्रदेशाची संस्कृती म्हणून ओळखली जाते. म्हणूनच किरकोळ व्यापार हा अर्थशास्त्राचा विषय नसतो तर भूगोलाचा विषय असतो. आता तर Geo economics भू प्रदेशासंदर्भातील अर्थशास्त्राची शाखाच विकसित झाली आहे.

जागतिकीकरणानंतर आलेली मॉलची साखळी ही जैविक प्रक्रिया खंडित करणारी आणि सांस्कृतिक वाटचालीवर आघात करणारी आहे. मुळात मॉलच्या रूपाने किरकोळ व्यवसायाचे होणारे कार्पोरेटायझेशन हा नैसर्गिक बदल नसून आघाती बदल आहे. समाजाच्या बदलत्या आणि वाढत्या गरजा भागवण्यासाठी पर्याय नव्हता असे नाही. वास्तविक बदलत्या गरजांना सामोरे जाणारे बदल या क्षेत्रातही होतच होते. त्यातूनच पश्चिम दादरमध्ये साड्यांची, तयार कपड्यांची, मुलांच्या कपड्यांची बाजारपेठ विकसित झाली. हिंदमाता-परेल विभागात प्रथम प्रवासी बॅगेजची दुकाने आली व त्याची जागा आता रेडीमेडने घेतली. उपनगरातही अशा बाजारपेठा विकसित झाल्या. पुणे, नाशिक, औरंगाबादसारख्या शहरातही या प्रक्रिया घडल्या. परंतु या सगळ्यामागे ग्राहकांच्या बदलत्या गरजा, वाढती क्रयशक्ती, वाढती मागणी या प्रेरक शक्ती होत्या. या प्रक्रियेत या व्यवसायातील लोकांची उर्ध्वगामी वाटचाल होत होती. नवनवीनांना सामावून घेतले जात होते. पण मॉल साखळी झाल्यावर ही सर्व प्रक्रिया बंद पडली नाही, तरी मंद होणार हे निश्चित! पुढच्या काळात जीवनावश्यक वस्तूंची दुकानदारी जरी तग धरून राहिली तरी तिच्यात विकास क्षमता राहणार नाही. कपडे, इलेक्ट्रॉनिक्स, ज्वेलरी, सौंदर्य प्रसाधने, उपकरणांची नवी दुकानदारी करणे कठीण होणार आहे. कारण मॉल हा किरकोळ व्यवसायातील नैसर्गिक जैविक प्रक्रिया नसून आघाती बदल आहे. याचे कारण गरजा भागवणे ही मॉलची प्रेरणा नसून भांडवलाची गुंतवणूक ही त्याची प्रेरकशक्ती असते. त्यामुळे गरजा भागवण्यापेक्षा गरजा निर्माण करण्यावर भर द्यावा लागतो आणि स्पर्धक संपुष्टात आणणे अपरिहार्य ठरते.

मुळात मॉल हा केवळ किरकोळ विक्रीव्यवसाय नाही. उत्पादन प्रक्रिया, वितरण, विक्री या सर्वांवर ताबा मिळवण्याची ती व्यवस्था आहे. मॉल हा या साखळीतील फक्त दृश्य भाग आहे. म्हणून त्याला फ्रंट एन्ड म्हणून संबोधले जाते. या व्यवसायात प्रत्यक्ष किरकोळ विक्रीत जेवढा नफा आहे त्याच्यापेक्षा कितीतरी अधिक नफा, बॅक एन्ड म्हणजे मालाच्या खरेदीमध्ये आहे. मॉल साखळीचा एकूण व्यवहार एवढा मोठा असतो, की घाऊक व्यापाऱ्यांना बाजूला करून ते शेतकऱ्याकडून थेट खरेदी सुरू करतात, नंतर कोणत्या प्रतीचा आणि कोणती शेती शेतकऱ्यांनी करावी ते ठरवू लागतात, घाऊक व्यापार संपल्यावर शेतकरी केवळ या मॉल साखळ्यांवर अवलंबून राहू लागतात आणि यातूनच करारी शेतीपर्यंत वाटचाल होऊ शकते. शेतीमालाचा प्रक्रिया उद्योगही मॉलच्या ताब्यात जातो. मॉलच्या व्यवसायाचा विस्तार झाल्यावर अनेक मॉलच स्वत:चे ब्रॅण्ड काढून उत्पादकांना अडचणीत आणतात, नाहीतर त्या धाकाखाली आपला नफा वाढवून घेतात. मॉलचा खरा नफा हा अशा प्रकारे बॅक एन्डमध्ये असतो. यातून शेतकऱ्यांचे हित साधले जाईल असे सांगितले जाते आणि तीच भलामण शासनव्यवस्था करते. जी आता किरकोळ व्यापारात परदेशी कंपन्यांना प्रवेश देण्यासाठी केली जात आहे. अशा प्रकारे कृषिव्यवस्थेतही हस्तक्षेप करण्याची आणि उत्पादक-घाऊक व्यापार-किरकोळ व्यापार यांचे केंद्रीकरण करणारी ही प्रक्रिया आहे. या व्यवसायातील बहुराष्ट्रीय कंपन्यांनी लॅटिन अमेरिकेत काय धुमाकूळ घातला आणि अनेक युरोपीय देशांना त्यांच्यावर नियंत्रण करण्यासाठी कसे कायदे करावे लागले; याबद्दल पुरेसे लिखाण उपलब्ध आहे.

मानव समाजाचा इतिहास हा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक बदलाचा इतिहास आहे. त्यामुळे किरकोळ व्यवसायात बदल होणे यात अनपेक्षित काही नाही. पण कृषिसंस्कृतीपासून सुरू झालेली आणि औद्योगिक समाजामध्ये विकसित झालेली किरकोळ व्यापाराची संस्कृती, आता संगणक आणि संवादक्रांतीवर स्वार होऊन आलेल्या वित्तीय भांडवलशाहीच्या नव्या रचनेत, पुढील काळात लयाला जाईल हे स्पष्ट आहे. आजवर समाजाच्या विविध स्तरांतील सामान्य माणसांना मोठ्या प्रमाणावर सामावून घेणारी ही व्यवस्था, त्यांच्या कक्षेपलीकडे जाईल आणि अजूनपर्यंत खाजगी असला तरी भांडवली नसलेला हा व्यवसाय भांडवलदारांच्या आणि भांडवलाच्या हाती जाईल. किरकोळ व्यवसायात उतरलेल्या राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे भागधारक आपणच सर्वसामान्य असू, आपल्याच भांडवलावर औद्योगिक साम्राज्याप्रमाणे किरकोळ व्यवसायाची साम्राज्ये उभी राहतील, पण त्याचे चालक आणि मालक मात्र भांडवलदार वर्ग असेल. किरकोळ व्यवसायातील या सांस्कृतिक घटिताचे आपण साक्षीदार असू, एवढेच!

**– गजानन खातू**
३/७५ त्रिमूर्ती, सायन-चुनाभट्टी, मुंबई-४०० ०२२
भ्रमणध्वनी : ९८९२८२१०५६

# 'ब्रँड' न्यू स्टोरी

अपर्णा चवाथे

प्रत्येक व्यक्तीला कशाची ना कशाची 'गरज' असते. ह्या गरजा खरोखरीच कधी आवश्यक असतात, तर काही गरजा या नसल्या तरी चालणाऱ्या असतात, पण त्या 'तयार' केल्या जातात. व्यक्तिगत, सामाजिक, इतरांना स्फूर्ती देणाऱ्या, व्यावसायिक, वेगळ्या जीवन पद्धतीची धाटणी असलेल्या अशा साऱ्या व्यक्ती/प्रतीकांना हाताशी धरून 'गरजां'ची निर्मिती केली जाते. वाढती महत्त्वाकांक्षा आणि बदलती जीवनशैली यामुळे पूर्ण होणाऱ्या आणि (तरीही) नेहमीच अपूर्ण वाटणाऱ्या 'गरजां'ची नव्यानं त्यात भर पडत राहते. थोडक्यात 'ब्रँड'ची नवनवीन रूपं दिसू लागतात.

**ही** स्टोरी आहे माझ्या उत्कट छांदिष्ट वेडाची आणि हे वेड आहे बाजाराला व्यापून व गिळून टाकलेल्या आणि लहान मुलापासून उच्चशिक्षितांना झपाटलेल्या वस्तूंच्या ब्रँडच्या अस्तित्वाचं. लहानपणापासूनच कळत-नकळत आपल्या जगण्याला एकेक ब्रँड चिकटत जातो. परिणामी, व्यक्ती गरीब असो वा श्रीमंत, त्याच्या लहानमोठेपणाचं मोजमाप मग होऊ लागतं, त्यांनी स्वीकारलेल्या ब्रँडवरून.

ब्रँड म्हणजे आवड, आग्रही निवड, प्रतिष्ठेची निशाणी, विश्वासाची पावती आणि सारं सारं काही. जेव्हा या साऱ्यांना हातात हात घालून सकाळपासून संध्याकाळ-रात्रीपर्यंत मी जळीस्थळी पाहते तेव्हा या ब्रँडच्या इतिहासाचा व त्याला फुलवणाऱ्यांच्या कल्पकतेचा अभ्यास करण्याचं माझं वेड अजूनच वेडं होतं. आपण या ब्रँडच्या विळख्यात किती आहोत हे माझं मलाच, स्वतःच्या घरात त्रयस्थपणे डोकावलं तरी जाणवतं.

माझा ब्रँड दिवस सुरू होतो तोच मुलीच्या शाळेच्या वेळेपासून. मी तिला ओरडून विचार असते, तू आता 'केलॉग' घेणार आहेस की 'मॅगी'? तिचा बाथरूममधून आवाज येतो, मम्मा माझा डोव्ह संपला आहे, मी आता आंघोळ कशी करू? हे सांभाळताना नेहमीच घाईगर्दीत असलेला नवरा माझी 'होंडा सिटी'ची किल्ली कुठेय म्हणून इकडेतिकडे फिरत असतो. सगळं कसंबसं उरकून मी ऑफिसला निघते तो सासुबाई आठवण करून देतात, तुझा 'ब्लॅकबेरी' इथंच राहिला आहे.

आपल्या सर्वांचे, मग ते पुरुष असो स्त्रिया असोत आणि कुठल्याही थरातील असोत, दिवस हे असेच ब्रँडचा पुकारा करत उजाडतात-मावळतात. काही ठिकाणी हा फक्त ब्रँड नसतो तो 'माझा स्वत:चा' (खास) ब्रँड, माझं इतरांपेक्षा वेगळेपण दाखवणारा असतो.

मुंबईच्या सेंट झेवियर्स महाविद्यालयातून इंग्रजी साहित्य हा विशेष विषय घेऊन मी पदवीधर झाले, पण पुढे काय? मी अडखळत राहिले. कॉलेजच्या वास्तूनं माझे प्राध्यापक/प्राध्यापिका आणि मित्र-मैत्रिणी यांच्या सहवासानं मला कॉलेज

सोडून जाणं जिवावर आलं आणि म्हणून साऱ्या शक्यतांचा विचार करत राहिले. मला भाषेवर बऱ्यापैकी प्रभुत्व आलं होतं, म्हणून इंग्रजी साहित्याचं त्यावेळी मी भरपूर वाचन केलं, पण प्राध्यापकी करण्याचं मला भावलं नाही. त्या वेळेपासूनच मला या ब्रँडस्‌नी वेड लावलं होतं. माझी निरीक्षणशक्ती सारे ब्रँड टिपत होती. अमुक ब्रँडचीच सिगारेट ओढणारे प्राध्यापक व 'कोक'ला हात न लावता फक्त 'पेप्सी'वर विश्वास असलेल्या प्राध्यापिका या साऱ्यांमागे ब्रँडची शक्ती किती जबरदस्त आहे हे मला जाणवायचं आणि त्यातूनच मी झेवियर इन्स्टिट्यूटचा दोन वर्षांचा अभ्यासक्रम संपवून जाहिरातीच्या जगात प्रवेश करती झाले.

मला वाटतं, मी बावीस वर्षांची होते. आग्रीपाडाच्या 'Enterprises Nexus' या मोठ्या जाहिरात कंपनीत मला नोकरी मिळाली आणि 'AD-MAD-WORLD' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या व्यवसायात मी आले, जाहिरातक्षेत्राचं वास्तव मी जवळून समजावून घेऊ लागले. मी ब्रँड हे माझं आवडीचं क्षेत्र शोधण्याचा प्रयत्न करत होते, पण एकूणच साऱ्या किंवा बऱ्याचशा जाहिरात उद्योग विश्वाचासुद्धा एक ठरावीक साचा मला जिथे-तिथे प्रकर्षानं दिसू लागला. लांब केस वाढवलेले पुरुष आणि बॉब केलेल्या मुली. कोणत्याही कपड्यांमध्ये अगदी घरी असल्यासारख्या. तर ग्राहकांशी बोलणारे संपूर्ण टाय-सुटाबूटात. हा विरोधाभास मला जाणवूनही फारसा त्रासदायक व्हायचा नाही. पण एजन्सी किंवा व्यवसायाचे मुख्य आधारस्तंभ असलेल्या दोन विभागांत, ग्राहकसेवा (Client servicing) आणि प्रत्यक्ष कलानिर्मिती करणारे (Creativity) यांच्यात असलेली अलगतेची, व्यक्तिगत अहंपणाची भावना एकूणच ब्रँड उभारणीला घातकच नाही तर त्या ब्रँडचं अस्तित्वच संपवणारी आहे, हे मला राहूनराहून वाटायचं. ग्राहकसेवेतील कुणी चांगली कल्पना, अफलातून वाक्यरचना, एखादं छोटंसंच पण समर्पक व्यंगचित्र, बरोबर अचूकतादर्शक शब्द जरी सुचवला तरी, तो स्वीकारण्याऐवजी वा किमान विचारात घेण्याआधी, कलेतील मला सांगणारा, शिकवणारा हा कोण असा अहंभाव प्रकट व्हायचा. यामुळे खरं तर ते सारं मला उबग आणणारं वाटायचं. मला हा भेदभाव वाटायचा. वाक्‌चातुर्य असलेले, नीटनेटके फक्त ग्राहकांबरोबर, सतत अदबशीर वागणाऱ्यांच्या हातात वा मर्जीवर एखाद्या ब्रँडचं भवितव्य असायचं. माझी अस्वस्थता वाढायची. जाहिरात व्यवसायात एकावर एक अवलंबून असलेली ही खाती, एकत्र राहूनही परकेपणाची अलगतेसारखी वाटायची.

ब्रँडचा माझा ध्यास इथे पूर्ण होत नव्हता आणि त्यामुळेच आपण नक्की काय करायचं हे माझ्या मनानं पक्कं केलं. कोणतंही चित्र किंवा रेखा कागदावर रेखाटण्यात मी कच्ची होते, पण माणसं वाचण्यात मी पक्की होते. माणसांच्या मोठ्या घोळक्यांत राहून त्यांचं अंतरंग जाणून घेण्यात मला अडचण यायची नाही. अमुक पद्धतीनं अमुक वेळेत विशेषत: खरेदीच्या वेळी माणसं कशी निर्णयाला येतात ह्याचा हुकमी अंदाज ज्याला येतो त्याचा ब्रँड हा यशस्वी, जगावेगळा ठरतो हे ब्रँड यशस्वितेचं सूत्र मनात पक्कं घर करून गेलं.



ब्रँडचा आरंभ - आपली गुरं शोधण्यासाठी मारलेला शिक्का

वर्षामागून वर्षं गेली आणि ब्रँड अभ्यास अनुभवात मी श्रीमंत होत गेले. मनुष्याच्या मानसशास्त्रीय बैठकीची नाडी मला सापडली, जी कोणताही ब्रँड प्रस्थापित करायला फार फार अगत्याची असते.

शेवटी ब्रँडिंग म्हणजे काय, तर मनुष्यसमूहाची ग्रहणक्षमता प्रथम तयार करणं, वाढवणं आणि नंतर ती सतत वाढतीच ठेवणं. याचा अर्थ हा नाही की ही सारी प्रक्रिया उथळ, तात्पुरती वा अल्पजीवी आहे. जागतिक स्तरावरील मोठमोठे उद्योगसमूह त्यांचं उत्पादन किंवा त्यांनी निर्मिलेली वस्तू ब्रँडमध्ये प्रस्थापित करण्याकरता साऱ्या मानसशास्त्रीय

शक्यतांचा अभ्यास करतात. त्यासाठी करोडो रुपये खर्च करतात. मनुष्य स्वभावाचा अभ्यास हा त्याचा गाभा असतो.

ब्रँडचा जन्म सहजी होत नाही. पहिल्या दोन कठीण डोंगरवाटा पार करून स्थिर होण्यात यश आलं तरच तिसरा टप्पा ब्रँडला जन्म देण्यात यशस्वी होतो.

प्रत्येक व्यक्तीला कशाची ना कशाची 'गरज' असते. ह्या गरजा खरोखरीच कधी आवश्यक असतात, तर काही गरजा या नसल्या तरी चालणाऱ्या असतात, पण त्या 'तयार' केल्या जातात. व्यक्तिगत, सामाजिक, इतरांना स्फूर्ती देणाऱ्या, व्यावसायिक, वेगळ्या जीवन पद्धतीची धाटणी असलेल्या अशा साऱ्या व्यक्ती/प्रतीकांना हाताशी धरून 'गरजां'ची निर्मिती केली जाते. वाढती महत्त्वाकांक्षा आणि बदलती जीवनशैली यामुळे पूर्ण होणाऱ्या आणि (तरीही) नेहमीच अपूर्ण वाटणाऱ्या 'गरजां'ची नव्यानं त्यात भर पडत राहते. थोडक्यात ब्रँडची नवनवीन रूपं दिसू लागतात.

'केलॉग' हा पोहे, उपमा, शिरा यांपासून गृहिणीला मिळालेला दिलासा आहे. तर मध्यमवर्गीय स्त्रियांना सौंदर्यासक्ती-वृद्धीकरता 'लक्स'चा सहारा आहे. भारतातील स्त्रियांना संसाराच्या रगाड्यातून स्वत:चे मोकळे क्षण मिळतात ते न्हाणीघरात. पण त्या थोड्याच वेळात बंद केलेल्या स्नानगृहात 'लक्स' तिच्या सौंदर्याच्या साऱ्या सुप्त आकांक्षा पूर्ण करत असतो. तिच्या मनाचा तो पूर्ण ताबा घेत असतो. 'क्लोजअप' टूथपेस्टनं कॉलेजच्या तरुणाईला नकळत एक आत्मविश्वास बहाल केला आहे. समोर असलेल्या मुलाला किंवा मुलीला आकर्षित करण्याचा कानमंत्र 'क्लोजअप'नं (जणू) दिला आहे. घामाच्या दुर्गंधीच्या नाशाचा जालीम इलाज म्हणून 'रेक्सोना' प्रस्थापित झाला. आपल्या घामामुळे समोरचा त्रासतो याची जाणीव 'रेक्सोना'नं करून दिली. तो वापरण्याची गरज निर्माण केली. त्याची जागा पुढे 'टाल्कम' पावडरींनी घेतली.

उदाहरणाकरता दिलेल्या या ब्रँड्सनी आपलाच अभ्यास करून आपल्या गरजांना जन्म दिला आणि नंतर आपल्याच मनात अमुक म्हणजे अमुक ही ब्रँडची लेबलं पक्की करून टाकली.

ब्रँड निर्मिताचा हा भाग एकदा बाजारात आला, लोकप्रिय झाला, खूप खपू लागला की काम संपलं असं न होता, खरी खडतर, टिकून राहण्याची लढाई मग सुरू होते. एकदा 'रेक्सोना'ची जरुरी कळल्यानंतर आपापली उत्पादनं घेऊन अनेक उत्पादक मग आधीच निर्माण झालेल्या गरजेच्या लाटेवर स्वार होऊ लागतात, स्वत:ला प्रस्थापित करण्याची जोरदार धडपड करू लागतात. मग मूळ निर्मात्याला ज्याच्या कल्पकतेतून, अभ्यासातून या आगळ्या वस्तूंची निर्मिती झाली ती टिकवण्याकरता (आपली ब्रँड इमेज) नानाविध गोष्टी कराव्या लागतात. आपण इतरांपेक्षा 'वेगळे' आहोत याचा विश्वास ग्राहकाला द्यावा लागतो.

गर्भनिरोधक (कॉंडोम) अनेकांनी बनवली. पण 'कामसूत्र' हा ब्रँड प्रस्थापित झाला तो त्याच्या जाहिरातींमुळे - Bold, Young, Sexuality यांसारखे शब्द वापरून त्यानं तरुणाईला चार भिंतीत बोलण्याच्या भाषेतून प्रथमच उघड्यावर आणले. विवाहपूर्व संबंध उपभोगणारे तरुण वा लग्न झालेल्या स्त्री-पुरुषांनाही केमिस्टकडे गर्भनिरोधक मागणं थोडं अवघड जायचं, याच मानसिकतेला पकडून 'कामसूत्र' फक्त 'केएस' म्हणून प्रचलित केलं गेलं. त्यामुळे तो 'ब्रँड' अजून पक्का झाला.

ग्राहकाच्या अंतर्बाह्य मानसिकतेची नाडी पकडणं ही हुशार ब्रँड मॅनेजरची खरी कसोटी असते. आपल्या ब्रँडबद्दल गिऱ्हाइकाला नुसतंच आकर्षण नाही तर तो वापरण्यात मोठेपणा वाटला पाहिजे, आणि तो निर्माण करण्याचं काम ब्रँडवर काम करणाऱ्याला नेहमीच आव्हानात्मक असतं. तरुणांना आपल्या जीन्सवरील 'Levis'ची खूण काय किंवा एखाद्या मोठ्या व्यावसायिकाच्या शर्टवरील खिशावर बारीक अक्षरात लिहिलेलं 'Arrow' काय, आपल्या दर्जाची खूण वाटते. आपल्या पहिल्या



लवासा ब्रँड

बाळाकरता 'Johnsons'चा आग्रह हा त्या ब्रँडचा विजय आहे.

आपली वस्तू भरपूर खपत असताना केव्हाही, कुठल्याही कारणानं त्यांची विक्री कमी होऊ शकते, थांबू शकते याचं भानही ब्रँड मॅनेजरला सतत ठेवावं लागतं. समाजात तब्येतीबद्दल, विशेषत: वाढत्या वजनाबद्दल जेव्हा जास्त जागरूकता येऊ लागली तेव्हा लगेचच 'पेप्सी'चा 'डाएट पेप्सी'मध्ये बदल झाला.

ब्रँडच्या जन्माचा हा इतिहास सुरस खरा, पण तो वाचताना मनात प्रश्न येतो, मुळात या ब्रँडचा जन्म झालाच कसा? खूप मागे जाता जाता शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत तिथे चरत असलेल्या गाई-म्हशींच्या कळपापर्यंत आपण जातो. चार शेतकऱ्यांची गुरं एकत्र चरत असताना त्यातली आपली कुठली हा नेहमी प्रश्न यायचा. आणि तो सोडवायला मग प्रत्येकानं आपला शिक्का (ब्रँड) शोधला. तोच शोध म्हणजे आजचा ब्रँड. स्वत:ला जगासमोर दाखवणं-इतरांपेक्षा वेगळेपण जाणवून देणं.




**शॉपर्स स्टॉपचा ब्रँड रुजवण्यासाठी 'ओम शांती ओम' ही कपड्यांची मालिका सिनेतारकांसह बाजारात आणली.**

खूप दूरवरचा प्रवास ब्रँडनं केला आहे. वस्तू शोधण्यापासून तिचं नाव करेपर्यंतचा हा प्रवास, वस्तूला चेहरा देण्याचं, व्यक्तिमत्त्व घडवण्याचं आणि उत्पादनाला मूल्य देण्याचं सारं श्रेय ब्रँड मॅनेजरचं. प्रत्येक ब्रँडचं आपलं वैशिष्ट्य आहे. काहींचं नावात आहे, काहींचं त्याच्या निशाणीत (लोगो) आहे. (एचएमव्हीचा छोटा कुत्रा आठवा) तर अजून कुणाचं अजून कशात!

जाहिरात क्षेत्रात नोकरी करत असताना ब्रँड निर्मितीतील प्रत्यक्ष सहभागापासून मी दूर होते, म्हणूनच नेहमी भरपूर पैसे मिळूनही अस्वस्थ आणि असमाधानी होते. कोणत्याही आस्थापनात ब्रँड मॅनेजर ही अत्यंत प्रतिष्ठेची जागा आहे. ते स्थान म्हणजे त्या ब्रँडचा सततचा रक्षणकर्ता/मार्गदर्शक. त्या मॅनेजरची त्या ब्रँडबद्दलची जाण-आत्मीयता आणि ज्ञान हे त्या व्यवस्थापनातील सर्वोच्च व्यक्तीपेक्षाही जास्त असण्याची अपेक्षा असते. जर एखादं व्यवस्थापन आपल्या ब्रँडच्या मूल्याबद्दल जागरूक असेल तर ब्रँड मॅनेजरचा शब्द हा अंतिम समजला जातो.

मी स्वत:ला भाग्यवान समजते की ज्या ध्येयाकरता मी सतत अतृप्त राहिले, अस्वस्थ राहिले ते माझं ब्रँड मॅनेजरचं स्वप्न मी नुसतं अनुभवलंच नाही तर रोमारोमांतून आनंदिलं.

आधी सांगितलेल्या ब्रँड कहाण्यांशिवाय अनेकांच्या कथा मी सविस्तर वाचल्या. पण जिथे मी ब्रँड मॅनेजर म्हणून काम केलं त्या 'लवासा'ची कहाणी अद्‌भुत अभ्यास कहाणी आहे.

डोंगरांनी वेढलेल्या दहा हजार एकरांच्या भयाण शांततेतील जागेवर अगदी आरंभापासून ब्रँडच्या माझ्या स्वप्नाची सुरुवात झाली. लवासा कसा असेल हे केवळ त्याच्या निशाणीमधून (लोगो) बोलते. केवळ हवा बदलाचं, सुट्टी करता मौजमजेचं ते ठिकाण न राहता शहरी ताणतणावापासून मुक्त आनंदानं राहण्याचं निवासस्थान ही लवासाची ब्रँड ओळख होती. आणि याच ब्रँडनं जगातील उत्तमोत्तम ब्रँडना भुरळ घातली. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी, आनंदा स्पा, सिम्बियॉसिस युनिव्हर्सिटी, रिटायरल होम्स, अपोलो हॉस्पिटल, आय.टी.सी. हॉटेल यांसारख्यांनीही लवासाकडे धाव घेतली.

मला अजूनही ते सुरुवातीचे दिवस आठवतात. स्पीड बोटीनं प्रथम पायथ्यापर्यंत जाऊन नंतर आम्ही डोंगर चढून जायचो. गाडीनं जाण्याकरता रस्ते त्यावेळी नव्हते. अशावेळी 'लवासा' हा ब्रँड म्हणून प्रस्थापित करणं प्रचंड मोठ्या आव्हानाचं काम होतं.

ते करण्याकरता जसं वास्तुरचनाकार नकाशे काढतो तसा आम्ही ब्रँड ड्रायव्हर त्याच धर्तीवर उभा केला. आपला ब्रँड कुठला, तो कुणाला रुचेल, कोणत्या, कशा माध्यमातून तो पोचेल यांसारखे प्रश्न ब्रँड ड्रायव्हरनं निर्माण केले, त्याची उत्तरं शोधली. सर्व लहानसहान गोष्टींचा विचार करून, म्हणजे थोडक्यात ब्रँडचा रंग कोणता, कागदपत्रं, दिशादर्शक पाट्या, त्यांच्या आकार, त्यावरील शब्दांचा आकार इतक्या लहानसहान पण ब्रँडनिर्मितीच्या दृष्टीनं मोठ्या गोष्टी ब्रँड ड्रायव्हर सतत लिहीत गेला. आणि या व्यतिरिक्तही अजून शेकड्यांनी अनेक गोष्टींच्या नोंदी नोंदवल्या गेल्या. या कामात मी व माझे सहकारी

एवढे बुडून गेलो की मला तर ब्रँड निर्मितीशिवाय दुसरं आयुष्यच नव्हतं. मला आमच्या चेअरमन साहेबांचे शब्द अजूनही आठवतात. आमच्या ग्रुपला ते 'हंटरवाली' म्हणून संबोधायचे. त्यामागची त्यांची भावना स्पष्ट होती. इतर कशाहीपेक्षा ब्रँड महत्त्वाचा आहे. त्याच्या पालना-रक्षणाकरता, त्याचे नियम मोडणाऱ्यांकरता 'हंटरवाली'चीच जरुरी आहे, ते मला म्हणायचे. लवासाच्या माझ्या आठवणी, माझे अनुभव म्हणजे एका सुखद आनंदाची शिदोरी आहे.

ब्रँड तयार करणं, वाढवणं हे जेवढं महत्त्वाचं तेवढंच किंबहुना त्याहून जास्त ते टिकवणं. आजुबाजूच्या परिस्थितीचं भान ठेवणं, त्यानुसार सतत बदल करत राहणं, नव्याला सामोरं जात राहणं आणि त्याचा स्वीकार करत अजून मजबूत होत जाणं.


जाता जाता सहज आठवलं ते म्हणजे मी जेव्हा 'शॉपर्स स्टॉप'च्या ब्रँड टीममध्ये होते तेव्हाची गोष्ट. त्यावेळी आम्ही 'ओम शांती ओम' ही कपड्यांची मालिका बाजारात आणली. आम्ही तरुणाईबरोबर आहोत हे दाखवण्याची व त्यांना आकृष्ट करण्याकरता 'ओम शांती ओम'चे प्रमुख स्टार शाहरूख खान, दीपिका पदुकोण यांच्या उपस्थितीचंही आयोजन आम्ही केलं. हिंदी चित्रपटांचा भारतीय जनमानसांवरील प्रभाव प्रचंड आहे. फक्त आमच्या शॉपर्स स्टॉपमधून खास निर्माण केलेल्या कपड्यांची त्यानंतर प्रचंड विक्री झाली.

मुंबईच्या म्युझियमला हजारो परदेशी पर्यटक नेहमी भेट देत असतात. अनेक वर्षांनंतर म्युझियमचं नूतनीकरण झालं. त्यातील मार्गदर्शक पाट्या या सध्याच्या जागतिक प्रमाणाला धरून असाव्यात असं मला वाटलं कारण तोही 'ब्रँडिंग'चाच एक भाग आहे हे व्यवस्थापनालाही मान्य होतं. ते काम मी पूर्ण केलं. पूर्वीच्या निशाण्यांच्या जागी नवीन निशाण्या आल्या. माझी 'निशाणी' लागल्याचा आनंदच वेगळा.

अण्णा हजारेंच्या आंदोलनाचा आणि व्यक्तिश: अण्णांचा पूर्ण आदर राखून मला असं वाटतं, की सध्याच्या माध्यमग्रस्त युगात माध्यमांनी आपापल्या परीनं अण्णांचं 'ब्रँडिंग' करण्याची संधी सोडली नाही. मला असंही प्रकर्षानं जाणवतं, की प्रचंड मोठ्या समुदायापर्यंत पोचण्याकरता आता 'इंटरनेट'शिवाय दुसरा इलाज नाही.

अनेक ब्रँड्सच्या इतिहासाच्या अंतरंगात शिरल्यामुळे माझ्या अनुभवात नित्य नव्यानं भर पडत आहे. आत्मस्तुतीचा दोष स्वीकारून मला प्रामाणिकपणे एवढंच सांगावंसं वाटतं, की या जाहिरात व्यवसायातील साऱ्या दालनांतून मुशाफिरी केल्यानंतर मिळालेलं ज्ञान मला 'Master of Brands'पर्यंत नक्कीच घेऊन जाईल. त्या पदाला पोचण्याकरता जास्त प्रगल्भता, कल्पकता तर पाहिजेच. पण त्याहीपेक्षा ब्रँड प्रतीची निष्ठा. तिच्यामुळेच या पदाला शोभा येणार आहे आणि वाचकांनाही ती 'ब्रँड न्यू स्टोरी' आनंद देणार आहे.

**– अपर्णा चवाथे**
डायरेक्टर, द ब्रँड सेल
२४, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१
भ्रमणध्वनी : ९८२१३२३२६१
aparna@thebrandcell.com
aparnanawathe@gmail.com




ग्रंथालीचा ताजा कवितासंग्रह

**प्रिय आयुष्यास... सप्रेम नमस्कार**

**संगीता उत्तम धायगुडे**

मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.

# प्राग व कारालावो वारी

सुधीर कुलकर्णी

हे कारालोवी वारी नावाजलेले आहे फिल्म जगतात, त्याच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामुळे! सन १९५३ मधील बिमल रॉय ह्यांचा 'दो बिघा जमीन' तसेच राज कपूर ह्यांनी काम केलेल्या 'जागते रहो' ह्या सन १९५६च्या हिंदी चित्रपटांना, 'करोलावी वारी पुरस्कार' मिळाल्याचे माझ्या स्मरणात आहे.

**व्हिएन्ना ते प्राग रेल्वे प्रवास**

या आधी केलेल्या साल्सबर्ग ते बुडापेस्ट व बुडापेस्ट ते व्हिएन्ना रेल्वे प्रवासात खाद्यपदार्थ व पेयांसाठी पैसे मोजावे लागत होते. ह्या प्रवासात पहिला धक्का बसला म्हणजे ह्या ट्रेनमध्ये दोन्ही फुकट होते... म्हणजेच तिकिटाच्या पैशांत होते! दुसरा धक्का म्हणजे, गाडी चेक रिपब्लिकमध्ये शिरल्यावर सर्व प्रवाशांच्या स्वागताची घोषणा इंग्रजीत ऐकू आली. ह्यापूर्वी हंगेरी देशात शिरल्यावर अशा तऱ्हेचे स्वागत ऐकायला मिळाले नाही. रेल्वे कर्मचारी हसतमुख, प्रवाशांशी अदबीने वागणारे व चांगले इंग्रजी बोलणारे आढळले.

प्राग (चेक भाषेत प्राहा) ही चेक रिपब्लिक देशाची राजधानी व सर्वांत मोठे शहर. शहर व आसपासच्या भागाची लोकसंख्या भरेल वीस लाखांच्या आसपास. प्राग रोमप्रमाणे सात टेकड्यांवर वसलेले आहे. (सात हा आकडा फार नशीबवान वाटतो. महाराष्ट्रातील सातारा शहराभोवती सात टेकड्या असल्याने त्याचे नाव साततारा- नंतर सातारा- पडले; ह्या आख्यायिकेची आठवण झाली.) विटावा (Vltava) नदीच्या काठावर वसलेल्या बोहेमियाच्या मध्यवर्ती असलेल्या प्रागचा इतिहास १,१०० वर्षे जुना आहे. त्यामुळे सन १९९२ मध्ये युनेस्कोने शहराचा मध्यवर्ती विभाग, जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले आहे.

नवव्या शतकात बांधलेल्या प्राग किल्ल्याची नोंद, गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील 'सर्वात पुराणा' म्हणून झालेली आहे. तिथल्या राजवाड्यात पूर्वी बोहेमियाचे राजे, नंतर पवित्र रोम साम्राज्याचे सम्राट राहत होते. नदीच्या पलीकडे जुन्या प्रागशेजारी नवीन प्राग वसवण्याचे चौथ्या चार्ल्सने ठरवले व हे दोन्ही भाग किल्ल्याला जोडण्यासाठी सन १३५७ मध्ये त्याने पूल बांधायला सुरुवात केली. पुढे तो चार्ल्स ब्रिज नावाने प्रसिद्धीस आला.

पहिल्या महायुद्धापर्यंतच्या काळात प्राग शहर हॅप्सबर्ग साम्राज्य व नंतर ऑस्ट्रो-हंगेरियन साम्राज्याखाली होते. दुसऱ्या महायुद्धानंतर चेक व स्लोव्हाकिया ह्या प्रदेशांची जोडणी

करून नवीन चेकोस्लोव्हाकिया हा देश निर्माण केला. (सन १९५७ मध्ये मुंबई महाराष्ट्राला न देण्यासाठी गुजराथ व महाराष्ट्र ह्यांचे द्वैभाषिक राज्य निर्माण केले, त्याप्रमाणे!) अमेरिका व सोव्हिएत युनियनमधील शीतयुद्धाच्या काळात प्राग शहर 'पोलादी पडद्या'मागचे प्रमुख ठिकाण बनले. त्या काळात भारताचा सोव्हिएत ब्लॉकशी फार सलोखा होता. (म्हणूनच बहुधा सन १९६२ मध्ये मी रांचीच्या हेवी इंजिनीयरिंगच्या साइटवर काम करत असता, तिथे चेक तज्ज्ञ त्या प्रोजेक्टसाठी होते, हे आठवते. तसेच मी जेव्हा सन १९६६ मध्ये अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी जायला निघालो त्यावेळी माझ्या एअर इंडियाच्या विमानाचा एक थांबा होता, प्राग.) सन १९९३ मध्ये चेकोस्लोव्हाकिया देशाचे विभाजन होऊन परत प्राग शहर, नवीन चेक रिपब्लिकची राजधानी बनली.

स्टेशनवरून व्हॅनने आम्ही मिटिओर प्लाझा हॉटेलमध्ये आलो. अमेरिकेतील बेस्ट वेस्टर्नला संलग्न असल्याने हॉटेलचा दर्जा चांगला होता. फ्रेश होऊन आम्ही आमच्या स्वागतासाठी तळमजल्यावरच्या बारमध्ये त्या देशाचे प्रसिद्ध पेय बेचेरोवकाची (Becherovka) चव बघितली. त्यांचे हे राष्ट्रीय पेय – लिकिअर (Liqueor) – आमच्यापैकी कोणालाच



डान्सिंग हाऊस

आवडले नाही. अर्थात त्याची चव आम्हाला नवीन होती, म्हणूनही असेल कदाचित!

आमचे हॉटेल जुन्या प्रागमध्ये होते. रात्र होण्याआधी चार्ल्स ब्रिजला भेट देण्याचे ठरवले. चालत चालत आम्ही ब्रिजवर आलो. एकंदर ५१६ मीटर लांबीचा हा पूल १६ कमानींवर उभा आहे. पुलाची रुंदी आहे १० मीटर. तो फक्त पादचाऱ्यांसाठी खुला आहे. पुलाच्या डागडुजीचे काम चालू होते. पुलाचे वैशिष्ट्य म्हणजे ह्यावर ठिकठिकाणी इ.स. १७००च्या आसपास उभारलेल्या अनेक संतांच्या शिल्पाकृती. बराक पद्धतीची एकूण ३० शिल्पे पाहायला मिळतात. पुलावर एकंदर तीन मनोरे आहेत. त्यांपैकी जुन्या प्रागच्या बाजूचा मनोरा गॉथिक पद्धतीचा आहे. ह्या कारणांमुळे, 'बजेट ट्रॅव्हल' मासिकाच्या मते जगांतील दहा देखण्या पुलांत ह्याची गणना होते.

पुलासंबंधी दोन आख्यायिका ऐकण्यात आल्या. एक, पुलाची वास्तुशांत झाली सन १३५७ साली ९ जुलैला पहाटे ५ वाजून ३१ मिनिटांनी. चौथ्या चार्ल्सने ही वेळ मुद्दाम निवडली. कारण, लिहिताना ती विषम आकड्यांची होईल : १-३-५-७-९-७-५-३-१. दुसरी, पूल बांधकामासाठी स्थानिक – बोहेमियातील – वाळूच्या खडकाचा (Sandstone) उपयोग केला होता. दगडांना जोडण्यासाठी वापरलेल्या सांधक मसाल्यात (Joint compound) अंड्यांचा वापर केला आहे. मात्र हल्लीच्या लॅब टेस्टवरून ह्यांत तथ्य आहे असे आढळून आले.

**प्राग शहर**

मिनीव्हॅनने गाइडबरोबर प्राग शहरातील किल्ल्याकडे (कॅसल) जायला निघालो. वाटेत नदीच्या काठावरील रस्त्यावर एक वेगळी इमारत – दोन व्यक्ती एकत्र नाच करत आहेत – अशी दिसली. त्या इमारतीचे नाव आहे 'डान्सिंग हाउस.' पूर्वी ती 'फ्रेड आणि जिंजर' (प्रसिद्ध अमेरिकन नट फ्रेड अस्टेअर व नटी जिंजर रॉजर्स) म्हणून ओळखली जात असे. काहीजणांची ह्या इमारतीला 'प्यालेले घर' (Drunk House) असे टोपणनावही दिले आहे. ह्या सातमजली इमारतीत बराक, गॉथिक व आर्ट नुवौ (Art Nouveau) वास्तुशैलींचा संगम पाहायला मिळेल. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी आर्ट नुवौ – म्हणजेच नवी कला– शैलीचा प्रभाव कला व वास्तुशिल्पांत पडू लागला. शैलीची मुख्य कल्पना फुलांच्या व झाडांच्या वक्ररेषीय आकारांवर आधारलेली होती. पुढे 'आधुनिक कला' म्हणजेच Modern

Artचा प्रसार झाल्यामुळे आर्ट नूवौ इतिहासजमा झाली.

प्राग किल्ल्यातील सेंट व्हायरस चर्च व सेंट जॉर्ज चर्च ह्या दोन्हींची उभारणी दहाव्या शतकाच्या मध्यापर्यंत झाली. परंतु सेंट जॉर्जवर रोमॅनस्क शैलीचा पगडा आहे तर सेंट व्हायरसवर गॉथिक शैलीचा. चौथ्या चार्ल्सने बांधला गॉथिक शैलीचा राजवाडा – जो जुना म्हणून ओळखला जातो – चौदाव्या शतकात मात्र त्याचा दर्शनी भाग व खिडक्या रेनेसान्स शैलीच्या तर मनोरे बांधले आहेत गॉथिक पद्धतीचे. दोन महायुद्धांमधील काळात नवीन राजवाडा (New Royal Palace) बांधण्यात आला. प्रथम त्यांतचेकोस्लोव्हाकियाच्या अध्यक्षांचे कार्यालय होते व आता चेक रिपब्लिक अध्यक्षांचे कार्यालय आहे.

किल्ल्यावरून दिसणारे पसरलेले शहर व त्यामधून वाहणाऱ्या विटावा नदीचे दृश्य विहंगम होते. तिथल्या घरांच्या छपरांना लाल रंग देण्याची सक्ती असल्याने हिरव्या झाडाच्या पार्श्वभूमीवर घरे उठून दिसत होती. दूरवरच्या एका टेकडीवर पॅरिसच्या आयफेल टॉवरसारखा दिसणारा एक टॉवर पाहण्यात आला. गाइडने माहिती दिली, की तो ऑब्झर्व्हेशन टॉवर पेट्रीन टेकडीवर आहे. तसेच आणखी एक उंच टॉवर आकाशात डोकावत होता. तो टीव्ही प्रसारणासाठी होता. गाइडच्या मते तो कम्युनिस्ट राजवटीत बांधला असल्याने डोळ्यांत खुपणारा (Eye sore) आहे. त्याबाबतीत आमचे तिच्याशी सहमत झाले.

खरे म्हणजे आमच्या प्रागच्या गाइडबद्दल आम्ही थोडे नाखूश होतो. एक तर, ती व्हॅनमधून जाताना शहर किंवा देशाबद्दल फारशी माहिती देत नव्हती – इतर शहरातील गाइडप्रमाणे! दुसरे, गाडीत व गाडीतून उतरल्यावरही बराच वेळ सेल फोनवर बोलण्यात व्यग्र होती. थोडा वेळ आम्ही सहन केले. नंतर तिला हसत हसत आठवण करून द्यायला लागली, की आमच्याकडेही थोडे लक्ष दिल्यास बरे होईल. त्यानंतर तिने शहराची माहिती द्यायला सुरुवात केली. टूरच्या शेवटी आम्हीही टीप देताना हात थोडा आखडता ठेवला – तिच्या वागणुकीमुळे!

किल्ल्यावरून खाली येण्याची पायवाट अर्थातच उतरती व वळणावळणाची होती. त्या वाटेच्या दोन्ही बाजूंना द्राक्षांचे मळे लावलेले पाहायला मिळाले. हा उतार सेंट वेनसेसलास वाइनयार्ड (St. Wenceslas Vineyard) म्हणून प्रसिद्ध आहे. बोहेमिया प्रांताचा संरक्षक (Patron) संत म्हणूनही तो प्रसिद्ध आहे. ह्या संताच्या नावाचा प्रसिद्ध चौकही न्यू टाउनमध्ये आहे. चौकात संताचा घोड्यावरील पुतळा व त्यामागे नॅशनल म्युझियमची भव्य इमारत उभी आहे. मध्ययुगीन काळात चौकात घोडेबाजार चालत असे. खरे म्हणजे हा चौक म्हणण्यापेक्षा प्रशस्त बुलेवार्डच आहे. ह्या भव्य चौकासमोरील दोन रस्त्यांच्या मध्ये सुरेख बागही आहे. मुंबईच्या हुतात्मा चौकाप्रमाणे निदर्शने तसेच शिवाजी पार्कमधील जाहीर सत्कार समारंभांसारखी परंपरा ह्या चौकाला आहे. सन १९२९ पासून प्रख्यात बाटा शू कंपनीचे एक दुकानही चौकात आहे. जगभर प्रसिद्ध असलेल्या बाटा कंपनीची स्थापना सन १८९४ मध्ये एका चेक माणसाने– थॉमस बाटाने – केली.

त्याच साली स्थापन झालेल्या, सायकली उत्पादन करणाऱ्या कंपनीने १९०५ पासून स्कोडा कार बनवण्यास सुरुवात केली. ती स्कोडा कार चेकची 'राष्ट्रीय कार' म्हणून ओळखली जाते. सन १९९९ मध्ये जर्मनीच्या वॉक्स वॅगनने स्कोडा विकत घेतली. सध्या ह्या कंपनीने चार कारखाने युरोपमध्ये तर दोन भारतात.. एक औरंगाबादमध्ये आणि दुसरा पुण्याजवळील चाकण इथे आहेत.

चौथ्या चार्ल्सने १३४८ मध्ये न्यू टाउनमध्ये आणखी एक चौक उभा केला होता. तिथे गुरांचा बाजार भरत असे. पुढे, जगातील एका मोठ्या चौकाला पाचशे वर्षांनंतर संस्थापकाचे नाव दिल्याने, तो आता चार्ल्स स्क्वेअर म्हणून ओळखला जातो. सध्या इथे मोठे पार्क व त्याखेरीज शहराचे वाहतूक केंद्रही – सबवे व ट्राम जंक्शन आहे. प्राग शहराचे वैशिष्ट्य म्हणजे शहरात बसेसना परवानगी नाही. फक्त ट्रामचे मार्ग आहेत. काही विभाग फक्त पादचाऱ्यांसाठीच राखून ठेवलेले आहेत. उपनगरातून येणाऱ्या बसेस फक्त सबवेपर्यंत येण्याची मुभा आहे. ह्या सर्व उपायांमुळे शहरात ट्रॅफिक जॅम कुठे आढळला नाही.

संध्याकाळी जेवणाआधी जवळच्या ओल्ड टाउनमध्ये गेलो. तिथल्या सिटी हॉलच्या दक्षिण भिंतीवर प्रागचे प्रसिद्ध प्रवासी आकर्षण, खगोलीय घड्याळ (Astronomical Clock) ऊर्फ ऑरलॉज (Orloj) आहे. ह्या ७०० वर्षे जुन्या घड्याळाचे तीन प्रमुख भाग आहेत. खगोलीय तबकडी, जी दर्शवते सूर्य व चंद्राचे स्थान आणि इतर खगोलीय माहिती. पंचांग तबकडी महिने दाखवत आहे. त्याशिवाय दर तासाला हलणाऱ्या चार मूर्ती, ज्या घड्याळ निर्मितीच्या काळात तुच्छ मानल्या जात असत त्या – दर्शवल्या आहेत. एक, पोकळ डौल– एक मानवी मूर्ती स्वत:ला आरशात न्याहाळत आहे. दुसरी, हावरट– एक ज्यू सावकार सोन्याने भरलेली थैली घेऊन उभा आहे. तिसरी, मृत्यू– हाडांचा



**प्रागचे प्रसिद्ध खगोलीय घड्याळ**

सापळा दर तासाला घंटी ओढत आहे. चौथी, नास्तिकता–फेटा घातलेला तुर्की माणूस दाखवला आहे. दर तासाला होणाऱ्या टोल्यांबरोबर हलणाऱ्या मूर्ती बघण्यासाठी पर्यटक गर्दी करून उभे असतात. एरवी तिथे फारशी रहदारी नसते.

## कारोलावी वारी

सकाळी एका मिनी बसने प्रागपासून पश्चिमेला १३० किलोमीटर अंतरावरील कारोलावी वारीकडे जायला निघालो. जाताना काही अंतर एक्स्प्रेस वे होता. नंतर तो दुहेरी वाहतुकीचा हायवे झाला, परंतु रस्ता चांगला होता. प्रागबाहेरचा प्रदेश सपाटच होता. नंतर मात्र थोडा वेळ चढ लागला. वाटेत ठिकठिकाणी दहा–पंधरा फूट उंचीच्या जाळ्या दिसल्या. त्यावर वेल चढलेले होते. चौकशी केली असता ते बार्ली हॉप्सचे आहेत व ते स्थानिक बिअर बनवण्यासाठी वापरतात, ही माहिती मिळाली.

जर्मन भाषेत चार्ल्सचा उच्चार कार्ल होतो. चौथ्या चार्ल्सने सन १३८० मध्ये स्थापन केल्याने हे शहर कार्ल्सबाड ह्या नावानेही ओळखले जाते. शहर गरम पाण्यांच्या झऱ्यांसाठीही प्रसिद्ध आहे. इथे गरम पाण्याचे अनेक झरे आहेत व गावांमधून वाहणाऱ्या तेपला नदीचे पाणीही गरम असते. शहर समुद्रसपाटीपासून ४०० मीटर (१,२१९ फूट) उंचीवर असल्याने इथली हवाही आल्हाददायक असते. इथल्या गरम पाण्याच्या झऱ्यांत रोग बरे करण्याची शक्ती आहे हे सिद्ध झाल्यावर, शहर प्रवाशांचे – त्यातून युरोपीय धनिक बाळांचे – आकर्षण बनले ह्यात नवल नाही. वर्षातून वीस लाख पर्यटक इथे भेट देतात. कारलोवी वारी म्हणजे महाराष्ट्रातील महाबळेश्वर व वज्रेश्वरी ह्यांचे मिश्रण असल्याची कल्पना करता येईल.

सुप्रसिद्ध मोझर (Moser) काच कारखाना व देशाचे प्रतिनिधित्व करणारी दारू – बेचेरोवका – ह्यामुळेही शहर प्रसिद्धीला आले. परंतु हे कारालोवी वारी नावाजलेले आहे फिल्म जगतात, त्याच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामुळे! सन १९५३ मधील बिमल रॉय ह्यांचा ‘दो बिघा जमीन’ तसेच राज कपूर ह्यांनी काम केलेल्या ‘जागते रहो’ ह्या सन १९५६च्या हिंदी चित्रपटांना, ‘करोलावी वारी पुरस्कार’ मिळाल्याचे माझ्या स्मरणात आहे.

टूर गाइडबरोबर शहराची फेरी मारत असताना एका बागेत प्रसिद्ध जर्मन कवी गटे (Goethe) ह्यांचा पुतळा दिसला. गाइडने खुलासा केला, की प्रसिद्ध संगीतकार बेथोवन व गटे हे दोघे स्पा ट्रीटमेंटसाठी म्हणजेच गरम पाण्याच्या झऱ्यांत



**चार्ल्स ब्रिज**


डुंबण्यासाठी गावात येत व एकत्र फिरत असत. त्या काळात लोकांत तो एक कुतूहलाचा विषय झाला होता.

तिथून थोड्या अंतरावर हॉटेल पप (Pupp) दिसले. त्याचा उपयोग जेम्स बाँड मालिकेतील सन २००६ मधील 'कॅसिनो रॉयल' चित्रपटासाठी करण्यात आला होता, ही माहिती गाइडने पुरवली. एकोणिसाव्या शतकात बांधल्या गेलेल्या ह्या पांढऱ्याशुभ्र हॉटेलची वास्तुकला होती संमिश्र – रेनेसान्स आणि आर्ट नुवौ! मात्र फिल्म फेस्टिव्हल भरते त्या इमारतीची वास्तुकला होती रेनेसान्स पद्धतीची.

शहराचे मुख्य आकर्षण होते सोव्हिएत कारकिर्दीत बांधलेली हॉट स्प्रिंग कॉलोनेड. तिथले गरम पाण्याचे कारंजे जवळजवळ दहा मीटर (अंदाजे ३१ फूट) उंच उडताना पाहिले. कधी कधी ते सतरा मीटर (५५ फूट) उंच उडते. त्याला जागा करून देण्यासाठी छतामध्ये काचेच्या चिमणीची व्यवस्था केलेली दिसली. हे उडणारे पाणी जवळजवळ २,००० लिटर भरेल. (त्यामानाने अमेरिकेतील यलोस्टोन नॅशनल पार्कमधील 'ओल्ड फेथफुल' कारंजे सरासरी ४४ मीटर (१४५ फूट) उडते. त्यातून बाहेर पडणारे पाणी असते सरासरी ६,००० लिटर. त्यामुळे ओल्ड फेथफुल उघड्यावर आहे... बंदिस्त करणे अशक्य आहे!) तिथून जवळच रशियन झार पीटर दि ग्रेट ह्याचे अठराव्या शतकातील घर व संगीतकार मोझार्टच्या मुलाचे घरही गाइडने दाखवले.

संध्याकाळी प्रागला परतल्यावर आमच्यासारख्या टूरवरून परत आलेल्या पर्यटकांशी हॉटेलमध्ये बोलणे झाले. ते प्रागच्या दक्षिणेला असलेल्या चेस्की क्रुमलावला भेट देऊन आले होते. युनेस्कोने जाहीर केलेल्या जागतिक वारसा स्थळांपैकी ते एक होते. तिथला किल्ला चेक राष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचा होता हे त्यांच्याकडून कळले. तिथे गेलो नाही ह्याची हळहळ मुळीच वाटली नाही. त्याउलट जिथे दोन हिंदी चित्रपटांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पहिले पारितोषिक मिळवले, त्या गावाची 'वारी' करून आल्याचा आनंद आम्हाला तिथून बर्लिनला जाताना नक्कीच झाला.

**– सुधीर कुलकर्णी**
१४ विंडलॉस ड्राइव्ह
लेथम, न्यू यॉर्क १२११०, यु.एस.ए.
दूरध्वनी – ५१८-७८३-७१७९
sudhirk18@hotmail.com



# एक स्मरणसहल

उषा मेहता

समीक्षक म्हणून साहित्यवर्तुळात स्वत:चा दबदबा निर्माण केलेले नामवंत साहित्यिक माधव मनोहर यांची नुकतीच जन्मशताब्दी साजरी झाली. आत्माराम भेंडे, मामा तोरडमल या नटवर्यांनी मनोहरांशी असलेले ऋणानुबंध आठवणींतून उलगडले. समीक्षक कमलाकर नाडकर्णी यांनीही समीक्षा लेखनात माधव मनोहरांना गुरुस्थानी मानल्याचे सांगितले. मनोहरांच्या विद्यार्थिनी, त्यांच्या कन्या प्रतिभा मतकरी आदींनी त्यांचे ऋण व्यक्त केले. मनोहरांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक वेगळा पैलू या ललितबंधातून समोर येईल.

प्रतिभाचे ते पपा
म्हणून आम्हा सर्वांचे पपाच
पक्षी माधव मनोहर
त्यांचा तो सुप्रसिद्ध चिरुट कलंदर!
चिरुट ओढावा तर पपांनीच
एकदमच शोभून दिसायचा तो, त्यांच्या
भारदस्त देहावरच्या तेजस्वी मुखमंडलाला
(एरवी, साधी सिगरेट म्हणजे अगरबत्तीच, त्यांच्या मुखात!)
त्यांचा तो चिरुट आणि गळ्याभोवतीचा मफलर
खूणच पटायची
हाच तो परखड समीक्षक
मराठी साहित्याचा जागल्या
नाटककार, कादंबरीकार, कथाकार
कविताही लिहिल्यात त्यांनी एकेकाळी

पण आमचे ते पपा
रानावनांचा शौक त्यांना
अमावस्येच्या उधाणलेल्या समुद्राची ओढ
आषाढ गर्जायला लागला, की
सालाबादप्रमाणे यायचंच त्यांना निमंत्रण 'ड्यूक्स नोज'चं
विसापूर-लोहगड-किल्ल्यांचं, वर्षासहलीसाठी


अजून वेढून राहिलाय आमच्या त्या सहलींना
पपांच्या चिरुटांचा मस्त वास

पपांचा आदेश यायचा
की जमवायचो आम्ही मेळा सहलसदस्यांचा
वय वर्षे सात ते सत्तर
यांचा लसावि म्हणजे तरुणाई!
हीच खास खूण या मेळ्याची
आणखी एक,
चिखला-पावसात पाय घसरून,

कितीही वेळा कोसळायची वेळ आली
तरी मागे फिरायचं नाही
छत्र्यांना बंदी
टिकतच नाहीत त्या वाऱ्यापावसात
भिजत राहायचं सतत, झाडापेडांसारखं, दिवसभर
अशी तयारी असलेलेच सामील व्हायचे या मेळ्यात

एकदा असेच,
वाऱ्यापावसातच लोहगडच्या पायऱ्या चढत होतो,
पायऱ्या शेवाळलेल्या आणि त्यावरून,
पाण्याचा प्रवाह पळत येत असलेला
एकमेकांचे हात पकडून, त्या उंच उंच पायऱ्यांवरून
कशीबशी पावलं रोवत, किंचाळ्या मारीत
चढत होतो आणि...
पाण्यातूनच एक साप आला विळविळत
पायांना अडखळत गेला तो पुढे
पाण्यातल्या घसरगुंडीवरून घरंगळत
त्याचा तो क्षणभरच झालेला गिळगिळीत स्पर्श
आठवणीनंही आत्ता, काटा उभा राहिलाय् अंगभर!
...पपा म्हणजे गार्डचा डबा
हसत होते आमच्या घाबरगुंड्या पाहून!

तर, निघायचो असे आम्ही फौजफाटा घेऊन
भाताच्या खाचरांमध्ये साठलेल्या पाण्यात
आभाळातले ढग अंथरलेले
जादूच्या हलत्या सतरंजांसारखे
त्यात भाताची पोपटी रोपं डोलत असायची




**माधव मनोहर**
**(२० मार्च १९११ ते १६ मे १९९४)**

पांढरेधोप बगळे समाधी लावून कुठे कुठे.
कुठेकुठे, इरली घातलेल्या बायकापुरुषांची ओणव्यानं लावणी सुरू
आपणही बघायचं मागे रेंगाळून,
चार रोपं चिखलात खुपसून उभी करायला

एकदा एका अरुंद पाणंदीतून आम्ही या बाजूनं,
तर विरुद्ध बाजूनं जरा अंतरावरून एक जोरदार हाकारा,
"माधवराव माधवराव माधवराऽऽऽव"
दुर्गप्रेमी गोनीदा आणि माधवरावांची ती वर्षाभेट संस्मरणीयच!

आणि ती कनकेश्वरची सहल!
पाऊस नव्हता पण कसलं घनदाट जंगल कनकेश्वरचं
टारझनच्या सिनेमातलं जणू,
संध्याकाळपर्यंत उभा डोंगर चढून जायचं म्हणजे,
दमायला होणारच



शंकराच्या देवळाभोवतीच्या दगडी ओवऱ्यांवर
अपुऱ्या अंथरुणावरही गाढ झोप लागणारच
भल्या पहाटे पपांनी उठवलं हळूच दोघाचौघांना
अंधुक प्रकाशात नि:शब्द होऊन
झाडंवेली पार करीत, त्या घनदाट जंगलातल्या
पपांच्या लाडक्या उंच झाडाखाली आलो
केवढा तो विस्तार
छोटीछोटी पानं झिळमिळणारी उंच उंच पताका लावल्यासारख्या
फांद्यांतून दिसणारं झुंजुमुंजू आकाश...
फांद्यांवर अनोळखी चिमण्या पाखरांचा सुमधुर किलबिलाट,
बहुतेक, फांद्यांफांद्यांवर मंगेशकर भावंडं गप्पा मारत होती,
चिमणी पाखरं होऊन!

भरपूर भटकलो दिवसभर
कनकेश्वरभवती डोंगरच डोंगर
पायथ्याशी फेसाळत असलेला सागरकिनारा
मांडव्याची दीपमाळ नि ती,
उभ्या खडूच्या कांडीसारखी दिसणारी,
दूरवरची नारिंगीची दीपमाळ
पोचलो तिथंही
आतल्या लोखंडी कड्यांवरून थेट चढून
पोटभर न्याहाळला तो विस्तीर्ण परिसर
दिपून गेलो....

दमलो होतो दिवसभराच्या भटकंतीनं
तरी रात्री झकास गप्पा रंगल्या
आवडती गाणी, कविता, फर्माईशींसह
भेंड्यांवर भेंड्या नि किश्श्यांवर किस्से
हास्याचा खळखळाट
झोपले सारे एकदाचे कालच्यासारखेच, गप्पगार,
रात्र शांत झाली आणि पपा... गुपचूप खाशांना बरोबर घेऊन
लागले चालायला
हातात टॉर्च आणि काठी
चालतचालत काही फर्लांगांवर
कानोसा.... शेकडो ऋषी सामुदायिक मंत्रघोष करीत असल्याचा
भास
पुढे गेलो,
एका चिरे सुटलेल्या, फुटक्या पुष्करिणीत
शेकडो बेडकांचा असा सुंदर खर्ज लागलेला,
हे म्हणजे... एक मंडूकोपनिषदच!

आणि श्रोत्यांमध्ये,
सृष्टिसंगीताचे श्रेष्ठ जाणकार... पपा!

**– उषा मेहता**
१६–२७ शिवाजी पार्क,
मुंबई–४०० ०२८
दूरध्वनी : २४४६१९९१

*With Best Complimenst From*

# Mayur Paper Corporation

**STATIONERS & PAPER MERCHANTS**


***We are paper suppliers of reputed publishers like Granthali***

23-B, Podar Chambers, S.A. Brelvi Road, Fort, Mumbai-400 001.
e-mail : mayurpapercorp@gmail.com

# कवितेची पाने

## मी सूर्यासारखा

एकटेपणाचा जबडा सरकतोय माझ्याकडे
मला गिळून टाकायला
तेव्हा मी कवितेच्या कुशीत शिरतो
किंवा लोकांच्या सागरात उडी घेतो
घराच्या भिंती
कट केल्यासारख्या एकमेकींजवळ सरकतात
मला चिरडून टाकण्यासाठी
तेव्हा मी पक्षी होऊन बाहेर झेपावतो
आणि आकाशातील सूर्यकिरणांवर
जमिनीचे आक्रंदन लिहितो
माझे काही हरवत आहे असे वाटते
तेव्हा मी स्वत:ला पोलादाचे झाड करतो
उजेडाची सुरक्षा उभी करतो भोवती
सुगंधाचे प्रेम मांडतो भोवती
मी रस्ता होतो जंगलात न हरपता
बाहेर पडणारा
मी उजेडाचा वारा होतो
अंधाराच्या बेबंदशाहीला देतो धडका
मी प्रकाशतो पण संभ्रमात हरवत नाही
मी सूर्यासारखा
...



**डॉ. यशवंत मनोहर**
'लुम्बिनी', ४५, लोकसेवानगर,
नागपूर-४४००४४
भ्रमणध्वनी : ९४२२१०२३९६

## बैनाई...!

बैनाई...!
तुझ्या अभ्रंकष पटलावर कोरलेल्या
कारुण्याच्या शब्दांना किनारेच नाहीत
तुझ्या प्रेमात प्रमुग्ध होणाऱ्या सुगंधाला
बंधारेच बांधता येत नाहीत

अर्धजागृत असणाऱ्या तुझ्या दु:खाच्या अस्तित्वाला
उसनवार घेता येत नाही
तुझ्यात ऋजू झालेल्या शाश्वत मूल्यांना
पूर्णत: विरचित करता येत नाही


तुझ्या आज्ञेशिवाय मिळत नाही
स्वच्छंदी माणसांच्या दु:खाला न्याय
दु:खनिरोधाच्या श्रेष्ठ सत्यांना
तूच आता शोधून पाह्य

आयुष्याला निराशेचा गहिरा रंग देऊ नकोस
दर्शनशास्त्राचा सांस्कृतिक ध्वज
तुझ्या शाळेत फडकवू नकोस

स्मशानातील अग्निवंतास विमलेची असते गरज
तुझ्या कुशीत विसावणाऱ्या चेतनाशक्तीवर
धम्मतेची लेखणी परत
दु:खनिर्मितीच्या ग्रंथामध्ये तुझे नाव दिसू नये
बैनाई...! व्याज आयुष्याचे निर्लिप्त अश्रू
निर्मोही हातांनी सजवू नये



**प्रमोद वाळके 'युगंधर'**
प्लॉट क्र. ४०, परफेक्ट सोसायटी,
पन्नासे ले आउट क्र. ५,
नागपूर-४४००२२
भ्रमणध्वनी : ७५८८७४५८५०



## सूर्याच्या दिशेदिशेने

तंबूच नव्हता त्यांचा
कधीच ताणून धरला
जो दिसला त्याला केवळ
आणून त्यांनी भरला

हा जो कोणी आहे
आपल्यात शिरलेला
प्रत्येकाच्या रक्तारक्तातून
मुरलेला

नायनाट कोणाचा करणार
कोण कशाने
उगवत जावे फक्त
सूर्याच्या दिशेदिशेने

**श्रीपाद भालचंद्र जोशी**
१०५, संकल्प सहनिवास,
४०, खरे टाऊन, धरमपेठ,
नागपूर–४४०१० (भारत)
दूरध्वनी : (०७१२) २५२५३१५
भ्रमणध्वनी : ९९६०४९३६२२

## ठरले आहे!

जमेल तितके जगायचे हे ठरले आहे
निरोप येता निघायचे हे ठरले आहे!


सामोरे जायचेच आहे, जर दुःखाला
पुसून डोळे... लढायचे हे ठरले आहे!

काटेरी कुंपणे असू द्या सभोवताली
तरी फुलांनी फुलायचे हे ठरले आहे!

तसे मनोमन तयार आता प्रस्थानाला
कधीतरी मी नसायचे हे ठरले आहे!

वाळूवरती ठसे, तसे हे जगणे इथले
तरीही मागे उरायचे हे ठरले आहे!

**सदानंद डबीर**
१ बी/२०६ विमानदर्शन,
जीवा महाले मार्ग, अंधेरी (पूर्व),
मुंबई –४०००६९
दूरध्वनी : २६८४८३९९





## गजल

या जगण्याला भर चौकात निलाम करावे
मरण्यापूर्वी शेवटचे हे काम करावे

तुला न कळली कधीच माझी प्रेम कहाणी
म्हणून का तू प्रेमाला बदनाम करावे

इथे कसाई मिरवत असतो ईश्वर बनूनी
खुशाल त्याचे दलाल बनूनी काम करावे?

भरपूर केल्या चोऱ्यामाऱ्या, खून–दरोडे
पुण्य मिळविण्या आता 'चारीधाम' करावे

भेटी–गाठी, रुसणे–फुगणे आणि बिलगणे
प्रेमामध्ये हे सगळे मुद्दाम करावे

सोपे असते शत्रूंसंगे लढणे येथे
डाव कसे मित्रांचे पण नाकाम करावे?

अरे विठ्ठला! जाहलास तू 'धन' बडव्यांचे
आम्ही बापुडे फक्त तुझे हरिनाम करावे

खरेच जर का असेल मृत्यू नितांत सुंदर
मरता मरता हे जगणे सुफलाम करावे

**संदीप माळवी**
१ एफ, ऑर्चिड, कॉसमॉस, लाऊंज,
मानपाडा–४००६१०
sandeepmalavi@gmail.com

## सांजमुद्रा

१
अशी झाकोळून यावी सायंकाळ
मिटून जावीत पाखरं जाळीजाळीत
साकळावी चराचरावर अंधाराची दाट साय..
..नि झगमगून यावं मनाचं झुंबर
चांदण्या रात्री चमचमत्या सरोवरासारखं
संथ..मंद.. हळुवार..
२
माळरानांवर पसरलेली निस्तेज मलूल सायंकिरणं
मटकीच्या कंच जाळीत रेंगाळती सोनपिवळी उन्हं
बाजरीच्या पक्व शेतांवरून भरारते
पाखरांचे स्वच्छंद थवे..
क्षणोक्षणी दृग्गोचर होत जाणारं
भरातलं चांदण्यांचं रान
डोळ्यांत डुचमळणारं..
३
शांत नि:शब्द चांदणरात्री
कुण्या पाखराचं अवचित फडफडणं
आतून उदासत डोहाचं
संततधार घळघळत राहणं..

**विजय शं. माळी**
'चांदणवेल', सर्व्हे नं. १८३/३ ब/१४,
दूधगंगा सोसा. नजीक, विद्यानगर, कऱ्हाड-४१५१२४
दूरध्वनी : ०२१६४-२७३९०८



## विजय

मेनस्ट्रीमच्या प्रवाहात न जाण्यामुळे
आमचं झालेलं नुकसान चालेल; परंतु
प्रस्थापितांविरुद्ध चाललेला लढा आम्ही लढत राहू

चारही बाजूंनी हमला होत असताना
आमच्या तलवारी मान्य करून चालणार नाही
मुकद्दर का सिकंदर होईल की नाही
हा प्रश्नच मनातून निकालात काढून टाकला आहे
आणि अखेरपर्यंत लढत राहणे क्रमप्राप्त आहे

ईश्वर आयसीयूमध्ये शेवटच्या घटका मोजतोय
आणि बाहेर टाळ-चिपळ्यांचा गजर चालला आहे
डिजेच्या ढाणऽ ढाणऽच्या तालावर बेहोष तरुणाई तर्रर्र...

आता, खरं तर,
हे सारं नाटक संपलं पायजेल; मध्यानंतर तरी बरीच माणसं
उठून गेली उरलेत ते लुंगेसुंगे
त्यांना कुणीतरी जबरदस्तीने धाक दाखवून बसवलंय
नाटक संपल्यानंतर आपल्याला उल्लू बनवलंय अशा
विचारात ते घरी निघून गेले

काही दिवसांनी तीच माणसं भेटली
त्यांच्यात बदल झालेला दिसला
नंतर आमच्या मोर्चातही सामील झाली
च्यामायला, आम्ही न हरता जिंकलो होतो

हा जुल्मी सनातनी काळावर उगवलेला सूड तर नव्हे?
की पुरोगामी विचारांचा विजय आहे!

**बबन लोंढे**
२५/१ सम्राट अशोकनगर को.ऑप.हौ.सो.
शेल कॉलनी रोड,
चेंबूर, मुंबई-४०००७१


## जे बदलू शकेल वर्तमानात

एकाला दुसऱ्यांत गुंतवून
तिसऱ्याला उद्ध्वस्त करण्यात
गुंतलेली यंत्रणा...

आणखी उरलेच आहेत बरेच
ते कुणाचा 'जय' म्हणण्यात
अन 'टाळ्या' वाजवण्यात गुंतवलेले

जे कुणी सुटले असतील
की बधले नसतील असे तसे
त्यांनी रचत राहावेत मनसुबे

एवढी उबग येऊन कसं चालेल!
काहीतरी तर असेलच ना मूलभूत
जे बदलू शकेल वर्तमानात...



**अशोक कोतवाल**
'संदर्भ', ४८/१/५४, ब्लॉक क्र. ६, शिवा अपार्टमेंटजवळ,
शिवकॉलनी, जळगाव-४२५००२
भ्रमणध्वनी : ९८५०११७५३९

## देणे आहे!

मी न मागता तारुण्याचे देणे आहे!
भरभरूनी मज आयुष्याचे देणे आहे!

लिहिता गझला, कळते मजला, पुन्हा पुन्हा की–
लेखणीस या, तव प्रेमाचे देणे आहे!


नको कोसणे, गतकाळाला, सदासर्वदा
किती शुभंकर या काळाचे देणे आहे!

जरा असू दे आपसातले रुसवे–फुगवे
गोड–गुलाबी हे नात्याचे देणे आहे!

कशास चिंता श्रावणातही पानगळीची?
पानफुटीचे आनंदाचे देणे आहे!

तू नसताही फुले शहारा अंगभरूनी
ऋतुबहराच्या त्या स्पर्शाचे देणे आहे!

**प्रतिभा सराफ**
इ–१५०३, १५वा मजला, रुणवाल सेंटर,
गोवंडी स्टेशन रोड, देवनार, मुंबई–४०००८८
भ्रमणध्वनी : ९८३३०५६७९५



## जीवन

तू नाकारलास
'माझ्या'
मुक्तीचा आदिबंध
अन्
छिनलास
त्याचा अवकाश

मला वारंवार दाखवू नकोस
तुझ्या अस्तित्वाच्या निर्दयी खुणा
तुझ्या कुरूपतेच्या प्रदेशात
वसंतासही बंदी

तुला मान्य नव्हता
'माझ्या'
फुलणाऱ्या मोगऱ्याचा सुवास
अन्
उसळणाऱ्या समुद्राची गाज

पण...
तुला माहीत आहेच.
कोंबडा आरवला नाही
तरीही
सूर्य व्यापून टाकतो
आसमंत
आपल्या सोनकिरणांनी

कसं विसरलास...
हेतूपुरस्सर जरी ओरबाडलीस
कोवळी पालवी
तरी
खोड राहील मजबूत
पुन्हा जीवन घडविण्यासाठी

**शारदा नवले**
डी/४/४, सिद्धिविनायक सोसायटी,
पटेल हॉलजवळ, सेक्टर ८,
सानपाडा, नवी मुंबई–४००७०५

माझ्या डोळ्यातलं पाणी ओलांडून
तू घराबाहेर पडलास
आणि
घराचा कोपरा न् कोपरा
आक्रंदत राहिला नि:शब्द आकांताने
तुझ्या आठवांचा अखंड
जाळणारा वैशाखवणवा
आणि
सावल्याही दिशाहीन झालेल्या
फारकत घेतलेल्या पाखरांच्या
शोधात;
जाताना तू जडवून गेलास
तुझ्या अस्तित्वाची मोहर
माझ्या प्रत्येक श्वासावर
दारात आयुष्य कधीच खोळंबलेलं
कदाचित माझ्या कपाळावरच्या
कुंकवाचा परिघ
अपुरा राहिला असावा
तुझ्या कुंचल्याशिवाय



**छाया कोरेगावकर**
भ्रमणध्वनी : ९८२१६७८२५०

## असे लोक

जे दयेला पात्र नाहीत
आणि ज्यांची कीव पण करावीशी वाटत नाही
असे लोक असतात आजूबाजूला...

जे आपल्या अनैतिक परंपरेचा वारसा चालवतात नेकीनं
मुजोरी, लबाडी, हडेलहप्पी करतात
हरामी, उल्लू, संशयी, व्यभिचारी असतात
धडधाकट, गलितगात्र, जर्जर म्हातारे, तरणेताठे
असे किती किती लोक असतात आजूबाजूला...

जवळून गेल्यावर कोणी दर्वळतात काही वेळ
आपल्याभोवती परिचियासारखे
खूप काळ सोबत राहून वास मारतात काही काही
किंवा अनेक वर्षं सोबत राहून वावरतो
जसे की नवरा–बायको–प्रेयसी–प्रियकर–मुलगा–मुलगी–बाप–आई इ.इ.
खरं तर आपण त्यांना अजिबात कणभरही ओळखत नाही
याउलट अनोळखी भेटले की त्यांना आपण लगेचच आजमावतो
बेभरवशाचे कामी येतात, विश्वासू गद्दारी करतात
असेही लोक असतात आजूबाजूला...

प्रवासात भेटल्यावर लक्षात राहतात काही दीर्घकाळ
रोजच्या प्रवासातले क्वचित रेंगाळतात मनात अल्पकाळ
काहींचे आलिंगन हवेहवेसे,
काहींचे श्वास नकोनकोसे
असे लोक असतात आजूबाजूला...

मुखवटे संतांचे पण पाय मातीचे
आव शालीनतेचा पण कपटी मनाचे
खरे तर भित्रे–भेकड पण (वरून) ताठ कण्याचे
काहींच्या केवळ असण्याने धीर येतो
काहींच्या नसण्याने हर्ष मनात दाटतो
काहींच्या सौंदर्यात कुरूपता असते
असे लोक असतात आजूबाजूला...

जे फक्त शब्द घेतात, शब्द देतात, शब्द पाळतात
सचोटीनं, इमानदारीनं, मेहनतीनं स्वत:चं आणि दुसऱ्याचं
जगणं सुंदर करतात
ज्यांच्यामुळेच जगरहाटी बिनदिक्कत चालते
ज्यांना आदरानं सलाम करावा आणि
ज्यांचे पाय धरावे
असेही (पण खूप कमी) लोक असतात आजूबाजूला...

**मनोहर जाधव**
गणेशखिंड, पुणे–४११००७
दूरध्वनी : (०२०) २६६८९४९४
hodmarathi@ac.ernet.in
mjj@unipune.ac.in



## शोध

हल्ली मी स्वत:ला शोधू लागलेय
कुठेही, अगदी कुठेही... म्हणजे रस्त्यावर,
भरगर्दीत, एकांतात आणि कुठे कुठे

पावसाच्या पडणाऱ्या प्रत्येक थेंबात
मी मला शोधतेय
निर्जन सडकेवर
मी मला शोधतेय
वाऱ्यानं हलणाऱ्या नारळाच्या झावळ्यांत
मी मला शोधतेय
चकचकीत वस्तूंच्या दुकानासमोर
उभं राहिल्यावर
चकाकणाऱ्या वस्तूंवर पडणाऱ्या माझ्याच प्रतिबिंबात
मी मला शोधत राहते...
मला आनंद देणाऱ्या,
अस्वस्थ करणाऱ्या,
अनेक क्षणांमध्ये
मी मला शोधू पाहते

या सगळ्यात कधीतरी स्वत:ला सापडणारी
आणि तरीही हुलकावणी देणारी
प्रत्येकवेळी
मी नवीच असते!!

**जया भीमराव जगताप**
द्वारा मराठी विभाग
पुणे विद्यापीठ, पुणे–४११००७

## संस्कृती : भवितव्य

कित्येक वंश येथे मिसळून पार गेले
गोरे, भुरे नि काळे विसरून वर्ण गेले!

सारेच पंथभेद धर्मासवे निमाले
मानव्य पांघरोनी नाचात दंग झाले

वात्सल्य, प्रेम, भक्ती कष्टासवे मिळाले
दुर्भाग्य, दु:ख, दैन्य – हे हद्दपार झाले!

देवास नाव द्याया कोणास वेळ आहे?
हृदयात नांदतो जो, त्याचाच घोष आहे!

साऱ्या वसुंधरेचे खेडेच एक झाले
नक्षत्रलोक त्यांना पाहूनच धन्य झाले!

**विद्युल्लेखा अकलूजकर**
vidyut.aklujkar@gmail.com



## प्रेम

कोणीतरी एक करत असतो तुझ्यावर प्रेम
अनावर इतकं
की धास्तीची एक अनिवार लहर उमटत जाते
आजूबाजू सगळ्या आसमंतात आणि तू मात्र
अंतर्बाह्य बिनधास्त

कोणीतरी एक करत असतो तुझ्यावर प्रेम
जिवापाड
आणि ठेवून जातो कोवळा चैत्र
तुझ्या ओंजळीमध्ये
शोधत राहतो तुझी छबी
तुझ्याच वयाच्या इतर मुलींमध्ये
आणि परत परत एकटा एकटा होत जातो
निर्जन जंगलातल्या पडक्या विहिरीसारखा

कोणीतरी एक प्रेम करत असतो
तुझ्यावर जिवापाड
वावरत असतो सावली होऊन तुझ्या आसपास
नाहीतर,
सुनसान संध्याकाळी नदीकाठी
तुला एकटीनं जाता आलं नसतं,
केस मोकळे सोडून
तास-न्-तास खिडकीपाशी
रेंगाळता आलं नसतं
गावाबाहेरच्या निर्जन देवळाजवळ एकटीनं
भटकता आलं नसतं.

जेव्हा तुला न्हाऊ घालत असते तुझी आई,
पुसत असते तुझे लांबसडक मऊ काळे केस
भिनवून घेत असते
शिकेकाईचा ओलाशार गंध अंगअंगात
तिलाही जाणवत असते
तुझ्या आत आत सर्वदूर पसरलेली
एक हळवी व्याकुळता
तुझी देहबोली दाखवत असते तिला
तुझ्या आत आत उजळत असलेली
एक दीपमाळ

तुझं ते शून्यात नजर लावून बसणं,
तास-न्-तास थंड पाणी अंगावत घेत राहणं,
जागेपणी सुद्धा
स्वप्नात असल्यासारखं वावरणं

हलकासा स्पर्श होतो तुला
फुलांच्या डहाळीचा फक्त
आणि झंकारत जातेस तू
पाय पडतात ठेक्यात
सोनसळी नागिणीसारखी
नादावत जातेस तू
तुझ्यावर करत असतो कोणीतरी एक प्रेम जिवापाड

तू झोपतेस तेव्हा
तुझ्या स्वप्नामध्ये येरझाऱ्या घालणारा कोणीतरी एक
उभा असतो तुझ्या प्रत्येक पहाटेसाठी
प्रार्थना होऊन

तू जेव्हा बदलतेस कूस झोपेमध्ये
तेव्हा पायाकडून वर सरकलेलं पांघरूण
नीट करून तो पसार होतो गच्च अंधारातून

तू जेव्हा उभी असतेस ना?
देवासमोर हात जोडून
सगळ्या जगाचा चांगुलपणा होऊन झिरपत असतो
तो तुझ्या डोळ्यांतून

तुझ्यावर करतो आहे कोणीतरी प्रेम जिवापाड
आणि त्याच्या वाटेला मात्र आले आहेत
दु:खविभोर दिवस, निर्दयी एकाकीपण आणि
एक रुक्ष वाळवंटी आयुष्य कायमचं


तुझ्यावर करतो आहे कोणीतरी प्रेम जिवापाड
हे कोणालाच माहीत नाही
त्याच्याशिवाय.

**सतीश सोळांकूरकर**
श्री सह्याद्री को-ऑप. हौ. सोसायटी,
बि. ९, फ्लॅट ६, पुणे रोड,
कळवा (पश्चिम), जि. ठाणे-४००६०५
दूरध्वनी : ०२२-२५४०३७७८
भ्रमणध्वनी : ९३२४३६३९३४
satishsolankurkar@gmail.com

## कवितेविषयी

कविता करते स्पर्धा आयुष्याशी
जाते वर वर उंच
आभाळात
आयुष्य धडपडते सरपटते
अडखळते
उंबरठ्याच्या आत!
कविता होते
तुकोबाच्या धगधगत्या आयुष्याची
साक्षीदार
आणि तो गेल्यावरच होते;
त्याच्या गाथेची
रुपेरी किनार!
कविता होते काळी माती
नांगरलेली स्वप्ने नि मृगाचं पाणी
तरारते कोंबाकोंबातून कविता
मात्र पोशिंद्याचे पाय
सदाचेच अनवाणी!
भुकेवर; भाकरीवर
करता येते सुंदर कविता
पण कविता कधीच नाही
भुकेच्या मदतील येत
डोळ्यांत पाणीही आणते कविता
पण कवितेवर कधीच
नाही कुणी
घासभर भाकरी देत!
कविता; कविता असते
आयुष्य; आयुष्य
सापडण्याआधीच हरवून बसते;
अधुऱ्या वर्तमानाचे भविष्य...!

**सदानंद सिनगारे**
जिजामाता मार्ग, खामगाव,
जि. बुलढाणा
भ्रमणध्वनी : ९४२२५६८१२७
sa.singare@gmail.com



## कुंती

ती उभी तिथे त्या वृक्षासमीप आणि
गोंधळून पुरती गेलेली!

ती बघते आकाशाचे काळीज वेडे लाल
तो तप्तरसाचा ज्वालामुखी विशाल
अन सर्पाच्या जिव्हेमधुनी; फुत्कार निघावा तैशा
लाव्याच्या ठिणग्या क्षितिजाच्या भाळावर

घेऊनिया थोडी हिंमत; अन मायेचे गंगाजल
त्या अपमानाच्या ज्वाला, ती शांत कराया आलेली
गोंधळून पुरती गेलेली!


तो गर्भ कधी नवसाचा नव्हता तरीही
डोहाळे त्या वेळेचे; पुरविले न गेले तरीही
ती तरीही त्याची माता, अन् रक्ताचा तो बाळ
एकांती अन एकाकी कापिली जयाची नाळ

त्या बालमुखातून तेव्हा ओढून घेतला पान्हा
नजरेने आज पुन्हा त्या, ती पाजाया आलेली
गोंधळून पुरती गेलेली!

विनवणी चालली शब्दांची सारखी
त्या आभाळा गवसणी घालण्यासाठी
त्या रुसलेल्या बाळाला; दाखवू कशाचा मोह
या अवघ्या धरणीवरला, तो दानशूर निर्मोह

आठवून फिरूनी करणी काल दिसाची
हिम झाली सारी भाषा, ती फिरूनी हिरमुसलेली
गोंधळून पुरती गेलेली!

**मनीषा साधू**
प्लॉट नं. ६, फ्लॅट नं. २०१
महर्षी विनायक अपार्टमेंट
स्वावलंबीनगर (स्केटिंग ग्राउंडजवळ),
नागपूर-४४००२२



## एक दिवस

आज आभाळ कसे भरून आले आहे
दिवसभर माझ्या मनात

कुठल्या अनामिक नात्याची करुणानदी वाहतेय
दुथडी भरून माझ्या रक्तामधून!
दुपारचं उन्हही शासकीय चंद्रकलेचं झालंय
आजवरच्या कृतज्ञ पायवाटेवरून चालताना

माझ्या बागेतलं फळ कुणी तोडलं.. मी तोडू दिलं
मला राग नाही आला
आज माझं पात्र दयेनं भरून वाहतेय
हात देणाऱ्याचे झाले आहेत
कुणा सहवेदनेनं अश्रुतीर्थ झरत आहे

माझ्या घराचं अंगण भिडलं आहे क्षितिजाला
आणि भिंती कोसळून दाही दिशांना जोडणारा
एक तरल समर्थ पूल झालोय मी
शब्दांत तुळस ओवणारा अभंग
ज्ञानेश्वरीतील अमृतघन ओवी झालोय मी

केवळ जिवालाच नव्हे तर शब्दांनाही
विश्वात्मक जाणिवांचे धुमारे फुटू लागले आहेत

आज मी सुखतुडुंब झालो आहे
आयुष्याचे पिकले फळ रसमधुर झाले आहे

**दत्ता हलसगीकर**
२० अ, जवाननगर,
विजापूर रस्ता, सोलापूर-४१३००४
दूरध्वनी : (०२१७) २३४२५९४
भ्रमणध्वनी : ९८२२३००७००

# टाळी

चांगदेव
काळे

''अहो! सांगा ना,. कोणती साडी नेसू. वैताग आला नुसता. एक धड सुचेना.'' साडी अंगावर टाकून पाहिली. रंग मनाला येईना. आला मनाला तर वर प्रश्न. काठाची की बिगरकाठाची. मग रंग कोणता. समारंभाला शोभेसा हवा ना. समारंभाला कोणता रंग. निळा, लाल, पांढरा की पिवळा. त्यावर ब्लाऊज कोणता. लाल, पिवळा की निळा. बरं त्यांची अवस्था? ब्लाऊज खांद्याला लावून पाहिले. तर कुणी आखूड, घट्ट. तब्येत वाढली की काय? कुणी लांब. कुणी अंगाला सैल. आपण सुकलो की काय? तर कुणाला खोल गळा. कुठे पाठ खोल. आपण अशाही फॅशनी केल्या म्हणायच्या! एक ना धड. आता काय करायचं? नवीन शिवायचे का? आता वेळ कुठं आहे. एकतर कार्यक्रमाचं आताच कळलं. अगोदर कळलं असलं तर शक्य होतं. कार्यक्रमवालेही चक्रमच. त्यांना हे कळलं कसं नाही. वेळेपूर्वी कळवायचं असतं ते. आता आली ना पंचाईत! कार्यक्रमाला जायचं आहे. तर नीटनेटकं हवंच ना. म्हणे मातृदिन. इथं मातांची फजिती होतेय त्याचं काय?

''अहो, ऐकलंत का?'' श्रीकांतचा काहीच प्रतिसाद नाही. एकदा विचारलं होतं ना. पुन्हा हाक मारली. तरीही हे गप्पच. बाहेर गेले की काय? वळून पाहिलं तर हे सोफ्यावरच. हातात पेपर घेऊन बसलेले. डाव्या मांडीवर उजव्या पायाची घडी. हे काय? मी हाक मारतेय. यांचं लक्षच नाही. इथं जीव मेटाकुटीला आला. हे आपल्याच नादात. प्रसंगाचं गांभीर्यच नाही. सरळ उठले. पेपर हिसकावून घेतला हातातून. ''म्हटलं, साडी कोणती नेसू? लवकर सांगा. वेळ होत आली आहे निघायची. उगीच उशीर नको.''

श्रीकांत नुसतेच पाहत राहिले. उत्तर दिलंच नाही. त्यांच्या गालात स्मित पसरलेलं दिसू लागलं. डोळेही जरा किलकिले झाले. खालून वरून पाहू लागले. आपादमस्तक म्हणतात की काय, तसे. नंतर नजर स्थिर झाली. कमरेचा पट्टा ते गळ्यापर्यंत. पटकन् लक्षात आलं. आपण समोर उभ्या आहोत. तेही फक्त ब्लाऊज परकरवर. तसं त्यात आता नवीन ते काय होतं! काही काल लग्न झालेलं नव्हतं. तरी त्यांची नजर स्थिर होती.

''अहो, मी काय म्हणते...'' भानावर आणायला पुन्हा हाक मारली. खरं तर लाजल्यासारखं झालं होतं. आवाज चिरकल्याचा भास जाणवला.

''उत्तर सोपं आहे. फक्त वेळ चुकली. रात्री विचारलं असतं तर...' बोलता बोलता त्यांनी हात पुढे केला. नजरेत लाडिकपणा दाटला होता. खरं म्हणजे याच नजरेचं कौतुक वाटतं. अंगभर मोराचं पीस फिरत जातं. वाऱ्याची झुळूक येण्यापूर्वीची मंद साद. ढग दाटून आल्यानंतरचा गंध. फुलाला काय वाटत असेल तेव्हा? मन फुलासारखं झालं. तरी हात झटकून मागे सरकले.

''चावटपणा नको. वेळ होत आलीए. जा, बाहेर जाऊन बसा. तयारी करा तुमची. मी करते माझी तयारी. जमेल तशी.'' यांच्याशी बोलण्यात अर्थ नव्हता. पुन्हा कपाटाकडे वळले.

''मी काय म्हणतो'' यांनी सुरुवात केली. ''कार्यक्रमाला जायला हवंच का? आहे काय त्या कार्यक्रमात? सगळा जुलमाचा रामराम. कार्यक्रम करायचा म्हणून करायचा. चार भाषणं. तीही जुलमानं पकडून आणलेल्या धेंडांची. विषयाशी काहीही संबंध नसलेली. तरीही ते बोलतात. अधिकार

असल्यासारखं. फुकटचा वेळ वाया घालवतात.''

यांना कार्यक्रमात कधी रस नसतोच. यायचं नसेल तेव्हा सतरा कारणं सांगतील. आताही तेच.

''नाही हं, असंच असतं असं नाही. काही चांगलेही कार्यक्रम असू शकतात. त्यातून हा मातृदिनाचा कार्यक्रम. सोज्वळ. त्यात माझा निबंध आहे. त्यासाठी त्यांनी आवर्जून आमंत्रण दिलंय. कदाचित बक्षीससुद्धा मिळण्याची शक्यता आहे. वाचलंत ना आमंत्रण पत्र!''

''त्यापेक्षा घरी थांब. मीच तुला चांगलं बक्षीस देतो.'' बसल्या जागेवरून यांनी सुचवलं.

''कधी कधी दुसऱ्यांच्या बक्षिसांचा आदर राखावा. चला, तयारीला लागा. उशीर होतोय.''

''ते मिळेल याची खात्री काय? अशा गोष्टीमागे धावण्यात मतलब काय? बरं, बक्षीस म्हणजे काही अंतिम ध्येय नाही. जीवनात अनेक गोष्टी आहेत. ते साध्य करण्याचं ध्येय असावं.''

''उगीच नकारघंटा वाजवू नका. अनेक लोक येतील तिथं. मोठा समारंभ असेल. चार लोकांना ऐकायला मिळेल. मातृदिनाचा आदर ठेवणार की नाही?''

''खरं सांगू? अशा कार्यक्रमांना जायला मन करत नाही. तू असं कर. जा एकटी. ड्रायव्हरला सांगतो तुला सोडायला. येताना घेऊन येईल.''

जरा रागच आला. कधी नाही ते निघायचं म्हणते. तर यांचा नकार. हौस नावाची गोष्टच नाही. तरी बरं, फारसा आग्रह धरीत नाही. कुठं चला असं म्हणत नाही. आज चांगली संधी आली. मोठा समारंभ होणार आहे. आवर्जून या, असा आग्रह आहे. शिवाय औचित्य आहे कार्यक्रमाचं. काय हरकत आहे अशावेळी यायला? यांना मुळात कशाचं कौतुक नाही. बायकोचं तर नाहीच. सरळ म्हणतात, 'जा एकटी.' हरकत नाही तशी एकटीने जायला. नाहीतरी तो कार्यक्रम बायकांचाच आहे. बायकांच्या कार्यक्रमाचं कौतुक पुरुषांना काय असणार? तरी आले तर बिघडणार नाही. इतरजणी नवऱ्यासोबत येणार. मिरवणार. मग आपण नको का मिरवायला? तशी ऐट असतेच नवऱ्यासोबत मिरवण्यात. त्यातून रुबाबदार नवऱ्यासोबत जास्तच. श्रीकांत तसे दिसायला रुबाबदार आहेत. रूपाने राजबिंडे आहेत. पटकन छान पडते त्यांची. बोलण्यात लाघवी आहेत. चटकन आपलंसं करील असं वागणं आहे. असा नवरा सोबत असायला हवाच. त्यांच्यासारखा नवरा असल्याचा इतरजणींना हेवा वाटणारच. अशावेळी काहीशा मत्सराने त्या पाहणार. तो त्यांच्या डोळ्यांत पाहताना किती गंमत येईल? यांना मात्र त्याचं काहीच नाही.

''कुठलीही कारणं सांगू नका. तुम्ही यायचं आहे. चला, तयारी करा.'' जरा दरडावून हुकूम सोडला.

''नाही. मला जमणार नाही. तू जा.'' हे उठून हॉलमध्ये निघून गेले. पुरुषाला किती सहज मोकळं होता येतं. हात झटकल्यासारखं. दोन्ही हातांचा परस्परसंबंध नसल्यासारखं. तसे दोन्ही हात नामानिराळेच. ते एकत्र येतात तेव्हाच संसार होतो. टाळीसाठी दोघांनी एकत्र यावंच लागतं ना! शेवटी संसार तरी काय असतो, ती एक टाळीच असते. दोघांच्या साथीनेच तिचा नाद उमटतो. गुंजतो. फुलतो. आनंद देतो. आनंद वाढवतो. रागच आला. हे काय वागणं झालं? म्हणे, तू जा. मी जाणारच. आमंत्रण मलाच आहे. तुम्ही सगळ्यांनी यावं अशी अपेक्षा आहे. नसाल येत तर नका येऊ. नाही. हे असं वागणं ठीक नाही. आपण एकटीनं काय जायचं? भरल्या घरातील बाई आपण. कधी अशा एकट्या गेलो नाही. ते शोभूनही दिसत नाही. यांना नसेल यायचं तर राहिलं. सासूबाई आहेत. त्यांना सोबत घेऊ. त्याही घरातल्या कर्त्यासवरत्या आहेत. त्यांच्या शब्दाला तितकीच किंमत आहे. त्यांचं येणंही शोभून दिसेल. जरा नीटनेटकी साडी नेसून घेतली. समारंभाला बरी दिसेल अशी. फार नटण्यासारखी नव्हती. तशी फार नाव ठेवावी अशीही नव्हती. तसं म्हणायला काही आपण नवरी नाही. आवर्जून लक्ष जावं असं रूप नाही. मध्यम वयाची. चारचौघींसारखी साधी. त्यात नटायचं तरी कशाला? त्यातून हे सोबत नाहीत. म्हणजे फांदीशिवाय फूल. फुलदाणीत ठेवलेलं. त्याची मिजास ती काय!

''आत्याबाई, एक कार्यक्रम आहे. मातृदिनाचा. आपल्याला जायचं आहे. चला, तयारी करा.'' त्यांच्यासमोर येत सांगितलं. तशा त्या फार कामात नव्हत्या. घरातलंच काहीबाही चाललेलं होतं. महत्त्वाचं म्हणजे हॉलमध्येच होत्या. श्रीकांत काहीसं अंतर राखून उभे होते. खिडकीतून बाहेर पाहत होते. लक्ष नसल्यासारखे. मीही त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्याचे दाखवलं. तरी त्यांना समजेल अशा सुरात म्हटलं, त्यांनी काही वळून मागे पाहिले नाही. सासूबाई काही चटकन उत्तरल्या नाहीत. हातातलं काम खाली ठेवून सावकाशपणे हसल्या. त्यांच्या नितळ चेहऱ्यावर चमक पसरली. कांद्याचा पापुद्रा उलगडावा तशी.

''माझं मातृत्व सरलं आता. चाळीस वर्षे झालीत त्याला. म्हाताऱ्या गायीचं कालवडींमध्ये काय काम? त्यापेक्षा श्रीला घेऊन जा. नवराबायकोचं जाणं ठीक राहील.'' आत्याबाईंनी अंग काढून घेतलं. मनातून मला तेच हवं होतं. त्याच उद्देशानं मोठ्यानं ऐकवलं होतं. वाटलं, आता श्रीकांत वळून पाहतील. कशाचं काय; हे आपल्याच नादात. दावणीला बांधलेल्या जनावरासारखे.

''आम्ही असतोच नेहमी सोबत. आज तुम्ही सोबत चला. मातृत्वाचे सार तुमच्या रूपात दिसेल सगळ्यांना. तुमच्यासारखी अनुभवी माणसं हवीत तिथं. मातृत्वासोबत माणुसकी समजावून सांगणारी. आपल्या-परक्यातला फरक सांगणारी. मातृत्वासोबत त्यातला अनुभव जास्त महत्त्वाचा.'' काय बोलत होते मी. मातृत्व अनुभवातूनच साकारतं ना! अनुभवापेक्षा ते वेगळं कसं असू शकणार?

आत्याबाई तशा खरंच अनुभवी. मुरलेल्या दह्यासारख्या. लोणी पोटात दडवून ठेवलेल्या. नुसत्याच हसल्या. काय बरं कारण असावं या हसण्यापाठी. पटकन् अंदाज आला नाही. मात्र नंदा बाजूलाच होत्या. नणंदबाई. वन्स. लग्नाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या. बोलण्यात मात्र उंबरठा ओलांडलेल्या. लक्ष देऊन ऐकत उभ्या होत्या. संधी मिळताच झेपावल्या.

''वहिनी, अशा कार्यक्रमात तुमचं काय काम? उगीच उतावीळ झालात ते. मातृदिनाचा तुमच्याशी संबंध काय? तुम्हाला ना मूलबाळ, ना आई होण्याचा अनुभव. न पावलेल्या पिराचा ऊरूस. तिथं नैवेद्य घेऊन निघालात. आमंत्रण काय देतात, कुणालाही. आपण गेलंच पाहिजे असं कुठे आहे? आई म्हणते तेच खरं आहे. म्हाताऱ्या गायीचं कालवडींमध्ये काय काम?''

झालं! तापलेल्या दुधात लिंबू. गप्प का नाही बसत? बोललंच पाहिजे का सगळ्या ठिकाणी? तसा रागच आला होता. सवयच मुळी अवसानघात करायची. आपला संबंध असो वा नसो, मूल नाही हे काही झाकलेलं नाही. सगळ्यांना ठाऊक आहे ते. म्हणून बारशाला जायचं टाळायचं का? नाही झाले आई. नाही दिला जन्म बाळाला. म्हणून नाही का जायचं समारंभाला? अजून कालवडीचं वय आहे. म्हणून सुचतं बोलायला. गाय झाल्यावर कळेल. जाऊ देत. काय लक्ष द्यायचं अशा बोलण्याकडे. उगाच कलहाला कारण. त्यात कुणीच त्या बोलण्यावर बोललं नाही. म्हणजे सगळ्यांच्या मनात हेच घोळत असणार. आत्याबाईंनी हातातलं काम पुन्हा सुरू केलं. यांचं तर तोंड बाहेरच होतं. वाऱ्याच्या दिशेने रोखलेलं. आशा धरायची कुणाकडून? आपणच आपलं सावरायला हवं. पाणी गढूळ म्हणून का पोहणं सोडायचं? पाण्यात पडलो तर पोहायला हवंच.

''नाही हं वन्स! कार्यक्रम मोठा आहे. आमंत्रण पत्रिका वाचा. मोठी मोठी माणसं येणार आहेत. चार चांगल्या गोष्टी ऐकायला मिळतील. आमचं सोडा. आयुष्य कोरडं गेलं म्हणा. तुमचं तर सारंच व्हायचं आहे. तुम्हाला उपयोगी पडेल. चला तुम्हीसुद्धा. समजा, नाही पडलं उपयोगी, तरी नुकसान नक्कीच नाही होणार.''

''मला वाटतं, तू चुकते आहेस. भलत्या गोष्टीवर विश्वास ठेवतेस. मला सांग, काय मिळणार या समारंभात? विज्ञानाच्या परिषदा होतात. त्यात कोण असतं, ठाऊक आहे? सारे विज्ञानाचे अभ्यासक. दुसऱ्यांनी तिथं जाऊन उपयोग काय? तू स्वत:ला विसरायचा प्रयत्न करत असलीस, मन गुंतवण्याचा प्रयत्न करत असलीस तर जा. अशा गोष्टी तात्पुरत्या असतात हे लक्षात ठेव. देवळात जाताना हातात नारळ असावा लागतो. तुझ्या हातात काय आहे? रिकामी कूस. निघालीस मात्र मातृदिनाला.'' नंदा वन्सने भावाचं काम सोपं केलं. आत्याबाईचं मत वेगळं नसावं. पुरात भोवरे असतातच. त्यांचा अंदाज ध्यानी ठेवायला हवा, तरून जायचं तर. तरी एक बरं झालं, श्रीकांतनी नजर वळवली. पाणी नाकातोंडात गेलं की नाही पाहण्यासाठी. दमछाक झाली की नाही, हे पाहण्यासाठी. हा त्यांचा चांगुलपणा. मी मात्र हातपाय सोडले नाहीत. त्याची तयारी आधीच मनाशी केली होती. उघड्यावर ऊन-पाऊस लागणार. तसं वीज-वारा भेटणारच. पळून पळणार कुठे? त्यांच्यात राहायचं. दु:स्वास करून कसं चालेल?

''वन्स, यात आणखी एक गोष्ट आहे. भाग घेतलेल्या सगळ्यांना आमंत्रित केलंय. स्पर्धेचा निकाल तिथंच लागणार आहे. विजेतीला मोठं बक्षिस मिळणार आहे. कुणी सांगावं, आपलाही नंबर लागेल म्हणून जायचं.''

''तोंड धुऊन बस. मांजर पंजाने धुते ना, तशी. तुला वाटतं, तुला मिळेल बक्षीस? भले भले पडलेत लिहिणारे. त्यांचा पाडाव लागत नाही. त्यातून तू पडली नापीक जमीन. अनुभवाच्या नावाने वाळवंट. तुला कशा कळणार मातृत्वाच्या वेणा? बक्षिसाची आशा धरतेस कशाच्या जोरावर? कुशीचं तर सोड. धड अक्षरसुद्धा नीट नाही तुझं. मला काय म्हणायचं ते कळतं ना तुला? रिकाम्या घागरीला कवडीची किंमत नसते.''

''सारं कबूल आहे मला. तरीही जायचं. तुम्ही सगळ्यांनीसुद्धा यावं. आग्रह आहे तसा. मी असेन वांझ. माझी नाही उपजली कूस. मला नाही झालं मूलबाळ. आहे मी रिकामी घागर. कबूल. तरी मी घराची घटक आहे एक. तुम्ही सारेजण माझ्याशी बांधलेले आहात. तुमची अब्रू ती माझी अब्रू. तशी माझी बेअब्रू ती तुमचीही. तुम्ही माझ्यापासून वेगळे राहू शकत नाहीत. टाळी दोन हातांनी वाजते. मी एक हात आहे. तुम्ही दुसरा. तुम्ही तुमची मतं मांडलीत. मी ऐकली. आता माझी मतं. ती मांडण्याचा अधिकार आहे मला. तो वांझपणामुळे करपलेला नाही. आता मी सांगते ते ऐकायचं. आपण कार्यक्रमाला जाणार आहोत. सगळे मिळून.'' अखेर अधिकार वापरावा लागला. त्याचा काय परिणाम होतो ते पाहू लागले. माझ्याकडून असलेल्या अपेक्षेत हे बसलं नसावं. नजरा

आश्चर्यचकित झाल्या. त्या माझ्यावरच रोखल्या गेल्या. सासूबाईंना अंमळ झोंबलेलं जाणवलं. त्यांची नजर श्रीकांतकडे वळली. प्रतिक्रियेसाठी यांना जागा सापडेना. जागा शोधणं तसं अवघड होतं. आईची बाजू सांभाळायची की बायकोवरचा विश्वास? त्यांना दोन्ही गमवायचे नव्हते. नंदा वन्स लहानच. त्यांना ऐलतीर पैलतीर नव्हता. त्यामुळे त्यांच्या मर्जीचा प्रश्न नव्हता. ही गोष्टी त्यांना जाणवली असावी.

''हा अधिकार की हुकूम?'' नंदा वन्सने शंका काढलीच. त्यांचे डोळे रोखलेले होते. मोठाले.

''मी काय म्हणतो नंदा, आपण असं केलं तर...' श्रीकांत सावरून पुढे झाले. ''आपण जाऊ या सगळे मिळून. तिचा आग्रहच आहे तर. पाहू या, काय असतो समारंभ ते.'' नंदाचा प्रतिसाद काही सकारात्मक वाटला नाही. त्याची पर्वा श्रीकांतने केली नाही. तिकडे दुर्लक्ष करून मला विचारले, ''जेवण वगैरे आहे का तिथे? म्हणजे तोही प्रश्न सुटेल परस्पर.''

''ठाऊक नाही. असेल तर उत्तम झालं. नाहीतर बाहेरचं जेवण माझ्याकडे लागलं.'' एवढी जोखीम उचलायला काहीच हरकत नाही. नंदाचा नाइलाज झाला. भावापुढे आढेवेढे घेणे शक्य झालं नाही. तरी हातचा एक हुकूम बाहेर काढलाच.

''दादा, मान्य! जाऊ या सारेजण. त्यानिमित्ताने कमलाबाईची भेटतरी होईल. खूप वर्षं झाली तिच्या भेटीला. खूप बदलली असेल नाही, ती? एवढीशी. हडकुळी. म्हणजे नुसती हाडांची. मांसाचा पत्ताच नसलेली. डोळे बारीक, तेज हरवलेली. हातापायांच्या काड्या. अंगावर सुरकत्यांची जाळी. सावळ्या रंगाची. एवढीशी मूर्ती. कमरेला लुगडं खोचलेली. अंगात चोळी. लहानसं डोकं. त्यावर केसांचा लहानसा अंबाडा. गळ्यात मण्यांची एक माळ. लक्षात राहावी अशी मूर्ती. वाटायचं, हिला काही कळत नसेल. बोलत येत नसेल. छे! काय वस्ताद होती बोलण्यात! एवढंसं बोलायची. अचूक. किती समजावलं आपण. भलंबुरं सारं. नाव नाही. आपलंच खरं केलं तिने. तीही असणार ना तिथं?'' बोलताना नंदाचा उत्साह ओसंडून वाहत होता. तिला खरंच कमलाबाईची आठवण झाली असेल? की मुद्दाम काढली चिडवण्यासाठी. तिचा आता काय संबंध होता? ती आली, नाही आली, फरक काय पडणार होता. मुळात अशा बाईला बोलवणार कोण? तिचा पत्ता तरी कुणाला ठाऊक असणार. अडाणी बाई ती. आदिवासी भागात राहणारी. तिच्यापर्यंत पोचवणार कोण मुद्दाम? नंदाने मुद्दामच खपली काढली असणार. तिची नजर सांगतेय ते. आपल्याकडेच लक्ष होतं बोलताना. काही माणसांना असते सवय ओरखडे ओढायची. नंदावन्स त्यातल्या. लहान आहेत अजून. त्यांच्याकडे दुर्लक्ष करणं उत्तम. सगळे तयार होताहेत हेच मोठं अप्रूप. माझ्यासाठी मात्र आभाळ ठेंगणं झालं. टाळीसाठी हात जुळून आले.

''मला वाटतं, अनयसुद्धा येणार असेल. गोड मुलगा. लळा लावला होता सगळ्यांना. भेटला तर नक्कीच आनंद होईल त्याला.'' आत्याबाईंनी जखमेत खोल बोट खुपसलं.

''नाही हं आई. तो गोड वगैरे काही नव्हता. आईसारखाच होता. हडकुळा. काळा. तेज नसलेला. तेज आलं ते इथं आल्यानंतर. गोड दिसायला लागला तो इथं आल्यानंतर. खरं तर पाप्याचं पितर होतं ते. खाण्यावाचून आबाळ झालेलं. रानात खुरटी झुडपं वाढतात तसं. काटेरी झुडूप. आपण त्याला



खाऊपिऊ घातलं. वाढवलं. तेव्हा बाळसं धरलं त्याने.'' नंदाने आईला दुरुस्त केलं. तेही हेल काढून. अनयविषयी द्वेष असल्यासारखा. खरं तर तिला तो आवडला नव्हता कधी. कधी आपुलकीने बोलणं नाही. भरवणं तर दूर राहिलं. जवळसुद्धा घेतलं नाही. अंघोळ घालणं, त्याला शाळेला तयार करणं, शाळेत पोचवणं तर नाहीच. माणूसद्वेष कसा असतो त्याचं उत्तम उदाहरण. ती अनयविषयी चांगलं बोलणार कशी? तिच्या बोलण्यावर श्रीकांतनी मौन धरलं. त्यांना त्या आठवणी नको होत्या. म्हणजे विषयच नको असावा. त्यांनी तोंड फिरवलं. आत्याबाईचं मात्र तसं नव्हतं. लेकीला प्रतिसाद देणे त्यांच्यासाठी अगत्याचं होतं. नाहीतर लेकीचं बोलणं वाऱ्यावर उडालं असतं. ती काळजी त्यांनी घेतली, आई म्हणून.

''काय आहे नंदा, रानातलं फूल ते रानातलं. बागेतल्या फुलाशी तुलना कशी होणार त्याची? तरी फुलून आलं होतं हे खरं. आता तेव्हा नसेल रंगरूप, बदललं ना इथं आल्यावर? रंग उजळला. चेहऱ्यावर टवटवी आली. मुळातच हुषार असावा. किती भराभर आत्मसात केलं त्याने सारं. शाळेतसुद्धा चुणूक दाखवायला लागला होता. नक्कीच नंबरात आला असता; आणखी राहिला असता तर.''

''काही नाही. नशीब असतं एकेकाचं. फुटक्या नशिबाला किती ठिगळं लावणार, कारलं पाकात टाकलं म्हणून...? मी म्हणते तो गेला तेच बरं झालं. ओढ्याचं पाणी ओढ्याला जाणार. नाहीतर तिथंच तुंबून राहणार. आज गेला, तसा मोठा झाल्यावरही गेलाच असता. आता एवढं वाटलं नाही. नंतर मात्र उगाच त्रास झाला असता.''

खरंच येईल अनय तिथं? किती वर्षे झाली त्याला भेटून. आताही तसाच असेल तो? गुटगुटीत, डोळ्यांत तेज असलेला. मान डोलावून हाक मारणारा : 'आई!' किती जड गेलं ते म्हणताना. 'आई!' सवयच नव्हती त्याला आई म्हणायची. आपण तर याच शब्दाला आसुसलेले. 'आई!' किती गोड शब्द! त्यासाठी कान आतुरलेले. मन हळवं झालेलं. सारं घर त्यासाठी उत्सुक होतं. तो आधी आमा म्हणायचा. मग आमी. मग आय. शेवटी मात्र जमलं. 'आई' हा शब्दच ठाऊक नव्हता त्याला. त्याच्या आईलाही नव्हता तो. आईला आई म्हणायचं हे ठाऊक नव्हतं त्याला. त्याच्या आईला नव्हे, त्याच्या परिवाराला. तो ते शिकला. आपल्याला हुरूप आला. आई झाल्याचा आनंद झाला. आईच्या जीवनात टाळी वाजते ती मुलाच्या जन्माने. आई शब्दाला टाळी मिळते ती मुलाच्या जन्माने. ती टाळी वाजू लागली होती. घर त्या टाळीत रमायला लागलं होतं. घर त्या निनादात रंगायला लागलं होतं. आईपणाची टाळी.

अनय गेल्याचा त्रास झालाच. किती प्रेमानं वाढवलं होतं त्याला. मोठं करायचं स्वप्न रंगवलं त्याच्याभोवती. किती कष्ट घेतले त्याच्यासाठी. त्याच्या सगळ्या सवयी बदलाव्या लागल्या. त्याचं रूप बदलावं लागलं. बागेत शोभेल असं. यासाठी किती धडपड करावी लागली. त्याला यशही आलं होतं. कुणी त्याला आदिवासी म्हणू शकणार नव्हतं. तो रानातला राहिला नव्हता. बागेतला झाला होता.

''नंदा, तुझ्या कल्पनेची दाद द्यायला हवी.'' श्रीकांत मागे वळले. टाळी वाजवत म्हणाले, ''ज्या गोष्टीशी सुतराम संबंध नाही, जे कधी घडणार नाही, कुणी स्वप्नात कल्पना करणारी नाही; अशा गोष्टी तू उकरून काढतेस. खरंच दाद देतो तुला. नव्हे, पार्टी देणार. अनय खरंच तिथं आला तर.''

काय हे आश्चर्य! अनयने यावं ही यांची इच्छा? म्हणजे यांनाही लळा होता त्याचा. कधी बोलून दाखवलं नाही. घरात असताना नाहीच. गेल्यानंतरही नाही. पुरुषांना जमतं असं कोरडं राहायला. आपण पटकन् बोलून मोकळं होतो. शब्दांनी नाहीतर आसवांनी. यांनी मात्र ते दाबून धरलं. आतल्या आत. सहवेदना पाहून सुखावले. घरात आपण एकटेच नाही. आपल्याबाजूने कुणी आहे हे पाहून सुखावले. खरंच, अनय आला तर... नाही, त्याने यायलाच हवं. त्याला मनापासून भेटावंसं वाटतंय. ओळख दाखवील ना तो? खूप मोठा झाला असेल आता. पाहताच काय करील बरं तो? धावत येईल. मिठी मारील. हाक मारील : आई! नक्कीच मारील. आपण लळा लावला त्याला तसा. कशाची म्हणून कमतरता पडू दिली नव्हती. आपला मुलगा तो. मुलाला कोण कमी पडू देणार. पोटचा नसला म्हणून काय झालं? मुलगा मानलं होतं ना त्याला!

''खरंच!'' नंदानं उडी मारली. टाळ्या पिटीत म्हणाली, ''माघार नाही घ्यायची हं. सांगून ठेवते. तुला सवय आहे ऐनवेळी माघार घ्यायची.'' पार्टीला जाणं हा नंदाचा आवडता छंद. हवं ते खायला मिळणार ही तिच्यासाठी पर्वणी. या खुशीत म्हणाली, ''तू बघच. तो नाही आला तर मी आणीन त्याला. पार्टी मात्र हवीच.''

नंदाच्या उत्साहाचं सगळ्यांनाच हसू आलं. अशक्य गोष्टीवर ती खूश झाली होती. उंबराचं फूल दाखव या अटीसारखी.

''मात्र तू पार्टी द्यायची. तो आला नाहीतर.'' श्रीकांतनी तिला पेचात पकडले.

''म्हणजे एकूण काय, पार्टी बोंबलली. तो काही येणार नाही. तुम्ही पार्टी काही देणार नाही.'' आईने मुलगा-मुलीच्या अटीचा अर्थ लावला.

माझ्यापुरता विषय सोपा झाला होता. सगळे येणार यासारखी पर्वणी नव्हती. जरा घाई करतच म्हटले,

''चला, उशीर होतोय. वेळ होत आलीय.''

आत आले तर श्रीकांत पाठी आले. खांद्यावर हात ठेवून म्हणाले,

''खरंच जायला हवं का? उगीच मन:स्ताप नको म्हणून विचारतोय. मातृदिन वगैरे सगळं ठीक आहे. तू त्यावर निबंध लिहिलास हेही ठीक. प्रश्न असा, की त्यातून मिळणार काय? मातेचे सोहळे, तिचं गुणगान. तिचं मोठेपण. तिच्या जबाबदाऱ्या. हे सारं ऐकताना आनंद वाटेल तुला? गुलाबाचे गोडवे लव्हाळीसमोर गायचे. तशातला प्रकार होणार हा. सहन करशील हे सारं?''

श्रीकांतच्या स्वरात आपुलकी होती. त्यांचा स्वर हळवा झाला होता. त्यात माझ्याविषयी काळजी होती. शेवटी काळजी वाटणार ती त्यांनाच. माझी ओळख त्यांच्याशिवाय कुणाला असणार! जिवाभावाचं नातं तेवढंच होतं. टाळी वाजवणारं... आपुलकीनं. इतरांची नातीही वाजवतात टाळी. दु:स्वासाने. तिरकस हेतूने. कधी द्वेषाने. त्या टाळीचा आवाज वेगळाच असतो. जाणवतो ना. कोरड्या हातांचा आवाज कोरडाच. चपराक बसावी असा खणखणीत. टाळणार कसा? श्रीकांतना तो ऐकू येतो. जाणवतोही. शेवटी ती त्यांची माणसं आहेत. त्यांच्या टाळ्यात सहभागी व्हावंच लागणार त्यांना. रोखणं कुणाच्याच हातात नाही. तरी माझ्यासाठी. माझा म्हणून कळवळा आहेच.

''हो, जायचं आपण. मी आई नाही. मान्य. बाई तर आहे. दुसऱ्या आया असतील तिथं. त्यांचं कौतुक करू. दुसऱ्यांच्या आनंदातही आनंद असतोच ना आपला! गुलाबाच्या रानात गवत असतं. ज्याला कुठलीच फुलं येत नाहीत. तरी गुलाबाचा ते द्वेष करत नाही. आपलं मानतं.''

''हे बघ. गैरसमज करून घेऊ नकोस. तुला दुखवण्याचा हेतू नाही माझा. तुझ्या उणिवाही दाखवायच्या नाहीत. ते कबूल, उणिवा आहेत. त्या तुझ्या एकटीच्या नाहीत. आपल्या दोघांच्याही आहेत. त्या दुरुस्त होणार नाहीत हे खरं आहे. तसं त्यांच्यापासून दूर पळणंही शक्य नाही. आपण त्या सहन करू. सामोरं जाऊ, दोघं मिळून जाऊ. मी सोबत आहे तुझ्या. फक्त एक कर. अशा समारंभांना जायचा आग्रह सोड. बाभळीच्या झाडाखाली बोरं नाही मिळत. त्यासाठी बोरीच्याच झाडाखाली जावं लागतं. आपल्यात ते बळ आता उरलेलं नाही.''

काय म्हणायचं आहे यांना? हवीत कुणाला बोरं? खाणाऱ्यांना खाऊ देत खुशाल. त्यांच्या खाण्यात त्यांना मिळेल आनंद. पाहण्यात आपल्याला नाही का मिळणार आनंद; निदान थोडाफार तरी?

''तुम्हाला लाज वाटतेय का माझी. स्वत:ची? स्वत:ची फसवणूक करत आहात. का नकार देत आहात सारखे. मला मूल झालं नाही म्हणून? वांझपण माथ्यावर मिरवत फिरते म्हणून? तुम्हाला चांगलं ठाऊक आहे सारं. मी वांझ नाहीए. मूल जन्माला घालण्याची क्षमता आहे माझ्यात. होऊ देत माझं काय व्हायचं ते. मरणाला घाबरत नाही मी. अशी मरण्यापेक्षा तशी मेलेली बरी. म्हणजे तुम्हाला बाभळीच्या झाडाखाली बसायला नको. नको जाऊया कार्यक्रमाला. करा माझं गर्भदान. मी तयार आहे.'' अंगाभोवती गुंडाळलेली साडी ओरबडून फेकली. ब्लाऊजच्या हुकांना हात घातला. रागच आला या सगळ्या गोष्टींचा. ऐकण्याला मर्यादा असतात काही. मला मूल नको असं कधीच म्हटलं नव्हतं. मीही गरोदर होते. लग्नाच्या तिसऱ्याच महिन्यात. ओटी भरण्याचा कार्यक्रमही झाला होता. सातव्या महिन्यात. केवढे सुखाचे दिवस होते ते! किती हुरहुर वाटत होती. सगळे आतुरतेने वाट पाहत होते. नावाचीसुद्धा चर्चा सुरू होती. सगळे सुखावले होते. फक्त दैव सोडून. कार अपघात झाला. त्यात गर्भाशयाला मार लागला. फुलू पाहणारी बाग उद्ध्वस्त झाली. 'जीव वाचला. पुन्हा संधी घेऊ नका. जिवाला धोका होईल. त्यापेक्षा दत्तक मूल घ्या.' डॉक्टरांनी सल्ला दिला. आपण तो सल्ला धुडकावून लावला. मूलबाळ नाही ते जगणं काय कामाचं? मला मूल हवं होतं. माझं. आमच्या दोघांचं. आई म्हणणारं. बाबा म्हणणारं. आजी, आत्या म्हणणारं. त्याशिवाय घराला घरपण लाभणार कसं. घर फुलून दिसणार कसं? बाभूळ होऊ जगायचं नव्हतं मला. मला जगायचं होतं, आई म्हणून. वाटेल ती किंमत द्यायची तयारी होती माझी. कितीदा सांगितलं, ओरडून सांगितलं. कुणी मनावर घेतलं नाही. सगळ्यांनी देव्हाऱ्यात बसवलं. आता तेच बाहेर ओढताहेत. त्यापेक्षा... एकदाच मेलेलं काय वाईट? सगळे हूक मोकळे झाले तसा श्रीकांतचा संयम सुटला. पूर्ण आवेशाने हात उंचावला. त्यांना माझ्याकडून ही अपेक्षा नव्हती. आता चांगली सणसणीत बसणार. आपण कोसळणार. क्षणभर काळजाचा ठोका चुकला. नकळत हात कानांवर आडवे आले. मार वाचवण्यासाठी. एका बाजूला झुकले. तोल सावरण्यासाठी. तेवढंच. हात कानावर आदळलाच नाही. आश्चर्याने वाकून पाहिले तर हात वरच. आपोआप तो खाली आला. भान आल्यासारखा. डोळ्यांतला संताप तसा कायमच होता. ओठ आवळलेले होते. काही क्षण तसेच गेले. मीही तशीच उभी राहिले. त्यांच्याकडे रोखून पाहात. त्यांचा अंदाज घेत. माझं काहीच चुकलेलं नव्हतं. मरणाची भीती मला नव्हती. जड त्यांना जात होतं. सहन त्यांना होत नव्हतं. तरीही त्यांनी संयम दाखवला. एक पाऊल मागे सरकले. स्वत:च हात झटकला. अपराधी भावना चेहऱ्यावर पसरली. आपल्याकडून चुकलं ही भावना पसरली. मान हालवत म्हणाले,

''असं कर, आवर. आपण जाऊ कार्यक्रमाला.'' इतकं बोलून हॉलमध्ये निघून गेले.

काय करायचं? जायचं की नाही जायचं? इतक्या अपमानानंतर काय उरलं कार्यक्रमात? हेही खरंच आहे, आपल्यावाचून काय अडलं? काय मिळणार आहे तिथं जाऊन? चार भाषणं. चार कौतुकाचे शब्द. पोकळ गुणगान. नकोच जायला. सगळ्यांची तीच इच्छा आहे. आग्रह आपल्याच एकटीचा आहे. सगळ्यांपेक्षा आपण मोठ्या का लागून गेलो?

''रागावलास की काय? काय झालं रागवायला. हे बघ. रागवण्यात काही अर्थ नसतो. घडीभराचं असतं हे सारं. तसा तिचाही दोष नाही. उगीच आपण तिला दोष देतो. आता त्या बाईने तमाशा केला. सारं विस्कटून गेलं. चांगला दत्तक घेतला होता. आपला मानला होता. शिकून मोठा झाला असता. सगळे सुखात राहिले असते. आपणच अभागी. जाऊ दे. अजून वेळ गेलेली नाही. आज नाहीतर उद्या होईल. दुसरा अनय सापडेल. शांत हो. ती म्हणतेय तर चला सगळ्यांनी. घर सुखात असेल तर सारे सुखी. ती कुणी परकी नाही राहिलेली. उगीच भांडत बसू नका. चला.'' आत्याबाईचा आवाज कानांवर आला. अंगावर शहारा आला. समजूतदारपणाचा झरा शिल्लक आहे म्हणायचा.

आरशासमोर आले. ब्लाऊजचे हूक मोकळेच होते. आतून ब्रा डोकावत होती. शुभ्रशी. स्वत:चीच लाज वाटली. काय भलतं वागलो आपण. तेही भलत्यावेळी. काय वाटलं असेल श्रीकांतना. घरात सगळेच आहेत. दिवसा उजेडी सगळे व्यवहार सुरू आहेत. अशा वेळी आपण... यांचं वागणंच बरोबर होतं. राग येण्यासारखंच वागलो आपण. त्यांचं हात उचलणं बरोबर होतं. मारायलाच हवं होतं. शिक्षा म्हणून. असं वागतात का कुणी भरल्या घरात? हूक लावले. साडी खाली पडली होती. ती उचलली. गुंडाळली. चेहऱ्यावर पाण्याचा हात फिरवला. आता शहाणपणा दाखवण्यात शहाणपण नव्हतं. ते तयार झालेत. त्या दोघी झाल्यात. आपण आढेवेढे घेणं शोभणार नाही. मग निघाले निमूटपणे.

तसा उशीरच झाला होता. कार्यक्रम सुरू झाला होता. सभागृह भरलं होतं. आत काळोख पसरलेला होता. डोअरकीपरने सीट दाखवल्या. अनाउन्सर माइकवर निबंध वाचत होता. त्याच्या हातात निबंध होता. एकेकाचे वाचन करत होता. वाचताना लेखकाचं नाव सांगत होता. निबंधाचं वैशिष्ट्य सांगत होता. ते निवडक निबंध होते. त्यांच्यातून एकाला बक्षीस मिळणार होतं. खरंतर कार्यक्रमातलं लक्ष उडालं होतं. त्यातला उत्साह ओसरला होता. उरला होता तो औपचारिकपणा. उपस्थिती होती ती नुसती. मूळ छाटलेल्या रोपट्यासारखी. किती अट्टहासाने सारं जुळवून आणलं होतं. सारं वाया गेलं होतं.

''हे बघ, मनाला लावून घेऊ नकोस. लहानसहान गोष्टी ह्या. घडत असतात संसारात. मोकळ्या मनाने वाग. लक्षात ठेव, पैज लागली आहे. पाहू कोण हरतो ते.'' आत्याबाईंनी ऐकवलं. माझं गप्प राहणं जाणवलं असावं. माझं सारं लक्ष अनयकडे लागलेलं. खरंच, तो आला असेल तर काय? नजर भिरभिरली. अंधारात काहीच दिसलं नाही. मुळात त्याची शक्यताच नव्हती. त्याला कोण आमंत्रण देणार? आश्रम शाळेतला पोरगा तो. त्याचा इथं संबंध काय?

अनाउन्सर एका टप्प्यावर थांबला. सभागृह अचानक स्तब्ध झालं. त्याची नजर सभागृहातून फिरत होती. काय पाहत होता तो ते कळेना. काय बोलला होता, तेही ठाऊक नव्हतं. त्यामुळे विनाकारण उत्सुकतेला ताण पडला. त्याच्या हातात कागद होते. त्याने आपला निबंध वाचला की नाही, कळत नव्हतं. कदाचित अगोदर वाचला असावा. आपल्याला उशीर झाला यायला. त्याने एकदा कागदांकडे पाहिलं. माइक हातात घट्ट धरला. दुसरा हात उंचावून म्हणाला,

''आणि बक्षिसाच्या मानकरी आहेत...' त्याचा आवाज टिपेला पोचला होता. तो अचानक थांबला. पुन्हा सभागृहाचा अंदाज घेऊ लागला. सगळ्यांचे श्वास थांबले. काळजाचे ठोके थांबले. उत्सुकतेने कळस गाठला.

'काही अंदाज?' त्याने हळूच विचारले. शांततेचा भंग केला. तो पक्ष्याचा अंदाज घेत होता. त्याला ठाऊक होतं, पक्षी इथंच आहे. त्याला उडताना पाहायचे होते. अचानक पंख पसरून झेपावत जाताना. आकाशात रेषा ओढताना. ती आपली शिकार असेल. वेध घेतलेली. तो शोध घेत होता.

''उगीच नखरे करतोय. पटकन् सांगायला काय होतं? कुणाला एकालाच तर मिळणार आहे. आव मात्र बघ. जसा सगळ्यांनाच वाटणार आहे.'' नंदावन्सला त्याचं वागणं आवडलं नव्हतं. बोलण्यात तिरकसपणा होता. ''बरं, असून काय असणार आहे? एखादी क्षुल्लकशी भेटवस्तू. त्यासाठी एवढे आढेवेढे. कशाला बोलवायचं त्यासाठी सगळ्यांना? वाटून टाकायचं कुणा एकाला. फारच झालं तर त्याच्या घरी नेऊन द्यायचं.''

''गप्प बस. लोक ऐकताहेत.'' आत्याबाईंनी त्यांना आवरलं. व्यासपीठावर टेबल मांडलेलं होतं. त्यावर चादर घातलेली होती फुलाफुलांची. मागे खुर्च्या होत्या चार. त्यांच्यावर चौघे बसलेले होते. त्यांच्याही नजरा अनाउन्सरकडे लागल्या होत्या. बसलेल्या व्यक्ती तशा भारदस्त दिसत होत्या. समारंभाची त्यांना सवय असावी. अगदी ऐटीत विसावले होते.

त्यामानाने मला अस्वस्थपणा जाणवत होता. अशा समारंभांना फारसं जाणं नव्हतं. कॉलेजची गॅदरिंग्ज तेवढी ठाऊक होती. बक्षिसाशी तर कधी संबंध आलाच नव्हता. आताही शक्यता नव्हतीच. संसारात मिळालं नाही. आता कुठून मिळणार? तरी हुरहुर वाटत होती. कोण असेल तो मानकरी?

एकजण पाठून अनाउन्सरजवळ आला. त्याच्या हातात कागद देऊन निघून गेला. अनाउन्सरने तो कागद उघडला. त्यावरून नजर फिरवली. घडी घालून म्हणाला,

''एक निबंध अजून आहे. परीक्षकांनी तो मुद्दाम मागे ठेवला होता. त्याची वाच्यता करू नये म्हणून. स्पर्धकाचीच तशी अट होती. तो आता माझ्या हातात आहे. त्याविषयी मी काहीच बोलणार नाही. मात्र सांगायला आनंद होतोय, की... तोच निबंध पहिला आहे. आणि त्याची लेखिका आहे... शलाऽऽ का श्रीकांत सरदेसाई!''

व्यासपीठावरील पाहुणा उठून ओरडला : टाळ्या!

तो हात उंचावून टाळ्या वाजवू लागला. त्याचं अनुकरण सगळ्यांनी केलं. त्याच्या टाळीवर सभागृहाची टाळी पडली. असंख्य पक्षी एकाचवेळी अचानक झेपावले. कुणीतरी दगड भिरकावल्यासारखे. वेगाने. टाळ्यांचा कडकडाट की पंखांची फडफड? सभागृह निनादात न्हाऊन निघालं. श्वासाचे हुंकार उसळले. खुर्च्यांच्या घड्या उस्कटल्या. शब्दांना अंकुर फुटले. क्षणभरच. दोन्ही बाजूंनी हात गळ्यात पडले. अचानक. आवेगाने घट्ट आवळले. घुसमटलेल्या श्वासातून शब्द बाहेर पडला : शाब्बास!

लक्षात आलं, सावज आपण ठरलो. शिकार आपण ठरलो. आनंदाचा पूर ओसंडून वाहू लागला. प्रचंड लाटांचे थैमान सुरू झाले. किनारा ओलांडून वाहू लागले. विश्वास बसत नव्हता ऐकले त्यावर! बसावा तरी कसा? होतं काय त्या निबंधात? आलेले अनुभव. सहन केलेले. सोसलेले. मानापेक्षा अपमानाचे. कौतुकापेक्षा अवहेलनेचे. पान्हा कधीच न फुटलेल्या मातेला बक्षीस? कुशीला उजवण्याचं भाग्य नाही, ती माता? बरड जमिनीला पाटाचं पाणी मिळालं. हिरवळीने रान फुलून आलं. असं नशीब नाही. तरीही? काहीतरी गफलत झाली असावी. दिवसाचं औचित्य कुठंतरी विस्कटल्यासारखं वाटत होतं. आनंदाला संशयाची किनार लाभली. मन शंकाकुल झालं. चुकून तर नाव जाहीर झालं नाही ना?

''कधी कधी चांगलंसुद्धा घडतं. आपण उगीच आपल्याला दोष देऊ नये.'' आत्याबाईचा हात प्रेमळ झाला होता. पाठीवरून फिरत होता. हळूच कौतुक दाखवत होत्या. श्रीकांतना आईच्या हाताचा स्पर्श जाणवला. त्यांनी स्वत:चा हात मागे घेतला. एकदाच शाबासकी देऊन. नंदा वन्स मात्र टाळी वाजवत होत्या. स्वत:ला बक्षीस मिळाल्यासारख्या.

''शलाकाजी, आपण व्यासपीठावर यावं.'' अनाउन्सरने विनंती केली. त्याची नजर भिरभिरत होती. शलाका त्याला सापडली नव्हती. तिचा शोध तो घेत होता. व्यासपीठावरही उत्सुकता दिसत होती. ते आपसांत बोलत होते. माइकवर पकड घट्ट झाली होती. उभा असलेला पाहुणा खाली बसला.

''ऊठ! वर बोलावताहेत तुला.'' श्रीकांतनी हळूच सुचवलं. आवाजात कोरडेपणा जाणवला. आनंद नाही का वाटला यांना? की शंका आहे मनात? उगीच मनात शंका आली. आत्याबाईंनी हातानेच उठण्याचा इशारा केला. नंदालाही बोलावंसं वाटलं. उठून पुढे आली. हातात धरून उठवत म्हणाली,

''वहिनी, ऊठ! बोलावताहेत तुला.''

जागेवर उठून उभी राहिले. नंदांचा हात हातात धरून. पायांत कंप जाणवू लागला. पाय उचलण्याचे बळ विसरून गेले. मात्र पाठीवर हात विसावला. श्रीकांत उभे होते. बळ देत म्हणाले, 'जा.' मानेची खूण करून. तो आधार मोठा वाटला. पाऊल पुढे टाकलं. तसा टाळ्यांचा गजर सुरू झाला. टाळ्या कौतुक करत होत्या. टाळ्या आनंद व्यक्त करत होत्या. टाळ्या प्रोत्साहन देत होत्या. त्यामुळे बळ आलं. धीर आला. अंगभर मोरपीस फिरत होतं. नव्हे मोरपिसारा फुलला होता. आश्चर्याचा धक्का किती सुखद असतो! मानकरी म्हणून मिरवणे किती आल्हाददायक. अपेक्षेचं फळ किती मधुर. हे सारं अनुभवाला येत होतं. एकेक पाऊल उचललं. खाली जणू गालिचा अंथरला होता. गवताचा अंकुर किती लोभसवाणा असतो. दवाचा थेंब किती अलवार असतो. पावसाळी हवेतला गारवा किती अलवार असतो. हे सारं अनुभवाला येत होतं, व्यासपीठाकडे चालत जाताना. पुन्हा नावाची घोषणा केली. टाळ्यांच्या पुरात ती वाहून गेली.

व्यासपीठाला चार पायऱ्या होत्या. अलगद पहिल्या पायरीवर पाऊल ठेवलं. अभिमानाचं. कधीतरी कामगिरी केली होती. अभिमान वाटावी अशी. एक पायरी कधीतरी ओलांडता आली होती. हातात साडीचा घोळ होता. स्वत:च्या मर्यादा हातात होत्या. दुसऱ्या पायरीवर दुसरं पाऊल ठेवलं. एका जाणीवेचं. एखादा तरी गुण आहे अंगी. आपण काहीतरी करू शकतो. त्यासाठी बक्षीस मिळतं. जो गुण कधीच कळला नव्हता. समजला नव्हता. आज तो अंकुरला. सगळ्यांच्या साक्षीने. थबकले. आपण कोणतं पाऊल उचललं अगोदर. उजवं की डावं. आपण करतो ते सारे उजवंच असतं. संसारात मात्र डावं पडलं होतं. सवय उजव्याचीच आहे. संस्कारही उजवाच आहे. आई दक्ष होती त्याबाबतीत. पहिलं पाऊलही उजवं होतं.

उंबरठ्याच्या आत येताना. वाढताना उजवाच हात पुढे असतो. आता ती सवयच झाली. उजवंच असणार. तरी शंका आली. तिसरं पाऊल उचललं. उजवंच. म्हणजे पहिलं उजवंच होतं. अंगवळणी पडलं ते आता. तरी दान डावं का पडलं? समारंभाला नव्हतं यायचं कुणाला. आपण आग्रह केला. आले तरी त्यात बळजबरी अधिक. मनाने नाहीच. आपल्याला मात्र यावंसं वाटत होतं. ओढ होती समारंभाची. कौतुकाची. मातेच्या कौतुकाची. कुठल्याही मातेची. माता ती माताच असते. तिच्या कौतुकात सहभागी होण्यात आनंद होतोच ना? आपला उत्साह वाढतो ना? जगण्याची उमेद वाढवतो ना? कौतुक ते कौतुकच! हेवा न वाटता केलेलं. आज लोक आपलं करत आहेत. टाळ्या वाजवून. ते कौतुक तिसऱ्या पावलात साठलं होतं. आपल्या पावलाशी चाललेलं. सगळ्यांच्या साक्षीने. मात्र चौथं पाऊल थबकलं. मागे वळून पाहिलं. आपण कुठं आहोत त्याचा अंदाज घेतला. शेवटच्या पायरीवरून घेतलेला अंदाज. सभागृह तुडुंब भरलं होतं काळोखानं. पावसाळ्यात भरलेल्या धरणासारखं. तरी त्यातल्या नजरांचे तारे चमकले. सगळ्यांशी नजरानजर झाली. नकळत हात जोडले गेले. कृतज्ञतेने. तसा टाळ्यांचा पाऊस बरसला. चिंब भिजवणारा. अंगांगात झिरपत गेला. चेहऱ्यावर हसू पसरलं. इंद्रधनुष्य पसरल्यासारखं.

''या. बक्षीस वाट पाहत आहे आपली.'' पाठून आवाज आला. सगळ्यांच्या कौतुकाचा वर्षाव झेलत वळले. चौथ्या पायरीवरच होते. बक्षिसाची पायरी. काहीतरी मिळवल्याची पावती देणारी पायरी. व्यासपीठाला हात लावून नमस्कार केला. व्यासपीठावरील मान्यवरांना हात जोडून केला. समोर येऊन उभी राहिले. व्यासपीठ भव्य होतं. प्रकाशात उजळून निघालं होतं. माइकवरचा ताबा सोडीत अनाउन्सरने घोषणा केली,

''बाळासाहेबांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात येईल.''

तसे बाळासाहेब उठून उभे राहिले. टाळी वाजवण्यात त्यांचाच पुढाकार होता. भारदस्त व्यक्तिमत्त्वाचे बाळासाहेब. शहरातले प्रतिष्ठित प्रस्थ. सामाजिक क्षेत्रात नाव कमावलेले. अनेक अनुभवांचे थर चेहऱ्यावर पसरलेले. वयानेही अधिकार प्राप्त झालेले. डोक्यावर शुभ्र टोपी. अंगात कांजी केलेला लांब शुभ्र झब्बा. सहज छाप पडावी असे बाळासाहेब. आपल्या खुर्चीपासून पुढे आले. दमदारपणे पावलं टाकीत. माइकचा ताबा घेत खाकरले. आपल्या खर्ज लावलेल्या आवाजात म्हणाले,

''आनंद वाटला कार्यक्रमाला बोलावण्याबद्दलचा. इथं बसताना तो अधिक वाटला. मातृदिनाच्या निमित्ताने सर्व मातांचं दर्शन झालं. माता, माताच असते. बक्षीसाने तिचे मोल मोजता येणार नाही. त्यामुळे आज सर्वच माता विजयी आहेत. शलाकाताई तुमच्या सगळ्यांच्या प्रतिनिधी आहेत. तुमच्या सगळ्यांच्या साक्षीने सन्मानित करणार आहोत. तेव्हा प्रथम टाळ्यांच्या गजरात स्वागत करावं.''

बाळासाहेब बोलून थांबले नाही. स्वत:च टाळी वाजवू लागले. व्यासपीठावरील सगळ्यांनी अनुकरण केलं. पाठोपाठ टाळ्यांचा ध्वनी निनादू लागला. किती बोलक्या असतात नाही, ह्या टाळ्या? कौतुकाची टाळी. आपण घरात आलो तेव्हा अशीच वाजली. कोण कौतुक झालं त्यावेळी! आपण गरोदर राहिलो तेव्हाही अशीच वाजली. सावकाश. दोन टप्प्यांमध्ये अंतर ठेवलेलं. दोन्ही हातांचं ठामपणे भेटणं. दमदारपणाचं दर्शन अंगी बाळगलेली टाळी. ऐकताना कानाला नादाचं सुख देणारी. मनाला भुरळ घालणारी. कौतुकाने पाठीवर थाप मारणारी. गुणाला दाद देणारी. मनासारखं घडल्याची दखल घेणारी. कदर करणारी. ती अंगावर घेताना मन मोहरून आलं.

बाळासाहेबाच्या हातात स्मृतिचिन्ह देण्यात आलं. ते त्यांनी न्याहाळून पाहिलं. काळ्या रंगाचा खालचा भाग. रुंद गोल ओटा जसा. स्टीलचं शिल्प. हातांची ओंजळ. लांबसडक बोटं. त्या ओंजळीत लहान मुलगा. उभा. हातातून पळण्याचा प्रयत्न करणारा. एक पाय हातावर. दुसरा हवेत. हात हवेत उंचावलेले. झेप घेत असावा असे. अशी उभी प्रतिकृती. ओतीव शिल्पाची. चमकदार झळाळी असलेली. सहज नजरेत भरावी अशी. बाळासाहेबांनी ती उंच धरली. सगळ्यांना दाखवली. दाखवताना ओठ मुडपले. पसंतीची पावती होती ती. हे स्मृतिचिन्ह आपल्याला मिळणार. आपण याचे हक्कदार ठरणार. अभिमानाने ऊर भरून आलं. नकळत टाळ्या वाजवू लागले. सभागृहाने टाळी वाजवून प्रतिक्रिया दिली. पसंतीला अनुमोदन मिळते ते टाळीतून. शब्दांची जागा घेतात टाळ्या. भावनांची पोच म्हणजे टाळ्या. टाळ्या वाजत राहिल्या. पसंतीच्या. त्या टाळ्या स्मृतिचिन्हासाठी होत्या. तशा माझ्यासाठीही होत्या. कोरलेल्या शिल्पासाठी होत्या. तशा माझ्या यशासाठीही. बाळाचं कौतुक होतं. तसं तळहातांचं होतं. अंकुराचं होतं. तसं मातीचंही होतं. कधी एकदा स्वीकारते असं झालं.

''मी स्वत:ला मोठा समजत होतो. प्रमुख पाहुणा म्हणून मोठा झालो होतो. तसा वयाचाही फायदा घेतला होता. किती क्षुल्लक आहोत आपण. किती भ्रामक कल्पनेत वावरतो आपण. हा भ्रम या स्मृतिचिन्हाने साफ केला. तळहातावर खेळणाऱ्या बालकाने दूर केला. या तळहातांनी डोळ्यांवरचा पडदा फाडून टाकला. तळहातांच्या रेषांनी डोळ्यांत अंजन घातलं. तळहात नुसत्याच टाळ्या वाजवत नाहीत. तळहात आपलं भाग्य घडवतात. तळहात आपली जागा दाखवतात. ती जागा मला सापडली. या बालकाने लहानपणाचं भान दिलं. समोर सगळ्या माता आहेत. मातेपेक्षा कुणी मोठा असू शकत नाही. मग मी

कसा असू शकेन?''

बाळासाहेब माइकपासून पुढे आले. गुडघ्यावर खाली वाकले. अगदी समोर. उंच धरलेले स्मृतिचिन्ह पुढे धरलं. हा काय प्रकार आहे? काहीच कळेना. लहान मुलासारखे दिसू लागले. निरागस चेहऱ्याचे. स्मृतिचिन्हातला मुलगा पुढे झेपावू लागला. त्यांनी ते स्मृतिचिन्ह पुढे केलं. घेण्यासाठी हात पुढे केले. तसा टाळ्यांचा कडकडाट झाला. उंच आवाजात. वेगात. हा त्यांच्या कृतीला उत्स्फूर्त प्रतिसाद होता. अनोखी अदाही टाळ्यांची मानकरी ठरते. मोठ्या माणसांच्या वागण्याला कधीही अर्थ लाभतो. त्याचं समर्थन टाळीतून होतं. त्यांना ते शोभून दिसलं. माझं काय? मीही लहान व्हायचं त्यांच्यासारखं? हो. मी तर लहानच. मातेचा शिक्का नसलेली. त्यांच्याहून लहान. तशी मागे सरकले. हात मागे घेतले. एवढा मोठा माणूस. बापापेक्षा वयाने मोठा. अनाउन्सर गमतीने पाहत होता. मागे सरकताच टाळ्या थांबल्या. माझ्या वागण्याचं आश्चर्य वाटलं असावं. आश्चर्याला टाळ्या मुक्या होतात.

''हा तुमचा नाही, माझा सन्मान आहे. स्वीकार करावा.'' बाळासाहेब हळूच पुटपुटले. बाळ मातेकडे हट्ट करते. मागणी करते. मातेला सन्मानित करत नाही. माता स्वत:च सन्मानित झालेली असते. बाळाच्या जन्मामुळे. त्याच्याकडून कशी अपेक्षा करणार सन्मानाची. अवघडून उभी राहिले.

''आपण सरळ उभं राहावं. संकोच वाटतो आहे.'' नकळत बोलून गेले. एवढा मोठा माणूस. त्याचं वागणं शिष्टाचारात बसेना. कदाचित ते त्यांनी ठरवलेलं असावं. आधीच. त्यांचं ठीक. शोभून दिसेल त्यांना. आपलं काय? ते ज्या आदर्शाची कल्पना कल्पितात. सन्मान देऊ पाहतात. त्यातलं काय आहे आपल्याकडे? कदाचित ते अनभिज्ञ असावेत. त्यांच्या कानांवर माझं बोलणं पोचलंच नाही. टाळ्यांचा मात्र कडकडाट झाला. सभागृहाला त्यांचं वागणं पसंतीला आलं होतं. त्यात माझं बोलणं झाकलं गेलं. त्यांची नजर माझ्यावरच रोखलेली. त्यातच व्यासपीठावरील मंडळी उठून उभी राहिली. टाळ्यात तेही सहभागी झालेले. पुढे केलेले बाळ माझ्याकडे पाहत होतं. त्याचे हात उंचावलेले होते. ओढीने झेपावू पाहत होते. नकळत हात पुढे झाले. अलगदपणे. त्याचक्षणी विचार डोकावला. त्याने हात मागे घेतले तर? त्याची आई ऐनवेळी इथं आली तर? मुलाला आपल्याच आईची ओढ असणार. दुसरीला तो आई कसा म्हणणार? त्याची आई त्याला घेऊन जाणार. आपण अडवू शकणार नाही. तिचा हक्क आपण कसा डावलणार? मग हात पोळायचे कशाला? एकदा पोळलेले... चटकन् हात मागे घेतले. एक पाऊल आणखी मागे सरकले.

सभागृह स्तब्ध झालं.

''संकोच वाटतो का? काढून टाका तो डोक्यातून. विसरा स्वत:ला. एक विजेती माता म्हणून समोर या. मग नाही वाटणार संकोच.'' बाळासाहेबांनी सुचवलं. त्यांचा हेका कायम होता. तो पटेना. सन्मान करायची ही पद्धत नव्हती. बाळासाहेब काही लहान नाहीत. लहान होऊ शकत नाहीत. तसा अभिनय करण्याचं स्वातंत्र्य त्यांना होतं. ती वेळ ही नव्हती. ज्या उत्साहाने वर गेले तो मावळू लागला. अवघडलेपण सहन होईना. एकदा श्रीकांतकडे पाहिले. विचित्रपणा त्यांच्याही लक्षात आला असावा. अंधारात चेहरा स्पष्ट दिसला नाही.

''शलाका मॅडम संकोचल्या आहेत. तेव्हा त्यांच्या मदतीला येत आहे... अनय!'' अनाउन्सरने जोरात घोषणा केली. आश्चर्याचा धक्काच होता तो. अनय इथं? यावेळी? अनाउन्सरकडे आश्चर्याने पाहू लागले. अनाउन्सरने नजर चुकवली. तो सभागृहाकडे पाहू लागला. पाठोपाठ टाळ्यांचा



आवाज सुरू झाला. एका तालात. काहीतरी वेगळं घडल्याची ती खूण होती. आनंदाचा चित्कार त्या टाळीत मिसळला. का पडताहेत टाळ्या? कधीही टाळी पडणे म्हणजे अपमान. उतरायचं का व्यासपीठावरून? मस्तकात सणक गेल्यासारखी झाली. टाळ्या वाजतच होत्या. त्यांचा आवाज म्हणजे फटकारे वाटू लागले. मागे वळले. स्तब्ध होण्याची वेळ माझी होती. सणक पार वितळून गेली. टाळीला अर्थ होता. समोर अनय उभा होता. माझ्यापासून अंतर राखून. माझा अनय. माझ्यापासून नजर चुकवत होता. त्याला पाहताच सारं विसरले. झडप घालावी तशी त्याला बिलगले.

''अनय! कसा आहेस तू. तुला आठवण नाही आली माझी? कधी भेटायलासुद्धा आला नाहीस. किती वाळलास...'' पटापटा त्याचे मुके घेत राहिले.

''उपस्थित मातांनो, मातांच्या आप्तांनो! मातेची अनेक रूपे आपण पाहत आलो. अगदी महाभारतापासून. आताच्या टेस्टट्यूबी बेबीपासून ते सरोगेट मदरपर्यंत. आपली भावना आदराचीच राहिली. पूजा करत आलो आपण तिची. आज याच मातृत्वाचा गौरव आपण करतो आहोत. अशी एक माता, जिचा हा निबंध पहिला आला आहे. मातृत्व जिने पाहिले आहे. ते अनुभवण्याचा प्रयत्न केला. एक आदिवासी मूल दत्तक घेऊन. अनेक मुलांपैकी एक मूल. त्याच्या आईबापाच्या संमतीने. परवानगीने. कायदेशीर कागदपत्रे तयार करून. अधिकृतपणे. तोच त्यांचा मुलगा. तोच त्यांचा वारसदार. तोच त्यांच्या आयुष्याचा आधार. ही सारे रूपे त्याच्यात पाहिली होती. त्यालाही नवी आई आवडली होती. रानातल्या पाडसाने नवं आयुष्य स्वीकारलं होतं. मात्र... पाडस म्हणजे अनय!'' अनाउन्सर माहिती सांगत होता. तो थांबला. तसा टाळ्यांनी ताल धरला. नाजूक ताल. एका माहितीसाठी. रिमझिम पावसासारखा. अनय मिठीतून दूर झाला. थोडं अंतर राखून उभा राहिला. एका शब्दाने बोलला नाही. जणू शहरी भाषा तो विसरला होता. त्याच्या अंगात गणवेष होता. आश्रम शाळेचे त्यावर नाव होते. दहा वर्षांचा तो, चांगला उंच झाला होता. काटक दिसत होता. मूळ मातीचा रंग ल्यायला होता. डोळ्यांत चमक होती. नजरेतून ओळखीचे नाते त्याने पुसले होते. त्याला ते कसे शक्य झाले होते? तो मुद्दाम करतोय का? ओळख विसरता येते? की आईने शिकवलं त्याच्या? कमलाबाईने.

''अनय, आईला बक्षीस देणार ना?'' अनाउन्सरने अनयच्या जवळ येत विचारले. त्याच्या खांद्यावर विश्वासाचा हात ठेवला. अनयने मान डोलावली. बाळासाहेब सरळ उभे राहिले होते. त्यांनी स्मृतिचिन्ह अनयच्या हातात दिले. अनयकडे पाहून मंद हसले. मंद पावले टाकत माइकजवळ गेले.

''उपस्थित सभ्य मंडळींनो! दिङ्मूढ झालो मी. मला माझं बालपण हवं होतं. नाही मिळालं. तरी एक मोठा अनुभव मिळाला. सन्मानापेक्षा घरंदाजपणाची मर्यादा श्रेष्ठ असते. सन्मान सन्मानाने प्रदान झाला पाहिजे. तो कुणी कुणाला द्यायचा, कुणी कुणाकडून स्वीकारायचा याचे संकेत आहेत. शलाकाताईनी त्याचे भान ठेवले. आनंद वाटला. वीट मातीची. म्हणून माता, वीट एका नात्याच्या. वीट भाजली की हे नातं खुंटतं. विटेला मातीसारखं वागण्याचं स्वातंत्र्य नसतं. माती विटेवर हक्क सांगू शकते, इतकंच. मातीलाही कळतं, विटेला मर्यादा आहेत. वीट पुन्हा माती होऊ शकत नाही. मग मी जख्ख म्हातारा. लहान होणार कसा? माझा अभिमान दुणावला. मला सगळं कळलं ते इथं आल्यावर. संयम, धैर्य दाखवून सगळं सहन केलंत. पुढे आनंदात राहा. माझ्या हार्दिक शुभेच्छा!'' हात जोडून ते खुर्चीत विसावले. टाळ्या झाल्या. त्यांच्या मोठेपणासाठी. काहीशा संथ. निरोपाच्या.

अनय स्मृतिचिन्ह धरून उभा होता. घट्ट धरून. स्वत:ला मिळाल्यासारखं. त्याला ते आवडलेलं दिसत होतं. स्वत:ला मिळावं अशी लालसा दिसत होती. तर दुसरीकडे अवघडलेपण दाटलं होतं.

''अनय! बाळा, आईला बक्षीस दे!'' अनाउन्सरने सूचना केली.

अनय पुढे झाला. त्याने हात उंचावले. ते थरथरत होते. डोळ्यांत अपराधीपणा होता. हे बक्षीस आहे की पोरखेळ? सन्मान आहे की अपमान? काय करणार हे बक्षीस घेऊन? पीक करपून गेलं. मातीला भेगळ्या पडल्या. हंगाम सरून गेला. पाऊस आता आला. अनय पुढे आला. त्याचे पाय अनवाणी होते. आश्रमाची धूळ त्यावर साचली होती. गणवेष मातीचे नाते सांभाळून होता. गोंडस बाळ सुरकुतलं होतं. डोळ्यांतली आशा तेवत होती. क्षणभर नजरेला नजर भिडली. नखशिखान्त वीज सळसळत गेली. तशीच मागे सरकले. वाऱ्याच्या वेगाने वळले. एकाच उडीत खाली आले. निघून जायचं होतं. दूर. अनयपासून दूर. सन्मानापासून. नाही. पाय जागीच खिळले. पायात खिळे ठोकल्यासारखे. आश्चर्याचा आणखी एक धक्का होता. समोर उभी होती कमलाबाई. अनयची आई. अनयचा ताबा घेण्यासाठी. तिला अनयची काळजी होती. तिच्या डोळ्यांत भीती होती. हडकुळी. कमरेला लुगडं गुंडाळलेली. पोलक्याने छाती आवळलेली. खोल डोळ्यांची. बेताची उंची. सावळ्या वर्णाची. हातात लोखंडाच्या बांगड्या. बोटांच्या काड्या. अनवाणी. नंदावन्सनी वर्णन केल्यासारखी. मी अनयला घेऊन जाईन अशी... एकदा घडलं ते पुन्हा घडले याची. क्षणभर राग आला. क्षणभर ओरडावंसं वाटलं : 'जा घेऊन तुझा मुलगा.

नकोय मला. दहा आहेत ना तुला. दहाचे दहा सांभाळ. आणखी होऊ दे डझनभर.'

नाही ओरडले. राग आवरला. तिचा काय दोष? तिच्या मुलावर हक्क सांगणारी मी कोण? प्रत्येकीला आपलं मूल प्यारं असणारच. एक असू दे नाहीतर दहा. प्रत्येकावर तेवढंच प्रेम असणार. तिला तिचा अनय हवा होता. वैभवापेक्षा जवळ हवा होता. जसा राहील तसा. त्याच्याविना तिची माया पोरकी झाली होती. ती घेऊन गेली. काय चुकलं तिचं? वेडी हरीण. पाडसासाठी वेडी झालेली. तिच्या समोर आले. तिच्या डोळ्यांत पाहिलं. ती घाबरल्यासारखी दिसली. एक पाऊल मागे सरकली. तिचे डोळे भिरभिरले. तिला हातात धरून व्यासपीठावर आणलं. दावं धरून गाय आणावी तशी. अनयच्या समोर उभं केलं.

''बक्षीस द्यायचं ना. हिला द्या. ही आई अनयची. खरी आई.'' ओरडलेच. कुठून आलं बळ ते कळलंच नाही. बाळासाहेब गोंधळले. अनाउन्सर गोंधळला. व्यासपीठावरील सगळे गोंधळले. क्षणभर स्तब्धता पसरली. किती भयाण वाटायला लागलं. थंडगार सभागृह आणखी गार झालं. हात बांधून. टाळी बांधून. श्वास रोखून.

दुसऱ्याच क्षणी टाळ्या कडाडल्या. अनेक पक्षी एकाचवेळी झेपावले. फडफड करत उडाल्यासारखे. फक्त कळेना, त्या कशासाठी होत्या. अनयच्या आईसाठी. आयोजकांसाठी. की मातृदिनासाठी?

व्यासपीठावरून खाली आले. खूप धाप लागली होती. तशीच सभागृहाबाहेर आले. मोकळी हवा अंगाला बिलगली. खूप मोकळं मोकळं वाटू लागलं. मोकळा श्वास घेतला. तसा पाठून टाळीचा आवाज आला. सावकाश, खणखणीत. उपहासाचा. मागे वळून पाहिलं. श्रीकांत. यांचा उपहास? डोळ्यांत द्वेष?

''काय झालं...' वाक्य पूर्ण व्हायच्या आत आवाज आदळला,

''तमाशा पाहायला आणलंस आम्हाला?''

''तमाशा नाही. स्वत:चं मोठेपण.'' नंदा वन्सने ढोल बडवला. यांचा राग आणखी उफाळला. जवळ आले. गालावर टाळी वाजणार असं वाटू लागलं. आत्याबाई वेळेवर आल्या. खांद्यावर हात ठेवला. तशाच पुढे निघाल्या. पाठी दोघांना म्हणाल्या,

''तुम्हाला नाही कळायचं ते. तुम्ही टाळी वाजवणाऱ्या हातांचा विचार करताय. टाळीच्या आवाजाचा करा. आवाज करणारी हवा असते दोन्ही हातात. तिच्यावर होणारा आघात नाही कळला तुम्हाला. तो आवाज ओळखा अगोदर. मग तिला नाव ठेवा.''

**– चांगदेव भीमराज काळे**
३/१४, इंदू हौ. सोसा. लि.,
पाखाडी – खारीगाव,
कळवा, ठाणे – ४००६०५
भ्रमणध्वनी : ९८६९२०७४०३




**मूल्य २७५ रु.**
**सवलतीत १६० रु.**

**वसुमती धुरू** लिखित

## माझ्या मनाचा मुरांबा

**(आंबटगोड आठवणी)**

**हे लेखन म्हणजे ब्याऐंशी वर्षांच्या दीर्घ जीवनातील आठवणींचा आंबटगोड मुरांबा आहे. डाएटिशियन म्हणून काम करताना आणि एक गृहिणी व रसिक म्हणून अनुभवलेले जीवनातील प्रसंग इथे रसाळ शैलीत उतरले आहेत. हे सलग आत्मचरित्र नाही, हा आहे आठवणींचा गोफ, वाचकाला सोबत नेणारा...**

# भ्रष्टाचार असावा तर असा!

दिलीप चावरे

प्रत्येक देशातील भ्रष्टाचाराची तऱ्हा निरनिराळी आहे. अविकसित किंवा तथाकथित विकसनशील देशांमधील भ्रष्टाचार सर्वव्यापी आहे. तथापि ज्या पद्धतीचा भ्रष्टाचार आणि नैतिक अधःपात इटलीत झालेला दिसतो त्याच्या एक टक्काही भ्रष्टाचार प्रगत राष्ट्रांमध्ये आढळत नाही. भारत आणि इटलीमधील साम्य म्हणजे दोन्हीकडचे राजकारणी तसेच सरकारी अधिकारी अत्यंत कोडगे आणि मग्रूर आहेत. लोक काय म्हणतील याची तमा ते आता बाळगत नाहीत.

आलिशान गाडी, तिच्या पुढे-मागे पोलिसांचा ताफा आणि गाडीवरील लाल दिवा. ही सगळी वरात सुसाट जावी म्हणून रस्त्यावरची वाहतूक बंद करण्यासाठी प्राणपणाने शिट्या फुंकणारे पोलिस, हे दृश्य आपल्या रोजच्या परिचयाचे आहे. ज्यांना पोलिससंरक्षण दिले आहे, असे लोक कोण आहेत आणि त्यांना खरोखरी संरक्षणाची गरज आहे का, असा प्रश्न विचारणे अगदीच मूर्खपणाचे ठरेल. कारण आम जनतेलाही ठाऊक आहे, की राजकारणी आणि गुंड टोळ्यांचे म्होरके यांच्या नखालाही धक्का लागू नये, यासाठी ही तरतूद सरकारने केलेली आहे. भ्रष्टाचाराचा कळस बघायचा असेल तर या भूमीवर अवश्य जावे.

हे सारे वर्णन वाचून ते आपल्या मायदेशातील आहे असा समस्त भारतवासियांचा समज किंवा गैरसमज होणे अपरिहार्य आहे. परंतु भ्रष्टाचाराच्या या सुरस कथा आहेत इटली या देशातील. मती गुंग करणारा भ्रष्टाचाराचा तपशील पंतप्रधान सिल्व्हिओ बर्लुस्कोनी यांच्या कारकिर्दीत सर्व विक्रम मोडू पाहत आहे. खुद्द बर्लुस्कोनी यांच्याविरुद्ध २,५००पेक्षा जास्त कोर्ट समन्स निघालेली आहेत. इटलीतील सर्वात मोठे माध्यमसम्राट असलेले बर्लुस्कोनी यांचे लैंगिक प्रताप गेले काही महिने जागतिक चव्हाट्यावर गाजत आहेत. या पेटाऱ्यातून आणखी काय काय बाहेर पडेल याची उत्सुकता सर्वांनाच आहे. तथापि एवढे उच्च पद भूषवणारा राजकारणी किती पतित असू शकतो याचे बर्लुस्कोनी हे 'आदर्श' उदाहरण आहे. त्यांच्यापुढे आपल्याकडचे राजकारणी अगदीच पोरखेळ करणारे भासू लागतात. एकूणच इटलीची समाजव्यवस्था एवढी पोखरलेली आहे, की हा डोलारा कोसळून पडल्यास काय होईल याची चिंता जगभर निर्माण झाली आहे.

युरोपमधील जर्मनी आणि फ्रान्स यांच्या खालोखाल इटलीच्या अर्थव्यवस्थेचा क्रमांक लागतो. मात्र या राष्ट्रावर आतापर्यंत झालेल्या कर्जाचा आकडा त्याच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नापेक्षाही अधिक आहे. आता केवळ ग्रीस हा देशच कर्जबाजारीपणाच्या बाबतीत इटलीबरोबर स्पर्धा करू शकतो

अशी परिस्थिती आहे. त्यामुळे इटली कोसळू नये यासाठी अन्य राष्ट्रांनी दबाव आणण्यास आरंभ केला आहे. इटलीवरील एकूण कर्ज एक खर्व (ट्रिलियन) पौंडांपेक्षा म्हणजेच देशाच्या एकूण उत्पन्नाच्या १२०% आहे. त्यात दिलासा एवढाच, की ग्रीसचे कर्ज देशाच्या उत्पन्नाच्या १५८% आहे.

इटलीमधील भ्रष्टाचाराच्या काही कथा तर भारतालाही लाजवतील अशा आहेत. याबाबत एका हमरस्त्याचे उदाहरण नेहमी देण्यात येते. गेली वीस वर्षे या रस्त्याचे बांधकाम चालूच आहे. ज्या ज्या राजकारण्यांच्या आणि टोळीदादांच्या हद्दीतून हा रस्ता जाणार आहे, त्या प्रत्येकाला त्या प्रमाणात खंडणी देऊन संतुष्ट केल्याखेरीज रस्ता काही पुढे सरकत नाही! ही बाबसुद्धा सर्वज्ञात आहे. तरीही ना सरकारला खंत, ना मतदारांना खेद! त्या त्या भागातून तेच ते राजकारणी पुन्हा पुन्हा निवडून येतात आणि आपल्या भोवतीचे खंडणीखोर अधिक वेगाने पोसू लागतात. याच्या बदल्यात मतदारांना काय मिळत असेल? एका पाहणीनुसार, इटलीतील सुमारे २५ टक्के जनता एक छदामही कर भरत नाही. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेचे दरसाल अंदाजे १२० अब्ज पौंड नुकसान होते, परंतु परिस्थिती काही बदलत नाही.

देशाच्या अर्थव्यवस्थेवर घाला घालून जणू समाधान होत नाही; म्हणून आता युरोपीयन युनियनच्या तिजोरीवर डल्ला मारण्याचे उद्योग सुरू झाले आहेत. युनियनच्या घटनेनुसार अडचणीत असलेल्या सदस्य राष्ट्रांना अर्थपुरवठा करण्याची जबाबदारी इतर राष्ट्रांची आहे. इटलीमधील परिस्थिती लक्षात घेऊन युनियनने तेथील उद्योजकांना मदत करण्याची जबाबदारी स्वीकारली. मात्र घाईघाईने अतिउत्साह दाखवणे युनियनच्याच अंगाशी आले. प्रदूषण कमी व्हावे आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर व्हावा, असा आग्रह आजकाल सगळेच धरत असतात. या संधीचा वापर करून इटलीच्या एका दंतवैद्याने युनियनला जवळपास ८ कोटी पौंडांचा दणदणीत गंडा घातला. एक सौरऊर्जा प्रकल्प आपण विकसित करणार असल्याचे सांगून, त्याने युनियनच्या अधिकाऱ्यांना हातोहात फसवले. तपासात असे दिसून आले, की या महाशयांनी ५५ महागड्या गाड्या आणि एक यॉट यांची खरेदी करून चैनीत राहणे सुरू केले होते. एका राजकारणी नेत्याच्या पत्नीने जातिवंत घोड्यांची पैदास करण्यासाठी चार लाख पौंड असेच सफाईने खिशात घातले. नंतर असे सिद्ध झाले, की तिने दिलेली सर्व कागदपत्रे आणि त्यांच्यामधील तपशील पूर्णपणे काल्पनिक होता. ही झाली वैयक्तिक उदाहरणे. सामूहिकरीत्या युनियनच्या तोंडाला पाने पुसण्याचा एक प्रकार दक्षिण इटलीत झाला. लिंबूवर्गीय फळे खरेदी आणि विक्री करण्याची योजना, युनियनच्या सामूहिक

'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल' या संस्थेतर्फे दरवर्षी जगातील विविध देशांमधील भ्रष्टाचाराची माहिती प्रसिद्ध करण्यात येते. त्यामुळे कोणत्या देशात किती भ्रष्टाचार आहे याची कल्पना येते. याबाबतची २००० सालापासूनची दशकभराची आकडेवारी पाहता, डेन्मार्क, न्यूझीलंड आणि सिंगापूर या देशांत सर्वात कमी भ्रष्टाचार असून त्यांचा क्रमांक पहिला आहे तर भारताचा क्रमांक अत्याधिक भ्रष्टाचार असल्याने अगदी तळाला म्हणजे ८० वा आहे. इटलीचा क्रमांक ६७ वा असून कडक कायदेकानून असलेल्या जॉर्डन आणि सौदी अरेबिया यांचा क्रमांक ५० वा आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या क्रमवारीत, इंग्लंड २०व्या स्थानावर असून अमेरिकेने २२ वे स्थान पटकाविले आहे. अत्यंत कडव्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इस्रायलचा क्रमांक ३० वा आहे तर कम्युनिस्ट राजवट असणारा चीन ३३ व्या स्थानी आहे. ट्रान्सपरन्सीने ९१ देशांची माहिती जाहीर केली आहे. तथापि प्रत्येक देशातील भ्रष्टाचाराची तऱ्हा निरनिराळी आहे. अविकसित किंवा तथाकथित विकसनशील देशांमधील भ्रष्टाचार सर्वव्यापी आहे. त्यात भारताचाही समावेश आहे. याचा अर्थ असा, की प्रत्येक स्तरावरील सत्ताधाऱ्यास– मग तो सरकारी कर्मचारी असो किंवा राजकीय नेता–लाच द्यावीच लागते. पूर्वी आफ्रिकेत दैनंदिन गरजेच्या वस्तू काळ्या बाजारात विकत घ्यावा लागत. आज भारतात रॉकेल आणि स्वयंपाकाचा गॅस यांचा सर्रास काळा बाजार होताना आढळतो. याउलट प्रगत देशांमधील भ्रष्टाचार हा सहजी दिसणारा नसतो. उदा. अमेरिकेसारख्या राष्ट्रात प्रत्येक उद्योगाची एक लॉबी असते. या लॉबीतर्फे शासकीय अधिकारी, न्यायाधीश आणि राजकीय नेते यांची निष्ठा खरेदी करण्यात येते. त्या बदल्यात बड्या उद्योगांना अनुकूल असेच कायदेकानू करण्यात येतात. तेल, तंबाखू आणि औषध उद्योगांचा अमेरिकी अर्थव्यवस्थेत जबरदस्त प्रभाव आहे. या प्रत्येक उद्योगाच्या स्वतंत्र लॉबीज् आहेत. त्या सतत कार्यरत असतात. तथापि ज्या पद्धतीचा भ्रष्टाचार आणि नैतिक अधःपात इटलीत झालेला दिसतो त्याच्या एक टक्काही भ्रष्टाचार प्रगत राष्ट्रांमध्ये आढळत नाही. भारत आणि इटलीमधील साम्य म्हणजे दोन्हीकडचे राजकारणी तसेच सरकारी अधिकारी अत्यंत कोडगे आणि मग्रूर आहेत. लोक काय म्हणतील याची तमा ते आता बाळगत नाहीत.

शेती धोरणाच्या अंतर्गत युनियनच्या मुख्यालयात सादर करण्यात आली. चार वर्षांनंतर फळेही मिळाली नाहीत आणि शेतकरीही. सुमारे पाच कोटी पौंड पाहता पाहता हवेत विरून गेले.

अशी असंख्य उदाहरणे आहेत; परंतु स्थानिक जनता भ्रष्टाचाराला एवढी सरावलेली आहे, की भ्रष्टाचाराच्या कोणत्याच घटनेचा कोणालाही धक्का बसत नाही. त्यामुळेच देशातील निवडून आलेल्या सर्व प्रतिनिधींचा दूरध्वनीचा खर्च शासकीय तिजोरीतून भागवण्यात येतो. खासदार मंडळींचे लाड तर विचारायचीच सोय नाही. दररोज त्यांच्या दिमतीला सात केशकर्तक संसदेत तत्पर असतात. त्या प्रत्येकाला सालिना सव्वा लाख पौंड तनखा देण्यात येतो. पण हे काहीच नाही. सरकारी खर्चाने देशात सुमारे दोन लाख गाड्या दिवस-रात्र दौडत असतात. सरकारचे बोधचिन्ह असले, की या गाड्यांना सर्वत्र मुक्त प्रवेश आणि प्राधान्यक्रम देण्यात येतो. अशा प्रत्येक गाडीवर चोवीस तास सरकारी चालक असतो. वैधानिक किंवा कौटुंबिक अशा कोणत्याही कारणासाठी या गाड्यांचा वापर करता येतो. या बहुतेक गाड्या अलिशान आणि अत्यंत किमती असतात. इतर कोणत्याही राष्ट्रात न आढळणारा प्रकार म्हणजे, इटलीच्या संसदेत मंजूर झालेल्या एका तरतुदीनुसार एकदा निवडून आलेल्या कोणत्याही व्यक्तीला एक युरो एवढी लाक्षणिक रक्कम देऊन आपल्याला आवडलेली गाडी खरेदी करता येते. निवडणुकीत हरल्यानंतरही हा विशेष अधिकार राजकीय नेत्यांना कायम राहतो. तसेच अशा कोणत्याही वाहनांना कोणताही शासकीय कर द्यावा लागत नाही.

परंतु एवढ्याने समाधान झाले तर ते राजकीय नेते कसले! आपला रुबाब दाखवण्यासाठी त्यांना सभोवताली बंदुकधारी अंगरक्षकांचा गराडा लागतो. यांपैकी बहुतेक राजकारणी अगदीच क्षुल्लक असतात. त्यांना कोणीही धमकी देत नाही किंवा धमकी देण्याची शक्यता नसते. परंतु संरक्षण तर त्यांना हवे असते. ते मिळावे यासाठी आपले नातलग किंवा मित्र यांना फितवून आपल्याला धमकीचा एस्.एम्.एस. किंवा इमेल आल्याचा देखावा ते निर्माण करतात. सरकारमध्ये त्यांचेच साथीदार असल्यामुळे आपोआप पोलिस संरक्षण मिळू लागते. सध्या इटलीमध्ये असे सुमारे सहा हजार लोकप्रतिनिधी असून त्यांच्या संरक्षणासाठी प्रति वर्ष एक अब्ज पौंड खर्चण्यात येतात, याचेही आमजनतेला काही वाटत नाही.

राजकीय नेते आपल्या आयुष्याची बेगमी कशी करून घेतात हे पाहायचे असेल तर इटलीला जरुर भेट द्यावी. गेली दहा वर्षे तरी दरसाल १०% वेतन आणि भत्तेवाढ स्वतःसाठी करून घेणाऱ्या राजकारण्यांनी, देशाची अर्थव्यवस्था कड्याच्या टोकावर नेऊन ठेवली आहे. राजकीय प्रणाली आणि शासन-व्यवस्था यांच्यात अंतर्बाह्य परिवर्तन झाल्याखेरीज इटली वाचणे शक्य नाही, असा निर्ष्कष राजकीय निरीक्षकांनी याआधीच काढून ठेवला आहे. तो कशाच्या आधारे? तर इटलीतील प्रत्येक खासदाराचा दरसाल पगार सुमारे दीड लाख पौंड आहे. ब्रिटिश खासदारांच्या पगाराच्या तो दुप्पट आहे; तर पोर्तुगाल आणि स्पेन या देशाच्या खासदारांना मिळणाऱ्या रकमेच्या तो तिप्पट आहे. युरोपीय युनियनचे सदस्य असलेल्या या देशामधून इटलीमधील उधळपट्टीबद्दल निषेधाचे सूर ऐकू येतात. मात्र इटलीमध्ये सारे काही सुशेगात आहे. इटालियन खासदारांना कोणताही त्रास होऊ नये म्हणून अलितालियानामक सरकारी विमानसेवेत, त्यांना कोठेही प्रथमवर्गातून प्रवास करण्याची मुभा आहे. त्यांची उपासमार होऊ नये यासाठी इटलीतील अतिप्रसिद्ध आणि महागड्या उपाहारगृहांमध्ये त्यांची खानपानाची विनामूल्य सोय करण्यात आलेली असते. केवळ खासदारांच्या दंतसौंदर्यासाठी दरमहा प्रचंड रक्कम खर्च करण्यात येते. ‘कॅमेऱ्यांसमोर दात विचकताना ते सुंदर दिसावेत म्हणून जनतेच्या खिशावर घातलेला घाला’ असे या खर्चाचे वर्णन ‘ला रिपब्लिका’ या रोममधील दैनिकाने केले आहे. गतवर्षी खासदारांच्या मनोवैज्ञानिक उपचारांसाठी जवळपास तीन लाख पौंड खर्च करण्यात आले तर त्यांच्या श्रवणयंत्रांवर दोन लाख पौंडांचा खर्च दाखवण्यात आला. डोळ्यांचे डॉक्टर आणि अन्य उपायांवर दहा लाख पौंड उडवण्यात आले. तरीही इटालियन लोकप्रतिनिधींची भूक भागलेली नाही. इटलीतील प्रत्येक साठ हजार नागरिकांना एक खासदार आहे, इंग्लंडमध्ये ९२,००० तर अमेरिकेत साडेपाच लाख जनतेला एक प्रतिनिधी असे प्रमाण आहे. सदस्यत्वाचा कालावधी संपल्यानंतरही लोकप्रतिनिधींची काळजी घेण्यात येते. कोणतीही निवडणूक पार पडली, की पुढच्या ७२ तासांत निर्वाचित सदस्यास सर्व सुखसोयी उपलब्ध होतात. पराभूत झालेल्या माजी सदस्यांनाही तशाच सुविधा देण्यात येतात. इटलीमधील लोकप्रतिनिधींचे पगार हा जगभर आश्चर्याचा विषय राहिलेला आहे. सरकारी खजिन्याची ते अक्षरशः लूट करतात असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये. बोलझानो या आल्प्स पर्वतराजीतील छोट्याशा प्रांताच्या मेयरचा, वार्षिक पगार आहे पावणे तीन लाख पौंड. अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांच्यापेक्षा तो ३५,००० पौंडांनी अधिक आहे.

देशातील भ्रष्टाचाराचा परिणाम नाही म्हटले तरी काही घटकांवर होतच आहे. याचा सर्वाधिक फटका शिक्षणक्षेत्राला बसत आहे. कितीही बुद्धिमान व्यक्ती असली आणि कोणतीही उच्च पदवी असली तरी वशिला असल्याखेरीज इटलीत कोठेही

सन्माननीय शैक्षणिक पद लाभू शकत नाही. तसेच परदेशातून येणाऱ्या उच्च विद्याविभूषित प्राध्यापकांनाही इटलीतील स्थानिक परीक्षा दिल्याखेरीज देशात शिकवण्याची परवानगी मिळत नाही. ही परवानगी मिळावी म्हणून हात ओले करावे लागतातच. त्यामुळे इटलीतील तरुणांनी देशाबाहेर जावे असे उघड आवाहन, शिक्षणक्षेत्रातील धुरीण करत असतात.

हिंसाचार, व्यसनाधीनता, भ्रष्टाचार आणि निरक्षरता हे इटलीला लागलेले चार गंभीर रोग आहेत. इटलीतील माफिया ही गुन्हेगारी संस्था जगभर बदनाम झालेली आहे. विसाव्या शतकाच्या आरंभी इटलीतून अमेरिकेकडे स्थलांतरितांचा ओघ सुरू झाला. कोणतेही शिक्षण किंवा कौशल्य तसेच परभाषेचे ज्ञान नसणाऱ्या इटालियन निर्वासितांना मजूर म्हणूनच अंगमेहनतीचे काम करावे लागले. या काळात अमेरिकेची भरभराट औद्योगिक संशोधनाच्या जोरावर वेगाने चालू होती. अमेरिकेतील काही प्रमुख शहरांमध्ये इटालियन बेकार तरुण एकत्र झाले आणि मायदेशातील माफियाचा प्रयोग न्यू यार्कसारख्या शहरात करण्याचा कट त्यांनी रचला. हा प्रयोग कल्पनेबाहेर यशस्वी झाला. त्याच दरम्यान अमेरिकन सरकारला देशात दारुबंदी करण्याची हुक्की आली आणि माफियांच्या हाती जणू खजिन्याची किल्लीच आली. त्या काळात बेकायदा व्यवहार अमेरिकेत सोकावले. व्यवसायिकांकडून खंडणी घेणे आणि राजकारणी किंवा टोळीदादा यांना खंडणी देणे, हे प्रकार सर्रास सुरू झाले. पोलिस अधिकारी आणि न्यायाधिशांना खरेदी करण्याचा शिरस्ता पडला. एक प्रकारे इटलीतीलच परिस्थितीचे हे प्रतिबिंब होते. माफियांचा दबदबा आणि उपसर्ग कालांतराने अमेरिकेने नष्ट करून टाकला. मात्र माफियाची जननी असणाऱ्या इटलीत त्याचा प्रभाव आजही जाणवतो. सुमारे शतकभरापूर्वी भ्रष्टाचार थेट आणि प्रत्यक्ष असायचा. आता तो अप्रत्यक्ष झाला आहे. त्याचा प्रत्यय आपल्याला भारतात हरघडी येतच असतो. परंतु अस्सल खानदानी भ्रष्टाचार म्हणजे काय, हे बघण्यासाठी जावे इटलीतच. सर्व रस्ते रोमकडे जातात अशा आशयाची इंग्रजी भाषेत म्हण आहे. ती कितपत खरी आहे याची कल्पना नाही; मात्र भ्रष्टाचाराची मूळाक्षरे गिरवायची असतील तर इटलीतच जावे.

**–दिलीप चावरे**

patrakar@hotmail.com




# हसरा सूर्य आणि नक्षत्रमंडल


रमेश पंचवाघ

सूर्याबद्दल प्राचीन काळापासूनच मानवांना कुतूहल, भीती, आकर्षण व आदर वाटत आला आहे. ऋग्वेद काळापासून सूर्याला देवता मानले असून, त्याची पूजा करणे, अर्घ्य देणे, स्तुती करणे या गोष्टी चालत आल्या आहेत. प्रसिद्ध गायत्री मंत्र तर विश्वामित्र ऋषींनी सूर्याला उद्देशूनच रचला आहे. सूर्यापासून मिळणाऱ्या प्रकाश व उष्णतेमुळेच सर्व जीवसृष्टीचे व मानवसृष्टीचे जीवन शक्य झाले आहे. फार प्राचीन काळामध्ये, कृतयुगाच्या अखेरीस लिहिलेल्या सूर्यसिद्धान्तावर अवलंबून ग्रहगणित अगदी गेल्या शतकापर्यंत चालत आले. सूर्य व इतर ग्रह पृथ्वीभोवती फिरतात ही समजूत तर अठराव्या शतकापर्यंत होती. अजूनही सूर्यच पृथ्वीभोवती फिरतो, ही समजूत बऱ्याच लोकांमध्ये आहे. सूर्याबद्दलची प्राथमिक माहिती मात्र आता सर्व शाळा-कॉलेजांमधून शिकवली जाते. तो स्वयंप्रकाशी तारा आहे. तसेच सर्व ग्रह त्याच्याभोवती नियमितपणे फिरतात, हे बहुतेक सर्वांना माहिती आहे. परंतु १९९८ सालानंतर हबल् टेलेस्कोपमुळे या सूर्यमालेची बरीच नवीन माहिती उपलब्ध झाली. त्यामध्ये नासाने सोडलेल्या Solar Dynamic Observatory, Chandra X-ray Observatory आणि European Space Agency ने सोडलेल्या Solar Video Satelite या उपग्रहांमुळे सूर्याची खूपच अधिक व नवीन माहिती हाती लागलेली आहे व त्यात दररोज अधिक भर पडत आहे. ही माहिती Space, Science, Astronomy वगैरे TV Channels वर तसेच त्यांच्या तत्सम मासिकांतून प्रसिद्ध होत आहे. त्यातून अनेक नवीन शोध लागले आहेत. या उपग्रहांनी मिळून सूर्याचा Video काढला असून, त्यामधील सूर्याच्या हसऱ्या चेहऱ्याचे (Smiley Face चे) छायाचित्र पुढे दिले आहे. ही छायाचित्रे २५ व २९ जुलै २०११ ला काढलेली आहेत. या छायाचित्रांत सूर्याचे दोन डोळे व खालती दोन ओठ असलेले तोंड स्पष्ट दिसते. अर्थात तो हसरा चेहरा आहे का? का ही कल्पनाच आहे?

सूर्यावर दर सेकंदाला हजारो Hydrogen bomb सारखे Nuclear Explosions होत असतात. त्यामुळेच त्याच्यातून प्रकाश, उष्णता व चुंबकीय लहरी प्रक्षेपित होत असतात. सूर्यावर Plasma (चुंबकीय लहरींचे प्रवाह) च्या नद्या असून त्याचे भोवरे म्हणजेच हे डोळे व ओठ आहेत. सूर्याच्या या डोळ्यांतून प्रचंड चुंबकीय कणांचे प्रक्षेपण होत असते. सूर्य स्वत:भोवती, पृथ्वीप्रमाणेच प्रदक्षिणा करतो. मात्र त्याचा विषुववृत्ताजवळील भाग २५.८ दिवसांत, डोळ्यांजवळचा भाग २७ दिवसांत व ध्रुवाकडील भाग ३०.५ दिवसांत स्वत:भोवती फिरतो. सूर्याला पृथ्वीसारखा कठीण पृष्ठभाग नसून त्याचे बाहेरील आवरण हे पूर्णत: वायूंनी बनलेले आहे. त्यामध्ये Hydrogen व Helium जास्त असून Nitrogen व Oxygen ही आहेत. त्यामुळे या महाप्रचंड वायुगोलाचे भाग स्वतंत्रपणे स्वत:भोवती फिरतात. सूर्याचे चुंबकीय ध्रुव दर बावीस वर्षांनी अदलाबदल करतात व दर अकरा वर्षांनी सूर्यावर डाग प्रकटतात आणि प्रचंड प्रकाशलहरींच्या लाटा (Solar Flares) फेकल्या जातात. सूर्याचा विषुववृत्तीय व्यास ८,७०,००० किलोमीटर आहे. पृथ्वीचा फक्त १२,६७५ किलोमीटर आहे. सूर्याचे वजन पृथ्वीच्या ३,३०,००० पट इतके प्रचंड आहे. सूर्याच्या चुंबकीय लहरींचे कण पृथ्वीच्या वातावरणात आल्यावर उत्तर व दक्षिण ध्रुवाकडे आकर्षित होतात, म्हणून पृथ्वीवरील Electronic Activing ला सहसा




सूर्याचा हसरा चेहरा



बाहेर पडलेल्या सौरज्वाला

बाधा येत नाही. मात्र सूर्यावरील डाग व Flares चे प्रमाण वाढले, की हा बाध येतोच.

या प्रचंड सूर्याचा आपल्या (पृथ्वीच्या) नक्षत्रमंडळावर परिणाम होतोच. सूर्याचे विषुववृत्त हे विश्वगोलापर्यंत वाढवले, की त्याला Eclipits अगर क्रांतिवृत्त समजतात. कारण सूर्याभोवती पृथ्वीचा वर्तुळाकृती भ्रमणमार्ग तोच असून इतर सर्व ग्रह त्याच्या अवतीभोवतीच वर्तुळाकृती कक्षांमध्ये फिरतात. या क्रांतिवृत्ताच्या वर ८°–९° व खाली ८°–९° अशा १६° ते १८° प्रदेशास क्रांतिप्रदेश (Zodiac) म्हणतात. सर्व ग्रह या क्रांतिप्रदेशातूनच वर्तुळाकृती पट्ट्यातून सूर्याभोवती फिरतात. या क्रांतिप्रदेशाचे बारा भाग केले, की त्या प्रत्येकी ३०° च्या बारा राशी होतात व प्रत्येकी १३$\frac{१}{३}$° असे सत्तावीस भाग केले, की ते नक्षत्र विभाग होतात. यामध्ये अनेक तारे व तारकासमूह आहेत, त्यांनाच त्यातील प्रमुख ताऱ्यांची नावे देऊन या सत्तावीस नक्षत्रांची नावे ठरवली गेली आहेत. अगदी पूर्वी, ऋग्वेद काळापासून (दहा हजार वर्षांपासून) ही नक्षत्र पद्धती अस्तित्वात आहे व ही नक्षत्रपद्धती फक्त भारतातच आढळते. राशीपद्धती मात्र चीन, ग्रीस व रोमन साम्राज्यांमधून आढळते व ती स्वाल्डियन लोकांकडून आली असल्याचे उल्लेख आहेत. ब्रिटिश राज्यकाळात भारतीयांनी ही राशीपद्धती ग्रीक लोकांकडून घेतल्याचा दावा प्रसिद्ध झाला व आजही आपले कित्येक विद्वान त्यावर विश्वास ठेवतात. मात्र मूळ स्वाल्डियन व सुमेरियन लोकांनी मात्र आम्हाला हे ज्ञान भारतीयांकडून मिळाले, असा उल्लेख केला आहे. या सर्व पद्धतीत नक्षत्रविभाग सत्तावीसच का, हे कधीही स्पष्ट झाले नाही. एके काळी अठ्ठावीस नक्षत्रे समजत, पण नंतर एक नक्षत्र (अभिजात) हे ढळले (आकाशातून पडले) असे समजण्यात आले. या सर्व सत्तावीस नक्षत्रांमध्ये काही मृदू, तीक्ष्ण, उग्र, शुभ व अशुभ अशी मानली गेली आहेत. ती कशाच्या आधारावर हे कधीही स्पष्ट झाले नाही. अगदी पाराशर संहिता वगैरे प्राचीन ज्योतिष ग्रंथातही ही नक्षत्रे किंवा नक्षत्र विभाग सत्तावीसच का व त्यांचे गुणधर्म असेच का, हे कोठेही स्पष्ट झाले नाही.

मात्र नासाच्या या Solar Dynamics Observatory मधून मिळालेल्या नवीन माहितीच्या आधारे सूर्य स्वत:भोवती सत्तावीस दिवसांत फिरतो व आकाशगंगेच्या मूळ नक्षत्राजवळील भागाभोवती २४० दशलक्ष वर्षांमध्ये प्रदक्षिणा करतो हे स्पष्ट झाले आहे. म्हणून सूर्यही ग्रहच आहे. तसेच सूर्याच्या डोळ्यांमधून, ओठांमधून प्रचंड प्रकाश व चुंबकीय लहरी दररोज एका नक्षत्र विभागावर जोरात आदळून प्रकर्षाने परिणाम करतात, हे उघड झाले आहे. या क्रांतिप्रदेशात (Zodiac) असलेल्या स्वयंप्रकाशी ताऱ्यांमधूनही अशाच स्वरूपाच्या चुंबकीय लहरी प्रक्षेपित होत असणार व त्यांचा व सौर लहरींचा एकत्र परिणाम हा या क्रांतिप्रदेशातील (नक्षत्र मंडळातील) नक्षत्र विभागांना स्वतंत्र गुणधर्म देत असणार, असा विज्ञाननिष्ठ निष्कर्ष काढता येतो. याच परिणामाने बारा राशींमध्येही स्वतंत्र गुणधर्म निर्माण झाले असणार. नासाच्या या सूर्य संशोधनामुळे हे कोडे सुटण्याला मदत झाली आहे. या बारा राशी व सत्तावीस नक्षत्रांच्या पार्श्वभूमीवर फिरणारे ग्रह– ज्यांना स्वतंत्र गुणधर्म आहेत– ते नवीन गुणधर्म स्वीकारतात. ज्योतिषशास्त्र हे शास्त्र नसून केवळ कल्पनाविलास आहे असे मानणारे सर्वच विद्वान, ज्योर्तिगणित किंवा Astronomy मात्र विज्ञानाधिष्ठित शास्त्र असल्याचे मानतात. वरील माहितीमुळे या सर्वांना नवीन मते बनवण्याला मदत होईल अशी अपेक्षा आहे. आपण या हसऱ्या सूर्यदेवांची 'तत्सवितुर्वरेण्यं, भर्गोदेवस्य धीमहि धियो यो न: प्रचोदयात् (वंदनीय सूर्यदेवांनी आमच्या बुद्धीस प्रकाशित करावे) अशी प्रार्थना करूया!

**– रमेश वि. पंचवाघ**
वुडस्टॉक, मेरीलँड,
यू.एस.ए.

# लढा स्वत:चा स्वत:शी

विमल कुलकर्णी


शिमग्गा गाव नावासारखंच मधुर आणि माणसा-माणसांत कायम गोडवा ठेवणारं गाव. कानडी भाषेत 'शि' म्हणजे गोड. शिमग्गा म्हणजे गोडाचा भरलेला पेला. मग्गा म्हणजे पेला. नारळ, सुपारीच्या झावळ्याच्या सावलीत सतत विसावलेलं. वस्त्या, वाड्या, वसाहती, शंभर-दोनशे छोट्या छोट्या घरांनी साकारलेलं गाव. धनिकांनी आपलीच कुळं, कामकरी, सुतार, लोहारापासून आपल्याच आसऱ्याला झोपड्या, कच्ची घरं बांधून आपलीच वाडी वसवलेली. बनहट्टी चार-पाचशे उंबऱ्यांचं ठाणं आणि देशमुखाच्या छत्रछायेखाली सुखाने नांदणारी कुटुंब. घरं इतकी जवळ, की एक हाळी दिली की अख्खी वाडी जागी व्हायची.

शिमग्गा जिल्ह्यात अगदी नारळागत वरून कठीण पण आत अमृताचा साठा, अशी रांगडी वाटणारी माणसं, पण एकमेकांच्या अडीअडचणीला सामोरं जाणारी अन् जीव लावून, जिवाला जीव देणारी होती. कर्नाटकात अजूनही एकत्र कुटुंब गुण्यागोविंदाने नांदत होती. एका घरात लग्न सोहळा, की सारं गाव वऱ्हाडी व्हायचं. सून यायची असो की लेक सासऱ्याला जायची असो, प्रत्येकजण स्वत:च्या घरातल्या कार्यासारखा राबायला तयार. जात-पात-वर्ण-धर्म सर्व इथेही नांदत होते. पण प्रत्येकाच्या उंबऱ्याच्या आत, साऱ्यांचे धर्म पाळले जात. कुळाची अडचण धन्याच्या हातूनच निपटली जायची. कर्नाटक प्रांतात, आजही इतर राज्यांपेक्षा कर्मठ पद्धती जास्त आढळतात. हा आक्षेप काही अंशी खरा असला, तरी आज झपाट्याने काळ बदलण्याच्या शर्यतीत तो थोडा पिछाडीस आहे खरा, पण नैतिक मूल्ये, विश्वास, एकत्र कुटुंबपद्धत, नातेसंबंध, जिव्हाळा, संवाद अन् माणुसकी याबाबतीत मात्र कर्नाटक अग्रेसरच म्हणावा लागेल. आजमितीला जन्मदात्या मातापित्यांचं ओझं वाटणं, ज्यांनी जन्म दिला, जग दाखवलं त्यांना वृद्धाश्रमात जीवन व्यतित करणं भाग पाडणं, हे सर्रास दिसणारं दृश्य फार कमी प्रमाणात कर्नाटकात आढळतं.

अप्पाजी देशमुखांची सून, प्रथम गावात येणार म्हणजे गावाची लक्ष्मी उंबऱ्यावरचं माप ओलांडून आपल्याच घरी येणार, हे कवतिक साऱ्या गावानं मनानं मिरवलं. सारा गाव रांगोळ्या, तोरणांनी असा सजला, की मंगलाष्टकाच्या सुरांची सारे वाट पाहताहेत असं वाटावं. सनई चौघडे यांचा जल्लोष उसळला होता. अन् परगावाहून भाडोत्री आणलेला बेंडबाजा, सारखा तीच ती गाणी वाजवत होता.

कर्नाटकामध्ये आजही एक खास पद्धत आहे. मोलाने काम करणारी, बाकी कामाच्या आधी अंगण सारवून सुबक नागमोडी, वळणा-वळणाची रांगोळी काढूनच नंतर दुसरी कामं हाती घेणार. मालकीण असो की मोलकरीण. मरवा, दवणा, अबोली, मोगऱ्याचा भरगच्च गजरा प्रत्येकीनं केसात माळायचाच. नाकात मोरणी आणि डोईस गजरा-सव्वाष्णीला पाहिजेच.

आज तर अप्पाजी देशमुखांची सून, सोनपावलांनी मोत्या-माणकांची उधळण करून पहिल्यांदा गावी येणार होती. साऱ्या शिमग्गाला नुसतं आनंदाचं उधाण आलं होतं. माधव अन् मधुवंती यांचं लग्न बंगळूरला झालं तरी सून आणि मुलगा आपल्या गावी मिरवण्याची अप्पाजींची कोण हौस! गावाच्या वेशीपासून दुतर्फा स्वागताला सज्ज असलेल्या, नखशिखान्त नटलेल्या सुवासिनी आणि भरजरी शेमले फडकवणारे त्यांचे घरधनी पाहून, राजे रजवाडे आणि त्यांची स्वारी फिकी वाटावी! फुलांनी सजलेली, कलाबतूने चमचमणारी गाडी, अप्पाजींच्या गढीच्या महाद्वारांत थांबली अन्



अप्पाजींची घरधनीण आणि त्यांच्या तीन भावजया आरती ओवाळून सुनेला माप ओलांडून आत घेत्या झाल्या. वाडा सुगंधानं, संगीतानं, फुलांच्या पखरणीनं मोहरला होता.

आनंद सोहळ्याने भरभरून दिवस कसे फुलपंखी वेगानं सरत होते. आठ-दहा दिवस पापणी लवता लवता सरलेसुद्धा. दिवाणखान्यातून ओसरीतल्या बैठकीत जबरदस्त आवाज घुमला. 'कोण आहे रे तिकडे? आज माधवला अन् सूनबाईला आपल्या घराण्याच्या लक्ष्मीच्या अन् हिरोड्याच्या पायावर घालून आणा.' अप्पाजींचा आवाज म्हणजे नगर नगाऱ्यांचे पडघम. हिरोडा म्हणजे कर्नाटकात मूळ पुरुषाची समाधी.

देवदेव झाल्यानंतर माधव, मधुवंती जरासा श्वास टाकताहेत तोच अप्पाजींची गर्जना 'माधवा, आज आपल्याला फार्म हाउसवर जायचंय सूनबाईला घेऊन. सांगावा धाडलाय कधीचाच.'

घरात या बेताची चर्चा होताना मात्र अप्पाजींच्या सौभाग्यवती माधवच्या मातोश्री अन् वहिन्या, जरा डोळे, नाक मुरडून आपली नापसंती दाखवताना दिसल्या खऱ्या, मात्र माधव अन् मधू फार्म हाउसच्या मजेमुळे जाम खूश.

एक दिवस मुक्काम, फार्मची मज्जा हा बेत ठरवूनच अप्पाजी, माधव, मधू निघालो एकदाचे. फार्मवर पोचल्या पोचल्या स्वागताची जय्यत तयारी माधव, मधूला जाणवलीच. सनई-चौघड्याच्या साथीने सांज कशी सुरमयी झाली होती. फार्मवरील वाडाही नटूनथटून उभा होता. वाड्याच्या महाद्वारातून आरतीचं तबक घेऊन एक प्रौढा हलक्या पावलांनी जवळ येताना दिसली. डोकीस मरवा, दवणा, अबोली, जाईजुई यांचा भरगच्च गजरा अंबाड्यावर सजवलेला. नाकात मूळच्या सौंदर्याची आभा वाढवणारी हिऱ्याची मोरणी आणि लफ्फेदार टोप पदराची इरकली साडी नेसलेली, प्रसन्नवदना पाहून माधवचा चेहरा थोडा आनंदी अन् आश्चर्यचकित झाला. मधू, माधवचे आश्चर्य साऱ्या गड्यामाणसांनी टिपले.

'माधवा अन् मधुवंती, या तुमच्या आजेसासूबाई! यांना वाकून नमस्कार करा. मधू ही मूळची नाजनीन, आपली नाजुका. तुमचे आजोबा तिला नाजू म्हणतात.' अप्पाजींच्या सागंण्यावरून दोघांनी नमस्कार केला. पण माधव, मधू यांच्या चेहऱ्यावरचे प्रश्नचिन्ह मावळलं नव्हतं.

अप्पाजी, मधू, माधव यांची खाजगी मैफील चालली. तो प्रशस्त वाडा, तिथली अलिशान सजावट, तिथली शिस्त आणि नाजूआजींचा तिथला नेटका, आदबशीर वावर, सारं सारं माधवला आधीच माहीत होतं. नाजू फार्मवरची कारभारीण, अगदी घरच्यासारखी- नव्हे - घरचीच. जणू एवढं माधवला माहीत होतं. शिक्षण, मोठमोठ्या डिग्र्या, कॅम्पसमधूनच मिळालेली मोठी नोकरी आणि आज आय.टी.आय. सॉफ्टवेअर इंजिनीअर म्हणून मोठ्या कंपनीत असल्याने माधव कुटुंबाशी जरा दूरदूरच राहिला. आज मात्र अनेक प्रश्नचिन्हं, एखाद्या भेडसावणाऱ्या वादळासारखी भोवती फिरताहेत असं माधवला जाणवलं.

शिमग्गा सारख्या ठिकाणाचं देशमुख प्रस्थ, एक छोटसं संस्थानच. हिऱ्या-सोन्याची मोठी पेढी. सर्व भावंडांची चोख व्यवस्था अन् पतही तेवढीच पंचक्रोशीत. भावंडांत अप्पाजी देशमुख सर्वांत वडीलबंधू. भाऊ-भावजया, नातवंडांनी गजबजलेलं कुटुंब. माधव, अप्पाजींचा वडील मुलगा.

आज फार्म हाउसवर आल्यापासूनच माधव, मधू अस्वस्थच होती. 'माधव, आज तुझ्याबरोबर जरा फेरफटका मारण्याचं मन होतंय' अप्पाजींचं फर्मान होतं हे. घोडागाडी तयार होतीच. माधव अन् अप्पाजींची सवारी निघाली.

'माधव! इथे आल्यापासून तुला अस्वस्थ पाहिलं अन् तुला बाहेर काढलं. कधीतरी तुला सारं कळलंच पाहिजे. मी असेन एकोणीस-वीस वर्षांचा. तुझे दोन्ही काका पाठोपाठचे. अन् आईला छोट्याशा आजाराचं निमित्त झालं अन् आम्ही सारे पोरके झालो. गडगंज श्रीमंती, गढीसारखा वाडा, या वाड्यात येणाऱ्या सव्वाष्णींना कुंकू लावायला घरात सव्वाष्ण कोणी नाही म्हणून



तुझी आई माप ओलांडून या घरी आली.

दु:ख विसरायला काळ हेच औषध. जखम आत असली तरी वरून खपली धरत जाते, तसंच काहीसं. रघुनाथ दळवी हे तुझ्या आजोबांचे परममित्र, अगदी एका ताटात जेवणारे. शिमग्गाला ते मामलेदार असल्यापासून आमचे कुटुंबीयच होते जणू. तुझे आजोबा गोविंदराव रघुनाथकाकाकडे विरंगुळा म्हणून जात असत अन् एका खेपेला येताना रघुकाका, तुझे आजोबा आणि नाजू सगळे आले. तेव्हापासून फार्मवरची कारभारीण म्हणून ओळखली जायला लागली नाजू.

गावात बरीच चर्चा झाली. नातेवाइकांनी अपरोक्ष दूषणं दिली. माधव! मी पण मनोमन खूप नाराज झालो. दादासाहेब-आम्ही वडिलांना दादासाहेब अशी हाक मारायचो भल्या पहाटे मंत्रघोष करत स्नान आटपायचे अन् दोन दोन तास ध्यान! मला ते दांभिक वाटायला लागलं. मी दादांचा तिरस्कार करायला लागलो. त्यांच्या पुढे उभे राहण्याची हिंमत नसलेला मी, डोळ्याला डोळा भिडवून उत्तर द्यायला लागलो. मनात अनेक प्रश्न फेर धरायला लागले. दादा दोन-दोन तास ध्यान-धारणा, पूजा, प्रार्थना, मंत्र कशासाठी करतात? हातून घडत असलेल्या पापाचे परिमार्जन करण्यासाठी हे करतात का? का त्यांना घडल्या गोष्टीचा पश्चात्ताप होतो आहे म्हणून ही साधना चालवली आहे का? दादासाहेबांबद्दलच्या अशा विचारांनी मी दादापासून दूर दूर जात होतो. आमच्यातला जिव्हाळा आटत चालला होता. आदर नष्ट होत होता. आई गेल्यावर आईवडील दोघांचं छत्र म्हणजे दादा, हा माझा विश्वास डळमळू लागला.'

माधव एखाद्या निश्चल पुतळ्याप्रमाणे स्तब्ध, सारं ऐकत होता. अप्पाजी आपल्या तीर्थरूपांसंबंधी सांगत असताना झालेली उलघाल त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती.

आई गेल्यावर दादा अगदी एकाकी झाले. अबोल, कशातही स्वारस्य नसल्यासारखे झाले. कधीकधी गप्पा, पत्ते यासाठी रघुकाकाकडे मात्र जात. सर्व नातेवाइकांनी दादांना दुसरा घरोबा करण्याचा आग्रह केला. गावोगावच्या मातब्बर स्थळांची ये-जा सुरू झाली. पण एके दिवशी दादांनी सर्व वडिलधाऱ्या, गावच्या ज्येष्ठ, श्रेष्ठांसमोर निक्षून सांगितलं. 'माझी तीन मुलं बुद्धिसंपन्न, घराण्याला शोभेशी परमेश्वरानं मला दिली आहेत. असे असताना त्यांना दुसऱ्या घरोब्याने होणारा सावत्रपणाचा जाच मी याच डोळ्यांनी पाहू का? अगदी अशक्य. यापुढे या विषयाला पूर्णविराम!'

दादांचे हे वाक्य उच्चारतानासुद्धा अप्पाजी सद्‌गदित झाले. 'माधवा! चारचौघांत, तोंडी या विषयाला पूर्णविराम दिल्याने, मनात ठसठसणारं एकाकीपण विसरता येईल का?

माधव, अप्पाजी फार्मवरील मुक्काम संपवून मधुवंतीसह परतले अन् परत बंगळूरला प्रयाण.

माधव ज्या उत्साहाने मधुला घेऊन शिमग्गाला आला तितकाच जड ओझ्याने, नकळत थकल्यासारखा झाला. एका न सुटणाऱ्या गुंत्यात अडकल्यागत त्याचं सारं शरीरच जड झालं. अजबच सगळे योगायोग! काही कळेनासं झालं. माधव जेवढा विचार करी तेवढाच जास्त विमनस्क होत चालला होता. माझे संस्कार, नीति-अनीतिची चाड. सारं फसवं होतं का? प्रत्येक पिढीत जनरेशन गॅप असणारच. एक पिढी दुसरीला खोडून काढणार हा जणू शिरस्ताच झालाय आजकाल. नीतिमूल्यांचा अर्थ बदलत चाललाय. श्लील, अश्लील यांच्या सीमारेषा धूसर झाल्या, मानमर्यादा, वडीलधारे यांचे अवमूल्यन चाललेले पाहून माधव सैरभैर होऊन बंगळूरला परत चालला होता. प्रेमातलं समर्पण संपत चाललंय, तिथेही व्यवहार, आसक्ती, चैन अन् मनमानीचं थैमान सुरू आहे असं वाटून माधवला वाटलं, आपले संस्कार खरे की आज आपण पाहतो त्या घडामोडी खऱ्या? अप्पाजींनी फार्म हाउसवर जी घटना सांगितली तिचा अव्हेर, तिरस्कार करणं उचित की स्वीकार करणं बरोबर? प्लेटॉनिक लव्ह ही स्वर्गीय कल्पनाच आहे का? जागतिकीकरणाने माणसाची जीवनशैली बदलली आहे, की माणसाची आसक्ती पूर्वीपासूनच होती; ती त्याने दडपून ठेवून नुसता सभ्यतेचा मुखवटा धारण केलाय का? पैसा कुणासाठी मिळवायचा? आपल्या आनंदासाठी. उद्या कुणी पाहिलाय? हेच आजचं खरं वास्तव आहे का? भावनिकतेपासून प्रॅक्टिकल होण्याकडे

वाटचाल हेच अंतिम सत्य आहे का? माधव रात्र रात्र जागून विचारांच्या तुफानात कुठे वाहवत जायला लागला, न कळे!

सूर्य तोच असतो पण रोज नव्याने उगवतो, त्याचप्रमाणे माधवच्या विचारांची प्रखरता तीच होती. पण नव्या दिवसानिशी त्या प्रखरतेची बोच नव्याने वाढत होती. आणि काळजीच्या सुरातलं अप्पाजींचं पत्र मिळालं. आजोबांना ॲटॅक आला होता.

मधू अन् माधव शिमोग्गाला पोचले तेव्हा रघुनाथकाका आणि सारी मंडळी चिंतातुर दिसली. आजोबा, रघुकाका वरचेवर येत जात पण आजचा नूर वेगळाच होता. अप्पाजी, आई, सर्व काका-काकू यांना छत्र हरपल्याची हळहळ व्यक्त करून नातेवाइक मंडळी सांत्वना देत होती. आणि नाजू एका कोपऱ्यात निर्जिव पुतळ्यासारखी स्तब्ध पण निर्विकार. तिची कोणी दखलही घेतली नाही. जिचं सर्वस्व हरवलं, त्याचं कुणालाही दु:ख नव्हतं. आजोबा जेमतेम साठीला आलेले.

आजोबांच्या जाण्यापेक्षा नाजू, एकटी निराधार, निर्विकार कोपऱ्यात पाहून माधवच्या दु:खाचा एकदम बांधच फुटला. नाजूचं कोण होतं नात्याचं? स्वत:ची सख्खी सोयरी, रक्ताची नाती तोडून, नाजू आजोबांबरोबर आली. वीस वर्षं एकनिष्ठेने राहिली. इथली नवी नाती आपली करण्याचा, घट्ट जोडण्याचा प्रयत्न केला. अर्ध्यावर विस्कटलेला गोविंदरावांच्या संसाराचा सारीपाट पुन्हा मार्गी लावला. गोविंदराव आजोबांच्या मुला-नातवंडांना जिवापाड प्रेम लावलं. तिनं देशमुखांच्या गोतावळ्यात स्वत:ला गुंतवून घेतलं. पण आम्ही मात्र तिला आपलं म्हटलं नाही. स्वार्थ, समाज, प्रतिष्ठा यांच्या बुजगावण्यात तिच्या निष्ठेची मात्र देशमुखाच्या घरच्यांनी अवहेलना केली. त्या जिवाची नुसती परवड झाली. कोपऱ्यात निराधार बसलेल्या नाजूकडे माधव एकटक पाहतच राहिला. तिचं सांत्वन कशा अन् कोणत्या शब्दांत करणार? अन् हे धैर्य कोण दाखवणार? माधवचे पायदेखील जमिनीवरून हालले नाहीत. भलेही मनात दु:खाचा ज्वालामुखी भडकला, तरीही माधवही अखेर देशमुखच ठरला!

अप्पाजींचा हात माधवच्या खांद्यावर दिलाशाखातर पडला. पण दोघांच्या मनाची उलघाल जास्तच उचंबळली. रात्री निवांतपणे अप्पाजी माधवला शांत करताना बोलत होते. 'माधवा, अरे मी दादासाहेबांना समजू शकलो नाही. त्यांच्या पूजापाठ, अर्चना, साधना, प्रार्थना यांच्याविषयी सुद्धा माझ्या मनात तिरस्कार वाटला. त्यांना कोणत्याही गोष्टीचा पश्चात्ताप झाला नव्हता. अरे, मनीचा संवाद साधण्याला फक्त बायकोच हवी का? सहचरी, मैत्रीण, सचिव आणि एकमेकांचं सुखदु:ख समजून घेणारी बरोबरची व्यक्ती बायको म्हणून नव्हे, तर मदतनीस, सल्लागार, सचिव या कोणत्याही नात्याने पुरुषाच्या जीवनात कोणी स्त्री येऊच शकत नाही का? शरीराच्या येणाऱ्या संबंधातच आपल्याकडे अधिक प्राधान्य दिलं जातं, असं का? त्यामुले मनाची काय अवस्था होत असेल याचा विचारच कुणी करत नाही. एक पुरुष अन् स्त्री यांचे पतिपत्नीखेरीज म्हणजे शरीरसंबंधाशिवाय वेगळे संबंध असूच शकत नाहीत का? माधवा! प्रेमाची व्याख्याच तोकडी झालीय आजकाल. आत्मिक प्रेम, प्लेटॉनिक लव्ह जगातून नष्टच झालंय का? माधवा! मी खरा अपराधी आहे. दादांबद्दल मन शंकित करून घेऊन मी पुत्रधर्मच कलंकित केला. त्यांनी आमच्या मायेखातर, आमच्या पालन-पोषणासाठी स्वत:च्या भावभावनांचा त्याग केला. आई गेल्यावर मनीचं ऐकणारी दिलखुलास नाजू त्यांच्या आयुष्यात आणली गेली. तिचासुद्धा आम्ही द्वेष केला. त्यांची पूजा, साधना पश्चात्तापाची नव्हती. तर स्वत:ला जाणून घेण्याची होती. नियतीनं दिलेला कौल झेलून, एक समर्थ जीवन जगण्याच्या जिद्दीची ती साधना होती.'

'आज जागतिकीकरणाने प्रत्येक माणसाची जीवनशैलीच बदलत गेलीय. मी, माझं हे ब्रीद झालंय साऱ्यांचं. प्रेम, विश्वास, एकत्र कुटुंब, जिव्हाळा अन् समर्पण हे शब्द, शब्दकोशातच राहिले अन् ते फसवे वाटताहेत आजच्या पिढीला. सुख आणि आनंद यातला फरक फारच थोड्यांना उमजलाय. सुख ऐहिक आणि आनंद आत्मिक असतो हे अनुभवल्याखेरीज समजणारच नाही. पैसा, आर्थिक सुबत्ता ही सुखाची महत्त्वाची गुरूकिल्ली आहे का? माधवा! व्यक्ती तितक्या प्रवृत्ती हे खरं, पण समाजासाठी अवैध की वैध याचा शोध आजच्या पिढीनंच घ्यावा. मी मनोमन पितृऋणीच राहणार. इतक्या पारदर्शी व्यक्तिमत्त्वाचा वेध मी घेऊ शकलो नाही. मागे वळून पाहताना भूतकाळच्या घटनांचा नव्यानं अर्थ लावण्याचा मी कधी प्रयत्न केला नाही.'

अप्पाजींचा करुणालाप ऐकत असताना सुद्धा, निस्तब्ध दगडासारखी बसलेल्या नाजूचाच विचार माधवच्या मनात थैमान घालत होता. आपलं म्हणून कवटाळायला अख्ख्या देशमुखवाडीत कोणीतरी होतं का तिचं हक्काचं? खऱ्या अर्थानं नाजू आज पोरकी, अनाथ अन् परकी झाली होती. आज मात्र माधवला नाजू खरंच जवळची, आपली कोणीतरी वाटत होती.

रूढी, परंपरा मोडीत निघत होत्या, तरी त्या अनिष्ट परंपरांच्या जोखडातून समाजमनाची, प्रवृत्ती पूर्ण बदलली नाही हेच माधवलाही जाणवत होतं. प्रवाहाच्या विरुद्ध पोहून जाण्याची शक्ती माधवमध्येही नव्हती.

'कालाय तस्मै नम:' 'दिस येतील दिस जातील' या क्रमाने गोविंदरावांविना रहाटगाडा चालू लागला. अन् थोड्याच दिवसांत रघुकाका स्टेट बँकेचा एक लिफाफा घेऊन आले. सर्व देशमुख कुटुंबीयांना बैठकीस आमंत्रण दिलं गेलं. रघुकाकांएवढे विश्वसनीय आजोबांना दुसरं कोणीच वाटलं नाही का? रघुनाथकाकांनी सर्वांसमक्ष गोविदरावच्या मृत्युपत्राचे वाचन केले. त्यात

फार्महाउसवरील वाडा व लगतची आठ एकर जमीन नाजूच्या नावे केली होती. नंतरच्या विल्हेवाटीचा हक्क नाजूलाच देण्यात आला होता. कुलमुखत्यार तीच होती. उपरोक्त संपत्ती आजोबांची स्वकष्टार्जित असल्याचा उल्लेखही मृत्यूपत्रात नमूद होता.

अख्ख्या देशमुखांची गढीच हादरली. कित्येकांनी तर मुठी आवळल्या. अप्पाजींच्या पाठचे दोन्ही भाऊ, युद्धावर निघालेल्या रणवीरासारखे, छाती पुढे काढून उभे ठाकले. दोन्ही काकू, मावशा, आत्या साऱ्या बोटं मोडून शिव्या-शापांची लाखोली वाहत्या झाल्या. शिमग्गात ही बातमी वाऱ्याच्या वेगानं पसरली. गप्प होते, ते फक्त अप्पाजी आणि माधव.

रघुकाकांनी भावंडांची खास बैठक बोलावली. 'शामराव, गजानना, ही आपसांतली बाब इथेच मिटवा. देवाने तुम्हा साऱ्यांना गडगंज दिलंय. थोड्यासाठी मनात किल्मीष आणू नका.'

'काका, मी शामराव या मृत्युपत्राविरुद्ध कोर्टात जाणार' गजानन.

'अहो काका, इतके दिवस फार्महाउसवर राज्य झालं, बस झालं! आता मी पण गप्प बसणार नाही. कोर्ट कचेरीपेक्षा आमची पंचायत बोलवा.'

रघुकाका-'अरे बाळांनो, गोविंदाने आयुष्य कसं काढलं मी एकटाच जाणतो. केवळ तुम्हा लेकरांसाठी अखेरपर्यंत तो स्वत:शीच लढला. रूढी, परंपरा यांचा मुलाहिजा न ठेवता, सामान्य व्यक्ती असूनही त्या अनिष्ट रूढी-परंपराविरुद्ध लढत राहिला. तो एका सामान्य व्यक्तीचा नियती अन् दैवाविरुद्ध लढा होता. मनासारखे दान पडले नाही म्हणून सारीपाट उधळून लावणारेच बहुसंख्य असतात. पण प्रपंचाचा समतोल सांभाळून मनोरा शाबूत ठेवण्याचे भागीरथ प्रयत्न गोविंदाने केलेत. अन् गेला तोही जेत्याच्या अविर्भावातच. नाजू कोण तुमची? पण ती आई झाली, माया लावली. सगेसोयरे तोडून तुम्हाला जोडलं. फक्त देशमुखी रुबाबाचा डोलारा सांभाळताना गोविंदाच्या खांद्याला खांदा देऊन उभी राहिली.'

शामराव गजानन गर्जले, 'बस्स! बस्स! आम्हाला त्रिवार मंजूर नाही ही वाटणी.'

पंचायतीत निवाडा करणारे प्रतिष्ठित, भाऊ-भावजया सारे हजर. पंचायत न्याय मान्य असल्याची सर्वांची कागदोपत्री मंजुरी झाली.

पंचश्रेष्ठ भगवानराव सरदेशमुखांच्या समक्ष पुन्हा मृत्युपत्राचे वाचन केले गेले. दोन्ही लहान भावांच्या फिर्यादी, नाखुशी आणि अरेरावीयुक्त भाषणं, शेजारीच अप्पाजी मात्र माधवबरोबर शांत, अबोल, निश्चल बसलेले.

लहान्या गजानन म्हणाला, 'अहो, वीस वर्षं पोसलंय हिला. अन्न, वस्त्र, निवारा कशाचीही ददात पडू दिली नाही. पण आज हे अतीच झालंय. आमच्या देशमुख घराण्याची ही कोण, कुठली वाटेकरी होणार? शामराव, पंचक्रोशीत नावाजलेलं आमचं देशमुख घराणं. आज या मृत्युपत्रातला मजकूर जगजाहीर झालाय. आम्हाला समाजात तोंड काढायला जागा राहिली नाही.'

'खबरदार!' एवढा वेळ स्तब्ध, अबोल बसलेले, पण नजरेतून अंगार बरसवणारे अप्पाजी कडाडले, 'खबरदार! समाज? शाम, कुठल्या समाजाची भाषा करतोयस? आपलं घर आईविना पोरकं झालं होतं तेव्हा कुठे गेला होता तुझा समाज? नीति-अनीति, श्लील-अश्लील या मर्यादा प्रत्येकानं फक्त दुसऱ्यासाठी आखलेल्या आहेत का? काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्यावर दगडफेक करता कामा नये. सत्य-असत्य, हिंसा-अहिंसा या शब्दांच्या सीमाच आता पुसट झाल्या आहेत, असं वाटायला लागलंय. माणसानं कसं जगावं अन् दुसऱ्याला कसं जगू द्यावं याचं कोष्टकच पुसून टाकलंय साऱ्या माणसांनी. या असल्या माणसांचा तुझा समाज ना? असल्या याच समाजाचा दाखला देतोयस ना शाम?

गजानना! आईची माया जिनं लावली तिचं मोल तू पैशात केलंस! तू दिलेल्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याच्या बदल्यात जिनं मऊ साईसारखी प्रेमाची पाखर घातली त्याचं मोल तू जमीनजुमल्यात केलंस.

'पंच अन् पंचायतपरमेश्वर मला देवाच्या जागी आहेत. माझी भावंडं अजून अनुभवी नाहीत. हे दोघे आज या मृत्युपत्राविरुद्ध कोर्ट-कचेऱ्यांत फिर्याद करोत. हायकोर्ट, सुप्रीमकोर्ट कुठेही जावोत. एवढे लक्षात असू द्या, या सर्व कोर्टापेक्षा श्रेष्ठ, आणखी एक न्यायालय आहे. ज्या जगन्नियंत्याने माणसाला या जगात भावभावनांसहित एक हृदय देऊन पाठवलंय. मानवतेचा स्रोत त्याच्याजवळ देऊन पाठवलंय. त्या न्यायालयात आपल्या सर्वांना जबाब द्यायचा आहे. माझे पिताश्री गोविंदराव यांचे मृत्युपत्र, त्यांची इच्छा मला शिरसावंद्य आहे. माझे शतश: प्रणाम आहेत दादासाहेबांना अन् नाजूआईला.'

पंचकमेटी बरखास्त झाली. पण आजही त्या जगन्नियंत्याने, सर्व सत्ताधीशानं, परमेश्वराचं न्यायालय न्यायनिवाडा करण्यासाठी सदैव खुलेच आहे, आपणा सर्वांसाठी!

**– विमल कुलकर्णी**

द्वारा- डॉ. भारती तडवळकर, ए/६, जामदार टॉवर्स,
१३८, मुरारजी पेठ, किल्ला बालोद्यानसमोर,
सोलापूर - ४१३००१
भ्रमणध्वनी - ९८२२१५२३३७

WISH YOU
HAPPY DIWALI
AND
A
PROSPEROUS
NEW YEAR



FROM
A WELL WISHER

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India

# तुमचे घर आनंदाने उजळू दे,
# तुमच्या सर्व मनोकामना परिपूर्ण होवु देत.

सणासुदीला वर्षाव सवलतींचा



• व्याज दरांमध्ये विशेष सूट • प्रक्रिया शुल्क नाही

डायरेक्ट हाऊसिंग फायनान्स लोन | सेन्ट पर्सनल गोल्ड लोन

सेन्ट ज्वेल | सेन्ट वेहिकल | सेन्ट सफर

पर्सनल लोन (कॉर्पोरेट/नॉनकॉर्पोरेट)

*ही योजना फक्त मर्यादित कालावधीसाठी आहे*

अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाईट www.centralbankofindia.co.in वर लॉग ऑन करा किंवा संपर्क साधा 1800 200 1911 ( टोल फ्री )

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केले.